# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे  इतिवृत्तांत

**दिनांक १९-०४-१९९५ ते ३०-०३-१९९६**

## रजिष्टर क्र. ०१

# ***औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद***

**महापौर उपमहापौर व स्थायी समीती सदस्यांच्या निवडणुकीसाठी दि. २९ एप्रील १९९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेची इतिवृत्तांत सार्वत्रीक**

**औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण निवडणुक १९९५ मधे निवडुण आलेल्या ८२ नगर सेवका मधुन मा. महापौर उपमहापौर व १६ स्थायी समीती सदरयांच्या निवडणुकीसाठी मुंबई प्रतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील व निवडणुकीसाठी मुंबई प्रतिंक निवडणुक कामकाज नियमावली मधील तरतुदी नुसार दि. २९ एप्रिल १९९५ रोजी सकाळी ११-०० वाजता प्रशासकाच्या अध्यक्षते खाली सर्व साधारण सभा आयोजीत करण्यात आली होती. या सभेमध्ये निम्नीर्दीष्ट स. नगरसेवक उपस्थीत होते.**

सर्व श्री श्रीमती

१. सौ.रखामन बाई खंडेराव लोंखंडे
२. श्री. अफसर खान यासीनखान
३. श्री. प्रभाकर सिताराम विधाते
४. सौ. साजेदा बेगम
५. श्री. मन्सलीभ म. हनिक कुरैशी
६. श्री. गौतम भागाजी खरात
७. श्री. गणेश किशनराव वानाखेडे
८. सौ. रजनी रमेश जोशी
९. सौ. उषाबाई दिलीप गायकवाड
१०. सौ. विमल बाई नंदकु मार मुंडलीक
११. सौ शिलाबाई सिताराम गुंजाळे
१२. श्री. लांडगे गौतम लिंबाजी
१३. श्री सुंर्यवंशी महादेव पुडंलीकराव
१४. श्री . भालेराव अभिमन्यु रामभाऊ
१५. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
१६. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ
१७. श्री. सोनवणे सुदाम रामदास
१८.श्री . इंगळे रविद्र बाबुराव
१९. श्री. बैनाडे कवर सींग किंसन सींग
२०. श्री पद्मा बाबुराव शिर्दे
२१. श्री. टाकळकर सुभाष भिकाजी
२२. श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद्
२३. श्रीमती. चंपाबाई विश्वनाथ पांचाल
२४. श्रीमती. धनश्री अशोक विसपुते
२५. श्रीमती. फरहद बानो मो. नवाब
२६. श्री अजिज खान अमजउल्ला खान
२७. श्री अजिज खान गणी अमजउल्ला खान
२८. श्रीमती आबेद बेगम मो. मुस्ताफा
२९. श्री. मुस्ताक अहमद

३०. सौ. नुरजहा बेंगम अ. रहमान खान
३१. श्री. वसंत विनायकराव देशमुख
३२. श्री. हाजी मोंहंमद मोहसीन अहमद हाजी बशीर अहमद
३३. श्री. मोहसीना बीलकीश विश्वारोद्यीन
३४ श्री. अ. जावेद रजाक
३५. श्री. जाहेदा बेंगम म. जमीर
३६. श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव
३७. सौ. यशोदा धनंजय वाडेकर
३८. श्री. तुलसीबागवाले किशोर बाबुलाल
३९. श्री. गंगवाल पुष्पाबाई सुरेश चंद्र
४०. श्री. हमीदोद्दीन ताबा फसीयोद्यीन
४१. श्री. म. अ. रऊफ म.अ. माबुद
४२. श्री. स.अ. एकबालोद्यीन स.मो. कुतुबुद्यीन
४३. श्री. खाकोरडीया धीरज शांतीलाल
४४. श्री. जैस्वाल प्रदीप शिवनारायण
४५. श्री. स. अली. मीरा सलामी
४६. श्री. लाहोट रमेश दिपचंद
४७. श्री. संजय किसनराव केनेकर
४८. श्री. फौयाज अहेमद महमद हाजी कुरैशी
४९. श्री. वाघमारे मुक्ताबाई सुदाम .
५०. सौ. लताबाई दलाल
५१. श्री. ओक जायंबत केशवराव
५२. सौ. अलका रमेश पाटील
५३. श्री. धोर्डे शंकुतला हरीदास
५४. श्री. अ. रशीदखान (मामु )
५५. श्री. कच्छवाट सुभाष लक्ष्मीनारायण
५६. कु.माया लिंबाजी लाडवाणी
५७. श्री. डॉ. कराड भागवत किशनराव
५८. श्री. आव्हाड सविता संजय
५९. सौ. निर्मला विठठल कांबळे
६०. श्री. अ. रशीद अ. सत्तार
६१. श्री. धिल्लन तरवेद्रसींग विरेंद्रसींग
६२. श्री. विरवारोधीनवीता खुदबोधीन
६३. श्री. जैन विकास रतनलाल
६४. श्री. गंगाधर सुखदेव गाडे
६५. श्री. बारवाल गजानन रामकिसन
६६. श्री. ओबेराय मनमोहन सिंग करमसिंग
६७. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
६८. श्री. जोशी संजय रामदास
६९. श्री गीरजाराम नानाराव हाळनोर
७०. श्री अविनाश लक्ष्मण कुमावत
७१. सौ. जोत्सनी दौलत हिवराळे

७२. श्री. राजकुमार ऊर्फ सांडू बचाटे
७३. सौ. राधाबाई तळेकर
७४. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर
७५. श्री. विठठल किसन जाधव
७६. श्री. मेहेर विजय कुमार गजानन
७७. श्री. काळसे मंदा धनंजय
७८. सौ कोल्हे सुनंदा उत्तम
७९. श्री. गांगवे बन्सी तुळशिराम
८०. श्री. घडामोडे भगवान देविदास
८१. श्री. नवपूते कचरु चंद्रभान

सभेची सुरुवात सकाळी ठीक ११-०० वाजता झाली प्रशासंकानी नवनिर्वाचीत स. नगर सेवकांचे स्वागत केले व सभेत होणा-या कामकाज विषयी माहिती उघ्दुत केली. दि.१९/४/९५ रोजी वितरीत केलेल्या विषय पत्रीकेनुसार सर्व प्रथम महापौर पदासाठी मतदान पध्दतीने निवडणुक घेण्यात येणार असल्याचे निवडणुकी बाबत च्या सर्व साधारण नियमाची माहिती मा प्रशासंकानी सभागृहात दिली स. नगर सेवक प्रदिप जैस्वाल व त्यांच्या साथी दारांनी सभेची सुरुवात "वंदे मातरम " गीताने व्हावी अशी मागणी केल्यावरुन अध्यक्षांनी त्यास परवानगी दिली. महापौर पदासाठी ज्या उमेदवारांनी नामांकण पत्रे दाखल केली होती. त्यांची नांवे सभागृहात जाहीर करण्यात आली. व नामांकन पत्रे परत घेऊ इच्छीनम्यासाठी ३० मिनीटाचा आवधी देण्यात आला ( सकाळी ११-०० ते ११-४० ) महापौर पदासाठी खालील स. नगर सेवकांनी आपली नामंकरण पत्रे दाखल केली होती.

१. सौ. अल्का पाटील
२. सौ. कोल्हे सुनंदा उत्तम
३. जाहेदा बेंगम म. जमीर
४. सौ. रजनी रमेश जोशी
५. सौ. दलाल लता श्री निवास

उपशेक्त वेळात सर्व सौ. अल्का पाटील सौ. जोशी रजनी रमेश व दलाल लता तीन नगर सेवकांनी आपली नामांकन पत्रे परत घेतल्याने.

१. सौ. कोल्हे सुनंदा उत्तम
२. श्री . जाहेदा बेंगम म. जमीर

या महापौर पदासाठी उभ्या असल्याचे म अध्यक्षानी सभागृहात जाहिर केले स. श्री मुजील आलमशा खान हे` बंदीगृहात असल्याने आजच्या सभेसाठी उपस्थीत राहू शकत नाहीत. तेव्हा ही सर्वसाधारण सभातीन दिवसा साठी पुढे ढकलण्यात यावी. स. श्री. मनमोहनसिंग ओबेराय व त्यांच्या सहका-यांनी या संदर्भाने मा. अध्यक्षांना निवेदन सादर केले स. श्री. मुजीब आलमशा खान यांना आजच्या बैठकीत उपस्थीत राहता यावे या संदर्भाने तुरुंग आंधेका-यांना पत्र पाठविले असल्याचे मा. प्रशासकांनी सभागृहात सांगीतले स. मनमोहनसिंग व त्यांच्या साथीदारांनी यावर सभात्याग केला.

दुपारी १२-१५ वाजता महापौर पदांच्या निवडणुक प्रक्रीयेस सुरुवात झाली. सर्वप्रथम मतपेटी पुर्णता रिकामी असल्याचे सभागृहात दाखविण्यात आले व ती कुलूप बंद करण्यात आली व सील करण्यात आली मा प्रशासंकानी मतदानाची पध्दत सभागृहात समजावून सांगितली .मत पत्रीके बाबत काही नगर सेवकांनी मतदानाची उपस्थीत केलेल्या शांके बाबत मा. प्रशासकांनी खुलासा केला की कोणीही कोणास मतदान केले ही बाब गोपनीय रहावी म्हणून मतपत्रीका एकत्र मिसळल्या जातील व नंतर त्या मतदानासाठी उपलब्ध करुन

दिल्या जातील दुपारी १२-१५ वाजता मतदानास प्रारंभ झाला. व १-०० वाजता मतदान संपले. दरम्यानच्या काळात ज्या स. नगर सेवकांनी मतदान केलेले नव्हते त्यांची नांवे पुन्हा सभागृहात वाचुन दाखविन्यात आली. मत मोजनीचा ठिकाणी उमेदवार आपला प्रतीनीधी पाठवून इच्छीत असेल तर त्यांनी नांव अध्यक्षाकडे द्यावीत असे मा. प्रशासकांनी सुचविल्या वरुन दोन्ही उमेदवारांनी आपले प्रतीनीधी मत मोजनी ठीकाणी पाठविले सदर प्रतीनिधी मत मोजनी पेटी सदर प्रतीनिधी समोर मत पेटी उघडण्यात येवून मत पेटीतील मत पत्रीकांनी मोजनी करण्यात आली मा. अध्यक्षानी मत मोजनी संपल्या नंतर निकाल घोषीत केला तो खालील प्रमाणे.

एकूण झालेले मतदान ४८

सौ. कोल्हे सुनंदा उतम ४८

सौ. जाहेदा बेंगम म.जमीर ००

मा. अध्यक्षांनी सौ. कोल्हे सुंनंदा उत्तम या ४८ विरुध्द ०० मतांनी विजयी झाल्याचे घोशीत केले नवनिर्वाचीत महापौर सौ. सुंनंदा उत्तम कोल्हे याचें मा. अध्यक्षांनी स्वागत केले. व वाज दंड त्यांचे कडे सुपूर्द केला. सभेचे पुढील कामकाज मा महापौरांच्या अध्यक्षाते खाली सुरु झाले.

दुपारी १-२० वाजता नगर सचीव यांनी मा महापौरांच्या आदेशानुसार उपमहापौर पदाच्या निवडणुकी साठी अर्ज मागे घेण्यासाठी ३० मिनीटाचा अवधी देण्यात येत असल्याचे घोषीत केले . उपमहापौर पदासाठी खालील स. नगर सेवकांनी आपली नांमाकण पत्रे दाखल केली होती.

१. श्री पाटील नरेंद्र यादवराव
२. श्री निाकाळजे प्रकाश भाऊराव
३. श्री लांडगे गौतम लिंबाजी
४. श्रीमती नुरजहॉ बेंगम अ.रहेमान खान
५. श्री मेहेर विजय कुमार गजानन
६. विखारोद्यीन पिता खुतुबद्यीन
७. श्री अफसर खान यासीन खान
८. सौ. जोत्सना दौलत हिवराळे
९. कु माया लिंबाजी लाडवाणी

नवनिर्वाचीत महापौर च्या अभिनंदना दाखल स. सदश्यांनी समायोजित भाषणे केली मा. महापौराची छायाचित्रे काढण्यासाठी छायाचित्रकारांना परवानगी देण्यात आली.

स. सदश्यांनी श्री गंगाधर गाडेयांनी

सभागृहाची गणपूर्ती ही २/३ नसल्याने सभा घेणे योग्य नाही. असा मुद्या उपस्थीत केल्यावरुन मा. आयुक्तांनी खुलासा केला की सभेच्या काम काजासाठी १/३ सभासदांची उपस्थीती आवश्यक आहे व ती सभागृहात आहे. स. स. श्री गंगाधर गाडे मनमोहनसिंग ओबेरॉय व इतर काही सदरयांनी मुद्या उपस्थीत केला की सभागृहात काही नगर सेवक वारवार औरंगाबाद शहराचा उल्लेख संभाजी नगर करीत आहे. यावर मा महापौरांनी खुलासा केला की, आजची सभा ही केवळ निवडणुकीसाठी आहे. विरोधी पथाच्या मागणीवर पुढील बैठकीत विचार केला जाईल.

उप महापौर पदाच्या निवडणुकीतून आपले नामांकन पत्रे परत घेतल्या नंतर खालील सन्सदस्य स. नगर सेविका उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी उभे असल्याचे नगर सचीव सांनी सांगीतले

१. श्रीमती नुरजदा बेगम अ रहेमान खान

२. सौ जोत्सना दौलत हिवराळे

छायाचित्रकारांनी दिलेल्या निवेदनावरती मा. आयुक्तांनी स्पष्ट केले काही गेर समजुतीतून हा प्रश्न उदभव केला आहे. सर्व पत्रकाराना बसण्यासाठी गॅलरीच्या पासेस देण्यात आलेल्या आहेत व मा महापौरांनी निवडणुक झाल्यांनतर छायाचित्रे घेण्यासाठी परवानगी देण्यात येईल ही बाब पुर्वीच स्पष्ट केली होती. यास काही तरी गैरसमज निर्माण झालेला आहे. पत्रकारांना आमचे नेहमीचे सहकार्य राहीलेले आहे.

उपमहापौर पदासाठी निवडणुक प्रकीया सुरु होताअसल्याचे मा आयुक्त यांनी सांगीतले दुपारी (२वा ४५मि ) नी सर्व प्रथम मत पेटी असल्याचे सभागृहात दाखविण्यात आले त्यांनतर मतपेटीस कुलुप लावून सील करण्यात आली नंतर मा. आयुक्तांनी सीलवर मतपेटीवर स्वक्षरी केली. दुपारी ३.१५ वाजता मतदान संपले मतदानाचे वेळी ज्या स. सदसयांनी मतदान केले नाही त्यांनी मतदान करण्याबाबत पुनश्च विनंती करण्यात आली. मतदानाचे वेळी ज्या मतदारांना लिहीता वाचता येत नाही. त्यांना महानगरपालिका अधिका-यांनी सहकार्य केले मत मोजनी च्या वेळी उमेदवार किंवा त्यांचे प्रतीनिधी व्यास पीठावर यावे अशी विनंती मा आयुक्तांनी केली त्या प्रमाणे उमेद वारा किंवा त्यांचे प्रतीनिधी हजर होते मत पत्रीकेच्या छानगी नंतर मत मोजनी करण्यात आली. दुपारी ३.२५ वाजता महापौर यांनी खालील प्रमाणे मत मोजनीचा निकाल घोषीण केला.

| | | |
|---|---|---|
| १ | एकूण झालेले मतदान | ४८ |
| २ | सौ. जोत्सना हिवराळे | ४८ |
| ३ | नुरंजहा बेगम | ०० |

सौ. जोत्सना हिवराळे या ४८ विरुध्द ०० मतांनी उपमहापौर पदासाठी विजयी झाल्याचे मा. महापौर यांनी घोषीत केले या वेळी मा आयुक्तांनी छायाचित्र कारांना छायाचित्र घ्यायचे असल्यास घ्यावे.

असे सांगीतले यानंतर उपमहापौर यांनी सौ. जोत्सना हिवराळे यांनी सर्वाचे अभार मानुन समायोजित भाषण केले.

त्यांनतर स्थयी समीतीच्या १६ सदश्यांची निवड करण्यासाठी निवडणुक प्रकीया सुरु होत असल्याचे नगर सचिव यांनी सांगीतले उमेदवारी मागे घेण्यासाठी ३० मिनिटाचा वेळ देण्यात आला या वेळी खालील उमेदवारांनी अर्ज मागे घेतले.

१. मोहसीना बीलकीश
२. कोकाटे काशीनाथ
३. पाटील नरेंद्र यादवराव
४. मोहसीन अहमद
५. आबेदा बेगम म. मुस्ताक
६. बारवाल गजानन रामक्सिन
७. संजय रामदास जोशी
८. जावेद रज्जाक
९. संजय कि सनराव के नेकर
१०. सौ. अल्का रमेश पाटील
११. सौ.लोंखडे रुखमनबाई खंडेराव
१२. तुपे त्र्यंबक गणपतराव
१३. विठठल किसन जाधव
१४. ढगे नरसींग मुरलीधर

जे उमेदरवार स्थायी समीतीच्या सदस्या साठी उभे आहेत त्याची नांवे खालील प्रमाणे आहे.

१. अ. रशीद खान (मामु)
२. कच्छवाह सुभाष नारायण
३. कराड भागवत कि सनराव
४. गौतम भागाजी खरात
५. प्रदिप शिवनारायण जैस्वाल
६. जोश्ी रजनी रमेश
७. टाकळकर सुभाष भिकाजी
८. प्रकाश भाऊराव निकाळजे
९. बैनाडे कवरसिंग किसनसिंग
१०. म. मुस्ताक अहमद
११. माया लिंबाजी लाडवाणी
१२. मेहेर विजय कुमार गजानन
१३. विधाते प्रभाकर सिताराम
१४ शिंन्दे पद्मा बाबुराव
१५. स. अ.एकबालोद्दीन सन्मोकुतुबुधीन
१६. स. अली मीरा सलामी
१७. सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव
१८. सोनवणे सुदाम रामदास
१९. हमीदोधीन ताबा

मा. आयुक्तांनी सांगीतले की प्रत्येक उमेदवारास १६ मते येतात सदर १६ मते एका उमेदवारास देता येते किंवा मतांची विभागणी करता येंते परंतु १६ पेक्षा जास्त मत नोंदल तर ती मत पत्रीका अवैध ठराविण्यात येईल तसेच मत नोदंविताना मत पत्रीके वर फुली मारावी या पेक्षी छायचित्र काढण्यासाठी सभागृहाच्या परवानगीने मा आयुक्तांनी मा महापौर यांचे समोरील राजदंड मा. महापौर यांना सुपुर्द के ला. ज्या सन्मान्य सदस्यांना लिहीता वाचता येत नाही त्यांना मतदानासाठी महानगरपालिका अधीकारी सहकार्य करतील असे मा. आयुक्तानी सांगीतले त्यांनतर मत पेटी रिकामी असल्याचे सभागृहात दाखविण्यात आली. मत पेटीस कुलुप लावुन नंतर सील करुन त्यावर मा. आयुक्तांनी स्वाक्षरी के ली. दुपारी ठीक ४-०० वाजता मतदानास सुरु वात झाली ५-३० वाजता मतदान संपले त्यांनंतर मा. आयुक्तांनी सांगीतले की मत मोजनीच्या वेळी उमेदवारांनी किंवा त्यांचे प्रतीनिधीनी व्यास पीठावर उपस्थीत रहावे. त्याप्रमाणे उमेदवार व काही प्रतीनिाधी उपस्थीत होते त्यानंतर मतपेटीचे कुलुप उघडून त्यातील मत पत्रीके ची छानणी करण्यात आली मत पेटीत पत्रीका शिल्लक नसल्याचे दाखविण्यात आले त्यांनंतर मत मोजनी करुन मा. महापौर यांनी खालील प्रमाणे निकाळ घोषीत केला.

| | |
|---|---|
| १. अ.रशीद खान (मामु ) | ७० मते |
| २. कच्छवाह सुभाष नायराण | ६४ मते |
| ३. कराड भागवत कि सन राव | ९६ मते |
| ४. गौतम भागाजी खरात | ८० मते |
| ५. जैस्वाल प्रदीप शिवनायराण | ८० मते |
| ६. जोशी रजनी रमेश | ८० मते |
| ७.टाकलज भिकाजी | ०० मते |
| ८.निकाळजे प्रकाश भाऊराव | ६८ मते |
| ९. बैनाडे कवरसींग किसनसींग | ८० मते |

१०. म. मुस्ताक अहमद ९३ मते
११. कु. माया लिंगाजील लाडवाणी ८८ मते
१२. मेहेर विजय कुमार गजानन ८० मते
१३. विधाते प्रभाकार सिताराम ८० मते
१४. शिंन्दे पदमा बाबुराव ८० मते
१५. स.अ. एकबालोबाज स. मा. कुतुबोधीन XX मते
१६. स.अली मीरा सलामी १६ मते
१७. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव ८० मते
१८. सोनवणे सुक्षम रामदास ८० मते
१९. हमीदुद्दीन ताबा ६४ मते

त्यानंतर सर्व निवडुण आलेल्या सन्मानीय सदस्यांचे मा. महापौर यांनी स्वागत केले राष्ट्रगीतानंतर सांयकाळी ६-३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौरांनी घोषीत केले.

सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

मा. महापौर
महानगरपालिका औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**गुरुवार दि. १८-५-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्तांत.**

**मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांच्या अधक्षते खाली दि. १८-५-९५ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व साधारण सभा आयोजित करण्यात आली होती. सभेची सुरुवात "वदे मातरम्" हया गीताने अंदाजे ठिक ११.०० वा झाली सभेस हजेरी रजिस्टर प्रमाणे स.सदस्य तथा मा. आयुक्त उपआयुक्त १ व २ तसेच संबंधीत अधिकारी वर्ग उपस्थिती होते.**

| | |
|---|---|
| १. श्रीमती. ज्योत्सना हिवराळे | उपमहापौर |
| २. श्रीमती रुख्मनबाई लोखंडे | सदस्य |
| ३. श्री. अफसर खान यासीन खान | --//-- |
| ४. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | --//-- |
| ५. श्रीमती साजेदा बेगम | --//-- |
| ६. श्री. सलीम म. हनिफ कुरैशी | --//-- |
| ७. श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ८. ॲड गणेश किशन वानखेडे | --//-- |
| ९. श्रीमती रजनी रमेश जोशी | --//-- |
| १०. श्रीमती उषाबाई दिलीप गायकवाड | --//-- |
| ११. श्रीमती विमलबाई नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| १२. श्रीमती शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १३. श्री. लांडगे गौतम लिंबाजी | --//-- |
| १४. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | --//-- |
| १५. श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १६. श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १७. श्री. कोकाटे काशीनाथ हरिभाऊ | --//-- |
| १८. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १९. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| २०. श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २१. सौ. पद्माबाई बाबुराव शिंन्दे | --//-- |
| २२. श्री. बैनाडे कवरसिंग किसनराव | --//-- |
| २३. श्री. मालानी प्रफुल्लचंद लालचंद | --//-- |
| २४. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २५. श्रीमती धनश्री अशोक शिंदे | --//-- |
| २६. श्रीमती फरहद बानो भ्र. मो नवाब | --//-- |
| २७. श्री. फजउल्लाखान अजमत उल्ला खान | --//-- |
| २८. श्री. अजिजखा गणी खान | --//-- |
| २९. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्ताफा | --//-- |
| ३०. श्री. मो. मुश्ताक अहमद | --//-- |
| ३१. श्रीमती नुरजहा बेगम अ. रहमान खान | --//-- |
| ३२. श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| ३३. श्री. हाजी मोहसिन अहमद हाजी बशीर अहमद | --//-- |

| | |
|---|---|
| ३४. श्री. मुजीब आलमशाह मीर आलमशाह | --//-- |
| ३५. श्री. मोहसीना बिल्कीश विखारोद्दीन | --//-- |
| ३६. श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३७. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर | --//-- |
| ३८. श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३९. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ४०. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ४१. श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | --//-- |
| ४२. श्री. हमीदोद्दीन ताबा फसीयोद्दीन | --//-- |
| ४३. श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| ४४. श्री. स.अ. एकबालोद्दीन मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ४५. श्री. खखोरर्डीया धिरल शांतीलाल | --//-- |
| ४६. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४७. श्री. स.अली मीरा सलामी | --//-- |
| ४८. श्री. लहोट रमेश दिपंचंद | --//-- |
| ४९. श्री. फैय्याल अहमद हाजी कुरैशी | --//-- |
| ५०. श्रीमती मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --//-- |
| ५१. श्रीमती लता श्रीनिवास दलाल | --//-- |
| ५२. श्री. ओक जयंवत केशवराव | --//-- |
| ५३. श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ५४. श्री. धांडे शंकुतला हरिदास | --//-- |
| ५५. श्री. अ. रशीद खान (मामु) | --//-- |
| ५६. श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | --//-- |
| ५७. कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ५८. श्री. डॉ. कराड भागवत किसनराव | --//-- |
| ५९. श्रीमती आव्हाड सविता संजय | --//-- |
| ६०. श्री. कांबळे निर्मला विठ्ठल | --//-- |
| ६१. श्री. अ.रशीद अ. सत्तार | --//-- |
| ६२. श्री. धिल्लन तरविंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ६३. श्री. विखारोद्दीन खुदबोद्दीन | --//-- |
| ६४. श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ६५. श्री. गाडे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ६६. श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ६७. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ६८. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ६९. श्री. जोशी संजय रामदास | --//-- |
| ७०. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ७१. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | --//-- |
| ७२. श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | --//-- |
| ७३. श्रीमती राधाबाई तळेकर | --//-- |
| ७४. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ७५. श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |

७६. श्री. मेहेर विजयकुमार गजानन --//--
७७. श्रीमती काळुसे मंदा धनंजय --//--
७८. श्री. गागवे बन्सी तुकाराम --//--
७९. श्री. घडामोडे भगवान देविदास --//--
८०. श्री. नवपुते कचरु चंद्रभान --//--

संवाद

प्रदिप जैस्वाल : कोठावाला कुटुंबातील एका अपघातात पाच व्यक्ती मृत्युमुखी पडले तर दलीत मित्र श्री. बी.एस. मोरे स्वातंत्र्य सैनिक मास्टर दिनानाथ पाठक व मनपा सचिवांचे वडील बुध्दवासी श्री. विठ्ठल मगरे यांच्या निधना निमित्त सभागृहात ००.०२ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सौ. लता दलाल : यास माझे अनुमोदन आहे त्या वेळी सभागृहात ००.०३ मिनिटे उभे राहुन संबंधीतांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

अ.रशीद खान (मामु) : नवनिर्वाचित सर्व स. सदस्यांना माझी विनंती आहे की, शहरातील वातावरण कोणत्याही प्रकारचे वातावरण बिघडु नये असे कृत्य होवु नये (यावेळी मा. महापौर व उपमहापौरांचे पुष्प हाराने स्वागत केले.)

श्री. नरेंद्र पाटील : सर्व साधारण सभेची वेळ ११.०० वाजता असतांना सभा वेळेवर सुरु व्हावी अशी माझी विनंती आहे.

श्री. मोहसिन अहमद : सभेचे इतिवृत्त उर्दुतुन मिळाले नाही याचे काय कारण आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल, सौ.लता दलाल : शासनाने निर्दशना नुसार सर्व कार्यलयीन कारभार मराठीतुनच चालावा असे आहे त्यामुळे इतिवृत्त मराठीत छापले.

श्री. अ. रशीद खान (मामु) : मागील लोकप्रतिनिधी च्या काळात सभेचे इतिवृत्त उर्दुतुन काही स. सदस्यांना दिले जात होते त्या प्रमाणे आतासुध्दा तशी व्यवस्था व्हावी.

श्री. मोहसिन अहमद : या पुढील बैठकीचे इतिवृत्त मराठी सोबतच उर्दुतुन सुध्दा छापुन काही स. सभासदांना द्यावे यावर निर्णय द्यावा. अन्यथा आजचा सभेस आमचा विरोध राहील श्री. गिरजाराम हाळनोर काही स. सभासद निरक्षर आहेत. त्यांच्यासाठी महानगरपालिका काय करणार आहे.

मा. महापौर : सभागृहाच्या समंतीने सदरचा प्रश्न नंतर घेतला जाईल.

**विषय क्र. १ :**

दि. २९-४-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. महापौर : विषय क्र. १ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. २९-४-९५ रोजी झालेल्या मा. महापौर उपमहापौर व स्थायी समितीचे सदस्य निवडुन देण्या बाबतच्या इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे सुधारीत कलम २९ (अ) नुसार आयुक्त मनपा औ'बाद यांचे तर्फे निवडणुक प्रभागाचा समावेश असलेल्या समीत्या स्थापन करणे बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार निवडणुक प्रभागाचा समावेश असलेल्या प्रभाग समित्या स्थापन करणे बाबत खालील प्रमाणे तरतुद केलेली आहे.

| अ. क्र | लोकसंख्या | प्रभाग समित्याची किमान संख्या | अतिरिक्त लोक संस्थेसाठी अतीरिक्त प्रभाग | प्रभाग समित्यांची कमाल संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | ३ लाखपेक्षा अधिक व ४.५ लाखा पर्यंत | ३ | - | ४ |
| २. | ४.५ लाखपेक्षा अधिक व १२ लाखापर्यंत | ४ | ५०,०००/- | ९ |
| ३. | १२ लाखपेक्षा अधिक व २४ लाखा पर्यंत | ९ | १०,०००/- | १३ |
| ४. | २४ लाखापेक्षा अधिक | १३ | ६०,०००/- | २५ |

सन १९९१ च्या जनगणनेनुसार औ'बाद शहराची लोकसंख्या ५,७३,२७२ एवढी असुन त्या आर औ'बाद शहराचे एकंदर ८२ निवडणुक प्रभाग अस्तीत्वात आले आहे. सदरचा ठराव सभागृहात ठेवण्यात आला आहे.

उपरोक्त तरतुदी आल्या ४.५ लोकसंखेपर्यंत कमीत कमी ३ प्रभाग समित्या व अतिरिक्त दीड लाख लोक संख्येसाठी १ या अनुषंगाने कमीत कमी एकंदर चार प्रभाग समित्यांची रचना करणे आवश्यक आहे प्रशासकीय दृष्टीकोणातुन औ'बाद मनपा चे एकंदर विभागीय कार्यालये (झोन) पुर्वी पासुनच अस्तीत्वात आहे. सदरील ७ विभागीय कार्यालयांना कोणतीही बाधा येवुन देता खालील प्रमाणे निवडणुक प्रभागाचा समावेश असलेल्या चार प्रभाग समित्या व त्यांची कार्यालये खालील प्रमाणे प्रस्तुत करण्यात येत आहे.

| प्रभाग समिती क्रमांक | निवडणुकप्रभाग क्रमांक | समिती कार्यालय |
|---|---|---|
| १. | १,२,३,४,५,६,७,४०,४१,४२,४३,४४,४५,४७,५१,५२, ५३,५४,५५,५६,५७ (एकुण २१) | विभागय कार्यालय क्र. २ (वसंत भुवन) |
| २. | ११,२२,२३,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४, ३५,३६,३७,३८,३९,४८ | नेहरुभवन (तात्पुरते) |
| | ४६,४९,५०,५१,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७, ६८,६९,७०,७१,७२,७३,७४,७५ एकुण २१ | विभागीय कार्यालय ६ रेल्वेस्टेशन |
| ४ | ८,९,१०,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,७६, ७७,७८,७९,८०,८१,८२ (एकुण विस) | विभागीय कार्यालय चिकलठाणा |

सोबत प्रभाग समित्याचे अधिकार व कार्य क्षेत्र सोबत जोडलेले आहे. सबब वरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. नरेंद्र पाटील : सदरचा प्रस्तावात विभागीय कार्यालय म्हणुन चिकलठाणा असे ठरविले आहे. त्या ऐवजी सिडको झोन असावे जेणे करुन हे हाडकोतील स. सभासदांना जवळ पडु शकेल अशी माझी मागणी आहे.

श्री. कचरु नवपुते : विभागीय कार्यालय झोन क्र. ५ येथे बसण्याची व्यवस्था असल्याने सदरचे समिती कार्यालय तेथेच असे.

श्री. मोहसिन अहमद : समिती कार्यालय म्हणुन प्रभाग समिती २ ला नेहरुभवन दिले आहे ते सुध्दा चुकीचे आहे त्या ऐवजी झोन क्र. ३ असावे.

मा. आयुक्त : नेहरु भवन हे तात्पुरते आहे कामाच्या दृष्टीने यात नंतर बदल करता येईल.

श्री. मुजीब अलमशॉ.खान : या बाबत लवकारात लवकर व्यवस्था व्हावी.

मा. आयुक्त : लवकर झोन नं. ३ येथे नविन इमारत बांधण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री. मो. मुस्ताक अहमद : प्रभाग समित्याचे समिती कार्यालय कोणतया आधारे केले याची माहिती द्यावी.

मा. आयुक्त : मनपामध्ये सात झोन आहेत या ७ झोन पैकी चार झोन हे प्रशासकीय दृष्टी कोणातुन समान प्रमाणात कायमकरुन समिती कार्यालयासाठी केले आहे जेणे करुन विभागीय समितीचे कंट्रोलसहीत श्री. कचरु नवपुते समितीच्या नियुक्त्या कशा प्रकारे करणार यात समिती वा अध्यक्ष राहणार आहेत काय?

मा. आयुक्त : याबाबत शासनाने अद्याप नियम तयार केले नाहीत याचे नियमावल्या नंतर विचार करण्यात येईल या समितीला अध्यक्ष राहणार आहे आणि त्या वार्डातील सध्या झोन ५ मध्ये मनपा कार्यालयाचा संपुर्ण चिकलठाणाच्या झोनमध्ये मनपा कार्यालयाचा भार असुन झोन ७ येथे आम्ही कोणतेही लक्ष केंद्रीत केलेले नाही. कारण या ठिकाणी फक्त पाणीपुरवठा केला जातो. बाकी कोणतेही सेवा पुरवील्या जात नाही. म्हणुन झोन ५ वर लक्ष केंद्रीत आहे. वाटल्यास एका वर्षाने तसे अदलाबदल करता येवु शकेल.

श्री. नरेंद्र पाटील : सिडकोतील एन १२ ते एक टोक आहे तर झोन ५ हे दुसरे टोक आहे. यावरविचार व्हावा.

डॉ. विजयकुमार मेहेर : झोन ७ येथे समिती कार्यालय व्हावे.

मा. आयुक्त : झोन नं. ७ येथे कार्यालय ठेवले तरी प्रशासनाला काही हरकत नाही.

मा. महापौर : सदरचा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंबुई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे सुधारित कालम २९(अ) नुसार निवडणुक प्रभागाचा समावेश असलेल्या प्रभाग समित्या तरतुदी आधारे ४.५ लोक संख्ये पर्यंत कमीत कमी तीन प्रभाग समित्या व अतिरिक्त १.५० लाख लोक संख्ये साठी १ या अनुषंगाने एकंदर ४ प्रभाग समित्या सात विभागीय कार्यालयास कोणतीही बांधान येता प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समितीचे अधिकार व कार्यक्षेत्रात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| प्रभाग समिती क्रमांक | निवडणुकप्रभाग क्रमांक | समिती कार्यालय |
|---|---|---|
| १. | १,२,३,४,५,६,७,४०,४१,४२,४३,४४,४५,४७,५१,५२, ५३,५४,५५,५६,५७ (एकुण २१) | विभागय कार्यालय क्र. २ |
| २. | ११,२२,२३,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४, ३५,३६,३७,३८,३९,४८ | नेहरुभवन (तात्पुरते) |
| | ४६,४९,५०,५१,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७, ६८,६९,७०,७१,७२,७३,७४,७५ एकुण २१ | विभागीय कार्यालय ६ रेल्वेस्टेशन |
| ४ | ८,९,१०,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,७६, ७७,७८,७९,८०,८१,८२ (एकुण विस) | विभागीय कार्यालय चिकलठाणा |

**विषय क्र. ३ :**

महानगरपालिकेचे भुतपुर्व औरंगाबाद नगर परिषदेच्या हद्दीसाठी १९६७ व १९७५ मध्ये मंजुर झालेल्या विकास योजनेतील नाविकास क्षेत्र वगळुन व सिडको नियोजन प्राधिकरणाने अघोषीत केलेल्या क्षेत्रासह विकास योजना सुधारित करण्यांचे सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७ दिनांक १८-६-८८ अन्वये क्रंमाक मनपा/नरवि/वियो/सु,टी. १/७५२/९५ दिनांक १०-३-९५ नुसार प्रसिध्द करण्यांत आले आहे व याबाबतची अधिसुचना स्थानिक वृत्तपत्रात दिनांक २३-३-९५ ला प्रसिध्द करण्यांत आली आहे. प्राप्त झालेल्या हरकती सुचनांवर विचार करुन निर्णय घेण्यासाठी व त्यानुसार महानगरपालिकेस अहवाल सादर करण्यांसाठी वरील अधिनियमाच्या कलम २८ अन्वये नियोजन समितीची स्थापना करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर अधिनियम १९६६ चे कलम २८ (२) नुसार नियोजने समितीमध्ये स्थायी समितीतुन ३ सभासदाचा समावेश करावा लागणार आहे. तरी स्थायी समितीतुन नियोजन समितीवर सभसदांची नियुक्ती करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिकेने भुतपर्व शहरातील काही प्रभागा मधील भाग सुटलेला आहे. तेव्हा सुटलेल्या प्रभागातील घरांचा सुध्दा यात समावेश व्हावा.

मा. आयुक्त : नियोजन समिती आहे. त्या समितीला काही सुचना घ्यावयाचे असल्यास दयावे. त्याप्रमाणे सदरची समिती विचार करील.

श्री. हमीदउद्दीन ताबा: अगोदरच जो नियोजनाचा आराखडा तयार केला आहे तो चुकीचा असुन त्यात दुरुस्ती व्हावी.

मा. आयुक्त : हा मसुदा तयार केला आहे तो अंतिमरित्या नसुन काही ऑब्जेक्शन आल्यास आपल्या समितीच्या विचारनिय अंतिम स्वरुप देता येईल व पुन्हा प्रसिध्दीस देता येईल.

सौ. लता दलाल : समितीचे योग्य निर्णय घेणार असल्याने अगोदर समिती सदस्यांची निवड व्हावी.

श्री. मुजीब आलमशा खान : सदस्याच्या समिती बाबतचा निर्णय घेताना मा. महापौर उपमहापौर यांनी स. सदस्या समवेत एकत्रीत बसुन योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. नरेंद्र पाटील : स्थायी समितीतुन ३ स.सदस्य निवडुन दयावे असा काही नियम आहे काय? याची माहिती घ्यावी.

मा. आयुक्त : स्थायी समितीतुन ३ सदस्य निवडुन दयावचे असा कायदयात नियम आहे त्यामुळे ते बंधन कारक राहिल.

सहा संचालक : कायादयामध्ये अशी तरतुद आहे की नगररचना नियोजन समिती नेमावयाची असल्याने स्थायी समिती सदस्या मधुन तीन स. सदस्याना घ्यावयाचे आहे. बाकीचे चार सभासद आहेत ते शासनाकडुन नियुक्त होतात.

मा. आयुक्त : सध्या ३ सदस्य निवडुन घ्यावयाचे आहेत राज्यशासनाकडे आपल्या सुचने प्रमाणे ५ सदस्य निवडुन देणेबाबतच प्रस्ताव पाठविला जाईल परंतु सध्या ३ सदस्य नियोजन समितीवर निवडुन देणे योग्य.

मा. महापौर : मा. प्रस्तावावर स्थायी समितीतुन ३ सदस्य निवडुन देणेबाबत स्थायी समितीला अधिकार प्रदान करण्यांत येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थायी समितीतुन नियोजन समितीवर ३ सभासदाचा समावेश करण्यांसाठी स्थायी समितीला संपुर्ण अधिकार प्रदान करुन त्यांनी ३ सदस्यांची निवड करुन शासनास पाठवावे.

सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४ :**

सचिव महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. महापौर महानगरपालिका औरंगाबाद यांनी स. नगरसेवक श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय याची विरोधी पक्षनेता व स.नगर सेवक श्री. जयवंत ओक यांची सभागृहनेत्या पदावर निवड केलेली असल्याने सदरील निवड कायम करणे व त्यांना दयावयाच्या सवलती व सुविधाचे तसेच खर्चाचे विचारार्थ प्रस्ताव सादर.

संवाद

सचिव : हया प्रस्तावा बाबत स. सदस्य श्री. फैय्याज कुरैशी यांनी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केल्याने न्यायालयाने कोणतीही चर्चा न करता विषय बाजुला ठेवावा व नेमणुक करु नये असे आदेश दिले आहेत. त्यामुळे हया विषयावर चर्चा करता येणार नाही.

श्री. मुजीब आलमशाह खान : न्यायालयाचा जो आदेश आहे तो वाचुन दाखवावा.

सचिव : न्यायालयातील (मुळ इंग्रजी प्रत) वाचुन दाखवितात.

श्री. जावेद रज्जाक श्री. मुजीब आलमशा खान : मुळ प्रतीच्या भाषांतर करुन उर्दु व मराठीच सर्व स. सदस्यांना दयावेत.

श्री. प्रदिप जैस्वाल : नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सर्व स.सदस्यांना विनंती की सभागृहात एकावेळेस एकाच स. सदस्यांने बोलावे व सभागृहात शांतता राखावी.

मा. महापौर : सर्व सदस्यांना विनंती की सभागृहात एका वेळेस एकाच स. सदस्यांने बोलावे व सभागृहात शांतता राखावी.

श्री. नरेंद्र पाटील : दैनिक एकमतच्या वर्तमान पत्रात मा. महापौराचे बाबतीत वृत्त प्रसिध्द झ ाालेले आहे त्यावर आपले काय मत आहे.

मा. महापौर : सदरच्या बाबतीत चर्चा करता येणार नाही परंतु न्यायालयाच्या प्रस्तावावर निर्णय योग्य

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेत स. नगरसेवक श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय याची विरोधी पक्ष नेता व स. नगरसेवक श्री. जयवंत ओक यांची सभागृहनेता हया पदावर निवड करुन कायम करणे व त्यांना दयावयाच्या सवलती व सुविधाचे तसेच खर्चाचे बाबतीत न्यायालयाने सध्या चर्चा करता येणार नाही. व नियुक्ती पण करता येणार नाही असे निर्दश दिलेले आहेत त्यास अनुसरुन तुर्त विचार करता येणार नाही असे ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सोमवार दि १९/६/९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सोमवार दिनांक् १९/६/९५ रोजी नगर भुवन टाऊन हॉल येथे मा. महापौर, सौ. सुनंदा कोल्हे हयांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सुरूवात झाली. त्या सभेस कार्योलयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य ऊपस्थित होते**

| | |
|---|---|
| १. सौ जोस्ना हिवराळे | उपमहापौर |
| २. सौ लोंखडे रूख्मनणाई खंडेराव | सदस्य |
| ३. श्री. अफसरखॉ यासिन खॉ | सदस्य |
| ४. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | सदस्य |
| ५. सौ. साजेदा बेगम | ,, |
| ६. श्री. म. सलिम म. हजीफ कुरेंशी | ,, |
| ७. श्री. गौतम भागाजी खरात | ,, |
| ८. ॲड. गणेश किशनराव वानखेडे | ,, |
| ९. सौ. ज्योशी रजनी रमेश | ,, |
| १०. सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | ,, |
| ११. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | ,, |
| १२. सौ. शिलाबाई सिताराम गुजाळे | ,, |
| १३. श्री. लांडगे गौतम भागाजी | ,, |
| १४. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | ,, |
| १५. श्री. भालेराव अभिमन्यू | ,, |
| १६. श्री. नरेंद्र यादवराव पाटील | ,, |
| १७. श्री. कोकाटे काशीनाथ हरिभाऊ | ,, |
| १८. श्री. सोनवणे सुदाम रामदास | ,, |
| १९. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | ,, |
| २०. श्री. बैनाडे केवरसिंग किसनसिंग | ,, |
| २१. श्री. पद्मा बाबुराव शिंदे | ,, |
| २२. श्री. टाकलकर सुभाष भिकाजी | ,, |
| २३. श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद्र | ,, |
| २४. श्री. चंपाबाई विश्रवनाथ पांचाळ | ,, |
| २५. सौ. धनश्री अशोक दिसपूते | ,, |
| २६. सौ. फरहदबानो भ्र मो. नवाज | ,, |
| २७. श्री. फजलऊल्लाखान अमजतऊल्ला खान | ,, |
| २८. श्री. अजीम खॉ गनी खॉ | ,, |
| २९. श्री. आबेदा बेगम मो. मुस्तफा | ,, |
| ३०. श्री. मो मुस्ताक अहमद | ,, |
| ३१. श्री. नुरजहॉं बेगम अ. रहेमान खान | ,, |
| ३२. श्री. देशमुख वसंत विनायकराव | ,, |
| ३३. श्री. बजी मोहसीन अष्टमदानीण आलमशाह | ,, |
| ३४. श्री. मुजीष आलमशाह भिर आलमशाह | ,, |

३५. सौ. मोहसिना बिलकीस विखारोद्दीन ,,
३६. श्री. अ. जावेद रज्जाक ,,
३७. श्री. जाहेदा बेगम म. जमिर ,,
३८. श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव ,,
३९. सौ. यशोदा धनंजय वाडेकर ,,
४०. श्री. तुलशीबागवाले किशोर बागुलाल ,,
४१. श्री. गंगवाळ पुष्पाताई सुरंशचंद्र ,,
४२. श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन ,,
४३. श्री. म. अ. रऊक म. अ. सबुद ,,
४४. श्री. स. अ. एकबालोद्दी समो कुतुबोद्यीन ,,
४५. श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल ,,
४६. श्री. जैस्वाल प्रदीप शिवनाराचण ,,
४७. श्री. लाहोट रमेश दिपंचंद्र ,,
४८. श्री. संजय किसनराव केनेकर ,,
४९. श्री. फैय्याज अहेमदमहमद टाळी कुरेशी ,,
५०. सौ. वाघमोर मुक्ताबाई सुदाय ,,
५१. सौ. दलाल लता श्रिनिवास ,,
५२. श्री. ओक जयवंत केशवराव ,,
५३. सौ. अलका रमेश पाटील ,,
५४. सौ. धांडे शकुंतला हरीदास ,,
५५. श्री. अब्दुल रशीद खानमामू ,,
५६. श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मी नारायण ,,
५७. कु. माया लिंबाजी लाडवाणी ,,
५८. डॉ. कराड भागवत किशनराव ,,
५९. सौ. आव्हाड सविता संजय ,,
६०. सौ. निर्मला विठठ्ल कांबळे ,,
६१. श्री. अब्दुल रशीद अ. सत्तार ,,
६२. श्री. धिल्लन तरविंद्रसिंग महेंद्रसिंग ,,
६३. श्री. विखारोद्दीन पिता खूदबोदरीन ,,
६४. श्री. जैन विकास रतनलाल ,,
६५. श्री. बारवाल गजानन रामकिसन ,,
६६. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग ,,
६७. श्री. निकाळजे प्रकाश रामभाऊ ,,
६८. श्री. जोशी संजय रामदास ,,
६९. श्री. हाळनोर गिरजाराम नानानराव ,,
७०. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण ,,
७१. श्री. राजकुमार ऊर्फ सांडू बचाटे ,,
७२. सौ. राधाबाई तळेकर ,,
७३. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर ,,
७४. श्री. विठठ्ल किसन जाधव ,,
७५. श्री. मेहेर विजय कुमार गजानन ,,
७६. सौ. काळुसे मंदा धनंजय ,,

७७. श्री. गांगवे बन्शी तुळशीराम ,,
७८. श्री. घडामोडे भगवान देविदास ,,
७९. श्री. नवपुते कचरूचंद्र भान ,,

सभेची सुरूवात वंदेमातरम या गीताने झाली
विषय क्र १ : दिनांक १८ मे १९९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.
संवाद

**सौ. लता दलाल :-** मा. महापौरांचा काही स. सभासदांनी जो अवमान केला त्याबददल निषेध मी हया ठिकाणी करीत आहे.
[यावेळी काही स. सभासद जोरजोरात आपसा बोलतात काही हि ऐकू येत नाही. ]

**मा. महापौर :-** एका वेळी एकाच स. सभासदांनी बोलावे अशी मी सर्वांना विंनती करते.

**श्री. प्रकाश निकाळजे :-** स. सभासदांनी सभागृहात खोटे आरोप करू नये. निकाळजे औरंगाबाद महापौर हे सर्वाचे च आहेत. कृपया अवमान केल्याचे आरोप करून नये. [यावेळी पुन्हा दोन्हीही पक्षाचे स. सभासद जोरजोरात बोलतात . काहि ही ऐकू येत नाही. ]

**जावेद रज्जाक :-** सौ. लता दलाल यांनी घेतलेला आरोप कृपया मागे घ्यावा कारणा महापौरांना आमच्या सहीत ३४ स. सभासंदाचें एक निवेदन द्यावयास गेलो असतांना त्यांनी आमचे म्हणणे ऐकूण घेतलेले नाही . [हयावेळी सुध्दा दोन्हीही पक्षाचे स. सभासद आपसात जोरजोरात बोलतात काहीही ऐकू येत नाही.]

**मा. महापौर :-** स. सभासदांना विनंती की, एकावेळी फक्त एकाच स. सभासदांनी बोलावे.

**रशीद मामू :-** स. सभासदां, सौ, लता दलाल यांनी जे विघान केले त्या बाबत गत वेळेसच पाचही वर्ष महापौराचा स. सभासद बोलतात की, मा महापौरांचा अवमान झाला कृपया असे बोलणे योग्य नाही यांना बोलल्याचा हक्क सुध्दा नाही.

**सौ. लता दलाल :-** स्वतः जेष्ठ स. सदस्य समजणारे लोकशाही पध्दतीने हया ठिकाणी बोलतात त्याच पध्दतीने आम्हालाही बोलावे लागते.

**मा. महापौर :-** आता तिसर-या वेळेस स. सभांसदांना सूचीत करण्यात येते की, फक्त एकाच स. सभासदांनी बोलावे अन्यथा नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. जावेद रज्जाक :-** स. सभासदांनी सूचीत केल्याप्रमाणे गत पाचं वर्षाचे काळात माजी महापौरांचा सभागृहात अवमान केला होता आता तेच सभासद निषेधाची भाषा बोलतात तेव्हा त्यांना बोलण्याचा काहीही अधिकार नाही.

**मा. महापौर :-** चर्चान करता विषय क्र. १ ला सुरूवात व्हावी. (त्यावेळी सचीव विषय क्र.१ वाचतात, तर दोन्ही पक्षांचे स. सभासद सभागृहात एकच आवाज करतात, काहीही ऐकू येत नाही.)

**श्री . प्रदीप जैस्वाल :-** मंजूर असा जोराने आवाज देतात.
व इतर सभासद

**मा. महापौर :-** मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १८-५-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यात बहूमताने मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

[ सचीव विषय क्र.२ वाचावयास सुरूवात करतात. त्यावेळी काही विरोधी सभासद सचीवांना २ वाळी बसण्यास सांगता जय एकच आवाज दोन्ही ही पक्षी कडील सभासद

विषय १६/२ दिनांक ७जुन ९५ च्या दैनिक महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रसिध्द झालेल्या बातमी वरून असे दिसून येते की, नुकतेच राज्य शासनाने मुबंई महानगरपालिकेतील नगरसेवकांच्या मानधनात तसेच बैठक भत्यात भरीववाढ केली आहे ही वाढ खालीलप्रमाणे

**१ मासिक मानघन -** रूपये /५० वरून रु. २०००/- पावेतो

२. **बैठक भत्ता :-** रुपये ३० रूपये १००/- पावेतो (परंतु एका महिन्यात जास्तीतजास्त ५ बैठका करिता)--

दैनिक महाराष्ट्र टाईम्स मध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीत असे म्हटले आहे की मा. मुख्यमंत्र्यांनी वार्ताहर परिषदेत असे सूचीत केले आहे की इतर महानगरपालिकाकाडून मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव आल्यास राज्यशासन त्याबददल निश्चितपणे विचार करील.

वरील सर्व बाबींचा विचार करता औरंगाबाद महानगरपालिके तर्फ स. नगरसेवक / सेविंकाच्या मानधनात तसेच बैठक भत्यात वाढ करणे आवश्यक वाटते. हया सबांधात खालील प्रस्ताव मा. सभागृहाच्या विचारार्थ सादर.

**प्रस्ताव :-**

अ. स नगरसेवकासेविंकाच्या मासिकमानधनात रूपये ४५०/- वरून रूपये १२००/- पावेतो वाढ करण्यात यावी.

ब. बैठक भत्यात रूपये २०/- वरून रूपये ५०/- पावेतो वाढ करण्यात यावी. तसेच बैठक भत्या करिता प्रति महा जास्तीत जास्त ५ बैठकां करीताच मर्यादा ठेवण्यात यावी.

मा. सभागृहाने वरील प्रस्तावास मान्यता दिल्यास त्यास मंजुरी करीत राज्य शासनाकडे पाठवण्यात येईल

**सचीव :-** मा. महापौरानी विषय क्र १ मंजूर केलेला आहे व आता विषय क्र. २ ला सुरूवात होत आहे. (हयावेळी सभागृहात स. सभासदांचा पुन्हाजोरजोरात आवाज व घोषणा प्रति घोषणा देणे सुरु होते काहीही ऐकू येत नाही.)

**मा. महापौर :-** स. सभासद श्री. मनमोहन सिंग ओबेरॉय आपण शिस्तभंग कृपया करु नये. कृपया स. सभासदांनी आपआपल्या जागेवर बसून ध्यावे व एका वेळी एकाच सभासदाने बोलावे.

**श्री. मुजीब आलमशा :-** एका सदस्याने बोलल्या नंतर दुसरे दुसरे सदस्य आलमशाह खान बोलू शकतात, तेव्हा आपण अशा वेळी चुकीचा निर्णय देऊ नये.

(हयावेळी दोन्हीही पक्षातील स. सभासद आप सात जोरजोरात बोलतात. )

**मा. महापौर :-** स. सभासदांना विंनती की एका वेळी फक्त एकाच स. सभासदांनी बोलावे. सभागृहात गोंधळ किंवा जोराने आवाज करण्याचा प्रयत्न करु नये टेबलावरील माईकची मोडतोड करु नये कृपया नोंद हयावी (त्यावेळी स. सभासद आपसात जोरजोरात बोलतात व सभागृहात टेबलांवरील माईकाची मोडतोड झालेली असते. )

**मा. महापौर :-** आजची सभा दहा मिनिटासाठी "तहकूब " करण्यात ( अंदाचे वेळ ११-४५ वाजता )

१० मिनिंटांसाठी तहकूब झालेली सभा १२-०० वाजता पून्हा सुरु झाली.

**मा. महापौर :-** सर्व स. सदस्यांना विंनती की, सभागृहात एकाच वेळी एकाच स. सभासदांनी बोलावे.

**श्री. प्रदीप जैस्वाल :-** स. सभासंद विषयावर चर्चा करु इाच्छित असतील. तर मा. महापौरानी त्याना चर्चा करु देण्यासं काहीच हरकत नाही.

**श्री. मनमोहन सिंग ओबेरॉय :-** मि सभागृहाला विनंती करतो की, आम्मच्या विरोधी पक्षाचे ३४ स. सभासदांनी मा. महापौरांना यांना निवेदन देण्यासाठी शांत रितीने गेलो असतांना काही स. सभासदांनी गैरसमज करुन घेतलेला आहे. आम्ही महापौरांना घेराव घालण्यासाठी गेलेलो नव्हतो तर आम्हाला महापौरांना एक निवेदन द्यावयाचे होते की, हया शहराचे नामांतराच्या प्रस्तावाबाबत शहरातील वातावरण बिघडु नये कोणत्याही प्रकारचे तणाव होवु नये शांतता भंग होवु नये हयासाठी निवेदनाव्दारे भेटण्यास आम्ही सर्व सभासद महापौरांना भेटण्यास गेलो होतो तेव्हा कोणताही गैरसमज आमच्या बद्दल करुन घेवु नये. आम्ही लोकशाही मार्गाने मा. महापौरांना भेटण्यास गेलो होतो. व तशी शहराची परिस्थिती कोणत्याही प्रकारे दुषीत होणार नाही याची दक्षता आम्ही घेणार आहोत. तेव्हा नामांतराचा प्रस्ताव आजच्या सभेत ठेवलेला आहे. त्याबाबत सर्वांशी चर्चा करुनच निर्णय घेणे योग्य राहिल. अशी विनंती आम्ही करतो. व आजच्या नामांतरांच्या विषयास स्थगिती घ्यावी अशी सभागृहाला परत विनंती करतो.

(यावेळी काही स.सभासद आपसात पुन्हा जोरजोरात बोलतात)

**श्री. जावेद रज्जाक :** मा. महापौरांनी निर्णय दिलेला आहे की, सभागृहात फक्त एका वेळी एकाच स. सभासदांनी बोलावे तेव्हा त्याप्रमाणे सर्व सभासदांनी वागावे व कोणत्याही प्रकारची गैरशिस्त करु नये.

**श्री. मनमोहनसिंग ओबेंरॉय :-** आम्ही विरोधी पक्षांच्या जे निवेदन आपल्याला दिले आहे. त्याबाबतचा खुलासा व्हावा.

**श्री. प्रदीप जैस्वालः-** स. सभासंदानी सुचना केल्याप्रमाणे मा. महापौरांना जैस्वाल खुलासा करावा.

**श्री. जयवंत ओक :-** सबंधीत विषय ज्यावेळी चर्चेला येईल. ज्यावेळी मा. महापौरांनी खुलासा करावा.

**श्री. नरेंद्र पाटील :-** हया सभेत शहाराचे संभाजीनगर नामांतर करण्याचा प्रस्ताव आहें. तपुर्वी माझे असे मत आहे की सर्व स. सभासदांना एकत्रीत बोलावू नव चर्चा घडवून त्यावर अंतिम निर्णय हयावा, कारण त्यामुळे शहराचे वातारण दुषित होण्याची शक्यत आहे. व महानगरपालिकेचा कारभार चालविणे सुरु अशक्य होईल हयासाठी सर्व सभासदांना विश्वासत घेऊन अंतिम निर्णय घेणे ऊचीत होईल.

**श्री. विजय कुमार मेहर :-** ४ स. सभासदांनी जे निवेदन महापौरांना दिलेले आहे. ते रोन वेळी दिला आहे. त्यामुळे आता निर्णय त्यांना देणे योग्य नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :-** मा. महापौरांना ३४ स सभासदांचे निवेदन दिलेले आहे. त्याच प्रमाणे सभागृहातील ४७ स. सभासदांनी सुध्दा शहरांचे नामांतर करण्यासाठीच्या प्रस्तावासअनुमती दिलेली आहे. म्हणून सदरच्या प्रस्तावास सर्वच्या सर्व ८२ स. सभासदांनी एकमताने पाठींबा देवून प्रस्तावास मंजूरी दया अशी मी सभागृहास विंनती करतो.

**श्री. मनमोहन सिंग ओबोरॉय :-** संभाजी नगर शंहराचा नामांतर प्रस्ताव राजकिय हेतूने पारित होवू नये व लोंकाची दिशाभुल होवू नये. त्यास आमचा विरोध आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :-** सभागृहात स.सभासदांची बरीच चर्चा होत आहे. तेव्हा आता मा. महापौरानी आपला सबंधीत विषयावर निर्णय घ्यावा.

**श्री. मनमोहन सिंग ओबोरॉय :-** मा. महापौरांना विंनती की, निर्णय घेण्यापूर्वी आमच्या भावना लक्षात घ्याव्यात.

**सौ. लता दलाल :-** आजच्या सर्वसाधारण सभेत शहराच्या विकासात्मक काही विषय आहेत. तेव्हा विषयावर अनुक्र माने चर्चा करावी. इतर बाबींवर चर्चा करणे योग्य नसून विषया नुसार. मा. महापौरांनी निर्णय दयावा.

**श्री. नरेंद्र पाटील :-** कृपया विरोधी पक्षातील ३४ स. सभासंदानी दिलेल्या निवेदनाचा खुलासा करावा.

**मा. महापौर :-** सर्व स. सभासदांना विंनती की विषयावर चर्चा करावी. आता विषय क्र २ चालू आहे. त्यावरच चर्चा व्हावी.

**श्री. महंमद मुश्ताक अहेमद :-** शहराच्या नामांतराचा विषय होत आहें. तो विषय वैधानिक असून ठेवलेला कोणताही प्रस्ताव ठेवता येत नाही. हयाबाबत अधिकार केंद्र सरकारला आहे. तो हया सभेला नाही.

(हयावेळी सभागृहातील बहूतेक स. सभासद विषय क्र २ मंजूर म्हणून आवाज देतात.)

**मा. महापौर :-** मंजूर

**ठराव :**

(अ) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका स. नगर सेवक सेंविकाच्या मानधात रु ४५०/- वरु न व १२००/- पावेतो वाढ करण्यास येते.

(ब) तसेच बैठक भत्यात रु २०/- वरु न ५०/- पावेतो वाढ करण्यात यावी. बैठक भत्याकरिता जास्तीत जास्त व (पाचं) बैठकी करीताच ठेवण्यात यावी. यास सर्वा नुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ७/३** :

सहाय्यक आयुक्त १ यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी /कर्मचारी सेवा भरती नियमास शासनाने एएमसी १६९३ /१२१९ प्र.क्र ९७/ नवि - २८ दिनांक १५मे १९९४ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदरील सेवा भरती नियमात "कार्येकारी अभियंता" हया पदावर पदोन्नती देण्याकरीता उप्रअभियता हयासं वर्गात स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी आणि उप्रअभियता म्हणून किमान सात वर्षाचा अनुभव किंवा स्थापन अभियांत्रिकी मधील पदविका आणि उपअभियता म्हणून किमान सात वर्षाचा अनुभव किंवा स्थापन अभियांत्रिकी मधील आणि उपअभियता म्हणून किमान दहा वर्षाचा अनुभव ही

अर्हता दर्शविण्यात आलेली आहे. तथापि हया नियमामध्ये अशी ही तरतुद करण्यात आलेली आहे की, भागास वर्गीय कर्मचा-यांना पदोन्नती देतांना वयाची व अनुभवाची अट शासन निर्णयाप्रमाणे शिशिलकरण्यात येईल.

महानगरपालिका ही स्वायत्ता संस्था असून महानगरपालिकेच्या अस्थापनेवर काम करत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सेवा भरती नियम तयार करण्यात आलेले आहेत. त्यानुसार "कार्येकारी अभियता" हया पदावर पदोन्नतीसाठी उपअभियता हया संवर्गात "स्थापत्य अभियाञिकी मधील पदवी आणि उपअभियता म्हणून किमान पाच वर्षाचा अनुभव किंवा स्थापत्य अभियंत्रिकी मधीक पदविका आणि उपअभियता म्हणून किमान सात वर्षाचा अनुभव " अशी अर्हता दर्शविणारी दुरूस्ती करणे योग्य होईल.
त्याप्रमाणे शासनास ठराव मान्यतेस्तव पाठविणे योग्य होईल.

**संवाद**

**मा. महापौर :-** विषय क्र.३ चर्चा करावी.
(यावेळी सभागृहातील बहुतेक क स. सभासद मंजुर असे जोरजोराने आवाज देतात.)
**श्री.प्रदीप जैस्वाल ,श्री. बैनाडे कंवरसिंग, श्री. महादेव सुर्यवंशी :-** मंजुर करण्यात यावा.
**मा. महापौर :-** मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे महनगरपालिका अधिकारी /कर्मचारी सेवा भरती नियमास शासनाने एएमसी १६९४/१२१९ /३ प्र. क्र. ९७ नवि २४ दि.१५ मे १९९४ अन्वये मंजुरी दिलेली आहे. यास अनुसरुन महानगरपालिकेमध्ये "कार्येकारी अभियता" हया पदावर पदोन्नती देण्याकरिता "उपअभियता " हया संवर्गात स्थापत्य अभियात्रिकी मधील पदवी आणि " उपअभियता " म्हणून किमान सात वर्षाचा अनुभव किंवा स्थापन अभियात्रिकी मधीक किमान पदवीका आणि उपअभियता म्हणून दहा वर्षाचा अनुभव ही अर्हता दर्शविण्यात आलेली आहे. तथापि मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना उपरोक्त शासन निर्णयान्वये वयाची व अनुभवाची अट शिथिल करण्यात येईल असे आहे.

महानगरपालिका ही स्वायत संस्था असुन महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सेवा भरती नियमानुसार "कार्येकारी अभियता" हया पदावर पदोन्नती साठी उपअभिता हया संकीर्ण "स्थापत्य अभियात्रिकी" मधील पाच वर्षाचा अनुभव किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका आणि उपअभियता म्हणुन किमान सात वर्षाचा अनुभव अशी दुरुस्ती करणेस मंजुरी देवुन त्यानुसार शासनाची मंजुरी प्राप्त होईल. हया आशेवर आयुक्तांच्या अधिकारामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये ६ महिन्यांकरिता सदरील पदावर याच अधिकाऱ्यांस पदोन्नती देण्यांत यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४ :**

स्थायी सामिती ठराव क्र माक ५३ दिनांक २९.५.९५ अन्वये हॉटेल अमप्रित ते चेतनानगर हया ल रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये १६,०८,३६४/- च्या अंदाज पगकास आणि उन्नत कामासाठी तुलनात्मकहप्प्या सर्वांत कमी व अंदाजपगकाच्या दरापेक्षा १४.९० /- कमी दराने मे . रास राच असोसिराटस हयांचे दर पगकास सर्वानुमस्ते मंजुरी देण्यात येवून सर्वसाधारण सभेस शिफारस के ली आहे.
विचारार्थ सादर.

**संवाद**

**मा. महापौर :-** विषय क्र .४ वर चर्चावर चर्चा करावीव सर्व स. सभासदांना विंनती की, कुणीही आवाज करु नये. सभागृहात शांतता राखावी व आपआपल्या जागेवर बसून घ्यावे (हयावेळी सभागृहात दोन्ही ही बाजूचे स. सभासदांचे जोरजोरात बोलल्याचा आवाज ऐकू येतो. ते काहीच कळत नाही. हयावेळी काही स. सभासद विषय क्र.४ मंजुर असे म्हणतात.

**मा. महापौर :-** मंजुर .

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे स्थायी समिती ठराव क्र ५३ दिनांक २९.५.९५ अन्वये हॉटेल अमरप्ति वे चेतनानगर हया रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामाकरिता रक्कम रु १६,०८,३६४/- च्या अंदाजपत्रकाय आणि युक्त कामासाठी सर्वांत कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १४.९०/. कमी दराने एस. एच असोसिएटस यांचे दरपत्रकास स्थासी सामितीने शिफारस केल्यानुसार सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ५ :**

सहाय्यक आयुक्त -१ यांनी प्रस्ताव केला की, संचालक लेखा व कोषागारे महाराष्ट् राज्य मुबंई यांचे आदेश क दिलेशो २२९३/१८७/अस्था-१ /५२७ नो. दि.१६.१.९३ अन्वये श्री. घोडके लेखा अधिकारी यांची औरंगाबाद महानगरपालिका रुजू झाल्याचे तारखेपासून दोन वर्षाकरिता प्रति नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार लेखा-धिकारी हया पदावर प्रतिनियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार त्यांची प्रतिनियुक्तीची मुदत दि.२५.५.९५ ला संपली आहे. शासनाकडून अदयाप त्यांचे जागेवर नियुक्ती करण्यात आलेली नाही.

दरम्यान श्री. वि. बा घोडके लेखाधिकारी (प्रति नियुक्तीवर) यांनी त्यांच्या दि.७.३.९५ च्या विनंती अर्जानुसार मा. संचालक लेखा व कोषगारे मुबंई यांना कळविले आहे की, त्यांचा प्रतिनियुक्तींचा कालावधी वाढवून घेण्याची त्यांची वैदयाकिय कारण स्तव इच्छा नाही. या पगाची प्रत आपल्या कार्योल्यास सुध्दा दिलेली आहे.

तथापि श्री. वि. बा घोडके यांनी त्यांच्या दि. ३०.५.९५ च्या अर्जानुसार पुन्हा मा. संचालक, लेखा व कोषगारे मुंबई यांना विनंती केली आहे. की, त्यांच्या दि. ७.३.९५ च्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना पत्यावर्तन आदेश प्राप्त झालेले नाहीत व प्रतिनियुक्तींच्या कालावधीत एका वर्षाने वाढ मिळणे बाबत त्यांची संमती विचारली असता , वैदयाक्रि य उपचारासाठी औरंगाबाद मुरण्यालयात घेणे आवश्यक असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्ती कालावर्धाात एक वर्षाने वाढ करण्याची संमती दिली आहे. करीता दि.७.३.९५ ची प्रत्यावर्तना बाबतची नोटीस रद्द् करुन त्यांची प्रतिनियुक्ती कालावधी एक वर्षाने म्हणजे दि.२७.५.९५ ते दिंनाक २६.५.९६ वाढवून देण्यास त्यांनी विंनंती केली आहे.

करीता श्री. वि. बा. घोडेके लेखाधिकास (प्रतिनियुक्तीवर) यांचा औरंगाबाद महानगरपालिके तील प्रतिनियुक्ती कालावधी एक वर्षाने म्हणजे च दि.२७.५.९५ ते २६.५.९६ पर्यत वाढविणेस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**मा. महापौर :-** सभा दहा मिनिटासाठी तहकुब करण्यात येते अंदाज वेळ १२=३०
तहकुब सभेस सुरुवात अंदाजे १२=४५ वाजता झाली.

**मा. महापौर :-** विषय क्र.५ ला सुरु वात करण्यात येते. सर्व स. सभासदांना विंनती की, त्यांनी संबंधीत विषयावर चर्चा करावी.

(हयावेळी सभागृहात दोन्हीही पक्षाचे स. सभासद जोरजोराने आवाज चालू असतो. काहीही ऐकू येत नाही.)

**श्री. गौतम खरात, श्री. कचरु नवपुते, श्री. गिरापाराम हाळनोर :-** सदरचा प्रस्ताव ना मंजूर करण्यात यावा.

**मा. महापौर :-** सदरचा प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले लेखाधिकारी श्री. वि.बा. घोडके यांचा प्रतिनियुक्तींचा कालावधी संपलेला असल्याने त्यांची पुन्हा प्रतिनियुक्तीन करता नियमप्रमाणे महानगरपालिका कर्मचा-यातून हे पद भरण्यात यावे असे बहूमताने ठरले. वैधानिक कार्येवाही व्हावी.

**विषय क्रंमाक १०/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिके तर्फे विविध विभागाअंतर्गत वेगवेगळया प्रकारची दखार्वी अंदाजे रु २० ते २५ कोटी खर्चाची कामे के ली जातात. करण्यात आलेल्या कामाची गुणवत्ता तपासणी करता महानगरपालिके कडे स्वंतत्र यंत्रना अस्तित्वात नाही. कामाच्या गुणवत्ते बाबतची नियंत्रण यंत्रना सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असुन महानगरपालिके च्या अस्थापनेवर स्वतंत्र गुणवत्ता नियंत्रण यंत्रना निर्माण करण्या ऐवजी सार्वजनिक बाधंकाम विभागात असलेल्या गुणवत्ता नियंत्रण यंत्रणे ची मदत घेणे अधिक संयुक्तीक व कमी खर्चाचे ठरले सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कार्यरत असलेल्या गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेची सेवा औरंगाबाद महानगरपालिकेला उपलब्ध करुन देण्याकरीता राज्य शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. राज्य शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार तसेच राज्यशासनाने घालुन दिलेल्या अटी व शर्तीनुसार औरंगाबाद महानगरपालिके तर्फे राबविल्या जाणाऱ्या कामाची गुणवत्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेची सेवा उपलब्ध करुन देण्याबाबातचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**मा. महापौर -** मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फ विविध विभागांतर्गत वेगवेगळया प्रकारची दरवर्षी अंदाजे रु २० ते २५ कोटी खर्चाची कामे केली जातात. करण्यात आलेल्या गुणवत्त, तपासणी करीता महानगरपालिकेकडे कुठलोही स्वंतत्र यंत्रणा अस्तित्वात नाही. कामाच्या गुणवत्तेबाबतची नियंत्रण यंत्रण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असुन महानगरपालिकेच्या अस्थापणेवर स्वतंत्र गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा निर्माण करण्या ऐवजी सार्वजनिक बांधकाम विभागात असलेल्या गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेची मदत घेणे अधिक संयुक्तीक व कमी खर्चाचे करेल सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यरत असलेल्या गुणक्ता नियंत्रण यंत्रणेची सेवा औरंगाबाद महानगरपालिके` मध्ये उपलब्ध करुन देण्याकरिता राज्य शासनानी त्यांना घालून दिलेल्या अटी व शर्तीवर मंजूर करुन घेण्यासह प्रस्तावास सर्वानुसार मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/७ :**

मा. आयुक्त यांनी मा. सभापती, स्थायी समिती आणि मा. महापौर हयांचे अनुकमे दि.१.६.९५ व ५.६.९५ चे पत्रान्वये सुचविल्याप्रमाणे प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका सर्वसाधारणसभा ठराव क्रंमाक ६२/२ दि २८/१०/९१ अन्वये सभासद स्वेच्छानीधी नियमास मान्यता दिलेली आहे. सदरहू नियमात खालील प्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात येत आहेत.

१) औरंगाबाद शहरातील विविध स्तरातील विधार्थ्यांची /खेळाडुंची खेळाच्या परदेशात होणा-या सामन्यासाठी /प्रशिक्षणासाठी निवड होत असते, ही औरंगाबाद शहरवासियांकरीता गौरवाची बाब आहे. तथापि निवड झालेल्या विधार्थ्यांना / खेळाडुंना अर्थिक मदतीची आवश्यकता असते आणि त्यांच्या कडुन मनपा नगरसेवक स्वेच्छानिधीतुन अर्थिक मदतीची मागणी होत असते. सघ्याच्या नियमात तशी तरतुद नाही आणि अशी तरतुद करणे आवश्यक असल्याने "नगर सेवक स्वेच्छा निघीतुन " परदेशात होणा-या सामन्यासाठी / प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विघार्थ्यांना प्रत्येकी रु १०००/ ( रुपये एक हजार ) पर्यंत आणि एकाहुन अर्थिक नगर सेवकांती एकाच खेळाडुस/ विद्यार्थ्यास त्यांचे स्वेच्छा निर्धातुन मदत करण्याचे ठरविल्यास एकुण अर्थिक मदतीची कमाल मर्यादा रु २५,०००/- ( पंचवीस हजार रुपये ) सिमीत ( मर्यादीत ) असावी.

२) सार्वजनिक व लोक हिताचे कान करणाऱ्या रजिस्टर्ड ( पंजिकृत ) संस्थांना नगरसेवक निधितुन रु १५,०००/- ( रुपये पंधरा हजार ) पर्यंत अर्थिक सहाय्य करण्याची नियमात तरतुद आहे. संस्थेच्या कामाचे स्वरुप आणि प्रस्तावित बाबी वरील के वळ भांडवली कामासाठी उदा. इमारत बांधकाम,रुग्नवहिका खरेदी साठी अपेक्षित खर्च जादा असल्यास काही, नगर सेवक मिळुन एकत्रित निधी रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त )पर्यंत संस्थेस अर्थिक सहाय्य मंजुरीची शिफारस, संस्था खालील बाबींची पुर्तता करीत असल्यास करु शकतीत. १) संस्था रजिस्टर्ड ( पंजिकृत ) असली पाहीजे आणि रजिस्ट्रेशन चे प्रमाणपत्र सादर केले पाहीजे.

२) संस्थेविरुध्द कोणतीही चौकशी चालु नसली पाहीजे.

३) संस्थेंचे दरवर्षी सनदी लेखापाल (चार्टड अकांऊट ) मार्फत लेंखापरिक्षण नियमित झालेले असावे. आणि मागील २ वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल प्रस्तावा सोबत दिले पाहीजे.

४) संस्थेची स्वत:ची काही स्थावर मालमत्ता असली पाहीजें. आणि त्याचा उल्लेख तपशील संस्थेच्या भत्ता व दायित्व ( स्टेंटमेन्ट ऑफ असेटस् आणि लॅबिलीटीज ) विवरण दिलेला असला पाहीजे.

५) संस्थेने नियोजित इमारत बांधकामाचे आराखडे व अदाजपत्रके वास्तुशास्त्रज्ञ हयांचे स्वाक्षरीचे आणि बांधकाम परवाना प्रस्तावा सोबत दिले पाहीजे. बांधकामाच्या अंदाजित खर्चापैकी किमान ५०% खर्च संस्थेने स्वता: के ला पाहीजे. उर्वरीत खर्च भागविण्यासाठी नगरसेवक त्यांचे निघितुन रु १५,०००/- ( रुपये पंधरा हजार ) पर्यंत शिफारस करु शकतील एकत्रित निधी रु ५०,०००/- ( रुपये पन्नास हजार) पर्यंत मर्यादित राहील,

६) संस्थेने ज्या कामासाठी अर्थ साहाय्याची मागणी के ली असेल त्याच कामासाठी अर्थ सहाय्याचा वापर के ला पाहीजे. दुरु पयोग के ल्यास अर्थ सहाय्य वसुल करण्याचे अधिकार म.न.पा.स राहिलं.

७) संस्थेस दरवर्षी अर्थ सहाय्य मंजुर करता येणार नाही. संस्था तीन वर्षातुन एकदाच मदत मिळण्यास पात्र राहील. आणि संस्थेने अर्थ सहाय्याचे उपयोगिता प्रमाणपत्र ( युटीलायझेशन सर्टीफीलेट ) महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक राहिल.
८) शहरातील गोरगरीब नागरीकांपैकी काहींना ह्दय शस्त्रक्रीया / कर्करोग या साररव्या खर्चिक रोगावर उपचारासाठी अर्थिक मदतीची आवश्यकता असते त्यासाठी काही नगर सेवकांनी मिळुन त्यांचे स्वेच्छा निधितुन प्रत्येक प्रकरणात आणि वेद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती त्याचे मालकाकडुन मिळु शकत नाही असे बॉडवर लिहून देणा-या व्यक्तीस एकत्रित मदत रु ५०,०००/- ( रुपये पन्नास हजार फक्त ) पर्यंत करु शकतील सदरची मदत औरंगाबाद शहरातील रहीवाशी असल्या बाबत चा पुरावा सादर करणा-या व्यक्तीस शिफारस करण्यात यावी. आणि मदतीची रक्कम अधिकृत वैद्यकीय प्राधिकरणाचे नावे चेक व्दारे देण्यात यावी.

प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**मा. महापौर :-** मंजुर

**ठराव :-** प्रस्तावात दर्शविल्या महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्रंमाक ६२/२ दि.२८/१०/९१ अन्वये सभासद स्वेच्छा निही निस्मास मान्यता दिलेली आहे. सदस्टु नियमात प्रस्तापातील अनुक्रमांक १व२ प्रमाणे दुरूस्ती बह मंजुर करुन प्रस्ताव शासनाकडे पाणविण्यात सवानुमस्ते देळात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र.१ :**

पिरबाजार येथे ज्या रोडवर टपऱ्या होत्या त्यांना पर्यायी जागा देणे व त्यांच्यसाठी पर्यायी जागेचा विचार करणे.

सुचक - श्री . मनमोहनसिंग ओंबेरॉय

अनुमोदक :- श्री प्रकाश निकाळजे.

**मा. महापौर -** विषय क्रंमाक १वर चर्चा करावी. ( या वेळी सभेमध्ये दोन्ही पक्षाचे स सभासंदाचा जयघोषण व पतिघोषणा चालु असतात काहीही ऐकु येत नाही.)
**श्री. प्रदिप जैस्वाल -** विषय क्रंमाक १ टपरी कमिटीकडे पाणविण्यात यावा.
**मा. महापौर -** सदरचा विषय स्थापित ठेवण्यात येतो.

**ठराव -** प्रस्तुत प्रस्ताव स्थापित ठेवण्यात येतो.
**विषय क्र. २** :

शहानुरवाही येथील रोड गेलेल्या घरांाबाबत व पर्यायी जागे बाबत विचार करण्यात यावा.

सुचक - श्री . मनमोहनसिंग ओंबेरॉय

अनुमोदक :- श्री प्रकाश निकाळजे.

**श्री . गिरजाराम हळनोर :-** सदरचा विषय स्थागित ठेवण्यात यावा. हळनोर
**मा. महापौर :-** स्थागित ठेवण्यात येतो.
**ठराव :** प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र. ३** औरंगाबाद शहराचे नाव बदलुन संभाजीनगर असे नामकारण करणे बाबत.

सुचक - श्री . प्रफुल्ल मालानी श्री . संजय जोशी , सौ रजनी जोशी श्री प्रदीप जैस्वाल
अनुमोदक :- श्री विजय कुमार मेहेर , श्री वसंत देशमुख , श्री प्रभाकर विधाते , श्री सुदाम सोनवणे , श्री महादेव सुर्यांवशी .

**मा. महापौर :-** विषय क्रंमाक ३ वर सर्व सभासंदानी चर्चा करावी.

**श्री. जावेद रज्जाक** :-औरंगाबाद शहराचे नाव बदलुन नामांतर करणे योग्य वाटत नाही. यामध्ये सर्वानुमते विचार व्हावा ( या वेळी सर्व स. सभासद सभागृहात प्रस्तावा बाबत घोषणा व प्रतिघोषणा देत होते.)

सत्तासढ पक्षाचे सर्व स. सभासद सदरील प्रस्तावात मंजुर म्हणून घोषणा देतात.

**मा. महापौर :-** मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद शहराचे नाव बदलुन "संभाजीनगर " असे नामकरण करण्यात बहुमताने मंजुरी देण्यात येते सदरील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

वैद्यानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच मा.महापौर यांनी सभा संपल्याचे जाहीर करुन "जन गन मन " राष्ट्गिताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. महापौर
महानगरपालिका,औरंगाबाद.

# ***औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद***

**दि.२०.०७.९५ रोजी मा. महापौर , सौ सुनंदा कोल्हे यांच्या अध्यक्षते खाली सर्वसाधारण सभा संपन्न झाली तीचे इतिवृत्त. सौ. सुनंदा कोल्हे महापौर हयांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक .२०.०७.९५ रोजी अंदाजीत वेळ ११.३० वाजता महानगरपालिका संचलित नगरभुवन येथे "वंदेमातरम" गीताने सर्वसाधारण सभेला सुरुवात झ ााली सभेत रजिस्टर प्रमाणे स.नगरसेवक मा.आयुक्त, उपआयुक्त तथा संबधीत अधिकारी हयांची उपस्थिती होती.**

१) सौ.ज्योत्स्ना हिवराळे
२) श्री. लांडगे गौतम लिंबाजी
३) श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव
४) श्री. नरेंद्र यादवराव पाटील
५) श्री. सोनवणे सुदाम रामदास
६) श्री. मुजीब अलमशाह मिर आलमशाह
७) श्री. अब्दुल जावेद रज्जाक
८) श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र
९) श्री. खखोरडिया धिरज शांतीलाल
१०) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
११) सौ. लता श्रीनिवास दलाल
१२) श्री. अब्दुल रशिदखान मामु
१३) श्री. डॉ. कराड भागवत किसनराव
१४) श्रीमती निर्मला विठ्ठल कांबळे
१५) श्री. अब्दुल रशीद सत्तार
१६) श्री. विखारोद्यीन पिता कुतुबोद्यीन
१७) श्री. गंगाधर सुखदेव गाडे
१८) श्री. बारवाल गजानन रामकिसन
१९) श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंह
२०) श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२१) श्री. जोशी संजय रामदास
२२) श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
२३) सौ. काळुसे मंदा धनंजय
२४) श्री. कचरु चंद्रभान नवपुते

श्री. प्रदिप जैस्वाल : आजच्या सभेसाठीच्या कोरम पुर्ण नसल्यामुळे पुढे ढकरण्यात यावी अशी मी विनंती करतो.

मा. महापौर : ००.०५ मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते. (अंदाजीत वेळ ११.३०)

सविच : सभेला सुरुवात होत आहे. (अंदाजीत वेळ ११.३५)

श्री. प्रदिप जैस्वाल : मी. सभा गृहाला पुन्हा विनंती करितो की, आजच्या सभेस कोरम अपुर्ण असल्यामुळे आजची बैठक पुढे ढकलण्यात यावा.

श्री. रशीद मामु, श्री. बी.के. कराड, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स.सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांच्या सुचनेस आमचे पुर्णपणे सहमत आहे.

सचिव : मा. महापौर हयांच्या आदेशानुसार आजची सभा अभावी तहकुब करुन पुढे ढकलण्यात येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सोमवार दि.१९.०८.९५ रोजी मा. महापौर , सौ सुनंदा कोल्हे यांच्या अध्यक्षते खाली सर्वसाधारण सभा संपन्न झाली तीचे इतिवृत्त. सौ. सुनंदा कोल्हे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दिनांक .१९.०८.९५ रोजी सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली. सदरच्या सभेस "वंदे मातरम्" या गिताने सकाळी ११.२० वाजता झाली. सभेस रजिस्टर प्रमाणे स.नगरसेवक, व संबंधीत अधिकारी उपस्थित होते.**

१) सौ. ज्योत्सना हिवराळे
२) श्री. गौतम भागाजी खरात
३) श्री. लांडगे गौतम लिंबाजी
४) श्री. मो. मुस्ताक अहमद
५) श्री. अ.जावेद रज्जाक
६) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
७) सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम
८) सौ. अलका रमेश पाटील
९) सौ. सविता आव्हाड
१०) श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११) श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग
१२) श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
१३) श्री. अ. रशिदखान (मामु)
१४) सौ. लता श्रीनिवास दलाल

श्री. रशिद (मामु) : आजच्या सभेसाठीचा कोरम अपुर्ण असल्याने सभा तहकुब करावी.
सौ. लता दलाल : कोरम अपुर्ण असल्याने सभा तहकुब करावी.
मा. महापौर : ००.०५ मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येते. (वेळ अंदाजे ११.२५)
(सभेला सुरुवात अंदाजे ११.३० वाजता)
श्री. रशिद (मामु) : पुन्हा सभेला कोरम अपुर्ण असल्याने सभा तहकुब करावी.
मा. महापौर : सभा कोरम अभावि तहकुब करुन पुढे ढकलण्यात येते.

"जन गण मन" राष्ट्र गिताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२०.०७.१९९५ व १९.०८.९५ रोजी गणपुर्ती अभावि तहकुब झालेली औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवार दि. २८.०८.९५ रोजी मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षतेखाली नगरभुवन (टाऊन हॉल) येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सकाळी ११.१५ वाजता सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) सौ. ज्योत्स्ना हिवराळे
२) सौ. रुख्मणबाई खंडेराव लोखंडे
३) श्री. अफसरखाँ यासिनखाँ
४) श्री. प्रभाकर सिताराम विधाते
५) सौ. साजेदा बेगम
६) श्री. म.सलिम म. हनिफ कुरैशी
७) श्री. गौतम भागाजी खरात
८) श्री. ॲड. गणेश किशनराव वानखेडे
९) सौ. रजनी रमेश जोशी
१०) सौ. उषाबाई दिलीप गायकवाड
११) सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक
१२) सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
१३) श्री. गौतम लिंबाजी लांडगे
१४) श्री. महादेव पुंडलिकराव सुर्यवंशी
१५) श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव
१६) श्री. नरेंद्र यादवराव पाटील
१७) श्री. काशीनाथ हरिभाऊ कोकाटे
१८) श्री. सुदाम रामदास सोनवणे
१९) श्री. रविंद्र बाबुराव इंगळे
२०) श्री. कंवरसिंग किसनसिंग बैनाडे
२१) सौ. पद्मा बाबुराव शिंदे
२२) श्री. सुभाष भिकाजी टाकळकर
२३) श्री. प्रफुल्ल लालचंद मालाणी
२४) श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
२५) सौ. धनश्री अमोल विसपुते
२६) श्री. फजउल्लखान अजमत उल्लाखान
२७) श्री. अजिजखॉ गणीखॉ
२८) श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा
२९) श्री. महंमद मुश्ताक अहमद
३०) श्रीमती नुरजहॉ बेगम अ. रहेमान खॉ
३१) श्री. वसंत विनायकराव देशमुख
३२) श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर
३३) श्रीमती मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन

३४) श्री. अ. जावेद रज्जाक
३५) श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर
३६) श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे
३७) सौ. यशोदा धनंजय वाडेकर
३८) श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले
३९) श्रीमती पुष्पाताई सुरेशचन्द्र गंगवाल
४०) श्री. हमीदउद्यीन ताबा फसियोद्यीन
४१) श्री. म.अ.रऊफ म.अ. माबुद
४२) श्री. स.अ.एकबालोद्यीन स.मो.कुतुबोद्यीन
४३) श्री. धिरज शांतीलाल खखोरडीया
४४) श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल
४५) श्री. सय्यद अली मिर सलामी
४६) श्री. रमेश दिपचंद लाहोट
४७) श्री. संजय किसनराव केनेकर
४८) सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
४९) सौ. लता श्रीनिवास दलाल,
५०) श्री. जयवंत केशवराव ओक
५१) सौ. अलका रमेश पाटील
५२) सौ. शकुंतला हरिदास धांडे
५३) श्री. अब्दुल रशिदखाँन(मामु)
५४) कु. माया लिंबाजी लाडवाणी
५५) श्री. डॉ. भागवत किशराव कराड
५६) सौ. निर्मला विठ्ठल कांबळे
५७) श्री. अ.रशिद अ. सत्तार
५८) श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५९) श्री. विखारोद्यीन पिता खुदबोद्यीन
६०) श्री. विकास रतनलाल जैन
६१) श्री. गंगाधर सुखदेव गाडे
६२) श्री. गजानन रामकिसन बारवाल
६३) श्री. मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय
६४) श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
६५) श्री. संजय रामदास जोशी
६६) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
६७) श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
६८) श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे
६९) श्री. विठ्ठल किसन जाधव
७०) श्री. विजयकुमार गजाजन मेहेर
७१) सौ. मंदा धनंजय काळुसे
७२) श्री. बन्सी तुळशीराम गांगवे
७३) श्री. भगवान देविदास घडामोडे
७४) श्री. कचरु चद्रभान नवपुते

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली.

**विषय क्र. १४/१ :**

दिनांक २८-८-१९९५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

श्री. नरेंद्र पाटील : फेरोजाबाद रेल्वस्थानका दरम्यान जी भिषण रेल्वे दुर्घटना घडली ज्या मध्ये कित्येक माणसे मृत पावली, अशा सर्वांना सभागृहामध्ये सभागृहातर्फे ००.०२ मिनिटे उभे राहुन फेरोजाबाद रेल्वस्थानका दरम्यान जी भिषण रेल्वे दुर्घटना घडली व त्यात मृत पावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्यात येते.

श्री. नरेंद्र पाटील, श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. गिरजाराम हाळनोर : सभागृहात अगोदर "पाणी प्रश्नावर" चर्चा व्हावी अशी मी विनंती करतो अगोदर विषय क्र. ०१ मंजुर झाल्यानंतर पाणी प्रश्नावर चर्चा करण्यास हरकत नाही.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : इतिवृत्त कायम करण्यापुर्वी पान क्र. ८ मध्ये प्रस्ताव ३ मधील ठरावात व्हावी ती अशी "त्यानुसार शासनाची मंजुरी प्राप्त होईल या आशेला आयुक्तांच्या अधिकारांमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम ५३ अन्वये ६(सहा) महिन्याकरिता सदरील पदावर पाच आणि पदोन्नती देण्यात यावी.

मा. महापौर : ठीक आहे. सदरचे वाक्य इविवृत्तातुन वगळण्यात येते.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : इविवृत्तातील पान क्र. १४ मधील पुरवणी विषय पत्रिकेतील प्रस्ताव क्रमांक ३ शहराचे नामांतर करण्याचा प्रस्ताव अजुन कायम करण्यात आलेला नसतांनाही सदरचया प्रस्तावाची माहिती शासनाकडे का पाठविली? यामुळे सभागृहाची दिशाभुल केलेली आहे. ती चुकीची आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : आमच्या माहिती प्रमाणे शासनानेच माहिती मागविलेली असल्याचे सदरची माहिती पाठविलेली आहे. प्रस्ताव पाठविलेला नाही.

मा. महापौर : शासनाने मागविलेली माहिती फक्त शासनाकडे पाठविलेली आहे.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : कायम झालेल्या नसतांनाही शासनाकडे माहिती का पाठविली याचा खुलासा व्हावा. (यावेळी सभागृहात शासनाकडे पाठविलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत दाखवितात.)

नगरसचिव : शासनाने पत्रानुसार विधासभेत एल.ए.क्यु प्रश्न होता त्यामुळे सदरची माहिती तात्काळ पाठविणे आवश्यक होते.

श्री. अब्दुल रशिदखान : इवितृत्त कायम करण्यात आलेले नसतांनाही सदरची प्रस्तावाची माहिती शासनाकडे कां पाटविली?

(यावेळी सभागृहात स.सभासदांचे आपसात बोलण्याचे आवाज चालु असतात काहीही ऐकु येत नाही व विषय क्र. १ मंजुर असे ओरडतात.)

मा. महापौर : सर्व स. सभासदांना विनंती की, सर्वांनी खाली बसुन घ्यावे व शांतता करण्यात येतो.

(यावेळी सभागृहात दोन्हीही पक्षाकडील स. सभासदांच्या घोषणा बाजी चालु होते.)

मा. महापौर : आजची सभा ००.१० मिनिटे सभा तहकुब करण्यात येते. अंदाजे वेळ ११.४० वा.

श्री. अब्दुल रशिदखान : सदरचा विषय आम्हास मंजुर नाही. दहा मिनिटांसाठी तहकुब करण्यात आलेल्या सभेस पुन्हा ११.५० वा. पुन्हा सुरुवात झाली.

श्री. अब्दुल रशिदखॉन : सभागृहात इविवृत्त कायम न करता शासनाकडे माहिती पाठविणे या बाबतचा आम्हीउ निषेध व्यक्त करीत आहोत.

श्री. मालाणी प्रफुल्ल : सभागृहाचा वेळ वाया न घालविता विषय क्रमांक २ वर चर्चा करावी.

श्री. नरेंद्र पाटील : सर्व स. सभासदांचा प्रत्येक विषयावर बोलण्याचा हक्क कृपया सर्वांना बोलु द्यावे.

मा. महापौर : सर्व स. सभासदांना विनंती की, सभागृहात शांतता बाळगावी.

श्री. अब्दुल रशिदखान : सभागृहात चुकी झाली अशी माफी मागावी, आम्ही मान्य करतो.

मा. महापौर : शासन पत्रानुसार माहिती शासनाकडे पाठविण्यात आलेली आहे.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : माझे असे म्हणणे आहे की, जो पर्यंत इतिवृत्त कायम होत नाही तो पर्यंत कुठलीही माहिती पाठविता येते काय?

(यावेळी सभासद व अनेक स. सभासद विषय क्र. २ वर चर्चा करुन असे ओरडतात.)

श्री. अब्दुल रशिदखान : सचिवांनी डुप्लीकेट काम करु नये व महापौरांनी सुध्दा.

श्री. नरेंद्र पाटील, श्री. मालाणी प्रफुल्ल : स. सभासदांनी मा. महापौरांबद्दल असे उद्‌गार काढणे योग्य नाही तसेच आम्ही सहन करणार नाही.

(यावेळी पुन्हा सभागृहात जोरजोरात आवाज होतो)

मा. महापौर : सभा ००१० मिनिटासाठी तहकुब करण्यात येते.

दहा मिनिटांसाठी तहकुब करण्यात आलेल्या सभेस पुन्हा ०१.१० वाजता पुन्हा सुरुवात झाली.

श्री. जयवंत ओक : सभागृहात स. सभासद श्री. नरेंद्र पाटील व रशिद मामु यांनी अपशब्द उच्चारले त्याबाबत त्यांचे आजचे सभासदस्त्व रद्द करण्यात यावे व सभागृहात माफी मागवयास लावुन त्यांना सक्त ताकीद देण्यात यावी.

श्री. मोहसिन अहेमद : इतिवृत्त कायम करण्यापुर्वीच संबंधीत अधिकाऱ्यांने शासनास माहिती पाठविली आशा आधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी.

श्री. अब्दुल रशिदखान : सचिवांनी या बाबत खुलासा करावा कारण त्यांनीच सदरची माहिती शासनाकडे पाठविलेली आहे.

नगर सचिव : स. सभासदांनी सुचना केल्याप्रमाणे या बाबत विशेष लक्ष देण्यात येइल.

मा. महापौर : सर्व स. सभासदांना सुचना करण्यात येते की, सभागृहात कुणाबद्दल अपशब्द वापरुन बोलणे याची दक्षता घ्यावी.

श्री. नरेंद्र पाटील शहराचे नामांतर प्रस्ताव मंजुर केला तो पुर्णतः चुकीचा आहे.

श्री. गंगाधर गाडे : सध्या महाराष्ट्रात पाण्याची भिषण टंचाइ परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशावेळी अगोदर पाणी प्रश्नावर चर्चा होणे आवश्यक आहे. इतर बाबींवरती विनाकारण चर्चा होणे योग्य वाटत नाही. (यावेळी स्थायी समितीचे सभापतींनी पाणी प्रश्नावर एक निवेदन मा. महापौरांना दिले.)

मा. महापौर : स. सभासदांनी सुचना केल्याप्रमाणे पाण्याच्या प्रश्नावर चर्चा करणेसाठी सोमवार दि. ४-९-९५ रोजी दुपारी ०२.०० वाजता विशेष सभा बोलवण्यात येइल.

श्री. मोहसिन अहेमद, श्री. महंमद मुश्ताक अहेमद श्री. हमीदउद्दीन ताबा : स. सभासदास रु. ४५०/- वरुन रु. १२००/- प्रतिमहा मानधनास वाढ करावयाचा प्रस्ताव मंजुर झाला तेव्हापासुन त्याची अंमल बजावणी व्हावी. अशी दुरुस्ती व्हावी. तसेच नगरसेवक स्वेच्छानिधी बाबत जी नियमावली आहे, त्यातील सुद्दा क्रमांक १ ठेवुन बाकीचे मुद्दे वगळण्यात यावे.

मा. महापौर : ठिक आहे.

**ठराव :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे-

१) दिनांक ११-६-९५ च्या इतिवृत्तातील ठराव क्र. ७/३ च्या मुळ प्रस्तावात खालील वाक्य नसल्यामुळे (ती चुकीची वाक्य रचना पुढील प्रमाणे) "त्यानुसार शासनाची मंजुरी प्राप्त होईल या आशेवर मा. आयुक्तांच्या अधिकारामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये सहा महिन्या करिता सदरील पदावर अधिकाऱ्यास पदोन्नती देण्यात यावी" ही वाक्य रचना वगळयात येते.
२) दि. ११-६-९५ च्या इतिवृत्तातील ठराव क्रमांक ६/२ मध्ये स. नगरसेवकांची मासिक मानधनात रुपये ४५०/- वरुन रुपये १२००/- पावेतो वाढ करण्यात यावी व सदर वाढीव रकमेची अंमल बजावणी ठराव मंजुर झाला त्या महिन्यापासुन करण्यात यावी. अशी वाढ करण्यात येते.
३) दि. १९-६-९५ च्या इतिवृत्तातील ठराव क्र. ११/७ मधील नियम क्रमांक १,२ (१) व ३ कायम ठेवुन नियम नं २ मधील पोट क्रमांक २ ते ७ वगळण्यात येतात.

वरील प्रमाणे अ.क्र. १ ते ३ मधील दुरुस्ती व वाढवयास दिनांक १९-६-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. १५/२ :
स्थायी समितीने ठराव क्र. ३२ दि. ३-७-९५ अन्वये महानगरपालिकेच्या बांधकामासाठी आवश्यक असलेले वेगवेगळया व्यासाचे (खालील दर्शविलेल्या प्रमाणे) १६० मे. टन पिळदार लोखंड खरेदी करण्यास रक्कम रुपये २७,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देवुन सर्वसाधारण सभेस शिफारस केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ०६ एम्.एम्. | ०७ मे. टन |
| २. | ०८ एम्.एम्. | २४ मे. टन |
| ३. | १० एम्.एम्. | २२ मे. टन |
| ४. | १२ एम्.एम्. | ३६ मे. टन |
| ५. | १६ एम्.एम्. | ३६ मे. टन |
| ६. | २० एम्.एम्. | २२ मे. टन |
| ७. | २५ एम्.एम्. | १२ मे. टन |

ठराव :
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे. महानगरनालिकेच्या बांधकामासाठी आवश्यक असलेले वेगवेगळ व्यासाची खालील प्रमाणे १६० मे.टन पिळदार लोखंड खरेदी करण्यास रक्कम रुपये. २७,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | ०६ एम्.एम्. | ०७ मे. टन |
| २. | ०८ एम्.एम्. | २४ मे. टन |
| ३. | १० एम्.एम्. | २२ मे. टन |
| ४. | १२ एम्.एम्. | ३६ मे. टन |

| | | |
|---|---|---|
| ५. | १६ एम्.एम्. | ३६ मे. टन |
| ६. | २० एम्.एम्. | २२ मे. टन |
| ७. | २५ एम्.एम्. | १२ मे. टन |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६/३** :

अखिल भारतीय महिला क्रिकेट स्पर्धा दिनांक (३०-५-९५ ते ५-६-९५) पर्यंत औ'बाद येथे संपन्न झाल्या. या स्पर्धासाठी संयोजकांनी महानगरपालिकेतर्फे नगरसेवक स्वेच्छा निधीतुन मदत मागीतली होती. त्या अनुषंगाने एकुण २६ नगरसेवकांतील त्यांच्या स्वेच्छा निधीतुन प्रत्येकी रक्कम रु. ५०००/- देण्याबाबत संमतीपत्रे दिलेली आहेत.

या बाबत अस्तीत्वात असलेल्या स्वेच्छा निधी नियमानुसार (सर्व साधारण सभा ठराव क्र. ६२/२ दि. २८-१०-९१) स. नगरसेवक (एकाहुन अधिक क्रिकेट स्पर्धा आयोजित) करण्यासाठी त्यांच्या स्वेच्छा निधीतुन रु. १,००,०००/- (रुपये एक लाखापर्यंत) अर्थसहाय्य सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करु शकतात. खालील २६ नगर सेविकांची त्यांचे स्वेच्छा निधीतुन प्रत्येक रु. ५०००/- अर्थसहाय्य देण्याची संमतीपत्रे दिलेली आहेत. त्यानुसार एकत्रित स्वेच्छा निधी आयोजित स्पर्धेसाठी रुपये १,३०,०००/- होती २६x५०००/-) त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.

तथापी वरील क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सर्वसाधारण सभा होण्यापुर्वी झाल्याने सभागृहाची मान्यता मिळेल या अपेक्षेने मा. महापौर आणि मा. सभापती स्थायी समिती हयांची मान्यता घेवुन स्पर्धा संयोजकास रु. १,००,०००/- प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात आली केलेल्या कार्यवाहीस सभागृहाने मान्यता देण्याची विनंती असुन उर्वरित रक्कम रु. ३०,०००/- (एकुण रुपये १,००,०००/-) विशेष बाब म्हणुन अर्थसहाय्य मंजुरीस मान्यता देण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | नांव | पद |
|---|---|---|---|
| १. | ७९ | सौ. सुनंदा कोल्हे | महापौर |
| २. | ७२ | सौ. ज्योत्स्ना हिवराळे | उप-महापौर |
| ३. | ४७ | कु. माया लाडवाणी | नगरसेविका |
| ४. | २० | सौ. पद्मा शिन्दे | --//-- |
| ५. | ०८ | सौ. रजनी जोशी | --//-- |
| ६. | ५१ | सौ. लता दलाल | --//-- |
| ७. | ३८ | सौ. यशोदा वाडेकर | --//-- |
| ८. | ७४ | सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ९. | २५ | सौ. फरदबानो मो. नवाब | --//-- |
| १०. | २८ | श्रीमती आबेदा बेगम | --//-- |
| ११. | ११ | सौ. शिलाबाई गुंजाळे | --//-- |
| १२. | ०९ | सौ. उषाबाई दिलीप | --//-- |
| १३. | १० | सौ. विमलबाई मुंडलिक | --//-- |
| १४. | २४ | सौ. मोहसिना बिल्कीस | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | २६ | श्रीमती जाहेदा बेगम जमीद | --//-- |
| १६. | ६० | सौ. निर्मला विठ्ठलराव कांबळे | --//-- |
| १७. | ३० | श्रीमती नुरजहॉ अ. रहेमान | --//-- |
| १८. | ५९ | सौ. सविता संजय आव्हाड | --//-- |
| १९. | २३ | श्रीमती चंपाबाई विश्वनाथ | --//-- |
| २०. | ५४ | सौ. शकुंतलाबाई हरिदास धांडे | --//-- |
| २१. | ०१ | सौ. रुख्मनबाई खंडेराव लोखंडे | --//-- |
| २२. | ०४ | श्रीमती साजेदा बेगम | --//-- |
| २३. | ५० | सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --//-- |
| २४. | ७८ | सौ. मंदा काळुसे | --//-- |
| २५. | २४ | सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २६. | ४० | श्रीमती पुष्पाताई गंगवाल | --//-- |

संवाद

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महिला क्रिकेट स्पर्धेसाठी रुपये १.४० लाख खर्चास मान्यता न देता ती कमीतकमी रुपये ५० हजारास मान्यता द्यावी.

श्री. मोहसिन अहेमद : महिला क्रिकेट स्पर्धेसाठी फक्त महिला नगरसेवकांकडुन प्रत्येकी रुपये ५०००/- स्वेच्छानिधीतुन एकत्रित करुन रु. १,४०,०००/- लाखाचा प्रस्ताव मांडलेला आहे अशाच प्रकारचा प्रस्ताव इतर कोणत्याही स्पधेसाठी काही स.सदस्यांनी मांडल्यास आपण मान्यता देणार आहात काय?

श्री. प्रदिप जैस्वाल : या बाबत सर्व स.सभासद नगर सेवकांनी आपल्या स्वेच्छा निधीतुन रु. ५०००/- प्रत्येकी देणाचे पत्राव्दारे लिहुन दिलेले आहे त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. अशा प्रकारे कोणत्या खेळास किंवा संस्थेस मदत द्यावयाची झाल्यास नियमावली तयार करुनच नंतर कार्यवाही करणे योग्य.

श्री. नरेंद्र पाटील : क्रिकेट स्पर्धेपुर्वी किती संभाव्य संघ भाग होत आहेत व किती दिवसांचा खर्च अपेक्षित आहे, यासह चर्चा करुन नंतरच मान्यता देणे आवश्यक होते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ज्या संस्थेतर्फे ही स्पर्धा आयोजित केलेली होती, त्या संस्थेस रुपये ५०,०००/- एकदम रक्कम द्यावी यापेक्षा जादा रक्कम देण्यात येऊ नये.

श्री. मोहसिन अहेमद : माझ्या मते आशा कुठल्याही संस्थेस महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देतांना पैशाने न देता एखादया वस्तु स्वरुपात द्यावी.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : सचिवांनी स्वाक्षरी करुन शासनाकडे माहिती पाठविली या बाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(यावेळी झेरॉक्स प्रत सभागृहात दाखवुन एक प्रत देतात)

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासनातर्फे झेरॉक्स प्रत करुन देणे योग्य नसुन यावर कुठेतरी पाबंद घालणे आवश्यक आहे.

सौ.लता दलाल : प्रशासनाची गोपनिय माहिती बाहेर कशी पडते या बाबत अशा अधिकारी/कर्मचाऱ्यावर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : मी नियमाप्रमाणे रेकॉर्ड विभागातुन पैसे भरुन सदरचे पत्राची झेरॉक्स प्रत तयार केलेली आहे.

श्री. वसंत देशमुख : प्रशासनातील गोपनिय माहिती बाहेर कशी पडते याचा खुलासा मा. आयुक्तांनी करावा.

मा. आयुक्त : गोपनिय माहितीची झेरॉक्स प्रत कुणालाही देता येत नाही. फक्त जरुरी पडल्यास व प्रशासनाला आवश्यक वाटल्यासच ती देता येते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासनाची गोपनिय माहिती बाहेर कशी काय येते याची पुर्णतः चौकशी करुन माहिती द्यावी.

श्री. अब्दुल रशिदखान(मामु), श्री. काशीनाथ कोकाटे, सौ. लता दलाल : यापुर्वी असाच प्रकार घडलेला आहे. आणि प्रशासनातील गोपनिय माहिती बाहेर पडणे योग्य नसुन या बाबत संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यावर कार्यवाही करणे योग्य.

मा. आयुक्त : प्रशासनातील गोपनिय माहिती बाहेर देता येत नाही. परंतु कोटी दाखल करता येते आणि याबाबत कोणते कर्मचारी दोषी आढळयास त्यांचेवर कार्यवाही करण्यात येइल.

श्री. गंगाधर गाडे : या ठिकाणी लोकप्रतिनिधी नियुक्त शासन चालत असुन प्रशासन कोणतीही गोपनिय माहिती सर्व सदस्यांना किंवा सभागृहात माहिती होणे आवश्यक आहे, आणि अशी कुठलीही माहिती जनते पर्यंत पोहोच आवश्यक आहे असे मला वाटते

मा. आयुक्त : स. सदस्य श्री. रशिद मामु यांच्या बाबत मी खुलासा केलेला नाही.

सौ.लता दलाल : खुलासा जो केला आहे तो जनरल केला आहे किंवा कसे ते समजने आवश्यक आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : प्रशासनांची अशी कुठलीही गोपनिय माहिती मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमान्वये एखादी समिती नेमुन मागविता येते.

मा. महापौर : यावर जास्त चर्चा न करता विषयावर चर्चा करावी.

श्री. मोहसिन अहेमद : महिला क्रिकेट स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेच्या संयोजक अहेमद मंडळास महानगरपालिकेतर्फे रु. ५०/- हजाराची मदत देण्यात यावी.

श्री. गंगाधर गाडे, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : या व्यतिरिक्त जादा रक्कम मंजुर करु नये अशी सभागृहास विनंती आहे. कारण वार्डातील विकास कामासाठी जनतेच्या कामासाठी हा निधी असतो. तो त्याच मार्गाला लावणे आवश्यक असते. यासाठी अजुन लागल्यास पुन्हा दुसऱ्या सभेत विचार करण्यांत येइल.

श्री. प्रदिप जैस्वाल : प्रथमतः या बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती कडे झाला. परंतु सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मान्यता घेण्यासाठी सर्वसाधारण सभेत येणे आवश्यक असल्याने मी सांगितले व मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ६६ अन्वये पॉलिसी मॅटर असल्याने हा प्रस्ताव सर्वासमोर चर्चेला येणे आवश्यक होते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : अनेक स. सदस्यांच्या सुचनेप्रमाणे या प्रस्तावास रुपये ५०,०००/- हजाराची मान्यता द्यावी.

श्री. मोहसिन अहेमद : निर्णय लवकर होत नसल्यास एखादी चौकशी समिती नेमुण निर्णय घ्यावा.

श्री. प्रफुल्ल मालाणी : विशेष सभा बोलवुन निर्णय घ्यावा.

श्री. काशीनाथ कोकाटे : जास्त चर्चा न करता निर्णय घ्यावा व यापुढे दक्षता घ्यावी.

मा. महापौर : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात येते व यापुढे असा प्रस्ताव आल्यास विचार करुनच नंतर निर्णय देता येइल.

(यावेळी सभागृहातील विरोधी सदस्य सभागृहात निषेध नोंदवुन बाहेर पडतात. अंदाजे ०२.०० वाजता.) (०२.०० वा सभागृहात विरोधी सदस्यांचा प्रवेश)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अखिल भारतीय महिला क्रिकेट स्पर्धा दिनांक ३०-५-९५ ते ०५-६-९५ पर्यंत औरंगाबाद येथे संपन्न झाल्या या स्पर्धा संयोजकांनी महानगरपालिकेतर्फे नगरसेवक स्वेच्छा निधीतुन मागणी केली. त्यानुसार प्रस्तावातील महिला नगर सेविका यांनी त्यांच्या स्वेच्छा निधीतुन प्रत्येकी रु. ५०००/- (१ ते २६ नगरसेविका) २६x५०००= १,३०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख तीस हजार फक्त) एकत्रित त्यांच्या स्वेच्छा निधीतुन अर्थ म्हणुन देण्यात बहुमताने मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७/४ :**

सहाय्यक आयुक्त-१ महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अस्थापनेवर सेवा निवृत्तीमुळे १३ सहसिक्षकांच्या जागा रिक्त असुन शैक्षणिक वर्ष सुरु होत असल्या कारणाने सदर रिक्त जागा भरण्याची कार्यवाही करणे योग्य होइल. औरंगाबाद महापालिकेमध्ये सेवा वर्ग करणे बाबतची खरीच प्रकरणे प्राप्त झाली असुन रिक्त असलेल्या १३ जागा या सरळसेवा भरतीने न भरता जिल्हा परिषदेमधुन महानगरपालिकेमध्ये सेवा वर्ग करणेसाठी करण्यात आलेल्या अर्जावर विचार करण्यात येवुन भरणे योग्य होइल. त्यामुळे महानगरपालिकेस अनुभवी शिक्षक वर्ग प्राप्त होइल. जेणे करुन महानगरपालिकेतील शाळेचा व शैक्षणिक दर्जा सुधारण्यात नक्कीच मदत होइल. सेवा वर्ग करतांना संबंधीताचे वयाबाबत विचार करणे योग्य होइल. त्यामध्ये प्रामुख्याने ४५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील अर्जधारकांचा विचार करण्यात येऊन खालील शर्ती व अटींच्या आधारे त्यांची सेवा महानगरपालिकेमध्ये वर्गकरणे सोइस्कर होइल.

१) ज्या कार्यालयामध्ये सेवा केलेली आहे. त्या झालेल्या सेवेबद्दल निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम मनपा फंडा मध्ये स्वत: भरण्याकरिता रु. १०/- च्या बाँड पेपरवर प्रतिज्ञापत्र तयार करुन द्यावे.

२) संबंधीत कार्यालयाकडुन कार्यमुक्त होतांना सेवा पुस्तिकामध्ये व एल् पी.सी.मध्ये निवृत्ती वेतन अंशदान स्वत:भरणार असल्या बद्दल नोंदी करुन घ्याव्यात.

३) मनपा मध्ये रुजु होते वेळी निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम मनपा फंडामध्ये जमा करण्यात यावी.

४) मनपामध्ये कामावर रुजु होतांना संबंधीत कार्यालयाकडुन झाल्याचे प्रमाणपत्र व तत्संबंधीचे सर्व कागदपत्र मनपाकडे वर्ग करावीत.

५) मनपाकडे ते ज्या तारखेला त्यांची सेवा जेष्ठता ग्राहय धरली जाईल. त्या बद्दल लेखी शपथपत्र रु. १०/- च्या बाँड पेपरवर द्यावे.

६) मनपामध्ये त्यांची सेवा वर्ग झाल्यानंतर पुर्वीच्या कार्यालयामध्ये त्यांना मिळणाऱ्या वेतनास संरक्षण दिले जाईल. त्यानुसार त्यांची वेतन निश्चिती करण्यात येइल.

७) संबंधीत सेवा वर्ग झाल्यानंतर त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियमांतर्गत अटी व शर्ती त्यांना लागु होतील.

८) वर्ग होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वय ४५ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

९) वर्ग होणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारची चौकशी चालु नसावी.

१०) शारीरिक दृष्टया कर्मचारी पात्र असावा.

वरील प्रमाणे शर्ती व अटीनुसार जि.प. मधुन महानगरपालिकेमध्ये सेवा वर्ग करणे योग्य होइल.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

संवाद

श्री. मोहसिन अहेमद : यापुर्वी शिक्षक भरतीसाठी इंटर व्हयु कॉल पाठविण्यात आले, त्या नंतर इंटर व्हयु रद्द का करण्यात आले? याची माहिती द्यावी.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : जिल्हा परिषद मधुन मनपा कडे शिक्षक घेणे योग्य नाही.

श्रीमती मोहसिना बिल्कीस : मनपामध्ये नविन शिक्षक घेणे उचित होइल कारण जि.प.मनपा मध्ये शिक्षक घेणेसाठी कसे शिक्षक येतील याची काहीही खात्री दिसुन येणार नाही.

मा. महापौर : या बाबत मा. आयुक्त खुलासा करतील.

सौ. रजनी जोशी, श्री. भगवान घडामोडे, श्री. नरेंद्र पाटील : जि.परिषदेतुन मनपाकडे शिक्षकांना सामावुन घेणे योग्य नसुन हा प्रस्ताव मंजुर करु नये.

मा. आयुक्त सदरचा प्रस्ताव प्रशासकियरित्या माडला असुन त्यास सभागृहाची मंजुरीनुसार कार्यवाही करता येइल.

श्री. मोहसिन अहेमद : मनपा शिक्षक भरतीलची इंटरव्हयु का रद्द केला याची माहिती द्यावी.

मा. आयुक्त : यापुर्वी जिल्हा परिषदे कडुन मनपाकडे शिक्षक भरती वर्ग केलेले आहेत. परंतु तसे आता जर काही बदल करावयाचा असल्यास आपण निर्णय घेऊ शकतो.

श्री. जावेद रज्जाक : मनपा शिक्षक भरती करतांना सेवा योजन कार्यालयातुन नावे मागवुन नविन भरती करावी. परंतु जिल्हा परिषदेकडुन शिक्षक अजिबात बोलवु नयेत.

सौ. अलका पाटील,श्री. हमीदउद्यीन ताबा : जिल्हापरिषदेकडुन मनपाकडे शिक्षक भरण्याचा प्रस्ताव नामंजुर करावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : या बाबत चर्चा जास्त होत आहे. तेव्हा लवकरात लवकर निर्णय व्हावा.

मा. महापौर : जिल्हा परिषदेकडुन शिक्षक भरती न करता मनपानेय सेवायोजना या कार्यालयाकडुन किंवा जाहिरात देवुन नविन भरती करण्याची व्यवस्था करावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवर १३ सहशिक्षकांच्या जागा रिक्त आहेत त्या जागांवर जिल्हा परिषदेकडुन शिक्षक न घेता सरळ महापालिकेनेच नियमाप्रमाणे कार्यवाही करुन शिक्षकांची भरती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८/५** :

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल येथील जलसुध्दीकरण केंद्रासाठी तसेच इतर पाण्याच्या टाक्यावर पाणी निर्जंतुकी करण्यासाठी स्टेबल ब्लीचिंग पावडर एकुण ५० मे.टन. खरेदीसाठी प्रति मे.टन. ११,३६०/- प्रमाणे एकुण

रक्कम रु. ५,६८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. नरेंद्र पाटील, श्री. गौतम खरात, श्री. गंगाधर गाडे : ब्लिचिंग पावडरचा साठा किती वर्षासाठी आहोत व ते कोणत्या कंपनीकडुन मागविणार याची माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता पा.पु. : हर्सुल येथ्हील जलशुध्दीकरण केंद्रासाठी तसेच इतर पाण्याच्या टाक्यावर पाणी निर्जतुकी करण्यासाठी स्टेपल ब्लिचिंग पावडर ३५% क्लोरिन असलेले ब्लिचिंग डी.सी. एम् कंपनी कडुन घेणार आहोत.

श्री. महादेव सुर्यवंशी : सदरच्या ब्लिचिंग पावडर बाबत स्थायी समिती कडुनच कार्यवाही व्हावी.

श्री. मोहसिन अहेमद : नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. महापौर : पुर्वीचे जे नियम व निकष आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी तसेच इतर पाण्याच्या टाक्यावर पाणी निर्जतुकी करण्यासाठी स्टेबल ब्लिचिंग पावडर एकुण ५० मे.टन खरेदीसाठी प्रति मे.टन. रु. ११,३६०/- प्रमाणे एकुण रक्कम रु. ५,६८,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९/६** :

स्थायी समिती ठराव क्रमांक ४१/ दि. १०-७-९५ अन्वये प्रशासनातर्फे पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानी पुरविण्यात आलेल्या दुरध्वनीवरील एस.टी.डी. खर्चा बाबतच्या निर्बंधासंबंधी मा. मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर निवासस्थानी असलेल्या दुरध्वनी करिता एस.टी.डी. सवलत उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा यास मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार प्रशासनातर्फे महानगरपालिका पदाधिकारी व अधिकारी यांच्या निवासस्थानी असलेल्या दुरध्वनींना एस.टी.डी. सवलत उपलब्ध करुन दिल्यास खालील प्रमाणे निर्बंध सुचविण्यात आलेले आहेत.

| | |
|---|---|
| १) मा. महापौर<br>मा. उप-महापौर<br>मा. सभापती स्थायी समिती, | प्रति माह रुपये -२५००/- |
| २) मा. आयुक्त<br>मा. उप-आयुक्त | प्रति माह रुपये -२५००/- |
| ३) अन्यसर्व अधिकारी | प्रति माह रुपये -५००/- |

प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

श्री. मोहसिन अहेमद : इतर अधिकाऱ्यांप्रमाणे मनपा नगर सचिवांनाही एस.टी.डी. सेवेची त्यांच्या निवासस्थानी सेवा द्यावी.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : पदाधिकारी व अधिकारी यांच्या प्रमाणेच मनपातील स. नगरसेवकांनाही रुपये २५०/- प्रति महा देण्यात यावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : मा. महापौर,उप-महापौर यांनी २५००/- च्या ऐवजी रुपये ५०००/- एस.टी.डीची सवलत द्यावी.

श्री. गंगाधर गाडे : दुरध्वनीचा दुरुपयोग होणार नाही याची काळाजी घ्यावी व अधिकात्यांच्या बाबतीत कोणत्या अधिकाऱ्यांना सवलत देणार यादी द्यावी.

मा. महापौर : या बाबत मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : ज्या अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी दुरध्वनीची व्यवस्था आहे त्या अधिकाऱ्यांना एस.टी.डी. सेवा उपलब्ध होणार आहे.

मा. महापौर प्रस्तावास मंजुरी देवुन स.नगर सेवकांच्या निवास स्थानी दुरध्वनी व्यवस्था आहे. त्यांनाही दरमहा रु. ३००/- या प्रमाणे दुरध्वनी बिलापोटी देण्याची कार्यवाही करणेत येइल.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे ज्या पदाधिकारी व अधिकारी निवासस्थानी प्रशासना तर्फे पुरविण्यात आलेल्या दुरध्वनींना एस.टी.डी. सवलत उपलब्ध आहे. अशा दुरध्वनी वरील खर्चा बाबत खालील प्रमाणे निर्बंध कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| ३) मा. महापौर<br>मा. उप-महापौर<br>मा. सभापती स्थायी समिती, | प्रति माह रुपये -२५००/- |
| ४) मा. आयुक्त<br>मा. उप-आयुक्त | प्रति माह रुपये -२५००/- |
| ३) अन्यसर्व अधिकारी | प्रति माह रुपये -५००/- |

याशिवाय औरंगाबाद महानगरपालिकेच्या स. सभासदांना त्यांचे निवास स्थानी असलेल्या दुरध्वनी वरील देयकांचे खर्चा बाबत प्रति माहा रु. ३००/- अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/-<br>नगरसचिव,<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | स्वाक्षरीत/-<br>मा. महापौर,<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०४-०९-१९९५ रोजी संपन्न झालेल्या "विशेष सर्वसाधारण" सभेचे इतिवृत्त. मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४-९-९५ रोजी दुपारी ०२.०० वाजता शहरातील प्रश्नावर चर्चा करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा आयोजिली होती. सभेत खालील तथा मा. आयुक्त, उप-आयुक्त १ व २ व संबंधीत अधिकारी वर्ग उपस्थित होते. सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या गीताने झाली.**

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. ज्योत्स्ना हिवराळे | उप-महापौर |
| २) | श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल | सदस्य |
| ३) | श्री. प्रभाकर सिताराम विधाते | --//-- |
| ४) | सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ५) | श्री. म.सलिम हनीफ कुरैशी | --//-- |
| ६) | श्री. ॲड. गणेश किशनराव वानखेडे | --//-- |
| ७) | सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ८) | सौ. उषा दिलीप गायकवाड | --//-- |
| ९) | सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १०) | सौ. शिला सिताराम गुंजाळे | --//-- |
| ११) | श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १२) | श्री. महादेव पुंडलिकराव सुर्यवंशी | --//-- |
| १३) | श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --//-- |
| १४) | श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १५) | श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| १६) | श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | --//-- |
| १७) | श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १८) | श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | --//-- |
| १९) | श्री. बैनाडे कंवरसिंग | --//-- |
| २०) | सौ. पद्मा बाबुराव शिंदे | --//-- |
| २१) | श्री. सुभाष भिकाजी टाकळकर | --//-- |
| २२) | श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २३) | श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २४) | श्री. फजलउल्लाखान अजमतउल्लाखान | --//-- |
| २५) | श्री. अजिजखॉन गणीखॉन | --//-- |
| २६) | श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्ताफ | --//-- |
| २७) | श्री. मो. मुश्ताक अहमद | --//-- |
| २८) | श्रीमती नुरजहॉ बेगम अ. रहमानखॉन | --//-- |
| २९) | श्री. हाजी मोहसिन अहमद हाजी बशिर | --//-- |
| ३०) | श्री. मुजिब आलमशाह मिर आलमशाह | --//-- |
| ३१) | श्रीमती मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| ३२) | श्री. अब्दुल जावेद रज्जाक | --//-- |
| ३३) | श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३४) | श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे | --//-- |
| ३५) | सौ. यशोदाबाई धनंजय वाडेकर | --//-- |
| ३६) | श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले | --//-- |
| ३७) | श्रीमती पुष्पाबाई सुरेशचंद्र गंगवाल | --//-- |
| ३८) | श्री. हमीद उद्दीन ताबा फसियोद्दीन | --//-- |
| ३९) | श्री. म.अ.रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| ४०) | श्री.स.अ. एकबालोद्दीन स.मो. कुतुबोद्दीन | --//-- |
| ४१) | श्री. धिरज शातीलाल खखोरडीया | --//-- |
| ४२) | श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ४३) | श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ४४) | श्री. संजय किसनराव केनेकर | --//-- |
| ४५) | सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --//-- |
| ४६) | सौ. लता श्रीनिवास दलाल | --//-- |
| ४७) | श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| ४८) | सौ. अलका रमेश पाटील | --//-- |
| ४९) | सौ. धांडे शकुंतला हरीदास | --//-- |
| ५०) | श्री. अ.रशिदखान (मामु) | --//-- |
| ५१) | कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ५२) | डॉ. भागवत कराड | --//-- |
| ५३) | सौ. सविता संजय आव्हाड | --//-- |
| ५४) | सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ५५) | श्री. अ.रशिद अ. सत्तार | --//-- |
| ५६) | श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ५७) | श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ५८) | श्री. गंगाधर सुखदेव गाडे | --//-- |
| ५९) | श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ६०) | श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंह | --//-- |
| ६१) | श्री. संजय रामदास जोशी | --//-- |
| ६२) | श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ६३) | श्री. अविनाश लक्ष्मणराव कुमावत | --//-- |
| ६४) | सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६५) | श्री. विजय कुमार गजानन मेहेर | --//-- |
| ६६) | सौ. मंदा धंनजय काळुसे | --//-- |
| ६७) | श्री. बन्शी तुळशीराम गांगवे | --//-- |
| ६८) | श्री. नवपुते कचरु चंद्रभान | --//-- |

मा. महापौर : साक्षरता अभियानाची बैठक असल्याकारणाने सभेस उशिर झाला तया बद्दल दिलगिरी व्यक्त करते.

श्री. नरेंद्र पाटील : पंजाबचे मुख्यमंत्री कै. श्री. बियांतसिंग बॉम्ब स्फोटात अतिरेक्यांनी हत्या केली व रो.ह.यो.मंत्री मा. हरिभाऊ बागडे यांच्या कन्येचे अपघाती निधन झाले त्यांना सभागृहातर्फे ००.०२ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे.

(यावेळी सभागृहात ००.०२ मि.स्तब्ध उभे राहुन दिवंगतांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री. प्रदिप जैस्वाल : महानगरपालिकेच्या हद्दीत खाजगी विहीरी व तलाव किती आहेत. शहरात संपुर्णपणे पाणी सुरळीत होऊ शकेल काय? या बाबत सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री. कचरु नवपुते : शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता, पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही, या बाबत मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : आपण पाणी प्रश्नावर बैठक बोलविली त्या बद्दल प्रथमतः अभिनंदन करतो. १) शहरातील पाणी पुरवठा व्यवस्था करणे आवश्यक आहे. २)

३) वार्ड वाईज विहीरी किती आहे ते तपासुन घ्यावेत ४) सिडकोतील सर्वाजनिक नळांना तोटया नाहीत तेथे ताबडतोब तोटया बसविण्याची कार्यवाही करावी. ५) क्रांती चौकातुन होणारा पाणी पुरवठा शहरात व सिडको टाकीमध्ये सुध्दा होतो तेव्हा सिडकोला पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. ६) आपण जेव्हढा खर्च पाण्यासाठी करतो त्या पाण्याचा वापर व्यवस्थितरित्या करणे आवश्यक असल्याने पाणी बचत करणेबाबत नागरिकांना वर्तमानपत्राव्दारे आवाहन किंवा प्रसिध्दी देणे. ७) मनपातील पाणी पुरवठा विभागांचा परिसर अभियांत्रिकी कार्यालयाशी काहीही ताळमेळ नसतो. ८) शहरात किंवा सिडको भागात अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत त्यांचेवर कार्यवाही होणे आवश्यक आहे. ९) ज्या ठिकाणी पाइप टाकणे आवश्यक आहे तेथे आय.एस् आय मार्फ असलेले टाकावे. पुर्वीचे पाइप लाइन अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. १०) सिडको भागात १/२ तास फक्त पाणी पुरवठा होतो. या बाबत कायमचा तोडगा काढणे आवश्यक आहे. ११) औरंगाबादचे पालकमंत्री महोदयांनी शहर पाणी पुरवठया विषयी बैठक बोलवावी अशी मी विनंती करतो.

श्री. संजय जोशी माझ्या वार्डात टॅंकरने पाणी पुरवठा केला जातो. तर टॅंकर एका ठिकाणी राहात नाही. त्यामुळे गर्दीने पाणी सर्व खाली सांडते, याची काळाजी घ्यावी किंवा ज्या ठिकाणी सततची मागणी असने, अशा भागामध्ये सिमेंटच्या टाक्या तयार करुन त्याच ठिकाणी पाणी टाकावे व नंतर तेथुन नागरिक त्यांच्या वेळे प्रमाणे पाणी होऊ शकतील.

श्री. मुजिब आलमशाह : प्रत्येक वार्डवाइज पाणी किती वाटप केल्या जाते, याची माहिती द्यावी. बऱ्याचशा भागात लाइनमन प्रेशर कमी जास्त करुन नाकटीकांकडुन पैसे उकळतो, या बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री. कचरु नवपुते : सर्व्हीस सेंटर आहे. त्यामुळे बाजु बाजुच्या लोकांना पाण्याचा त्रास होतो. तेव्हा ते सेंटर बंद कां करत नाही याचा खुलासा करावा.

श्री. जयवंत ओक : ज्या ठिकाणी २४ तास सतत पाणी पुरवठा होतो तो अनाधिकृत नळकनेक्शन व्दारे असुन या बाबत आवश्यक ती कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच शहरातील हापसे व विहीरी आहेत ते दुरुस्ती करुन त्याचा तो उपयोग करुन घ्यावा. शहरातील पाणी पुरवठा अनियमितपणे होतो. याकडे लक्ष देणे.

श्री. विजयकुमार मेहेर : नळ कनेक्शन किती आहेत, याची माहिती द्यावी. ज्या ठिकाणी अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत. तेथील अशा प्रकारचे कनेक्शन कसे दिले. याचा शोध घ्यावा व नंतर संबंधीत झोन अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

श्री. महंमद मुश्ताक अहेमद : पाण्याची व्यवस्था मागील सरकारने चांगली केली आहे.

सौ. लता दलाल व श्री. गिरजाराम हाळनोर : याठिकाणी पाणी प्रश्नावर चर्चा होत असतांना राजकारण आनु नये मागील सरकारने काय केले याचा कोणताही उल्लेख करु नये. (अशा वेळी स. सदस्यांचा सभागृहात आवाज होतो.)

मा. महापौर : सर्व स.सदस्यांना विनंती की, एका वेळी फक्त एकाच स. सदस्यांनी बोलावे.

श्री. संजय केनेकर : शहरात जवळपास १८०० नळांना तोटया नाहीत असे माझ्या माहिती प्रमाणे आहे त्यावर कार्यवाही व्हावी.

सौ. अलका पाटील : शहरात पाणी पुरवठा सुरळीत व वेळेवर व्हावा याची काळजी घ्यावी.

सौ. लता दलाल : शहरातील मोठ-मोठया हॉटेल्सकडे अनाधिकृत नळकनेक्शन किती आहेत, याची माहिती द्यावी. बऱ्याचशा गॅरेज वाल्यांना सुधा अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत, या बाबत संबंधीत अधिकारी काहीही कार्यवाही करत नाहीत.

श्री. गंगाधर गाडे : १) सन १९७५ ला कॉग्रेस सरकारने पाणी पुरवठा योजना केली व भारत स्वतंत्र १९४७ ला झाला म्हणजे तब्बल २८ वर्षानंतर ही योजना आखली आहे. याचे दुर्भाग्य अजुन कोणते. २) शहरातील अनेक हॉटेल्स मालकाकडे अनाधिकृतरित्या २-३० इंची कनेक्शन आहेत परंतु कागदावर मात्र १/२ इंची कनेक्शन आहेत. याची माहिती घ्यावी. ३) जालना रोडवरील अभय बिल्डींगजवळ पाइप लाइन फुटल्याने गेले कित्येक दिवसाने पाणी सतत वाहात असते, परंतु संबंधीत विभागाने यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. ४) अनेक ठिकाणी हापसे नादुरुस्त आहेत, याबाबत संबंधीत अधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नाहीत. ५) आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाने, शहरातील प्रत्येक भागामध्ये मच्छर,डास व इतर किटक नाशके जंतु मारण्यासाठी औषधाची फवारणी करणे आवश्यक आहे परंतु या विभागाकडुन काहीही कार्यवाही होत नाही.

सौ. नुरजहॉ बेगम : वार्ड क्र. ३० मध्ये पाणी पुरवठा अत्यंत कमी होतो. याचे कारण काय याचा खुलासा व्हावा.

सौ. मोहसिना बिल्कीस : माझ्या वार्डासाठी पाणी पुरवठयाची वेळ निश्चित नाही, याची पाहणी करावी.

प्रकाश निकाळजे : शहरात पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही, जायकवाडी कठुन पाणी विकत घ्यावे लागते व ते मनपाला परवडणारे नसुन यासाठी महानगरपालिकेने स्वतःचे डॅम तयार करण्याची कार्यवाही करावी. यासाठी काही तज्ञ मंडळींची मदत घ्यावी.

श्री. विठ्ठल जाधव : माझ्या वार्डात टँकरने पाणी पुरवठा होतो. परंतु टँकरचे पाणी सतत खाली पडत असते. कारण लोकांची गर्दी एकदम होते व नळ किंवा पाइपव्दारे पाणी व्यवस्थितरित्या नागरिकांना भरता येत नाही बरेचशे पाणी खालीच पडते. व त्यामुळे खाली पडलेले पाणी पुन्हा जमिनीत मुरुन ते नळाच्या पाइपलाइनव्दारे किंवा हापश्याव्दारे नागरिकांना दुषित पाणी ण्यावयास मिळते.

( दुषित पाणी असल्याचे एका बाटलीत भरलेले पाणी मा. महापौर यांचे समोर आणुन देतात.) माझ्या वार्डात पिण्याच्या पाण्याची अत्यंत निकड असुन जवळपास १३ ते २५ टँकरची दररोजची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. विजयकुमार मेहेर : शहरातील पाणी प्रश्नाबाबत पाणी कसे वाचविता येइल व महानगरपालिकेला पाणी पुरवठा सुरळीत करता येइल याची चर्चा व्हावी.

श्री. मुजिबखॉन : स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

श्री. अभिमन्यु भालेराव : वार्ड क्र. १४ या वार्डात बऱ्याचशा भागात पाइप लाइन नविन टाकलेल्या नाहीत, बऱ्याचशा पाइप लाइन तुटलेल्या अवस्थेत आहेत त्यामुळे दारु कारखान्यातील दुषित पाणी यात मिळुन नागरिकांना पिण्यावाटे येण्याची शक्यता आहे. यासाठी याठिकाणी तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्री. गंगाधर गाडे : एम.आय.डी.सी. भागातील महाराष्ट्र डीस्टीलरीजचे घाण पाणी वाहत जाते व बाजुला असलेल्या मसनतपुर झोपडपट्टीतील नागरिकांना याचा सतत घाण वास येतो. आणि यामुळे तेथील नागरिकांवर रोग होण्याची शक्यता नाकरता येत नाही. यासाठी दारु कारखान्या बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री. काशीनाथ कोकाटे : सिडको भागातील एन ७,११ व १२ येथील पाण्याच्या नविन पाइप लाईन टाकण्याच्या निविदा अद्यापही पुर्णपणे कां आल्या नाहीत या बाबत त्वरीत कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

श्री. मोहसिन अहेमद : तांत्रिक मुद्दे असल्याने संबंधीत अधिकाऱ्यांने खुलासा करावा.

श्री. महादेव सुर्यवंशी : नारेगांवला पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट आहे. तेथे घाण पाणी सतत वाहात असते. व दारुच्या कारखाण्याचाही सतत वास येतो याच्या बाजुला कारखाने असल्याने सतत दुर्गंधी येते. हापसे या ठिकाणी नाहीत.

मा. आयुक्त : काही महत्वाची माहिती मी देतो व काही तांत्रिक मुद्याची माहिती संबंधीत अधिकारी देतील. १) प्रत्येक व्यक्तीला १४० लिटर पाणी प्रतिदिन दयावयास पाहिजे या शहरास दरडोइ एकुण पाणी पुरवठा ९८ एम.एल.डी. सध्या आहे. २) या शहराला एका महिन्याला २५० एम.एम.क्यु पाणी लागते. सध्या जायकवाडी धरणात २५० एम.एम.क्यु. पाणी उपलब्ध आहे. आपल्याला वर्षाचा खर्च ४० एम.एम. क्यु. आहे. वर्षाचा साठा उपलब्ध आहे. ३) सिडकोला २२ १/२ एम.एल.डी. पाणी देत आहोत, पुर्वी ५-६ महिन्यासाठी १६ एम.एल.डी. देत होतो. सहा कन्सलटंटच्या डीझाइनप्रमाणे सिडको ९ १/२ एम.एल.डी. पाणी द्यावयास पाहिजे होते. परंतु सध्याच आजही २२ १/२ एम.एल.डी. पाणी देत आहोत. ४) नक्षत्रवाडी येथील जलवाहिनीवरुन सिडकोला स्वतंत्ररित्या पाइप लाइन टाकण्यास अंदाजे २० कोटीचे प्लॅन तयार करण्यात येत आहे. ५) नळ कनेक्शन बाबत स.सदस्यांनी केलेल्या सुचनांनुसार माझ्या माहितीप्रमाणे ती व्यवस्थित नाही. कारण प्रॉपर्टी ८५ हजार आहेत, व नळ कनेक्शन जास्तीचे असणे शक्य नाही. त्यातही बऱ्याच ठिकाणी खाजगी विहीरी आहेत. ७) ज्या ठिकाणी नळाला तोटया नाहीत, त्या त्या ठिकाणी तोटया लावण्यात येतील सदरचे काम येत्या १५-२० दिवसात पुर्ण करणार. ८) काही भागात चोवीस तास पाणी चालुच राहते. त्या-त्या ठिकाणी प्रत्यक्षात पाहणी करुन कार्यवाही करणार. ९) नळाचे पाणी सतत वाहत जाऊ देता कामा नये, यासाठी अशा संबंधीत मालकाचे नावे नोटीसेस काढण्यात येतील. १०) पाइप लाइन टाकण्याचे वेळी आय.एस.आय. मार्क असलेली खात्री करुन घेण्यात येइल. ११) वेळेबाबत

सकाळी ५ ते रात्री १०.०० ठेवण्यात आलेली आहे. काही तांत्रिक अडचणीमुळे कमी-जास्त होते. १२) सिडकोच्या दुसऱ्या मजल्यावर पाणी पुरवठा करु शकतो काय याची संबंधीत तज्ञाकडुन तपासणी करुन कार्यवाही करण्यात येइल. १३) या शहरात १०३ विहीरी आहेत. त्यापैकी ४९ विहीरी महापालिकेने बांधलेल्या आहेत. १४) टँकरने पाणी पुरवठा केला जातो. तेव्हा संबंधीत वार्डामध्ये सिमेंट टाक्या बांधवयाचा प्रस्ताव आहे तो तयार करता येइल.

श्री. मुजीब आलमशाह : माझ्या वार्डातील कमीत कमी भाग लक्षात घेता ५ तर स्टॅन्ड पोस्ट असावयास पाहिजे ते सुध्दा नाहीत आणि जवळपास १८५० स्टॅन्ड पोस्ट शहरात शक्य नाहीत काही तरी चुकीची माहिती मिळते.

मा. आयुक्त : या बाबतचा खुलासा विभाग प्रमुखांनी करावा. स्टॅन्ड पोस्ट बाबत धोरणात्मक निर्णय घेणे शक्य आहे. शहराला पाणी पुरवठयाचा खर्च कमी आहे. परंतु सिडकोसाठी वेळोवेळी जादा प्रमुखांनी सोसावा लागतो. त्या बाबत एकतर तरतुद करणे आवश्यक आहे. एम.एस.इ.बी. ला ८१/२ परिसर अभियांत्रिकी २.१२+ मनपा २ कोटी = १३ कोटी खर्च पगार व मेंटेनन्स धरुन येतो. व महापालिकेस उत्पन्न फक्त ३ १/२ कोटी आहे. या बाबतचे प्रमाण ठरवावे लागणार आहे. सध्याचा दर रु. ५००/- आहे व नोटीसेस सहीत याचा दर प्रतिवर्ष १८०० करावे लागणार आहे. ज्या ज्या ठिकाणी नविन पाइप लाइन टाकण्याची आहेत त्या-त्या ठिकाणी पाहणी करावयाची आहे.

श्री. मोहसिन अहेमद : सन १९९६५ मध्ये आमखास येथे पाहणी होती त्याचा खुलासा करावा.

श्री. मुंजीब आलमशाह : मी विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा करावा.

सौ. लता दलाल : शहरातील हॉटेल्सना किती इंची नळ कनेक्शन दिलेले आहेत व की अनाधिकृत आहे याचा खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : मुजीब कॉलनी आलमगिर कॉलनी तसेच रोशनगेट व गणेश कॉलनी पर्यंतची सर्व कामे करण्यात येतील अंदाज पत्रकास मंजुरी घेतलेली आहेत. याच भागात ११ स्टॅन्ड पोस्ट ची मंजुरी घेवुन काम सुरु करावे लागणार आहे.

श्री. मुजीब आलमशाह खान : संबंधीत अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा चुकीचा असुन सभागृहाची दिशाभुल करीत आहेत.

श्री. महंमद मुश्ताक अहमद : शहरात अनेक ठिकाणी पाणी समस्या होण्याची शक्यता आहे. त्या बाबत प्रशासनाने लक्ष द्यावे.

श्री. जावेद रज्जाक : माझ्या वार्डातील अनेक पाण्याच्या समस्या आहेत. काही ठिकाणी नविन कामे सुरु करावयाची आहेत या बाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी पाहणी करावी.

श्री. जयवंत ओक : पाण्याचा साठा औरंगाबादेत नाही. तेंव्हा महापालिकेचा स्विमिंग पुल मध्ये दररोज पाणी टाकण्याची आवश्यकता नाही. तेथील पाणी सरकुलरवर चालु राहाते.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : स. सदस्यांनी केलेल्या सुचना प्रमाणे ज्या-ज्या भागात पाणी २४ तास सतत चालु राहाते त्या ठिकाणी पाहाणी करुन ताबडतोब कार्यवाही करण्यात येइल. अनेक ठिकाणी अनाधिकृत नळ कनेक्शन आढळल्यास

विभागीय अधिकाऱ्यामार्फत योग्य ती कार्यवाही करणार, हॉटेल वाल्यांना मोठया व्यासाच्या इंचीचे लाइन दिलेली आढळल्यास त्यांचे बाबतीतही पाहाणी करुन त्वरीत कार्यवाही करण्यात येइल. विहिरी व हापसे वगैरे याचीही सविस्तर माहिती घेवुन त्या प्रमाणे कार्यवाही करता येइल.

डॉ. भागवत कराड : ज्या भागात अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत त्यांचेवर त्वरीत कार्यवाही व्हावी.

श्री. गौतम खरात : महापालिका व परिसर अभियांत्रिकी या दोन कार्यालयांची मिळुन कामात सुसुत्रता आणणे आवश्यक आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : सन १९५४ साली हर्सुल तलाव चालु झाला आहे. नारेगाव व ब्रिजवाडी येथील एम.आय.डी.सी. परिसरात कारखान्याचे घाण पाणी सतत वाहत आसते, त्यामुळे काही ठिकाणी जुन्या पाइप लाइन फुटलेल्या असल्याने त्याव्दारे सदरचे घाण पाणी मिळुन पाणी दुषित होण्याची शक्यता असते. आता एम.आय.डी.सी. मार्फत बऱ्याच ठिकाणी आडवणुक होते. व त्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. सिडको व शहराला पाणी पुरवठा करण्याचे खर्चाची तरतुद जादा असल्याने शासनाकडुन मागणी करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे. याच भागात मिसारवाडी येथे काही हापसे आहेत. ते काही बंद स्थितीत आहे. या भागात पाणी साठविण्यासाठी स्टोअर्सची आवश्यकता आहे ज्या ठिकाणी जुन्या विहीरी आहेत त्या साफ करुन त्याचा उपयोग होवु शकतो.

## *ऐनवेळचा प्रस्ताव*

(या पुर्वी तयार करुन दिलेला आहे)

मा. मुख्यमंत्री व मा. उप-मुख्यमंत्री याना मानपत्र व त्यांचे सहकाऱ्यांचे सत्कार.

श्री. गंगाधर गाडे : औद्योगिक परिसर चिकलठाणा येथे दारुचा कारखाना आहे. त्या कारखान्याचे सांडपाणी रस्त्यावरुन सतत वाहात राहाते व त्यामुळे जमीनीत मुरुन हापशाचे व्दारे पिण्यामध्ये येण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही रोग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, यासाठी त्या कारखान्याबाबत पोलुशन बोर्ड कडुन काहीतरी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : या बाबत पोलुशन कन्ट्रोल बोर्ड कडुन संबंधीत कारखान्या बाबत कार्यवाही सुरु आहे. त्याची प्रत मी आपल्याला देतो.

श्री. जावेद रज्जाक, सौ. लता दलाल : पावसाळयात घराची पडझड झाली आशा व्यक्तींना रु. ५००/- चेक वाटप केले काय? याची माहिती द्यावी. व जे चेक दिलेले असतील त्याचे बँकेत खाते नसते त्यामुळे अडचणी निर्माण होतात.

मा. आयुक्त : वियमाप्रमाणे रु. १००/- च्या वर कॅश देता येत नाही. कारण कार्यालयीन व ऑडीट प्रॉब्लेम न होणेसाठी चेक देणे आवश्यक आहे.

श्री. मुजीब आलमशाखान : ज्या व्यक्तींना पडझडीबाबत रु. ५००/- ची मदत केली गेली ती अल्पशी असुन अजुनही जादा रक्कम वाटप करावी, नुकसान जर घरातील भांडयासहीत दागीन्यासहीत झालेले आहेत, परंतु शासकीय मदत मात्र अल्पशी वाटते.

श्री. गंगाधर गाडे व श्री. नरेंद्र पाटील : ही बैठक पाण्याच्या संदर्भात बोलवलेली होती व यावर चर्चाही झालेली आहे तेव्हा निर्णय काय झाला सभागृहात माहिती द्यावी.

मा. महापौर : स. सदस्या सौ. लता दलाल यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत संबंधीत अधिकारी, कार्यकारी अभियंता पा.पु. यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : शहरात पाणी पुरवठा करणे पुरेसा पाणी साठा उपलब्ध जायकवाडीतुन होणार आहे, त्यामुळे काही ठिकाणी मागणी आसल्यास टँकटव्दारे पुरवठा केला जाइल तर ज्या ठिकाणी विहीरी आहेत. त्या साफ करुन किंवा दुरुस्त वैगेरे करुन उपयोगात आनल्या जातील हापसे नादुरुस्त असतील त्या बाबतही दुरुस्तीची तात्काळ अंमलबजावणी केली जाइल, त्यानंतरही सभागृहात ठरेल. त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येइल.

सुचक श्री. प्रदिप जैस्वाल : सभागृह नेता म्हणुन स. सदस्य श्री. जयवंत ओक यांची एकमताने निवड करण्यात यावी.

अनुमोदक श्री. मोहसिन अहेमद : यांस माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : स. सरस्य श्री. जयवंत ओक यांची सभागृह नेता म्हणुन सर्वानुमते मंजुरी दिली जाते. त्यानुसार त्यांना महापालिकेच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देता येइल त्याच प्रमाणे दि. १९ व २० सप्टेंबर ९५ रोजी मा. मंत्रीमंडळाची बैठक औरंगाबादत होत आहे, त्या वेळी मा. मुखमंत्री व उप-मुख्यमंत्री तसेच त्यांचे मंत्रीमंडळातील इतर सहकारी यांचे मानपत्र व स्मृतिचिन्ह देवुन सत्कार व दुपारचे भोजन करण्याची व्यवस्था करावी अशी मंजुरी देण्यात येते.

पाणी प्रश्नावर जी शांतपणे सभागृहात चर्चा झाली व स.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे मा. आयुक्त यांनी केलेला खुलासा त्या प्रमाणे प्रशासन कार्यवाही करेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी प्रश्नावर चर्चा करण्यासाठी व स. सदस्यांनी मांडलेल्या मुद्यावर मा. आयुक्तांनी केलेला खुलासा प्रमाणे कार्यवाही करण्यात येइल. तसेच औरंगाबाद दिनांक १९ व २० सप्टेंबर ९५ रोजी मंत्रीमंडळाची बैठक होत आहे त्यावेळी मा. मुख्यमंत्री व उप-मुख्यमंत्री यांना महापालिकेतर्फे मानपत्र व त्यांचे सहकारी मंत्रीगण यांचा स्मृति चिन्ह देवुन सत्कार करण्याचे ठरले व सभागृहातील सभागृह नेता म्हणुन श्री. जयवंत ओक यांच्या निवडीस सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" राष्ट्र गिताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**शनिवार दि.१६.९.९५ रोजी संपन्न झालेल्या सर्व्साधारण सभेचे इतिवृत्त. शनिवार दिनांक १६-०९-९५ रोजी मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली नगर भुवन(टाउन हॉल) येथे औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सकाळी ११.२५ वाजता "वंदे मातरम्" या गीताने सुरु झाली. सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. ज्योत्स्ना हिवराळे | उप-महापौर | |
| २) | श्री. प्रदिपकुमार जैस्वाल | | सदस्य |
| ३) | श्री. प्रभाकर विधाते | --//-- | |
| ४) | श्रीमती साजेदा बेगम | --//-- | |
| ५) | श्री. म.सलिम म. हनिफ कुरैशी | --//-- | |
| ६) | श्री. गौतम भागाजी खरात | | --//-- |
| ७) | श्री. गणेश किसनराव वानखेडे | --//-- | |
| ८) | सौ. रजनी रमेश जोशी | | --//-- |
| ९) | सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | | --//-- |
| १०) | श्री. गौतम लिंबाजी लांडगे | | --//-- |
| ११) | श्री. महादेव पुंडलिकराव सुर्यवंशी | | --//-- |
| १२) | श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --//-- | |
| १३) | श्री. नरेंद्र यादवराव पाटील | | --//-- |
| १४) | श्री. काशिनाथ हरीभाऊ सोनवणे | | --//-- |
| १५) | श्री. सुदाम रामदास सोनवणे | --//-- | |
| १६) | श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | | --//-- |
| १७) | सौ. पद्मा बाबुराव शिंदे | | --//-- |
| १८) | श्री. सुभाष भिकाजी टाकळकर | --//-- | |
| १९) | श्री. प्रफुल्ल लालचंद मालाणी | --//-- | |
| २०) | श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | | --//-- |
| २१) | सौ. धनश्री अशोक विसपुते | | --//-- |
| २२) | श्रीमती फरहतबानो म. नवाज | --//-- | |
| २३) | श्री. फजलउल्लखान अजमतउल्लाखान | --//-- | |
| २४) | श्री. अजिजखॉ गणी खॉन | | --//-- |
| २५) | श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा | | --//-- |
| २६) | श्री. महंमद मुश्ताक अहेमद | --//-- | |
| २७) | श्रीमती नुरजहॉ बेगम अब्दुल रहेमानखॉ | --//-- | |
| २८) | श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- | |
| २९) | श्री. हाजी मोहसनी अहेमंद हाजी बशीर | --//-- | |
| ३०) | श्री. मुजीब आलमशा मीर आलमशा | | --//-- |
| ३१) | श्रीमती. मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- | |
| ३२) | श्री. अब्दुल जावेद रज्जाक | | --//-- |
| ३३) | श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर | --//-- | |
| ३४) | श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे | | --//-- |

३५) श्री. किशोर बाबुराव तुळशीबागवाले --//--
३६) सौ. यशोदा धनंजय वाडेकर --//--
३७) श्रीमती. पुष्पाबाई सुरेशचन्द्र गंगवाल --//--
३८) श्री. हमीद उद्यीन ताबा फसियोद्यीन --//--
३९) श्री. म.अ.रऊफ म. अ. माबुद --//--
४०) श्री. स.अ.एकबालोद्यीन स.मो. कुतुबोद्यीन --//--
४१) श्री. धिरज शांतीलाल खाखोरडीया --//--
४२) श्री. स.अली मिरा सलामी --//--
४३) श्री. लाहोट रमेश दिपचंद --//--
४४) श्री. फैय्याज अहमद कुरैशी --//--
४५) सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे --//--
४६) सौ. लता श्रीनिवास दलाल --//--
४७) श्री. जयवंत केशवराव ओक --//--
४८) सौ. अलका रमेश पाटील --//--
४९) सौ. शकुंतला हरिदास धांडे --//--
५०) श्री. अब्दुल रशिदखान --//--
५१) श्री. सुभाष लक्षीनारायण कच्छवाह --//--
५२) कु. माया लिंबाजी लाडवाणी --//--
५३) डॉ. भागवत कराड --//--
५४) सौ. सविता संजय आव्हाड --//--
५५) सौ. निर्मला विठ्ठल कांबळे --//--
५६) श्री. अ.रशिद अ. सत्तार --//--
५७) श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग --//--
५८) श्री. विखारोद्यीन सुदबोद्यीन --//--
५९) श्री. विकास रतनालाल --//--
६०) श्री. गंगाधर सुखदेव गाडे --//--
६१) श्री. गजानन रामकिसन बारवाल --//--
६२) श्री. मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय --//--
६३) श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे --//--
६४) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर --//--
६५) श्री. अविनाश लक्ष्मणराव कुमावत --//--
६६) सौ. राधाबाई तळेकर --//--
६७) श्री. विठ्ठल किसन जाधव --//--
६८) सौ. मंदा धनंजय काळुसे --//--
६९) श्री. बन्सी तुळशीराम गांगवे --//--
७०) श्री. कचरु चंद्रभान नवपुते --//--

संवाद

सौ. रजनी जोशी : शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या धर्मपत्नी यांचे दु:खद निधन झ ााले, त्यांच्या आत्म्यास शांती लाभो यासाठी सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री. गौतम खरात : ॲड,बी.एच.गायकवाड यांचे पुत्र बुध्दवासी कुमार महेंद्र गायकवाड यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांनाही सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : ऑल इंडिया जमाते इस्लामचे जनरल सेक्रेटरी रजिया बेगम भ्र. अब्दुल कय्युम यांचे दु:खद निधन झाल्याने सभागृहात ००.०२ मिनिटे उभे राहुन स्तब्धता पाळावी.

मा. महापौर : ठिक आहे.

००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

श्री. मुजीब आलमशाह खान : आजच्या कार्यक्रमाची पत्रिका मला अद्यापही मिळाली नाहीयाचे कारण काय?

मा. महापौर : सचिवांनी खुलासा करावा.

नगर सचिव : संबंधीतांनी वाटप कसे केले या बाबत रजिष्टरमध्ये पाहुन उत्तर देतो.

श्री. कचरु नवपुते : मला विषय पत्रिका दि. १०-९-९५ रोजी मिळाली, परंतु ऐनवेळचा चिकलठाणा बाजार येथील बाबतचा प्रस्ताव आम्हाला मिळालेला नाही.

श्री. मोहसिन अहेमद : जे. प्रस्ताव महापौरांच्या स्वाक्षरीने येतात तसे प्रस्ताव कां ठेवले जात नाहीत?

सौ. अलका पाटील : माझ्या वार्डासंबंधीचे प्रस्ताव होते ते सुध्दा आजच्या बैठकीत आलेले नाहीत, याचे कारण काय?

श्री. प्रकाश निकाळजे : सदरची बैठक बेकायदेशीर असुन स. सभासदांना विषय पत्रिकासुध्दा मिळालेली नाही, तेव्हा बैठक पुढे ठकलण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : जास्त चर्चा करण्यापुर्वी या बाबत सचिवांनी खुलासा करावा.

श्री. मिरा सलामी : विषय पत्रिका आम्हाला वेळेवर मिळाली नाही या बाबत खुलासा करावा.

मा. महापौर : सचिवांनी खुलासा करावा.

नगर सचिव : कार्यक्रम पत्रिकेसहीत इतिवृत्त सात दिवस अगोदर वाटप करण्यात आलेले आहे. मंत्रीमंडळाच्या बैठकीमुळे या वेळेस सभा बाबत मा. महापौरांनी व सचिवांनी सत्ताधारी पक्ष यांचे सोबत चर्चा करुन सभा दि. १८-९-९५ ऐवजी १६-९-९५ रोजी संपन्न करण्याचे ठरले.

श्री. मुजिब आलमशा खान : विषय पत्रिका उशिरा मिळाल्या बद्दल सभागृहात योग्य तो खुलासा मिळाला नाही आणि इतिवृत्त उर्दुतुन दयावयास पाहिजे, त्याचीही व्यवस्था करावी. अन्यथा आजची सभा रद्द करण्यात यावी.

श्री. वसंत देशमुख : सचिव विभागातील कर्मचारी वर्गाचा निष्काळजीपणा सर्वस्वी तेच जबाबदार आहेत.

श्री. नरेंद्र पाटील : आजची बैठक अनाधिकृत असुन स. सभासदांना इतिवृत्त व विषय पत्रिका वेळेवर न मिळाल्याने वाचता येणे शक्य झाले नाही. यासाठी सचिव विभागातील अकार्यक्रम कर्मचारीच जबाबदार असुन अशा कर्मचाऱ्याची बदली करावी.

मा. महापौर : सचिवांनी या बाबत खुलासा करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सभासदांना विषय पत्रिका वाचन करणेसाठी आजची बैठक २-३ तासासाठी तहकुब करावी. नियमाप्रमाणे इतिवृत्त वाटप करण्यात आलेले आहे व ते अधिकृत आहे.

श्री. मुजिब आलमशा खान : आजच्या सभेच्या बैठकीची पुरवणी विषय पत्रिका सुध्दा आम्हाला मिळालेली नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : जास्तीची चर्चा झालेली आहे. सचिवांनी योग्य तो खुलासा केलेला आहे. (यावेळी सभागृहात इतिवृत्त वाटप करणारे शिपाई व ड्रायव्हर व्यासपिठावर येतात व स. सभासदांनी चर्चा करतात. रजिष्टर दाखवुन घरातील व्यक्तीची स्वाक्षरी असल्याचे दर्शविले.)

श्री. मुजिब आलमशा शाख : सदरील शिपायाने मला इतिवृत्त दिलेलेच नाही, व त्यावर खोडया स्वाक्षऱ्या घेतलेल्या असुन कर्मचारी खोटे बोलुन सभागृहाची दिशाभुल करीत आहेत.

नगर सचिव : आमच्या विभागातील कर्मचारी इतिवृत्त तयार करुन वाटप करण्याकरिता रात्रंदिवस कामे करतात, व त्यांच्या कामाची तपासणी केली जाते.

(यावेळी सभागृहात जोर जोरात आवाज होत असतो)

मा. महापौर : दोन तासांसाठी आजची सभा तहकुब करण्यात येते. (वेळ अंदाजे १२.३०) (सभेला सुरुवात ०२.३० वाजता)

श्री. नरेंद्र पाटील स्थायी समितीने चौकशी समिती नेमली आहे तर ती कोणत्या नियमान्वये समिती नेमलेली आहे. विविध समित्या नेमणुक करण्याचा स्थायी समितीस परस्पर अधिकार आहे काय? खुलासा व्हावा.

श्री. अब्दुल रशिदखान(मामु) : सं. सभासदांनी सुचना केल्याप्रमाणे स्थायी समितीने जी समिती नेमलेली आहे ती पुर्णतः नियमाप्रमाणे आहे.

मा. महापौर : या बाबत मा. आयुक्तांना विचारणा करण्यात येइल. व विविध समित्यांचे गठण करणे बाबत सचिवांनी कार्यवाही करावी. तथापी इतिवृत्त वेळेवर का वाटप झालेले नाही, या बाबत चौकशी करण्यात येइल. आता यावर जास्त चर्चा न करता विषय क्र. १ ला सुरुवात करावी.

**विषय क्र. २१/१ :**

दि. १६-९-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : इतिवृत्तातील पान क्र. ५ मध्ये सचिवांनी "विशेष लक्ष देण्यात येइल असे" असे वाक्य उच्चारलेले आहे. ते चुकीचे असुन "विशेष काळजी घेण्यात येइल" अशी दुरुस्ती इतिवृत्तात करण्यात यावी.

मा. महापौर : इतिवृत्त लिहीतांना स. सभासंदाचे वाक्य बरोबर येत नाही तेव्हा जसेच्या तसे वाक्य इतिवृत्तात येणे साठी संबंधीतांनी नोंद घ्यावी किंवा अजुन सोबत एक कर्मचारी असुन लिहीण्यासाठी कार्यरत करावे

विधी सल्लागार : महानगरपालिकेतील विरोधी पक्ष नेते पदाबाबत मा. न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. त्या प्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. नरेंद्र पाटिल सुचक : विरोधी पक्ष नेते पद श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांना करण्यात यावे.

श्री. हमीदउद्यीन ताबा अनुमोदक : यास आमचे अनुमोदन आहे.

सौ. अलका पाटील श्री. प्रफुल्ल मालाणी :

मा. महापौर : विषय क्र. २९/१ ला मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

मा. सभागृहातील संवादानुसार इतिवृत्तातील पान क्र. ५ मध्ये सचिवांनी जी वाक्य उच्चारले त्या मध्ये "विशेष काळजी घेण्यात येइल" अशी दुरुस्ती करण्यात येते. तसेच मा. न्यायालयात विरोधी पक्ष नेता बाबत प्रकरण निकाली निघाल्याने महानगरपालिकेतील विरोधी पक्ष नेता म्हणुन श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय याची सभागृहात एकमताने निवड करण्यात येते. या व इतर सर्व दुरुस्त्यासह दि. १६-०९-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२/२ :**

दि. १०-७-९५ च्या स्थायी समितीने ठराव क्रमांक ४२/२ अन्वये महानगरपालिका अंतर्गत ३६ विभागाचे लेखापरिक्षण अद्ययावत व नियमित करणे, लेखा परिक्षणाचे काम वेळीच अद्ययावत पणे पुर्ण करणे व लेखा परिक्षणाच्या कामात सुसुत्रता आणण्यासाठी लेखा परिक्षण विभाग स्वतंत्र असणे आवश्यक असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(२) अन्वये स्थायी स्वरुपाची कनिष्ठ लिपिक संवर्गातील वेतन श्रेणी रुपये ९५० ते १५०० या संवर्गातील "कनिष्ठ लेखा परिक्षकांची" एकुण १५ पदे "वाणिज्य शाखेतील पदवीधर" असलेली निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

श्री. मुजीब आलमशाहाखान : या पुर्वी महानगरपालिकेमध्ये लेखा (ऑडीट) विभागात दोन पदे अधिक्षकांची भरण्यात आली ती अनाधिकृत आहेत, या बाबत प्रथमतः खुलासा करावा.

मा. महापौर : या बाबत प्रत्यांतर करण्यात येइल.

श्री. वसंत देशमुख : या पदाबाबत एकंकीत खर्च किती येइल या बाबतच्या सविस्तर खुलासा व्हावा.

मा. महापौर : उप आयुक्त यांनी खुलासा करावा.

उप-आयुक्त : सदरचा प्रस्ताव मंजुर केल्यानंतर शासनाकडे अंतिम मंजुरीस्तव वाठविण्यात येणार आहे. यासाठी अंदाजे ५.३३ लाख खर्च प्रति वर्ष येण्याची शक्यता आहे.

श्री. मुजीब आलमशाखान : शहरातील महानगर दैनिकात लेखाधिकारी व ऑडीट मधिल जेष्ठ लेखा परिक्षक यांचे बाबतीत बातमी प्रसिध्दीस आलेली आहे. याबाबत खुलासा करावा.

श्री. गौतम खरात : स. सभासदांनी सुचना केल्या प्रमाणे यावर सभागृहात चर्चा करण्यात येऊ नये व सभागृहाचा वेळ वाया घालवु नये.

श्री. प्रदिप जैस्वाल : आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील विषयावरच चर्चा करावी. या प्रस्तावाचा वृत्तपत्रातील बातमीशी काहीही संबंध नाही.

श्री. मुजीब आलमशा खान : प्रस्तावात तोच आहे यापुर्वी ऑडीट विभागात दोन पदे अनाधिकृतरित्या भरल्या गेलीत याची चौकशी करुन कार्यवाही करावी.

मा. महापौर : आता या विषयावर बरीच चर्चा झाली आहे. सदरचा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अस्थापनेतील लेखा परिक्षण विभागात लेखा परिक्षणाच्या कामात सुसुत्रता आणण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (२) अन्वये स्थायी स्वरुपाची कनिष्ठ लिपीक संवर्गातील वेतन श्रेणी रु. ९५० ते १५०० या संवर्गातील "कनिष्ठ लेखा परिक्षकाची" एकुण ९५ पदे वाणिज्य शाखेतील पदवीधर असलेली निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३/३ :**

दिनांक १०-७-९५ च्या स्थायी समितीने ठराव क्रमांक ४४/४ अन्वये राहुल नगर व बनेवाडी गाव येथील डांबरी रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये. ६,७६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्व साधारण सभेस शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पातील झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकातुन करण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समितीचा ठराव क्र. ४४/४ अन्वये राहुलनगर बनेवाडी गाव येथील डांबरीरस्ते तयार करण्याच्या कामाकरिता रक्कम रु. ६,७६,०००/- च्या खर्च सन १९९५-९६ अर्थसंकल्पातील झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४/४ :**

शिक्षणाधिकारी व प्रकल्प संचालक यांनी संयुक्तरित्या प्रस्ताव सादर केला आहे की, सध्या औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षण विभागातर्फे ८३ व प्रकल्प विभागातर्फे १३ बालवाडया चालविण्यात येत आहेत त्यासाठी नेमणुक केलेल्या बालवाडी शिक्षिकांना सध्या रु. ३००/- दरमहा मानधन देण्यात येत आहे दि. १६-६-९५ च्या स्थायी समितीच्या बैठकीत मा. सभापतीच्या (इतिवृत्त पृष्ठ क्र. ३) सुचने नुसार बालवाडी शिक्षिकांना देण्यात येणारं मानधन रु. ३००/- दरमहा वरुन रु. ५००/- दरमहा अशी वाढ दि. ०९-८-९५ पासुन मंजुर करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

संवाद

श्री. सय्यद अली मिरा सलामी : सदरच्या प्रस्तावा बाबत अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न असुन बालवाडी शिक्षिका यांना आजच्या महागाइच्या काळात न परवडणारे मानधन आहे. सेविकांना तरी जादा पगार दिला जातो. परंतु बालवाडी शिक्षिका यांना पायाभुत मानुनही त्यांच्या पगारात असमाधानी दिसुन येते. रु. ३००/- मानधन जाण्यायेण्याकरिताच परवडत नाही करिता रु. ३००/- वरुन रुपये. १०००/- असे एकत्रित मानधन मंजुर करावे व दिवाळी तथा उन्हाळयाच्या सुटयामध्ये सुध्दा त्यांना पगार देण्यात यावा.

श्री. हमीदोद्दीन ताबा : सदरचा प्रस्ताव दोन महिन्यापुर्वीचाच असुन संभाजीनगर नामांतर प्रस्तावामुळे व आचार संहितेमुळे प्रश्न प्रलंबित राहिलेला आहे.

श्री. अब्दुल रशिदखान : नियमाप्रमाणे प्रस्तावाबाबत काम करता येइल ते पाहुनच निर्णय घेणे योग्य कारण महानगरपालिकेला आर्थिक भुर्दड पडता कामा नये.

श्री. प्रदिप जैस्वाल : बऱ्याचशा स.सभासदांनी चर्चा केलेली आहे. या ठिकाणी गेल्या २० वर्षापासुन ३२ सेविका म्हणुन काम करीत आहेत. परंतु अद्यापही ते अस्थापनेवर कायम स्वरुपी झालेले नाहीत, अथवा शासनाकडुन त्यांचे बाबतीत कोणताही कार्यवाही झालेली नाही. तेव्हा बालवाडी शिक्षिका या मानधनावर कार्यरत असुन त्यांना रु. ३००/- ऐवजी रु. ५००/- मानधन देण्यास हरकत नाही.

श्री. काशीनाथ कोकाटे : महानगरपालिकेतील आर्थिक तरतुद पाहुनच निर्णय घ्यावा.

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे ८३ व प्रकल्प विभागातर्फे १३ बालवाडयातील बालवाडी सिक्षिकांना रु. ३००/- मानधन प्रतिमाह देण्यात येते त्यामध्ये वाढ करुन दि. १६-६-९५ च्या स्थायी समितीच्या बैठकीत ठरल्यानुसार त्यावेळे पासुन रु. ५००/- ची वाढ बालवाडी शिक्षिकांना करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५/५ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजने (जुनी हद्द) नुसार ५० फुट रुंद रस्ता किलेआर्क ते लोहार गल्ली सिटी चौक या रस्त्याने न.भु.क्र. ३९९४ ही अंशतः वार्डात झालेली आहे सदर रस्त्याने या मिळकतीतुन सुमारे ९८२.०० चौ.मी. क्षेत्र बाधीत होते अर्जदाराने बाधीत क्षेत्र संपादन करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९९६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे. वरील रस्त्यावरील वाहतुक लक्षात घेता आणि अर्जदाराने दिलेली खरेदी सुचना लक्षात घेऊन सदरील न.भु.क्र. ३९९४ मधुन बाधीत होणारे क्षेत्र संपादीत करुन या भु.संपादनास येणाऱ्या खर्चास मंजुरी देणे योग्य प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. हमीदोद्दीन ताबा : सदरील प्रस्तावा बाबत साइट प्लॉन व नकाशा देणे व सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत नियमाप्रमाणे ठेवावे.

सौ. लता दलाल : तसेच या रस्त्यांसाठी बाधीत भुखंडाच्या भु.संपादनाचा मोबदला खर्च किती येइल यासह माहिती द्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : सदरील बाबतीत संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा सन १९८५ पासुन या रोडच्या मास्टर प्लान घोषित केलेला आहे. ज्यावेळेस यातुन एकंदरीत पाहणी करणे आवश्यक आहे.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक नगररचना : म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ च्या कलम १२७ अन्वये जमिन मालकाने परचेस नोटीस दिली असल्यामुळे ६ महिन्याच्या आत भु संपादनाची कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधीत जमिन आरक्षणातुन वगळली जाते. त्या करिता भुसंपादन करणे आवश्यक ठरले आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : सन १९८५ पासुन मास्टर प्लॅन मंजुर झालेला आहे. आणि संबंधीत मु. संपादन अधिकाऱ्यांनी पाहणी करुन फक्त एकुण खर्चास मंजुरी घ्यावयाची आहे.
श्री. हमीदोद्दीन ताबा, श्री. विखारोद्दीन : या प्रस्तावातील न.भु.क्र. ची जागा नेमकी कोणती याची साइट प्लॅन पाहणे आवश्यक आहे. व एकंदरीत खर्चास मंजुरी घ्यावयाची आहे.
श्री. नरेंद्र पाटील : सदरील प्रस्ताव ठेवण्याचा मुळ उद्देश काय याची माहिती द्यावी.
श्री. जावेद रज्जाक : सदरील प्रस्तावात लोहारगल्ली असे नमुद केले आहे ते योग्य आहे काय? याचा खुलासा व्हावा.
मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.
सहा.संचालक नगर रचना : मंजुर विकास योजने (जुनी हद्द) नुसार ५० फुट रुंद रस्ता किलेआर्क ते लोहर गल्ली सिटी चौक या रस्त्याने न.भु.की. ३९९४ अंशतः बाधीत झालेली आहे या रस्त्यातील बाधीत होणाऱ्या भुसंपादनाच्या खर्चास मान्यता देवुन प्रस्ताव मंजुर करणे आवश्यक आहे. अन्यथा प्रस्ताव उशीर झाल्यास डिलीट होण्याची शक्यता आहे.
श्री. जावेद रज्जाक : या प्रस्तावातील मुळनांव रोहीला गल्ली असुन ही दुरुस्ती करुन सदरचा भुखंड नेमका कोठे आहे याची माहिती द्यावी.
मा. महापौर : सदरचा प्रस्ताव संपुर्ण माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संपुर्ण माहितीसह (उदा. साइट प्लॅन,नकाशा व एकुण खर्च) पुढील बैठकीत ठेवण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६/६ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसा ३० फुट रुंद रस्ता हॉलीडे कॅम्प रेल्वेस्टेशन रोड स्टेशन रोड ते बन्सिलालनगर (उमाजी कॉलनी) या रस्त्याने बाधीत होणाऱ्या न.भु. क्र. १९२८/१ च्या मिळकत धारक यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे.
तथापी याच रस्त्याने वरील मिळकती व्यतिरिक्त चार मिळकती न.भु.क्र. १९२८२,१९८२३,१९२८४ व १९२९९) बाधीत होतात, त्या सुध्दा संपादन केल्यास हॉली डे कॅम्प रेल्वेस्टेशन रोड ते बन्सीलालनगर (उमाजी कॉलनी) हा संपुर्ण रस्ता विकसित होऊन वाहतुकीस खुला होइल तरी खरेदी सुचना दिलेल्या मिळकती बरोबरच वरील चार मिळकतीतुन बाधीत होणारे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) अन्वये भुसंपादन करण्यास आणि सदर प्रकरणात येणाऱ्या भुसंपादन खर्चास मंजुरी देणे योग्य प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद
मा.महापौर : प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वरील प्रस्तावानुसार संपुर्ण माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २७/७ :**

आयुक्त महानगरपालिका, औं'बाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र (झोपडपट्टी सुधार निर्मलन, पुर्नविकास कायदा १९७१) च्या कलम ३(१) च्या तरतुदी नुसार १९८५ पुर्वी अस्तित्वात आलेल्या खाजगी जमिनीवरील विशिष्ट वस्ती झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन काही निकषावर घोषित करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे.

विशिष्ट वस्ती झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करतांना स्थानिक वृत्तपत्रे, शासकीय राजपत्रातुन प्रकाशित करुन तेथील रहीवाशी जमिन मालक, भोगवटा व इतर संबंधीताकडुन लेखी हरकती, सुचना मागविण्यात येतात. त्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात येतो. कुणाची हरकत नसल्यास या वसाहतींना भौतिक मुलभुत सुविधा (विज,पिण्याचे पाणी, गटारी, शौचालय इ.) पुरविण्यासाठी म्हाडा मार्फत महानगरपालिकेत प्रति माणसी रु. ५००/- अनुदान प्राप्त होते.

शहाशोक्ता कॉलनी व तक्षशिलानगर या वस्त्यातील रहीवाशीयांनी विनंती अर्ज दिला आहे की, या वसाहती झोपडपट्टया म्हणुन घोषित करण्यात या वसाहती खाजगी जमिनीवर वसलेल्या असुन १९८५ पुर्वीपासुन अस्तित्वात आहेत या वस्त्यांची लोकसंख्या सर्व्हेक्षण करण्यात आले असुन या भागात भौतिक सुविधांचा अभाव आहे. या कारणास्तव त्यांना झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

वरील कायदयाच्या तरतुदीच्या आधारे विशिष्ट वस्ती झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना प्रदान केले जाऊ शकतात. तरी वरील कायदयाच्या तरतुद ३ (१) नुसार वरील अधिकार महानगरपालिका आयुक्तांना प्रदान करण्यात यावेत ही विनंती.

संवाद

मोहसिन अहेमद : सदरच्या प्रस्तावात चिश्तिया कॉलनीचाही समावेश करावा.

श्री. प्रदीप जैस्वाल : शहरात आजही अनेक अनाधिकृत वस्त्या व झोपडपट्टया वसलेल्या आहेत व प्रस्तावात फक्त दोनच भागांचा समोवश आहे यापेक्षा शहरातील अशा अनाधिकृत वस्त्या आहेत व ज्या १५-२० वर्षापासुन च्या अस्तित्वात आहेत. अशानाही नागरी सुविधा मिळणे आवश्यक आहे. यासाठी वस्त्यातील घराचा सर्व्हे करुन द्यावे व नागरी सुविधा बाबत विचार व्हावा.

मा. महापौर : स.सभासदांनी सुचित केल्याप्रमाणे शहरातील सर्व अनाधिकृत झोपडपट्टयाचे पुन्हा सर्वेक्षण करुन वस्त्यांची यादी तयार करुन झोपडपट्टी स्लम घोषित करणेसाठी उर्वरीत झोपडपट्टयांचा प्रस्ताव सादर करावा वरील दोन वस्त्यांना मंजुर करुन ठराव शासनाकडे पाठववे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र झोपडपट्टी सुधार निर्मुलन व पुर्नविकास कायदा १९७१ च्या कलम ३(१) च्या तरतुदीनुसार १९८५ पुर्वी अस्तित्वात असलेल्या अनाधिकृत विशिष्ट वस्ती झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन काही निकषावर घोषित करण्यांचा महानगरपालिकेस अधिकार आहे विशिष्ट झोपडपट्टी घोषित करणे अगोदर स्थानिक वृत्तपत्रातुन तेथील रहीवाशी जमीन मालक भोगवटादार व इतर संबंधीताकडुन लेखी हरकती मागविण्यात याव्यात व त्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात यावा. कोणाची हरकत नसल्यास प्रस्तुत वसाहतींना नागरी सुविधा पुरविण्यापोटी म्हाडा मार्फत महानगरपालिकेस प्रति माणसी ५००/- अनुदान प्राप्त होऊ शकते.

शहाशैक्ता कॉलनी  व तक्षशिलानगर या वस्त्या १९८५ पुर्वीपासुन अस्तित्वात आहे. या वस्त्यात भौतिक सुविधांचा अभाव असल्यामुळे झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करण्यात येते. तसेच महानगरपालिका आयुक्तांना कायदा १९७१ चे कलम ३(१) अन्वये विशिष्ट वस्ती झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९०-९१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या प्रस्ताव रु. २५ लाख महानगरपालिकेतर्फे राज्य शासनाकडे सादर केला होता. राज्य शासनाने रु. २५ लाखाच्या प्रकल्पास मान्यता दिल्यानुसार (५०% शासकीय अनुदान रु. १२.५० लाख ५०% महानगरपालिका फंडातुन रु. १२.५० लाख) महानगरपालिकेतर्फे सर्व बाबींची पुर्तता करुन काम हाती घेतले होते. आता रु. २५ लाखचे काम झाले असुन मंजुर नकाशाप्रमाणे तळ मजल्याचे बांधकाम पुर्ण झाले आहे. या इमारतीवर पहिला मजला बांधावा अशी मागणी असुन पहिला मजला बांधवयाचा झाल्यास त्यास सुमारे २५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे रु. २५ लाख राज्य शासना कडुन अनुदान मिळण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

श्री. हमीदोद्यीन ताबा : डॉ. झाकीर हुसैन व सिकंदरअली वज्द मेमोरियल ट्रस्ट बाबत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : सदरचे बांधकामाचे बाबतीत त्याच वेळेस झालेले असते तर खर्च बराच कमी झाला असतां आता दिवसेंदिवस सगळया बाबी महागल्यामुळे आर्थिक बोजा जास्त होणार आहे.

श्री. गौतम खरात : संशोधन केन्द्र उद्‌घाटनाच्या प्रतिक्षेत असुन या बाबत कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व उद्‌घाटन करणे बाबत १५ दिवसा पर्यंत कार्यवाही करण्यात येइल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या वर पाहिला मजला बांधकामासाठी रु. २५ लाख खर्च अपेक्षित आहे. सदरच्या बांधकामासाठीचे खर्च राज्य शासना कडुन रु. २५ लाख अनुदान मिळाविण्यासाठी ठराव पाठविण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९/९ :**

मा. आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केले की, सिडको औरंगाबाद या भागास पाणी पुरवठा करण्यासाठी नक्षत्रवाडी येथुन स्वतंत्र जलवाहीनी टाकणे या संबंधीने शहर भागास पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत त्याच प्रमाणे नविन उद्‌भव होउन पाणी पुरठा करणे बाबत श्वेतपत्रिका तयार करण्यासाठी दिनांक १९-६-९५ रोजी मा. गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे कक्षात बैठक झाली. त्या बैठकीत सध्या सिडको विभागस जायकवाडीतुन होणारा पाणी पुरवठा अपुरा पडतो याचे कारण सिडको विभाग औरंगाबाद शहरपेक्षा उंच पातळीवर वसलेले आहे. व या भागास पाणी

पुरवठा करणारी जलवाहिनी औरंगाबाद शहरातुन जाते, औरंगाबाद शहरास लागणारा पाणी पुरवठा या जलवाहिनी मधुनच घेतल्यास सिडको भागास पाणी पुरवठा अपुरा होतो त्याच प्रमाणे सातारा प्रभागात रेल्वेलाइन व बीड बायपास रोड या ठिकाणी सध्या जलद गतीने वसाहती होत आहेत. या भागात सुध्दा पाणी पुरवठा करण्याचे दृष्टीकोनातुन आताच विचार करणे आवश्यक आहे.

या दोन्ही विभागास (सिडको आणि सातारा परिसर) पाणी करण्यासाठी नक्षत्रवाडी येथील अस्तित्वात असलेल्या जलकुंभामधुन स्वतंत्र जलवाहिनी टाकावी असे ठरले आहे. सदर योजना महाराष्ट्र पाणी पुरवठा जलनि:सारण मंडळ राबविणार आहे. या संबंधाने कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी विभाग क्र. २ याचे क्रमांक ४२७२/९५ दिनांक २७-६-९५ यांनी खालील दोन बाबींची आवश्यकता आहे असे सुचविले आहे.

१) योजना तयार करणे बाबत व ती पुर्ण आल्यानंतर देखभाल व दुरुस्ती ताब्यात होणे बाबत सर्वसाधारण सभेचा ठराव.

२) योजना तयार करण्यासाठ‍ लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत ठराव सदर योजना तयार करणेबाबत व ती पुर्ण झाल्यानंतर पुढील काळासाठी लाभदायक राहील व त्याचा फायदा सिडको औरंगाबाद आणि सातारा परिसर व पुढील वसाहतीसाठी होइल.

१) सदर योजना तयार करणे बाबत व ती पुर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्ती साठी ताब्यात घेण्यास महानगरपालिका तयार आहे.

२) योजना तयार करण्यासाठी लागणारा निधी औरंगाबाद महानगरपालिका उपलब्ध करुन देइल. तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : या प्रस्तावावर एकंदर किती खर्च येणार आहे याची माहिती द्यावी. सिडको रहीवाशी घर टॅक्स अद्यापही भरत नाहीत तरीही महानगरपालिका सुरळीत पणे पाणी पुरवठा करते. शहरातील नागरिक १००% टॅक्स भरुनही शहराला पाहिजे तितका पुरवठा होत नाही. मात्र सिडकोला नविन पाइप लाइन टाकुन दिल्या जाते. हा सर्व खर्च महानगरपालिका तोटयात सहन करते.

श्री. काशीनाथ कोकाटे : सिडको भागात २६ हजार नळ कनेक्शन अर्ध्या उंचीच्या सुरळीत पाइपलाइनवरुन दोन घरात वाटलेली आहेत. त्यामुळे पाणी पुरवठा पुरेसा अपुरा पडतो. त्यासाठी सदरच्या प्रस्तावा बाबत निर्णय घेणे योग्य राहील. या कामी निधी करता उपलब्ध करावयाचा तो ठरवावे परंतु येथील कामाची सुरुवात तात्काळ करावे.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : सिडको भाग हा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेला नाही. त्यामुळे सिडकोतील नागरिक टॅक्स भरत नाहीत. परंतु या विस्तारीत पाइप लाइनसाठी किती खर्च अपेक्षित आहे याची माहिती द्यावी.

श्री. इंगळे : जास्त चर्चा न करता प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. नरेंद्र पाटील : विनाकारण सिडकोस दुखम स्थान देवु नये महानगरपालिकेच्या सहा लाख लोकसंख्येमध्ये सिडको समाविष्ट आहे. परंतु सिडकोला दुखम स्थानाने पाहाणे योग्य नाही. या भागात गेल्या वर्षापासुन पाण्याचा पुरवठा सुरळीत होत नाही. वेळेवेळी पाण्यासाठी ओरड होत असते या कामासाठी

महाराष्ट्र शासनाकडुन अनुदान मिळणार आहे करिता चर्चा न करता प्रस्ताव मंजुर करावा.

मा. महापौर : प्रस्ताव करण्यात येतो.

श्री. मुजीब आलमशा खान : माझ्या वार्डात रोशनगेट भागात रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे झाले ते आहेत जागोजागी खोदकाम करुन ठेवण्यात आले आहे पाइप लाइन फुटलेली आहे. गेली अनेक दिवसांपासुन मी संबंधीत अधिकाऱ्यांना कळवितो. परंतु काहीही कार्यवाही होत नाही. याचे कारण काय? या बाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : स. सभासदांनी सुचना केल्याप्रमाणे संबंधीत भागास प्रत्यक्ष स्थळ पाहाणी करुन त्वरीत कार्यवाही करण्यात येइल.

श्री. जयवंत ओक : स. सभासदांनी केवळ विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

श्री. मुजीब आलशाखान : माझ्या वार्डातील पाण्याचे बाबतीत संबंधीत अधिकाऱ्यांना अनेकवेळा सांगितलेले आहे. परंतु काहीही कार्यवाही झालेली नाही. किंवा साइटवर सुध्दा येवुन पाहाणी करीत नाहीत याचे कारण काय?

श्री. जयवंत ओक : संबंधीत अधिकाऱ्यांनी संबंधीत स्थळी जाऊन पाहाणी करावी.

श्री. मुजीब आलमशाखान : जागोजागी खड्डे असल्याने लहान-लहान मले खेकळतात त्यांना काहीही धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही तेव्हा लवकरात लवकर कार्यवाही करावी.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यासह प्रत्यक्ष स्थळ पाहाणी करण्यात येइल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको दर्शविल्याप्रमाणे सिडका औ'बाद या भागात पाणी पुरवठा करण्यासाठी नक्षत्रवाडी येथुन स्वतंत्र जलवाहिनी टाकणे या संबंधात शहरीभागात पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत श्वेत पत्रिका तयार करुन (सिडको आणि सातारा परिसर) पाणी पुरवठा करण्यासाठी नक्षत्रावाडी येथील अस्तित्वात असलेल्या जलकुंभामधुन स्वतंत्र जलवाहिनी टाकणे व यासाठी आवश्यकत तो लागणारा निधी उपलब्ध करुन देणे या कामी सदरची योजना तयार करणे बाबत व ती पुर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्तीसाठी ताब्यात घेणेस महानगरपालिका तयार आहे. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०/१०** :

मंजुर विकास योजना औरंगाबाद (वाढीव हद्द) १९९१ मधील मौजे औरंगाबाद येथील सर्व्हे न. ९६ ची जमीन ना विकास क्षेत्रात दर्शविलेली आहे. सदरील सर्व्हे नं. ९६ मधील जमीन क्षेत्र ८५ आर ही गिरीदर्शन को-ऑप.हौ.सोसायटी लि. औरंगाबाद या संस्थेच्या मालकीची असुन सदरच्या सोसायटीच्या जमिनीला दि. २०-१२-६५ च्या औरंगाबाद अकृषीक परवानगी मिळाली आहे. तसेच नगर परिषद औरंगाबाद व सहाय्यक संचालक नगर रचना औ'बाद यांनी अनुक्रमे सन १९६८ व सन १९६६ साली अभिण्यास मंजुरी दिलेली आहे. पुराणवस्तु संशोधन खाते यांनी दि. १२-०४-१९६५ च्या पत्रानुसार सदरील संस्थेस निवास वापरासाठी संमती दिलेली आहे. वरील परिस्थिती संबंधीत गृहनिर्माण संस्थेने औरंगाबाद महानगरपालिकेकउे विनंती अर्जाव्दारे मांडल्यामुळे व नियोजनाच्या दृष्टीकोनातुन सदरील गृहनिर्माण संस्थेची जागा निवासी भागात समाविष्ट करणे इष्ट असल्या कारणाने महाराष्ट्र

प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलचा प्रस्ताव करण्यात आला आहे. सदरील किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

संवाद

श्रीमती साजेदा बेगम : सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री. विखारोद्दीन, श्री. जावेद रज्जाक : सदरच्या प्रस्तावातील सर्व्हे नं. ९६ कोणत्या ठिकाणी आहे याची माहिती दयावी.

श्री. गंगाधर गाडे : स. सभासदांच्या भावना लक्षात घेता व जगप्रसिध्द बिबीका मकबरा याला कोणत्याही प्रकारचा धोका नाही याची खात्री करुन घेतल्याची माहिती सभागृहात द्यावी.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

सहा.संचालक : या प्रकरणात ॲकॉलॉजी विभागाने पुर्वीचे ना हरकत प्रमाणपत्र दिले असुन त्या नुसार म.प्रा.व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यामध्ये फक्त तळमजल्याच्या इमारतीच अनुज्ञेय होतील.

मा. महापौर : मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजुर विकास योजना औरंगाबाद (वाढीव हद्द) १९९९ मधील मौजे औरंगाबाद येथील सर्व्हे नं. ९६ ही जमीन क्षेत्र ८५ आर ही गीरी दर्शन को.ऑप.हाऊ.सोसायटी लि. औरंगाबाद या संस्थेच्या मालकीची असुन २०-११-६५ चे आदेशानुसार अकृषिक मिळाली आहे. सदरील गृह निर्माण संस्थेची जागा निवासी भागात समाविष्ठ करणे इष्ट असल्या कारणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. ३१/११ :**

महानगरपालिके मार्फत दोन वर्षापुर्वी ज्या उर्दु शाळा कमी केल्या आहेत, त्या पुन्हा चालु करण्यात याव्यात.

संवाद

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिके मार्फत दोन वर्षापुर्वी ज्या उर्दु शाळा कमी केल्या आहेत, त्या पुन्हा चालु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२/१२ :**

सभेची विषय पत्रिका उर्दु मध्ये देण्यात यावी.

संवाद

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : यापुढे विषय पत्रिका उर्दुतुन देण्यात याव्यात.

श्री. गिरजाराम हाळनोर : प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवावा.

मा. महापौर : मंजुर करुन शासनाकडे पाठविण्यात येते.

श्री. हमीदोद्दीन ताबा : यापुर्वी सुध्दा अशाच प्रकारचा प्रस्ताव मंजुर झालेला होता व त्याप्रमाणे विषय पत्रिका उर्दुतुन काढण्यात येत होती तीच प्रक्रिया आजही करावी.

सौ. पद्मा शिंदे : प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवावा.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : स्वायत्त संस्थेतील अख्यतारीतील बात म्हणुन असल्याने मंजुर करुन येथेच कार्यवाही व्हावी.

श्री. नरेंद्र पाटील : यापुर्वीसुध्दा विषयपत्रिका उर्दुतुन काढण्यात येत होती ही नविन पध्दत नाही, बऱ्याचशा नगर सेवकांना मराठी येत नसल्याने त्यांना उर्दुतुन वाचने सहज शक्य आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : उर्दुभाषेतुन विषय पत्रिका तयार करण्याची प्रस्ताव येथेच मंजुर करुन कार्यवाही व्हावी. शासनाकडे पाठविण्याचा काहीही प्रश्न नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : मागील सर्व व्यवहार मराठीतुन असल्याने शासन परवानगी होणे आवश्यक आहे. तेव्हा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : या बाबत उप-आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. महापौर : या बाबत उप-आयुक्त यांनी खुलासा करावा.

उप-आयुक्त : शासनाचे निर्देशानुसार शासकीय कार्यालयातुन पुर्णपणे मराठी भाषेचा वापर करावा असे आहे. तथापी काही स.सभासदांना मराठी वाचता येत नसेल, तर मागील प्रथेप्रमाणे सभागृहाने ठरविल्यास स्थानिक प्रथेनुसार विषय पत्रिका व अजंडा काढणे त्या प्रमाणे कार्यवाही करता येइल.

श्री. अविनाश कुमावत : या देशाची राष्ट्रीय भाषा हिन्दी आहे, त्या नुसार हिन्दीतुन अजंडा तयार करावा उर्दुतुन काढु नये.

श्री. नरेंद्र पाटील : या सभागृहात जवळपास पंधरा नगर सेवक आहेत, त्यांना मराठी भाषा वाचता येत नाही. यासाठी त्यांचे करिता उर्दुतुन विषय पत्रिका व इतिवृत्त काढावे.

श्री. जयवंत ओक : शासनाचा जो काही नियम आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. गौतम खरात : हा मराठवाडा निजाम राजवटीतील असुन या ठिकाणी मुस्लीम धर्मा व्यतिरिक्त अनेक हिन्दु व दलीत वर्गही उर्दुभाषा चांगल्या रितीने अवगत करतो. शिवाय मागील माजी महापौर श्री. मोरेश्वर सावे यांनाही उर्दुभाषा चांगली वाचता येत होती, याची सभागृहाने दखल घ्यावी.

मा. महापौर : सर्व स. सभासदांना विनंती की, कुणीही सभागृहात गडबड करु नये शांतपणे आपले म्हणणे सांगावे. आताच उप-आयुक्त यांनी खुलासा केल्यानुसार उर्दु भाषेच्या विषय पत्रिका बाबत चर्चा करण्यापुर्वी माझ्या कैबीन मध्येच तोंडी चर्चा करुन निर्णय घेतला असता. परंतु सभागृहात सदरचा प्रश्न मांडल्याने

विषयास मंजुरी देऊन शासनाकडे ठराव पाठविण्याची शिफारस करण्यात येते.

श्री. गंगाधर गाडे : सभागृहात भाषे विषयी जास्त चर्चा होणे योगय वाटत नाही इंग्रजांनी १०० वर्षे राज्य करुनही या देशातील इंग्रजी भाषे बरोबरच उर्दु भाषाही आजपर्यंत चालु आहे. (या वेळी सभागृहात दोन्हीही पक्षाकडील स. सभासदांचा आवाज होतो) काहीही ऐकु येत नाही.

मा. महापौर : सर्व स. सभासदांना विनंती की, सभागृहात आवाज करु नये, शांतता बाळगावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सभेची विषय पत्रिका उर्दु भाषेतुन काढण्यासाठी मंजुरी देवुन प्रस्तुत ठराव मंजुरीसाठी शासनास पाठवावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

(तरीही सभागृहात जय भवानी जय शिवाजी घोषणा व प्रतिघोषणा चालु असतात)

मा. महापौर : ००.०५ मिनिटाकरिता सभा तहकुब करण्यात येते.

(अंदाजे वेळ ४.०५) सभेला सुरुवात अंदाजे ४.१० वाजता.

**विषय क्र. ३३/१३ :**

मनपा प्रभाग क्र. ६८ एकनाथनगर येथील मैदानावर मुलांसाठी खेळणीसाहित्य उदा. घसरगुंडी, पाळणा,शिडी आदी बाल क्रिडांगणासाठीचे आवश्यक साहित्य.

संवाद

नगर सचिव : एकनाथनगर येथे खेळणी व साहित्य पुरविणे बाबत

श्री. अविनाश कुमावत : सदरचा प्रस्ताव घेऊ शकत नाही. सभासदांचे फंड असते त्यामधुन याचा विनियोग करावा.

श्री. गौतम खरात : फुलेनगर हा भाग अतिशय मागासवर्गिय असुन या ठिकाणी मागासवर्गियांसाठी ५% खर्चाची तरतुद स्लममध्ये करतो, त्यामधुन सदरचा खर्च करावयाचा आहे.

सौ. लता दलाल : सदरचा प्रस्ताव हा शिक्षण किंवा क्रिडा विभागाच्या अखत्यारीतील असुन त्या विभागाने हे कार्य करावयाचे आहे. स. सभासदांनी मांडलेला प्रस्ताव योग्य नसुन, नियमाप्रमाणे संबंधीत विभागाकडे पाठवावा. नसता या पुढे प्रत्येक स. सभासद अशाच प्रकारचे प्रस्ताव मांडुन उल्लंघन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्री. गौतम खरात : स. सभासदांनी या बाबत कुठले नियम आहेत याची माहिती द्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : महानगरपालिकेच्या फंडातुन हे खर्च होणार आहेत. तेव्हा आपणाच निर्णय घ्यावा व मंजुरी द्यावी.

श्री. गौतम खरात : आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या धारकांसाठी जी आर्थिक तरतुद केलेली असेल, त्यामधुन हा खर्च करावा अशी माझी विनंती आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : सदरचा प्रस्तावा बाबत एका संस्थेने पाऊन एकर जमिन गार्डन व खेळाचे मैदान विकसित करण्यासाठी दिलेला असुन, वैयक्तीक माझ्या फंडतुनही मी काही पैसे खर्च केलेले आहेत. तथापी गार्डन व खेळाचे मैदानात साहित्य उपलब्ध करणेसाठी जादा खर्च येणार आहे. करिता पुरेसा

निधी उपलब्ध होणे आवश्यक असल्याने प्रस्तावास विचार करावा अशी सभागृहात विनंती करतो.

श्री. अविनाश कुमावत : अशा प्रकारचा प्रस्ताव प्रशासकीय ठेवावा त्यास आमचा काहीही विरोध नाही.

मा. महापौर : सदरचा विषय स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

मा. सभागृहात चर्चेनुसार सदरचा विषय स्थगित ठेवावा.

**विषय क्र. ३४/१४ :**

मनपा प्रभाग क्र. ६८ एकनाथनगर मधील युवकांसाठी व्यायाम साहित्य उदा. डबलबार, सिंगलबार आदी व्यायाम साहित्य पुरविणे बाबत.

संवाद

मा. महापौर : सदरचा विषय स्थगित ठेवण्यात यावा.

**ठराव :**

स. सदस्यांचे चर्चेनुसार सदरचा विषय स्थगित ठेवावा.

**विषय क्र. ३५/१५:**

प्रभाग क्र. ६८ एकनाथनगर येथील खुल्या मैदानावर समाज मंदिर बांधण्याबाबत.

संवाद

श्री. गजानन बारवाल : मागील वेळेस काही प्रस्ताव मा. आयुक्तांकडे पाठविले असता त्यांनी समाज मंदिराबाबत ५०% वाटा लोकवर्गणीव्दारे व्हावा असे म्हणाले याबाबत खुलासा व्हावा.

श्री. अविनाश कुमावत, सौ. लता दलाल : ठिक आहे संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : माजी आयुक्त डॉ. गारे साहेब असतांना समाज मंदिर कुठल्याही भागास बांधत असतांना त्या मंदिराचे अंदाजपत्रकाचे २५% रक्कम तेथील लाभधारकांनी भरावी असा ठराव केलेला आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : एकनाथनगर हा भाग पुर्वीचा माझा होता माझ्या माहितीप्रमाणे महानगरपालिकेने असा कोणताही करार समाज मंदिराबाबत केलेला नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : एका संस्थेने जागा समाज मंदिरासाठी सोडलेली आहे त्या ठिकाणी समाज मंदिर महानगरपालिकेने बांधुन द्यावे.

श्री. कचरु नवपुते : समाज मंदिर बांधुन देणे बाबत २५% रक्कम लाभधारकांनी भरण्याची अट रद्द करुन सर्व खर्च महानगरपालिकेने करावा अशी दुरुस्ती सदरच्या प्रस्तावात करावी.

श्री. गौतम खरात : यास माझे व आमच्या सहकाऱ्यांचे अनुमोदन आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : २५% रक्कम अट रद्द करुन सुधारीत प्रस्ताव मांडावा.

श्री. गजानन बारवाल : सुधारीत प्रस्ताव मांडावा.

मा. महापौर : सदरचा विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात यावा.

**ठराव :**

चर्चेनुसार सदरचा विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात

**विषय क्र. ३६/१६ :**

एकनाथनगर ते बीड हायवे (सातारा) उत्तर दक्षिण बाजुस रेल्वे क्रॉसिंग ओव्हर ब्रिज बांधणे बाबत.

संवाद

श्री. गजानन बारवाल : मागील वेळेस रेल्वेस्टेशन येथे ओव्हर ब्रीज बांधणे बाबत प्रस्ताव मंजुर केला होता. त्या बाबत काय झाले कृपया माहिती द्यावी.
मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथ त`बीड हायवे (सातारा) उत्तर दक्षिण बाजुस रेल्वे क्रॉसिंग ओव्हर ब्रिज बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७/१७ :**

औरंगाबाद महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक आणि नगरसेविका हे लोकप्रतिनिधी असल्यामुळे आम्हा सर्वाना महानगरपालिका व सर्व विभागातील अधिकारी औरंगाबाद शहरातील इतर कार्यालये व त्यांचे अधिकारी तसेच प्रतिष्ठीत नागरिक व विविध संस्था यांच्याशी आमच्या वार्डातील व औरंगाबाद शहरातील जनतेच्या हिताची कामे करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी संपक्र साधावा लागतो. आमच्या कामाची व्याप्ती व औरंगाबाद शहराची व्याप्ती या दोन्हींचा विचार केला तर सर्वांनी संपर्क ठेवणे अवघड काम आहे. त्यासाठी आम्हा सर्व नगरसेवक व नगरसेविकांना स्वतंत्र टेलीफोन अतिशय आवश्यक आहे. तरी आम्ही सर्वांचे घरी महापालिकेच्या वतीने व खर्चाने टेलीफोन त्वरीत द्यावेत.

संवाद

श्री. गिरजाराम हाळनोर : ८२ स.सभासद निवडुन आलेले आहेत त्या सर्वांना सुविधा मिळाव्यात.
मा. महापौर : मंजुर
श्री. गिरजाराम हाळनोर : विषय क्रमांक ७ बाबत कोणत्या अधारे मंजुर करण्यात येतो या बाबत बऱ्याचशा सदस्यांनी दुरध्वनी स्व-खर्चाने घेतलेले आहेत आणि मागील बैठकीत रु. ३००/- प्रतिमाह दुरध्वनीसाठी कार्यालयाने भरावयाचे असल्याचे ठरलेले आहे. तेव्हा या बाबत निर्णय व्हावा.
मा. महापौर : सदरचा प्रस्ताव नामंजुर करुन स. सभासदांनी दुरध्वनी स्व-खर्चाने घ्यावा.

**ठराव :**

प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो.

**विषय क्र. ३८/१८ :**

औरंगाबाद शहरात विविध प्रभागामध्ये अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत तसेच या पैकी बऱ्याचशा अनाधिकृत बांधकामांना मालमत्ता कराची आकारणी झालेली आहे. या पुर्वीच्या सर्व साधारण सभेने एका ठरावव्दारे अनाधिकृत बांधकामांना मालमत्ता कराची अकारणी करुन महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर घातलेली होती, परंतु मध्येतरी प्रशासकीय कारकीर्दी मध्ये तात्कालीन प्रशासकांनी अशा प्रकारे अनाधिकृत बांधकामांना मालमत्ता कराची अकारणी करणे बंद केलेले आहे. ज्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान तर होतच आहे. परंतु सर्व साधारण जनतेला मालमत्ता कराची आकारणी न झाल्याने इतर सुविधा मिळविण्यात अडचणी निर्माण होत आहेत करिता पुर्वीप्रमाणेच अनाधिकृत बांधकामाना मालमत्ता कराची आकारणी करुन महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढवावे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद
श्री. गिरजाराम हाळनोर : शहरामध्ये नविन घरे अधिकृत/ अनाधिकृत घरांना नंबरींग देणे आवश्यक आहे.
मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात विविध प्रभागामध्ये अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत त्यापैकी बऱ्याच घरांना मालमत्ता कर लावण्यात आलेला आहे. परंतु काही घरांना प्रशासकीय कारकीर्दीत कर लावणे बंद केलेले आहे. ज्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तेव्हा अशा अनाधिकृत शहरातील सर्व प्रभागातील घरांना सर्व्हे करुन (टॅक्स) मालमत्ता कर लावावा. व महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढेल यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/१९ :**

औरंगाबाद शहर हे आशिया खंडात सर्वात झपाडयाने वाढणारे शहर म्हणुन नावा रुपात आलेले असुन या शहरात ऐतिहासिक पार्श्वभुमी आहे. या शहरात देशातील तसेच परदेशातील अनेक पर्यटक सतत भेट देत असतात. त्यामुळे या शहराची स्वच्छता व सौदर्य राखणे हे महापालिका प्रशासनाचे काम आहे. गेल्या पाच सात वर्षापासुन या शहराची लोकसंख्या व व्याप वाढलेला असुन त्याच प्रमाणे साफसफाईच्या कामाचा बोजाही वाढलेला आहे. परंतु त्या मानाने साफसफाइ व इतर कामासाठी महानगरपालिके कडील वर्गाची वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे आहे त्याच कर्मचाऱ्यांकडुन सदरील काम करुन घेण्यात येत आहे. म्हणुन कर्मचाऱ्यांवरही कामाचा ताण वाढतो व पर्यायाने शहरातील स्वच्छता पाहीजे तशी होत नाही. करिता कामाच्या प्रमाणात नविन कर्मचारी वर्गाची भरती करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद
श्री. गजानन बारवाल : कर्मचाऱ्यांची जादा भरती होणे आवश्यक आहे. कारण माझ्या वार्डात फक्त एकमेव महिला कामाला आहे. सफाइ कामगार अपुरा आहे. या बाबत झोनवाईज किती कर्मचारी काम करतात याची माहिती द्यावी.
श्री. विखारोद्दीन : झोन ६ मध्ये बरेच कर्मचारी काम करित होते परंतु तेथुन बऱ्याचशा कर्मचाऱ्यांना शिपाइ व सेविका म्हणुन शिक्षण विभागात पाठविले होते या बाबत माहिती द्यावी.
श्री. गौतम खरात : शहराच्या लोकसंख्येनुसार महानगरपालिकेमध्ये १९८२ पासुनचा कर्मचारी वर्ग आहे तोच आहे. कर्मचारी अपुरा पडतो. त्यामुळे शहरात साफ सफाइ होत नाही, दुर्गंधी वाढते व नागरिकांना त्रास होतो. शासनाकडे २०० पदाची मंजुरी बाबत गेल्या चार वर्षापासुनचा प्रश्न प्रलंबित आहे. तेव्हा आपली स्थायत्त संस्था असुन आपणच असा निर्णय घ्यावा की, आपणच कर वसुल करतो व आपणच खर्च करतो. यासाठी कर्मचाऱ्याची भरती सुध्दा आपणच स्वता: करण्या बाबतचा निर्णय घ्यावा. प्रस्ताव शासनाकडे पाठविण्या येवु नये.
श्री. अविनाश कुमावत : प्रस्ताव शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे.
श्री. गौतम खरात : चार-चार वर्ष प्रस्ताव मंजुर होऊन येत नाही, त्याचे काय?
श्री. अविनाश कुमावत व श्री. गजानन बारवाल : टेम्परारी भरती करावे व नंतर शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.
श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : सदरच्या प्रस्तावा बाबत अत्यंत आवश्यकता असुन या बाबत चा खर्च किती अपेक्षित राहील याची माहिती द्यावी.
सौ. लता दलाल : एकंदरीत बोजा पडेल यासह खुलासा करावा.
उप-आयुक्त : जवळपास ३ ते २५ हजार कर्मचारी वर्ग आहे. या कर्मचारी वर्गासाठीचा आस्थापनेवरील खर्च हा सध्या ३८ ते ३८.५ टक्के पर्यंतचा आहे. जो की ४२ टक्के पर्यंत आपल्याला खर्च करता येतो. परंतु निश्चित आकडा पुढील बैठकीत सांगता येइल.
श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सदरचा प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवावा.
श्री. गिरजाराम हाळनोर : महानगरपालिकेने आधुनिक पध्दतीने यंत्रसामुग्री आणुन साफसफाइ करावी व या कामी जे भंगी बरोजगार असतील त्यांना प्राधान्याने काम द्यावे.
श्री. गंगाधर गाडे : स. सभासदांनी सुचना केल्या संबंधीत कर्मचाऱ्यावर बेकारी पाळी येइल व त्यांचे बेकारीची हमी संबंधीत नगरसेवक देत असतील तरच आसा निर्णय व्हावा.
श्री. अविनाश कुमावत : या बाबत महानगरपालिकेने काही ठेका घेतलेला नाही.
श्री. गंगाधर गाडे : स. सभासद श्री. गौतम खरात यांनी सुचने नुसार प्रस्ताव मंजुर करावा कारण दिवसेंदिसस लोकसंख्या वाढत आहे. आणि कर्मचारी अपुरे आहे. शहराची साफसफाई होणे आवश्यक आहे. अन्यथा अनेक रोगाची लागण लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव सभागृहात जास्तीची चर्चा न होता प्रस्ताव मंजुर करावा.
मा. महापौर : प्रस्ताव मंजुर शासनाकडे पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर अशिया खंडात झपाटयाने वाढत असुन शहराची स्वच्छता व सौदर्य हे महानगरपालिकेचे काम आहे. महानगरपालिकेतील कामाचा बोजा व व्याप लक्षात घेता कर्मचारी वर्ग अपुरा पडतो त्यामुळे शहर स्वच्छता होत नाही या करिता नविन नौकर भरती चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/२० :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत विविध शाळांवर "सेविका" या पदावर सन १९८३ पासुन अनेक सेविका व चौकीदार ठराविक वेतन (फिक्स पे) वर कार्यरत आहेत या सेविकांच्या सेवेचा कालावधी लक्षात घेता त्यांना ठराविक वेतनावरुन कायम स्वरुपी नौकरी मध्ये सामातुन घेण्यात यावे, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

सौ. लता दलाल : या प्रस्तावातील अनुमोदक या बैठकीत नाहीत तेव्हा पुढील बैठकीत विचार व्हावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : कर्मचाऱ्यांचे २०० पदांची मंजुरी आल्यास त्यातुन १०० महिला कर्मचारी भरती करीत असतांना त्यातुन प्राधान्याने शिक्षण विभागातील सेविकांना होण्याबाबत विचार व्हावा.

मा. महापौर : दोनशे पदांची मंजुरी शासनाकडुन मिळेल त्यानंतर सदरचा सेविकांना घेण्या बाबत विचार व्हावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत विविध शाळांवर "सेविका" या पदावर सन १९८३ पासुन सेविका व चौकीदार (फिक्स पे) वर कार्यरत आहेत या सेविकांच्या सेवेचा कालावधी लक्षात घेता त्यांना ठराविक वेतनवरुन कायम स्वरुपी नौकरीत ज्या वेळेस शासनाची मंजुरी मिळेल त्या वेळेस सामावुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१/२१ :**

औरंगाबाद महापालिकेतर्फे बांधण्यात येत असलेल्या "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या" पहिल्या टप्प्याचे काम पुर्ण झालेले आहे. करिता या प्रस्तावाव्दारे पुर्ण झालेल्या या संशोधन केद्रांच्या पहिल्या टप्प्याचे उद्‌घाटन मा.श्री. दलाऊ लामा यांच्या अध्यक्षतेखाली व मा.ना. श्री. मनमोहनसिंग जोशी, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे शुभ हस्ते करण्यात यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

मा. महापौर : प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्ताव स्थगित ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२/२२ :**

सिडको येथील महानगरपालिका हद्दीतील "मजनुहील" या उद्यानाचे नांव बदलुन "स्वामी विवेकानंद उद्यान सिडका" नविन औरंगाबाद असे नामकरण करण्यात यावे.

संवाद

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : विविध ठिकाणचे नामांतर ठेवण्याचा प्रस्ताव बरोबर नाही यापुर्वी मी सुध्दा एक प्रस्ताव ठेवलेला होता की मोंठा ते चौराहा रोडवरील चौकास कै. मोराराजी भाई यांचे नाव देण्यात यावे परंतु त्या बाबत काहीही कार्यवाही होत नाही.

श्री. नरेंद्र पाटील : सभागृहात विविध प्रभागातील नामांतर करण्याच्या प्रस्तावा बाबत निर्णय घेऊन एका समितीचे गठण करावे. व ती समिति योग्य तो निर्णय होऊन शिफारस करेल. त्या प्रमाणे सभागृहाणे निर्णय घ्यावा. असा आदेश व्हावा.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : जे जुने नांव आहे ते योग्य असुन जुन्या काळापासुन ते चाललेले आहे. तेव्हा नामांतर करणे योग्य नाही.

(यावेळी काही स.सभासद नामांतर असे जोरजोरात ओरडतात.)

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको येथिल महानगरपालिका हद्दीतील "मजनुहील" या उद्यानाचे नाव बदलुन "स्वामी विवेकानंद उद्यान" सिडको नविन औरंगाबाद असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३/२३ :**

न्यु कॉलनी ते रोशनगेट जागा हस्तगत करुन रोड बांधणे बाबत.

संवाद

मा. महापौर : मंजुर

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु कॉलनी ते रोषनगेट जागा जिया सि.नं. ३२९ आहे. ती जागा हस्तगत करुन रोड बांधणेच मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४/२४ :**

न्यु कॉलनी रोशनगेट भागात जिनिंग कॉटन मिलची विक्री जागांवर खेळाचे स्टेडियम तयार करण्याकरिता सदरील जागा खरेदी करण्याकरिता व सर्व प्रकारचे खेळासाठी खेळाचे मैदान तयार करण्यास मंजुरीस्तव सादर.

संवाद

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु कॉलनी रोषगेट भागात जिनिंग कॉटन मिलची विक्री जागावर खेळाचे स्टेडियम तयार करण्यासाठी सदरील जागा खरेदी करण्याकरिता व सर्व प्रकारचे खेळसाठी खेळाचे मैदान तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५/२५ :**

औरंगाबाद महानगरपालिका निवडणुक १९९५ चे पुर्वी या बाबत प्रशासकीय काळात या विषयी तिनवेळा पत्र व्यवहार करुन स्मशान हनुमान मंदिर, संजयनगर ते जाफरगेट पर्यंत नाला संरक्षित भिंत उभारणे जरुरीचे आहे असे कळविण्यात आलेले होते. संबंधीत कार्यवाही अभियंता जलनिःसारण विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रत्यक्ष पाहाणी करुन संबंधीचे अंदाजपत्रक तयार केले होते. सदर नाल्याच्या दोन्हीही बाजुला नागरी वस्तीची वाढ होत आहे. काही ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे आढळुन आलेले आहे "जवाहर नेहरु इंजिनियरींग कॉलेज इंदिरानगर, सुराणानगर, सेव्हन हिल्स बसैय्येनगर, संजयनगर व अन्य वस्त्यामधुन पावसाळयातील पाणी नैसर्गिक रित्या निर्माण झालेल्या नाल्यातुन वाहुन जात असते. या नाल्यावरच अतिक्रमण झाल्याने पावसाचे पाणी मोठया प्रमाणावर साचुन गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. झोपडपट्टीप्रमाणे बांधलेल्या लगतच्या घरांना या पासुन धोका संभवतो.

महानगरपालिकेने वरील निर्देशित केलेल्या भागातुन येणाऱ्या ड्रेनेज लाइन नाल्यातील मुख्य ड्रेनेज लाइन टाकुन जलनिःसारणाची व्यवस्था केलेली आहे. जर नाला संरक्षित भिंत उभारली गेली नाही तर मुख्य जल निःसारण वाहिनींना सुध्दा धोका संभवतो. यासाठी (१) अतिक्रमण रोखणे (२) वादातील प्रश्न मिळविणे (३) जलनिःसारण लाइन सुरक्षित ठेवणे. (४) पाणी विना अडथळा वाहुन जाणे. (५) गरिब वस्त्यांना कोणत्याही प्रकारचा धोका होऊ नये म्हणुन, नाला संरक्षित भिंत बांधणे अत्यंत जरुरी आहे. विचारास्तव सदरील प्रस्ताव सभेत सादर करण्यात येत आहे. ही सभा सर्वसामान्य जनतेचा प्रश्न समजुन मान्यता देऊल, अशी अपेक्षा.

संवाद
महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्मशान हनुमान मंदिर, संजयनगर ते जाफरगेट पर्यंत नाला संरक्षित भिंत बांधणेबाबत जलनिःसारण विभागा मार्फत अंदाजपत्रक तयार करुन घेण्यास सर्वांनुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६/२६ :**

शहरातील आरक्षणाच्या जागेवर बसलेल्या अनाधिकृत वस्त्या ज्या मध्ये ७० ते १०० टक्के लोकवस्ती आहे. अशांचे आरक्षण रद्द करुन, त्या अधिकृत (निवासी) घोषित करण्यात याव्यात व शासनाकडे त्वरीत मंजुरीस्तव पाठवावा.

संवाद
मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील आरक्षणाचे जागेवर बसलेल्या अनाधिकृत वस्त्या ज्यामध्ये ७० ते १०० टक्के लोकवस्ती आहे अशा वस्त्यांचे आरक्षण रद्द करुन त्या

अधिकृत (निवासी) घोषित करण्याबाबत शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यास सर्वानुमते शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७/२७ :**

ज्या अनाधिकृत वस्त्यांमध्ये अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत त्या ठिकाणी महानगरपालिकेने काही घरांना कर लावलेला आहे. परंतु गेल्या दोन वर्षापासुन उत्पन्न तर बुडतेच परंतु नागरिकांवरही अन्याय होत आहे. करिता पुर्ववत कर लावण्यात याव. जेणे करुन ज्या भागातील जनतेला नळ ड्रेनेज इ. व्यवस्था अधिकृतपणे मिळतील.

संवाद

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्या अनाधिकृत घर बांधकामांना महानगरपालिकेतर्फे कर आकारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे गेल्या दोन वर्षापासुन महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नाचे नुकसान होत आहे. यासाठी पुर्ववत कर आकारणी करण्याची कार्यवाही करुन तेथील नागरिकांना नागरी सुविधा महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात याव्यात यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. व तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८/२८ :**

प्रभाग क्रमांक १३ "नारेगांव" चे नाव बदलुन "माणिकनगर" असे करणे बाबत नारेगांव ही वस्ती गेल्या ५० वर्षापुर्वी फक्त ६ ते ७ घरांची होती. या वस्तीचे पोलीस पाटील हे श्री. माणिकराव दहीहंडे हे होते. त्यांनी या गावाचा विकास व्हावा म्हणुन आदीवासी, भटके, मागासवर्गिय विविध जाती धर्माचया तसेच सर्व १८ जातीच्या व्यक्तींना स्वकष्टाने निवारा व आश्रम देण्याचे पवित्र सामाजिक कार्य गेल्या २२ वर्षा पासुन केलेले आहे. व त्यांचेच प्रयत्नामुळे आज या वसाहतीचे गावात रुपांतर झाले आहे. त्यामुळे त्यांचे काष्टाचे चिज व्हावे तसेच त्यांची समाजसेवा कारणी लागावी यासाठी "नारेगांव" या वसाहतीचे नाव बदलुन "माणिकनगर" असे करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. जावेद रज्जाक : नारेगांव वार्डाचे नाव बदलण्याचा मुळ उद्देश काय आहे.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : या वार्डाचे नाव सुरुवातीपासुनचे असुन नाव बदलणे योग्य वाटत नाही या बाबत ऐतिहासिक काही माहिती आहे काय?

श्री. महादेव सुर्यवंशी : माणिकराव दहिहंडे नावाचा एक सामाजिक जाण असलेल्या येथील राहाणारा व्यक्ती होता. व त्यांनीच या ठिकाणी समाजसेवा करुन गरीब लोकांसाठी वस्ती तयार केली व त्यांचे साठी अहोरात्र प्रयत्न करीत असे. अशा व्यक्तीचे नाव अजरामर राहाणेसाठी या वार्डाचे नामांतर करणे आवश्यक आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : अशा सामाजिक मानसाचे नाव फक्त तेथील वस्तीसाठी द्यावे. परंतु संपुर्ण वार्डाचे नाव बदलणे योग्य आहे.

श्री. मिरा सलामी : अशा प्रकारचे प्रस्ताव ठेवुन नागरीकांचे साठी महानगरपालिका काय करावीत की, लोकांच्या नजरे समोर ते स्पष्टपणे दिसुन येइल तेव्हा हा प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : नारायण हे नाव देवाचे असते देव हा आपल्या भावनिकतेचा प्रश्न आहे. तेव्हा देवाचे नाव बदलणे कितपत योग्य वाटते?

श्री. वसंत देशमुख : अशा कोणत्याही प्रस्तावावर स. सभासदांनी उगाचच उहापोत्र करुन खिल्ली उडवु नये व सभागृहाचा वेळ वाया घालवु नये.

श्री. रशिदखान (मामु) : सभागृहात वेळोवेळी नामांतर किंवा विविध प्रभाग किंवा उद्यानाचे नावे ठेवणे योग्य वाटत नाही.

श्री. नरेंद्र पाटील : स. सभासदांच्या सुचना प्रमाणे माणिकराव ज्या ठिकाणी राहातात त्या परिसराला फक्त नांव द्यावे व नारेगाव प्रभाग जसेच्या तसे ठेवावा.

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. १३ "नारेगांव" हे नाव बदलुन "माणिकनगर" असे नामकरण करण्यास बहुमताने मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९/२९ :**

औरंगाबाद वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालयात ४०% डॉक्टरांच्या जागा भरलेल्या नाहीत या रुग्णालयात डॉक्टरांची सेवा मिळत नाही. तसेच या वैद्यकिय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुध्दा काही तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळत नाही व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या जागा कमी होतात, हे महाविद्यालय व रुग्णालय आपल्या महानगरपालिकेत येत असल्यामुळे वरील मंजुरीस्तव ठेवावा.

संवाद

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : आपल्या कडील लोक प्रतिनिधी डॉ. श्री. कराड यांचे बाबतीत सदरीत प्रस्ताव मांडलेला आहे.

सौ. लता दलाल : प्रस्तावा बाबत चर्चा करुन नंतरच निर्णय घ्यावा की, यामुळे महानगरपालिकेचा कोणता फायदा होणार आहे.

श्री. गौतम खरात व श्री. काशिनाथ कोकाटे श्री. प्रफुल्ल मालाणी : प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे याचा महानगरपालिकेशी काहीही संबंध नाही. या बाबत उप-आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. महापौर : या संबंधी उप-आयुक्त यांनी खुलासा करावा.

उप-आयुक्त : या विषयामध्ये निश्चित असे काय म्हणावयाचे आहे याचा काहीही बोध होत नाही. या बाबत सभागृहानेच ठरवावे.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : स. सभासद डॉ. श्री. कराड यांच्या बाबतीत ठराव मंजुर पाठवावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉक्टरांची सेवा बाबत महानगरपालिकेशी काहीही संबध येत नाही त्यामुळे सदरील प्रस्ताव नामंजुर करावा.

मा. महापौर : सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत सुधारित करुन ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सदरचा सुधारित प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**विषय क्र. ५०/३० :**

ग्रामपंचायतीच्या ठरावनुसार देशीदारुचे दुकाने स्थलांतरीत होउन औरंगाबाद शहराच्या विविध झोपडपट्टी/गरिब वस्तीमध्ये स्थापन होत आहे, व त्यांना तशी परवानगी दिली जात आहे. सध्या १५ दुकाने अशा प्रकारे येण्याच्या स्थितीत आहेत. त्यांना महानगरपालिका हद्दीमध्ये कुठल्याही गरीब वस्तीमध्ये किंवा झोपडपट्टी मध्ये दारु विक्री दुकान सुरु करण्यास परवानगी देऊ नये व तसा ठराव करुन सभागृहाचा निर्णय महाराष्ट्र शासनास कळवावा. ठराव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. गौतम खरात व श्री. लांडगे : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे माझ्या वार्डातील कोणत्याही ठिकाणी देशी दारुचे दुकान चालविण्यास परवानगी देऊ नये. ज्यामुळे झ ोपडपट्टीतील गरीब वस्तीतील लोकांना कोणत्याही त्रास होणार नाही याची खबरदारी घेउन शासनास कळवावे.

श्री. गंगाधर गाडे : स. सभासद श्री.लांडगे यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो योग्य आहे. अशा प्रकारे झोपडपट्टीत देशी दारुचे दुकान चालविण्यास कुठल्याही प्रकारची परवानगी देऊ नये, ज्यामुळे गरीब लोकांचे संसार उघडयावर राहतील याचा गांर्भीयाने विचार करणे आवश्यक आहे. माझ्या वार्डातही फुलेनगर येथे देशी दारुचे दुकान आहे. त्या ठिकाणी सायंकाळी दररोज गर्दी असते व मेनरोडवर सदरची दुकान असल्याने त्या ठिकाणतुन पायी चालणेही कठीण जाते. यासाठी देशी दारुचे दुकानात परवानगी देवु नये व असल्यास ताबडतोब हटविण्याची कार्यवाही करावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : शहरात अनेक ठिकाणी बिअर बारचे परमिटरुम उघडत आहेत त्यांनाही परवानगी नाकारावी.

मा. महापौर : प्रस्तावा मंजुर करुन शासनाकडे पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार देशी दारुची दुकाने स्थलांतरीत होऊन औरंगाबाद शहराच्या विविध झोपडपट्टीत गरीब वस्तीत स्थापन होत आहेत अशा देशी दरुचे दुकानदारास शहरात कुठेही परवानगी देवु नये.

या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येवुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१/३१ :**

वाळुंज पंढरपुर परिसर आणि एम.आय.डी.सी. परिसर औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत समावेश करणे बाबत कारणा त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यास मदत होइल. व त्या भागातील नागरिकांना नागरी सुविधा देणे शक्य होऊन शहराचा विकास भरभराटीस येईल.

संवाद
श्री. नरेंद्र पाटील : सदरचा प्रस्ताव मागील लोक प्रतिनिधींच्या काळात सुध्दा मंजुर झाला होता तरी अद्यापही कार्यवाही झालेली नाही.
री. मनमोहनसिंग ओबेरॉय : या पुर्वीचा प्रस्ताव जो मंजुर झालेला आहे त्या प्रमाणे शासनाकडे पाठपुरावा करावा.
मा. महापौर : मंजुर करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाळुंज पंढरपुर परिसर आणि एम.आय.डी.सी. परिसर औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत समावेश करुन घेण्या बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ५२/३२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका आरोग्य केद्रावर रोग्यांची दररोज जास्त गर्दी वाढत आहे. त्या मानाने आरोग्य केंद्रास दिलेला वेळ अपुर्ण पडत आहे. करिता आरोग्य केंद्राची वेळ स. ९ ते १ ऐवजी ९ ते २ ठेवण्यात यावी.

संवाद
श्री. मोहसिन अहेमद : औरंगाबाद महानगरपालिकेतील सर्व आरोग्य केंद्राच्या वेळात सकाळी ०८.३० ते दुपारी १.३० पर्यंत वाढ करण्यात यावी.
श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सभासदांनी सुचित केल्या प्रमाणे बदल करावा.
मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील सर्व आरोग्य केंद्र सकाळी ०८.३० ते दुपारी १.३० पर्यंत चालु करण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३/३३ :
सहा. आयुक्त १ महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्ती व पदोन्नती संदर्भात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५७(३) "अ" अन्वये तयार करण्यात आलेल्या सेवाभर्ती अधिनियमास शासनाने मंजुरी दिलेली आहे. या अधिनियमात महानगरपालिका अस्थापनेवरील सांस्कृतिक कार्य अधिकारी या पदाच्या संदर्भात स्तंभ क्रमांक ४ मध्ये "पुढील बढती सहा. अधिक्षक, व कार्यालय अधिक्षक यांच्या करिता वैद्य असेल व ती संवर्गातर्गत हस्तांतरणास अधिन असेल. ही टीप मुळ सेवा भरती नियमात अनावधानाने अंतर्भुत करावयाची राहिल्याने मंजुर सेवा भरती नियमात या टीपेचा अंतर्भाव

करुन शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. गौतम खरात : सदरचा ऐनवेळचा प्रस्ताव चुकीचा मांडलेला असुन प्रस्ताव नामंजुर करावा.

श्री. जयंवत ओक : महानगरपालिकेमध्ये कॅडेर मध्ये बदल करुन त्या प्रमाणे वेतन श्रेणीत बसविण्यात आलेले आहेत. असे बरेच उदा. आहेत. त्या प्रमाणे मंजुरी देवुन शासनाकडे पाठविण्यात यावा.

सौ. लता दलाल : आपल्या महानगरपालिकेन सेवा भरती नियम हे चुकीचे मंजुर झालेले असुन "आजच्याच महानगर दैनिकात" येथील लेखाधिकारी-१ व ऑडीट मधील विभागातील अधिक्षक यांचे बाबतीत चुकीचे व दिशाभुल करुन भरती झाल्याचे वृत्त प्रसिध्द झालेले आहे. तेव्हा अशा अंदाधुदी कारभारा बाबत चौकशी होणे आवश्यक आहे तेव्हा सदरच्या प्रस्तावात मंजुरी देवुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. गौतम खरात : विनाकारण कर्मचाऱ्यावरती आरोप करण्यात काही अर्थ नाही. नियमाप्रमाणे सेवा भरती झालेली आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय व श्री. नरेंद्र पाटील : सदरचा प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविण्यात यावा.

मा. महापौर : मंजुर करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमाप्रमाणे अस्थापने वरील सांस्कृतिक कार्य अधिकारी या पदाच्या संदर्भात स्तंभ क्र. ४ मध्ये "पुढील बएती सहा. अधिक्षक व कार्यालय अधिक्षक यांच्या करिता वैद्य असेल व ती संवर्गाअंतर्गत हस्तांतरणास अधिन असेल" ही टिप मुळ सेवा भरती नियमात अनावधानाने अंतर्गत करावयाची रहिल्याने ती करुन शासनास मंजुरीस्तव पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**शुक्रवार दिनांक २०-१०-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक २०-१०-९५ रोजी सर्व साधारण सभा संपन्न झाली. सभेची सुरवात वंदेमातरम या गीताने अंदाजे ११-१५ वाजता झाली. सभेस खालील स. सदस्य तथा अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. सौ. ज्योत्सना हिवराळे | उपमहापौर |
| २) | मा. सौ. रुख्मणीबाई खंडेराव लोखंडे | सदस्य |
| ३) | मा. श्री. अफसरखॉ यासिनखॉ | सदस्य |
| ४) | मा. श्री. विधाने प्रभाकर सिताराम | सदस्य |
| ५) | मा. सौ. साजेदा बेगम | सदस्य |
| ६) | मा. श्री. म. सलिम हनिफ कुरैशी | सदस्य |
| ७) | मा. श्री. ॲड. गणेश किशनराव वानखेडे | सदस्य |
| ८) | मा. सौ. रजनी रमेश जोशी | सदस्य |
| ९) | मा. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक | सदस्य |
| १०) | मा. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | सदस्य |
| ११) | मा. श्री. गौतम लिंबाजी लांडगे | सदस्य |
| १२) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव महादेव पुंडलीक | सदस्य |
| १३) | मा. श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | सदस्य |
| १४) | मा. श्री. नरेंद्र यादवराव पाटील | सदस्य |
| १५) | मा. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | सदस्य |
| १६) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | सदस्य |
| १७) | मा. श्री. रविंद्र (राजु) बाबुराव इंगळे | सदस्य |
| १८) | मा. श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | सदस्य |
| १९) | मा. सौ. पदमाबाई बाबुराव शिदे | सदस्य |
| २०) | मा. श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | सदस्य |
| २१) | मा. श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | सदस्य |
| २२) | मा. श्रीमती. चंपाबाई पांचाळ | सदस्य |
| २३) | मा. सौ. धंनश्री अशोक विसपुते | सदस्य |
| २४) | मा. श्रीमती. फरहत बानो मो. नवाज | सदस्य |
| २५) | मा. श्री. फजलउल्लाखान अजमतउल्लाखान | सदस्य |
| २६) | मा. श्रीमती. आबेदा बेगम मो. मुस्ताफा | सदस्य |
| २७) | मा. श्री. मो. मुश्ताक अहमद. | सदस्य |
| २८) | मा. सौ. नुरजहॉ बेगम अ. रहेमानखॉ | सदस्य |
| २९) | मा. श्री. देशमुख वसंत विनायकराव | सदस्य |
| ३०) | मा. श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद | सदस्य |
| ३१) | मा. सौ. मोहसिंना बिलकीस विखारोद्दीन | सदस्य |
| ३२) | मा. श्री. अ. जावेद रज्जाक | सदस्य |
| ३३) | मा. श्रीमती. जाहेदा बेगम म. जमिर | सदस्य |
| ३४) | मा. श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३५) | मा. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | सदस्य |
| ३६) | मा. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | सदस्य |
| ३७) | मा. श्रीमती. पुष्पाताई सुरेशचंद गंगवाल | सदस्य |
| ३८) | मा. श्री. हमिदोद्दीन ताबा फसियोद्दीन | सदस्य |
| ३९) | मा. श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद | सदस्य |
| ४०) | मा. श्री. स.अ. एकबालोद्दीन स.मो. कुतुबोद्दीन | सदस्य |
| ४१) | मा.श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल | सदस्य |
| ४२) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | सदस्य |
| ४३) | मा. श्री. स. अली मिर . सलामी | सदस्य |
| ४४) | मा. श्री. लाहोट रमेश दिपंचंद | सदस्य |
| ४५) | मा. श्री. संजय किसनराव केनेकर | सदस्य |
| ४६) | मा. श्री. फैय्याज अहेमद कुरैशी | सदस्य |
| ४७) | मा. सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | सदस्य |
| ४८) | मा. सौ. दलाल लता श्रीनिवास | सदस्य |
| ४९) | मा. श्री. ओक जयंवत केशवराव | सदस्य |
| ५०) | मा. सौ. अलका रमेश पाटील | सदस्य |
| ५१) | सौ. धांडे शकुंतला हरीदास | ,, |
| ५२) | श्री. अब्दुल रशीद खान (मामु) | ,, |
| ५३) | श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मी नारायण | ,, |
| ५४) | कु. माया लिंबाजी लाडवाणी | ,, |
| ५५) | डॉ. कराड भागवत किशनराव | ,, |
| ५६) | सौ. आव्हाड सविता संजय | ,, |
| ५७) | सौ. निर्मला विठठ्ल कांबळे | ,, |
| ५८) | श्री. अब्दुल रशीद अ. सत्तार | ,, |
| ५९) | श्री. विखारोद्यीन पि. कुतुबोद्यीन | ,, |
| ६०) | श्री. जैन विकास रतनलाल | ,, |
| ६१) | श्री. गाडे गंगाधार सुखदेव | |
| ६२) | श्री. बारवाल गजानन रामकिसन | ,, |
| ६३) | श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | ,, |
| ६४) | श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | ,, |
| ६५) | श्री. जोशी संजय रामदास | ,, |
| ६६) | श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | ,, |
| ६७) | श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | ,, |
| ६८) | श्री. राजकुमार ऊर्फ सांडू बचाटे | ,, |
| ६९) | सौ. राधाबाई तळेकर | ,, |
| ७०) | श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | ,, |
| ७१) | श्री. विठठ्ल किसन जाधव | ,, |
| ७२) | श्री. मेहेर विजय कुमार गजानन | ,, |
| ७३) | सौ. काळुसेमंदा धनंजय | ,, |
| ७४) | श्री. गांगवे बन्शी तुळशीराम | ,, |
| ७५) | श्री. घडामोडे भगवान देविदास | ,, |
| ७६) | श्री. नवपुते कचरूचंद्र भान | ,, |

**विषय क्र. ५४/१ :**

दिनांक ४-९-१९९५ रोजी संपन्न आलेली विशेंष सर्व साधारण सभा तसेच दिनांक १६-९-१९९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत कायम करणे.

**संवाद**

श्री. मोहसिंन अहमद : सर्वसाधारण सभेमध्ये स. सदस्य जे काही बोलतात त्याचे भाष्य व्यवस्थितरित्या इतिवृतात नोद होत नाहीत अशी आमची तक्रर आहे. अनेक वेळा स. सदस्य सभागृहात विविध मुददे मांडतात परंतु त्यांच्या मुद्दयांच्या बाबतीत इतिवृतात नोद केलीच जात नाही. मात्र त्यांच्या नावाची नोद होवून त्यांना हिरो केल्या जाते. व त्या रेकॉर्डीग नुसार इतिवृत्तात नोंद घेणे आवश्यक आहे, जर रेकॉर्डीग प्रमाणे नोद न होणे मागे कारण काय? याचा खुलासा संबंधित अधिका-याकडुन मागवावा, कारण वेळोवेळी स. सदस्य बोलतात त्याचे सर्व काही इतिवृतात नोदी होणे आवश्यक आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : स. सदस्यांच्या सुचने प्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांना योग्य त्या सुचना दयाव्यात.

श्री. मोहसिंन अहेमद : स. सदस्यांच्या बोलण्याच्या बाबतीत इतिवृतात नोद न होणे या बाबत संबंधित अधिकांऱ्यांनी खुलासा करावा कि नेमके कारण काय रेकॉर्डीग झालेले इतिवृतात नोंद होणे आवश्यक आहे परंतु या मागे उदेश काय आहे आमच्यावर अन्याय होत आहे.

मा. महापौर : या पुढे असे काहीही होणार नाही अशी संबंधितांनी विशेष लक्ष घालुन दखल घावी.

श्री. मिरा सलामी : इतिवृत्त लिहिणारे कर्मचारी एकच आहेत तेव्हा एका पेक्षा दोन कर्मचारी बसुन इतिवृत लिहावे जेणे करुन व्यवस्थितरीत्या नोद होणे शक्य होईल कारण की इतिवृतातील पान क्र. ५ व ६ मध्ये मी बोललेल्या वाक्यांची इतिवृत्तात नोंद व्यवस्थित झालेली नाही.

श्री. अ. जावेद रज्जाक : रेकॉर्डीग प्रमाणे इतिवृतात नोदी होणे आवश्यक आहे या बाबत संबंधिांनी दखल घ्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मी एक पत्र दिले होते की, शुकवार रोजी मुस्लीम बांधव व स. सदस्य यांना दुपारला नमाज पढण्यासाठी जावे लागते. तेव्हा त्या वेळात सभा होऊ नये.

मा. महापौर : काल विरोधी पक्षनेत्यांचे पड मिळाले पत्रात नमुद केल्या प्रमाणे स. सदस्यांना १०० रोज पर्यत सभा संपवायची तेव्हा सर्व स. सदस्यांना विंनती की, सर्वानी सहकार्य करन ही सभा आनंदात पार पाडावी तसेच दिवाळी निमित सर्वाना माझ्या शुभेच्या आता विषय क.१ ला सुरवात करण्यात घावी.

श्री. रशि (मामु) : शुक्रवार दिवस हा नमाज पढण्यासाठी स. जावे लागते व आता पर्यत शुकवाराला कधिच सभा झाली नाही. तेव्हा याची नोंद घ्यावी.

मा. महापौर : या पुढे शुकवारला सभा होणार नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : इतिवृतात पान क्र. २६ ऐनवेळचा विषय क. २ बाबत दुरस्ती व्हावी.

श्री. रशिद (मामु) : सभागृहात ऐनवेळी शिपाया मार्फत काहीही स. सदस्यांना पॉकेट मध्ये दिल्या जाते. ऐनवेळचा विषयही असाच वाटत केला जातो. त्यामुळे स.

सदस्यांना वाचवयास सुध्दा मिळत नाही. याची संबंधित अधिका-यांनी दखल घ्यावी. व मा. महापौर यांनी खुलासा करावा. ऐनवेळाचा विषय सुध्दा एक दिवस अगोदर का दिल्या जात नाही.

( या वेळी सभागृहात स. सदस्यांचे आपआपसात सारखा आवाज होत असतो. काहीही ऐकु येत नाही.)

श्री. अभिमन्यु भालेराव : माझी अशी विनंती की, गेल्या सहा महिन्यापासुन अनेक प्रश्न या ठिकाणी रेगाळत पडलेले आहेत, माझ्या माहिती प्रमाणे की जे शहराच्या विकासाशी संबंधित आहे व जनतेच्या भावनांशी निगडा्त आहेत या बाबत सभागृहात चर्चा करावी. आणि एक स. सदस्य सभागृहात बोलत असंताना दुसऱ्यांनी वेगळेच काही मुददे उपस्थित करुन सभागृहात गोधंळ व गडबड कर नये. त्यामुळे वेळ वाया जातो. आम्ही या ठिकाणी दलीतांचे प्रश्न सोडविण्यासाठी व प्रलंबीत कामे सोडविण्यासाठी या ठिकाणी एकत्रित येवुन बोलता व ते सर्वानी समजुन घेवुन सभेचे कामकाज चालवावे, अन्यया सभागृहात गडबड करन विकासाची कामे होणार नाहीत व अशाच प्रकारे स. सदस्यांच्या गोघंळामुळे आम्हालाही कामे राजीनामे देवुन मोकळे व्हावे लागेल यासाठी स. सदस्यांना विंनती की, सर्वानी विकास कामा बाबत सभागृहात प्रश्न मांडुन आपले मत मांडावे वेळ बरबाद कर नये.

श्री. जयवंत ओक : विरोधी पक्ष नेत्यानी आपल्या कडील सर्व स. सदस्यांनी सभागृहात कसे बोलावे या बाबत सुचना दयाव्यात एकदा एका स. सदस्यांनी बोलण्यात उभे राहीले. असता दुसया स. सदस्यांनी मध्येच बोलण्यात सुरवात कर नये. सर्वानी सभागृहात शांततेने व चांगले चालावे याची दक्षता घ्यावी. मी सुध्दा सभागृहानेता म्हणुन माझे कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रयत्न करतो, माझे कडील स. सदस्य असे काही मध्येच बोलुन सभागृहात गडबड करणार नाहीत. तसे विरोधी पक्षा कडील स. सदस्यांनी लक्षात घ्यावे. व मा. महापौरांना सहकार्य करावे महापौरा पुढे काहीही बोलुन व आसना समोर जाऊन बोलणे योग्य नाही. नसता अशा स. सदस्यांना सभागृहात बाहेर काढावे अशी मी करतो कारण विरोंधी सदस्य शिस्तीने वागत नाहीत.

श्री. रशिद मामु : स. सदस्य जे काही बोलतात ते खोटे आहे यांच्या काही कुठाचे घरातले राज नाही. मा. महापौरांनी मागील बैठकीत असे आश्श्वासन दिलेले होते की, स्व, मोरारजीभाई देसाई यांच्या पुतळया संदर्भिय प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात येइल व तशी इतिवृतात नोद ही झालेली नाही. याचे कारण काय. स. सदस्य जयवंत ओक यांनी काढलेल्या उद्‌गारा बाबत सभागृहात माफी मागावी त्यांनी म्हटले की, विरोधी सदस्य सभागृहात शिस्तीने वागत नाहीत.

श्री. जयवंत ओक : मी माफी मागायला तयार आहे जर सर्व स. सदस्य आपले व्यवस्थित वागत असतील तर व सभागृहात शिस्त पाळत असतील तर

प्रदिप जैस्वाल : सभागृहात सर्वांनी शांतता बाळगावी व सभागृहातील सर्व स.सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : इतिवृतातील पान क.२६ मधिल ऐनवेळचा प्रस्ताव क.२ बाबत अनेक स. सदस्य नाराज आहेत व काही कर्मचारी अधिकारी वर्ग यानी पत्र देवुन विंनती केली की, या प्रस्तावा बाबत स्थगिती द्यावी तेव्हा या बाबत सभागृहात चर्चा करन स्थगिती द्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : या ऐनवेळाच्या प्रस्तावा बाबत स. सदस्यांनी अशी दुरस्ती सुचवावी कारण हा प्रस्ताव मंजुर झालेला आहे व यावर स्थगिती न देता काही स. सदस्यांच्या ज्या काही सुचना असतील त्या सुचना लक्षात घेणे योग्य

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी पत्र देवुन सांगितले आहे की प्रस्ताव क.२ हा चैज करणे बाबतचा आहे व यामुळे इतर कर्मचा-यांचे नुकसान होते यासाठी सरचा प्रस्ताव मंजुर न करता प्रस्ताव बाबत प्रशासनाचे मत आजमावणे आवश्यक आहे केडर चैज करण्याचा अधिकार आपल्याला नाही. शासन पातळीवर तो निर्णय होतो. तेव्हा प्रस्ताव मजुर न करता स्थगिती द्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : सदरचा प्रस्ताव ऐनवेळी प्रशासनाने ठेवलेला होता व त्यांस मंजुरी मिळालेली आहे. व आता शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. फक्त काही स. सभासद चे दुरस्ती सुचना असल्यास त्या सुचवाव्यात.

सौ. लता दलाल : इतिवृत कायम करते वेळेस काही दुरस्ती सुचवायच्या असतील तर त्या करता येतात स. सभासद व विरोधी पक्ष नेता यांनी सागीतले की, ऐनवेळच्या प्रस्तावास स्थगिती घावी. मला सांगयचे आहे की, एकदा प्रस्ताव मंजुर झाला की, इतिवृत कायम करते वेळी फक्त स. सभासदांच्या ज्या काही सुचना असतील त्या सुचना किंवा दुरस्ती करता येतात. इतिवृत कायम करतांना प्रस्तावांस स्थगिती देता येत नाही. तेव्हा हा प्रस्ताव कायम करण्यात यावा.

श्री. रशिद मामु : मागील बैठकीत जसे म्हटले चर्चा झाली परंतु चर्चाचे इतिवृतात नोंद झालेली नाही. जसे की आम्ही म्हटले होते आर आर मध्ये नाही आहे व नियम चुकीचे आहेत हे वाक्य इतिवृतात झालेलेच नाही, हे इतिवृतात न येण्याचे चुक कोणाचे या साठी सभागृहात कोणते स. सभासद काय बोलतात त्याचे वाक्याची नोद इतिवृतात येणे आवश्यक आहे आर आर मध्ये असे आहे की, उधाला ड्रायवडला टेक्नीकल केडर म्हणुन नॉन टेक्नीकलचे काम किंवा जनावराचे डॉक्टरला माणसाचे डॉक्टरचे काम दिले व माणसाला जनावराचे काम सांभाळवायस दिले तर शक्य आहे काय जसे शिन्दे यांना बसविले टेक्नीकल म्हणुन त्यांना त्यांचे मुळ पदावर काम करण्यास बसविले या साठी की सदरचा प्रस्ताव जो आला आर आर प्रमाणे आला आहे काय मागील आयुक्त गौतम साहेबांच्या काळत ब-यांचशा अधिकाऱ्यांनी आर आर बाबत आक्षेप घेतला होता व काही कर्मचा-यांनी कोर्टात धाव घेतलेली आहे व प्रकरण कोर्टात प्रलंबित आहे. मग आज जर आपण केडर चैज केले तर उद्याला कोर्टाचा निर्णया वेगळा आला तर त्यास कोण जबाबदार राहाणार सभागृहात राहील. यासाठी कि प्रशासनाने विचार पुर्वक प्रस्ताव सभागृहात मांडावयास पाहीजे होते. ते त्यांनी बारबाईने पाहीले नाही. त्यामुळे आज कर्मचा-यावर अन्याय होत आहे. व सभागृहात विनाकारण चर्चा होत आहे. जेव्हा प्रस्ताव आणण्यामागे प्रशासनातील कोणत्या अधिकां-यांनी आर आर चा नियम न पाहता प्रस्ताव मांडल त्याचे वर सभागृहात कार्यवाही करावी व सदरची नोद इतिवृत्तात येणे बाबत योग्य त्या सुचना घ्याण्यात.

मुश्ताक अहेमद : सभागृहात जे काही कामकाज चालते व चर्चा घडवुन काही प्रस्तांवाना मान्यता मिळते. त्यास पुर्ण सभागृह जाबाबदार असते. हा ऐनवेळाचा प्रस्ताव

विषय क.२ मंजुर झाला तर संपुर्ण सभागृह जबाबदार राहाणार आहे व त्यांची बदमामी महाराष्ट्र शासना पर्यत होइल की त्यांना आर आर नियम माहित असुनही कोणताही विचार न करता जाणीव पूर्वक प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवितात. असा बदनामीकारक ठराव ना मंजुर करुन परत घ्यावा किंवा प्रस्तावास मान्यता दिण्यास त्यास आमचा विरोध नोदंवावा. उद्या चालुन काही कर्मचारी कोर्टात गेल्यास आम्ही त्यास जबाबदार नाहीत. याची नोद घ्यावी.

मोहसिन अहेमद : स. सभासदांनी सुचना केल्या प्रमाणे प्रस्ताव एकदा मंजुर केल्या नंतर तो रद्द करण्यात येत नसतो. परंतु काही दुरुस्ती असतील तर त्या सचविता येतात मागील सर्व साधारण सभेने असा प्रस्ताव पारित केलेला होता. की, १५-२० वर्षापासुनचे जे कर्मचारी / अधिकारी सतत कार्यरत आहेत त्याना १-२ इनकीमेंट दयावेत असे आर आर मध्ये आहे. पंरतु त्या प्रमाणे काहीही होत नाही. चलतीच्या अधिका-याचे कर्मचा-याच मात्र फावत आहे. या मध्ये जरासाही विचार केला जात नाही. की आर आर च्या नियमान्वये न केल्यास प्रशासनावर आर्थिक भुर्दंड येइल काय किंवा एखादया कर्मचारी / अधिका-याचे काही नुकसान होइल काय याचा सारासार विचारच होत नाही. मनमानी कारभार चालतो. सदरच्या प्रस्तावात स्थाती समितीची अर्थिक बाबतीत मंजुरी आहे काय? अर्थिक बाबतीत कोणतीही मंजुरी न होता प्रशासन बदल घडवु का इच्छिते याची कल्पना येणे आवश्यक आहे. आर आर नियमा बाबत अंमल बजावणी प्रशासन कोर्टात या बाबत गेले असता कोर्टातच प्रशासनातील आस्था विभाग माहिती देते की, आर आर नियमाचे अजुन इतिवृत्त कायम करण्यात आलेले नाहीत. व दुस-या कोर्टात माहीती दिल्या गेली की, आर आर नियम इतिवृत कायम झालेले आहे. असे विधी विभागाकडुन माहिती दिल्या जाते म्हणजे प्रशासनातील अधिका-याकडुन वेगवेगळी माहिती प्रस्तावात होते याचा अर्थ काय यासाठी आर आर च्या नियमास अधिन राहुन अंमल बजावणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे गेली १५-२० वर्षापासुन काम करित असलेले कर्मचा-यांना प्रमोशन व ७-८ वर्षापासुन काम करीत असलेले कर्मचारी व त्यांना प्रमोशन नाही त्यांना वरचा ग्रेड मिळणे चा वेतन श्रेणी व १-२ इन्किमेन्ट देणे आवश्यक आहे. या बाबतची प्रशासनाने कार्यवाही करावी, ही विंनती ज्यामुळे कर्मचा-यांना कर्मचा-याचा हक्क मिळणे त्यांचे वर कोणत्याही प्रकारची नामुष्की होणार नाही याची दखल घ्यावी.

हमिद ताबा : आर आर नियमा बाबत विधी सल्लागाराने आपले मत मांडावे.

जावेद रज्जाक : केडर चैज करणे बाबत एक ड्रायव्हर सुध्दा मागणी करत आहेत. तेव्हा असे करता येणे शक्य आहे काय? जर झाल्यास आपली काही बदनामी होणार नाही याची जबाबदारी घ्यावी यासाठी विधी विभागाचे मत अजमावणे आवश्यक आहे.

मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रस्ताव मंजुर जरी झाला असला तरी प्रस्ताव शासनाकडे पाठविणे पूर्ण विधी सल्लागाराने आपले मत त्यात नोदवूनच नंतर शासनाकडे पाठवावा. असे मला वाटते.

गिरजाराम हाळनोर : प्रस्तावा मंजुर झाल्यांनंतर प्रशासन त्याचे मत मांडुनच नंतर शासनाकडे पाठवितात.

हमिद ताबा : विधी विभागाचा सल्ला घेऊनच प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

मोहसिना बिल्कीस : विधी सल्लागाराने आपले मत देवुनच सदरचा प्रस्ताव शासनकडे पाठवावा. हा प्रस्ताव विधी विभागाकडुन येणे आवश्यक होते. तरीही विधी विभागाने कार्यवाही करावी.

श्री. मिरा सलामी श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : कुणाचेही केडर चैजं करणे असा नियम आहे काय? या बाबत विधी सल्लागाराने आपले मत मांडुनच शासनाकडे पाठवावा.

मा. महापौर : ठीक आहे. मंजुर.

गिरजाराम हाळनोर : इतिवृतातील पान क्र. १९ मध्ये माझ्या वाक्यात जे भंगी बेरोजगार असतील त्यांना प्राध्यान्याने काम घावे असे आहे. सदरील वाक्य स्वच्छता कामगारांच्या बाबतीत असुन मी कोणत्याही जाती बाबत बोललो नाही अशी दुरुस्ती इतिवृतात करावी.

मा. महापौर : ठीक आहे.

नरेंद्र पाटील : सभागृहात स. सभासद श्री. भालेराव व जयंवत ओक यांनी जे विकास कामाबाबत सुचना केल्या त्या योग्य आहेत. पंरतु सभागृहात शुल्लक कारणावरुन विनाकारण जास्तीची चर्चा होते व सभागृहाचा वेळ वाया जातो. तेव्हा सर्व स. सभासदाचे चर्चेत भाग होत असतांना कुठल्याही विकास कामाबाबत सहकार्य असणे आवश्यक आहे. आणि जर काही स. सभासद विकास कामाच्या व्यतिरीक्त इतर मुद्यावर हात घालीत असतील तर मी सभागृहा बाहेर जाईल.

जाहेदा बेगम : अजंटा कोण पाठवितो या मध्ये स. सभासदाचे नाव स्पष्ट दिसत नाहीत.

मा. महापौर : मी सचिवांना सुचना देते.

मोहसिन अहेमद : ऐनवेळाचा विषय क्र.१ मध्ये मनपातील सर्व आरोग्य केंद्र सकाळी ८.३० ते १.३० पर्यत चालु राहाणे बाबत प्रस्ताव मंजुर झाला. तेव्हा या वेळा संबंधित आरोग्य अधिका-यासह सर्व कर्मचारी यांनीही यांच वेळेच हजार राहावे अशी दुरुस्ती व्हावी.

मा. महापौर : ठीक आहे अशी दुरुस्ती करण्यात येते.

रशिद मामु : मागील बैठकीत आपण आश्वासन दिल्या प्रमाणे स्व. मोरारजीभाई देसाई यांच्या पुतळयाचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात येइल परंतु या सभेतील इतिवृतात आला नाही याचे कारण काय? याचा खुलासा व्हावा कुणी जाणुन बुजुन करतो काय?

मा. महापौर : या पुतळया बाबत एक कमेटी गठण करण्यात येइल.

मोहसिंन अहेमद : स. सभासदाच्या सुचने प्रमाणे स्व. मोररजी भाई देसाइ यांचा पुतळा संदर्भात तिन वेळेस चर्चा झालेली आहे. तेव्हा ऐनवेळाचा प्रस्ताव स्विकारावा.

प्रदिप जैस्वाल : कोणता प्रस्ताव घ्यावा व कोणता घेवु नये या बाबतचा अधिकार महापौरांना आहे. तसेच मागील बैठकीत ठराल्या प्रमाणे जे स्लम घोषित करावयाचे प्रस्ताव होते. त्यावर शहरातील एकत्रितरित्या स्लमाचा सर्व्हे करण्यासाठी प्रस्ताव स्थागित ठेवलेला होता तो काढुन घेवुन प्रस्तावास मंजुरी घावी.

नरेंद पाटील : एका वृतापत्रात बातमी प्रसिध्द झालेली आहे कि १ नोव्हे ९५ पासुन शहरात १०% पाणी कपात होणार आहे व गेल्या ६ महिन्या पासुन ३.०० कोटी रुपयेची पाणी पटटी बिले शकीत आहेत याचे कारण काय? यामुळे काय

उपाय योजना करणार आहात? याची माहिती सविस्तरपणे सभागृहात द्यावी.

विजय मेहेर : शहरात ब-याच ठीकाणी नळा व्दारे पाणी रस्त्यावर सतत वाढत असते ब-याच नंळाना तोटया नाहीत. त्यामुळे तोटयांना वेल्डींग करुन का होइना मनपाने त्वरीत कार्यवाही करावी. व वार्डातील नागरीकांनाही पाणी वाचना या बाबत स. सभासद यांनी आवाहन करावे ही विनंती.

नरेंद्र पाटील : पाणी कपात १०% वरुन उद्याला २०% टक्यावर जाइल तेव्हा या बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

प्रफुल्ल मालाणी : स. सभासद सभागृहात इतिवृतात चर्चा न करता ऐनवेळी कोणताही प्रश्न उपस्थित करतात हे योंग्य नसुन सभागृहात वेळ वाया घालुव नये.

( या वेळी शेम शेम च्या घोषणा सभागृहात स. सदस्याकडुन होतात.)

गिरजाराम हाळनोर : स. सभासंदानी सभागृहात चर्चा करण्यापुर्वी महापौरांची परवानगी घेवूनच सुरवात करावी.

नरेंद्र पाटील : पाणी प्रश्नाच्या बाबतीत जर परवानगी घ्यावी लागत असेल तर तुमचे अज्ञान किती आहे हे स्पष्ट होइल.

मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सभासंदानी सुचित केल्या प्रमाणे पाणी बिलाचा खुलासा करावा.

गंगाधर गाडे : स. सभासद श्री. पाटील यांनी चांगला विषय प्रश्न उपस्थित केला दैनिक वृत्तापत्रात बातमी प्रसिध्दीस झाली. या बाबत सभागृहात चर्चा करणेस परवानगी घावी अशी मी विंनती करतो.

मिर सलामी :- मा. महापौरानी अशा ज्वलंत प्रश्नावर चर्चा करण्यास परवानगी घावी.

मा. महापौर :- स. सभासद श्री. नरेंद पाटील यांनी पाण्याच्या प्रश्नाबाबत मुद्दा उपस्थित केला या बाबत विषयपत्रिका संपल्यानंतर वेळ देण्यात येइल.

(या वेळी सभागृहात काही स. सभासद एकाच वेळेस बोलता त्यामुळे काहीही ऐकू येत नाही. )

श्री. गंगाधर गाडे, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. नरेंद्र पाटील :- शहरातील पिण्याचा ज्वलंत प्रश्न आहे. तेव्हा यावर सभागृहात चर्चा व्हावी.

जयवंत ओक :- मा. महापौरांनी निर्णय दिलेला आहे.

( पुन्हा सभागृहात काही विरोधी स. सभासद पाणी प्रश्नावर चर्चा व खुलासा होण्यासाठी ओरडतात.)

मा. महापौर :- सर्व स. सभासदाच्या भावना लक्षात घेता संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पापु.) : आजच्या एका दैनिकात महाराष्ट्र जल निःसारण मंडळाची बातमी आहे. कि १०% पाणी कपात करणार आहे. औरंगाबाद शहरासाठी यापुर्वी गेल्या आठ दिवसपूर्वी आपल्याला पत्र आलेले आहे कि, मागील बिल पेंडींग राहीलेले आपण भरले नाही तर १०% कपात करतील. त्यांचे एकुण थकबाकी २,००८२,५५,६५७-०० ही ऑक्टोबर ९४ ते जुलै ९५ याच महिन्याची थकबाकी आहे. परंतु ज्यावेळी कपातीचे पत्र मिळाले त्याच वेळी मा आयुक्त यांनी अधिक्षक अभियंता जल निःसारण मंडळ यांना पत्र पाठविले कि, दिवाळीनंतर नोव्हेबर मध्ये थकबाकी जवळ जवळ १-०० कोटी रु देणार आहोत. बाकी १०% पाणी कपात करावयाचे ठरविले ते करु नये असे एक विनंतीपत्र पाठविले आहे. त्यामुळे नोव्हेबर मध्ये कपात करण्याचे

बातमी प्रसिध्दीस आली ती होणार नाही व तसे आम्ही प्रयत्नास राहु पाणी कपात होवु देणार नाही.

कचरु नवपुते . १०% पाणी कपात बीलामुळे किंवा पाण्या अभावे होणारे बिले भरण्यास अडचण काय? कार्यवाही पाणी कपात असुन झालेली नाही नोव्हेंबर ९५ मध्ये करणार अभिंयता (पा.पु ) परंतु थकबाकी भरल्यानंतर ते होणार नाही पाणी कपात थकबाकीमुळे करणार होते. पाणी कमी असल्याने नाही.

कार्यकारी अभियंता (पापु.) : पाणी कपात अजून झालेली नाही नाव्हेंबर ९५ मध्ये करणार. परंतु थकबाकी भरल्यानंतर ते होणार नाही पाणी कपात थकबाकीमुळे करणार होते. पाणी असल्याने नाही.

मनमोहनसिंग ओबेरॉय :- इतर सर्व बिले तुर्त स्थगित ठेवावी. तसेच मनपाने पैसे वसुल करावे व पाणीचे बिले त्वरीत भरणार करावीत.

काशीनाथ कोकाटे :- सिडको भागात कोणत्याही सेक्टर मध्ये पाणी वेळेवर येते नाही. रात्री काधीही सोडल्या जाते. व पाणी भरपुर मिळत नाही. तेव्हा पाण्याच्या कपातीवर सिडको भागात काय परिणाम होइल याचा खुलासा करावा.

गिरजाराम हाळनोर : १०% पाणी कपात कसे होणार याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

रशिद मामु :- मागील विशेष पापु च्या सभेस मा. आयुक्त यांनी रु ५०/- लाख जल निःसारण मंडळास पापुचे बिलाचे देणार असे सांगितले होते. आता त्या घडीला जवळपास दिड महिना लोटला तरी त्या मंडळाने असे पत्र का पाठवावे? मुद्यास बदनामीसाठी पत्र पाठविले काय? याचा खुलासा करावा त्यामुळे ब्लॅकमेलींग तर करत नाही ना?

मा. महापौर :- संबंधित अधिका-यांनी खुलसा करावा.

कार्यकारी अभिंयता (पापु ) या विभागामार्फत आम्ही मा. आयुक्त यांना वारंवार सांगते कि, जल निःसारण मंडळाचे बिल एवढे आलेले आहे. परंतु मनपा ची आर्थिक बाब लक्षात घेता. आपण पाच महिने पाणी बिल दिलेले नाही. परंतु आठ दिवसापुर्वी् मा. आयुक्तानी पत्र दिलेले आहे. कि रु १.०० कोटी आपणास देवू त्याच त्यांनी मान्यताही दिली आहे. परतु १०% कपात वगैरे जे आहे ते आम्ही होऊ देणार नाही. एवढी सभागृहात हामी देतो. सिडको बाबत मागील दोन महिन्यात पापु मध्ये कपात होते कमि मिळत होते. तरी ३० ते ४० मिनिटे पा. पु करीत होतो. वेळेत बदल करण्यामागे जायकवाडी येथील पाणी कमी झाल्याने व दुसरी बाब एम आय डी सी कडुन ३ एम एल डी पाणी कमी झाल्याने सिडकोला पापु व्यवस्थित करु शकला नाही मात्र आता ८-१० दिवसापासुन सिडकोला व्यवस्थित पापु करीत आहोत.

कशिनाथ कोकाटे :- कार्यकारी अभिंयता पापु यांनी खुलसा केल्याप्रमाणे सिडको भागासाठी टॅंकरने पापु करण्यासाठी व्यवस्था करावी.

कार्यवाही अभिंयंता :- सिडको एन ५ मघुन टॅकर भरल्या जाते तेव्हा एका टॅकरची व्यवस्था करण्यात येइल.

काशिनाथ कोकाटे :- सिडकोसाठी दोन टॅकरची व्यवस्था व्हावी.

विजय मेहेर :- पाइप लाइन फुटुन पाणी रस्त्यावर वाहात जाते ते थांबविणे आवश्यक आहे. आणि संबंधित झोन अधिकारी आहेत यांना जबाबदार धरावे.

मिर सलामी :-१) पाणी प्रश्नावर पैठणगेट ते दलालवाडी हा शहरातील मध्यवर्ती भाग असुनही येथील नागरीक खडडयातुन पाणी भरतात. या ठीकाणी लोकाना

पाण्यचा खुप त्रास आहे तेव्हा क्रॉस कनेक्शनची परवानगी दिल्यास बराचशा ताण नागरिकांचा कमि होण्याची शक्यता आहे. त्यानुंसार कार्यवाही व्हावी.

श्री. विठठल जाधव :- पाणी प्रश्नावर चर्चा खुप झालेली आहे. स. सभासद व विरोधी पक्षानी पत्र दिल्यानुसार १.०० वाजेपर्यत सभा संपावायची आहे तेव्हा विषय क्र.२ ला नुसार करावी.

गंगाधर गाडे :- एका महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा करीत असतांना सभागृहात मी अशी विनंती करतो. की, मागील विशेष पाणी पुरवठयाच्या बैठकीत जबाबदार अधिका-यांनी पाणी प्रश्न बाबत काय उपाय योजना करण्यात यावर सुचना मांडल्या होत्या व काय आपण करणार आहोत हे सुध्दा सांगितले होते पंरतु त्यावर आजपर्यत काय कार्यवाही झाली याची सभागृहाला आतापर्यत माहिती मिळाली नाही.

२) रु ३.०० कोटी पाणी प्रश्ना बाबत पैसे बाकी आहेत तेव्हा कोणास कारणास्तव पैसे स्थागित ठेवण्यात येत आहेत याचे कारण काय आहे? शहरात इतर ठीकाणी कांरजे उडत आहेत प्रत्येंक ठीकणी आपल्याकडे ऐवढा साठा आहे काय? जर पैसा असेल तर तुम्ही जरूर कांरजे उडवा मला काहीही म्हणावयाचे नाही. शहराचे सौदर्यकारण झाले पाहिजे लोंकासमोर चांगले चित्र उभे राहीले पाहिजे. या बददल कोणाचेही दुमत नाही. परंतु लोकाना येणाऱ्या पाणी पुरवठयातुन जर १०% पाणी कपात होत.असेल तर त्यासाठी आपण अशा प्रकारे उघळण करणे योग्य नाही. आणि वर्तमान पत्रात बातमी प्रसिध्दी झाल्यानुसार त्यांनी प्रशासना ला पत्र दिलेले आहे पंरतु शब्द दिल्या प्रमाणे आमची रक्कम मिळाली नाही असे त्यांनी म्हटले आहे. या संबंधी लोंकांमध्ये सभ्रम निर्माण झालेला आहे. कारण आज शहरात जे काही महत्वाच्या गोष्टी लोकांसमोर आहेत. त्या आहेत प्रचंड हजारे गॅलन पाणी अक्षरश: धो धो रस्त्यावरुन वाहात जात आहे. यापूर्वी स. सभासदानी सांगीतले की ब-याचशा नळाना तोटया नाहीत वगैर त्याही शिवाय अनेक भागामध्ये पाणी धो धो वाहत आहे. यामुळे हजारो कोटी रु शहरातील जनतेला भुर्दड सोसावा लागत आहे. हे योग्य नाही. म्हणुन मला सांगावयाचे आहे की, ज्या काही उपााय योजना मांडल्या होत्या त्या संबंधी अंमल का झाल्या नाही? आणि आपल्याकडे जल नि:सारण मंडळात देण्या इतपत पैसे नसेल तर पाण्याची उधळपटटी तुर्त ती थांबवावी म्हणजे आपल्याला जास्त पैशाच्या भुर्दड पडणार नाही याची कृपया प्रशासनाने दखल घ्यावी अशी मी विनंती करतो दुसरी सुचना म्हणजे सरकार जसे आपल्याला सांगते की, पैसा आलेला नाही त्यावर काही तरी इलाज होणे आवश्यक आहे म्हणुन आपल्या प्रशासनाच्या वतीने, महापालिकेच्या वतीने शहराच्या अवती भोवती ज्या ठीकाणी तलाव आपल्याला बांधता त्या तलावामधुन पाणी घेण्याचा जर आपण प्रयत्न केला तर कायमची ही डोके दुखी आपल्या ला बंद करता येइल आणि त्याच्यात कमीत कमी पैशामध्ये पाणी आपल्याला शहरातील नागरीकाना देता येइल आणि म्हणुन हा विषय अत्यंत प्राधान्याने घ्यावा या शहराच्या अवती भोवती चौका वगैरेचा भाग आहे येथील भौगोलीक परिस्थिती लक्षात घेऊन त्या ठीकाणी तलाव जर बांधुन कोटयावधी रु पये खर्च केले तर त्याचा फायदा राबविण्यात या शहराला होइल त्या दृष्टीने गांभिर्याने विचार व्हावा.

श्रीमती मोहसिना बिलकीस :- काही वार्डात दिवसा तर काही वार्डात रात्रीचे पाणी सारखे वाहत असते. या बाबत इलाज होणे आवश्यक आहे तर काही भागातील विहीरी आहेत त्या नादुरूस्ती व बंद स्थितीत आहेत, त्या त्वरीत दुरूस्ती करुन नागरीकांना पिण्याचे पाण्यासाठी उपयोगात आणता येइल या दृष्टीने विचार होणे गरजेचे आहे, काही ठीकाणी विना तोटयांमुळे पाणी रस्त्यावर सतत वाहत असते त्यावर कार्याल्याने कार्यवाही करावी.

श्री. सुदाम सोनवणे : आताच कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी सांगीतल्या नुसार बिलाच्या थकबाकीमुळे १०% पाणी कपात होणार आहे महापालिकेची आर्थिक परिस्थिती ठीक नसल्याने बिल दिलेले नाही. सिडकोकडे सुध्दा रु ५.०० कोटीची थकबाकी महापालिकेची आहे ती मिळणे आवश्यक आहे. सिडको भागातील प्रत्येक सेक्टर वाईज काही नागरीकांचे कमी जास्त पैसे घेऊन नळाची थकाबाकी वसुल केली तर बरीचशी वसुली होइल. परंतु ज्यांना पाणीच येत नाही त्यांनाही पाणी बिले वाटप होतात या बाबत पाहाणी करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच छावणी कॅन्टोमेन्ट बोर्डाला जो जकात करा बाबत पैसे देणे संबंधित करार केला गेला तशाचा प्रकारचा करार करुन वाळुज एम. आय. डी. सी. मनपा हद्दीत घेणे आवश्यक आहे. औघोगिक परिसरातील कारखानदाराकडुन अशा प्रकारचा करार करुन घ्यावे, ज्यामुळे महानगरपालिका उत्पन्नात भर पडेल याचा विचार व्हावा.

श्री. नरेंद्र पाटील :- कार्यकारी अभिंयता यानी खुलासा केल्या प्रमाणे महानगरपालिकेची गेल्या ५-६ महिन्यांपासुन आर्थिक स्थिती बरी नाही याचे कारण शोधले तर ही परिस्थिती अशीच बिघडत जाणार व १०% चे २०% पाणी कपात होइल. गेल्या १० वर्षात अशा कुठल्याही प्रकारची स्थिती निर्माण झालेंली नव्हती. माझ्या माहिती प्रमाणे मी सांगु इच्छितो की, दि. १५ मार्चला म्हणजे महानगरपालिकेची निवडणुक होणे पूर्वी एक महिना अगोदर आपल्या आयुक्तानी करोडी रुपयांचे कामाचे टेंडर काढुन मंजुर केलेले आहेत. व त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजुक झालेली आहे.

श्री. गंगाधर गाडे :- स. सभासद श्री. नरेंद पाटील यांनी सुचना केल्याप्रमाणे खरे आहे की. आवश्यक ते शिवाय करोडो रुपये बिन कामावर जास्त पैसा खर्च झालेला आहे. त्यामुळे पाण्याच्या पोटी थकबाकी देता आली नाही. रुपये ४० कोटीचे आवक व रु ६५ कोटीचे कामे देण्यात आले ते शक्य नसुन केवळ पब्लीसिटीच्या कामासाठी हे सर्व होत आहे आणि जनतेला धारेवर धरण्याचा प्रयत्न होत आहे.

मा. महापौर :- संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभिंयता (पा.पु.) :- आर्थिक बाबतीत मला कल्पना नाही तेव्हा संबंधित अधिका-यांनी खुलसा करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. संजय जोशी :- महानगरपालिकेतील हद्दीत ज्या विहारी आहेत त्यावर अतिक्रमण झालेले आहे ते हरवुन त्याचे संरक्षण करावे व लोकाना पिण्याच्या पाण्याचा उपयोगासाठी खुले करावे.

श्री. गंगाधर गाडे :- जनतेच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे अजिबात लक्ष नाही. अवाश्यक व सौदर्याकरणावर जास्त भर दिला जात आहे ते योग्य नसुन आयुक्तांच्या खुर्चिवर विराजमान असलेले अधिका-यांनी याचा खुलासा करावा.

उप-आयुक्त-२ :- महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कोलमडली आहे असे स. सभासदांनी सुचित केले, ज्यानुसार मख्य लेखा परिक्षकांनी खुलासा करावा.

(यावेळी सभागृहात स. सभासदांमध्ये आपसात आवाज होतो काहीही ऐकु येत नाही.)

मा. महापौर :- स. सभागृहात विनंती की, सभागृहात सर्वांनी शांतता बाळगावी, अन्यथा बाहेर काढणे बाबत सुचना देण्यात येइल.

मुख्य लेखा परिक्षक :- महानगरपालिकेची स्थिती बिघडलेली आहे ज्या बाबत सत्य परिस्थिती आपल्या समोर आहे. पहिला मुद्दा जो उपस्थित केला की, माहे एप्रिल मध्ये ४० कोटीची टेंडर काढलेत, परंतु तसे काहीही केलेले नसुन साधारण ७-८ कोटीचे टेडंर काढलेले होते आणि या कामाची बिले वर्क ऑर्डर प्रमाणे वर्षभरामध्ये येणार आहेत. कारण त्यांचे टाइम लिमिट हा वेगळा आहे. उदा. ५.८.३ महिन्यात आहे. सध्या जो आर्थिक प्रेशार आलेला आहे. महानगरपालिकेच्या तिजोरीवर हे प्रामुख्याने आपल्या मालमत्ता कराची व पाणी पटटी वसुली मध्यंतरी कमी झालेली असल्याने व पाणी उत्पन्नामध्ये व खर्चामध्ये फार मोठया प्रमाणात तफावत येत आहे. साधारण ८.०० कोटीचा तोटा महानगरपालिकेला सोसावा लागत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे जल निःसारण मंडळास थकबाकी पैसे न भराण्यचे आहे. यासाठी आपल्या सर्वाचे सहकार्य प्रशासनाला आवश्यक आहे. कारण या वर्षी महानगरपालिका आर्थिक सकटातुन बाहेर येऊ शकणार नाही. तसेच या वर्षी दोन महिन्यापुर्वी अमरप्रितच्या लॅड एकवीडेशन साठी १ कोटी ६० लाख रुपये कोर्टात भरावे लागले. कोर्टाच्या आदेश प्रमाणे सध्या थोडी ही परिस्थिती सावरत आहे. दिवाळीपुर्वी् कर्मचा-यांना साधारण एक कोटीचे बोनस आणि थकबाकी दिलेली आहे. काही कॉन्ट्रक्टराचे रुपये दोन कोटीचे बिले या माहिन्यात काढलेली आहेत. आणि या पुढील दहा पंधरा दिवसात जे काही कलेक्शन होईल त्यामध्ये कर्मचा-यांचे पगार व विघुत मंडळ व जल मंडळाची थकबाकी भरणार आहेत. पुढील दोन महिन्यात प्राधान्याने जी पाण्याची थकबाकी आहे तीच भागाविण्याचा महानगरपालिकेचा विचार आहे.

श्री. मोहसिन अहेमद :- महानगरपालिकेचे निवडणुक जाहीर होण्यापुर्वी आयुक्तांनी कामाचे टेंडर काढणे योग्य नव्हते कारण काय? त्यांचा नविन येणा-या नगर सेवकांवर विश्वास नव्हता काय? काय कारण आहे. पाण्याची व विद्युत बिलाची थकबाकी न देता टेंडर काढुन कामे करण्यास मंजुरी का दिली गेली याचा खुलासा व्हावा. आता तर डांबरीकरणाचा दरही दिवसे दिवसे वाढत आहे. बरीचशी टेंडर मागवुन व एजन्सी फिक्स करुन सर्व पैसा संपवलेला आहे. तेव्हा थकबाकी न भरता एजन्सी फिक्स करण्याची काय आवश्यकता होती? सभागृहातील सर्व नगर सेवक आम्ही सांगु इच्छितो की, पाणी दरवाढ एकही पैसा या वर्षापासुन होवु देणार नाही, याची नोदं ध्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :- मुख्य लेखा परिक्षकांनी जो खुलासा केला त्यास मी सहमत नाही कारण जे कोणतेही काम होते त्याचे बजेटमध्ये प्रोव्हीजन करुनच केल्या जाते. या व्यतिरिक्त महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिघडली यांचे मुख्य कारण प्रशासन आहे. आम्ही त्या बाबत विचारणा करु प्रशासकांनी जो काही पैसा खर्च केला तो चुकीने खर्च केला आहे. बजेटमध्ये जे काही प्रोव्हीजन असते, त्या प्रमाणे खर्च कारणे आवश्यक असले, त्या व्यतिरीक्त खर्च करणे प्रशासनाच्या दृष्टीने बाब योग्य नाही.

कर्मचा-यांचे पगार बोनस बाबतही बजेट मध्ये प्रोव्हीजन असते. काही गैरव्यवहार काही करीत नाही, तर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब होण्याचे कारण बजेंट च्या व्यतीरीक्त जादा कामांना मंजुरी देवुन पैसा खर्च करणे होय. त्यामुळे परिस्थिती दिवसोंदिवस बिघडत चालली.

श्री. प्रदिप जैस्वाल :- पाण्याच्या संदर्भात चर्चा होत असतांना, पाणी पुरवठा बाबत रु २.८२ कोटी महानगरपालिकेला थकबाकी पोटी भरावयाचे आहेत, आणि त्यामुळे महानगरपालिकेला तोटा होत आहे त्यासाठी सभागृहात विनंती आहे. की, वर्षभरात रु ५.०० कोटी पर्यन्तची थकबाकी होणार असुन या कामी काहीतरी मार्ग काढणे आवश्यक आहे, एकदा मोठा पैसा कोठुन आणणार आपल्याकडे महानगरपालिका वार्डात बराचसा खर्च पाणी पुरवठयाच्या व्यवस्थेकडे करीत आहे. आपला बजेंट रु ६७ कोटी चा असुन रु ४५ कोटीच्या जवळपास बजेट आहे फक्त कागदावर रु ६७ कोटी दर्शविण्यात आलेला आहे तो कसा मला माहीत नाही आणि त्यामुळेच महानगरपालिकेच्या विविध कामाचा खर्च करावा लागणार आहे.

श्री. अभिमन्यु भालेराव :- एम.आय.डी.सी एरीया चिकलठाणा या भागात दोन प्रकारच्या पाइप लाइन आहेत. एक एम.आय.डी.सी व दुसरी महानगरपालिकेची या दोन्ही नळाचे कनेक्शन ज्या वेळेस चालु होते. एम.आय.डी.सी एरीयाची जी पाइप लाइन आहे ती पुढीत चोकअप झालेली आहे. आणि ती चोकअप असल्यामुळे त्यावर निरीक्षण कुणाचे असावे, जे की महानगरपालिकेची पाइप लाइन आहेत व दुसरीकडे कारखान्याचे घाण पाणी पाइप व्दारे वाहतात त्याचे निरिक्षण कुणी करावे याचा खुलासा करावा.

सौ. अलका पाटील :- औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठया बाबत आपण चर्चा करीत आहोत कितीही चर्चा केली तरी वेळ आपल्याला अपुराच पडणार असुन या कामी पाणी पुरवठयावर चर्चा करण्यासाठी एक तातडीची बैठक बोलावली तर बरे होइल. कारण यामुळे विषयावर चर्चा होत नसुन फक्त पाण्यावरच चर्चा होत आहे. कृपया याकडे लक्ष यावे.

श्री. अब्दुल जावेद रज्जाक :- अनेक स. सभासदांनी चर्चेत भाग घेतला व सुचना मांडल्या त्या प्रमाणे पाणी पुरवठया बाबत कपात न करता, उलट शहरातील पाणी पुरवठा जास्तीचा कसा करता येइल याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

श्री. गंगाधर गाडे :- मुख्य लेखा परिक्षकांनी या ठिकाणी काही प्रश्नाचा खुलासा केल्याचे समजते त्यानीं कबुल केलेले आहे. सभागृहामध्ये की, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही तेव्हा मी सभागृहाला विनंती की, ही महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिघडण्यासाठी कोण कारणीभुत आहे. यासाठी जबाबदारी फिक्स करा व यासंबंधीचा जाब सबंधित अधिकाऱ्याकडुन घेतला पाहिजे. मी आपल्या लक्षात आवुन देवु इच्छितो की, यापुर्वी महानगरपालिकेच्या निवडणुका घेण्याआधी नोटी फीकेशन निघाल्यानंतर देखिल विविध कामाचे टेडंर काढण्यात आले. ते सर्व टेडंर बेकायदेशिर आहेत एकदा नोटीफीकेशन निघाले कि टेडंर काढता येत नाही. परंतु लोक प्रियतेसाठी कायदेशिर बाबी बाजुला देवुन करोडो रूपयाचे बजेट त्या कामासाठी लावण्यात आला. आजची महानगरपालिकेची परिस्थिती बाबत सभापतींनी कबुल केलेले आहे. अनेक कॉन्ट्रॅक्टरनी विविध कामे करु नाही सणासुदीच्या काळात सुध्दा त्यांचे बिले मिळालेली नाहीत ते

रडायला लागलेले आहेत. त्यांना सण साजरा करता येत नाही ते केवळ सांगातात की, महानगरपालिकची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. स.नगरसेवक व नगरसेविका आपआपल्या वार्डातील खोटे खोटे कामे घेऊन जातात तेव्हा प्रशासन वरील कारण सांगुन मोकळे होते. म्हणजे स. नगरसेवक बदनाम होत आहेत. दुसरी गोष्ट महानगरपालिकेकडुन टॅक्स वसुल होत नाही असे सांगण्यात आले याचे कारण काय? टॅक्स वसुल का होत नाही? यास जबाबदार कोण आहे? सर्व झोनचे टॅक्स वसुल करणारा अधिकारी हा लायक आहे काय? टेक्नीकल माहितीचा आहे काय? त्या घरा संबंधीचा टॅक्स लावलेला आहे तो योंग्य रीत्या आहे काय? याची पछताळणी करुन शहानिशा करणारा अधिकरी टेक्नीकल रित्या आहे काय? याची प्रशासनाने काळजी घ्यावयाची असते माझ्या मते टॅक्स लावणे व वसुली करीत असतांना कमी जास्त करणे बाबतीचे अधिकारा बाबत जो कोणी अधिकारी लायक आहे, तो लायक आहे ज्ञानाचा नाही एखादयावर अन्याय होतो तर एखादयाचा फायदा होतो त्यामुळे टॅक्स देखिल मागे पडलेला आहे. शहरात हजारो लोकांना जास्तीचा जादा टॅक्स आकाराण्यात झाला तर दुसरीकडे ब-याच घंराना टॅक्स लावलेला नाही हे केवळ जे अधिकारी श्री. अंभोरे म्हणुन ते या कामाचे लायक नाहीत त्याची चौकशी झाली पाहिजे. या अधिका-याला ख-या अर्थाने टेक्नीकल ज्ञान नसल्याने काहीही समजुन घेऊ शकत नाही. आणि म्हणुन शहरा मधला टॅक्स अजुनही पाहीजे तेव्हढा वसुल झालेला नाही. पाण्याचाही पाणी पट्टी शहरातील वसुल झालेली नाही. या सर्वासाठी जबाबदार कोण आहे? त्या त्या झोनच्या अधिका-यावर जबाबदारी टाकल्या नतरही टॅक्स वसुल न झाल्याने काय कार्यवाही केली? त्यांना त्यांची योंग्य शिक्षा का देण्यात आली नाही. याचा खुलासा झाला पाहीजे. याचा अर्थ उद्याच्या पेपरला बातमी येइल व दिवस निघुन जाइल पून्हा जैसे ये असे होता कामा नये. आजच्या दैनिक वर्तमानपत्रात पाण्याबाबत बातमी आली ती मी वाचुन दाखवतो. ( बातमी वाचुन दाखवतात. ) महानगरपालिकेने पाणी बिले गेल्या दोन वर्षापासुन भरलेले नाहीत. त्यांनंतर महानगरपालिकेला पत्राने सांगुन सांगूनही ते सारखे टाळाटाळ करतात. व तीन महिन्यापूर्वी रु. ५० लाख हप्त्याने देवु असे पत्राने कळविले परंतु तीही रक्कम अद्याय मिळालेली नाही. आता काही अधिका-यांनी अंत्यंत चुकीचा खुलासा केला, यासाठी प्रशासनाने जागृक राहाणे आवश्यक आहे, नसता नगरसेवकांची बदनामी सतत होत राहील. अंत्यंत चुकीचे टॅक्स आकारणी केल्या जाते. उदा. घरामध्ये भाडेकरु नसला तरी भाडेकरु म्हणुन टॅक्स लावल्या जाते व त्यामुळे वसुली होत नाही. तेव्हा पूढे न जाता यावर कार्यवाही झाली पाहीजे, खुलासा झाला पाहिजे.

मा. महापौर :- स. सभागृह आता पाणी प्रश्नाबाबत बऱ्याचशा स. सभासंदानी चर्चा केली. पाणी कपात व टॅक्स बाबत गांभीर्याने लक्ष देइल पाणी कपात कदापीही मी होऊ देणार नाही विशेष करुन त्यात लक्ष घालीन असे मी आश्वासन देते.

श्री. वसंत देशमुख :- स.स.जी जे लेखी लिहून विविध विभागांच्या कामाच्या संदर्भात देतात त्यावर प्रशासन त्वरित कार्यवाही करते काय याचा खुलासा व्हावा.

सौ. लता दलाल :- आताच कर आकारणी बाबत स. सभासंदानी चर्चा केली. त्या नुसार ब-याचशा घरांना कर आकारणी चुकीची लागलेली आहे. व त्यामुळे आक्षेप

नोदवून हेरीग घेतल्या जाते की, बाजुचे घर किंवा समसमान घरांना टॅक्स सारखाच आकारला जावा. परंतु तसे होत नसुन हेरीग करीत असतांना त्यांच ठीकाणी कागदपत्रे पाहुन निर्णय होवुन कार्यवाही व्हावी जेणे करुन वसूलीत वाढ होइल.

मा. महापौर : पाणी कपाती बाबत मी आताच सुचना केलेली आहे. तेंव्हा पाणी कपात होवु देणार नाही. व संबंधीत अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येइल याची मी दखल घेइल व याच बरोबर विषय क्रमांक -१ मंजुर करण्यात येते.

ठराव :

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र. १९ मध्ये जे भंगी बेरोजगार असतील त्यांना प्राधान्याने काम द्यावे असे आहे. सदरील वाक्य स्वच्छता कामगांराच्या बाबतीत असुन कोणत्याही जाती बाबत बोललेले नाही अशी दुरुस्ती करण्यात येते.
२) महापालिकेतील सर्व आरोग्य केन्द्रे सकाळी ०८.३० ते दु १.३० पर्यन्त चालु राहतील याच वेळेत आरोग्य आधिकारी व त्यांचे कर्मचारी वर्ग वेळेवर उपस्थित राहावे अशी दुरुस्ती करण्यात येते.
३) थकीत पाणी बीलामुळे शहरातील १०% पाणी कपात होणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी व थकीत बिले वेळेवर का भरलेले नाही या बाबत चौकशी करण्यात येइल. या व इतर दुरुस्त्यासह दि. ५-९-९५ रोजी संपन्न झालेली विशेष सर्वसाधारण सभा तसेच दि. १६-९-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५/२ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजने (जुनी हद्द) ५० फुट रुंद रस्ता किले अर्क ते लोहार गल्ली सिटीचौक या रस्त्याचे न.भु.क्र. ३९९४ ही अंशतः बाधीत झालेली आहे. सदर रस्त्याने या मिळकतीतुन सुमारे ९८२.०० चौ.मी. क्षेत्र बाधीत होते. अर्जदाराने बाधीत क्षेत्र संपादन करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे, वरील रस्त्यावरील वाहतुक लक्षात घेता आणि अर्जदाराने दिलेली खरेदी सुचना लक्षात घेऊन सदरील न.भु.क्र. ३९९४ मधुन बाधीत होणारे क्षेत्र संपादन करुन या भुसंपादनास येणाऱ्या खर्चास मंजुरी देणे योग्य पस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. मोहसिन अहेमद : सदरचा विषय आता ज्या विविध सब कमिटया गठीत झालेल्या आहेत त्यांचे सदरचा विषय घ्यावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : सब कमिटयांचे कामकाज अद्यापही सुरु झालेली नाही. तेव्हा आताच विषय पाठविणे योग्य नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : विषय क्रमांक -२ मंजुर करावा. (काही स.सदस्य मंजुर असे ओरडतात)

मा. महापौर : सर्व स.सदस्यांना सांगावयाचे आहे की, सब कमिटयांचे गठण होवुन आज चौथा दिवस आहे. आणि त्याच्या अगोदरच आजचा अजंडा तयार झाला आहे.

श्री. गंगाधर गाडे : या प्रस्तावातील संबंधी प्रशासनाला किती खर्च अपेक्षित आहे याची माहिती द्यावी.

श्री. रशिद खान (मामु) : प्रस्तावास आमची सुचना लक्षात घ्याव्या या बाबत अगोदर विधी सल्लागार यांचा अभिप्राय सभागृहात देण्यास यावा (या वेळी सभागृहात आपसात बोलण्याचा एकच आवाज होत असतो काहीही ऐकु येत नाही.)

मा. महापौर : सर्व स.सदस्यांना विनंती की, सभागृहात शांतता बाळगावी कुणीही गडबड करु नये नसता संबंधीत नगर सेवकांना बाहेर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

श्री. रशिद खान (मामु), श्री. हमीद ताबा : प्रस्ताव मंजुर न करता अगोदर विधी सल्लागारांचा सल्ला मागवावा (या वेळी विरोधी पक्षाच्या बाका वरील अनेक स.सदस्यांचा सारखा आवाज चालु असतो काहीही ऐकु येत नाही.)

मा. महापौर : मी दुसऱ्यांदा वॉर्निंग देते की, सभागृहात सर्व स. सदस्यांनी शांतता बाळगावी गडबड केल्यास त्यांना बाहेर काढण्यात येइल (तरीही सभागृहात विरोधी पक्षाकडील स.सदस्य व सत्ताधारी पक्षातील स.सदस्यांचा सारखा आवाज चालुच असतो काहीही ऐक येत नाही.)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजने (जुनी हद्द) नुसार ५० फुट रुंद रस्ता किले अर्क ते लोहार गल्ली सिटी चौक या रस्त्याने न.भु.क्र. ३९९४ ही अंशतः बाधीत झालेली आहे. सदर रस्त्याने या मिळकतीतुन सुमारे ९८२.०० चौ.मी. क्षेत्र बाधीत होते. अर्जदाराने बाधीत क्षेत्र संपादन करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे. सदरची खरेदी सुचना लक्षात घेऊन न.भु.क्र. ३९९४ मधुन बाधीत होणारे क्षेत्र संपादन करुन या भुसंपादनास येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६/३ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजने नुसार ३० फुट रुंद रस्ता हॉलिडे कॅप रेल्वे स्टेशन रोड ते बन्सीलालनगर (उमाजी कॉलनी ) या रस्त्याने बाधीत होणाऱ्या न.भु.क्र. १९२८२/१ च्या मिळकतधारक यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे.

तथापी याच रस्त्याने वरील मिळकती व्यतिरिक्त चार मिळकती (न.भु.क. १९२८२, १९२८३, १९२८४ व १९२९९ बाधीत होतात, त्यासुध्दा संपादन केल्यास हॉलीडे कॅम्प रे. स्टेशन रोड ते बन्सीलाल नगर (उमाजी कॉलनी) हा संपुर्ण रस्ता विकसित होवुन वाहतुकीस खुला होइल. तरी खरेदी सुचना दिलेल्या मिळकती बरोबरच वरील चार मिळकतीतुन बाधीत होणारे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) अन्वये भुसंपादन करणे आणि सदर प्रकरणात येणाऱ्या भुसंपादन खर्चास मंजुरी देणे योग्य, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजने नुसार ३० फुट रुंद रस्ता हॉलिडे कॅम्प रेल्वे स्टेशन रोड ते बन्सीलालनगर (उमाजी कॉलनी ) या रस्त्याने बाधीत होणाऱ्या न.भु.क्र. १९२८२/१ च्या मिळकतधाररक यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे.

तथापी याच रस्त्याने वरील मिळकती व्यतिरिक्त चार मिळकती न.भु.क. १९२८२, १९२८३, १९२८४ व १९२९९ बाधीत होतात, त्यासुध्दा संपादन केल्यास हा संपुर्ण रस्ता विकसित होवुन वाहतुकीस खुला होइल. तेंव्हा बाधीत होणारे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६(४) अन्वये भुसंपादन करणे आणि सदर प्रकरणात येणाऱ्या भुसंपादन खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चिकलठाणा येथील गट नं ४१०/पी संपादीत जागेवर आठवडी बाजारा करिता ओटे, खडी रस्ता व सुची नुसार रक्कम रुपये १०.००/- (दहा लाख) लाखाचे अंदाज पत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. १७-८-९५ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रुपये १०,०००,००/- लाखाचे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर खर्च आठवडी बाजार विकसित करणे व आवश्यक सुविधा पुरविणे या सदरातुन करण्यात येइल. (या वेळी सभागृहात विरोधी व सत्ताधारी पक्षाच्या स. सदस्यांचे एकच आवाज घुमत असतो काहीही ऐक येत नाही.)

संवाद
मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा येथील गट नं ४१०/पी संपादीत जागेवर आठवडी बाजारा करिता ओटे, खंडीरस्ता व पाण्याच्या टाक्या बांधण्याच्या कामासाठी सा.बा. खात्याचे सन १९९४-९५ चे जिल्हा दर नुसार रु. १०.०० लाख खर्च करुन आठवडी बाजार विकसित करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८/५ :**

मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव मांडला की, औरंगपुरा येथे बलवंत वाचनालयासमोर महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा वाहतुक बेटात बसविण्यात आला आहे. सदरील पुतळा ज्या आधारावर(          ) बसविण्यात आला आहे. त्या आधाराची उंची व जाडी पुतळयाच्या प्रमाणात नाही. हा आधार पुतळयाच्या तुलनेत मोठा असल्याने पुतळा चटकन नजरेत भरत नाही, तसेच आधाराचे बांधकाम आशा तऱ्हेने आहे की, वाहतुकीच्या दृष्टीने अडचण होत आहे, कारण या अधाराचा अडथळा वाहनधारकांच्या दृष्टीस होत असल्याने अपघात होण्याची शक्यता नाकरता येत नाही. तसेच वाहतुक बेटाची जास्तीत जास्त जागा या आधाराच्या बांधकामानेच व्यापली आहे.

तरी सदरील पुतळा सुयोग्य उंचीवर व सुयोग्य आधारावर बसविल्यास येथील वाहतुक बेटाची शोभा वाढेल व या वाहतुक बेटाचे सौदर्यीकरण करता येइल.

तरी कृपया पुतळयाच्या आधाराची उंची सुयोग्य व्हावी. त्या करिता पुतळा हलविण्याची मिळावी व सदरील काम कौशल्याने करावयाचे का असल्याने व सौदर्याकरणाच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने या कौशल्याने करावयाचे तत्सम स्वरुपाची कामे तज्ञ व अनुभवी कारगीरामुळे ( Turn key basis) वर करुन घेण्यात येतील व सदरील वाहतुक बेटाचे सौदर्यीकरण करण्यात येइल. या कामासाठी सुमारे एक लाख रुपये खर्च होतील असा प्राथमिक अंदाज आहे. कृपया प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा येथे बलवंत वाचनालयासमोर महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा वाहतुक बेटात बसविण्यात आला आहे. सदरील पुतळा ज्या आधारावर बसविण्यात त्या आधाराची उंची व जाडी पुतळयाच्या प्रमाणात नाही, त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने अडचण येत आहे व अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही, या साठी पुतळयाच्या आधाराची उंची सुयोग्य व्हावी व पुतळा हालवुन तेथील वाहतुक बेटाचे सौदर्यीकरण करता येइल यासाठी तज्ञ व अनुभवी कारागीर ( Turn key basis) वर करुन घऊन वाहतुक बेट सौदर्यीकरण करणेच्या कामासाठी लागणाऱ्या रु. १.०० लाख (एक लाख) खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/६ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) विभागा मार्फत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, मो. इंदीरानगर ही घोषित गलीच्छ वस्ती आहे. या सर्व गलीच्छ वस्तीपैकी दक्षिण भागातील नैसर्गिक उतार या गलीच्छ वस्तीस लागुन असलेल्या बाबुलाल बसैय्येनगर या मंजुर रेखांकनाकडे असल्याने पावसाचे पाणी, सांडपाणी,

संवाद

श्री. मोहसिन अहेमद : सदरचा विषय सब कमिटीमार्फत ठेवण्यात यावा.

मा. महापौर :स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे या पुढे दखल घेण्यात येइल. तत्पुर्वी विषय क्र. ६ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. इंदीरानगर बायजीपुरा येथील बाबुलाल बसैय्येनगर येथील एकुण १७८.०० स्क्वेअर मिटर जागा ड्रेनेज लाइन टाकणे करिता संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०/७ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेत २० फुट पोस्ट ऑफीस बेगमपुरा हा रस्ता २० फुट रुंद करावयाचा प्रस्ताव आहे. तथापी आज जागेवर हा रस्ता जवळपास तेव्हाच मिळत असुन त्याचे पुर्व व पश्चिम टोकासच अरुंद आहे. आजचे स्थितीत पुर्वे कडील टोकाजवळ हा अत्यंत अरुंद असुन तेथील सि.स.न.१३१४, १३१३, १३०८, १३०९, १३०७ व १३०६ मंजुर विकास योजनेचे प्रस्तावानुसार संपादित केल्यास रस्ता खुला होवु शकतो तरी वरील प्रमाणे भुसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक न नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) अन्वये करावयास व त्यास येणाऱ्या खर्चास मंजुरी देणे योग्य राहील सबब प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : नगररचना विभागाचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे पुर्वी सर्व सभागृहाला त्याची सविस्तर टिप्पणी नकाशासह ठेवावा म्हणजे स. सदस्यांना कोणतीही अडचण येणार नाही वा सभासदांच्या भावना दुखावणार नाही याची दखल घ्यावी.

श्री. जयवंत ओक : सदरचा प्रस्ताव प्रशासनाचा आहे त्यामुळे कागद पत्रांची व सविस्तर पाहणी करुनच प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : कोणत्याही धार्मिक स्थळांना न हलविता संबंधीत वार्डातील नगर सेवक व पदाधिकारी यांना सोबत घेऊनच प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : या बाबत सहाय्यक संचालक, नगररचना यांनी खुलासा करावा.

सहा संचालक नगर रचना : दोन्हीही प्रस्तावा बाबत सभागृहात ८२ स.सदस्यांना प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत भुसंपादीत जागेची माहिती नकाशा सहीत पुरवठा करणे बाबत सदरील विकास योजना सन १९६९ ची असुन ती आताची नाही, तरी ती जागा विकसित करण्यासाठी रद्द समजण्यात येइल करीता प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. गंगाधर गाडे : संबंधीत जागा भुसंपादन करणेसाठी एकंदरीत प्रशासनास किती खर्च अपेक्षीत आहे याची माहिती द्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. मोहसिन अहेमद : सदरचा प्रस्ताव अनाधिकृत असुन प्रस्तावपुर्वी नकाशा सहीत सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे.

सौ. लता दलाल : किती कालावधी पर्यंत संबंधीत भुसंपादन धारकास पैसा देण्यात येइल याची माहिती द्यावी.

सहा संचालक नगररचना : किमान एका महिन्यात संबंधीत जमीन मालकास पैसा देणे बाबत कार्यवाही होईल.

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेत २० फुट (पोस्ट ऑफीस गल्ली) मो. बेगमपुरा हा रस्ता २० फुट रुंद करावयाचा असुन जवळपास तेव्हाच हा रस्ता मिळत असुन त्याचे पुर्व-पश्चिम टोकास अरुंद आहे आजचे स्थितीतील पुर्वेकडील टोकाजवळ हा अरुंद रस्ता असुन तेथील सि.स.न.१३१४, १३१३, १३०८, १३०९, १३०७ व १३०६ मंजुर विकास योजनेच्या प्रस्तावानुसार संपादित केल्यास रस्ता खुला होवु शकतो.

तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) अन्वये बाधीत होणारा रस्ता भुसंपादन करण्यास व येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. ६१/८ :**

मो. सिध्दार्थ गार्डन बारापुल्ला, मोगलपुरा, पवनचक्कीगेट मागच्या भागात नाल्यास पिचिंग वॉल बांधकाम करण्यात यावे. तेथे पिचिंग वॉलची फार गरज आहे. तरी पिचिंग वॉल बांधकाम भरती करुन हवारी करण्यात यावे. हे फार मोठे काम असल्यामुळे प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर करावा.

सुचक : श्री. अ.रशिदखान (मामु)

अनुमोदक : सौ. अलका पाटील

संवाद

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. सिध्दार्थ गार्डन बारापुल्ला, मोगलपुरा, पवनचक्कीगेट मागच्या भागात नाल्यास पिचिंग वॉल बांधकाम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२/९ :**

औरंगाबाद शहरातील प्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्या डॉ. ज्सोत्स्नाताई घारपुरे यांचे दि. ४ जुलै ९५ रोजी कोकणवाडी येथील चौकात अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने त्यांना २०-०७-९५ ला मनपाच्या सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी व त्यांची आठवण राहावी म्हणुन कोकणवाडीच्या चौकाला "डॉ. ज्योत्स्नाताई घारपुरे चौक" असे नामकरण करण्यात यावे.

सुचक : सौ. शकुंतला धांडे

अनुमोदक : श्री. नरेंद्र पाटील, श्री. अ.रशिद, श्री. फजलउल्लाखान

संवाद

मा. महापौर : नामंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील प्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्या डॉ. ज्सोत्स्नाताई घारपुरे यांचे स्मरनार्थ कोकणवाडीच्या चौरस्त्यावरील चौकास डॉ. ज्योत्स्नाताई घारपुरे चौक असे नामकरण करण्याचा प्रस्ताव नामंजुर करण्यात येते.

**विषय क्र. ६३/१० :**

महानगरपालिकेतर्फे शहरामध्ये विविध नाल्यांवर इमारत बांधण्याकरिता वा इतर व्यापारी किंवा सामाजिक कारणाकरिता वापरण्यासाठी महानगरपालिकेची जागा लिजवर विविध व्यक्ती/संस्थाना देण्यात आलेली आहे. परंतु सदरील लिजवर देण्यात आलेल्या जागेवर ज्या कारणासाठी जागा देण्यात आलेली आहे त्या कारणासाठी त्या जागेचा वापर करण्यात आलेला नाही. अथवा त्या ठिकाणी बांधकाम करण्यात आलेले नाही अशा जितक्या लिजवर देण्यात आलेल्या जागा असतील त्याचा लीज रद्द करण्यात यावा.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री विकास जैन

अनुमोदक : श्री. सुभाष कच्छवाह.

संवाद

मा. महापौर : मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतर्फे शहरामध्ये विविध नाल्यांवर इमारत बांधण्याकरिता वा इतर व्यापारी किंवा सामाजिक कारणाकरिता वापरण्यासाठी मनपाची जागा लिजवर विविध व्यक्ती/संस्थाना देण्यात आलेली आहे. त्या जागेचा वापर त्या योग्य रित्या करण्यात आलेला नसेल अथवा त्या जागेवर बांधकाम केलेले नसल्यास त्या लिजवर देण्यात आलेल्या जागांचा लिज रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४/११ :**

झोन नं. ०३ झोन मोठा आहे या झोन ३ मध्ये १० ते १५ वार्ड आहेत म्हणुन या वार्डात सफाइ नळ, ड्रेनेज, लाइटचे काम वेळेवर होत नाहीत व वेगवेगळया वार्डाचे नगरसेवक नेहमी झोनला चकरा मारीत असतात. व अधिकारी त्यांना समाधानकारक काम करु शकत नाही. यावरुन आम्हाला आमच्या मागणीची पुर्तता करुन देणे.

सुचक : सौ. मोहसिना बिल्कीस

अनुमोदक : श्री. नरेंद्र पाटील श्री. हमीदउद्यीन ताबा

संवाद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभाग क्रमांक ०३ मोठा विस्तृत भाग आहे प्रस्तुत विभाग हा दहा ते पंधरा वार्डात विखुरलेला आहे. नागरीकांच्या सोयीसाठी व प्रशासनाच्या कामाच्या दृष्टीकोनातुन दोन विभाग करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५/१२ :**

उर्दु माध्यमाच्या शाळेचे फार हाल होत आहेत व या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या कमी होत चालली आहे. याकडे पुर्ण लक्ष देण्यासाठी आम्हाला एक उर्दु माध्यमाचा शिक्षणाधिकारी व एक सुपरवाझर नियुक्त करण्याचा ठराव मंजुर करावा.

सचुक : सौ. मोहसिना बिल्कीस
अनुमोदक : श्री. नरेंद्र पाटील, हमीदउद्दीन ताबा

संवाद
मा. महापौर : सदरचा विषय रद्द करण्यात येतो व शिक्षण विभागाकडे पाठविण्यात येतो.

**ठराव :**

सदरचा विषय शिक्षण विभागाकडे पाठविण्यात येतो.

**विषय क्र. ६६/१३ :**

प्रस्ताव सादर करते की, संजयनगर बायजिपुरा येथील अत्यंत गरिब लोक आहेत त्यांना खाजगी शाळेचा खर्च झेपत नाही त्यासाठी येथे जागा उपलब्ध करुन महानगरपालिकेची उर्दु शाळा बांधणे अत्यंत आवश्यक आहे.

सुचक : श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय
अनुमोदक : सौ. नुरजहा बेगम

संवाद
मा. महापौर : सदरील विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येतो.

**ठराव :**

सादचा प्रस्ताव स्थायी समितीच्या अख्यतारीत असल्याने हा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

**विषय क्र. ६७/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र. ३० स्लम महानगरपालिकेची जमीन नसल्यामुळे महानगरपालिकेने जागा खरेदी करुन इमारत बांधावी व त्यात जनतेसाठी वाचनालय सुरु करावे. हा विभाग गरिब लोकवस्तीचा असल्यामुळे स्वता: वर्तमापत्रे इ. खरेदी करु शकत नाही.

सुचक : श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय
अनुमोदक : सौ. नुरजहाँ बेगम

संवाद
मा. महापौर : सदरचा विषय स्थायी समितीकडे वर्ग करण्यात येतो.

**ठराव :**

स्थायी समितीच्या अखत्यारीत प्रस्ताव असल्याने हा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यात येतो.

**विषय क्र. ६८/१५ :**

रहेमानिया कॉलनी शहराची एक गजबजलेली वस्ती आहे तेथे १५ ते २० हजार नागरीक वास्तव्य करीत आहेत सदर कॉलनी महानगरपालिके च्या अनेक सुविधांपासुन वंचित असुन तेथील नागरीकांना आज पावेतो काहीच सुविधा मिळालेल्या नाहीत. सदर वार्डात महानगरपालिकेची मोकळी जागा असुन तेथे कम्युनिटी हॉल बांधण्यात यावा. करिता मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. फरहत बानो भ्र.मो. नवाज
अनुमोदक : श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. जावेद रज्जाक

संवाद
मा. महापौर : सदरील विषय स्थायी समितीकडे पाठविण्यात येतो.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

**विषय क्र. ६९/१६ :**

महानगरपालिकेच्या विविध खात्यामार्फत व सन्माननिय महापौर उप-महापौर, सभापती, नगरसेवक, नगरसेविका यांचे मार्फत त्यांच्या वार्डात अनेक लोकोपयोगी उपक्रमाचे महत्वपुर्ण समारंभाचेही आयोजन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत असते. ज्या काही लोककल्याणाच्या योजना महानगरपालिका राबविते त्या सर्व सामान्य जनतेपर्यंत आधिक परिणामकारकरित्या पोहोचाव्यात तसेच स.नगरसेवक/नगरसेविका, मनपा कर्मचारी/अधिकारी त्यांच्या कुटुंबियांचे विविध क्षेत्रातील यश, गुणवत्ता संपन्न केल्याबाबत त्यांच्या सुखदु:खाच्या बातम्या प्रकाशित करणेसाठी काही स. सदस्य मनपा अधिकारी, कर्मचारी वृत्तपत्रातुन चांगले लेखन करु शकतात त्यांना प्रोत्साहन मिळावे, महानगरपालिकेच्या जाहिरात, जाहीर निविदा त्यातुन प्रकाशीत करणे, कार्यलयीन फॉर्मची छपाइ करणे अशी अनेक उद्दीष्ट डोळयासमोर ठेवुन महानगरपालिकेच्या संगणक विभागाचा उपयोग करुन एक लेझर प्रिंटर, स्टेशनरी खरेदी करुन महानगरपालिकेतर्फे मासीक (बुलेटीन) सुरु करण्यात यावे.

सुचक : कु. माया लाडवाणी
अनुमोदक : श्री. जयवंत ओक, श्री. विकास जैन.

संवाद
मा. महापौर : मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेमार्फत विविध खात्या व सन्माननिय पदाधिकारी व नगरसेवक/नगरसेविका यांचे वार्डात ज्या विविध उपक्रम राबविले जातत तसेच त्यांच्या कुटुंबियाचे विविध क्षेत्रातील यश, गुणवत्ता संपादन केल्या बाबत च्या सुखदु:खाच्या बातम्या प्रकाशीत करण्यासाठी तसेच काही स.सदस्य व मनपा अधिकारी/कर्मचारी वृत्तपत्रातुन चांगले लिखाण करु शकतात त्यांना प्रोत्साहन मिळावे व मनपाच्या जाहिरात, जाहीर निविदातुन प्रकाशित करणे, कार्यलयीन फॉर्मची छापाई करणे

अशा अनेक कार्याक्रमाचे उपक्रम डोळयासमोर ठेवुन मनपाच्या संगणक विभागाचा उपयोग करुन एक लेझर प्रिंटर स्टेशनरी खरेदी करुन महानगरपालिकेतर्फे मासिक (बुलटीना) सुरु करण्यास सर्वानमुते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. ५३ भडकलगेट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासमोरील महानगरपालिका शाळा कपौंड वॉल जी दक्षिण उत्तर आहे तसेच पुर्व पश्चिम आहे ती आत थोडया प्रमाणात सरकवुन दुकाने (१०x१५) ची बांधण्यात यावी, जेणे करुन बेकारास रोजी रोटी व महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. अलका पाटील
अनुमोदक : श्री. बंडु ओक

संवाद
मा. महापौर : मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५३ भडकलगेट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासमोरील महानगरपालिका शाळा कपौंड वॉल जी दक्षिण उत्तर आहे तसेच पुर्व पश्चिम आहे ती थोडया प्रमाणात आत सरकवुन त्या कपौंड लगत (१०x१५) ची दुकाने मनपा तर्फे बांधण्यात यावी, जेणे करुन बेकारांना रोजी रोटी मिळुन मनपाने उत्पन्नात भर पडेल या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१/१८ :**

स.नगर सेवक श्री. किशोर तुळशीबागवाले यांचे कनिष्ट बंधु श्री. शाम तुळशीबागवाले यांच्या दोन्ही किडण्या निकामी असल्याने त्यांच्या मातोश्री आपली एक किडणी त्यांना देणार आहेत. सदर किडणीचे शस्त्रक्रिया तसेच औषधोपचारसाठी अंदाजे दोन लाख खर्च अपेक्षित आहे.

सदर खर्च ते करु शकत नसल्याने महानगरपालिकेतील सर्व नगर सेवकांचे स्वेच्छानिधीतुन प्रत्येकी रु. १०००/- आर्थिक मदत देण्यात यावी.

ज्या स. नगरसेवकांचे वरील कारणासाठी निधी खर्च झालेला असेल अशा नगर सेवकांचे स्वेच्छा निधीतुन इतर कारणासाठी राखुन ठेवलेल्या निधीमधुन वर्ग करुन या कामसाठी देण्यात यावी. सदर प्रस्ताव सहानुभुतीची बाब समजुन एकमताने मंजुर करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. प्रफुल्ल मालाणी, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय
अनुमोदक : श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. गौतम खरात

संवाद
मा. महापौर : मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स.नगर सेवक श्री. किशोर तुळशीबागवाले यांचे कनिष्ट बंधु श्री. शाम तुळशीबागवाले यांच्या दोन्ही किडण्या निकामी झालेल्या असल्याने त्यांच्या मातोश्री आपली एक किडणी त्यांना देणार आहेत. सदरच्या किडणीचा शस्त्रक्रिया तथा औषधोपचारसाठी अंदाजे ०२.०० लाख खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च सर्व स.सदस्यांचे स्वेच्छा निधीतुन प्रत्येकी रु. १०००/- आर्थिक मदत देण्यात यावी.

व ज्या स. नगरसेवकांचे वरील कारणासाठी निधी खर्च झालेला आहे अशा नगर सेवकांचे स्वेच्छा निधीतील इतर कारणासाठी राखुन ठेवलेल्या निधीतुन वर्ग करुन, किडणीचे शस्त्रक्रियेसाठी संबंधीत डॉक्टराचे नावे अदा करणे बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देवुन विशेष बाब म्हणुन कायम करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२/१९ :**

संभाजीनगर हया शहरातील ऐन मध्यवस्तीत असलेल्या बापुनगर मोंढयाजवळील जो दर रविवारी आठवडी बाजार भरतो, हया बाजारात शहरातील ९०% नागरिक हे बाजार करित असतात हया बाजाराची आज इतकी दुर्दशा झाली की, व्यापारांना बाजार मांडायचे ओटे सुध्दा नीट नाहीत. तसेच बाजारातील रस्ता हा पावसाच्या दिवसात गुडघ्या इतक्या पाण्याने आणि चिखलानी तुडुंब भरलेला असतो, तसेच बाजाराच्या शेजारी घाणीचे साम्राज्य घेऊन बसलेला उघडा नाला हा भयानक अशी दुर्गंधी पसरवितो यामुळे नागारिकांचा गुदमरणारा जीव धोक्यात येण्याचा संभव आहे.

तसेच या बाजाराभोवती संरक्षिक भिंत नसल्याने जनावरे मोकाट सुसाट वेगाने बाजारात उधळण करीत फिरतात. तेव्हा नागरिकांची गैरसोय पाहता सहज नागरिकांच्या तोंडातुन नको हा रविवार बाजार.

हया रविवार बाजारात महत्वाचे म्हणजे बाजाराच्या सुरुवातीच्या टोकाला म्हणजेच अभिनय रोडला मच्छीमार व्यापारी हे उघडणे मासे घेऊन बसतात त्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्या माशांच्या दुर्गंधीमधुन बाजारात प्रवेश नाक दाबत करतात आणि हया बाजारातील मालाची घाण ४ ते ५ दिवस त्याच जागेवर पडलेली असते तरी त्वरीत यावर कार्यवाही स्वरुप प्रस्ताव टाकण्यात येत आहे.

सुचक : श्री. संजय किसनराव केणेकर
अनुमोदक : श्री. रमेश लहोट.

संवाद

मा. महापौर : सदरच्या विषयाबाबत संबंधीत झोन अधिकाऱ्यांनी व विभाग प्रमुखांनी लक्ष घालणे बाबत शिफारस करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बापुनगर मोंढयाजवळील आठवडी बाजार आहे त्याचे अवतीभोवती बाजारासाठी ओटे बांधलेले नाहीत व रस्ता योग्य नाही ते करणेशिवाय संरक्षक भिंत जनावरे एकाच ठिकाणी राहाण्यासाठी व मच्छीमार व्यापाऱ्यांसाठी बसण्याची व्यवस्थाकरणे बाबत संबंधीत शहर अभियंता, विभाग प्रमुखाकडे प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करुन पाठविण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/२० :**

महानगरपालिकेतील तृतीय श्रेणीतील कर्मचारी वर्गाला ड्रेस (गणवेश) देणे बाबत जेणे करुन मनपातील कर्मचारी वर्ग ओळखल्या जावा. कॉन्ट्रॅक्टर व सामान्य नागरिक यांच्यातील फरक समजल्यास महानगरपालिकेचे व जनतेचे काम व्यवस्थितरीत्या होइल. व वेळ वाया घालाविणारे कर्मचारी नजरेस येतील.

सदरील ठराव मंजुर करुन जनहिताच्या कार्यास मदत करावी.

सुचक : श्री. स.अली मिरा सलामी

अनुमोदक : श्री. सलीम कुरैशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील तृतीय श्रेणीतील कर्मचारी वर्गाला महानगरपालिकेमार्फत एकाच रंगाचा ड्रेस (गणवेश) देण्यात यावा. जेणे कॉन्ट्रॅक्टर, सामान्य नागरिक यांच्यातील फरक समजला जावुन जनतेचे काम व्यवस्थित व सुलथ होऊन व मनपाची शिस्त राहील. यास अनुसरुन प्रस्ताव सर्वानुमते मंजुरी करण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/२१ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वार्ड क्र. ७६ पैकी स.न. १७, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ५१ ते ५३, ६९ इ चा काही भाग हा सिडको नोटीफीकेशनचा आहे. या भागातील जमीन मालकांनी जमिन मालकांनी जमिनीची किंमत वसुल व्हावी या दृष्टीने २०x३० चे लहान भुखंड पाडुन त्याची विक्री केली आहे. पुंडलिकनगर, हनुमाननगर,गजानननगर, जयभवानीनगर, न्यायनगर, हुसैनकॉलनी, मातोश्री नगर, अंबिकानगर इ. भागात शहरातील विविध स्तरांच्या कष्टकरी गोरगरिब नागरिकांनी काटकसरीने जमवलेली रक्कम लावुन घरे बांधली आहेत परंतु वर नमुद केलेल्या स.न.चा भाग हा सिडको नोटीफीकेशनचा असल्यामुळे या भागात राहाणारे नागरिक, नागरी सुविधांपासुन वंचित आहेत.

करिता वर नमुद केलेल्या स.नं. अंतर्गत येणारे सर्व क्षेत्राचे सिडको नोटीफिकेशन रद्द करुन हा सर्वभाग महानगरपालिकेने ताब्यात घ्यावा आणि पुंडलिक नगर व इतर सर्व वसाहतींना नागरीसुविधा उपलब्ध करुन देण्यास मंजुरी द्यावी.

सुचक : श्री. विट्ठल जाधव

अनुमोदक : सौ. मंदा धनंजय काळुशे

संवाद

मा. महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ७६ पैकी स.न. १७, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ५१ ते ५३, ६९ इ चा काही भाग सिडको नोटीफीकेशनचा आहे. या भागात २०x३० चे लहान-लहान भुखंड पाडुन लोकांनी घरे बांधुन राहु लागले. हा भाग सिडको नोटीफिकेशनचा असल्यामुळे या भागास राहाणाऱ्या नागरिकांना नागरी सुविधा

उपलब्ध मनपा करु शकत नाही. तरी सदरील भाग सिडको नोटीफीकेशनचा रद्द करुन मनपाने ताब्यात घेण्यासाठी शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यास येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५/२२ :**

मो. पडेगांव परिसरात हाडे उकळण्याचा कारखाना कार्यरत असुन तेथे जनावरांचे हाडे संग्रहीत करण्यात येतात. व मोठमोठया काढयामध्ये उकळण्याची प्रक्रिया अहोरात्र सुरु असते. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असुन घाण वास येतो. हाडाच्या कारखान्यामुळे या भागात सर्वत्र दुर्गंधीमुळे घराघरात माणसे आजारी पडत असुन या भागातील रहीवाशांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. सदर हाडाचा करखाना त्वरीत बंद करणे बाबत येथील समस्त रहीवाशांनी मागणी केली असुन, त्यासाठी यापुर्वी निदर्शने, मोर्च घेराव, धरणे आदी मार्गांचा अवलंब केलेला आहे. येथील रहीवाशांचे आरोग्य आबादीत राखण्यासाठी या भागातील हाडांचा कारखाना त्वरीत बंद करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. रुख्मीणबाई लोखंडे, श्री. जयवंत ओक

अनुमोदक : श्री. प्रभाकर विधाते. कु. माया लाडवाणी,
श्री. विठ्ठल जाधव, श्री. सुदाम सोनवणे, सौ पदमा शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. पडेगांव परिसरात हाडे उकळण्याचा कारखाना कार्यरत असुन तेथे जनावरांची हाडे संग्रहीत करण्यात येतात. व मोठमोठया काढयामध्ये उकळण्याची प्रक्रिया अहोरात्र सुरु असते. त्यामुळे पुर्व नागरीकांना सर्वत्र दुर्गंधीमुळे घराघरात माणसे आजारी पडत आहेत. यासाठी येथील रहीवाशांचे आरोग्य बाधीत राखणेसाठी सदरील प्रस्ताव विधी सल्लागार यांचे कडे पाठवुन कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६/२३ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने ५२ झोपडपट्टयातील गरीब महिलांसाठी फक्त तिनच शिवणकला केंद्र कार्यरत आहेत. या शिवनकला केंद्रामधुन प्रतिवर्षी फक्त ६० महिलांनाच दिले जाते. औरंगाबाद शहराची लोकसंख्या लक्षात घेता तीन केंद्र कमी पडतात ५२ झोपडपट्टयातील महिलांची संख्या लक्षात घेता त्यांच्या प्रमाणात शिवणकला केंद्राची संख्या वाढविण्यात यावी.

तसेच महानगरपालिकेच्या अस्थापनेवर हस्तकला प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात येवुन शिकविण्यासाठी आवश्यक तेवढी शिक्षकांची पदे निर्माण करण्यात यावी.

सुचक : सौ. शकुंतला धांडे

अनुमोदक : श्री. विठ्ठल जाधव, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय,
श्री. गौतम खरात

महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने ५२ झोपडपट्टयातील गरीब महिलांसाठी फक्त तिनच शिवणकला केंद्र कार्यरत आहेत. ५२ झोपडपट्टयातील महिलांची संख्या लक्षात घेता शिवणकला केंद्राची संख्या वाढविण्यात यावी.

तसेच मनपा अस्थापनेवर हस्तकला प्रशिक्षण केंद्र सुरु करुन शिकविण्यासाठी आवश्यक तेवढी शिक्षकांची पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/२४ :**

महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेत दि. २९-११-९२ च्या विषय क्रमांक ७१/१ प्रमाणे विशेष कामागिरी बजावलेल्या औरंगाबादच्या व्यक्तींना "औरंगाबाद भुषण" हा किताब बहाल करण्याचे व त्यासाठी वार्षिक २५ हजार रुपयांची तरतुद करण्याचे संमत झाले होते. परंतु त्यावर अंमलबजावणी झाली नाही.

सदर ठरावाची रक्कम रु. २५ हजाराऐवजी रु. ५० हजार करण्यात यावी व यास मंजुरीस्तव पुन्हा मनपाच्या आम सभेत ठेवावे. ही विनंती.

सुचक : श्री. मोहसिन अहेमद

अनुमोदक : सौ. अलका पाटील, श्री. वसंत देशमुख

महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या सर्वसाधारण सभेत दि. २९-११-९२ च्या विषय क्रमांक ७१/१ प्रमाणे विशेष कामागिरी बजावलेल्या औरंगाबादच्या व्यक्तींना "औरंगाबाद भुषण" हा किताब बहाल करण्याचे व त्यासाठी वार्षिक २५ हजार रु ची तरतुद केलेली होती. तथापी अंमलबजावणी झाली नाही.

सदर ठरावामध्ये तरतुद केलेली रक्कम रु. २५ हजाराऐवजी रु. ५० हजार वाढीव तरतुद करण्यास सर्वानुमते मंजरी देण्यात येते.

वैधानिक कर्यावाही व्हावी.

**विषय क्र. ७८/२५ :**

किराडपुरा भागाचे नामांतर करुन "मलिकांबर नगर" असे नांव ठेवण्यात यावे.

सुचक : श्री.मो.मुश्ताक अहमद,श्री. मोहसिन अहमद

अनुमोदक : श्रीमती फरहतबानो भ्र.मो. नवाज, श्रीमती आबेदा बेगम
श्री. अजिज खान, श्रीमती जाहेदा बेगम, श्री. फजलउल्ला खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. किराडपुरा भागाचे नामांतर करुन "मलीकअंबर नगर" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ७९/२६ :**

आपल्या ऐतिहासिक शहरात प.पु.आसाराम बापु यांचा भागवत सत्संग समारोह दिनांक २२ ते २६ नोव्हेंबर १९९५ रोजी आयोजित केला आहे. या सत्संगासाठी ५० ते ६० हजार भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे, व त्यासाठी अंदाजे ३५ ते ४० लाखाचा खर्च अपेक्षीत आहे. तरी या कामासाठी सर्व नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन प्रत्येकी रु. १०००/- (एक हजार फक्त) देण्यात यावेत व स्वेच्छा निधी संपला असेल तर दुसऱ्या निधीतुन पैसे घेऊन या भागवत सप्ताहास मदत करावी. असा ठराव सर्व साधारण सभेत घ्यावा ही विनंती.

सुचक : डॉ. बी.के. कराड, श्री.अ.रशिद (मामु), गौतम खरात
अनुमोदक : श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. डॉ. विजयकुमार मेहेर,
श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय

संवाद
मा. महापौर : मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या ऐतिहासिक शहरात प.पु.आसाराम बापु यांचा भागवत सत्संग समारोह दिनांक २२ ते २६ नोव्हेंबर १९९५ या कालावधीत आयोजित केला आहे. या सत्संगासाठी ५० ते ६० हजार भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. यासाठी रु. ३४ ते ४० लाखाचा खर्च अपेक्षीत आहे. तेव्हा स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन प्रत्येकी रु. १०००/- (एक हजार फक्त) घेण्यात यावा व निधी संपला असेल तर दुसऱ्या निधीतुन पैसे घेवुन आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौरांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
मा.नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १६-१०-१९९५ रोजी विशेष सर्वसाधारण सभा (विविध समित्यांचे निवडणुका बाबत) झाली तिचे इतिवृत्त**

मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षतखाली दि. १६-१०- १९९५ रोजी सकाळी अंदाजे ११.४० वाजता सभेस सुरुवात झाली.

सभेस स.सभासद तथा मा. आयुक्त व संबंधीत अधिकारी उपस्थित होते. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने झाली.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.सौ. ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | उप-महापौर |
| २) | मा.सौ. रुख्मणबाई खंडेराव लोखंडे | सदस्य |
| ३) | मा.श्री. अफसर खाँ यासिन खाँ. | --//-- |
| ४) | मा.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा.श्रीमती साजेदा बेगम | --//-- |
| ६) | मा.श्री. म.सलीम म. हनिफ कुरैशी | --//-- |
| ७) | मा.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ८) | मा.श्री. ॲड.गणेश किशनराव वानखेडे | --//-- |
| ९) | मा.सौ. जोशी रजनी रमेश | --//-- |
| १०) | मा.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| ११) | मा.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १२) | मा.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | --//-- |
| १३) | मा.श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १४) | मा.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १५) | मा.श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | --//-- |
| १६) | मा.श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १७) | मा.श्री. राजु रविद्र इंगळे | --//-- |
| १८) | मा.श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १९) | मा.सौ. पदमा बाबुराव शिंदे | --//-- |
| २०) | मा.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २१) | मा.श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २२) | मा.श्रीमती चंपाबाई पांचळ | --//-- |
| २३) | मा.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २४) | मा.श्रीमती फरहदबानो भ्र.मो.नवाज | --//-- |
| २५) | मा.श्री. फललउल्लाखान अजमतउल्लाखान | --//-- |
| २६) | मा.श्री. अजित खाँ गणी खाँ | --//-- |
| २७) | मा.श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा | --//-- |
| २८) | मा.श्री. मोहमंद मुश्ताक अहमद | --//-- |
| २९) | मा.सौ. नुरजहाँ बेगम अ. मो.रहेमान खाँ | --//-- |
| ३०) | मा.श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३१) | मा.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद | --//-- |
| ३२) | मा.श्री. मुजीब आलमशाह मिर आलमशाह | --//-- |
| ३३) | मा.श्रीमती मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| ३४) | मा.श्री. अब्दुल जावेद रज्जाक | --//-- |
| ३५) | मा.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३६) | मा.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३७) | मा.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३८) | मा.श्रीमती गंगवाल पुष्पाबाई सुरेशचंद्र | --//-- |
| ३९) | मा.श्री. हमीदउद्दीन ताबा फसीयोद्दीन | --//-- |
| ४०) | मा.श्री. म.अ.रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| ४१) | मा.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.अ.कुतुबोद्दीन | --//-- |
| ४२) | मा.श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल | --//-- |
| ४३) | मा.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४४) | मा.श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ४५) | मा.श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ४६) | मा.श्री. संजय किसनराव केनेकर | --//-- |
| ४७) | मा.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ४८) | मा.श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| ४९) | मा.सौ. अलका रमेश पाटील | --//-- |
| ५०) | मा.सौ. धांडे शकुंतला रामदास | --//-- |
| ५१) | मा.श्री. अब्दुल रशिदखान(मामु) | --//-- |
| ५२) | मा.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | --//-- |
| ५३) | मा.कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ५४) | मा.श्री. डॉ.कराड भागवत किसनराव | --//-- |
| ५५) | मा.सौ. आव्हाड सविता संजय | --//-- |
| ५६) | मा.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ५७) | मा.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ५८) | मा.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ५९) | मा.श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ६०) | मा.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ६१) | मा.श्री. जोशी संजय रामदास | --//-- |
| ६२) | मा.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ६३) | मा.श्री. आविनाश लक्ष्मण कुमावत | --//-- |
| ६४) | मा.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | --//-- |
| ६५) | मा.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६६) | मा.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ६७) | मा.श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ६८) | मा.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ६९) | मा.सौ. काळुशे मंदा धनंजय | --//-- |
| ७०) | मा.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ७१) | मा.श्री. घाडामोडे भगवात देविदास | --//-- |
| ७२) | मा.श्री. नवपुते कचरु चंद्रभान | --//-- |

संवाद

श्री. जयवंत ओक : स.स.श्री. महादेव सुर्यवंशी यांच्या मुलीचे दु:खद निधन झाले तेव्हा सभागृहात ००.०२ मिनिटे स्तब्धता पाळावी.

मा. महापौर : ठीक आहे.

सभागृहात ००.०२ मि.स्तब्धता पाळुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

श्री. कचरु नवपुते : विविध समित्यांच्या आज निवडणुका होत आहेत. परंतु बसण्यांसाठी जागा पुरेशा आहेत का? याचा खुलासा करावा.

मा. महापौर : सदरील विषय चर्चेचा नाही. आता सचिवांनी पुढील कार्यवाही सुरु करावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : सचिवांनी विशेष समित्याचे निवडणुक प्रक्रिये बाबत सभागृहात माहिती द्यावी.

नगर सचिव : सचिवांनी मतदान प्रक्रियेविषयी सभागृहात माहिती प्रतिपादन केली.

श्री. जयवंत ओक : ज्यांना निवडणुकीचा फॉर्म मागे घ्यावयाचा आहे, त्यासाठी थोडा अवधि देण्यात यावा.

मा. महापौर : स. सभासदांना फॉर्म परत घेण्यासाठी ०१.०० तासाचा अवधि देण्यात येतो. (१२.०५) (सभेला सुरुवात अंदाजे ०१.३० वा.)

श्री. हमीदउद्दीनताबा : विविध समित्यांचे वेगवेगळी माहिती द्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : फॉर्म परत घेण्याची वेळ संपलेली आहे आता नियमाप्रमाणे कार्यवाही सुरु करावी.

श्री. हमिदोद्दीन ताबा,श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सदरची सभा अनाधिकृत आहे याचा खुलासा विधी सल्लागाराने करावा की, स.सभासदांच्या मागणीनुसार ही सभा बोलवली ती अधिकृत आहे की, अनाधिकृत आहे.

श्री. मोहसिन अहेमद,श्री. मिरा सलामी, श्री. हमीदउद्दीन ताबा : स. सभासदांनी सुचना केल्याप्रमाणे विधी सल्लागाराने खुलासा करावा.

(या वेळी विरोधी स. सभासद बाकावर बसलेल्या जागेवरुनच जोरजोरात बोलतात काहीही ऐकु येत नाही.)

श्री. प्रदिप जैस्वाल : सदरील सभा नियमाप्रमाणे सुरु असुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. मोहसिन अहेमद : सदरची सभा अनाधिकृत आहे याचा विधी सल्लागाराने खुलासा सभागृहात करावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : विविध समित्यांचे फॉर्म भरलेल्या व काही स.सभासदांनी फॉर्म परत घेतलेल्या स. सभासदांची नावे वाचुन दाखवावी.

(यावेळी सभागृहात विरोधी स. सभासद आपसामध्ये जोरजोरात बोलतात, काहीही ऐकु येत नाही.)

मा. महापौर : सर्व स. सभासदांना विनंती की, सभागृहात सर्वांनी शांतता बाळगावी. (तरीही सभागृहात जोरजोरात आवाज चालुच असतो)

श्री. नरेंद्र पाटील : समित्यांचे गठण करणे बाबत सर्व साधारण सभेला अधिकार आहेत काय? याचा खुलासा करावा.

श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. जयवंत ओक : मा. महापौरांनी सुचना केल्याप्रमाणे सर्व साधारण सभेला अधिकार आहेत.

श्री. हमीदउद्दीन ताबा,श्री. ओबेरॉय, श्री.अ.जावेद रज्जाक : सदरील बैठक अनाधिकृत आहे, या बाबत विधी सल्लागाराने खुलासा करावा असे आमचे मत आहे.

मा. महापौर : सचिवांनी निवडणुक प्रक्रिये बाबतच्या समितीत किती स.सभासद विविध समितीत निवडणुकीसाठी उरले आहेत त्यांची नावे वाचुन दाखवावी.
(यावेळी विरोधी स. सभासद जोरजोराने ओरडतात)

मा. महापौर : स. सभासदाना विनंती की, सभागृहात शांतता बाळगावी. अन्यथा स.सभासदांना सभागृहाबाहेर काढावे लागेल.

श्री. प्रफुल्ल मालणी : वेळ भरपुर झालेला आहे तेव्हा नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

नगर सचिव : स. सभासद नरेंद्र पाटील यांनी दि. ०५ सप्टेंबर ९५ च्या सभेत सुचना केल्याप्रमाणे मा. महापौरांनी विविध समित्यांचे गठण करणे बाबत ही विशेष सर्व साधारण सभा घेण्याचा निर्णय दिलेला आहे.

श्री. नरेंद्र पाटील : मी सुचना केली, परंतु त्या बाबत सभागृहाची तात्काळ संमती घ्यावयाची होती.

श्री. जयवंत ओक : आता वेळ न घालवता किती स.सभासदांनी फॉर्म परत घेतलेले आहेत त्याची माहिती द्यावी.

मा. महापौर : प्रक्रियेला सुरुवात झाली व त्या प्रमाणे सभागृहात बिनविरोध खालील प्रमाणे १ ते ७ चे समितीतील स. सभासद निवडुन आले त्याची माहिती वाचुन दाखविण्यात आली ती पुढील प्रमाणे.

**१) <u>महिला व बाल कल्याण समिती</u>**

२) सौ. मुंडलिक विमल नंदकुमार
३) सौ. काळुशे मंदा धनंजय
४) सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
५) सौ. निर्मला विठ्ठल कांबळे
६) सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम
७) श्रीमती उषा दिलीप गायकवाड
८) सौ. शकुंतला हरीदास धांडे
९) श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा
१०) श्री.स.अ.एकबालोद्दीन स.मो. कुतुबोद्दीन

२) **<u>स्थापत्य समिती</u>**

१) श्रीमती. अलका रमेश पाटील
२) श्री. जैन विकास रतलाल
३) श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र
५) श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल
६) सौ. तळेकर राधाबाई सखाराम
७) श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन
८) श्री. म.सलीम म. हनिफ कुरैशी
९) श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ

३) **<u>वैद्याकिय सहाय्य व आरोग्य समिती</u>**

१) श्री. डॉ. मेहेर विजयकुमार गजानन
२) श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
३) सौ. लोखंडे रुख्मणबाई खंडेराव
४) सौ. आव्हाड सविता संजय
५) श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव
६) श्रीमती साजेदा बेगम विखार अहमद
७) श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले
८) श्री. अब्दुल रशिद अ. सत्तार
९) श्री. मा. सलीम हनिफ कुरैशी

४) **<u>विधी समिती</u>**

१) श्री. गणेश किसनराव वानखेडे
२) सौ. यशोदा धनंजय वाडेकर
३) सौ. धनश्री अशोक विसपुते
४) श्री. गांगवे बन्सी तुळशीराम
५) श्री. देशमुख वसंत विनायकराव
६) श्री. अब्दुल जावेद रज्जाक
७) श्री. नरेंद्र यादवराव पाटील
८) श्री. कोकाटे काशीनाथ हरिभाऊ
९) श्री. म.विखारोद्यीन म. खुदबोद्यीन

५) **शहर सुधार समिती**

१) श्री. संजय किसनराव केनेकर
२) श्री. म.अ.रऊफ म.अ.माबुद
३) श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४) सौ. पदमा बाबुराव शिंदे
५) कु. माया लिंबाजी लाडवाणी
६) सौ. राधाबाई सखाराम तळेकर
७) श्री. फजलउल्लाखान अजमतउल्लाखान
८) श्री. स.अली मिरा सलामी
९) श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर

६) **माध्यमिक पुर्वमाध्यमिक व तांत्रीक शाळा समिती**

१) श्री. संजय रामदास जोशी
२) श्री. सोनवणे सुदाम रामदास
३) श्री. प्रफुल्ल लालचंद मालाणी
४) श्री. सुभाष भिकाजी टाकळकर
५) श्री. विठ्ठल किसन जाधव

६)   सौ. मोहसिना बिल्कीस विखारोद्यीन
७)   सौ. उषा दिलीप गायकवाड
८)   श्री. अब्दुल जावेद रज्जाक
९)   श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुराव

७) **गलिच्छ वस्ती निर्मुलण, घर बांधणी व समाज कल्याण समिती**

१)   श्री. भगवान देविदास घडामोडे
२)   श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलीक
३)   श्री. लाहोट रमेश दिपचंद
४)   श्री. बारवाल गजानन रामकिसन
५)   श्री. ढगे नरसिंग मुलीधर
६)   श्री. लांडगे गौतम लिंबाजी
७)   श्रीमती नुरजहॉ बेगम अ. रहेमानखान
८)   श्री. फजलउल्लाखान अजमतउल्लाखान
९)   श्री. अजिज खॉं गणी खॉं

मा. महापौर वरील सर्व सात विषय समित्यांचे सभासद बिनविरोध निवडुन आल्याचे घोषित करण्यात येते निवडुन आलेल्या सर्व सभासंदाना सचिवांनी पत्र देण्यात यावे.

"जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
मा. नगरसविच,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**शनिवार दिनांक १८-११-१९९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

शनिवार दिनांक. १८-११-१९९५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांच्या अध्यक्षते खाली महानगरपालिका औरंगाबादची सर्व साधारण सभा संपन्न झाली. "वंदे मातरम्" या गिताने सभेची सुरुवात झाली सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते. तसेच महानगरनपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. सौ. ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | उप-महापौर |
| २) | मा. सौ. रुख्मनबाई खंडेराव लोखंडे | सदस्य |
| ३) | मा. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | --//-- |
| ४) | मा. सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ५) | मा. श्री. म.सलीम हनिफ कुरैशी | --//-- |
| ६) | मा. श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ७) | मा. सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ८) | मा. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| ९) | मा. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १०) | मा. श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| ११) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | --//-- |
| १२) | मा. श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १३) | मा. श्री. कोकाटे काशीनाथ हरिभाऊ | --//-- |
| १४) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १५) | मा. श्री. रविंद्र (राजु) बाबुराव इंगळे | --//-- |
| १६) | मा. श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १७) | मा. सौ. पदमा बाबुराव शिंदे | --//-- |
| १८) | मा. श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| १९) | मा. श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २०) | मा. श्रीमती चंपाबाई पांचाळ | --//-- |
| २१) | मा. सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २२) | मा. श्री. फजलउल्लाखान अजमतउल्लाखान | --//-- |
| २३) | मा. श्री. अजिज खॉ गणी खॉ | --//-- |
| २४) | मा. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्ताफा | --//-- |
| २५) | मा. श्री. मोहंमद मुश्ताक अहमद | --//-- |
| २६) | मा. सौ. नुरजहॉ बेगम अ.रहेमान | --//-- |
| २७) | मा. श्री. वसंत विनायक देशमुख | --//-- |
| २८) | मा. श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद | --//-- |
| २९) | मा. श्री. मुजीब आलमशाह मिर आलमशाह | --//-- |
| ३०) | मा. सौ. मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३१) | मा. श्री. अ.जावेद रज्जाक | --//-- |
| ३२) | मा. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीन | --//-- |
| ३३) | मा. श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३४) | मा. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३५) | मा. श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --//-- |
| ३६) | मा. श्री. हमिदद्यीन फसियोद्यीन ताबा | --//-- |
| ३७) | मा. श्री. म.अ.रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| ३८) | मा. श्री. स.अ.एकबालोद्यीन स.म.कुतुबोद्यीन | --//-- |
| ३९) | मा. श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल | --//-- |
| ४०) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४१) | मा. श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ४२) | मा. श्री. संजय किसनराव केनेकर | --//-- |
| ४३) | मा. सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ४४) | मा. सौ. लता दलाल | --//-- |
| ४५) | मा. श्री. जयवंत (बंडु) केशवराव ओक | --//-- |
| ४६) | मा. सौ. अलका रमेश पाटील | --//-- |
| ४७) | मा. श्री. अब्दुल रशिदखान (मामु) | --//-- |
| ४८) | मा. श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | --//-- |
| ४९) | मा. कु. माया लाडवाणी | --//-- |
| ५०) | मा. श्री. डॉ. भागवत कराड | --//-- |
| ५१) | मा. सौ. सविता संजय आव्हाड | --//-- |
| ५२) | मा. सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ५३) | मा. श्री. अ.रशिद अ. सत्तार | --//-- |
| ५४) | मा. श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ५५) | मा. श्री. विखारोद्यीन पी. कुतुबोद्यीन | --//-- |
| ५६) | मा. श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ५७) | मा. श्री. गंगाधर सुखदेव गाढे | --//-- |
| ५८) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ५९) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ६०) | मा. श्री. निकाळजे प्रकाश भावराव | --//-- |
| ६१) | मा. श्री. जोशी संजय रामदास | --//-- |
| ६२) | मा. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ६३) | मा. श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत | --//-- |
| ६४) | मा. श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | --//-- |
| ६५) | मा. सौ. राधाबाई सखाराम तळेकर | --//-- |
| ६६) | मा. श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ६७) | मा. श्री. डॉ. विजयकुमार मेहेर | --//-- |
| ६८) | मा. सौ. मंदा धनंजय काळुशे | --//-- |
| ६९) | मा. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ७०) | मा. श्री. भगवान देविदास घडामोडे | --//-- |
| ७१) | मा. श्री. कचरु चंद्रभान नवपुते | --//-- |

संवाद

: महापालिका सचिव, श्री. जी.व्ही.मगरे यांच्या मातोश्री तसेच स.नगरसेवक श्री. गौतम खरात यांचे काका यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव सर्वश्री. मोहसिन अहेमद व बंडु ओक यांनी मांडल्यानुसार सभागृहात दोन मिनिटे स्तब्धता पाळुन श्री. मगरे यांच्या मातोश्री व श्री. गौतम खरात यांच्या काकांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री. प्रदिप जैस्वाल : महानगरपालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब आहे, ही बाब सातत्याने वृत्तपत्रातुन मांडली जाते आहे. मी सभागृहाच्या निर्दशनास आणुन देऊ इच्छितो की, महापालिकेतर्फे महापालिका हद्दीतील मालमतांवर जो कर लावला जातो. त्या कराच्या संदर्भाने विविध मुद्यावरती ८००-९०० प्रकरणे न्याय प्रविष्ट झालेली आहेत. ही प्रकरणे न्याय प्रविष्ट असल्याने कर वसुल करता येत नाही. व त्याचा परिणाम महानगरपालिकेच्या तिजोरीवर होतो. ही प्रकरणे वेळीच निकाली निघाली तर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढु शकेल. तेव्हा सभागृहास विनंती की, या प्रकरणी एक समिती नेमण्यात यावी व प्रकरणे निकाली काढण्यास यावीत. ही समिती आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात येवुन संबंधीतांना सुनावणी देण्यात यावी व प्रकरणे निकाली काढण्यात यावी.

श्री. हमीद उद्यीन ताबा : स्थायी समिती सभापती, श्री. प्रदिप जैस्वाल यांनी मालमत्ता कर वसुल करण्याच्या संदर्भाने मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

श्री. बंडु ओक : शहरातील अनाधिकृत वसाहतींना मालमत्ता कर लावावा असा प्रस्ताव मागेच पारित झालेला आहे. शहरात ज्या अनाधिकृत वसाहती आहेत त्यांची पाहाणी करण्यात यावी आवश्यकता भासल्यास एखादी समिती नेमण्यात यावी. व अशा अनाधिकृत वसाहतीतील मालमत्तांवर कर लावण्यात यावा. माझ्या माहिती प्रमाणे शहरात सा. अनाधिकृत वसाहती आहेत. या पैकी फक्त दहा टक्के वसाहतीतील मालमत्तावरच कर लावण्यात आलेला आहे.

श्री. मोहसिन अहमद : जियाउद्यीन ले आऊट बाबत मी यापुर्वी बऱ्याच वेळा कार्यालयाकडे पत्रे दिलेली आहेत या ले-आऊट मधिल खुली जागा ही महानगरपालिकेच्या नावाची असतांनाही त्या जागेवर मोठया प्रमाणावर अतिक्रमण झालेले आहे. शहरात इतरची बऱ्याच भुखंडावर अतिक्रमणे झालेली आहेत. तेंव्हा अशा जागा महानगरपालिकेकडेच राहाव्यात, यासाठी व यावर कार्यवाही करण्यासाठी एक विशेष सभा बोलवावी अनाधिकृत वसाहतीकडुन कर वसुली बाबत विचार करण्यात यावा.

श्री. प्रभाकर विधाते : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्याच्या संदर्भाने सर्वश्री प्रदिप जैस्वाल, बंडु ओक, मोहसिन अहमद यांनी मांडलेल्या सुचनांशी मी ही सहमत आहे. मालमत्ता कर वसुलीतही अनेक त्रुटी आहेत. विभाग क्र. -१ मध्ये श्री. जाधव यांनी १९९३-९५ पर्यंतचा त्यांच्या मालमत्तेवरील कर भरलेला आहे तरीही त्याची नोंद कार्यालयातील रजिष्टर मध्ये नाही व करभरलेल्या कालावधीचा कर परत भरण्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आलेली आहे. अशा प्रकरणांचीही चौकशी व्हावयास पाहिजे.

मा. आयुक्त : प्रकरणात चौकशी केली जाइल. अशी प्रकरणे निर्दशणास आणुन दिल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येइल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : काही मालमत्ता धारकांनी मालमत्ता करा संदर्भाने कोर्टात केसेस केल्या आहेत ते मालमत्ताधारक जर केसेस मागे घेण्यास तयार असतील तर त्यावर कार्यालयाने विचार करण्यास हरकत नसावी, व यासाठी समिती नेमण्यात यावी. मात्र समितीस जर कराच्या संदर्भाने निर्णय घेण्याचे अधिकार दिले नाहीत तर त्या समितीस काहीच अर्थ राहणार नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : मालमत्ता कर वसुलीच्या संदर्भाने मुद्या उपस्थित करण्यामागे माझा हाच उद्देश होता की, समिती नेमुण त्या समितीस जर काही अधिकार देण्यात आले तर वेळीच निर्णय घेतले जातील व मालमत्त करही वसुल होऊ शकेल. तसेच जर आयुक्तच या समितीचे प्रमुख राहीले तर प्रकरणे लवकर निकाली निघतील. महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या चुकामुळे कर आकारणीत चुका झाल्या आहेत.

मा. आयुक्त : मालमत्ता कर वसुलीच्या संदर्भाने सहा. संचालक नगररचना, उप-आयुक्त-२ व विधी सल्लागार यांची समिती या पुर्वीच नेमण्यात आलेली आहे मीच समिती प्रमुख म्हणुन काम पाहावे अशी सभागृहाची इच्छा असेल तर त्यास माझी ना नाही. फक्त कोर्ट केसेस वगळता मालमत्ता कराची नेट डिमांड रुपये ३३ कोटी एवढे आहे. मागणी प्रमाणे जरी मालमत्ता कराची वसुली झाली तरी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारु शकेल.

श्री. अब्दुल रशिद खान (मामु) : एकाच आपार्टमेंट व बिल्डींग मधील वेगवेगळया मालमत्तांना लावलेल्या टॅक्समध्ये मोठी तफावत आहे. इमारती बांधुन झाल्यानंतर त्यांना लगेच कर आकारले जात नाहीत. त्यामुळेही महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. कर वसुलीसाठी उप-आयुक्त-२ यांचेकडे देण्यात आलेला कर्मचारी वर्ग हा त्यांच्या कार्यात निष्णात नाही. उप-आयुक्त-२ यांचेकडे कर वसुलीसाठी चांगले कर्मचारी देण्यात यावेत. जेणेकरुन वसुलीत वाढ होइल.

मा. आयुक्त : उप-आयुक्त-२ यांनी दिलेले उत्तर मीही देऊ शकतो. कर्मचाऱ्याकडुन काम करवुन घेता आले पाहिजे. त्यांच्याकडुनच वसुली व्यवस्थित होत नाही ही परिस्थिती आहे. वसुलीसाठी जो पर्यंत खऱ्या अर्थाने प्रयत्न होत नाहीत तो पर्यंत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : टॅक्स लावण्याबाबतचे नॉर्मस शासनाने ठरवलेले आहेत. एनआर.व्ही. आपणास चैज करता येणार नाही. या बाबींचाही कर वसुली मोहिम राबवितांना विचार करावयास हवा.

श्री गिरजाराम हाळनोर : ज्या मालमत्तावरती जादा कर लावण्यात आलेला आहे त्या मालमत्ता धारकांनी महानगरपालिकेकडे तक्रार अर्ज करुन दोन-दोन वर्षे लोटली तरी अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही. यामुळेही कर वसुलीवर परिणाम होतो या बाबीचाही कर वसुली करतांना विचार करावयास हवा.

मा. आयुक्त : असा प्रकरणाबाबत मी सुचना दिलेल्या आहेत की, अशा मालमत्ता धारकांनी त्यांना योग्य वाटतो तेव्हा तरी कर भरावा. व अशा प्रकरणांचा निकाल लागल्यानंतर काय ते ठरविले जाइल यामुळे मालमत्ताधारकांवरही कराचा बोजा वाढणार नाही.

सौ. लता दलाल : अशा प्रकरणांमध्ये वेळेवर निर्णय होत नसतील तर कशाच्या आधारावर नागरीकांनी कर भरावा त्यांना अशा प्रकरणांत हमी मिळाली पाहिजे.

श्री. हमीदउद्यीन ताबा : टॅक्स सेक्शनमध्ये टेक्नीकल स्टाफ नाही. असलेला स्टाफही बरोबर काम करीत नाही. तेव्हा उप-आयुक्त-२ यांच्याकडे चांगला स्टाफ देण्यात यावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : जे जास्त क्लॉलीफाईड कर्मचारी आहेत त्यांना कर वसुली कामी टॅक्स सेक्शनमध्ये देण्यात यावे. म्हणजे हे विभाग चांगल्या प्रकारे काम करु शकतील.

मा. आयुक्त : एकाच कर्मचाऱ्यास एकाच विभागात जास्त दिवस ठेवणे बरोबर होणार नाही. उपलब्ध कर्मचाऱ्याकडुनही चांगल्या प्रकारे काम करुन घेता येते.

श्री. अब्दुल जावेद रज्जाक : पाणी पट्टी वसुल करण्यासाठीही बरोबर कर्मचारी नसल्याने टॅक्स वसुली होत नाही.

मा. आयुक्त : कोणात्या विभागातर्फे काय कामे पार पाडली जातात व त्यासाठी किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते, या बाबत स्टाफिंग पॅटर्न बनविण्यात आला तर कामे व्यवस्थितपणे होऊ शकतील यासाठी एखादी समिती नेमुन त्या समितीकडे स्टाफिंग पॅटर्नचे काम देण्यात यावे. सभागृहाची परवानगी असेल तर अशी समिती बनविण्यात येइल.

श्री. अब्दुल जावेद रज्जाक व श्री. रशिद मामु : अशी समिती लवकर स्थापन करण्यात यावी यामुळे सर्वच विभागाचा फायदा होइल.

श्री. गिरजाराम हाळनोर : महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी किती दिवसापासुन सुट्टीवर आहेत व त्याचा चार्ज कोणाकडे आहे. १९८९ मध्ये उपशिक्षणाधिकाऱ्याचे पद निर्माण करण्याबाबत ठराव पारित झालेला आहे तेव्हा हे पदही भरण्यात यावे. एकाच व्यक्तीकडे किती चार्ज देणार.

मा.आयुक्त : शिक्षणाधिकारी हे आठ दिवसांसाठी सुट्टीवर गेलेले आहेत उप-शिक्षणाधिकारी या पदास शासनाने मंजुरी न दिल्याने ते पद भरता येत नाही.

श्री. प्रभाकर विधाते : कामाच्या सोयीसाठी एखादया जेष्ठ मुख्याध्यापकाकडे हे पद देण्यात यावे.

**विषय क्र. ८०/१ :**

दिनांक २०-१०-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. मोहसिन अहेमद : दि. २०-१०-९५ च्या इतिवृत्तावरील पृष्ठ क्र. १९ वरती महापालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रासाठी सकाळी ८-३० ते दुपारी १-३० या वेळा दाखविण्यात आलेल्या आहेत. या वेळा जर कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आल्या तर दवाखान्यातुन पेशंटवरती उपचार करता येत नाहीत. तेव्हा या वेळात कार्यालयात बैठका आयोजित करण्यात येऊ नयेत.

श्री. नरेंद्र पाटील : मागील सर्व साधारण सभेत ठराव होता की, सर्व नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन आसाराम बापु यांच्या भागवत सत्संग समारोरासाठी प्रत्येकी रु. १०००/- देण्यात यावेत, असे ठराव ऐनवेळी ठेवण्यात येवु नयेत. तसेच जे निधी देवु इच्छितात त्यांच्याकडुन वैयक्तिकरित्या त्यांच्या लेटर हेडवर तसे लेखी घेण्यात यावे व नंतरच निधी द्यावा.

श्री. मोहसिन अहेमद : नगर सेवकांच्या स्वेच्छा निधीचा गैरवापर अशा स्वरुपाच्या बातम्या वृत्तपत्रात आल्याचे महानगरपालिकेची तर बदनामी झालीच आहे. परंतु या बातमीने सर्व नगर सेवकांचा अपमान झालेला आहे. स्वेच्छा निधी देण्याबाबत आम्ही फक्त शिफारस करतो. परंतु असा निधी त्या संस्थेला देता येतो अथवा नाही ही बाब अधिकाऱ्यांनी तपासवयास पाहिजे. महापालिका स्वतःचा ऑडीट रिपोर्ट तीन-तीन वर्षे बनवु शकत नाही. मग एखादी संस्था तिन महिन्यात ऑडीट रिपोर्ट कसा बनवु शकेल नगर सेवकांना अशा प्रकारे बदनाम करण्याच्या कोणी प्रयत्न करु नये हा निधी नगरसेवकांचा आहे तो कसा खर्च करावा हे ते स्वतः ठरवु शकतात.

सौ. लता दलाल : नगर सेवक स्वेच्छा निधी बाबत आम्ही नगर सेवकांची चौकशी करु असे आयुक्तांचे विधान वृत्तपत्रातुन छापुन आलेले आहे. वास्तविक पाहाता प्रशासनास हा अधिकारच नाही हा अधिकार सर्व साधारण सभेचा आहे. हा आमचा अपमान आहे हे विधान आयुक्तांचेच आहे की, वार्ताहरांनी हे विधान आयुक्तांचे विधान म्हणुन नोंदविले आहे याचाही मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : प्रशासनातर्फे अथवा माझतर्फे नगर सेवकांची चौकशी केली जाईल असे कोणतेही विधान मी केलेले नाही मी हे विधान केलेले आहे असे कोणीही पत्रकार सांगण्यास तयार असतील तर मी माझ्या पदाचा राजीनामा देण्यास तयार आहे. नगरसेवकांनी कोणत्याही संस्थेस निधी दिला असला तरी हा "पब्लीक मनी" आहे. त्याचा वापर कसा होतो हे तपासण्याचे अधिकार प्रशासनास आहेत. नगरसेवकांवर प्रशासनाचा विश्वास आहे. म्हणुनच त्यांनी अशा प्रकरणांत दिलेले प्रस्ताव स्विकारले जातात. एखादी संस्था जर आशा निधीचा दुरुपयोग करत असेल तर त्यास नगर सेवक जबाबदार नाहीत, वृत्तपत्रांना त्या प्रकारच्या बातम्या प्रशासनाकडुन मिळत नाहीत तर त्या बाहेरुनच पुरविल्या जातात. स्वेच्छा निधीबाबत आंपणास हवी ती सर्व माहिती दिली जाईल.

श्री. वसंत देशमुख : मा. आयुक्तांचा खुलासा योग्यच आहे अशा प्रश्नात त्यांनी राजीनामा देण्याची गरज नाही.

मा. आयुक्त : आपण माझ्यावर आरोप केला की, वृत्तपत्रातील विधाने हे माझे आहे मी हे विधान केले असे कोणत्याच वृत्तपत्रात लिहिलेले नाही.

श्री. मोहसिन अहेमद : बऱ्याच जनांचे म्हणणे आहे की, नगरसेवकांवर आयुक्तांचा भरोसा नाही. व त्या बातम्या वृत्तपत्रात आल्या, त्यामुळे नगरसेवकांच्या भावना दुःखावल्या गेल्या हा पैसा प्रशासनांचा नाही तर जनतेचा आहे व आम्ही जनप्रतिनिधी आहोत. आम्हासही माहित आहे की, पैसे कसे व कोठे खर्च करावेत.

श्री. प्रदिप जैस्वाल : नगरसेवक स्वेच्छा निधीचा गैरवापर व खोब्रागडेंच्या भ्रष्ट्राचाराची बातमी वृत्तपत्रात आल्यानंतर मी स्वतः आयुक्तांना पत्र देवुनही माहिती मागवली होती. श्रीमती गंगावल यांनी लेखी दिले आहे की, मी खोब्रागडे यांचा संस्थेस रु. १०००/- नगरसेवक स्वेच्छा निधीतुन दिले होते व त्यांनी त्याचे रु. १००००/- असे केले मी या प्रकारानंतर स्वतः लेखा विभागात जावुन कोणकोणत्या संस्थेस किती रक्कम दिली गेली याची माहिती घेतली मा. आयुक्तांनी कोणत्याही नगर सेवकां बरोबर असद्भाव केलेला नाही.

पत्रकारांनीही अशा प्रकारच्या बातम्या छापु नयेत मोहसिन अहेमद व लता दलाल हे आयुक्तांच्या विरोधात नाहीत परंतु चित्र असे रंगवले जात आहे की, आयुक्त व नगर सेवक यांच्यात बेबनाव आहे.

श्री. मोहसिन अहमद : आयुक्तांच्या विरोधात मी व्यक्तीगतरीत्या बोलत नाही आमच्या भावना दु:खावल्या म्हणुन मी हे सर्व बोललो.

मा. आयुक्त : सभागृहास वाटत असेल तर मी माझे अधिकार डेलीगेट करण्यास तयार आहे अधिकार माझ्याकडेच ठेवुन घेण्याची मला हौस नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ज्या संस्थेने निधीचा गैरवापर केला असेल त्या संस्थेची जरुर चौकशी करण्यात यावी. आयुक्त हे एकच असे अधिकारी आहेत की, ज्यांना सर्वजण घाबरतात. त्यांनी पॉवर डेलीगेट करु नयेत.

श्री. प्रदिप जैस्वाल : मी असा खुलासा केलेला आहे की, मी चेअरमन म्हणुन आयुक्तांना पत्र दिलेले आहे.

सौ. लता दलाल : मा. आयुक्त व नगर सेवक यांच्यात गैरसमज नसावेत यासाठीच मी हे बोलले आयुक्तांचा राजीनामा मागण्यासाठी मी बोलले नाही. आयुक्तांनी गैरसमज काढुन टाकावा या महानगरपालिकेस आपली आवश्यकता आहे.

श्री. नरेंद्र पाटील : मी उपस्थित केलेल्या विषयास वेगळेच वळण लागलेले आहे. सभागृहात ऐनवेळी असे विषय मांडले जातात की, त्यास काही नगर सेवकांची मंजुरी नसते. तरीही सर्वांचीच मंजुरी गृहीत धरती जाते. व ते मंजुर केले जातात. यापुढे प्रत्येक नगर सेवकाने स्वत:च्या लेटर हेडवर लेखी दिल्या शिवाय निधी देण्यात येवु नये.ठरावाची व्यवस्थित स्क्रुतीनी करुन नंतरच प्रस्ताव सभागृहासमोर मांडले जावेत.

(बरेचसे नगरसेवक एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

मा. महापौर : नगर सेवकाने स्वत:च्या लेटर हेडवर लेखी स्वरुपात दिल्यानंतर नगरसेवक स्वेच्छा निधी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. विषय क्रमांक १ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक २० ऑक्टोबर ९५ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/२ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा अस्थापनेवर ५ स्त्री सुरक्षा रक्षकांच्या जागा रिक्त आहेत. या रिक्त जागा मनपा अस्थापनेवर कार्यरत विविध विभागातील वर्ग-४ च्या स्त्री कर्मचाऱ्यांमधुन भरण्याचे अभिप्राय प्राप्त झाल्यानुसर परिपत्रव्दारे रिक्त जागेसाठी अर्ज मागविण्यात आले असता एकुण ६ स्त्री कर्मचाऱ्यांनी या पदासाठी अर्ज सादर केले. उपरोक्त पदाची वेतनश्रेणी रु. ८२५-१५-९०० द.से. -२०-१२०० अशी आहे वरील ६ कर्मचाऱ्यापैकी पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठण केलल्या निवड समितीने दिनांक ६-६-९५ रोजी बैठकीच्या अहवालानुसार खालील उमेदवारांची स्त्री सुरक्षा रक्षक म्हणुन नियुक्तीसाठी शिफारस केली आहे.

१) श्रीमती सुमिंद्राबाई सोनवणे (ए.टी)
२) श्रीमती. सुनिता देवराव भालेराव (ए.टी)

करिता निवड समितीने केलेल्या उपरोक्त दोन स्त्री सुरक्षा रक्षकांच्या वेतन श्रेणी रु. ८२५-१२०० मध्ये नेमणुकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ व प्रकरण तीन मधिल नियम २ नुसार प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. मोहसिन अहमद : पाच जागा असतांना केवळ दोनच जागा का भरल्या गेल्यात इतर तीन जागा रिक्त का ठेवण्यात आल्या याचा सभागृहासमोर खुलासा व्हावा.

मा. महापौर : आयुक्तांनी याचा खुलासा करावा.

मा. आयुक्त : मुलाखती घेतल्यानंतरच या जागा भरण्यात आलेल्या आहेत महानगरपालिकेत ज्या स्त्रिया काम करित आहेत त्यांच्यातुन या जागा भरण्यात आल्या आहेत.

श्री. प्रदिप जैस्वाल : महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यातुनच या जागा भरल्या जाव्यात.

मा. आयुक्त : महानगरपालिकेत कार्यरत दै वेतन कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी बनवण्यात आलेली आहे. त्यांच्यातुनच या उर्वरित जागा भरण्यात येतील.

मा. महापौर : विषय क्र. २ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये स्थापन समितीने शिफारस केल्यानुसार खालील स्त्री रक्षकांच्या वेतनश्रेणी रु. ८२५-१५-९०० द.रा.-२०-१२०० मध्ये नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) श्रीमती समिंद्राबाई सोनवणे (एस.टी.)

२) श्रीमती सुनिता देवराव भालेराव (एस.टी.)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की "महर्षि दयानंद सरस्वती" हे भारत वर्षाचे एक युगपुरुष होते १८५७ च्या क्रांतीमध्ये स्वामी दयानंद यांचे फार योगदान आहे. त्यामुळे अमरप्रित हॉटेल ते शहानुरमियाँ दर्गा ८० फुट डी.पी. रस्ता तयार करण्यात येत आहे. सदर रस्त्यास "महर्षि दयानंद मार्ग" असे नाव देण्यात यावे, त्याच प्रमाणे या ठिकाणी चौक तयार होत असुन सदर चौकाचे नाव "महर्षि दयानंद चौक" असे नामकरण केल्या जावे अशी आर्यसमाज औ'बाद यांची मागणी आहे.

संवाद

श्री. नरेंद्र पाटील : अशा प्रकारचे ठराव एक कमिटी स्थापन त्या कमिटीकडे ठेवण्यात यावेत व त्या कमेटीने असे ठराव सर्व साधारण सभेपुढे ठेवावेत. (अनेक स.सदस्य एकदाच बोलतात.)

श्री. कचरु नवपुते : समिती स्थापुन त्या समितीकडे असे प्रस्ताव पाठविण्यात यावेत. (रशिद मामु व इतर अनेक सदस्य एकदम बोलतात गोंधळात काहीच समजत नाही.)

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : काही ठराव सभेत मंजुर केले जातात व काही ठराव समितीकडे पाठविले जातात असे का? ठरावास आमचा विरोध नाही. इतर ठरावाप्रमाणे हा ही, रस्त्याचा नांव देण्याचा ठराव समितीकडे पाठवावा.

मा. महापौर : एका स.सदस्यांने एका वेळी बोलावे. सभागृहात शांतता शिस्त पाळावी. विरोधी पक्ष नेता व सभागृह नेता यांनी दोन-दोन नगर सेवकांची नावे द्यावीत. समिती बनवण्यात येइल.

याच वेळी काही स.नगसेवक स्थायी समिती असे सुचवितात, त्यास मा. महापौर मंजुरी देतात.

श्री. मोहसिन अहेमद : १९५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात ज्यांनी आपले योगदान दिले व भारतीय स्वातंत्र्यासाठी हौताच पत्करले. त्यांच्याही नावाचा विचार करावा.

मा. महापौर : ठराव क्रमांक ३ मंजुर करण्यात येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अमरप्रित हॉटेल ते शहानुरमियाँ दर्गा तयार करण्यात येणाऱ्या ८० फुट रस्त्यास "महर्षि दयानंद चौक" नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महापालिकेची बांधकामासाठी मार्च ९६ अखेर पर्यंत बरीचशी महत्वाची कामे शासनाच्या अनुदानाची कामे चालु असुन ते प्रगाति पथावर आहेत. शिवाय शाळा बांधणे, पुलाचे बांधकाम करणे, व्यापारी संकुल बांधणे, जलनिःसारणाचे पाइप टाकणे, पाण्याचा हापसा बांधणे, रोडसाठी दुभाजक बांधणे सांस्कृतिक हॉल बांधणे, वाचनालय बांधणे आणि स्टेडीयम बांधणे, महत्वाची कामे चालु असुन त्यासाठी संबंधीत विभागातुन सिमेंटची मागणी केली असता एकुण ८२५०० सिमेंट गोणीची आवश्यकता आहे, अशी माहिती मिळाली त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसुची वर्ष ९४-९५ नुसार पान क्र. ५ मधील जिल्हा दरसुची नोटीस मधील अ.क्र.१३ अन्वये प्रति ५० किलो रु. १०० प्रति गोणी रु. १०० असा दर आहे. तरी वरील सिमेंट खरेदी प्रमाणे एकुण ८२.५० लक्ष खर्च येइल. त्यास अंदाज पत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १३-१०-९५ ला मंजुरी दिली.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :

(अनेक नगर सेवक एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

मा. महापौर : विषय क्र. ४ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मार्च ९६ अखेर पर्यंत महानगरपालिकेची विविध कामे फार पाडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसुचि ९४-९५ नुसार जिल्हा दरसुची नोटीस अ.क्र. १३ अन्वये रु. १००/- प्रति गोणी (५० नुसार रक्कम रुपये ८२.५० लक्षचे ८२५.०० गोणी सिमेंट खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४/५ :**

औरंगाबाद शहराच्या योजना (वाढीव हद्दा) साठी मंजुरी देतांना शासनाने स.नं. २२२ हर्सुलच्या दक्षिण बाजुस असलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्रावरुन जाणारा ४५.०० मीटर विकास योजना रस्ता कायम ठेवला आहे. सदरील ४५.०० मिटर विकास योजना रस्ता जलशुध्दीकरण केंद्रावरुन नेणे प्रत्यक्षात व्यवहार्य नसल्याने या रस्त्याची आखणी बदलणे अनिवार्य आहे. त्यामुळे हर्सुल येथील स.न.२२६, २२९, २२२, २२१, मधील ४५.०० मीटर रस्त्याची आखणी "फिल्टर बेड" अबाधीत ठेवण्याच्या दृष्टीने वायव्यकडे आवश्यक आहे. सदरील रस्त्याच्या आखणीत बदल केल्यास बदलत्या रस्त्यांच्या दक्षिणेकडील पुर्वीच्या ना विकास क्षेत्राचा व पुर्वीचा ४५.०० मिटर रस्त्याने बाधीत क्षेत्राचा निवासी भागात समावेश करणे आवश्यक आहे. सदरील नव्याने रहिवाशी विभागात समाविष्ट होणारी जमीन सुमारे १७.०० हेक्टर आहे. मंजुर विकास योजनेतील ४५.०० मीटर रस्त्याची आखणी ही काही अंशी स.नं. १०८ मधील टेकडीवरुन जात आहे, त्यामुळे या रस्त्यांची स.नं. १०८ मधील आखणी दक्षिणेकडे सरकविणे क्रमप्राप्त ठरते.

करिता वरील मंजुर विकास योजना औरंगाबाद (वाढीव हद्दा) १९९१ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम (३७) अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करणे योग्य वाटते. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव करण्यास मान्यता व्हावी.

संवाद :

(काही सभागृह प्रस्ताव प्लनिंग कमिटीकडे पाठविण्या बाबत सुचना मांडतात. गोंधळामुळे काहीच समजत नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : हा प्रस्ताव कॉम्प्लीकेटेड आहे. यातुन संस्थेचे रिजर्वेशन हटवाण्याचे आहे की, रस्ता तयार करावयाचा हेच कळत नाही व यास खर्च किती येणार आहे?

श्री. प्रदिप जैस्वाल : प्लॅनिंग कमिटीने स्थळपाहाणी करुन त्यास मंजुरी द्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : विकास योजना १९९१ मध्ये मंजुर झालेली आहे. त्यास आता फेरबदल करता येणार नाही.

(अनेक स.नगर सेवक एकाच वेळी बोलण्याचा प्रयास करतात यातच सहाय्यक संचालक नगर रचना ठरावा बाबत माहिती देतात.)

सौ. अलका पाटील : सभागृहात कोण काय बोलत आहे हेच कळत नाही.

मा. आयुक्त : १९९१ मध्ये योजनेस मंजुरी झाल्यानंतर त्यात ज्या त्रुटी आढळुन आल्या त्या बाबत हा प्रस्ताव आहे, हा केवळ प्रस्ताव आहे की, विकास योजनेत सुधारणा करावी हे मायनर मॉडीफिकेशन आहे.

श्री. नरेंद्र पाटील, श्री. मेहेर आपले म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करतात, परंतु सभागृहातील गोंधळामुळे काहीच ऐकु येत नाही. मा. महापौर सभासदांना शांत राहण्याचे आवाहन करतात.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी लक्षपुर्वक ठराव ठेवावा. ४.५ दिवसात मला माहिती द्यावी व ठराव पुढील बैठकीत ठेवावा.

**ठराव :**

प्रस्ताव परत व्यवस्थितरीत्या तयार करण्यात यावा व पुढील सर्वसाधारण सभेत निर्णयासाठी

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे प्रस्ताव*

**विषय क्र. ८५/६ :**

स्थायी समिती ठराव क्र. १६१/१८ दि. १८-१०-९५ अन्वये स्थायी समिती ठराव क्र. १९ दि. ०९-०६-९५ रोजी स्थापन केलेल्य, टपरी उप समितीच्या अहवालास सर्वानुमते मंजुरी देवुन सर्वसाधारण सभेस शिफास केली आहे. या टपरी उपसमितीने तयार केलेल्या अहवालाची प्रत दि. २७-१०-९५ रोजी सर्व सन्माननिय सभासदांना यापुर्वीच वितरीत केली आहे.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. काशिनाथ कोकाटे व श्री. जावेद रज्जाक : प्रथम पुरवणी विषय पत्रिका क्र. १ घेण्यात यावी. सभागहात मनमानी करु नये.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मी सभागृहास विनंती केली होती की, मला कामानिमित्त मुंबईस जावयाचे आहे म्हणुन हा विषय प्रथम चर्चेस घेण्यात यावा.

श्री. मोहसिन अहेमद : स्थायी समितीने टपरी कमिटीचा बनवलेला अहवाल अत्यंत चागला बनवला आहे त्यामुळे त्यांचे अभिनंदन.

श्री. प्रदिप जैस्वाल : अहवालाच्या अनु. क्र. १७ वर "क्रांती चौक" हा भाग वगळावा अशी माझी सभागृहास विनंती आहे.

श्री. हमीदउद्यीन ताबा व श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : त्या त्या प्रभागास टपऱ्या देतांना संबंधीत नगरसेवकांची संमती घेण्यात यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : टपऱ्या देतांना त्या भागातील स्थानीक रहिवाशांना प्राधान्य देण्यात यावे.

श्री. गंगाधर गाडे : प्रशासनाने टपऱ्या देतांना त्या त्या भागातील नगर सेवकांना विश्वासात घेवुन टपऱ्या द्याव्यात.

सौ. लता दलाल : महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या टपऱ्यांचा नमुना जुन्या टपंऱ्यानाही लागु होणार का?

श्री. भगवान घडामोडे : ज्या टपऱ्या बऱ्याच काळापासुन बंद आहेत त्या टपऱ्या महानगरपालिकेने काढुन घ्याव्यात व गरजु लोकांना द्याव्यात.

श्री. मुजीब आलमशा खान : बऱ्याच ठिकाणी नगर सेवकांनीच कबजे केलेले आहेत याचीही आयुक्तांनी चौकशी करावी. ही व्यवस्था फक्त गरिब गरजु लोकांसाठी व्हावी.

श्री. बंडु ओक : श्री. मुजीब आलमशाखान याच्या मताशी मी सहमत आहे. मा. आयुक्तांनी गरजुंना व गरिबांना टपऱ्या देण्याची व्यवस्था करावी. तसेच टपऱ्यांची साईज काय ठेवणार?

श्री. विखारोद्यीन अहेमद : मागील १०-१० वर्षापासुन अनेक टपऱ्यांचे भाडे वसुल झालेले नाही ते वसुल कां होत नाही? तसेच बऱ्याचशा टपऱ्या मुळमालकांनी इतरांना किरायाने दिलेल्या आहेत.

मा. महापौर : मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : टपरी देतांना ती नियमानुसारच दिली जाइल. परंतु टपऱ्या देण्यासाठी पध्दत ठरवावी लागेल तसेच नगरसेवकांना विश्वासात घ्यावयाचे या बाबत जास्त खुलासा होणे आवश्यक आहे. एखाद्या नगर सेवकाने शिफारस केलेल्या ठिकाणी टपरी देता येत नसेल तर तो अविश्वास झाला का याचाही सभागृहाने खुलासा करावा. तसेच एकाच ठिकाणी टपरीसाठी अनेक अर्ज आले तर त्या ठिकाणी टपरी देण्यासाठी कोणती पध्दत अवलंबवावी याचाही खुलासा सभागृहाने करावा. या बाबत नियमावली बनवुन बैठकीत ठेवली जाईल.

सौ. लता दलाल : महिलांसाठीही काही टपऱ्यांसाठी जागा राखुन ठेवण्यात याव्यात.

मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थायी समितीने मनपा क्षेत्रात टपऱ्या देण्यासंबंधी बनविलेल्या अहवालास मंजुरी देण्यात येते. अहवालतुन "क्राती चौक, हॉटेल डालिंग चा दशिणेकडे रस्ता जेथलीया अपार्टमेन्ट कडे रस्त्यांवर उत्तर बाजुला" हा भाग मनपा हद्दीत नव्याने टपरीसाठी जागा उपलब्धन करुन देते, या उताऱ्यातुन वगळण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. तसेच टपऱ्या देण्यासंबंधाने नियमावली तयार करुन सभागृहापुढे पुढील बैठकीत ठेवावी.

## ***पुरवणी विषय पत्रिका***

**विषय क्र. ८६/७ :**

जिवणबाई तापडीया चॉरीटेबल ट्रस्ट या संस्थेने कै. मिनाताई ठाकरे स्मृति प्रित्यर्थ औरंगाबाद शहरातील वृध्दाश्रमांची गरज लक्षात घेवुन स्वखर्चाने वृध्दाश्रम बांधण्याची तयारी दर्शविली आहे. उक्त संस्थेने या सामाजिक कार्यासाठी नक्षत्रवाडी येथील गट क्र. ११४ (भाग) या जागेची निवड केलेली आहे. निवड केलेल्या या जागेवर सदरील संस्थेने सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन रितसर परवानगी मागीतली आहे. प्रशासनाने सदर संस्थेची बांधकाम परवानगी नामंजुर केली आहे.

जिवनबाई तापडीया चॉरिटेबल ट्रस्ट या सामाजिक संस्थेने एक स्तुत्य उपक्रम स्वखर्चाने राबविण्याची योजना हाती घेतली आहे. तेव्हा या उपक्रमांचे उद्दीष्ट लक्षात घेऊन औरंगाबाद शहर विकास योजना आराखडयात आराक्षण क्रमांक अन्वये उद्यानासाठी आरक्षीत असलेल्या जागेपैकी उक्त धर्मादाय संस्थेने वृध्दाश्रमासाठी केलेली ३ एकर जागा उद्यानाच्या आरक्षणातुन वगळुन सार्वजनिक वापरासाठी (पब्लीक युजसाठी) खुली करुन देण्यास मंजुरी देण्यात यावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
अनुमोदक : श्री. जयवंत ओक
श्री. सुभाष कच्छवाह

संवाद

(अनेक स. सभासद बोलण्यास सुरुवात करतात त्यात श्री. मुलिब आलमशाखान, श्री. कोकाटे सर्व स. सभासदांना बोलण्याची समान संधी द्यावी. अशी मा. महापौरांना विनंती करतात.)

मा. महापौर : सर्व सभासदांनी सभागृहात शांतता पाळावी व एका वेळी एकाच स. सभासदांनी बोलावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : महाराष्ट्र शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, प्रत्येक जिल्हयात वृध्दाश्रम स्थापन करण्यात यावेत. जिवनबाई तापडीया चॅरीटेबल ट्रस्ट स्वखर्चाने नक्षत्रवाडी येथील गट क्र. ११४ मध्ये अशा प्रकारचा वृध्दाश्रम स्थापु इच्छिते त्यास सभागृहाने मंजुरी द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : आमचा वृध्दाश्रमास विरोध नाही. कोणत्या नावावर हा ट्रस्ट असावा यासही आमचा विरोध नाही. या जागेचा एन.ए झालेला आहे काय? ही जागा आरक्षणात आहे काय? हे प्रथम पाहिले पाहिजे तसेच वृध्दाश्रमाने जेवढया जागेची पाहाणी केलेली आहे. तेवढयाच जागा आश्रमास देण्यात यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : श्री. नरेंद्र पाटलांच्या म्हणण्यास माझे अनुमोदन आहे. ठराव मंजुर करण्यापुर्वी या मुद्यांचा विचार करण्यात यावा.

मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

औरंगाबाद शहरातील वृध्दाश्रमांची गरज लक्षात घेवुन जिवनबाई तापडीया औरंगाबाद ट्रस्ट या संस्थेने कै. मिनाताई स्मृति प्रित्यर्थ स्वखर्चाने वृध्दाश्रम बांधण्याची तयारी दर्शविल्याने प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे जिवनबाई तापडीया चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस कै. मिनाताई ठाकरे यांचे स्मृतिप्रित्यथ्र नक्षत्रवाडी येथील गट क्र. ११४ (भाग) मधील ३ एकर जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या गट क्र. ११४ भाग मधील या संस्थेस देण्यात यावयाच्या जागेतील उद्यान आरक्षण वगळण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७/८ :**

औरंगाबाद महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासुन या शहराची मोठया प्रमाणावर झपाटयाने वाढ होत आहे. झपाटयाने वाढत असलेल्या या शहरात बांधण्यात येत असलेल्या घरांना बांधकाम परवानगी देणे, बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे, विकास निधीची आकारणी करणे आणि शहर विकास आराखडयाची रचना करणे या शहर विकास आराखडयानुसार आरक्षित जागेचा विकास करणे या कामासाठी महापालिका प्रशासनातर्गत असलेले सहाय्यक संचालक, नगर रचना या पदावर काम करणारे एक वरिष्ठ अधिकारी अपुरे पडतात.

करिता महापालिकेतील नगर रचना विभागाचे दोन भाग करुन सध्या कार्यरत असलेल्या संचालक नगर रचना या पदाकडे विकास आराखडा तयार करणे, मंजुर झालेल्या शहर विकास आराखडयातील आरक्षित जागाचा नियमाप्रमाणे पुढील विकास आराखडा तयार करणे आदी कामे सोपवावीत आणि मंजुर भुमि अभिन्यासनुसार नागरिकांना बांधकाम परवानगी देणे, दिलेल्या बांधकाम परवानगीनुसार बांधण्यात आलेल्या घरांना बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे विकास निधीची वसुली आदी कामासाठी नगररचना विभागामध्ये कार्यकारी अभियंता नगररचना हे वर्ग-१ या संवर्गातील (रु. ३००० ते ४५००) पद नगर

रचना मध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेले (पोस्ट ग्रेड इन टाऊन प्लॅनिंग) पद अर्हता असलेल्या एक पद निर्माण करुन महानगरपालिका अधिकाऱ्यांतुन योग्य पदोन्नतीने भरण्यात यावे.

सुचक : श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. बंडु ओक

अनुमोदक : श्री. डॉ. बी.के. कराड सौ. लता दलाल, श्री. नरेंद्र पाटील

संवाद

मा. महापौर : मा. आयुक्तांनी सभासदांनी मागणी केल्यानुसार विषयावर खुलासा करावा.

मा. आयुक्त : यापुर्वीच ठरल्या नुसार स्टाफिंग पॅटर्न ठरविण्याबाबत समिती स्थापन केली जाइल व त्या समितीकडे हा ही विषय अभ्यासासाठी सोपविला जाइल.

मा. महापौर : स्टाफिंग पॅटर्न समितीकडे विषय पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नगर रचना विभागाचे दोन भाग करण्या बाबतचा विषय स्टाफिंग पॅटर्न समितीकडे पाठविण्यात यावा. व स्टाफिंग पॅटर्न समितीच्या शिफारशी सर्व साधारण सभेपुढे ठेवण्यात याव्यात.

**विषय क्र. ८८/९ :**

संभाजी नगर (औरंगाबाद) शहराची झपाटयाने वाढ होत असुन, त्या सोबतच या शहरात अपघात, अकस्मित दुर्घटनाचे प्रमाण देखील वाढत आहे. रात्रीचे वेळी शहराचे कुठल्याही भागात अनुचित दुर्घटना घडण्यास अग्निशमन दलास पाचारण करण्यात येते. अशा वेळी आग लागलेली असल्यास अटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन जवानांना प्रथम त्या भागातील विद्युत पुरवठा खंडीत करावा लागतो त्यामुळे सर्वत्र अंधार पडतो व आग अटोक्यात आणण्यास विलंब लागतो परिणामी जिवीत व वित्तहाणी मोठयाप्रमाणात होते. अग्निशमन दल अद्यावत व सुसज्ज असणेसाठी आग विझव्याबंब तथा वाहनासोबत स्वतंत्र विद्युत जनरेटर्स तसेच त्यावर चालणारे जास्त प्रकाश मिळेल असे विद्युत दिवे, फोकस बसविण्यात यावेत, ज्यामुळे अग्निशमन जवानांना दुर्घटनास्थळी भरपुर प्रकाश मिळेल, त्यांना करणे सोपे होइल, तसेच जिवित व प्राणहानी टाळता येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. सुभाष कच्छवाह

अनुमोदक : श्री. विकास जैन

संवाद

मा. महापौर : अनुमोदक उपस्थित नसल्याने ठराव स्थगिक ठेवण्यात येतो.

ठराव :

अनुमोदक उपस्थित नसल्याने ठराव स्थागित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ८९/१० :**

औरंगपुरा ते बाराभाइ ताजिया (श्री. बाळकृष्ण मंदीर ते गुलमंडी) चौक हया रस्त्याचे रुंदीकरण लवकरात लवकर करण्यात यावे. १९७५ च्या विकास आरखडया प्रमाणे या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव यापुर्वीच झालेला आहे.

या रस्त्यावर वाढलेल्या रहदारी पाहाता रस्ता फारच लहान वाटतो. यामुळे वाहनधारक व पादचारी व व्यापारी या सर्वांनीच या अरुंद रस्त्यामुळे कुचंबणा होत आहे हे विचारात घेता या रस्त्याचे रुंदीकरणचे काम त्वरीत सुरु करण्यात यावे.

सुचक : श्री. सौ. लता दलाल.
अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर

संवाद
मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा ते बाराभाइ (श्री. बाळकृष्ण मंदिर ते गुलमंडी चौक) तापडीया हया रस्त्याचे रुंदीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०/११ :**

पीर बाजार येथे भरण्याऱ्या आठवडी बाजारमुळे स्थानीक रहीवाशी नागरिकांना अत्यंत त्रास होत आहे. या बाजारामुळे सदर रस्त्यावरील वाहतुकीस तसेच रहदारीस मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होतो. सदर बाजारासाठी सध्या असलेली जागा अपुरी पडते. बाजारात येणाऱ्या विक्रेते तसेच ग्राहकांना अपुऱ्या जागेपुढे अडचणी येतात. ग्राहक तथा विक्रेत्यांनी सदर बाजार अन्य विस्तृत जागी स्थलांतरीत करणे बाबत मागणी केली असुन त्यांचे मागणीचा आदर राखुन सदर आठवडी बाजार रामकृपा कॉलनी सर्व्हे नं. ४५ येथील नाल्यालगतच्या महापालिकेच्या खुल्या जागेत भरविण्यात यावा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. गिरजाराम हाळनोर
अनुमोदक : श्री. नरसिंग ढगे

संवाद
श्री. गिरजाराम हाळनोर : पीरबाजार येथील आठवडी बाजार महापालिकेतर्फे लिलाव पध्दतीने विकला जातो हा बाजार रस्त्यावर भरत असल्याने या भागातील रहदारीची मोठया प्रमाणावर कोंडी होते. तेव्हा हा बाजार रामकृष्ण कॉलनी येथील स.नं. ४५ येथील नाल्यालगतच्या मनपाच्या खुल्याजागेवर भरविण्यात यावा.

श्री. मोहसिन अहमद : ठरावाचे सुचक अथवा अनुमोदक जर हजर नसतील तर ठरावा वर चर्चा करता येत नाही.

श्री. नरेंद्र पाटील : विधी सल्लागार सभागृहाची दिशाभुल करीत आहेत. यापुर्वी अनेक ठरावांचे सुचक. अनुमोदक हजर नसतांना अशा ठरावांवर चर्चा करण्यात आलेली नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : जर स. सदस्यांने अधिकार पत्र दिलेले असेल तर अशा ठरावावर चर्चा करता येऊ शकते. या बाबत विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : कामकाज नियमावलीतील नियम क्र. १० प्रमाणे सदस्याने लेखी हमी पत्र दिल्यानंतर ठरावावर चर्चा करता येऊ शकते.

श्री. गंगाधर गाडे : स. हाळनोरांनी मांडलेला ठराव स्तुत्य आहे. यास आमचा विरोध नाही. या कामात भविष्यात अडचण येऊ नये एवढीच माझी धारणा आहे या जागेवर कोणाचे अतिक्रमण वगैरे आहे काय? तसेच या जागेवर बाजार भरावयाचा म्हटल्यास त्यावर किती खर्च होणार आहे याचा ही प्रथम विचार व्हावयास हवा.

आयुक्तांनी आपले मत प्रदर्शित करावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : या ठरावा बाबत स. नगरसेवकांने दिलेले अनुमतीपत्र सभागृहासमोर सादर करावे.

मा. महापौर : यापुढे एखाद्या स. सभासदास बैठकीस उपस्थित राहाता येत नसेल तर त्याने मांडलेल्या ठरावा बाबत अन्य सभासदाकडे संमती पत्र द्यावे.

मा. आयुक्त : बाजार हटविण्याबाबत माझे दुमत नाही मात्र जेथे बाजार हटवायचा ती जागा विकसित करण्यासाठी बराच खर्च होणार आहे. या जागेवर एका बाजुस अतिक्रमण झालेले आहे. एका बाजुस काही झोपडया बसलेल्या आहेत त्या काढाव्या लागतील व ही जागा विकसित करावी लागेल. यासाठी येणारे खर्चाचे एस्टीमेट सभागृहासमोर ठेवले जाइल.

मा. महापौर : ठराव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ९१/१२ :**

औरंगाबाद महापालिका अस्तित्वात आल्यापासुन या शहराची मोठयाप्रमाणावर झापाटयाने वाढ होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे सुविधा पुरविण्याचे महानगरपालिकेचे काम वाढत आहे. हे काम सध्या तीन कार्यकारी अभियंता करीत आहेत. परंतु त्याचा औरंगाबाद शहरामध्ये असलेल्या महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांच्या कार्यालयाशी समन्वय साधणे अवघड होते आहे. उदा. टेलीफोन,पी.डब्ल्यु.डी. परिसर अभियंत्रिकी, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, एम.आय.डी.सी., सिडको, पोलिस आयुक्त आणि महसुल इत्यादी कार्याल्याशी समन्वये व संपर्क साधावा लागतो. या सर्व कार्यालयाचे अधिकारी वरिष्ठ श्रेणीचे आहेत त्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधणे महानगरपालिकेला अडचणीचे होते. त्यासाठी महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता या श्रेणीमधील शहर अभियंता हे पद वरिष्ठ श्रेणी म्हणजेच अधिक्षक अभियंता या श्रेणीमध्ये रुपांतर करणे जरुरीचे आहे.

सुचक : श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. बंडु ओक
अनुमोदक : श्री. डॉ. बी.के. कराड, श्री. बन्सी गांगवे

संवाद

मा. महापौर : स्टाफिंग पॅटर्न समितीकडे पाठविण्यात यावा.

ठराव :

सदरच्या प्रस्ताव स्टफिंग पॅटर्न समितीकडे पुढील कार्यवाही साठी पाठविण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२/१३ :**

महानगरपालिकेमार्फत महापालिका हद्दीत बऱ्याच ठिकाणी काही गृहनिर्माण संस्था अथवा बिल्डर्स यांना स्वयंविकास (सेल्फ डेव्हलपमेट) या तत्वानुसार विकासनिधी (बेटरमेंट चार्जेस) न होता बांधकाम परवानगी देण्यात येते गृहनिर्माण संस्था किंवा बिल्डर्स त्या वसाहतींना सर्व नागरी मुलभुत सुविधा हव्या तशा उपलब्ध करुन देत नाहीत आणि दिल्याच तर त्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो. अशा संस्थांनी मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यात याल्या अशी खात्री झाल्या नंतर सदर गृह निर्माण संस्था अथवा खाजगी बिल्डर्सना बांधकाम परवाना देण्यात यावा.

सुचक : श्री. नरसिंग ढगे
सौ. लता दलाल

संवाद

मा. महापौर : विषय स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

विषय स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ९३/१४ :**

शिवशंकर कॉलनी या वसाहतीमध्ये श्री. ढेपे यांचे घरापासुन ते रविंद्रनगर पर्यंत सध्या २५ सार्वजनिक रस्ता अस्तित्वात असुन सदर रस्त्यावर अतिक्रमण आहे. विकास आराखडयात सदर रस्ता ४० फुट विकास रस्ता असुन सदर रस्त्यावरील अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद बनला असुन रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवुन सदर रस्ता ४० फुटरुंदकरणे अत्यावश्यक आहे. या रस्त्यावरील अतिक्रमण त्वरीत हटवुन सदर रस्ता ४० फुट रुंद विकास रस्ता तयार करणे, बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अविनाश कुमावत
अनुमोदक : श्री. प्रदिप जैस्वाल

संवाद

श्री. प्रकाश निकाळजे : या प्रकरणात कोर्ट मॅटर झालेले आहे किंवा कसे याची प्रथम पाहाणी करावयास हावी.

श्री. हमीदउद्दीन ताबा : हा कोर्ट मॅटर आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : हा कोर्ट मॅटर असेल तर कोर्टाच्या निर्णयानंतरच तेथे रस्ता बनविण्यात येइल.

श्री. अविनाश कुमावत : रस्त्यावरील अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद बनलेला आहे कोर्ट मॅटर असले तरी ठराव पारित करण्यात यावा व कोर्टाच्या निर्णयानंतर रस्ता रुंदीकरण करण्यात यावेत. ठराव मंजुर करण्यास हरकत नसावी.

मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

शिवशंकर कॉलनी या वसाहतीमध्ये श्री. ढेपे यांचे घरापासुन ते रविंद्रनगर पर्यंत अस्तित्वात असलेला २५ फुट रस्ता प्रस्तावात दर्शविल्यानुसार अतिक्रमणे हटवुन ४० फुटाचा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४/१५ :**

वार्ड क्र. ७६ मध्ये पुंडलीकनगर, गजानन कॉलनी, गजानन नगर, न्यायनगर, अलंकार कॉलनी, चैतन्यनगर, तिरुपतीनगर, छत्रपतीनगर, अशा प्रकारच्या अनेक अधिकृत व अनाधिकृत वसाहती असुन या भागाचा झपाटयाने विस्तार होत आहे.

वार्ड क्र. ७६ मधील अनेक विध वसाहतीपैकी पुंडलिनगर, न्यायनगर, गजानननगर, हुसैन कॉलनी, या भागात दैनंदिन मोलमजुरी करुन राहणारे मध्यमवर्गिय नागरिक राहतात या नागरिकांच्या मुलांसाठी शासकीय स्तरातील एकही शाळा या भागात नाही. त्यामुळे मोलमजुरी पोट भरण्याऱ्या भागातील नागरिकांची मुले शिक्षणापासुन वंचित रहात आहे. ही बाब लक्षात घेऊन या वसाहती करिता महापालिकेतर्फे किमान ७ वी पर्यंतची शाळा सुरु करण्यात यावी.

सुचक : श्री. विठ्ठलराव जाधव
अनुमोदक : सौ. ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे

संवाद

श्री. विठ्ठल जाधव : या भागामध्ये राहणारे नागरीक मोठया प्रमाणावर कामगार वर्गातील आहेत. येथील मुलांना जवळपास कोठेही शाळा नाही ही बाब लक्षात घेता या भागातील मुलांची सोय व्हावी यासाठी सातवी पर्यंतची शाळा सुरु करण्यात यावी.

श्री. काशीनाथ कोकाटे : हनुमाननगर, चिश्तिया कॉलनी, जयभवानीनगर, आंबेडकर नगर, या भागात शाळा उघडण्या बाबतही या ठरावात उल्लेख करण्यात यावा.

मा. आयुक्त : या वसाहती अनाधिकृत आहेत व अशा प्रकारच्या अनाधिकृत वसाहतींना मुलभुत सुविधा देण्यात याव्यात कां हा महत्वांचा मुद्दा आहे. एकदा शाळा सुरु केली की, इतरही सुविधा या भागास द्याव्यात लागतीलव या सुविधा देण्यासाठी खर्च मोठया प्रमाणावर येइल. परंतु या ठिकाणी महापालिकेची जागा असेल तर शाळा सुरु करण्याबाबत विचार करता येइल.

श्री. अविनाश कुमावत : ही जागा महापालिकेची आहे की सिडकोची आहे याचा प्रथम खुलासा करण्यात यावा.

श्री. विजयकुमार मेहेर : शैक्षणिक संस्थेसाठी सिडको सवलतीच्या दराने जागा देते. आपणास परवडत असेल तर ही जागा अवश्य घ्यावी.

श्री. अविनाश कुमावत : माझ्या महितीप्रमाणे ही जागा आता सिडकोची नाही या जागेवर तेथील लोकांनी २०X३० चे प्लॉट पाडलेले आहेत व विकलेले आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : त्या वसाहतीतच ही शाळा उघडण्यात यावी अशी मागणी नाही परंतु या वसाहतीच्या जवळपास जरी महापालिकेची जागा असेल तर तेथे शाळा सुरु करण्यास हरकत नाही.

मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वार्ड क्र. ७६ मध्ये पुंडलीकनगर, गजानन कॉलनी, गजानन नगर, न्यायानगर, हुसैन कॉलनी, या वसाहती करिता ७ वी पर्यंतची शाळा महापालिकेतर्फे सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/१६ :**

वार्ड क्रमांक. ७६ मधील न्यायानगर, हुसैन कॉलनी, या भागाला लागुन असलेल्या एन-३ जवळ खाजगी मालकीचा पोल्ट्री फॉर्मचा व्यवसाय चालु आहे. यापोल्ट्री फॉर्ममुळे आजुबाजुच्या नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. या बाबत नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केलेल्या आहेत. तेव्हा खाजगी मालकीचा पोल्ट्री फॉर्म त्वरीत हलवुन शहराबाहेर नेमण्यात यावा.

सुचक : श्री. विठ्ठलराव जाधव
अनुमोदक : सौ. ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे

संवाद

श्री. नरेंद्र पाटील : हा पोल्ट्री फॉर्म मागील २५ वर्षापासुन तेथे चालु आहे या पोल्ट्रीफॉर्मच्या बाजुस कोणतीही वस्तीनाही व या पोल्ट्रीफॉर्म पासुन आजुबाजुच्या लोकांना कोणताही त्रास नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : मनपाच्या हद्दीत हा पोल्ट्रीफॉर्म नाही हा विषय या सभागृहाचा नाही. सिडको व पोल्ट्री फॉर्म मालक यात वाद चालु आहे त्यामुळे हा विषय या सभागृहाचा नाही.

मा. महापौर : आयुक्तांनी स्वत: जागेची पाहाणी करावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : आज शहरात अशा प्रकारचे अनेक उद्योग चालु आहेत. अशा उद्योगापासुन महापालिकेस काही उत्पन्न मिळत आहे काय? याचा खुलासा व्हावा या कोंबडयाना जो आहार दिला जातो त्या आहाराची तपासणी महापालिकेचे पशुधन विकास अधिकारी करतात काय?

मा. आयुक्त : अशा उद्योगापासुन महापालिकेस किती उत्पन्न मिळते. याची सभागृहास लेखी माहिती दिली जाइल महापालिकेच्या कत्तलखान्यातुन जनावरांची जी कत्तलकेली जाते, त्यापुर्वी त्यांची तपासणी केली जाते. शहरात मोठया प्रमाणावर जनावरांची अवैध रित्या कत्तलही केली जाते. या साठी पोलिस विभागाच्या मदतीने एक स्कॅड स्थापन केलेले आहे.

मा. महापौर : आयुक्तांनी पाहाणी करुन पुढील कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रकारणात मा. आयुक्तांनी पाहाणी करुन अहवाल द्यावा व त्यानुसार पुढील कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६/१७ :**

महानगरपालिका आरोग्य केंद्र कैसर कॉलनी येथे कमीत कमी २० खाटांची व्यवस्था करुन रुग्णांना दवाखान्यात शरिक करण्याची व्यवस्था करावी कारण या भागाची लोकसंख्या ६० हजाराच्या आसपास आहे व रुग्णांना दवाखान्यात शरिक करण्याची गरज असल्यास त्यांना लांब जावे लागते.

सुचक : श्री. मोहसिन अहमद, श्री. मुश्ताक अहमद,
श्रीमती आबेदा बेगम
अनुमोदक : श्रीमती जाहेदा बेगम, श्रीमती. मोहसिना बिल्कीस

श्री. अजिज खॉ. गणी खॉ

संवाद

श्री. मोहसिन अहमद : विषय पत्रिकेवर ठराव बरोबर टंकलिखीत झालेला नाही माझ्याजवळ आरीजिनल ठरावाची दुसरी प्रत आहे सुचक, अनुमोदक नसतील तर असे ठरावच मुळात कार्यलयात स्विकारले जात नाहीत या भागातील जनसंख्या लक्षात घेता व जवळपास कोणतेही शासकीय वा महापालिकेचे रुग्णालय नाही ही बाब लक्षात घेता कैसर कौलनी अथवा रोषनगेट भागात महापालिकेचे २० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यात यावे.

मा. आयुक्त : शासकीय नॉर्मस प्रमाणे ५०,०००/- लोकसंख्येसाठी एक दवाखाना असवावयास पाहिजे. आपणास पुर्ण शहराचा एकदा अभ्यास करुन शहरात अतिरिक्त दवाखाने काढता येतील सर्वच ठिकाणी बेडेड हॉस्पीटल काढता येणार नाहीत. शहरात अतिरिक्त दवाखाने स्थापन करण्याबाबत अभ्यास करण्यासाठी एखादी समिती स्थापन करण्यात यावी व त्या समितीच्या निर्णयाप्रमाणे दवाखाने उघडण्यात यावेत.

श्री. बंडु ओक : मी मा. आयुक्तांच्या मताशी सहमत आहे.

श्री. मोहसिन अहमद : रोशनगेट भागापासुन शासकीय व इतर दवाखाने बरेच दुर आहेत. या भागातील लोकसंख्याही जास्त आहे. या भागातील नागरिकही महानगरपालिकेचे सर्व कर भरतात. मग त्यांना आपण काही मुलभुत सुविधा देणार की नाही?

श्री. मुजीब आलमशा खान : या भागातील सहा वार्डासाठी एकही दवाखाना नाही. शहरात काही ठिकाणी जवळ जवळच दवाखाने उघडण्यात आलेले आहेत. किराडपुरा सारख्या भागात राहणारी जनता ही गरिब आहे. त्यांना मुलभुत सेवा मिळाव्यात यासाठी या भागात असा दवाखाना उघडण्यात यावा.

मा. आयुक्त : माझा प्रस्तावाच्या मंजुरीस विरोध नाही. फक्त शहरात कोठे कोठे दवाखाने आहेत व कोठे असावेत याची प्रथम पाहाणी केली जावी असे मला वाटते.

श्री. विजयकुमार मेहेर : सर्वानुमते दवाखान्याची जागा ठरविण्यात यावी.

श्री. मंहमद मुश्ताफ अहमद : आज हा ठराव मंजुर करण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : या भागात जागा वगैरे उपलब्ध आहे काय? याची पाहाणी करुन २० खाटांचे हॉस्पीटल मंजुर करण्यास हरकत नाही.

श्री. वसंत देशमुख : एकाच वेळेस अशा प्रकारचे ठराव मंजुरीस्तव ठेवण्यात यावेत.

श्री. नरेंद्र पाटील : महापालिकेने सिडको कडील मागील सहावर्षापुर्वी दवाखाना ताब्यात घेतला त्याचेही व्यवस्था बरोबर पाहिली जात नाही.

श्री. गंगाधर गाडे : अशा प्रकारचे ठराव सभागृहात मांडण्यापुर्वी प्रशासनाच्या नजरेखलुन जावेत म्हणजे सभागृहाची वेळ वाया जाणार नाही. मोहसिन यांची मागणी योग्य आहे. कारण त्या भागात दवाखान्याची सोय नाही. मोहसिन यांनी दाखवलेल्या जागेवरच दवाखाना उघडावा असे नाही तर या भागात जेथे जागा असेल तेथे दवाखाना उघण्यात यावा.

श्री. जावेद रज्जाक : महापालिकेच्या जागेवरच दवाखाना उघल्यास महापालिकेच्या ही फायदा हाइल. जागा किरायाने घेण्यापेक्षा महापालिकेने स्वतःच्याच जागांवर दवाखाने काढावेत.

श्री. मोहसिन अहमद : दवाखाना कोणत्या नगर सेवकाच्या भागात असावा, या बाबत माझे काहीही म्हणणे नाही. मात्र या भागात दवाखाना झाला पाहिजे. एवढीच माझी मागणी आहे.

श्री. प्रफुल्ल मालाणी : किरायाच्या जागा घेऊन दवाखाने उघडण्यापेक्षा व त्या जागाचे भाडे भरण्यापेक्षा महापालिकेने स्वत:च्या जागेत दवाखाने उघडावेत एवढेच माझे म्हणणे आहे. वैद्यकिय समितीच्या शिफारसीप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. महापौर : वैद्यकिय समितीची शिफारस झाल्यानंतर व आयुक्तांनी स्वतः लक्ष घालुन पुढील कार्यवाही करावी.

(श्री. मोहसिन अहमद यांनी विषय पत्रिका फाडुन सभागृहात टाकतात व निषेध व्यक्त करतात.)

श्री. बंडु ओक, श्री. भगवान घडामोडे : श्री. मोहसिन अहमद यांनी विषय पत्रिका फाडुन सभागृहाचा अवमान केलेला आहे. त्यांना सभागृहाबाहेर काढण्यात यावे व त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात यावे.

मा. महापौर : मोहसिन अहमद यांनी सभागृहाचा अपमान केल्यामुळे त्यांचे एक दिवसासाठी सदस्यत्व रद्द करण्यात येते. तसेच वैद्यकिय समितीने अभ्यास करुन या भागात दवाखाना उघडण्याबाबत पुढील बैठकीत अहवाल ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैसर कॉलनी येथे २० खाटांचे रुग्णालय उभारण्याबाबत वैद्यकिय समितीने अभ्यास करुन दवाखाना सुरु करण्याबाबत आगामी सर्व साधारण सभेत अहवाल द्यावा व त्या अनुषंगाने कार्यावाही व्हावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ९७/१८ :**

महानगरपालिकेच्या उपलब्ध मोकळया जागेवर महानगरपालिकेच्या वतीने हेल्थ क्लब (व्यायाम शाळा) स्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचे त्वरीत बांधकाम करावे व माझ्या नगरसेवक निधीतुन सदरील व्यायाम शाळेसाठी साहित्य खरेदी करण्यात यावे. सदर मोकळी जागा नागसेन कॉलनीत उपलब्ध आहे त्याचे सि.स.नं. व शिट नं. ४८ आहे.

सुचक : श्री. मोहसिन अहेमद, श्री. महंमद मुश्ताक अहमद
अनुमोदक : श्रीमती जाहेदा बेगम श्रीमती मोहसिना बिल्कीस
श्री. अजिज खॉ गणी खॉन

**ठराव :**

सुचक/अनुमोदक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित करण्यात येतो. काही नगरसेवक घोषणा देत सभा त्याग करतात.

**विषय क्र. ९८/१९ :**

महानगरपालिका शिक्षण विभागात शाळांची संख्या व विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने शिक्षणाधिकारीचे पद वर्ग-२ ऐवजी वर्ग -१ चे करण्यात यावे कारण इतर महानगरपालिकेत हे पद वर्ग -२ चे आहे. म्हणुन आपल्या महानगरपालिकेत शिक्षणाधिकारी वर्ग -१ हे पद निर्माण करण्यात यावे.

सुचक : श्री. मोहसिन अहेमद
अनुमोदक : श्री. मो. मुश्ताक अहमद, श्री. अजिज खॉन

संवाद

मा. महापौर : प्रशासकीय बाब असल्याने प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षणाधिकारी हे पद वर्ग-१ मध्ये निर्माण करणे ही बाब प्रशासकीय असल्याने प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९/२० :**

श्री. रमेश भावराव नलावडे वाहन चालक उद्यान विभाग महानगरपालिका औरंगाबाद हे छातीच्या विकाराने गंभीर आजारी असुन जे.जे.रुग्णालय मुंबई येथे उपचार घेत आहेत. तेथील संबंधीत डॉक्टरांनी छातीचे वॉल बदलणे आवश्यक असल्याने शस्त्रक्रिया करण्याबाबत सुचविले असुन सदर शस्त्रक्रियेसाठी ६५,०००/- रुपये खर्च येइल असे सांगीतले आहे. छातीचे वॉल बदलणेसाठी शस्त्रक्रिया दि. १७-११-९५ रोजी करण्याचे निश्चित झाले असुन त्यानंतर दोन महिने उपचार घ्यावे लागणार आहेत. सदर वाहन चालकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने ते एवढा खर्च करण्यास असमर्थ आहेत. शस्त्रक्रिया करण्यासाठी व औषधोपचारासाठी आर्थिक मदत मिळणे बाबत त्यांनी विनंती केली आहे. श्री. रमेश भावराव नलावडे हे महानगरपालिकेचे कर्मचारी असल्यामुळे विशेष बाब म्हणुन त्यांना नगर सेवक स्वेच्छा निधीमधुन व महानगरपालिका फंडामधुन जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवुन देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. जयवंत ओक
श्री. प्रदिप जैस्वाल
अनुमोदक : श्री. प्रभाकर विधाते

संवाद

मा. महापौर : मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. रमेश भावराव नलावडे वाहन चालक उद्यान विभाग हे छातीच्या विकाराने गंभीर आजारी असुन जे.जे.रुग्णालय मुंबई येथे उपचार घेत आहेत. तेथील संबंधीत डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्या छातीचे वॉल बदलणे आवश्यक असल्याने सुचविले आहे. व त्यासाठी शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे. शस्त्रक्रियेस खर्च म्हणुन रु. ६५,०००/- (रुपये पासष्ट हजार फक्त) दर्शविले आहे. सदर वाहन चालकाची परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे एवढा खर्च करण्यास असमर्थ आहेत. शस्त्रक्रिया व औषध उपचारासाठी श्री. रमेश भाऊराव नलावडे हे महापालिकेचे कर्मचारी असल्यामुळे माणुसकीचा विशेष दृष्टीकोन ठेवुन मा. सभागृह स. नगर सेवकांच्या स्वेच्छा निधीमधुन किंवा महापालिका फंडा मधुन जास्तीत जास्त आर्थिक मदत अदाई करण्याची सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००/२१ :**

सौ. मथुरा भागचंद्र गरंवाल या गेल्या विस वर्षापासुन कर्क रोगामुळे आजारी असुन त्या मराठवाडा कॅन्सर हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार घेत आहेत. तेथील संबंधीत डॉक्टरांनी त्यांना पुढील औषधोपचार व वैद्यकिय खर्चा करिता अंदाजे ५०,०००/- रुपये खर्च येइल असे सांगितले असुन सदर महिलेची आर्थिक परिस्थती अत्यंत बिकट असल्यामुळे एवढा खर्च करण्यास असमर्थ आहे. सदर महिलेले आर्थिक मदत करणे बाबत विनंती अर्ज सादर केला असुन त्यानुसार त्यांना विशेष बाब म्हणुन नगर सेवक स्वेच्छा निधीमधुन अथवा महापालिका फंडातुन अधिकाधिक आर्थिक मदत देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. जयवंत ओक श्री. प्रदिप जैस्वाल
अनुमोदक : श्री. बन्सी गांगवे
श्री. प्रभाकर विधाते.

संवाद
मा. महापौर : मा. सभागृहाच्या कुठल्याही निर्णय झालेला नाही.

**विषय क्र. १०१/२२ :**

वार्ड क्र. ३० संजय नगर येथे आरोग्य केंद्र नाही. येथील लोकसंख्या कमीत कमी ५५६० (पाचहजार पाचशे साठ फक्त) असुन सर्व गरिब स्लम विभागातील आहेत. या सर्वाना औषधोपचारासाठी घाटी दवाखाना जावे लागते. त्वरीत उपचारासाठी जवळपास सरकारी एकही दवाखाना नाही म्हणुन त्यांना सरकारी रुग्णालयाची अत्यंत गरज आहे.

करिता विनंती की, या विभागात महानगरपालिकेने स्वखर्चाने आरोग्य केंद्र बांधण्याची कृपा करावी.

सुचक : श्रीमती नुरजहा बेगम अ. रहेमानखान
अनुमोदक : सौ. शकुंतला धांडे, सौ. अलका पाटील
सौ. माहसिना बिल्कीस

संवाद
मा. महापौर : स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. १०२/२३ :**

ढोरपुरा ही वस्ती भवानीनगर या वार्डामध्ये येते. अनेक वर्षा पुर्वी ढोरपुरा ही वस्ती वसलेली आहे. परंतु सदरील नांव तेथील सर्व नागरिकांची इच्छा असल्याने हया वस्तीचे नांव रोहीदास पुरा करण्यात यावे.

सुचक : श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे
अनुमोदक : श्री. अविनाश कुमावत

संवाद
मा. महापौर : मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भवानीनगर वार्डातील ढोरपुरा हया वसाहतीचे नामकरण रोहीदासपुरा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३/२४ :**

हॉटेल ॲम्बेसेडर समोर N-३ मध्ये चौक आहे. अद्याप या चौकास कोणतेही नांव देण्यात आलेले नाही. संत तुकाराम महाराजांचे स्वीय सहाय्यक संत पं.पु.श्री. संताजी जगनाडे महाराज यांनी संत तुकारामाची गाथा लिहिण्यास मोलाचे साहय केलेले आहे. अशा या थोर पुरुषाच्या नावाने म्हणजे पं.पु. श्री. संताजी जगनाडे महाराज चौक असे नामकरण करण्याचा ठराव मंजुर करावा.

सुचक : डॉ. विजयकुमार मेहेर

अनुमोदक : सौ. विमल नंदकुमार मुंडलिक.

संवाद

मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-३ मध्ये हॉटेल ॲम्बेसेडर समोरील चौकास संत पं.पु.श्री. संताजी जगनाडे चौक असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४/२५ :**

औरंगाबाद महानगरपालिकेचे नगर सचिव श्री. गोविंद विठ्ठल मगरे यांच्या मोतोश्रींचे दि. १२-११-९५ रोजी दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहात ००.०२ मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

तसेच त्यांचे कुटुंबियास शोक संदेश कार्यालयामार्फत पाठविणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. अ. जावेद रज्जाक

अनुमोदक : श्री. महादेव सुर्यवंशी

संवाद

मा. महापौर : मंजुर सभा सुरु होतांनाच श्रध्दांजली वाहण्यात आलेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगर सचिव श्री. गोविंद विठ्ठल मगरे यांच्या मोतोश्रींस सभागृहातर्फे ००.०२ मि. स्तब्धता पाळुन श्रध्दांजली देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १०५/२६ :**

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीच्या वेळी शहर सुधारणा आणि सौदर्यीकरणासाठी रुपये १०.०० कोटी अनुदान घोषित केले आहे. हे अनुदान महापालिकेस जानेवारी १९९६ मध्ये मिळणार असल्याने मा. सह. सचिव,नगर विकास विभाग यांनी कळविले आहे. हे अनुदान मार्च १९९६ पर्यंत खर्च करावयाचे आहे. त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समितीस सर्व साधारण सभा ठराव क्र. २२/१ दि. १६-६-९० अन्वये रुपये ५.०० लाख रकमेच्या अंदाज पत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत. तथापी या अनुदानाचे मर्यादेत हे अधिकार स्थायी समितीस रुपये २५.०० लाखापर्यंत वाढवावेत असे प्रशासनास वाटते. त्यामुळे स्थायी समितीच्या साप्ताहीक बैठकीत या अनुदानातुन यावयाच्या कामांना प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करता येइल. त्यामुळे प्रत्यक्षात कामे सुरु करण्यास लागणारा विलंब टाळता येइल आणि शासनाचे आदेशाप्रमाणे ३१ मार्च १९९६ पर्यंत अनुदान खर्च करणे महापालिकेस शक्य होइल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाने दिलेले अनुदान खर्च करतांना व इतर कामांना वेळीच मंजुरी मिळावी. या दृष्टीकोनातुन स्थायी समितीस रुपये २५ लाखा पर्यंतची कामे मंजुर करण्याच्या अधिकारास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६/२७ :**

मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेनुसार अग्निशमन विभाग औरंगाबाद व अग्निशमन विभाग वाळुज करिता होज पाईप व अग्निशमन साहित्य खरेदी करावयाचे आहे.

त्याकरिता सन १९९५-९६ या वर्षासाठी अग्निशमन केंद्र औ'बाद व उप अग्निशमन केंद्र वाळुजसाठी अनुक्रमे रुपये ५,००,०००/- व रुपये ७,००,०००/- अशी एकुण रुपये १२,००,०००/- ची आर्थिक तरतुद केलेली आहे.

तरी अग्निशमन विभागासाठी होज पाइप खरेदीसाठी अंदाजे खर्च एकुण रुपये ७,८२,२७५/- येइल.

होज पाइप खरेदीच्या खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरी व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

संवाद

श्री. गिरजाराम हाळनोर : अग्निशमन दलाकडे असलेली अपुरी साधने पाहाता शहर सौदर्यीकरणासाठी जो निधी वापरला जातो. त्यातील काही रक्कम अग्निशमन दलाची साहित्ये वापरण्यासाठी वापरली जावी.

मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन दलासाठी ९५-९६ या वर्षासाठी अग्निशमन केंद्र औरंगाबाद व उप अग्निशमन केंद्र वाळुजसाठी अनुक्रमे रुपये ५,००,०००/- व रु. ७,००,०००/- अशी एकुण रुपये १२,००,०००/- च्या तरतुदी पैकी अग्निशमन विभागासाठी रुपये ७,८२,२७५/- चे होज पाइप खरेदी करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०७/२८ :**

मा. आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पुंडलीकनगर गजानननगर, हनुमाननगर, मोतोश्रीनगर, हूसैन कॉलनी, न्यायनगर व दुर्गामाता कॉलनी येथे पाणी पुरवठा व्यवस्था करण्यासाठी तांत्रिक सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे पाणी पुरवठा करण्याकरिता योजना तयार करण्यात आली असुन परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

| अ. क्र. | | |
|---|---|---|
| १. | एकुण अंदाजित लोकसंख्या (संध्या ६८२५ घरे आहेत.) | ६२,२०० |
| २. | १.२ दशलक्ष लिटर्स क्षमतेचे २ जलकुंभ | रु. ५३,९२,८३२.०० |
| ३. | गरुतत्व वाहिनी ५००मि.मि. व्यासाची सी आय लांबी १६५० | रु. ६५,३२,५२१.०० |
| ४. | वितरण जलवाहीनी ६०० मि.मि. ते १०० मि.मि. व्यासाचे. (एकुण लांखी ३३.८९ कि.मी.) | रु. २,६३,०८,७९५.०० |

वरील योजनेस एकुण अपेक्षित खर्च रक्कम रुपये ३,८२,३४,१४८/- एवढा खर्च येणार आहे.

वरील वसाहत ही सिडकोच्या निर्देशित भागात (नोटीफाइड एरिया) अनाधिकृतपणे वसलेली आहे. ही योजना कार्यान्वीत करणे पुर्वी ५०% रक्कम ही लोकवर्गणी म्हणुन त्या वसाहतीमधील मालमत्ताधारकांकडुन महानगरपालिकेत जमा करुन घ्यावी लागेल व उर्वरित ५०% रक्कम ही महानगरपालिकेचा हिस्सा भांडवली खर्चामधुन करावयाचा किंवा सन १९९५-९६ साली मिळणाऱ्या शासकीय अनुदानामधुन करावयाचा या बाबत निर्णय होणे योग्य राहील. सदरील लोकवर्गणीपैकी प्रत्येक मालमत्ताधारकांकडुन ५०% रक्कम ही लोकवर्गणी पोटी रुपये ३,१७३/- होणे योग्य राहील.

तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

संवाद

मा. आयुक्त : या शहरातील अनाधिकृत वसाहतींना अनेक सुविधा नाहीत या वसाहतींना पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. टँकरव्दारे पाणी पुरवठा न करता नळाव्दारे पाणी पुरवठा करावा. इतर भागामध्ये आपण जेव्हा नागरी सुविधा पुरवितो. तेव्हा तेथील रहिवाशांकडुन बेटरमेंट चार्जेस घेतो. व या रकमेतुन सुविधा पुरवितो परंतु अनाधिकृत वसाहतीकडुन अशी रक्कम घेतली जात नाही. जर अनाधिकृत वसाहतींना सुविधा पुरवावयाच्या असतील तर त्यांच्या कडुनही काही म्हणतील रक्कम घ्यावयास पाहिजे. अन्यथा इतर भागातील लोक म्हणतील अनाधिकृत वसाहतीतील लोकांकडुन काहीही रक्कम न घेता त्यांना या सुविधा आपण कशा पुरविता. तेव्हा प्रशासनाने असा प्रस्ताव मांडला आहे की, पाणी पुरवठा करण्याबाबत अनाधिकृत वसाहतीतील नागरिकांनी ५०% वाटा उचलावा व मनपा ५०% वाटा उचलेल. सहा मोठया वसाहतींसाठी प्रायोगिक तत्वावर हा आराखडा तयार करण्यात आला आहे. या वसाहतीतुन साधारणतः सात हजार कुटुंबे राहातात. या सात हजार कुटुंबासाठी आपण एक पाणी पुरवठा योजना तयार केली असुन त्याची एस्टीमेटेड कॉस्ट साडेतीन लाख रुपये होते. यातील अर्धी रक्कम या सहा वसाहतीतील लोकांनी भरावयाची आहे. व अर्धी रक्कम महापालिका खर्च करेल. साधारणतः प्रत्येक कुटुंबास तीन हजार रुपये खर्च येइल. ही रक्कम तीन हप्त्यात वसुल केली जाइल. पहिला हप्ता भरल्यानंतर काम सुरु केले जाइल. काम प्रगतीपथावर असतांना दुसरा हप्ता घेतला जाइल व काम संपल्यानंतर तिसरा हप्ता घेतला जाइल. काही स. सदस्यांचे म्हणणे आहे की, रहिवाश्यांकडुन २५% रक्कम घ्यावी व महापालिकेने ७५% रक्कम खर्च करावी. तेव्हा यावर विचार करण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : हा प्रस्ताव योग्यच आहे यामुळे येथील लोकांना पिण्याच्या पाण्याची सोयही होऊ शकेल.

श्री. अविनाश कुमावत : ही रक्कम प्रशासन कशी वसुल करणार?

मा. आयुक्त : हया वसुल केल्या जाणाऱ्या रकमेचा स्वतंत्र रित्या हिशोब ठेवल्या जाइल. त्या बाबत स्थायी समितीची मंजुरी घेतली जाईल आजच्या बैठकीत केवळ धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. विजयकुमार मेहेर : ठरावात हनुमान नगरचा उल्लेख नाही. मला वाटते की यात हनुमाननगर चा समावेश करुन घ्यावा.

श्री. अविनाश कुमावत : महापालिका जो बेटरमेंट चार्ज वसुल करते. त्यातुन इतरही सुविधा पुरविते. जेथे आपण फक्त पाणी पुरवठाच करणार आहोत तेव्हा या भागातील रहिवाशांकडुन २५% रक्कम घेण्यात यावी.

डॉ. भागवत कराड : प्रस्तावात दर्शविण्यात आलेली रक्कम कमी आहे. ती तीन हप्त्यात तेथील रहिवाशांकडुन वसुल करण्यास हरकत नसावी.

मा. आयुक्त : ही योजना प्रायोगिक तत्वावर सहा वसाहतींसाठी लागु करण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव आहे. ही योजना यशस्वी झाल्यानंतर शहरातील इतर अनाधिकृत वसाहतींनाही लागु केली जाइल. मात्र लोकवर्गणीचा हिस्सा कमी केला तर पुढे महापालिकेवरील खर्च वाढणार आहे, ही बाब लक्षात घेऊन निर्णय घेणे योग्य राहील.

श्री. प्रकाश निकाळजे : ही रक्कम भरण्यास जर झोपडपट्टीतील लोक तयार झाले नाहीत तर इतर झोपडपट्टयांवर त्याचा भुर्दंड बसेल व विकास कामात अडथळे येतील. सर्व सामान्यांकडुन ५०% रक्कम घेण्यास आमचा विरोध आहे. ही योजना विशिष्ट वार्डासाठीच आहे, अशी त्यात दुरुस्ती करण्यात यावी व ठरावा बाबत सर्वांगीन विचार व्हावा.

डॉ. विजयकुमार मेहेर : या सवलतीमुळे इतरांवर अन्याय होणार नाही, याचीही काळजी घ्यावयास हवी. अनाधिकृत वस्त्या निर्माण करुन त्यास सुविधा मिळवुन घेणे ही प्रवृत्ती थांबली पाहिजे. त्या त्या भागातील सन्माननिय नगरसेवकांनीही अशा कामासाठी लोकांनी कर भरावेत अशी मानसिकता त्यांच्यात निर्माण केली पाहिजे. या वसाहतीतील लोकात कर भरण्याबाबत मानसिकता निर्माण करावी. व ५०% रक्कम भरल्यानंतर महानगरपालिकेने पाणी रस्ते ड्रेनेज, विद्युत अशा सर्वच सुविधा पुरवाव्यात.

श्री. विठ्ठल जाधव : या भागातील नागरिक हे मोलमजुरी करणारे आहेत. मनपाचे या भागास आतापर्यंत कोणत्याही सुविधा पुरविलेल्या नाहीत महापालिका इतर भागातील नागरीकांकडुनही ५०% रक्कम घेतल्यानंतर रस्ते, पाणी, ड्रेनेज या सर्वच सुविधा पुरविते या भागातील नागरिक हे मोलमजुरी करणारे असल्याने एवढी मोठी रक्कम भरु शकणार नाहीत. तेव्हा त्यांच्याकडुन २५ टक्के रक्कम घेऊन पाणी पुरवठा करण्यात यावा.

श्री. महादेव सुर्यवंशी : या वसाहतीतील लोकांनी ५०% रक्कम भरण्यात यावी हे खरे असले तरी जसे मालमत्ता करासाठी मालमत्तांची आपण अ,ब,क,ड अशी वर्गवारी केलेली आहे. तशीच वर्गवारी या भागातील मालमत्ताचीही करण्यात यावी व त्या वर्गवारीनुसार रकमेची टक्केवारी ठरविण्यात यावी. व ५०% व २५% या प्रमाणात रक्कम घेण्यात यावी. यासाठी शासनाकडुन निधी घेण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : या भागातील नागरिकांकडुन ठरावात दर्शविल्याप्रमाणे रक्कम घेऊन पाणी पुरवठा करण्यास हरकत नसावी.

श्री. विठ्ठल जाधव : या सहा वसाहतीत झोपडपट्टया आहेत व तेथे राहाणारे नागरिक गरिब आहेत. हे लोक ५०% रक्कम भरु शकणार नाहीत तेव्हा त्यांच्याकडुन २५% टक्के रक्कम घेऊन काम करण्यात यावे व ठराव मंजुर करण्यात यावा. सर्वच सुविधा देणार असाल तर ५०% रक्कम घ्यावी. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा ज्वलंत प्रश्न आहे.

डॉ. विजयकुमार मेहेर : ५०% रक्कम घेतल्यानंतर रस्ते, ड्रेनेज,विद्युत, पाणी या सर्वच सुविधा पुरवावयास पाहिजे. मग केवळ पाण्यासाठीच सर्वाचा आग्रह का? तेव्हा ५०% रक्कम तीन हप्त्यात वसुल करुन या वसाहतींना सर्वच सुविधा पुरविण्यात याव्यात.

श्री. गिरजाराम हाळनोर : ५०% रक्कम घेवुन या वसाहतींनाही सर्वच सुविधा पुरविण्यात याव्यात.

मा. आयुक्त : कोणत्याही रकमेचा उल्लेख न करता या भागात सुविधा देण्यासाठी जो काही खर्च येइल त्यांच्या ५०% रक्कम तेथील स्थानिक नागरिकांनी द्यावी व ५०% रक्कम महापालिका खर्च करेल. या भागात टँकरने पाणी पुरवठा करणे प्रशासनास शक्य होणार नाही. कारण येत्या उन्हाळयात या भागात मोठया प्रमाणावर पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा प्रस्ताव ठेवला आहे की, या भागातुन नळाव्दारे पाणी पुरवठा करण्यात यावा

या वसाहती अनाधिकृत असल्याने नियमानुसार तेथील रहिवाशांकडुन बेटरमेंट चार्जेस वसुल करता येत नाहीत. परंतु या वसाहतीतील लोकांना काहीतरी मुलभुत सुविधा देण्यात याव्यात म्हणुन हा प्रस्ताव विचारार्थ ठेवण्यात आलेला आहे.

श्री. मुजीब आलमशाह खान : या वसाहतीतील लोकांनी ५०% रक्कम भरली नाही तर त्यांना सुविधा पुरविल्या जाणारच नाहीत का? यासाठी लोकवर्गणीची रक्कम निश्चित करण्यापत यावी. अशा सुविधा पुरविण्यासाठी प्रथम सर्वे करण्यात यावा. अन्यथा नगरसेवकांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागेल.

मा. आयुक्त : प्रस्ताव मंजुर झाला तर शहरातील इतर अनाधिकृत वसाहतींना तो आपोआप लागु होइल.

श्री. अब्दुल जावेद : रज्जाक : हे लोक गरिब आहेत ते टॅक्सही भरु शकत नाही परंतु ते ५०% रक्कम भरु शकणार नाहीत.

मा. आयुक्त : हा प्रस्ताव झोपडपट्टीतील नागरिकांना सुविधा पुरविण्याचा नाही ज्या अनाधिकृत वसाहती आहेत, त्यांना पाणीपुरवठा करण्या बाबतचा आहे या अनाधिकृत वसाहतींना मुलभुत सुविधा पुरवावयाच्या की नाही हा पहिला मुद्दा आहे.

श्री. गंगाधर गाडे : मानवी दृष्टीकोन डोळयासमोर ठेवुन या वसाहतींना पाणी पुरपठा करण्याबाबत काहीतरी तडजोड झाली पाहिजे असा माझा आग्रह आहे.

मा. आयुक्त : हा प्रस्ताव शासनाने जाहीर केलेल्या झोपडपट्ट्यासाठी नाही. शहरातील जे भाग अनाधिकृतपणे विकसित झालेले आहेत. त्यांना आपण कोणत्याही सुविधा दिलेल्या नाहीत. मानवी दृष्टीकोन समोर ठेवुन या भागातील लोकांना पाणीपुरवठा केला जावा. यासाठी हा प्रस्ताव ठेवलेला आहे. या वसाहतींना सुविधा पुरविणे महापालिकेवर बंधकारक नाही, तथापी मानवी दृष्टीकोनातुन हा प्रस्ताव ठेवलेला आहे. व या भागांना पाणी पुरवठा करावयाचाच असेल तर लोक वर्गणी गोळा करणे गरजेचे आहे. महापालिका एवढा मोठा खर्च करुन शकणार नाही.

श्री. मुजीब आलमशाह खान : प्रथम सर्वे करण्यात यावा व अशा वसाहतींची नावे जाहीर करावीत अन्यथा अशा वसाहती वाढतच जातात.

श्री.वसंत देशमुख : प्रथम २५% रक्कम वसुल करण्यांत यावी. हा प्रयोग यशस्वी झाला तर पुढे रक्कम वाढवता येवु शकते.

डॉ. भागवत कराड : प्रस्ताव लागु करतांना त्या त्या वसाहतींतील प्लॅटस्च्या साईज पाहिली जावी. मोठे प्लॉटस् असतील तर त्यांच्या कडुन पुर्ण रक्कम घेतली जावी.

डॉ. विजयकुमार मेहेर : सर्वच अनाधिकृत वसाहतींसाठी हा ठराव लागु होणार असेल तर मंजुर करण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : पैसे भरुनही ज्या भागांना पाणी पुरवठा होत नाही, त्या भागाबाबत आपण काय करणार आहोत पुन्हा आशा अनाधिकृत वसाहती वाढणार नाही याचीही काळजी घ्यावयास पाहिजे तेव्हा येथील लोकांकडुन २५% रक्कम घेण्यात यावी याच बरोबर सिडको भागासही वेळेवर पाणीपुरवठा कसा करता येइल याचीही काळजी घ्यावी.

श्री. बंडु ओक : या साठी कमिटी स्थापन करण्यात यावी. संबंधीत वार्डातील नगरसेवक तेथील नागरिकांशी चर्चा करतील व जनतेचे म्हणणे ऐकुण घेऊन नंतर निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : हा प्रश्न सिडको नोटीफाइड भागाचा आहे त्या भागातील नगरसेवकांनी कमिटी स्थापन करुन निर्णय घ्यावा.

श्री. कचरु नवपुते : २५% रक्कम येथील लोकांकडुन घेण्यात यावी.

श्री. काशिनाथ कोकाटे व श्री. भगवान घडामोडे : सिडको भागास दोन-दोन दिवस पाणी पुरवठा केला जात नाही याचीही सभागृहात चर्चा करण्यात यावी.

मा. महापौर : सिडको नगरसेवक व संबंधीत अधिकारी यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येइल.

**ठराव :**

सिडकोचे नगरसेवक व संबंधीत अधिकारी यांच्याशी चर्चा करुन नंतरच प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलीकनगर, गजानन नगर, हनुमाननगर, मातोश्रीनगर, हुसैन कॉलनी, न्यायानगर, दुर्गामाता कॉलनी आदी वसाहतींना महापालिकेतर्फे पाणीपुरवठा करण्याबाबत व लोकवर्गणीची रक्कम ठरविण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १०८/२९ :**

मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, पडेगांव कत्तलखान्याचे अधुनिकीकरण करण्यासाठी पुढील ६ वर्षासाठी ३,४५,६०,०००/- चा प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचा आहे. एकुण खर्चाचे अंदाजे ५०% ते ७५% अनुदान मिळण्याची शक्यता आहे आणि उर्वरित रकमेची तरतुद अंदाजपत्रकामध्ये करावी लागेल. पुढे दर्शविल्याप्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करावयाचे आहे केंद्र शासनाकडुन मंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात केली जाईल.

| अ) | पहिला टप्पा | रुपये. |
|---|---|---|
| १. | जमिन खरेदी रस्त्याचे विकास वगैरे | ०२,७३,०००/- |
| २. | मोठया जनावराकरिता कत्तल हॉल स्थापत्य कामा करिता. | ६१,६२,०००/- |
| ३. | कत्तलहॉल मधील यांत्रिकी स्वरुपाचे कामे करणे व इतर साहीत्य. | ४७,००,०००/- |
| ४. | विद्युत कामे | १६,००,०००/- |
| ५. | इतर खर्च | २५,४५,०००/- |
| | एकुण रुपये | १,५२,८०,०००/- |
| ब) | दुसरा टप्पा | रुपये. |
| १. | लहान जनावरांकरिता कत्तलहॉल व त्यासाठी करण्यात येणारी स्थापत्य कामे. | ९७,५०,०००/- |
| २. | यांत्रिकी कामे. | ५८,५०,०००/- |
| ३. | विद्युत कामे. | ०७,००,०००/- |
| ४. | इतर कामे. | १७,८२,०००/- |
| | एकुण रुपये | १,८०,८२,०००/- |
| क) | तिसरा टप्पा | रुपये. |
| १. | जनावरांचे मार्केट कार्यालय चारा प्रोडक्ट करिता | ११,२३,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | मार्केट. | |
| २. | विद्युतीकरण. | ७५,०००/- |
| | एकुण रुपये | ११,९८,०००/- |

तसेच आज पर्यंत पडेगांव कत्तलखान्यावर रुपय ५८,४६,८४१/- इतका खर्च झालेला असुन त्यापैकी सुरुवातीला रुपये १६,२९,६४०/- खर्च करण्यात आला आणि त्यानंतर कत्तलखाना अधुनिकीकरणाचे काम म्हणुन रुपये ४२,१७,१९२/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. अधुनिकीकरणाच्या अधिन राहुन करण्यात आलेला खर्च रुपये ४२,१७,१९३/- आणि पुर्वीचे कामासाठी करण्यात आलेला खर्च रुपये १६,२९,६४९/- या प्रमाणे एकुण खर्च रुपये ५८,४६,८४१/- च्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक भारत सरकारकडे अनुदानसाठी पाठविण्यात येणार आहे. म्हणजे झालेल्या कामास मान्यता देऊन अनुदान देता येइल. अशी अपेक्षा आहे. तरील संपुर्ण पशुवधगृहाचे संपुर्ण अधुनिकीकरण करण्याकरिता महानगरपालिकेने रुपये ५८,४६,८४१/- खर्चा व्यतिरिक्त या पशुवधगृहाकरिता रुपये ०३,४५,६०,०००/- अपेक्षित असुन जे खाली प्रमाणे वर्षानिहाय करण्यात येइल.

| वर्ष | रुपये |
|---|---|
| १९९५-९६ | २०,००,०००/- |
| १९९६-९७ | ४०,००,०००/- |
| १९९७-९८ | ८०,००,०००/- |
| १९९८-९९ | ९०,००,०००/- |
| १९९९-२००० | ९०,००,०००/- |
| २०००-२००१ | २५,६०,०००/- |
| एकुण रुपये | ३,४५.६०,०००/- |

तसेच सन १९९५-९६ च्या अंदाजपत्रकामध्ये कत्तखान्याचे अधुनिकीकरण करण्यासाठी रुपये १०,००,०००/- तरतुद केलेली आहे. येत्या सहा वर्षामध्ये एकुण रक्कम रुपये ३,४५,६०,०००/- ची अंदाजपत्रकामध्ये तरतुद करावी लागणार आहे. तेव्हा वरील प्रमाणे प्रतिवर्ष अंदाजपत्रकांमध्ये तरतुद करणे आणि सन १९९५-९६ या वर्षाच्या अंदाजपत्रकात सुधारीत अंदाजपत्रक रुपय १०,००,०००/- वाढीव तरतुद करावी लागेल.

या प्रमाणे प्रस्ताव मान्य झाल्यास महाराष्ट्र शासनातर्फे ५०% ते ७५% अनुदान मिळण्याकरिता भारत सरकारकडे प्रकरण प्रस्तावित करण्यात येइल.

संवाद

मा. आयुक्त : सदरचा प्रस्ताव हा हाडे उकडण्याच्या कारखान्या संदर्भाने नाही. तर कत्तलखान्याच्या अधुनिकीकरणाच्या संदर्भाने आहे. हा कत्तलखाना स्थलांतरीत करण्याबाबत सध्या कोणताही प्रस्ताव नाही.

श्री. संजय जोशी : कत्तलखान्यासाठी महानगरपालिकेने एवढी रक्कम खर्च करण्याची आवश्यकता वाटत नाही. कत्तलखाना आहे त्याच स्थितीत ठेवावा.

सौ. रुख्मणबाई लोखंडे : कत्तलखाना या भागात ठेवण्यात येवु नये. तो तात्काळ या भागातुन हलविण्यात यावा. या कत्तलखान्यामुळे व हाडे उकळण्याच्या कारखान्यामुळे या परिसरातील लोकांना दुर्गंधीयुक्त वातरवरणास सतत

रहावे लागत आहे. त्यामुळे लोकांच्या आरोग्यावरही त्याचा परिणाम होतो तेव्हा हा प्रस्ताव तेथील जनतेच्या भावना लक्षात घेता मंजुर करण्यात येवु नये. हा प्रस्ताव मंजुर केल्यास मी आत्महत्या करेल त्यास सर्वजण जबाबदार राहतील.

मा. आयुक्त : ही योजना केंद्र शासनाची आहे या योजनेचा फायदा आपण करुन घ्यावयाचा की नाही ठरवायचे आहे.

डॉ. विजयकुमार मेहेर : एवढी मोठी रक्कम खर्च केल्यावर महानगरपालिकेस त्यापासुन महसुली उत्पन्न काय मिळणार आहे.

श्री. प्रभाकर विधाते : पडेगांव भागाकडे भविष्यात विधान भवन बांधण्यात येणार आहे असा शासनाचा प्रस्ताव आहे मात्र भाग अनाधिकृत पण हाडे उकळण्याचा कारखानाही चालु आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे. तेव्हा हा प्रस्ताव स्थागित ठेवण्यात यावा.

श्री. महादेव सुर्यवंशी : केंद्र शासनाकडुन या कत्तलखान्याच्या अधुनिकीकरणासाठी रक्कम घेऊन आपण हा कत्तखाना अधुनिक करणार आहोत. याचे अधुनिकीकरण झाल्यानंतर या भागातील दुर्गंधी १००% नष्ट होणार आहे का? जर अधुनिक कत्तलखाना उभारुनही या भागातील भागातील जनतेला दुर्गंधीयुक्त वातावरणात रहावे लागणार असेल तर प्रस्ताव मंजुर करण्यात येवु नये.

मा. आयुक्त : कत्तलखाना अधुनिक नसल्यानेच स्थानिक लोकांना त्रास सहन करावा आहे. या कत्तलखान्याचे अधुनिकीकरण करण्यासाठीच केंद्र शासन निधी देत आहे. हा निधी आपण जर घेतला नाही तर महानगरपालिकेच्या पैशातुन हा खर्च करावा लागेल. यासाठी कत्तलखान्याचे अधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. कारण महानगरपालिकेने या कत्तलखान्यावर खर्चही खुप केला आहे. त्यामुळे तो बंदही करता येणार नाही. मुंबईच्या देवनार कत्तलखान्याच्या धर्तीवरच याचे अधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

श्री. संजय जोशी : या कत्तलखान्याचे अधिनिकीकरण केले तर कत्तल होणाऱ्या जनावरांची संध्याही वाढेल. गोहत्वा विधेयक मंजुर झालेले आहे त्यामुळे इतरही अनेक अडचणी यातुन उद्‌भवतील.

सौ. लता दलाल : हा कत्तलखाना हलविण्यात यावा. यासाठी अनेकवेळा प्रशासनाकडे निवेदन देण्यात आलेली आहेत. अशातच या संदर्भाने मा. पालक मंत्र्यांकडेही निवेदन देण्यात आलेले आहे. व या भागातील हा कत्तलखाना हलविण्यासाठी नागरिकांची एक कृती समितीही स्थापन झालेली आहे. जनाविरोध असतांनाही कत्तलखान्याचे अधुनिकीकरण करण्याचा विचार होवुन नये असे वाटते. कत्तलखान्यासाठी इतरत्र जागा देण्यात यावी.

डॉ. भागवत कराड : पडेगांव हा भाग शहराच्या सध्याभागी येतो. जनविरोध लक्षात घेता हा कत्तलखाना वैजापुररोडकडे हलविण्यात यावा व तेथे त्याचे अधुनिकीकरण करण्यासाठी अनुदान मागण्यात यावे.

श्री. गंगाधर गाडे : या ठिकाणी आयुक्तांचा खुलासा विचारात घेणे महत्वावचे आहे. हा कत्तलखाना अधुनिक नसल्याने त्याचे अधुनिकीकरण करण्यासाठी शासना निधी उपलब्ध करुन देणार आहे. तो बोजा महानगरपालिकेच्या तिजोरीवर पडणार नाही. कोठेही हा कत्तलखाना हलविला तरी तेथील आजुबाजुच्या लोकांची त्याबाबत तक्रार ही राहीलच त्यासाठी या कत्तलखान्याचे आधुनिकीकरण केले तर दुर्गंधीही पसरणार नाही.

श्री. विजयकुमार मेहेर : केंद्र शासन यासाठी निधी उपलब्ध करुन देणार असेल तरी महानगरपालिकेस या प्रकल्पावरती स्वत:च्या फंडातुन पैसा खर्च करावा च लागणार आहे. तसेच या सुविधेपासुन महानगरपालिकेस काही सेवा कर महसुली उत्पन्न मिळणार आहे का हा ही प्रश्न आहे.

श्री. मुजिब आलमशाह खान : हा कत्तलखाना या परिस्थितीत तेथुन हटणार नाही यासाठी वेळही भरपुर लागेल तोपर्यंत येथील नागरिकांना त्रास होणारच आहे. यासाठी याचे अधुनिकीकरण करुन नंतर कत्तलखाना हटवण्याचा दुसरा एखादा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

श्री. मंहमद मुश्ताक अहमद : सर्व सभासदांनी आयुक्तांच्या निवेदनावर विचार करावा. केंद्र शासन कत्तलखान्याच्या अधुनिकी करणासाठी पैसा देत आहे. तेव्हा हा निधी घेऊन कत्तलखान्याचे अधुनिकीकरण करण्यात यावे. त्यामुळे या भागातील नागरिकांनाही त्रास होणार नाही.

सौ. लता दलाल : काही सदस्यांनी विचार मांडले की, कत्तलखाना कोठेही हलवला तरी जनतेला त्याचा थोडयाफार प्रमाणात त्रास होणाच आहे. म्हणजेच कत्तलखान्याचे अधुनिकीकरण केले तरी जनतेस थोडया फार प्रमाणात त्याचा त्रास होणारच आहे.

या कत्तलखान्यास विरोध असतांनाही आपण त्याचे अधुनीकीरण केले तर तो नंतर हलवता येणार आहे का? व हलवला तर त्यावर झालेला खर्च वाया जाइल. तेव्हा हा खर्च करण्यापुर्वी शहरापासुन १५.२० किलोमिटर लांब जागा घेऊन तेथे कत्तलखाना बांधण्यात यावा व त्याचे अधुनिकीकरण केले तर तो नंतर हालवता येणार आहे का व हलवला तर त्यावर झालेला खर्च वाया जाइल. तेव्हा हा खर्च करण्यापुर्वी शहरापासुन १५.२० किलोमिटर लांब जागा घेवुन तेथे कत्तलखाना बांधण्यात यावा. व त्याचे अधुनिकीकरण करण्यात यावे हेच जास्त उचित होइल.

श्री. अब्दुल जावेद रज्जाक : हा प्रस्ताव कत्तलखान्याच्या अधुनिकीकरणाचा आहे. कत्तलखाना हलविण्याचा नाही. महानगरपालिकेने आता पावेतो यावर बराच खर्च केलेला आहे. तेव्हा लोकांना त्रास होवु नये यासाठी प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री. बंडु ओक : प्रस्ताव सध्या स्थगित ठेवण्यात यावा.

श्री. महंमद मुश्ताक अहमद : कत्तलखाना हलविणे ना हलविणे हा स्वतंत्र प्रश्न आहे. परंतु आज तेथील नागरिकांना जो त्रास सहन करावा लागत आहे तो संपावा म्हणुन त्याचे अधुनिकीकरण करणे गरजेचे आहे.

मा. आयुक्त : या ठिकाणी दोन स्वतंत्र प्रश्न उभे झालेले आहेत. याच ठिकाणी हाडे उकळण्यांचा कारखाना आहे. तो बंद करण्यात यावा अशी मागणी होती या संदर्भाने कोर्टात केसही चालु आहे. कत्तलखाना अधुनिक बनवण्याबाबतचा हा प्रस्ताव आहे. हाडे उकळण्याचा कारखान्या संदर्भात नाही.

श्री. प्रभाकर विधाते : हाडे उकळण्याचा कारखाना बंद होत नाही. तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

अनेक सदस्य एकदम बोलु लागतात.

सौ. पदमा शिंदे : सौ. लोखडे सं. नगरसेविका बऱ्याच दिवसापासुन हाडे उकळण्याचा कारखाना बंद करण्याची मागणी करत आहेत. तरी हा कारखाना बंद करण्यात यावा.

मा. महापौर : सध्या हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

श्री. गंगाधर गाडे : केवळ विरोधासाठी विरोध करुन भावसिंगपुऱ्यातील जनतेचे आपण नुकसान करत आहोत. तेव्हा यावर शांतपणे निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : हा प्रश्न पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

तुर्तास प्रस्ताव स्थगित ठेऊन आगामी सर्वसाधारण सभेत पुन:विचारार्थ ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बायजीपुरा येथील ८० फुट डी.पी. रस्त्यावरील मोकळया जागेत दवाखाना व वाचनालयासाठी इमारत बांधण्याच्या कामासाठी सर्वाजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ चे जिल्हा दरसुचि अन्वये व स. नगरसेवक श्री. मुश्ताक अहमद यांचे मागणीनुसार रक्कम रुपये १४,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा. आयुक्तांनी सुधारीत अंदाजपत्रकात वाढीव तरतुद उपलब्ध झाल्याशिवाय काम हाती घेऊ नये या अटीवर दि. ७-९-९५ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे रक्कम रुपये १४,४०,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा, व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधुन सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढीव तरतुद उपलब्ध झाल्यावर काम हाती घेऊन खर्च करण्यात येइल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

मा. महापौर : पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सदरचा प्रस्ताव आगामी सर्व साधारण सभेत पुन्हा विचारार्थ ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/३१ :**

राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने औरंगाबाद येथे दिनांक ८ ते ११ डिसेंबर या काळात अंध कल्याण सप्ताह आयोजित करण्यात आला आहे, त्या करिता येणाऱ्या खर्चास सरळ हस्ते मदत करण्याच्या दृष्टीने नगर नगरसेवकांच्या निधितुन प्रत्येकी रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) किंवा त्या पेक्षा अधिक नगरसेवकांच्या इच्छेनुसार देण्यात यावे, आणि जर निधी संपला असेल तर नगरसेवकांच्या फंडतुन मदत देण्यात यावी. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. जयवंत ओक

अनुमोदक : श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय

संवाद

श्री. बंडु ओक : मी सर्व नगरसेवकांना विनंती करतो की, या अधिवेशनासाठी सर्वांनी स्वखुशीने मदत करावी कारण हे सर्वजण अंध आहेत तेव्हा नगरसेवकांनी स्वतःहोऊन पत्र द्यावे.

श्री. प्रकाश निकाळजे : जे नगरसेवक आर्थिक मदत देवु इच्छित असतील, त्यांच्या कडुन त्यांच्या लेटरहेडवर वैयक्तीकरित्या पत्र घेण्यात यावे व मगच त्यांच्या स्वेच्छा निधीतुन रक्कम काढण्यात यावी. अशी प्रस्तावात दुरुस्ती करावी.

श्री. मुजीब आलमशाह खान : यापुर्वी काही संस्थांनी नगर सेवक स्वेच्छानिधीचा गैरवापर केला गेलेला नाही. संस्थेचे रजिस्ट्रेशन आहे याची खात्री कार्यालयाने करावयास पाहिजे व केलेला खर्चाचा तपशील कार्यालयाकडे देण्यात यावा.

श्री. बंडु ओक : स्वेच्छा निधीतुन कोणी किती रक्कम द्यावी या बाबत आग्रह नाही. प्रत्येक स. सदस्यांनी स्वतःस वाटेल तेव्हा ही रक्कम द्यावी. या अधिवेशनातील सर्व व्यक्ती अंध असल्याने मी. स. नगरसेवकांना विनंती की, त्यांनी स्वतः होऊनच कार्यालयाकडे पत्र द्यावे. तसेच मी सर्व स. नगरसेवकांना विनंती करतो की, त्यांनी या अधिवेशनास उपस्थित रहावे.

श्री. गंगाधर गाडे : बंडु ओक यांचा प्रस्ताव स्तुत्यच आहे सर्व नगरसेवकांनी रुपये ५००/- प्रत्येकी या अधिवेशनास स्वेच्छा निधीतुन मदत म्हणुन द्यावेत.

श्री. प्रकाश निकाळजे : महापालिका ही एखादी अर्थसंस्था नाही की तिने सर्वच कार्यक्रमांना मदत करावी. ही मदत नागरिकांच्या मदतीसाठी असावी. नगरसेवकांनी असे ठराव ठेवतांना महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करावा. या अधिवेशनासाठी प्रत्येक नगरसेवकाने रुपये ५००/- देण्यास हरकत नसावी.

मा. महापौर : प्रत्येक नगरसेवकांने रुपये ५००/- आर्थिक मदत करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने औरंगाबाद येथे दिनांक ८-१२-९५ ते ११-१२-९५ या चार दिवसाच्या काळात अंध निवारण कल्याण सप्ताह आयोजित करण्यात आला आहे, त्या करिता येणारा खर्च बराचसा असुन अंधकल्याण सप्ताहास सहानुभुती दर्शवुन स. नगरसेवकांच्या निधीतुन रुपये १०००/- किवा त्यापेक्षा अधिकची मागणी केलेली आहे. परंतु सभागृहाने स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त) अदाई करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे. जर स.नगरसेवकांचा स्वेच्छा निधी संपला असेल तर स. नगरसेवकांच्या इतर फंडातुन देण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" राष्ट्रगीत झाल्यानंतर दुपारी ३.१५ वाजता सभा संपल्याचे मा. महापौरांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मा. नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

## बुधवार दि. २०-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

बुधवार दिनांक. २०-१२-९५ रोजी सकाळी ११.०० वाजता नगर भुवन (टाऊन हॉल) येथे मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षते खाली औरंगाबाद महानगरपालिकेची सर्व साधारण सभा संपन्न झाली.

"वदे मातरम्" या गिताने सभेची सुरुवात झाली सभेस खाली स. सदस्य उपस्थित होत. तसेच महानगरपालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | उप-महापौर |
| २) | सौ. रुख्मणबाई खंडेराव लोखंडे | स. सभासद |
| ३) | श्री. म.सलीम हनिफ कुरैशी | --//-- |
| ४) | श्री. प्रभाकर सिताराम विधाते | --//-- |
| ५) | श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ६) | श्री. ॲन्ड गणेश किशनराव वानखेडे | --//-- |
| ७) | सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ८) | सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| ९) | सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १०) | श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| ११) | श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | --//-- |
| १२) | श्री. नरेंद्र पाटील यादवराव | --//-- |
| १३) | श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १४) | श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १५) | श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १६) | श्री. बैनाडे कवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १७) | सौ. पदमा बाबुराव शिंदे | --//-- |
| १८) | श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| १९) | श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २०) | श्रीमती चंपाबाई पांचाळ | --//-- |
| २१) | सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २२) | श्री. फजलउल्लाखान अझमतउल्लाखान | --//-- |
| २३) | श्री. अजिज खाँ गणी खाँ | --//-- |
| २४) | श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा | --//-- |
| २५) | श्री. मोहंमद मुश्ताक अहमद | --//-- |
| २६) | श्री. वसंत विनायक देशमुख | --//-- |
| २७) | श्री. हाजी मोहसिन अहमद हाजी बशीर अहमद | --//-- |
| २८) | सौ. मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| २९) | श्री. अब्दुल जावेद रज्जाक | --//-- |
| ३०) | सौ. जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३१) | श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३२) | सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३३) | श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ३४) | श्रीमती पुष्पाबाई गंगावाल | --//-- |
| ३५) | श्री. हमियोद्दीन फसियोद्दीन ताबा | --//-- |
| ३६) | श्री. म.अ.रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| ३७) | श्री. स.अ.एकबालोद्दीन स.अ.कुतुबोद्दीन | --//-- |
| ३८) | श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल | --//-- |
| ३९) | श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४०) | श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ४१) | श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ४२) | श्री. संजय किसनराव केनेकर | --//-- |
| ४३) | श्री. फैय्याज अहमद कुरैशी | --//-- |
| ४४) | सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ४५) | सौ. लता दलाल | --//-- |
| ४६) | सौ. शकुंतला रामदास धांडे | --//-- |
| ४७) | श्री. अब्दुल रशिदखान (मामु) | --//-- |
| ४८) | श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्हवाह | --//-- |
| ४९) | सौ. सविता संजय आव्हाड | --//-- |
| ५०) | सौ. निर्मलाबाई विठ्ठल कांबळे | --//-- |
| ५१) | श्री. अ.रशिद अ. सत्तार | --//-- |
| ५२) | श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ५३) | श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | --//-- |
| ५४) | श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ५५) | श्री. गंगाधर सुखदेव गाडे | --//-- |
| ५६) | श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ५७) | श्री. जोशी संजय रामदास | --//-- |
| ५८) | श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ५९) | श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत | --//-- |
| ६०) | श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | --//-- |
| ६१) | सौ. राधाबाई सखाराम तळेकर | --//-- |
| ६२) | श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ६३) | श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ६४) | श्री. डॉ. विजयकुमार मेहेर | --//-- |
| ६५) | सौ. मंदाबाई धनंजय काळुशे | --//-- |
| ६६) | श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६७) | श्री. भगवान देविदास घडामोडे | --//-- |
| ६८) | श्री. कचुरु चंद्रभान नवपुते | --//-- |

संवाद

श्री. मोहसिन अहेमद : स. सभासद श्री. मुजीब आलमशाहखान यांची बहिण श्रीमती नियोजोद्यीन बेगम युनुस खॉ. वय ७० वर्ष यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील दि. ९ डिसेंबर १९९५ रोजी चिकलठाणा औद्यागिक वसाहतीतील मे. गरवारे प्लास्टीक ॲड पॉलिस्टर कंपनीत स्फोट होऊन कामागारांचे निधन झाले आहे. त्या कामगारांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

स. सदस्य श्री. मुजीब आलमशाह खान यांच्या भगिनी श्रीमती नियाजो बेगम युनुस खाँ वय ७० वर्ष स.श्री. यांचे बंधु आणि मे. गरवारे प्लास्टीक व पॉलीस्टर कंपनीत झालेल्या स्फोटात मरण पावलेले कामगार यांना सभागृहातर्फे ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री. नरेंद्र पाटील : गेल्या काही दिवसांपासुन सिडको तसेच शहरातील नागरिकांचे पाण्याबाबत जे हाल झाले, बिकट समस्या निर्माण झाल्या, त्यास विद्युत मंडळातर्फे होणारा विद्युत पुरवठयांचे तांत्रिक कारण सांगितले जाते. यापुढेही अशाच प्रकारे विद्युत पुरवठा खंडीत झाला तर पाण्यासाठी नागरिकांचे हाल होतील या बाबींचा विचार करता भविष्यातील संभाव्य अडचणीवर मात करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे तांत्रिक दृष्टया ठोस उपाययोजना होणे आवश्यक आहे. या बाबत सभागृहात निर्णय घेण्यात यावा. नुसते पाणी येणार नाही एवढे सांगुन चालणार नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : खंडीत वीज पुरवठयामुळे शहर/सिडको भागातील नागरिकांची पाण्यासाठी जी अडचणी निर्माण झाली यासाठी मा. महापौर यांनी महाराष्ट्र राज्य विज मंडळ, पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ व अन्य संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक होऊन चर्चा केली आहे त्या बाबत मा. महापौर खुलासा करतील.

मा. महापौर : स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांचे सुचने बाबत पुढील सभेत माहिती देण्यात येईल.

श्री. प्रदिप जैस्वाल : विषय क्र. १ चर्चेला घ्यावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका घेवुन ७-८ महिन्याचा कालावधी लोटला आहे. या कालावधीत नगर सेवकांनी स्वेच्छा निधीतुन त्यांचे प्रभागातील काम करण्याबाबत विविध विभागात पत्रक दिले आहेत. ती अद्याप पुर्ण झाली नाहीत. तेव्हा या कामांना वेळ का लागतो. याचा खुलासा व्हावा. तसेच प्रशासकीय काळात महानगरपालिकेतर्फे कचरा दाखवा आणि बक्षिस मिळवा अशी घोषणा करण्यात आली होती. या योजनेबाबत पुढे काय झाले याचा खुलासा व्हावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : मा. महापौरांनी पुढील विषया बाबत चर्चा करावी. हा विषय विषपत्रिकेवर नाही. सभासदांना ज्या प्रश्नाविषयी माहिती हवी असेल, तर सभासदांना सभेच्या पुर्वी नियमाप्रमाणे लेखी पत्र दिले तर प्रशासनास खुलासा करणे सोईचे होईल आणि पर्यायाने सभागृहाचा वेळ जाणार नाही. विषय क्र. १ वर चर्चा करण्यात यावी.

सौ. लता दलाल : महानगरपालिका वर्धापन दिना निमित्त जी स्मरणीय प्रसिध्द झाली त्या स्मरणीकेत ब्राम्हण समाजावर विशिष्ट आरोप करुन अवमान केला.

समाजाची मानहानी करण्याचा काही जातीवादी मंडळींनी प्रयत्न केला आहे. आम्ही संयमाने आतापर्यंत सहन शिलता बाळगली आहे. यापुढे असा अन्याय सहन केला जाणार नाही निषेध करण्यात येतो. इतर समाजाबाबत असा लेख प्रसिध्द झाला असता तर आतापर्यंत महानगरपालिका जाळली गेली असती. स्मरणिका प्रसिध्द होत असतांना संपादक मंडळ झोपलं होत असे वाटत.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) महानगरपालिकेतर्फे प्रसिध्द झालेल्या स्मरणिकेत औरंगाबाद असा उल्लेख करण्यात आलेला आहे. तो वस्तुत: औरंगाबाद शहराचे नांव बदल्याबाबतची शासकीय कार्यवाही अधिकृतरित्या शासनातर्फे पुर्ण झालेली नाही. तेव्हा या स्मरणिकेत औरंगाबाद ऐवजी संभाजीनगर नावाचा उल्लेख करण्यात आला. संभाजीनगर हे नांव वगळण्यात यावे.

श्री. संजय जोशी : स्मरणीका प्रसिध्द करतांना या बाबत आम्हाला काहीही माहिती दिली नाही. लेखामध्ये देशपांडे/कुलकर्णी असे लिहिले या बद्दल संपादक मंडळाने योग्य संपादक मंडळाने यापुढे खबरदारी घ्यावी.

सौ. लता दलाल : महानगरपालिकेतर्फे प्रसिध्द झालेल्या स्मरणिकेत ब्राम्हण समाजाबाबत जो उल्लेख करण्यात आला आहे. त्या बाबत संपादक मंडळाने योग्य दखल का घेतली नाही, याचा खुलासा करावा.

मा. महापौर : एकावेळी एकाच सदस्याने बोलावे.

श्री. संजय जोशी : महानगरपालिकेतर्फे प्रसिध्द झालेल्या स्मरणिकेत काही विशिष्ट व्यक्तींच्या लेखाचा समावेश दिसुन येतो. स्मरणिका प्रसिध्द करतांना अन्य व्यक्तींच्या लेखाचा समावेश केला नाही या बाबत सर्वांना माहिती देण्यात आली होती का?

मा. महापौर : श्री. नवपुते बोलतील.

श्री. कुचरु नवपुते : या स्मरणिकेत अनेक त्रुटी आहे. स्मरणिका प्रसिध्द करतांना औरंगाबाद शहराचे प्रथम महापौर या दृष्टीने माजी महापौर श्री. शांताराम काळे यांच्यासह पाच महापौरांचे फोटो व चांगले लेख स्मरणिकेत घेणे आवश्यक होते. परंतु संपादकीय मंडळाने साधे पत्रही माजी महापौरांना दिलेले नाही. अशा त्रुटी पुढे होऊ नये म्हणुन संपादक मंडळाला सुचना द्याव्या अनेक जुने सदस्य महानगरपालिके विषयी चांगले लेख देऊ शकतात.

श्री. संजय जोशी : महानगरपालिकेतर्फे प्रसिध्द झालेल्या स्मरणिकेत ब्राम्हण समाजाविषयी जातीवाचक लेख, संपादक मंडळाने कसा स्विकारला याचा खुलासा व्हावा.

श्री. गौतम खरात : स्मरणिकेसाठी मी दिलेल्या लेखात चुक काय आहे याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : स्मरणिकेचे संपादक या बाबत खुलासा करतील. स. सदस्य यांनी खाली बसावे. एकावेळी एकच सदस्य बोलतील सर्वानी खाली बसावे.

प्रकल्प संचालक : महानगरपालिकेच्यावतीने ८ डिसेंबर या वर्धापण दिनी जी स्मरणिका प्रसिध्द झाली. या स्मरणिकेबाबत सौ. दलाल व इतर सदस्य यांनी जो प्रश्न विचारला त्या बाबत सांगु इच्छितो. वेळेअभावी लेखाचा समावेश करु शकलो नाही. स. सदस्या कु. माया लाडवाणी यांनी स्मरणिकेबाबत पत्र दिले, त्याप्रमाणे संपादकीय मंडळ ठरविले. त्यात मा. आयुक्त प्रमुख संपादक आहेत. खुलासा केल्या प्रमाणे ८-१० दिवस हा वेळ फारच कमी होता. वेळ अभावी काही सभासदांचे लेख घेऊ शकलो नाही. तथापी स्मरणिकेच्या

मुखपृष्ठावर, स्मरणिकेत प्रकाशित झालेल्या विचारांशी संपादक सहमत आहेतच असे नाही, असा खुलासा आहे. स.सदस्या श्री. गौतम खरात यांच्या लेखात कोणत्याही समाजाचे मन दुखविण्याचा उद्देश नाही. त्यात मागासवर्गिय मुलांना शिक्षण द्यावे, आत्मपरिक्षण करावे. व आदर्श घेऊन समाज सुधारावा असा उद्देश आहे. गटार काढतांना ब्राम्हण मुलगा दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. हाच संदेश दलीत समाजात दिला आहे. दलित समाज रोजच ही कामे करतात, त्यात कमीपणा नाही. पण आदर्श घेवुन मोठ व्हावं. हाच उद्देश आहे. व ब्राम्हण समाजाचे अनुकरण करावे उद्देश आहे.

श्री. हमीद उद्दीन ताबा व श्री. रशिद मामु : औरंगाबाद शहराचे नाव बदलले नसतांना स्मरणीकेत संभाजीनगर उल्लेख कसा? स्मरणिकेत फोटो आहेत. ते योग्य नाहीत फोटो सुध्दा चांगले नाहीत.

मा. महापौर : एका वेळी एकाच सदस्यांने बोलावे बाकी सदस्यांनी खाली बसावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : मा. महापौर आपण एकावेळी एका सदस्यांस बोलण्याची परवानगी द्यावी. म्हणजे कुठला सदस्य काय बोलता हे कळेल.

श्री. संजय जोशी, सौ. रजनी जोशी : ब्राम्हण समाजा व्यतिरिक्त इतर समाजही सर्व बाबतीत पुढे गेला आहे. तेव्हा स्मरणिकेच्या लेखात ब्राम्हणांची विशेष नावे घेवुन उल्लेख केला गेला आहे, ही बाब योग्य आहे कां?

श्री. मुजीब आलमशाह खान : औरंगाबाद शहराचे नांव औरंगबाद असतांना संभाजीनगर कसे लिहीले याचा खुलासा व्हावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : मुखपृष्ठावर औरंगाबाद असाच उल्लेख आहे. वैयक्तीक लेखा बाबत त्या लेखकाचे मत आहे.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांनी खाली बसुन घ्यावे एका वेळी एकच सदस्य बोलतील.
(याचवेळी स. सदस्य आपआपसात जोरजोरात बोलतात त्यामुळे काहीही ऐकु येते नाही.)

श्री. गंगाधर गाडे : सभागृहात महत्वाच्या विषयावर चर्चा होत आहे. सभासदांचे आभार मानतो. त्यांनी डोळसपणे लेख वाचलेला आहे. तर कोणत्याही एका जातीवर टीका आहेत असे नाही उलट त्यातुन आदर्श घेतला पाहिजे.

१) या लेखातुन लेखकाने दाखले दिले आहेत. जो हजारी वर्षापासुन गुलामीत राहात आला आहे. त्याल दाखल्यामुळे गुलामीची चीड आली पाहीजे.

२) त्यामध्ये दलालताई किंवा त्याच्या समाजाचा अवमान करणे या बाबतची कवडीचीही भावना नाही तो लेख मी बारकाईने वाचला त्यात ब्राम्हणाचा मुलगा गटार साफ करतांना कोणी पाहिला का? हे उघड सत्य आहे. श्री. खरात काय, श्री विठ्ठलराव शिंदे, श्री. महात्मा ज्योतीबा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही त्यांचे लेखात असे दाखले दिले आहेत त्यातुन दलितांना मोठ होता आलं पाहिजे असं त्यांना वाटल पाहिजे. यात कोणतही आव्हाण नाही. उलट प्रबोधन झाल पाहिजे हाच उद्दशे आहे. तथापी संपादकांनी माहिती घ्यायला पाहिजे होती.

३) दलालताई किंवा इतरांना मत व्यक्त करण्याची संधी द्यायला पाहिजे होती त्यात काही लेख आम्ही आणिक वाचला असता, वाईट वाचुन घेण्याचे काहीच कारण नाही एवढा मला सांगायचय.

सौ. लता दलाल : स्मरणिकेतील लेख चांगला आहे. असे मत स. सदस्य श्री. गाडे यांनी व्यक्त केल आहे. मग दलीत समाजात मोठे झालेले लोक नाहीत का?

१) या समाजात उच्च पदस्य अधिकारी आहे. त्यांची उदाहरणे द्यावयाची असती. उदा. माजी प्रशासक श्री. मुन्शीलाल गौतम याची उदाहरणे देता आली असती लेखात फक्त ब्राम्हण समाजाचाच उल्लेख का?

२) आपल्या माहितीसाठी की, सिल्लेखाना येथील गटार साफ करण्यासाठी बी.ए. झालेली चार ब्राम्हणांची मुलं होती त्यांची शहानिशा झोन न. ४ मध्ये करु शकतात. हा उल्लेख या ठिकाणी करणे अत्यंत अयोग्य आहे. आजही दलीत समाजातील अनेक माणसं पुढे गेलेली आहेत. आपण री गंगाधर पानतावणे यांच उदाहरण का दिल नाही त्याचाही उदाहरण आपण देवु शकला असता विशिष्ट समाजाच उदाहरण देवु शकला असता. विशिष्ट समाजाच उदाहरण दयायला नको होत. तेव्हा यापुढे जातीयवादी प्रवृत्ती यापुढे करु नका.

मा. महापौर : आता स. सदस्य श्री. मेहेर साहेब बोलतील.

श्री. विजयकुमार मेहेर : स. सदस्य श्री. गाडे यांनी स्मरणिकेतील लेखाबाबत जे पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला. त्यांनी झाल्या प्रकाराबाबत चे निवेदन चांगुलपणाचे आहे. त्यांनी दिलगीरी व्यक्त केली असली तर समजु शकलो. असतो. यात ब्राम्हण समाजा ऐवजी उच्च वर्णीय किंवा पुढारलेला समाज शब्द प्रयोग असता तर आम्ही समजु शकलो असतो. लेखातील. शब्द प्रयोग दोन समाजात दरी निर्माण करणारा आहे. तेव्हा उरलेल्या स्मरणीका पत्रिकाचे वितरण करु नये. अशी मी विनंती करतो संपादकीय मंडळाने दिलगीरी व्यक्त करावी.

श्री. संजय जोशी : संपादकीय मंडळाने दिलगीरी व्यक्त करावी.

मा. महापौर : सर्व स. सभासदांनी खाली बसावे. सौ रजनी जोशी बोलतील सर्वांनी शांत बसावे.

सौ. रजनी जोशी : खरे ज्ञान जानेल तो ब्राम्हण मग देशपांडे कुलकर्णी यांचा नावाचा उल्लेख स्मरणिकेत का? उच्च वर्णिय असा उल्लेख का केला नाही?

श्री. गौतम खरात : घटनेने भाषा स्वातंत्र्याचे अधिकार दिलेले आहेत. कोणत्याही समाजाचे मन दुखविण्याचा उद्देश नाही. महानगरपालिकेमध्ये आज २००० सफाई कामगार आहेत. त्यात कोणते देशपांडे/कुलकर्णी काम करतांना दिसतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्री. महात्मा ज्योतीबा फुले श्री. राजश्री शाहु महाराज यांनीही त्यांच्या लेखात ब्राम्हण समाजाचा उल्लेख केला आहे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल हे बोलतील.

श्री. प्रदिप जैस्वाल : या विषयावर जास्त चर्चा न करता कोणत्याही समाजाची भावना दुखावणार नाही. यासाठी संपादकीय मंडळाने दखल घेण्याची ताकीद देण्यात यावी. महानगरपालिकेच्या वर्धापनदिना निमित्त जी स्मरणिका प्रसिध्द झाली, त्यातील लेखा बाबत स. सदस्य सौ. दलाल श्री. जोशी यांनी आक्षेप घेतला आहे. त्याचा खुलासा श्री. खरात यांनी केला असेल तर स. सदस्य सौ. दलाल श्री. जोशी यांची भावना लक्षात घ्यावला पाहिजे. खरातांच म्हणण तस नसल तरी विशिष्टपणे ब्राम्हण समाजाचा हेतु खरातांचा नसला तरी माझ्या सहकारी सदस्यांना तसे वाटत असेल तर माझी संपादकीय मंडळाला विनंती आहे की, कुणलाही लेख देतांना कोणताही समाज असो मग तो

मुस्लीम असो. ब्राम्हण, हिन्दु असो किंवा इतर कोणताही समाज असो, कुठल्याही समाजाची भावना वाक्य, चांगल असल तरी त्यातुन निघनारे अर्थ वेगवेगळे असतात. या संपादकीय मंडळात संपादक म्हणुन आयुक्त यांचे नाव आहे. आज ते सभागृहात नाहीत म्हणुन संपादक मंउळाचा इतर सदस्यांनी माफी मागावी अशी माझी भावना आहे.

श्री. विजयकुमार मेहेर : संपादकीय मंडळास ताकीद देण्यापेक्षा दिलगीरी व्यक्त करावयाला लावा.

श्री. हमीदउद्दीन ताबा व श्री. रशिद मामु : स्मरणिकेच्या लेखातील संभाजीनगर हे नावही कट करावयाला लावा.

यावेळी स. सदस्य आपआपसात जोरजोराने बोलत असतात.

मा. महापौर : स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील हे बोलतील.

श्री. नरेंद्र पाटील : १) मा. महापौरांनी कुठलीही परवानगी दिलेली नसतांना या विषयाची चर्चा सुरु झाली आहे. या पुढेही विशेष काळजी घ्यावी. या विषयाला जातीय वळण लागत आहे. तेव्हा जास्त चर्चा होता कामा नये.

३) ही स्मरणिका सगळयाकरता छापलेली नाही. एका ठराविक मर्यादेपर्यंत आहे. त्यात फक्त औरंगाबाद हाच उल्लेख असावा. स.सदस्य श्री. खरात यांच्या लेखातील विधान चुकीचे आहे. तसेच लेखातील संभाजीनगर हे नावही कट करावयाला हवे या बाबत संपादकीय मंडळाने माफी मागुन प्रकरण संपवावे, ही स्मरणिका प्रायव्हेट सरक्युलेशनसाठी तिच्यात असा उल्लेख असु नये यांची संपादकाने दखल घ्यावी.

मा. महापौर : संपादकीय मंडळाने व्यवस्थित लेख घेण्यात येतील याची दक्षता घ्यावी मुखपृष्ठावर औरंगाबाद हे नाव आहे. जो पर्यंत जी.आर. येत नाही तो पर्यंत आम्ही छापणार नाही. संपादक सदस्यांनी दिल्लगीरी व्यक्त करावी.

श्री. गौतम लांडगे : संपादकांने माफी मागु नये. चेअरमन यांनी प्रथम संपादकांना ताकीद देण्याचा उल्लेख केला. काही नगरसेवकांची मागणी पाहुन त्यांनी माफी मागावी असा आग्रह धरला तर संभाजीनगर शब्दाबद्दल ही माफी मागावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : आम्ही माफी मागण्याची मागणी केली आहे.

सौ. लता दलाल : संपादकीय मंडळाने दिल्लगीरी व्यक्त करावी. आम्ही अजुनही बाळगुन आहोत.

मा. महापौर : संबंधीत संपादकिय सदस्यांनी लवकर दिल्लगीरी व्यक्त करावी. विषय चर्चेला घ्यावयाचे आहे.

प्रकल्प संचालक : स्मरणिका प्रसिध्द करतांना स्मरणिकेमध्ये ज्या चुका झाल्या आहेत. त्या बद्दल दिल्लगीर आहोत.

**विषय क्र. ११९/१ :**

दिनांक १६-१०-९५ रोजी सर्व साधारण सभा व दि. १८-११-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

श्री. गिरजाराम हाळनोर : मा. आयुक्त शहरातील सार्वजनिक विद्युत व्यवस्थांचे काम कंत्राट पध्दतीने देण्यात येइल अशी घोषणा केली आहे. वस्तुतः सर्वाजनिक

दिवाबत्तीचे खाजगीकरण करणे ही बाब धोरणात्मक बाब असुन या धोरणात्मक बाबींवर सर्वसाधारण सभेत निर्णय घेणे आवश्यक आहे. तथापी सर्व साधारण सभेच्या मंजुरीपुर्वी मा. आयुक्त यांनी वरील विषयाची जाहीर घोषणा करणे म्हणजे सर्व साधारण सभेचे अधिकार वापर आहेत यावर विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

या शिवाय शासनाच्या आदेशा नुसार पदवीधर अभियंत्याना कंत्राटी कामे देण्यात यावी असे असले तरी मा. आयुक्त आपल्या अधिकारात महानगरपालिकेची विविध कामे देतात कंत्राटी कामे देण्याबाबतही स्थायी समितीचे अधिकार आहेत सर्व साधारण सभेचे अधिकार आहेत.

मा. आयुक्त : मा. आयुक्तांनी सार्वजनिक दिवा बत्तीचे कामाचे खाजगीकरण बाबत स्वतंत्रपणे निर्णय घेता येणार नाही असा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवला जाईल.

मा. महापौर : स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील हे बोलतील

श्री. नरेंद्र पाटील : स. सदस्य सभासदांनी सुचविलेल्या विषयावर मा. आयुक्त यांचे गैरहजरीत चर्चा करणे योग्य होणार नाही. मा. आयुक्तांनाही त्यांचे व्यक्त करण्याचा अधिकार आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : मा. आयुक्तांना त्यांचे मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे याला आमचा विरोध नाही. पण त्यांनी जर म्हटलं असल की, हे माझ मत आहे तर योग्य झाल असत.

मा. महापौर : पुढच्या सभेत मा. आयुक्त असतील त्यावेळी तो विषय आपण घेऊ विषय क्रमांक १ चर्चेस घेण्यात येतो.

श्री. मोहसिन अहमद : सभागृहातील माईक (एक/दोन/तीन) बंद आहेत. त्यामुळे विषयातील चर्चे बाबत सभागृहात कसे बोलवे. एका माइकचा तिन/चार सभासदांना वापर करावा लागत आहे. सभागृहातील माईक जाणुन बुजुन बंद ठेवले जातात विषय क्र. १ ची स्विकृती अद्याप झालेली नाही.

श्री. हमिदउद्दीन ताबा : सुराणानगर, प्रतापनगर येथील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसाठी मांडला असता तो विषय पत्रिकेवर का घेण्यात आला नाही. याचा खुलासा व्हावा.

श्री. नरेंद्र पाटील : सभेच्यावेळी प्रशनोत्तरासाठी एक तास ठेवण्याचा नियम आहे. तेव्हा यापुढे एक तास प्रश्नोत्तरासाठी ठेवण्यात येईल असे जाहीर करावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : नियमाप्रमाणे अर्धातास प्रश्नोत्तरासाठी घेण्यात येतो स.सदस्य श्री. हमिदउद्दीन ताबा यांच्या प्रस्तावा बाबत खुलासा करावा.

नगर सचिव : स. सदस्य श्री. हमिदउद्दीन ताबा यांचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महापौर यांचेकडे सादर केला असता, नगररचना विभागाचा अभिप्राय घ्यावा असा अभिप्राय दिल्यामुळे सदर प्रकरणी नगर रचना विभागाचा अभिप्राय घेण्यात येत आहे, असे पत्र स. सदस्य यांना देण्यात आले आहे.

श्री. हमिदउद्दीन ताबा : स्थायी समितीचे सभापती यांच्या रुटींग प्रमाणे सदर प्रश्न सर्व साधारण सभेत मांडला होता. सभापतीच्या रुटींगला काही अर्थ आहे का नाही? हा प्रस्ताव रद्द आहे का?

श्री. प्रदिप जैस्वाल : सभासदांच्या लक्षात त्यांचा प्रश्न आला असेल. या सभागृहाची एक प्रथा आहे. या सभागृहामध्ये जो प्रश्न मांडण्यात येतो. तो सात दिवस अगोदर विशिष्ट फॉर्ममध्ये सचिवाकडे देण्यात यावा. त्या प्रश्नाचे उत्तर

सभागृहात येण्यापुर्वी त्या सभासदाकडे दिले जाते. त्यांचे समाधान झाले नाही तर त्याचावर सभागृहात चर्चा करता येते. सचिवांना त्यांची प्रत दिली आहे. सचिवांनी सविस्तर माहिती द्यावी. असे आदेश सचिवांना द्यावेत.

श्री. हमिद उद्दीन ताबा : आमचा विषय पत्रिकेवर क्र. ३ चा विषय कसा घेतला

श्री. रशिद मामु : प्रस्ताव उप-समितीकडे वर्ग करण्यात आला आहे. असा खुलासा केला मागील सभेतील अन्य नामांतराचे प्रस्ताव याच उपसमितीकडे वर्ग करण्याचा निर्णय सर्व साधारण सभेत घेतला आहे. त्यानंतरही आजच्या विषय पत्रिकेवर नामांतराचा प्रस्ताव ठेवला जातो. या बाबत महापौरांनी निर्णय घ्यावा. व ज्यांनी हा प्रस्ताव ठेवला त्यांना निलंबित करावे हा महापौरांचा अपमान आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : स. सदस्य श्री. अब्दुल रशिदखान (मामु) यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो योग्य आहे. कारण महापौरांनी जो निर्णय दिला तो प्रस्ताव यानंतरच्या मिटींग मध्ये घेवु नये, म्हणुन तो प्रस्ताव ज्या संबंधीत अधिकाऱ्यांनी मांडला असेल त्यांना ताकीद देण्यात यावी यानंतर ज्या शेवटी संधी म्हणुन यापुढे मोहल्याचे नांव देण्याचे प्रस्ताव संबंधीत कमिटीपुढे पाठविण्याची ताकीद दयावी व आदेश द्यावेत, की यापुढे संबंधीतांनी दक्षता घ्यावी. असे आदेश द्यावेत.

मा. महापौर : रस्त्यास नांवा देणे अथवा थोर व्यक्तीचे पुतळे उभे करणे या बाबत नगरसेवकांचा अथवा प्रशासकीय प्रस्ताव असला तरी असे प्रस्ताव सर्व साधारण सभेत ठेवले जाणार नाहीत याची संबंधीतांनी दक्षता घ्यावी असे आदेश द्यावे.

मा. महापौर : रस्त्यास नांव देणे अथवा थोर व्यक्तीचे पुतळे उभे करणे याबाबत नगरसेवकाचा अथवा प्रशासकीय प्रस्ताव असला तरी असे प्रस्ताव सर्व साधारण सभेत ठेवले जाणार नाहीत. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी अन्यथा यापुढे असे प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवले गेले तर नियमाप्रमाणे कडक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

(या नंतर एकाच वेळी अनेक सदस्य आपसात जोरजोरात बोलतात काहीच ऐकु येत नाही.)

मा. महापौर : एकावेळी एकच सदस्य बोलु शकेल.

श्री. मोहसिन अहमद : विषय क्र. ८२/३ मधील चर्चेत १८५७ ऐवजी १९५७ अशी नोंद घेण्यात यावी. शंभर वर्षाचा फरक झाला आहे. मंगलपांडे/हजरत महंमद/अजित भोसले व इतर असे नाव घालण्यात यावे.

मा. महापौर : स. सदस्य यांच्या सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यास मंजुर देण्यात येते. स. सदस्य श्री. सुर्यवंशी हे बोलतील.

श्री. महादेव सुर्यवंशी : विषय क्र. ९५ वरील चर्चेच्या अनुषंगाने पोल्ट्री फॉर्म सारख्या उद्योगापासुन महानगरपालिकेस किती उत्पन्न होते. याबाबत माहिती देण्यात येईल. अशी चर्चा झाली आहे. त्या बाबत खुलासा व्हावा.

मा. महापौर : स.स.श्री. सुर्यवंशी यांचे सुचने बाबत माहिती दिली जाईल.

श्री. गिरजाराम हाळनोर : विषय क्र. ४०/११ अन्वये पीर बाजार येथील आठवडी बाजारामुळे रहदारीस होणारा अडथळा दुर करण्यासाठी ठराव क्र. ९० मध्ये "तुर्त स्थगित" ऐवजी सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात येते अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. हमीदउद्दीन ताबा : टपरी कमिटीच काय झाल. दोन महिने झाले.

श्री. मोहंमद मुश्ताक : टपरी कमिटीच्या अहवालाबाबत स्थायी समितीने सर्वसाधारण सभेत केलेल्या शिफारसीनुसार टपरी कमिटीच्या अहवालास मंजुरी मिळाली आहे. त्यावेळी टपरी देण्याबाबत नियमावली तयार करण्यात येइल असा खुलासा केला होता त्या बाबत खुलासा व्हावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : टपऱ्या देण्याबाबतच्या नियमावली बाबत मा. आयुक्त यांचा अहवाल आलेला नाही. तेव्हा टपरी कमिटीच्या अहवालास मंजुरी देण्यात यावी.

सौ. लता दलाल : या अहवालाबरोबरच अर्जाचे फॉर्म छापुन देऊ असे सांगीतले ते अद्याप मिळाले नाही. त्यात दोन महिन्याचा वेळ जाइल याची वाट न पाहाता ज्यांनी अर्ज केले ते ताटकळत बसतील म्हणुन मंजुरी देण्यात यावी काम होइल.

मा. महापौर : टपरी कमिटीच्या अहवाला बाबत संबंधीत विभागाने आठ दिवसात कार्यवाही करावी. टपरी देतांना संबंधीत विभागाने नगर सेवकांना विश्वासात घेऊन टपरी देण्यात यावी. टपरी कमिटीच्या अहवालास मंजुरी देण्यात येते.

श्री. गंगाधर गाडे : टपरी कमिटीच्या अहवालाप्रमाणे टपऱ्या देतांना आरक्षण धोरण आंमलात आणले पाहिजे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा. महापौर : संबंधीत अधिकारी खुलासा करतील.

मा. आयुक्त : टपरी देण्याबाबतची कारवाई अहवालासाठी थांबवली होती या पुर्वी ज्या टपऱ्या देण्यात आल्या आहेत त्याचा खुलासा त्यात नाही म्हणुन मागील भाडे वसुल करण्यात आली नाही. आता निर्णय झाला आहे. यापुढे अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री. प्रदिप जैस्वाल : स.स.श्री. विखारोद्यीन यांचा प्रश्न योग्य आहे. तेव्हा ज्या ठिकाणी टपरीचे भाडे वसुल करण्यास काही अडचण नसेल अशा टपरी धारकांकडुन टपरीचे भाडे वसुल करण्यात यावे असे मा. आयुक्तांनी सुचित केले होते.

श्री. गंगाधर गाडे : न्यायालयाच्या इमारतीचे बाजुला अनेक टपऱ्या आहेत या टपऱ्या बाबत काही अडचण आहे. त्यामुळे त्यामुळे या टपऱ्यांचे गेल्या सात/आठ वर्षाचे भाडे थकीत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तेव्हा त्या बाबत योग्य कार्यवाही करण्यात यावी.

श्री. मोहंमद मुश्ताक अहमद : टपरी समितीच्या अहवालात सर्व बाबींचा उल्लेख आहे. सर्व नव्या जुन्या टपऱ्यांची पाहाणी केली आहे.

मा. महापौर : श्री. रज्जाक बोलतील.

श्री. जावेद रज्जाक : काही टपरीधारक टपरीचे भाडे भरण्यास येतात पण अशा टपरी धारकाकडुन अधिकारीवर्ग भाडे वसुल करुन घेत नाही. यामुळे महानगरपालिकेचे अर्थिक नुकसान होत आहे.

मा. महापौर : स.स. यांना सुचित करण्यात येते की, टपरी समितीचा अहवाल मंजुर केला आहे यापुढे वसुली करण्यात येइल.

श्री. कंवरसिंग बैनाडे : पंचवटी हॉटेल समोर रिझर्व जागा आहे. त्यात काही गॅरेज आहेत त्यांना जागा कोणी दिली? कशी दिली? त्या बाबत काही करणार का?

श्री. गिरजाराम हाळनोर : विषय क्र. १००/२१ अन्वये सौ. मथुराबाई भागचंद्र गरंडवाल यांचे वरील कर्क रोजाचे उपचाराबाबत नगरसेवक स्वेच्छानिधी अथवा महानगरपालिका फंडातुन आर्थिक मदत देण्याबाबत काहीही निर्णय झालेला नाही. त्या बाबत या सभागृहात निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : सौ. मथुराबाई भागचंद्र गरंडवाल यांचे वरील कर्करोगाचे उपचारा बाबत फंडातुन आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : ठराव क्रमांक १०७ मधील विनापरवाना वसाहतीतील भागात पाणी ड्रेनेज लाईन टाकावी अशी सर्व स. सदस्यांची मागणी आहे व इतर भागातील नागरिक २५% रक्कम वसुल करुन अशा वसाहतींना पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. काम ताबडतोब सुरु करावे.

श्री. काशीनाथ कोकाटे : आजच्या विषय पत्रिकेवर स.स.श्री. काळुशे यांनी जो विषय ठेवला आहे. त्याचा विचार करावा.

श्री.प्रदिप जैस्वाल : सभागृहात मिनिट्स स्विकृतीचा विषय चालु आहे. विषय पत्रिका सुरु झाली नाही.

मा. महापौर : ठराव क्र. १०७ मधील विनापरवाना वसाहती व त्यासारख्या इतर वसाहतीतील नागरिकांकडुन २५% रक्कम वसुल करुन पाणी पुरवठा करण्यास मंजुरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : ठराव क्र. १०८ अन्वये पडेगांव कत्तलखान्याचे अधुनिकीकरण केल्यानंतरही या भागातील दुर्गंधीयुक्त वातावरण कायम राहाणार असेल तर सदर प्रस्ताव मंजुर करु नये. यावर हाडाचा जो कारखाना आहे. त्या बाबत खुलासा व्हावा. त्यास परवानगी दिली आहे. काय? कत्तलखाना/हाड कारखाना हे दोन वेगळे भाग आहे करिता हा ठराव तुर्त स्थगित ठेवावा असा निर्णय झालेला आहे. पडेगांव कत्तलखान्यासाठी शासनाचे अनुदान आले आहे. तेव्हा ठराव मंजुर करावा व कत्तलखान्याचे अधुनिकीकरण करावे.

सौ. रुख्मणीबाई लोखंडे : जो पर्यंत पडेगांव येथील हाडाचा कारखाना बंद होत नाही तो पर्यत कत्तलखान्याचे अधुनिकीकरण करण्यात येवु नये. कत्तलखाना चुकीचा जागेवर बसलेला आहे. तेव्हा कत्तलखानाच या जागेतुन हलवावा. मी आत्मदहन करुन घेइल त्यास सभागृह जबाबदार राहील. नागरिकांना याचा त्रास होत आहे. काही पत्र वगैरे अधिकाऱ्यांनी दिले आहे काय? हा सभागृहाचा अपमान आहे. विषय पत्रिकेवरील बाबत खुलासा करण्यासाठी संबंधीत अधिकारी सभागृहात हजर नसल्यामुळे आजची सभा १० मिनिटाकरिता तहकुब करण्यात येत असल्याचे मा. महापौर यांनी १२.३० वाजता घोषित केले. तहकुब करण्यात आलेली सभा १.०० वाजता सुरु करण्यात आली.

श्री. प्रदिप जैस्वाल : पडेगांव कत्तलखाना या विषयाबाबतची आवश्यक माहिती सभागृहास उपलब्ध करुन देण्यास पशुवैद्यकिय अधिकारी अद्यापर्यंत सभागृहात हजर झालेले नाहीत. तो पर्यंत संबंधीत अधिकारी सभागृहात हजर होत नाही तो पर्यंत ही सभा तहकुब करण्यात यावी. आणि आजच्या सभेत संबंधीत अधिकारी हजर का राहीले नाहीत याचा खुलासा मा. आयुक्त यांनी करावा.

प्र आयुक्त : पडेगांव कत्तलखान्याचा विषय पशुवैद्यकिय अधिकारी यांचेशी संबंधीत आहे. पशुवैद्यकीय अधिकारी यांनी दोन दिवसापुर्वीच रजा दिलेली आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : पशुवेद्यकीय अधिकारी रजेवर असतील तर त्यांचे प्रतिनिधींनी सभेस हजर राहाणे आवश्यक होते. तेव्हा आजची सभा तहकुब करावी.

डॉ. विजयकुमार मेहेर : सभेची तारीख निश्चित झाल्यानंतर अत्यंत तातडीची गरज असेल तर मा. आयुक्तांनी अधिकाऱ्यांची रजा मंजुर करावी अशी ताकीद देण्यात यावी अन्यथा अधिकाऱ्यांनी सभेस हजर असलेच पाहिजे.

मा. महापौर : सभेची तारीख निश्चित झाल्यानंतर अधिकाऱ्यांना रजा हवी असेल तर अशा अधिकाऱ्यांनी रजेबाबतची पुर्व परवानगी घ्यावी. अन्यथा यापुढे जे अधिकारी सभागृहात हजर नसतील अशांची गय केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

श्री. नरेंद्र पाटील श्री. गंगाधर गाडे, श्री. प्रदिप जैस्वाल : पाणी पुरवठा टपरी बाबतची नियमावली व प्रलंबित प्रश्नाची माहिती यासह दि. २७-१२-९५ ला सभा घेण्यात यावी.

मा. महापौर : जे.जे. प्रश्न प्रलंबित असतील जे २७-१२-९५ च्या सभेत घेण्यात येतील सर्व सभासदांनी उपस्थित राहावे ही तहकुब केलेली सभा दिनांक २७-१२-९५ ला घेण्यात येइल.

या नंतर "जन गण मन" या गिताने सभा संपल्याचे मा. महापौरांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
मा. नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २७-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त.
दिनांक २०-१२-९५ रोजी तहकुब करण्यात आलेली सभा बुधवार दिनांक २७-१२-९५ रोजी सकाळी ११.०० वाजता नगर भुवन (टाऊन हॉल) येथे मा.महापौर सौ.सुनंदा कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेस सुरुवात झाली.या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) सौ.ज्योस्ना दौलतराव हिवराळे | उप-महापौर |
| २) सौ.रुखमनबाई खंडेराव लोखंडे | स.सभासद |
| ३) श्री.अफसर खाँ यासिन खाँ | --//-- |
| ४) श्री.प्रभाकर सिताराम विधाते | --//-- |
| ५) सौ.साजेदा बेगम | --//-- |
| ६) श्री.म.सलिम हनिफ कुरेशी | --//-- |
| ७) श्री.गौतम भागाजी खरात | --//-- |
| ८) श्री.ॲड.गणेश किशनराव वानखेडे | --//-- |
| ९) सौ.रजनीबाई रमेश जोशी | --//-- |
| १०) सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | --//-- |
| ११) सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १२) श्री.गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १३) श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | --//-- |
| १४) श्री.भालेराव अभिमन्यू रामभाऊ | --//-- |
| १५) श्री.नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १६) श्री.कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | --//-- |
| १७) श्री.रविंद्र बाबुराव इंगळे | --//-- |
| १८) बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १९) सौ.पद्मा बाबुराव शिंदे | --//-- |
| २०) श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २१) श्रीमती चंपाबाई पांचाळ | --//-- |
| २२) सौ.धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २३) सौ.फरहदबानो मो.नवाज | --//-- |
| २४) श्री.फजल उल्लाखान अजमत उल्लाखान | --//-- |
| २५) श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --//-- |
| २६) श्री.मोहमद मुस्ताक अहमद | --//-- |
| २७) सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खाँ | --//-- |
| २८) श्री.वसंत विनायक देशमुख | --//-- |
| २९) श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अ. | --//-- |
| ३०) श्री.मुजीब आलमशहा मिर आलमशहा | --//-- |
| ३१) श्री.अब्दुल जावेद रज्जाक | --//-- |
| ३२) सौ.जाहेदा बेगम म.जमीर | --//-- |
| ३३) श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |

३४) सौ.यशोदा धनंजय वाडेकर --//--
३५) श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल --//--
३६) श्रीमती पुष्पाताई गंगवाल --//--
३७) श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद --//--
३८) श्री.स.अ.एकबालोद्दीन स.अ.कुतुबोद्दीन --//--
३९) श्री.खखोरडीया धिरज शांतीलाल --//--
४०) श्री.जैस्वाल प्रदीप शिवनारायण --//--
४१) श्री.लाहोट रमेश दिपचंद --//--
४२) श्री.संजय किसनराव केनेकर --//--
४३) सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे --//--
४४) सौ.लता दलाल --//--
४५) श्री.जयवंत (बंडू) ओक --//--
४६) सौ.अलका रमेश पाटील --//--
४७) श्री.अब्दुल रशिदखान (मामू) --//--
४८) श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह --//--
४९) श्री.डॉ.भागवत कराड --//--
५०) सौ.सविता संजय आव्हाड --//--
५१) सौ.निर्मलाबाई विठ्ठल कांबळे --//--
५२) श्री.अ.रशिद अ.सत्तार --//--
५३) श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेन्द्रसिंग --//--
५४) श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन --//--
५५) श्री.जैन विकास रतनलाल --//--
५६) श्री.गंगाधर सुखदेव गाडे --//--
५७) श्री.बारवाल गजानन रामकिसन --//--
५८) श्री.ओबेराय मनमोहनसिंग करमसिंग --//--
५९) श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव --//--
६०) श्री.जोशी संजय रामदास --//--
६१) श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर --//--
६२) श्री.राजकुमार ऊर्फ सांडू बचाटे --//--
६३) सौ.राधाबाई सखाराम तळेकर --//--
६४) श्री.ढगे नरसिंग मुरलीधर --//--
६५) श्री.विठ्ठल किसन जाधव --//--
६६) सौ.मंदा धनंजय काळुसे --//--
६७) श्री.गांगवे बन्सी तुळशीराम --//--
६८) श्री.भगवान देविदास घडामोडे --//--
६९) श्री.कचरु चंद्रभान नवपुते --//--

"वंदे मातरम् " या गीताने सभेची सुरुवात झाली.

श्री.गौतम खरात : दिनांक २०-१२-९५ च्या सर्व साधारण सभेत स.सभासद सौ.लता दलाल यांनी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्रसिध्द झालेली स्मरणिका फाडून टाकली व निषेध व्यक्त केला.यावेळी महाराष्ट्राचे कुतदैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो फाटला आहे.महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो फाडल्यामूळे राष्ट्र पुरुषाचा

अवमान झाला आहे.याबाबत स.सभासद सौ.लता दलाल यांनी माफी मागावी.

श्री.प्रकाश निकाळजे : राष्ट्रपुरुषाच्या फोटोचा अपमान करणाऱ्या स.सभासद सौ.लता दलाल यांनी अवमान केला म्हणून त्यांचा निषेध करण्यात येतो.राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा सौ.दलाल यांनी अवमान केला असल्याने त्यांचे एक दिवसाचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे.ही कृती करणे म्हणजे आपली पेशवाईकृती पुन्हा प्रस्तावित करण्याचा आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर : राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो फाडलेला नाही.मागिल सभेत स्मरणिका फाडतांना मी स्वतः समोर होतो.स.सदस्य आरोप केल्याप्रमाणे छत्रपतीचा फाडलेला फोटो त्यांनी दाखवावा.विनाकारण राष्ट्रपुरुषाचा राजकारणात उपयोग करु नये.विषय संपलेला आहे.

मा.महापौर : एका वेळी एकच सदस्य बोलतील.सौ.दलाल व श्री.विठ्ठल जाधव यांनी खाली बसावे.हाळनोर बोलत आहे.

सौ.लता दलाल : राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराज,घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शाहु महाराज यांना स्मरुन खुलासा करते की,ज्या स.सभासदांनी जातीय वादाचा अवलंब केला त्यांनी आम्हाल धडे शिकवावे,ही निंदनिय बाब असून त्याचा निषेध करते.ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदूचे स्वराज्य स्थापन केले त्यांच्यामूळे आम्ही आज ताठ मानेने उभे आहोत.स्मरणिकेची पाने फाडतांना ज्यांनी जातीयवादी लिखान केले होते त्यांना धडा मिळावा म्हणून तेव्हडी पाने मी फाडली आहे.स.सदस्यांना आठ दिवसांनी या गोष्टीची आठवण झाली,याबाबत जातीयवादाचा हा पेशवाईचा उल्लेख केला त्याचा मी निषेध करते आणि जे जे थोर पुरुष आहेत त्यांना तुमच्या राजकारणात आणू नका आणि त्यांचा उल्लेख येथे करु नका.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : स्मरणिकेच्या लिखणाने जातीयवाद झालेला नाही.ब्राम्हण म्हणजे जो विद्वान आहे.ब्राम्हण म्हणजे जात नाही.लष्करामध्ये काम करणाऱ्याला क्षत्रिय म्हणतात त्याचप्रमाणे विद्वानांना ब्राम्हण म्हणतात.व्यासांनी महाभारत लिहिले म्हणून त्यांना ब्राम्हण किताब मिळाला.तेव्हा जातीचे राजकारण करणे योग्य नाही.छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो स्मरणिका फाडतांना फाटला अशी चुक करावी व माफी मागावी.

मा.महापौर : स.सदस्य श्री.सुर्यवंशी बोलतील.

श्री.महादेव सुर्यवंशी : आज मनातुन नाहीतर वरवर का होईना विरोधी पक्षाने छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करीत पक्ष सदस्यांनी सभागृहात प्रवेश केला,अभिनंदन स्मरणिकेबाबत मागील सभेत दिलगीरी व्यक्त करण्यात आली आहे.आज हा स्मरणिका प्रश्न म्हणजे राजकारणाचा भाग दिसतो.त्यामूळे सभागृहाचा वेळ न घालवता पुढील प्रश्न विचारात घ्यावा.

श्री.संजय जोशी : छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो फाडलेला नाही.माफी मागणार नाही,स्मरणिकेचा विषय संपलेला आहे.

श्री.प्रभाकर विधाते : स्मरणिकेच्या विषयाचे राजकारण करण्यात येत आहे.पत्रकारांना मुद्दाम बातमी सांगितली. मागील सभेत दिलगीरी व्यक्त करण्यात आली आहे.त्यावरुन प्रकरण संपले आहे.तेव्हा नविन विषय चर्चेसाठी घेण्यात यावा.

श्री.महमंद मुस्ताक अहमद : छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणाऱ्या स.सदस्यांनी माफी मागितली पाहीजे,अन्यथा आजची सभा स्थगित करण्यात यावी.

श्री.संजय जोशी : छत्रपती शिवाजी महाराजांविषयी सभागृहात बऱ्याच सदस्यांनी कळकळ व्यक्त केली आहे.तर सभागृहात छत्रपतींचे पुत्र संभाजीचे नाव देण्याच्या प्रस्तावास विरोध का करण्यात आला?

श्री.अब्दुल जावेद रज्जाक : छत्रपती शिवाजी महाराजांना आम्ही आमचा नेता मानतो.सर्व समाजाचे नेता,सौ.दलाल यांनी शिवाजी महाराजांचा फोटो फाडला म्हणून माफी पाहीजे व सौ.दलाल यांचे एक दिवसाचे सदस्य रद्द करण्यात यावे आम्ही निषेध करतो.

(सभागृहात काही सभासद आपआपसात बोलत होते,त्यामूळे काहीही ऐकू आले नाही.तर काही स.सभासद घोषणा देत होते.)

मा.महापौर : सर्व स.सभासदांनी शांत बसावे.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज हे वेगवेगळे व्यक्तीमत्व आहे.शिवाजी हे वडील व संभाजी हा मुलगा आहे.शिवाजी व संभाजी हे वेगवेगळे महाराज आहेत.

( यावेळी काही सभासद आपआपसात जोरजोरात बोलतात,त्यामूळे काहीच ऐकू येत नाही.घोषणा देतात.)

मा.महापौर : सर्व स.सभासदांनी शांत बसावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय : सौ.लता दलाल यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो फाडला म्हणून दिलगिरी व्यक्त करावी. जर स.सभासद दिलगिरी व्यक्त करत नसेल तर त्यांचा आम्ही निषेध व्यक्त करतो व सभात्याग करतो.

११.३५ वाजता विरोधी पक्षाच्या सर्व सदस्यांनी सभात्याग केला. व ११.४० वाजता पुन्हा सर्व विरोधी पक्ष सदस्यांनी सभागृहात प्रवेश केला.

श्री.प्रदीप जैस्वाल : विरोधी पक्षास गोंधळ घालून सभा कामकाजात व्यत्यय आणावयाचा आहे.स.स.सौ.लता दलाल यांचा आक्षेप योग्य आहे.त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो फाडला नाही तर त्यांनी फक्त स्मरणिकेचे आक्षेपार्ह पान फाडले आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर : विरोधी पक्षाने निषेध व्यक्त केला आहे.आता मा.महापौर यांनी पुढील कामकाजास सुरुवात करावी.स्मरणिकेतील आक्षेपार्ह लेखाच्या निमित्ताने विरोधी पक्षाचे सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराजास नेता मानन्यास तयार आहे.म्हणजेच या शहरास संभाजीनगर असे नाव देण्यास त्यांची मंजूरी आहे असे समजण्यात यावे.

मा.महापौर : स.स.श्री.नरेंद्र पाटील हे बोलतील इतर स.स.नी खाली बसावे.

श्री.नरेंद्र पाटील : शहरातील नागरिकांनी सभासदांना जातीयतेचा प्रचार करण्यासाठी येथे पाठविलेले नाही.ते आपणसच जबाबदार धरतील.जनहिताचे प्रश्न म्हणजेच पाण्याच्या प्रश्नावर चर्चा करावी.सभागृहात कुठलेही तारतम्य नसलेली चर्चा सुरु असते.त्यास आपण परवानगी देवू नये.जर अनावधानाने चूक झाली असेल तर दिलगीरी मानावी हे योग्य.सध्या विदयुत पुरवठा वेळोवेळी खंडीत

होत आहे.महानगरपालिकेकडे साधे जनरेटर नाही.सिडकोला पाणी ज्यावेळी देवू शकत नाही त्याची कारणेही दिली पाहीजे.ज्या गोष्टीकरता वारंवार पाणी पुरवठयात व्यत्यय येतो त्या कारणांचा शोध घेतला तर सभागृहाचा जास्त वेळ जाणार नाही.सौ.दलाल यांनी माफी मागावी. त्यांनी चुक केली ती त्यांनी सन्मानाने मान्य केली पाहीजे.छत्रपती शिवाजी महाराज एकाचे नाही.महाराष्ट्राचे दैवत आहे.सभागृहात जातीयतेचे कोणतेही शब्द येणार नाही याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.यापूढे शिवाजी महाराजांचा उल्लेख होईल तो सर्वार्थाने येईल यावी सर्वांनी दक्षता घेतली पाहीजे.स.स.श्री.नरेंद्र पाटील हे शहराच्या विकासाबाबत फारच निष्ठेने बोलत होते.

श्री.प्रदीप जैस्वाल : सिडको-हडको भागात चार दिवसापासून पाणी नाही म्हणून सकाळी ५.०० वाजता उठून टॅंकर पाठवले का? विदयुत पुरवठा व्यवस्थित झाला का नाही? पाणी पुरवठा व्यवस्थित झाला का नाही? याची सातत्याने पहाणी व विचारणा केलेली आहे.

मा.महापौर : स.स.श्री.कोकाटे बोलत आहेत.

श्री.काशीनाथ कोकाटे : सिडको-हडको पाण्याविषयी सभापतींनी अभिमान दाखवला जलगृह अभियंता- सभागृहात आहेत.काही भागांना टॅंकर गेलेच नाही.त्यांनी कोणत्या भागाला टॅंकर पाठवले याचा खुलासा करावा.सिडको भागातील काही सेक्टरला चार-चार दिवस पाणी मिळालेले नाही.विनाकारण राजकारण नको.तर सुधारणा काय करता येईल हे पहावे.एका तासात नागरिकांना किती पाणी मिळते व किती पाणी मिळावयास पाहीजे याचा अभ्यास करणे जरुरीचे आहे.१०.०० ते १२.०० पर्यंत मिटींगच्या दिवशीच विदुयत पुरवठा खंडीत झाला व सिडको-हडको भागास पाणी मिळाले नव्हते.

श्री.नरेंद्र पाटील : स.स.यांनी ८२ नगरसेवकांना उद्देशून सूचना केलेली आहे.एकटया जैस्वाल यांनी सुचना केलेली नाही. पाणी देणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.त्यावर विचार करावा.

सौ.अलका पाटील : बेगमपूरा / बीबी का मकबरा भागात १५०० लि.क्षमतेच्या पाण्याच्या टाक्याचे टेस्टींग झालेले आहे.व त्यानंतर ती टाकी बंद ठेवण्यात आली आहे.नागरिक पाण्याची मागणी करीत आहेत तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

श्री.अभिमन्यू भालेराव : प्रथम सभागृहात गोंधळ झाला व त्यानंतर पाण्याचा प्रश्न सुरु झाला.श्री.जैस्वाल यांनी सभागृहात खुलासा केला की,सिडको / हडको भागाची पाहणी केली तेव्हा त्यांनी किती वार्डाची पाहणी केली.ग्रामीण भागांना किती वेळा भेट दिली त्यांचे किती प्रश्न सोडविले.मा.महापौर,मा.आयुक्त यांना बरोबर घेवून पाहणी केली आहे,याभागात दलीत समाज रहातो रस्ते,ड्रेनेज,पाणी यापैकी कोणताही प्रश्न या भागाचा सुटलेला नाही.श्री.जैस्वाल यांनी संपूर्ण शहर व ग्रामीण भागाची पहाणी करुन सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात या सुविधा देतांना झोपडपट्टी भागाकडे विशेष लक्ष दयावे.दलीतांना सुविधा दया.लोकांना गटारीचे पाणी प्यावे लागते प्रत्येक नगरसेवकांनी त्यांचे वार्डाचे कामाला लागले पाहीजे वार्डाचा विकास करावा आणि त्यानंतरच छत्रपती शिवाजी महाराजाबाबत चर्चा करता येईल.

मा.महापौर : सर्व स.सभासदांना विनंती कि,मा.आयुक्त दिल्ली येथील परिषदेची माहिती सभागृहात देत आहेत.

मा.आयुक्त : दि.२१ / २२ ला दिल्ली येथील परिषदेची माहिती सभागृहाला देऊ इच्छितो.या परिषदेत तीन राज्याचे मध्य प्रदेश / गुजरात व महाराष्ट्र युनिसेफ,मिनिस्ट्री ऑफ पब्लीक हेल्थ अँड फॅमिली प्लॅनिंग,मिनिस्ट्री ऑफ अर्बन डेव्हलपमेंट मिनिस्ट्री ऑफ हयुमन अँड चाइल्ड डेव्हलपमेंट या खात्याने संबंधित अधिकारी उपस्थित होते.स्लम भागातील गरीब नागरिक राहतात अशा भागांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देवू शकलो नाही असे युनोचे मत आहे.त्यामूळे राज्य सरकार केंद्र सरकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अशा स्लम भागात आरोग्य सेवा कशी मजबूत करता येईल अशी ती सुचना होती आणि त्यासाठी युनोतर्फे देशातील १५ शहराची निवड केली आहे.यात महाराष्ट्रातील १५ शहराची निवड झाली असून त्यात औरंगाबाद शहराचा समावेश आहे.येथील आरोग्य सेवा मजबूत करण्याचा कृती आराखडा तयार करावयाचा आहे.या आराखडयाकरीता केंद्र शासनाने येत्या ३० जानेवारीला पून्हा वर्कशॉप ठेवले आहे.केंद्र,राज्य,युनिसेफ व पाच नगरपालिका व महानगरपालिकेचे अधिकार येणार आहेत व त्या अगोदर आपल्याला आराखडा तयार करावयाचा आहे.आराखडा तयार करतांना ज्या गोष्टी उपलब्ध आहेत त्याचा एकत्रित विचार करावायाचा आहे यात यु.बी.एस.पी.,पोस्ट मार्टम प्रोग्राम,हेल्थ प्रोग्राम,आय.सी.बी.एस.प्रोग्राम या स्कीमच्या वेगवेगळया योजना असतात या सर्वांचा एकत्र विचार करुन आराखडा तयार करावयाचा आहे. यापैकी न. प. , महानगरपालिका मध्ये आय.सी.बी.एस.योजना नाही.ती महापालिकेकडे घ्यावयाची आहे.तसा प्रस्ताव आहे.ही योजना जी.प. भागात राबविली जाते.त्याच तत्वावर महानगरपालिका भागात आय.सी.डी.एस.ही योजना लागू करावी असा युक्तीवाद संयुक्तीक वाटतो.तशा सूचना केंद्र सरकारमार्फत राज्य सरकारला येतील ती योजना आपल्याकडे येण्याची शक्यता आहे.या सर्व योजना एकत्र करुन एक कृती आराखडा तयार करावयाचा आहे.तो आराखडा ५-६ दिवसांत तयार करुन त्याची प्रत सभासदांना वाटण्यात येईल.या विषयी आपल्या काही सूचना असतील त्या एकत्रित करुन दयाव्यात म्हणजे त्याचाही विचार करता येईल.यात पैसा जास्त मिळेल असा कोणताही भाग नाही.ज्या सुविधा आहेत त्याचा एकत्र विचार करुन हा आराखडा तयार करावयाचा आहे.

श्री.कचरु नवपुते : मागील सभेत ठरल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखान्याविषयी अहवाल दयावा.

श्री.अब्दुल रशिद खॉंन (मामू) : आजची सभा ही तहकूब सभा आहे अशा तहकुब सभेत ऐनवेळचे विषय नसावेत आता काही ऐनवेळच्या विषयाचे वाटप करण्यात आले आहे.त्यासाठी ०५ तारखेला पुन्हा सभा घ्यावी.

मा.आयुक्त : यानंतर आचारसंहिता लागेल म्हणून विषय ठेवले आहेत आपली इच्छा नसेल तर विचारार्थ घेवू नयेत.

मा.महापौर : पाण्याविषयीचे महत्वाचे प्रश्न आहेत हे प्रश्न २० तारखेच्या सर्वसाधारण सभेत असा अभिप्राय दिलेला आहे.

मनमोहनसिंग ओबेराय : तहकुब सभेत ऐनवेळचे विषय घेता येत नाहीत.

श्री.प्रभाकर विधाते : पडेगांव कत्तलखाना व हाडे उकळण्याचा कारखाना यांचे दुर्गंधीमूळे या भागातील नागरिकांना त्रास होत आहे.तेव्हा मागील सभेतील निर्णयाप्रमाणे त्या विषयीचा अहवाल देण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय : आचार संहिता लागेल म्हणून ऐनवेळचे विषय घेवू त्याच प्रमाणे टपरीबाबत विचार करण्यात यावा.

मा.महापौर : सर्व सभासदांची संमती असेल तर विषय घेतले जातील.

सौ.लता दलाल : मा.आयुक्तांनी दिल्ली परिषदेबाबत अहवाल दिला.त्यावर चर्चा करण्यासाठी एक दिवस ठरावावर आणि नगरसेवकांनी त्याची माहिती घ्यावयाची आहे का याचा खुलासा व्हावा.

मा.आयुक्त : हा आराखडा फक्त आरोग्य विषयी आहे.यात ड्रेनेज,रस्ते,वगैरे काही नाही त्यापूर्वी कृती आराखडयाचा मसुदा तो सर्व सभासदांना पाठविण्यात येईल.त्यावर आपण आपले मत पाठवा.त्यावर मिटींग बोलावता येईल.

पशुधन विकास अधिकारी : महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत जानेवारी १९८७ पर्यंत शहराच्या मध्य वस्तीत मोहल्ला सिल्लेखाना येथे मोठया जनावारांचे पशुवधगृह कार्यान्वीत होते. त्यामूळे मोहल्यातील आणि सभोवतालच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने सदर पशुवधगृह शहराबाहेर स्थलांतर करणे करीता सन १९८३-८४पासून संबंधित खाटीक लोकांना विश्वासात घेवून मा.विभागीय आयुक्त,मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद,मा.पोलीस अधिक्षक औरंगाबाद आणि मा.प्रशासक महानगरपालिका औरंगाबाद.यांच्या संयुक्त प्रयत्नाने सदर पशुवधगृह पडेगाव परिसरात सन फेब्रुवारी ८७ मध्ये स्थलांतर करण्यात आले आहे.

<u>१)पशुवधगृह जागेबद्दल माहिती :</u>

पडेगाव परिसरात गट क्र. ६६ (६-८३ हेक्टर) व गट क्र.६७ (८.८७ हेक्टर) एकुण १५.६९ हेक्टर जमीन शासनाकडून प्राप्त झाले असून हस्तांतर झाले,ज्यामध्ये गट क्र. ६७ मधील ८.७८ हेक्टर परिसरात पशुवधगृह उभारले असून गट क्र.६६ मधील (६.८३ हेक्टर) जमीनीवर शाळा,दवाखाना,क्रिडांगण आणि खाटीक लोकांना वसाहतीकरिता देण्यासाठी २०३ भुखंड पाडण्यात आलेले असून त्यापैकी ५६ खाटीक लोकांनी भुखंडाचे काही पैसे भरलेले असून पैकी ३१ खाटीक लोकांना भुखंडाचे हस्तांतर करण्यात आलेले आहे.

२) <u>पशुवधगृहावर झालेला खर्च :</u>

महानगरपालिका औरंगाबादने सदर पशुवधगृहावर आजपर्यंत एकूण रक्कम रुपये ५८,४६,८४१/- खर्च केलेले असून खर्च केलेले असून त्यामध्ये पडेगाव येथील पशुवधगृहापर्यंत डांबरीरस्ता,पाणी पुरवठा करीता टाक्या बांधणे व जलवाहीाी टाकणे विद्युत पुरवठा होणे व पशुवधगृहासाठी एक मुख्य शेड व जनावरे बांधण्याकरीता एक शेड व हाडांचे पाच गोदाम संपूर्ण परिसराला (गट क्र. ६७) संरक्षित भिंत बांधणे वगैरे काम करुन घेण्यात आलेले आहे.

३) <u>पशुवधगृहाचे आधुनिकीकरण :</u>

सध्या कार्यान्वित असलेल्या पशुवधगृहामूळे दुर्गंधी पसरु नये व वातावरण दुषित होवू नये व नागरिकांचे आरोग्य आबाधित राहण्यासाठी पशुवधगृहाचे आधुनिकीकरण करण्यासाठी मुंबई येथील अधिकृत संख्या पी.एच.ई. कन्सल्टन्सी कडून प्रकल्प अहवाल (प्रोजेक्ट रिपोर्ट ) तयार करुन घेण्यात आलेला आहे.सदर अहवालाप्रमाणे पशुवधगृहाच्या आधुनिकीकरणासाठी रक्कम रुपये ३,४५,६०,०००/- अपेक्षित असून सदर खर्च तीन टप्प्यात करण्यात येईल.

अ) पहिला टप्पा : मोठया जनावारांच्या पशुवधगृहासाठी रक्कम रुपये १,५२,८०,०००/-

ब) दुसरा टप्पा : लहान जनावारांसाठी पशुवधगृह उभारणेसाठी रक्कम रुपये १,८०,८२,०००/-
क) तिसरा टप्पा : जनावारांचे मार्केट इ.साठी रक्कम रुपये ११,९८,०००/- सदर खर्च रक्कम रुपये ३,४५,६०,०००/- हे गेल्या ६ वर्षात (सन २००१ पर्यंत) करण्यात येईल.

सदर प्रकल्पासाठी होणाऱ्या खर्चापैकी एकूण रकमेच्या ५० ते ७५ % रक्कम भारत सरकारकडुन अनुदान म्हणून मिळण्याची अपेक्षा आहे.
टीप : नियमाप्रमाणे पशुवधगृह हे विमानतळापासून कमीत कमी १० किमी दूर असणे आवश्यक असल्याने तांत्रिकदृष्टया पडेगांव परिसरात पशुवधगृहासाठी जागेची निवड करुनच पशुवधगृह उभारण्यात आलेले आहेत.
यावेळी काही सभासद आपआपसात जोरजोरात बोलतात त्यामूळे काहीच ऐकू येत नाही.

मा.महापौर : स.स.सौ.लोखंडे या खुलासा करतील.

सौ.रुखमणीबाई लोखंडे : पडेगाव परिसरात आजही हाडे उकळण्याचा कारखाना चालू आहे.कत्तलखाना शहराच्या पूर्व बाजूस म्हणजेच मूळात चूकीच्या जागेवर आहे.हा कारखाना दक्षिण बाजूस असावयास पाहीजे.कत्तलखाना व हाडे उकळण्याच्या कारखान्यातून निघणाऱ्या दुर्गंधीमूळे या भागातील नागरिकांना वांत्या व इतर आजार होत आहे. कारखाना या भागातून हलविण्यात यावा.व हा कारखाना या भागातून हलविल्याशिवाय त्यात कोणतीही सुधारणा करण्यात येवू नये नाही तर मला आत्मदहनाचा विचार करावा लागेल याची नोंद घ्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय : सर्व सामान्य नागरिकांच्या मागणीचा विचार करुन पूर्वी सिल्लेखाना येथील कत्तलखाना हलवून पडेगाव येथे नेला आहे.या प्रकरणात राजकारण नको.कत्तलखाना आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाचे अनुदान आले आहे.त्यातून कत्त्लखान्याचे आधुनिकीकरण होणार आहे.

श्री.प्रभाकर विधाते : पडेगाव येथील हाडाचा कारखाना बंद करावा.कत्तलखान्यास आमचा विरोध नाही.

यावेळी स.सभासद आप-आपसात गोंधळ करतात.

मा.महापौर : एकावेळी एकच सदस्य बोलतील.सगळयांनी खाली बसावे.

श्री.अब्दुल जावेद रज्जाक : विषयांतर होत आहे.कत्तलखाना आधुनिकीकरणावर विचार चालू आहे.हाडाच्या कारखान्याचा विषय मध्ये आणू नये.

श्री.प्रदीप जैस्वाल : स.स.सौ.लोखंडे काय सांगतात हे सभागृहाच्या लक्षात आले नाही.हाडाचा कारखाना ज्या ठिकाणी टाकावयास हवा होता तो त्या

ठिकाणी टाकला नाही.हाडाच्या कारखान्याबाबत मा.आयुक्तांना घेराव घातला गेला होता.

श्री.हमीदउद्दीन ताबा व मनमोहनसिंग ओबेराय : केंद्र शासनाचे अनुदान कत्तलखान्यासाठी आले आहे.त्यावर चर्चा करावी.काही सदस्य जातीय राजकारण करत आहेत.

(यावेळी स.सदस्य आपसात गोंधळ करतात.)

श्री.जयवंत ओक : सिल्लेखाना येथील कत्तलखाना कॉंग्रेस राजवटीत हलवून पडेगांव येथे बसविण्यात आला.त्यावेळी नियमाचा विचार केला नाही.विचार केला नाही नियमाप्रमाणे हा कारखाना पूर्व किंवा दक्षिणेत पाहिजे.

यावेळी स.सभासद आप-आपसात जोरजोरात बोलतांना दिसतात त्यामूळे गोंधळ झालेला आहे.

अब्दुल रशिद खान (मामू) : कत्तलखाना कोठेही हलविला तरी त्या ठिकाणी वसाहत ही होणारच.त्या भागात नगरसेवक निवडून येणार.मग अशा प्रत्येक वेळी कत्तलखाना हलविणार का? दिल्ली व इतर मोठमोठया शहरात कत्तलखाने त्याच ठिकाणी आहेत.पडेगांव येथील हाडाच्या कारखान्याबाबतचे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.त्यावर चर्चा करता येत नाही.यावर लाखो रुपयाचा खर्च झाला.तो कोण सहन करणार.

श्री.काशीनाथ कोकाटे : सभागृहातील चर्चेत प्रत्येक विषयाला राजकीय हेतू ठेवून चर्चा केली जाते.कत्तलखाना हलविण्यात आला त्यावेळी स.सदस्य श्री.जयवंत ओक सभागृहात होते का नव्हते.त्यावेळी ते नगरसेवक होते.आपण विरोध का केला नाही.त्यावेळी पूर्व का दक्षिण बाजूला पाहिजे याचा विचार करण्यात आला नाही.

श्री.प्रदीप जैस्वाल : स.स.सौ लोखंडेताई यांच्या भावना लक्षात घ्यायला पाहिजे. सन १९८३ ला लोकप्रतिनिधीचा कार्यभार नव्हता त्यानंतर सन १९८८ ला लोकप्रतिनिधी निवडून आले.कत्तलखान्यामूळे ज्या नागरिकांना त्रास होत आहे.त्याबाबत मा.आयुक्त यांनी पाहणी केली.या कत्तलखान्यामूळे दलित / मुस्लीम व इतर सर्व सामान्य नागरिकांना त्रास होत आहे.या बाबींचा विचार करता सदर प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.धंदा बंद करण्याचा कोणताही उद्देश नाही.कारखाना व कत्तलखाना हलविण्यात यावा.

मा.महापौर : स.सदस्य श्री.पाटील बोलत आहेत.

श्री.नरेंद्र पाटील : सन १९८३ पासून कत्तलखाना पडेगांव येथे आहे.तो ९ वर्षापासून कार्येरत झाला आहे.तेव्हा आतापर्यंत त्रास झाला नाही का? या प्रकरणात राजकारण आणता कामा नये.मागणीनुसार कत्तलखाना कितीवेळा हलविणार ? सभागृहाकडे कत्तलखाना

आधुनिकीकरणाचा प्रस्ताव आहे.हा प्रस्ताव मंजूर करतांना त्रास येता कामा नये अशी मागणी त्यांनी करावी.

मा.महापौर : स.सदस्य श्री.गाडे साहेब बोलत आहेत.

श्री.गंगाधर गाडे : एका महत्वाच्या विषयावर बोलत आहोत.यापूर्वी हा प्रश्न मोठया प्रमाणात गाजला होता.मी चेअरमन असतांना या ठिकाणी लाखो रुपये खर्च करुन महानगरपालिकेने पडेगांव येथे कत्तलखाना हलविण्यात आला आहे.वास येतो,याबाबत कत्तलखान्याचे आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून अनुदान घ्यावयाचे कबूल केले आहे.यासाठी मला असे सुचवायचे आहे की,हाडे शिजल्यामूळे तो वास येतो.त्यासाठी जे अनुदान मिळणार आहे.ते घेण्याचा प्रयत्न झाला पाहीजे.हे शहर आशिया खंडात मोठया झपाटयाने वाढत आहे.आज पाच किलोमीटर शहरापासून कत्तलखाना नेला तरी पूढे हाच प्रश्न पाच वर्षाने उद्‌भवणार आहे तेव्हा जो वास येतो त्यासाठी जे अनुदान मिळणार आहे ते अनुदान घेतले पाहिजे.आज मुंबई भिवंडी सारख्या शहरात लाखो जनावरे कापली जातात.त्यासाठी केंद्र सरकारने अनुदान देवून आधुनिकीकरणाची यंत्रणा बसविली आहे.अशा प्रकारची यंत्रणा पडेगांव कत्तलखाना येथे बसविण्यासाठी अनुदान मिळविण्याचा प्रस्ताव आहे त्याचा विचार करावा.

मा.महापौर : स.स.श्री.विधाते हे बोलत आहेत.

श्री.प्रभाकर विधाते : स.स.श्री.गाडे यांना कत्तलखान्याचा विषय चांगला समजला.कत्तलखान्याला आमचा विरोध नाही.हाडे उकळण्याच्या कारखान्याबाबत अहवाल मागितला होता त्याचा खुलासा करावा.

मा.महापौर : स.स.सौ.लता दलाल बोलत आहेत.

सौ.लता दलाल : सदर विषय स्थगित ठेवला होता.हाडे उकळण्याचा कारखाना व कत्तलखाना याची गल्लत होत आहे.कत्तलखान्याच्या आधुनिकीकरणास विरोध नाही.परंतू हाडे उकळण्याच्या कारखान्यास प्रदुषण मंडळाने परवानगी दिलेली नाही. असे मला वाटते. पण महानगरपालकेकडून त्यास परवानगी कशी दिली गेली हा वादाचा मुद्दा आहे.आधुनिकीकरण करण्यापूर्वी हाडे उकळण्याचा कारखाना हलविण्यात यावा.त्याचा गांभिर्यपूर्वक विचार व्हावा.यात राजकारण आणू नये.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय : हाडे उकळण्याच्या कारखान्याचे प्रकरण न्याय प्रविष्ट कत्तलखाना आधुनिकीकरणाचा सभासदांचा विरोध नाही असा खुलासा सभागृहात झाला आहे.तेव्हा हा ठराव मंजूर करण्यात यावा.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : हाडाच्या कारखान्यासाठी प्रदुषण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले जावे.त्याचा प्रश्न महानगरपालिकेशी येत

नाही.या बाबतचे न्याय प्रविष्ट प्रकरण ही एक वेगळी बाब आहे.घाटी दवाखान्यातील प्रेत ठेवण्याचा वार्ड आहे.याठिकाणी दहा दहा दिवस प्रेत पडून असते.यामूळे ज्युबली पार्क / भडकलगेट भागातील नागरिकांना त्रास होतो.मग घाटी दवाखाना हलवणार का?

श्री.संजय जोशी : हाडे उकळण्याच्या कारखान्यात परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी.

श्री.गंगाधर गाडे : याच प्रमाणे चिकलठाणा भागातील डिल्टीलरीजच्या कारखान्यामूळे प्रदुषण होते.यावर चर्चा झाली आहे.अनेक आजारी पडतात.तो डिल्टीलरीजचा कारखाना काही हलवणार आहात.हा विचार झाला पाहीजे.

श्री.प्रदीप जैस्वाल : सभागृहातील चर्चेचा विचार करता हाडे उकळण्याच्या कारखान्याबाबत न्यायालयात चालू असलेल्या प्रकरणी नागरिकांचे आरोग्याचा विचार करुन महानगरपालिकेने पार्टी होवून आपला वकील नेमावा.

श्री.अभिमन्यू भालेराव : सभापतींना पून्हा विनंती आहे.हाडाचा कारखान्याबाबत सर्व नगरसेवकांना काळजी लागली आहे.सर्व नगरसेवक आपआपले विचार मांडत आहेत.परंतू गेल्या दोन महिन्याच्या कालावधीत महाराष्ट्र डिल्टीलरीच्या आसपास एम.आय.डी.सी.,विमानतळ व वसाहत आहे.त्या कंपनीच्या वासा विषयी मी बोलत आहे.

मा.महापौर : स.सभासदांना विनंती की,ज्या विषयावर विषय चालू आहे.त्यावरच बोलावे.सर्व स.सभासदांनी खाली बसावे व स.सभासद श्री.हाळनोर बोलत आहेत.

श्री.गिरजाराम हाळनोर : स.सभासद श्री.जैस्वाल यांनी हाडाच्या कारखान्याबाबत जी सूचना केली आहे ती विचारात घेता कत्तलखान्याच्या आधुनिकीकरणास आमचा विरोध नाही.

श्री.वसंत देशमुख : आज सभागृहात जो विषय घेतला आहे.त्यात जबरदस्तपणा दिसत नाही.केवळ हा विषय वादाचा विषय निर्माण होतो.प्रश्नोत्तरासाठी एक शुन्य प्रहरचा वेळ देण्यात येतो.या शुन्य प्रहरचा वापर सभागृहात का केला जात नाही यामूळे विनाकारण वेळ वाया जातो.

मा.महापौर : एकावेळी एकाच सदस्याने बोलावे.जो सदस्य खाली बसून वर हात करतील त्याच सदस्यास बोलण्याची संधी मिळेल.मागच्या सभेपासून हाडाच्या कारखान्याचे विषयावर चर्चा होत आहे.आपणास केंद्र शासनाकडून अनुदान मिळत आहे.सर्व सभागृहाच्या संमतीने मंजूर करावयाचा आहे.मला महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना व आयुक्तांना असे सांगावयाचे आहे की,हाडाच्या कारखान्याबाबत

महानगरपालिकेने पार्टी करुन घ्यावे व हा ठराव मंजूर करण्यात येतो.

श्री.काशीनाथ कोकाटे : मा.महापौरांनी विषय पत्रिकेवर जो विषय आहे.तोच चर्चेला घ्यावा.सर्व स.सभासदांना खाली बसवावे.सभासदांनी जो विषय मांडला तो पूढे असेल तर त्यावर पुढे चर्चा झाली पाहीजे.स.सभासदांना दुसऱ्या विषयांवर चर्चा करण्याची परवानगी देवू नये.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे -

१) दि.१८-११-९५ च्या सभेतील विषय क्र. ८२/३ मध्ये टंकलेखनात १८५७ ऐवजी १९५७ अशी नोंद झाली आहे.तेव्हा १९५७ ऐवजी १८५७ आणि याच प्रस्तावासंबंधी स.स.श्री.मोहसीन अहमद यांनी खुलासा केल्याप्रमाणे श्री.मंगल पांडे,श्री.हजरत महमद,श्री.अजिजुल्ला व इतर या नावाचा समावेश करण्यास मंजूरी देण्यात येते.

२) दि.१८-११-९५ च्या सभेतील ठराव क्रमांक ९०/११ अन्वये सादर प्रस्तावास देण्यात आलेली स्थगीती रद्द करुन त्याऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पीरबाजार येथे भरत असलेल्या आठवडी बाजारामुळे या भागातील रहिवाशांच्या रहदारीस अडथळा निर्माण होत असल्यामूळे पीरबाजार येथील आठवडी बाजार रामकृपा कॉलनी सर्व्हे नं ४५ नाल्यालगतच्या महानगरपालिकेच्या जागेवर हलविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

३) दि.१८/११/९५ च्या सभेतील ठराव क्र. १००/२१ बाबत काहीही निर्णय झालेला नाही असा उल्लेख आहे.त्या ऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सौ.मथुराबाई भागचंद गरंडवाल यांचेवरील कर्करोगाच्या गंभीर आजाराचे उपचारासाठी ज्या सभासदांची इच्छा असेल त्यांनी त्यांचे लेटर पॅडवर नोंद करुन स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

४) दि.१८/११/९५ च्या सभेतील ठराव क्र. १०७/२८ अन्वये सिडको विभागाचे नगरसेवक व संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा करुन नंतरच प्रस्तावित वसाहतींना महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा करणे व लोक वर्गणीचे रक्कम ठरविणे बाबत निर्णय घेण्यात यावा,यानिर्णया ऐवजी सदर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिक नगर,गजानन नगर,हनुमान नगर,मातोश्री नगर,हुसेन नगर,न्यायनगर व दुर्गामाता कॉलनी येथे पाणी पुरवठा करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या योजनेनुसार प्रस्तावातील अनुक्रमांक १ ते ४ मधील कामाकरीता अपेक्षित खर्च रक्कम रुपये ३,८२,३४,१४८/- च्या खर्चात आणि ही योजना अनधिकृतपणे वसलेल्या सिडकोच्या निर्देशित भागात असल्यामूळे सदर योजना कार्यान्वित करण्यापूर्वी या वसाहतीतील मालमत्ता धारकांकडून लोकवर्गणी म्हणून एकूण खर्चाच्या ५०% ऐवजी २५% रक्कम मालमत्ता धारकांकडून लोकवर्गणी म्हणून वसूल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

५) दि.१८/११/९५ च्या सभेतील ठराव क्रमांक १०८/८९ अन्वये सदर प्रस्ताव स्थगित ठेवून पूढील सभेत पून्हा विचारार्थ ठेवण्यात यावा असा निर्णय झाल्यानुसार पडेगांव कत्तलखान्याचे पूढील ६ वर्षाचे कालावधीत संपूर्ण आधुनिकीकरण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ३,४५,६०,०००/- च्या ( अ पहिला टप्पा,ब दुसरा टप्पा,आणि क तिसरा टप्पा) या वर्गवारीनुसार अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

अ) पहिला टप्पा :

| | |
|---|---|
| १) जमिन खरेदी रस्त्याचे विकास वगैरे | ०२,७३,०००/- |
| २) मोठया जनावारांकरीता कत्तल हॉल स्थापन कामे करीता | ६१,६२,०००/- |
| ३) कत्तल हॉल मधिल यांत्रिकी स्वरुपाचे कामे करणे व इतर साहित्य. | ४७,००,०००/- |
| ४) विद्युत कामे | १६,००,०००/- |
| ५) इतर खर्च | २५,४५,०००/- |
| एकूण | १,५२,८०,०००/- |

दुसरा टप्पा :

| | |
|---|---|
| १) लहान जनावारांकरीता कत्तल हॉल व त्यासाठी करण्यात येणारी स्थापत्य कामे | ९७,५०,०००/- |
| २) यांत्रिकी कामे | ५८,५०,०००/- |
| ३) विद्युत कामे | ०७,००,०००/- |
| ४) इतर कामे | १७,८२,०००/- |
| एकूण | १,८०,८२,०००/- |

तिसरा टप्पा :

| | |
|---|---|
| १)जनावारांचे मार्केट कार्यालय चारा प्रोडक्ट करीता मार्केट | ११,२३,०००/- |
| २) विद्युतीकरण | ७५,०००/- |
| एकूण रुपये | ११,९८,०००/- |

| | | |
|---|---|---|
| सन | १९९५-९६ | २०,००,०००/- |
| | १९९६-९७ | ४०,००,०००/- |
| | १९९८-९९ | ८०,००,०००/- |
| | १९९८-९९ | ९०,००,०००/- |
| | १९९९-२००० | ९०,००,०००/- |

१९९९-२०००.१ २०००-२००१ २५,६०,०००/-

एकूण रक्कम रुपये ३,४५,६०,०००/-

कत्तलखाना आधुनिकीकरणासाठी येणाऱ्या एकूण खर्चापैकी ५०% ७५% चे अनुदान मंजूरीसाठी राज्यशासनामार्फत केन्द्र शासनाकडे ठराव मंजूरीस्तवा पाठविण्यात यावा.व उर्वरित रकमेची अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

तसेच पडेगांव कत्तलखाना येथे असलेल्या हाडे उकळण्याच्या कारखान्याचे न्याय प्रविष्ट प्रकरणात महानगरपालिकेने वकील नेमून पार्टी व्हावे असे सर्वानुमते ठरले.

वरील अ.क्र.१ ते ५ पर्यंत दर्शविलेल्या दुरुस्त्यासह दि.१६/१०/९५ व दि.१८/११/९५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय : ११२/२**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,बायजीपूरा येथील ८० फुट डी.पी.रस्त्यावरील मोकळया जागेत दवाखाना व वाचनालयासाठी इमारत बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ चे जिल्हा दरसूची अन्वये व स.नगरसेवक श्री.महंमद मुश्ताक अहमद यांचे मागणी नुसार रक्कम रुपये १४,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी सुधारीत अंदाजपत्रकात वाढीव तरतूद उपलब्ध झाल्याशिवाय काम हाती घेवू नये या अटीवर दि. ७-९९५ अन्वये मंजूरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रुपये १४,४०,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च विकास इमारती,शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढीव तरतूद उपलब्ध झाल्यावर काम हाती घेवून खर्च करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद(मामू) : प्लॅनिंग कमिटीची स्थापना झाली आहे.मागील सभेत अशा विषयाबाबत मा.महापौरांनी प्लॅनिंग कमिटीत विषय ठेवावा असे रुलींग दिले आहे.काही विषय सर्व साधारण सभेत तर काही विषय प्लॅनिंग कमिटीत येतात खरे काय आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर : स्थायी समितीला २५ लाखाचे अधिकार दिले आहे तेव्हा हा विषय स्थायी समितीत पाहीजे तो सर्व साधारण सभेत कसा आला.

मा.महापौर : मा.आयुक्त खुलासा करीत आहेत.स.सदस्यांनी खाली बसावे.

मा.आयुक्त : स्थायी समितीला जे अधिकार दिले आहेत ते १० कोटीच्या कामा संबंधात आहेत.१० कोटीच्या बाहेरचे काम असेल तर माझ्या माहितीप्रमाणे २५ लाखाचे अधिकार दिलेले नाहीत.

श्री.प्रदीप जैस्वाल : माझी सभागृहाल अशी विनंती आहे की,२५ लाखाचे अधिकार स्थायी समितीला घ्यावयास पाहीजे कारण २५ लाखाच्या कामाला सर्व साधारण सभेची मंजूरी घ्यावयाची झाली तर दोन महिने जातात.निविदा मंजूरीसाठी शेवटी स्थायी समितीकडेच यावे लागते त्यामूळे माझी अशी विनंती आहे की,स्थायी समितीला २५ लाखाचे अधिकार देणे योग्य आहे.

श्री.हमीद ताबा : अधिकारी त्यांच्या मर्जीतले ठराव त्यांच्या लोकांसाठी सभासदासमोर ठेवतात माझ्या वार्डातील एक प्रस्ताव आहे त्याचा आ वार्ड ही झालेला आहे तो प्रस्ताव अदयाप सभागृहासमोर ठेवला नाही.

मा.महापौर : स.सदस्य श्री नरेंद्र पाटील हे बोलत आहेत.श्री.ओबेरॉय साहेब खाली बसावे.

श्री.नरेंद्र पाटील :मला या अनुषंगाने सभागृहासमोर अशी माहिती आणावयाची आहे की,गेल्या दहा वर्षात महापालिकेने ज्या कारणासाठी जागा संपादन केली आहे.त्यासाठी रक्कम ही दिली आहे,परंतू त्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होत आहे.त्यासाठी महापालिकेने किती जागा संपादन केल्या त्यापैकी किती जागांची रक्कम दिली त्यापैकी किती जागांचा उपयोग करुन घेतला पैकी जी संपादन झाली पैसे दिल्यानंतर किती जागांवर पुन्हा अतिक्रमण झाले याची माहिती सर्व स.सदस्यांना देण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे २५ लाखाचे अधिकार स्थायी समितीला दिले तर सर्व साधारण सभेचे काय काम ? आमचा स्थायी समितीला विरोध नाही.

श्री.प्रदीप जैस्वाल : २५ लाखाचे काम पण ५०० रुपयाचे अधिकार दिले तर चालतील वेळ लागतो म्हणून मार्ग सुचवला विरोधी पक्षाला असे वाटत असेल की,स्थायी समिती सर्व साधारण सभेचे अधिकार घेत आहे.तरी स्थायी समितीत नगरसेवकांची कामे होतात.

श्री.नरेंद्र पाटील : आताच स.सदस्य श्री.जैस्वाल यांनी खुलासा केला की,नगरसेवकांची कामे होतात.मला येथे जाहीर आरोप करावयाचा आहे की,जे सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक आहेत त्यांचीच कामे महापालिकेत होतात.जे काही मुस्लीम नगरसेवक आहेत त्यांची कामे होत नाहीत.

श्री.गिरजाराम हाळनोर : सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक आपल्या कामाची प्रतिनिधीकडून आपली कामे करुन घेतात.दुसऱ्यांची कामे होत नाहीत त्याला आम्ही काय करणार?

श्री.मुजीब आलमशहा खान : आजपासून पाच वर्षापूर्वी चंपा मस्जिद ते कलेक्टर ऑफिस पर्यंत रोड तयार करण्यात आला होता.या रस्त्यावर एकच पूल आहे.यामूळे गणेश कॉलनी व कलेक्टर ऑफीसच्या लोकांना येथून जाण्यास त्रास होतो.चंपा मस्जिद या १०० फुट रोडवर एक पुल आहे त्याचे काम अदयाप झाले नाही.तसेच या रस्त्यात काही ठिकाणची पाच / सहा घरे संपादन करावयाची राहीलीत जे नागरिक संपादनाची जागा देण्यास तयार आहेत ती संपादन करुन हा १०० फुटी रोड सरळ मोठा करावा.या रस्त्यावरील अरुंद पुलामुळे लहान लहान तीन मुलांचे पाय तुटले.तरीही महानगरपालिकेने लक्ष दिले नाही.तेव्हा मा.आयुक्तांनी एक वेळ पाहणी करावी व तसदी घ्यावी.

मा.महापौर : मा.आयुक्त खुलासा करतील.

मा.आयुक्त : याबाबत खुलासा करु इच्छितो की,या पुलाजवळचे जे सॉइल कन्सरव्हेशन ऑफीस आहे ते जिल्हाधिकारी कार्यालयात जी इमारत होत आहे त्या ठीकाणी हलविले जाणार आहे.त्यानंतर त्या जागेचा ताबा मिळणार आहे. १/२ महिन्यात काम होईल.

मा.महापौर : मा.आयुक्तांचा पूर्ण खुलासा ऐकूण घेतल्यानंतर स.सदस्यांनी बोलू नये.

मा.आयुक्त : मागील १५ वर्षात ज्या जागा संपादीत करण्यात आल्या आहेत त्याबाबतची सविस्तर पुस्तिका तयार करुन स.सदस्यांना वितरीत करण्यात येईल.त्यामूळे रस्त्यांचे कामात कुठे काय अडचण आहे याची कल्पना येईल.त्यानंतर मिटींग घेवून आपणाला चर्चा करता येईल.

मा.महापौर : स.सदस्य श्री.वसंत देशमुख बोलतील.

श्री.वसंत देशमुख : हा जो विषय मांडला आहे,सिल्लेखाना ते टिंबर मार्ट पर्यंत रस्ता पूर्ण झाला आहे.त्यापुढे कमीत कमी ४००० स्क्वे. फुटाची जागा आहे त्यावर थोडे अतिक्रमण आहे.त्या नागरिकांशी मी संपर्क केला ते नागरिक जागा दयायला तयार आहे.त्यासाठी जी समिती नेमली जाईल,त्याच्या समोर निर्णय होईल.त्यामूळे हा २० वर्षाचा प्रश्न लवकर सुटेल तेव्हा तो प्रश्न विनासायास सुटत असेल तर ती घ्यायला काहीच हरकत नाही,स्मशानी हनुमान पुढील भाग न्याय प्रविष्ट आहे.त्या अलिकडील लोकांचे मी संमती पत्र घेतले आहे.लोक जागा देण्यास तयार आहेत.ज्यामूळे हा प्रश्न लवकर

सुटेल म्हणून माझा प्रस्ताव मंजूर करण्यास काहीच हरकत नाही असे माझे मत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय : विषय क्र.  नुसार १४ लाखाचे कामास सभागृहाने मंजूरी दयावी.यापूर्वी जुने जितकी कामे आहेत ती सर्व घेण्यात यावी असा ठराव झाला आहे.स्थायी समितीचे अधिकार स्थायी समितीला व सर्वसाधारण सभेचे अधिकार त्याच सभेस असावे असे आमचे मत आहे.

मा.महापौर : सर्व स.सभासदांच्या भावना लक्षात घेवून विषय क्र. २ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपूरा येथील ८० फुट डी.पी.रस्त्यावरील मोकळया जागेत दवाखाना व वाचनालयासाठी इमारत बांधण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याचे सन ९४-९५ चे जिल्हा दर सुची अन्वये व स.नगरसेवक मुश्ताक अहेमद यांचे मागणी नुसार तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १४,४०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून सुधारित अंदाजपत्रकामध्ये वाढीव तरतूद झाल्यावर काम हाती घेवून खर्च करण्यात येईल,या अटीवर सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक  कार्येवाही व्हावी.

**विषय : ११३/३**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,वार्ड क्र. ४५ दिवाण देवडी मधील नागरिकांनी अर्ज देवून विनंती केली आहे की, आम्ही दिवाण देवडीचे नामांतर नागरिकांनी एकमताने "हरीनगर" करावयाचे ठरविले आहे आणि महानगरपालिकेतर्फे लेखी आद्यादेश द्यावा अशी विनंती केली आहे.

तरी सदरील बाब धोरणात्मक असल्याने दिवाण देवडीचे नामांतर "हरीनगर" करणे बाबतचा प्रस्ताव सर्व साधारण सभेपूढे विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्र. ३ हा स्थगित ठेवला आहे.विषय क्र.४ चर्चेला घ्यावा.

**ठराव :** सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.११४/४**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ३०.०० मीटर (१०० फुट) रुंद रस्त्यासाठी रेल्वे स्टेशन समोरील खाजगी मिळकती संपादन करणे आवश्यक आहे.रेल्वेस्टेशन समोर असलेला पेट्रोलपंप हा विकास योजनेच्या रस्त्याने संपूर्ण बाधीत आहे.त्या लगत हॉटेलचे व्यवसाय चालु आहे त्यामूळे तेथे वाहन रस्त्यावर उभे राहतात तसेच पेट्रोल घेणेसाठी वाहनाची रांग लागते त्यामूळे अस्तित्वातील

रस्त्यांवरील वाहतुकीस अडथळा होतो.हा भाग रेल्वे स्टेशनचे मुख्य दरवाजाचे समोरील असल्याने रुंद असणे आवश्यक आहे.

करीता रेल्वेस्टेशन समोरील बाधीत मिळकती महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम १२६(४) अन्वये संपादन करावयाचे प्रस्तावास व संपादनास येणाऱ्या खर्चास मंजूरी देणे योग्य.

सबब प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्र.४ प्लनिंग कमिटीकडे वर्ग करण्यात येतो.विषय क्र.५ चर्चेला घ्यावा.

**ठराव :**

सदर प्रस्ताव प्लनिंग कमिटीकडे वर्ग करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय ११५/५ :**

औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजनेमधील लक्ष्मण चावडी ते सिडको रोड (स्मशान मारुती मार्गे) हा २४.०० मीटर रुंद रस्ता जो शहराचे मध्यभागातून जाणाऱ्या नाशिक-निर्मल राज्य मार्गाचा भाग असलेल्या जालना रोडला पर्यायी रस्ता म्हणून आहे.सदर रस्ता म्हणून आहे.सदर रस्ता विकासामुळे जालनारोड वाहतूक वाहनांची वर्दळ कमी होवून अपघाताचे प्रमाण कमी होईल.हा रस्ता जालना रस्त्यास समांतर नसल्याने हया रस्त्याचे विकासामूळे मध्यवर्ती बसस्थानक,समर्थनगर,सिल्लेखाना,खोकडपूरा हया भागातून सिडको रोडकडे जालना रोड टाकून थेट वाहतूक होवू शकते.तसेच हा शहर बस वाहतुक मार्गही होवू शकतो.शहराचे मध्यवर्ती भागात असलेल्या स्मशानभूमीस या रस्त्याच्या विकासामूळे प्रशस्त व मोठा रस्ता मिळू शकतो.हया सर्व बाबी पाहता सदर रस्ता विकसित करणे गरजेचे आहे.हया रस्त्याचा लक्ष्मण चावडी ते स्मशान मारुती मंदिर हा भाग मंजूर विकास योजना नुसार आहे.तर स्मशान मारुती मंदिर ते सिडको रोड हा शहर विकास योजना नुसार आहे.

२) चंपा मस्जिद ते जालना रोड ( ३० मी. रुंद रस्ता) हा रस्ता शहागंज,शहाबाजार,रोशनगेट भागातील वाहनाची वर्दळ / वाहतूक पाहता विकसित करणे गरजेचे आहे.हया रस्त्यांचे विकासामूळे गणेश कॉलनी,विभागीय आयुक्त कार्यालय परिसर हया भागातून जालना रोड शहाबाजार,शहागंज मार्गे थेट वाहतुक होवू शकते.त्यामूळे मोंढा-जाफरगेट भागात होणारी वाहतुकीची कोंडी सोडविणे शक्य होईल.

३) काची वाडा ते शहाबाजार (१२.०० मी.रुंद रस्ता) चेलीपूरा,काचीवाडा भागातील वाहतुक थेट शहाबाजार मार्ग जाणाऱ्या ३०.०० मीटर रुंद रस्त्यास जोडण्याचे दृष्टीने सदर रस्ता विकसित करणे आवश्यक आहे.हा रस्ता चेलीपूरा चौकीस लागून शहाबाजारकडे जाणाऱ्या १५.०० मी रुंद रस्त्यास समांतर पर्यायी

रस्ता आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे सदर तिन्ही रस्त्यांचे शहरातील वाढती वाहनांची संख्या / रहदारी इत्यादी दृष्टीने विचार करता विकास योजना प्रस्तावानुसार रुंदीकरण करणे आवश्यक आसल्याने त्या संदर्भाने सदर रस्ते विकसित करणे करिता लागणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

प्रस्ताव मान्यतेनंतर रितसर भुसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल.

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्रमांक ५ प्लंनिग कमिटीकडे वर्ग करण्यात येतो.

**ठराव :**

सदर प्रस्ताव प्लदिंग कमेटीकडे वर्ग करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**संवाद :**

श्री.काशीनाथ कोकाटे : विषय क्र. ५ प्लॅनिंग कमेटीकडे पाठविण्याचे कारण काय? हा प्रशासकीय प्रस्ताव आहे,यावर चर्चा होणे अत्यंत जरुरीचे आहे.हा रोड सिडको-हडकोच्या नागरिकांच्या जीवनाशी संबंधित असून जालना रोडला समांतर जाणारा रोड आहे.जालना रोड रहदारी वाढली आहे.म्हणून लोकहीत व रहदारीची अडचण लक्षात घेता ठराव क्र. ५ मंजूर करण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मान्यता देण्यात यावी.

श्री.प्रदीप जैस्वाल : महापौरांनी रुलींग दिलेली आहे. सर्वांची भावना लक्षात घेता विषय क्र ५ मंजूर करण्यात यावा.

श्री.नरेंद्र पाटील : स.सदस्य श्री.जैस्वाल यांनी सांगितल्याप्रमाणे ठरावामध्ये तीन भागांपैकी पहिला भाग मंजूर करावा व बाकीचे प्लॅनिंग कमटीकडे पाठवावे.

मा.महापौर : सर्व स.सदस्यांनी लक्ष द्यावे विषय क्र.५ प्लॅनिंग कमिटीकडे वर्ग करण्यात येतो.

श्री.काशीनाथ कोकाटे : आपल्या रुलींगशी सहमत आहे.फक्त मुदतीची भर टाकण्यात यावी तशी नोंद करावी.

**विषय ११६/६ :**

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे सध्या एक बेडेड हॉस्पीटल (सिडको-N६) आणि १४ दवाखाने (डिस्पेसरीज) चालविले जातात.दवाखान्याच्या संख्येत उप-केंद्राचाही समावेश आहे.

या व्यतिरिक्त आणखी दोन वीस बेडेड हॉस्पीटल सुरु करण्याचा हा प्रस्ताव आहे.ही नवीन बेडेड हॉस्पीटल्स खालील भागात सुरु करण्यात यावी असाही प्रस्ताव आहे.

१) सिल्क मिल कॉलनी परिसर : रेल्वे लाईनचे पलिकडे पैठण रोडचे आजुबाजूस वस्त्या आहेत.परंतू त्या परिसरात महानगरपालिकेतर्फे एकही हॉस्पीटल किंवा दवाखाना चालविला जात नाही.त्यामूळे या परिसराकरीता एक २० बेडेड हास्पीटल सुरु करणे गरजेचे आहे.सिल्क मिल कॉलनी परिसरात खुली जागा उपलब्ध आहे.त्या जागेत हॉस्पीटल सुरु करणे शक्य आहे.इमारतीचे बांधकामाकरीता अंदाजे रुपये २५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.या हॉस्पीटलचा फायदा खालील नगरांना / गावांना होईल.

सिल्क मिल कॉलनी,सादतनगर,राहुलनगर,हमालवाडा,इटखेडा,जहागिरदार कॉलनी,शहसोक्ता कॉलनी,रेल्वेस्टेशन,बनेवाडी.

२) नेहरु नगर,कटकटगेट परिसर : या परिसरात खालील नगरांचा /कॉलनीचा समावेश होतो.

नेहरु नगर,औरंगाबाद टाइम्स कॉलनी,एस.टी.कर्मचारी कॉलनी,त्रिमूर्ती कॉलनी,यशोधरा कॉलनी,जिव्हेश्वर कॉलनी,गणेश कॉलनी,शताब्दीनगर,हिना नगर,मुजीब कॉलनी,रशिदपूरा,यूनूस कॉलनी,मकबुद कॉलनी,करीम कॉलनी,हत्तेसिंगपूरा,आजम कॉलनी,रोशनगेट एरिया.

या परिसरात बहुतांश लोक गरीब किंवा मध्यम वर्गीय आहेत त्यामूळे या परिसरात एक २० बेडेड हॉस्पीटल सुरु करण्याची गरज आहे.या परिसरापासून शासकीय दवाखाना बराच लांब आहे.या इमारतीच्या बांधकामाकरीता अंदाजे रुपये २५ लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे.

वरील दोन्ही हॉस्पीटलच्या इमारत बांधकामावरील खर्च शासनाकडून प्राप्त होणाऱ्या रुपये १० कोटीचे विशेष अर्थ सहाय्यातून करण्याचाही प्रस्ताव आहे.त्या नुसार शासनाकडे आवश्यक तो सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येईल.उपरोक्त प्रस्तावा बरोबरच खालील ठिकाणी डिस्पेंसरीज सुरु करण्याचाही प्रस्ताव आहे.

३) पडेगांव मिटमिटा परिसर : सध्या या परिसरात महापालिकेचा दवाखाना नाही.त्यामूळे या परिसरातील लोकांना नंदनवन कॉलनीतील महापालिका दवाखान्यास यावे लागते.हे नंतर जवळ जवळ ५-६ किलोमीटर आहे.त्यामूळे पडेगांव मिटमिटा परिसरात योग्य ठिकाणी एक दवाखाना (सब सेंटर) सुरु करावे असा प्रस्ताव आहे.

४) कैलासनगर : कैलासनगर परिसरात शक्यतो स्मशान मारोती समोरील मोकळया जागेत एक दवाखाना (सब सेंटर) सुरु करण्याचा प्रस्ताव आहे.हे सेंटर सुरु केल्यास कैलासनगर,दादाकॉलनी,मोंढा एरिया,ढोरपूरा,जिन्सीचा काही भाग,बायजीपूरा काही भाग या भागातील रहिवाशांना त्याचा फायदा होईल.

५) मुकुंदवाडी : मुकुंदवाडी,संजयनगर या परिसरातील लोकांना सध्या चिकलठाणा दवाखान्यात उपचारासाठी जावे लागते.मुकुंदवाडी ते चिकलठाणा हे अंतर जवळपास ५-६ किलोमीटर एव्हढे आहे.त्यामूळे या भागातील लोकांना बराच त्रास होतो.ही बाब विचारात घेता मुकुंदवाडी भागात एक दवाखाना (सब सेंटर) सुरु करावे असा प्रस्ताव आहे.

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्र.६ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे चालू असलेल्या सध्याचा सिडको N-८ येथील दवाखान्या व्यतिरिक्त खालील ठिकाणी दोन २० बेडेड हॉस्पीटल सुरु करणेस मंजूरी देण्यात येते.

१) रेल्वे स्टेशन लाइनच्या पलिकडे असलेल्या पैठण रोडच्या बाजूस बऱ्याच वस्त्या झालेल्या असून या परिसराकरीता महानगरपालिकेचा एकही दवाखाना या भागाकरीता चालविला जात नसल्यामूळे सादात नगर,सिल्क मिल कॉलनी,राहुलनगर,हमालवाडा,इटखेडा,जहागिरदार कॉलनी,शहासोक्ता कॉलनी,रेल्वेस्टेशन,बनेवाडी येथे उपलब्ध असलेल्या जागेवर २० बेडेड दवाखाना सुरु करणे व त्यासाठीच्या इमारतीसाठी रक्कम रुपये २५ लाखाच्या अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

२) नेहरुनगर,कटकटगेट परिसरात : नेहरु नगर,औरंगाबाद टाइम्स कॉलनी,एस.टी.कर्मचारी कॉलनी,त्रिमुर्ती कॉलनी,यशोधरा कॉलनी,जिव्हेश्वर कॉलनी,गणेश कॉलनी,शताब्दी नगर,हिनानगर,मुजीब कॉलनी,रशिदपूरा,युनुस कॉलनी,मकसुद कॉलनी,करीम कॉलनी,हत्तेसिंगपूरा,आजम कॉलनी,रोशनगेट एरीया या परिसरात बहुतांश गरीब,मध्यमवर्गीय नागरिक राहत असून या भागापासून शासकीय दवाखाना बराचशे लांब असल्यामूळे नेहरु नगर,कटकटगेट भागात २० बेडेड हॉस्पीटल सुरु करणे व त्यासाठीच्या इमारतीसाठी रुपये २५ लाखाच्या अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

अ.क्र.१ व २ नुसार सुरु करण्यात येणाऱ्या हॉस्पीटल इमारत बांधकामाचा खर्च शासनाकडून प्राप्त होणाऱ्या रुपये १० कोटीच्या विशेष अर्थसहाय्यातून करण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा,असे सर्वानुमते ठरले.उपरोक्त प्रस्तावा बरोबरच खालील ठिकाणी प्रत्येकी एक दवाखाना (सब सेंटर) सुरु करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१) पडेगांव मिटमिटा परिसर.

२) कैलासनगर.

३) मुकुंदवाडी.

वैधानिक कार्येवाही व्हावी.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय ११७/७ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद शहरासाठी जायकवाडी जलाशयातून पाणी पुरवठा करण्याकरीता नविन योजना तयार करावयाची आहे.महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ यांचे अर्धशासकीय पत्र जा.क्र./ ४ अबांवि-२/५०/९५ दिनांक

११/१२/१९९५ च्या अनुषंगाने सध्या कार्यरत असलेल्या नविन व जुन्या प्रकल्पामधून १५६ एम.एल.डी.पाणी पुरवठा होतो ही क्षमता २०१६ सालापर्यंत गृहीत धरुन आहे. परंतू सध्या शहरात १०० एम.एल.डी.पाणी पुरवठा होतो.म्हणजेच भविष्यात हा प्रकल्प कमी पडणार आहे.त्यामूळे आणखी एक नविन २०० एम.एल.डी.ची योजना तयार करणे गरजेचे आहे.या नविन योजनेचे तांत्रिक सर्वेक्षण,आराखडे व अंदाजपत्रक महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ,औरंगाबाद यांच्यातर्फे करुन घेण्यात येईल.

तरी प्रस्तावित नविन योजनेबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

मा.महापौर : ऐनवेळचा विषय क्रमांक ७ मंजूर करण्यात येतो.

मा.आयुक्त : महत्वाचा विषय आहे.यावर आपण चर्चा करु.

मा.आयुक्त : या पूर्वीचा अशाच प्रकारचा प्रस्ताव आहे.जायकवाडी पासून नक्षत्रवाडी पर्यंतची मुख्यलाईन बोर्डाचे ताब्यात आहे.ती महानालिकेने ताब्यात घ्यावी असा प्रस्ताव दिला होता.तो प्रस्ताव मागच्या वेळी मंजूर झाला की नाही याची माहिती नाही.ही लाईन पुढे आपल्याला ताब्यात घ्यावयाचीच आहे.बोर्डाचे दर जास्त आहे.या योजनेचे आपल्याला दरमहा ३५ लाख रुपये लागतात म्हणजेच वर्षाला ३.५ ते ४ कोटी रुपये द्यावे लागतात.दुरुस्तीचा खर्च दोन कोटीपेक्षा जास्त जाणार नाही यामूळे आपले २ कोटी नुकसान आहे म्हणून योजना तशीच दोन्ही ताब्यात घ्याव्या लागतील यासाठी काही दिवसांकरीता बोर्डाचा स्टाफ एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीवर घ्यावा लागेल.एक वर्षात महापालिकेचे कर्मचारी ते तयार करतील.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय : मा.आयुक्तांनी खुलासा केलाच आहे.बोर्ड ही योजना आपल्याकडे घ्यायला तयार आहे काय? आपणाकडे त्यासाठीचा तांत्रिक वर्ग आहे काय? तेव्हा पूर्ण विचार करुन ती योजना ताब्यात घ्यावी.नाहीतर नागरिकांना लाइन फुटल्यामूळे १५-१५ दिवस पाणी मिळणार नाही असे व्हायला नको.

मा.आयुक्त :ही योजना ताब्यात घ्यावयाची किंवा नाही हा अधिकार आपला आहे.ही योजना बोर्डाची नाही महापालिकेची आहे.महापालिकेकरीता बोर्डाने तयार केली आहे.यात दोन वेगवेगळे खाते असल्यामूळे बऱ्याचवेळा अडचण येते.पाईप लाईन फुटली तरी बोर्डाला कळविल्यानंतरही त्याचे महत्व पटत नाही.व त्याचा आरोप महानगरपालिकेवर येतो.महापालिकेचा तोटा होत असेल तर तो सहन का करावा. बोर्डाला वर्षाकाठी ४ कोटी देण्याऐवजी ०२ कोटीत महापालिकेचे काम होत असेल तर ती योजना महापालिकेने घ्यावी.त्यासाठी बोर्डाचे इंजिनियर्स एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर घेवून महापालिकेच्या तांत्रिक बी.ई.कर्मचाऱ्याकडून प्रशिक्षण देण्यात

येईल.समन्वयाने ही योजना घेता येईल.तांत्रिक किंवा कायदेशिर अडचण नाही.

श्री.गिराजाराम हाळनोर : ही योजना महापालिकेने ताब्यात घ्यावी सर्व काम महापालिकेलाचे करावे लागते.महापालिकेचे लाईनचे काम केले तर पैसा लागेल.

श्री.हमीद उद्दीन ताबा : महापालिकेचा २.०० कोटीचा फायदा होणार आहे.जायकवाडी लाइन फुटली तर बोर्डाचे इंजिनियरला सांगावे लागते ते अधिकारी ऐकत नाही ते रात्री बेरात्री आपल्याच इंजिनियरला काम करावे लागते.

श्री.गौतम खरात : महाराष्ट्र शासनाने मंत्रीमंडळ बैठकीत पाणी पुरवठा हा पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची बातमी वाचली आहे.यामूळे लाइन महानगरपालिकेने घेण्यात काही अडचण येते का याचा विचार व्हावा.

मा.आयुक्त : या संबंधिचा शासन निर्णय महापालिकेकडे आला नाही.ही बातमी वाचली आहे.तरी पण शासनाने वेगळा विभाग केला तरी महानगरपालिकेवर त्याचा परिणाम होणार नाही.

मा.महापौर : सदर प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरासाठी जायकवाडी जलाशयातून पाणी पूरवठा करण्याकरीता कार्यरत असलेल्या नविन व जुन्या प्रकल्पातून होणाऱ्या पाणी पुरवठयाची क्षमता सन २०१६ सालापर्यंत गृहीत आहे.भविष्यात हा प्रकल्प कमी पडणार असल्यामूळे नविन २०० एम.एल.डी.ची आणखी एक नविन योजना तयार करण्यासाठी नितांत गरज लक्षात घेवून या नविन योजनेचे तांत्रिक सर्वेक्षण आराखडे व अंदाजपत्रक महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ यांचेकडून तयार करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्येवाही व्हावी.

**विषय ११८/८ :**

आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की,औरंगाबाद शहरासाठी पाणी पुरवठा होणारा प्रकल्प महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचा असून जायकवाडी जलाशय ते औरंगाबाद शहरापर्यंतचा संपूर्ण प्रकल्प महानगरपालिका हस्तांतरीत करुन घेवू इच्छित आहे.

महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठयाच्या देयकापोटी प्रतिमाह दहा हजार लिटर पाण्याकरीता रुपये १.२० दराने वर्षाकाठी रुपये ४.२० कोटी एवढी रक्कम महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळात द्यावे लागते.सदर

प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्ती करीता सुमारे २.०० कोटी खर्च हा महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जल नि:सारण मंडळ करीत आहे.

वरील खर्च बघता सदरचा प्रकल्प हस्तांतरीत करुन घेतल्या नंतर महानगरपालिकेस रुपये २.०० कोटीचा फायदा प्रतिवर्ष होईल.त्याचप्रमाणे देखभाल व दुरुस्ती करणे शक्य होईल.तसेच आज पाणी पुरवठया बाबत समन्वय साधण्यासाठी जो विलंब होतो तो हस्तांतर झाल्यानंतर होणार नाही.

सदरचा प्रकल्प हस्तांतर झाल्यानंतर उप-अभियंता व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व सिव्हील) या वर्गामधील अधिकारी हे एक वर्षा करीता प्रतिनियुक्तीवर घेणे योग्य राहील.तसेच सध्या चतुर्थश्रेणी मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी २५% कर्मचारी हे एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे.या कालावधीत आपल्याकडील वर्ग-४ मधील कर्मचारी हा सक्षम होईल.

वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचा प्रकल्प हा महानगरपालिकेकडे हस्तांतर झाल्यास खर्चामध्ये कपात होईल.व शहरास होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या व्यवस्थेवर नियंत्रण राहील.तसेच सुरवातीच्या काळानंतर म्हणजेच अंदाजे ५ ते ७ वर्षाच्या कालावधीनंतर या योजनेपासून महानगरपालिकेस आर्थिक लाभ होवून उत्पादनामध्ये भर पडेल.

तरी जायकवाडी जलाशय ते औरंगाबाद शहरापर्यंतची महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची औरंगाबाद शहरास पाणी पुरवठा करणारा प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरास पाणी पुरवठा होत असलेल्या जायकवाडी जलाशय ते शहरापर्यंतचा प्रकल्प महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाकडे असून महानगरपालिकेस पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्ती यावर होणारा खर्च लक्षात घेता जायकवाडी जलाशय ते औरंगाबाद शहरापर्यंतचा संपूर्ण प्रकल्प महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या ताब्यात घेतल्यानंतर महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ यांचेकडील (यांत्रिकी व सिव्हील) वर्गातील उप-अभियंता व कनिष्ठ अभियंता तसेच सध्या चमुर्थ श्रेणीमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी २५% कर्मचारी एक वर्षा करीता प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व या कालावधीत महानगरपालिका कर्मचारी सक्षम करुन घेण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्येवाही व्हावी.

**विषय क्र.११९/१:**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला की,एकूण सात विषय समित्यांचे गठण करावयाचा प्रस्ताव दि.१८/१०/९५ च्या विशेष सर्वसाधारण सभेत पारीत करण्यात

आल्या आहेत.या समितीचे कार्य क्षेत्र व कार्याची माहिती समिती सभासद व सर्व नगरसेवकांना ज्ञापीत व्हावी म्हणून प्रस्ताव मसुदा सर्व साधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

१) महिला बाल कल्याण समिती
२) स्थापत्य समिती
३) वैदयकीय सहाय्य व आरोग्य समिती
४) विधी समिती
५) शहर सुधार समिती
६) माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती
७) गलिच्छ वस्ती निर्मुलन,घर बांधणी व समाज कल्याण समिती

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्या संदर्भात तयार करण्यात आलेल्या नियमावलीत विषय समित्यांचे अधिकार व कर्तव्ये नमुद केली आहे.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (२) व (६) अन्वये अधिकार निम्ननिर्दिष्ट विषय समित्यांना त्यांचे अधिकार व कार्यक्षेत्र ठरविण्याबाबत शिफारस केली आहे.

अ) महिला बाल कल्याण समिती
ब) स्थापत्य समिती सार्वजनिक बांधकाम समिती
क) वैदयकीय सहाय्य आणि आरोग्य समिती
ड) विधी समिती-कायदा महसुल आणि सर्व साधारण प्रयोजन समिती
ई) शहर सुधारणा व सुधार समिती
इ)माध्यमिक पुर्व प्राथमिक शाळा आणि तांत्रिक समिती.
फ) गलिच्छ वस्ती निर्मुलन घर बांधणी व समाजकल्याण समिती.

१) महिला व बाल कल्याण समितीचे कार्यक्षेत्र :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (३०) अधिन राहून राज्य शासनाकडून तसेच केन्द्र सरकारकडून वेळोवेळी जाहीर होतील अशा कल्याण योजना हया समितीने राबविल्या पाहीजेत.

२) स्थापत्य समितीचे कार्यक्षेत्र ( सार्वजनिक बांधकाम समिती)

१) नगर स्थापत्य प्रमुख यांचा विभाग व तत्संबधी सर्व प्रश्न .
२) मार्ग,भवने ,पाणी पुरवठा आणि जलशाला (वॉटर वर्क्स)

खुली मैदाने व उदयाने,आग्निशामक दल,कर्मशाळा,यांत्रिकी स्थापत्याची शाखा आणि स्थापत्य विभागातील इतर काम.

३) सार्वजनिक सुरक्षितता आणि सुखसोयी संबंधी इतर प्रश्न.
४) भूमी आणि जिंदगी विभाग तत्संबंधी प्रश्न.
५) कामाचे तपासणी आणि आवश्यकता वाटेल त्यांचे महापालिका आयुक्त यांच्याकडून निवेदन मागविणे.

३) स्थापत्य समितीचे अधिकार व कामे.

कलम अधिकार किंवा काम यांचे स्वरुप. अधिकार प्रदानाच्या

मर्यादेसंबंधी शेरे.

४५ (१) १. नगर स्थापत्य प्रमुख. समितीच्या कामापुरता अंतिम

या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या समितीच्या किंवा उपसमितीच्या वृत्तांतातील उतारा मागविण्याचा आणि अशा समिती किंवा उप-समिती संबंधी विवरणपक्ष,हिशोब पत्रक किंवा प्रतिवृत्त मागविण्याचा अधिकार समितीच्या कामापूरता अंतिम ७६(१) मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार

७९ (सी) कलम क्रमांक ७९ चे (९) (ब) (डी) (ई) यांना पात्र राहून महानगरपालिकेची मालमत्ता भाडयाने देणे,विकणे अथवा इतर मार्गाने तिची विल्हेवाट लावणे या करीता मान्यता देण्याचा अधिकार.

१५४ (१) महानगरपालिकेने गटारे,जलनिःसारण अथवा मलप्रवाहाची विल्हेवाट करण्याची साधने व कामे वगैरे ताब्यात घ्यावी या करीता मनपा आयुक्त यांना संमती देण्याचा अधिकार.

१७६ (ए) जल निःसारक व मैला वाहतुकीची गटारे सोडणेची जागा ठरविण्याचा अधिकार.

१८८ (२) काही विशिष्ट कामे महानगरपालिकेच्या व्यायनिच करावीत,आशा बाबत सर्वसरमान्य स्वरुपाचा अथवा विशेष आदेश देण्याचा अथवा प्रस्ताव मान्य करण्याचा अधिकार.

१८९ (२) जलशाळा इ.बांधण्याला संमती देण्याचा अधिकार.

१९४ (१) जलशाळेसंबंधी असलेल्या कामांना अनुज्ञा देण्याचा अधिकार.

१९६ (२) विनामूल्या पाणी पुरवठयाकरीता जलशाळा बांधण्याचा महापालिका आयुक्त यांना अनुज्ञा देण्याचा अधिकार .

१९६ (३) विनामूल्य पाणी पुरवठया करीता असलेली पुरवठयाची साधने बंद करण्याचा अधिकार.

१९६ (४) मुळ देणगी म्हणून मिळालेल्या रकमेतून समितीच्या कामापुरता अंतिम
बांधण्यात आलेल्या आणि नंतर बंद करण्यात आलेल्या पाणी पुरवठयाची साधने सार्वजनिक उपयुक्ततेच्या कामाकरीता वापरावी असा आदेश देण्याचा अधिकार.

२०३ (२) आक्षेप मागविण्यात आल्यानंतर ते विचारात घेवून एखादा संपूर्ण सार्वजनिक पथ अथवा त्याचा भाग कायमचा बंद करण्याचा अधिकार.

२०५ नविन पथ आखणे आणि तयार करणे आणि त्यांच्यासंबंधी व्ययासंबंधी करार करणे बाबत महापालिका आयुक्त यांना अनुज्ञा देण्याचा अधिकार.

२०६ (१) निरनिराळया वर्गाच्या सार्वजनिक रस्त्याची किमान रुंदी ठरविण्याचा अधिकार.

२०७ भुयारी मार्ग किंवा पुल वगैरे ताब्यात घेण्याचा बांधण्याचा किंवा त्यात काही फेरबदल करण्याचा महापालिका आयुक्त यांना अनुज्ञा देण्याचा अधिकार.

२०८ (१) काही विशिष्ट प्रकारच्या रहदारीकरीता सार्वजनिक पथाच्या वापराला बंदी करण्याकरीता मान्यता देण्याचा अधिकार.

२०९ (१) पथाच्या प्रमाणित रेषेच्या आहेरील जागा (बी) संपादन करण्यास मान्यता देण्याचा अधिकार.

२४९ (१) सार्वजनिक पथ प्रकाशित करण्यांची साधने ठरविण्याचा अधिकार.

४) वैधानिक सहाय्य आणि आरोग्य समितीचे कार्यक्षेत्र :

१) महानगरपालिकेची बाहय औषधालये,रुग्णालये (सांसर्गिक रोगांचे रुग्णालय धरुन) प्रसुतिगृह,वैद्यकीय आणि सुश्रुषागृह आणि ज्या वैद्यकीय संस्थाना

महानगरपालिका आर्थिक मदत करते त्या संबंधीचे सर्व प्रश्न.

२) आरोग्य विभाग-रस्ते सफाई,कचरा वाहतुक (स्थापत्य समितीच्या अधिकारात येणाऱ्या तांत्रिक विभागा संबंधी प्रश्न सोडून) धरुन आणि तत्संबंधी इतर सर्व प्रश्न.

वैद्यकीय सहाय्य आणि आरोग्य समितीचे अधिकार व कामे.

४५ (३) आरोग्य प्रमुख.

कलम अधिकार किंवा काम यांचे स्वरुप अधिकार प्रदानाच्या मर्यादेसंबंधी

शेरे.

६४ पिसाळलेली कुत्री चावल्यामुळे औषधोपचार गरीब माणसाचे पालन पोषण आणि उपचार या करीता खर्च करण्याचा अधिकार.

७०)या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या एखादया समितीच्या समितीच्या कामापुरता अंतिम

समितीच्या किंवा उप-समितीच्या वृत्तांतातील उतारा मागविण्याचा आणि अशा समिती हिंवा उप समिती तंत्संबधी विवला पत्रक हिशोब पत्रक किंवा प्रतिवृत्त मागविण्यांचा अधिकार.

२९४ (१) आयुक्ताने जेथे विशिष्ट प्रसंगी लोक मोठया संख्येत जमतात असे कोणतेही देऊळ,म.,मशिद,थडगे किंवा धार्मिक पुजे अर्चेची किंवा शिक्षणाची कोणतीही जागा यांच्या जवळपास जत्रा किंवा उत्सव भरण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही जागेत स्वच्छता राखण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी खास व्यवस्था केली पाहीजे मग ती कायमची असो की,तात्पुरती असो.

२९४ (२) महापालिकेने आरोग्य रक्षण विषयक केलेल्या खास व्यवस्थेच्या व्ययाप्रित्यर्थ रक्कम ठरविण्याचा अधिकार.

३११ (१) प्रेताची विल्हेवाट लावण्याकरिता योग्य आणि सोयीस्कर आशा इतर जागा ठरविण्याचा अधिकार.

३२२ प्रेताची विल्हेवाट लावण्याकरिता नविन जागा देण्याची किंवा अनुज्ञा नाकारण्याचा महापालिका आयुक्त यांना अधिकार देण्यास संमती देण्याचा अधिकार.

३२८ (१) महानगरपालिकेच्या नविन मंडया आणि नविन पशुवधगृहे यांची तरतुद महापालिका यांनी करण्याबाबत अनुज्ञा देण्याचा अधिकार.

३२८ (२) महापालिका कत्तलखाने व पशुआवारे ही शहरात किंवा (राज्य) शासनाच्या मंजूरीने शहराबाहेर ठेवता येतील.

३२९ महापालिका मंडया आणि पशुवधगृहे इत्यादी बंद करण्याचा अधिकार.

३३० (१) महानगरपालिकेच्या मंडयात विक्री करण्यात येणाऱ्या मालाची (बाहेर ) विक्री बंद करण्यास मान्यता देण्याचा अधिकार .

३३० (२) पोट कलम (१) अन्वये दिलेली कोणतीही नोटीस तसेच मंजुरी घेवून कोणत्याही वेळी आयुक्तास रद्द करता येईल किंवा तीत फेरबदल करता येईल.

४)विधी समितीचे कार्यक्षेत्र : (विधी महसुल व सर्वसाधारण उद्देश समिती)

१) महापालिकेच्या कारभारासंबंधी,महानगरपालिका अधिनियम आणि इतर अधिनियम पोटनियम,नियम यातील तरतुदी चा अर्थ लावण्याबाबत आणि त्यामधील सुधारणाबाबत उपस्थित होणारे प्रश्न.

२) कर आकारणी व कर संकलन विभाग.

३) निवडणूका विषयक प्रश्न.

४) आयात कर विभाग.

५) गणना विभाग

६) अनुज्ञा पत्र (परवाना विभाग) आरोग्य आणि आरोग्येतर

७) दुसऱ्या विशेष समित्यांच्या कक्षेत येणारे सर्व संकीर्ण प्रश्न.

विधी समित्याचे अधिकार व कामे.

कलम अधिकार किंवा काम यांचे स्वरुपअधिकार अधिकार प्रदानाच्या मर्यादेसंबंधी

३ (३) महापालिका चर्तु: सिमेतील बदल.

३२ इतर स्थानिक प्राधिकारी अथवा प्राधिकाऱ्यांच्या गटाबरोबर संयुक्त व्यवहार अथवा कामे करण्याकरीता त्यांच्याशी संयुक्त होण्याचा अधिकार.

४५ (१) प्रमुख अर्थ्वान्वेषक,नगर सचिव,महानगरपालिका

६ (३) उपायुक्त (डेप्युटी म्युनिसिपल कमिशनर) महापालिका सहाय्यक आयुक्त आणि (आसिस्टंट म्युनिसिपल कमीशनर) यांच्या नेमणूका करण्याचा अधिकार.

६० (१) महापालिकेने दिलेल्या निवासस्थानात अधिकारी व कर्मचारी यांनी राहण्याबाबत अटी शर्ती सुचविण्याचा अधिकार.

६०बी. (१) महापालिका आयुक्त यांनी महापालिकेच्या जागा रिकाम्या करुन घेण्याबाबत मान्यता देण्याचा अधिकार.

या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या एखादया समितीच्या कामापुरता अंतिम

७० समितीच्या किंवा उपसमितीच्या वृत्तांतातील उतारा मागविण्याचा आणि अशा समिती किंवा उपसमिती संबंधी विवरण पत्रक,हिशोब पत्रक किंवा प्रतिवृत्त मागविण्याचा अधिकार.

८०(२) मालमत्तेवरील हक्का संबंधीच्या निर्णयाबाबत दिवाणी दावा लावण्याचा अधिकार.

८१ आपली मालमत्ता हस्तांतरीत केलेली आहे,अशा मालकाविरुध्द अथवा ज्यांच्याकडे ते हस्तांतरीत झाला आहे अशा विरुध्द कराराची कार्यवाही करण्याचा अधिकार.

१३३ (२) सरकारी मालमत्तेची मूल्यमापन करण्याकरता (महाराष्ट्र ) शासनाने केलेल्या नियुक्तीबद्दल आपले सहमत व्यक्त करण्याचा अधिकार.

२८५ (३) स्वयंसेवक अग्निशामक दल म्हणून कोणत्याही व्यक्ती समुहाला मान्यता देण्याचा आणि त्या करीता अटी ठरविण्याचा अधिकार.
३८६ (२) अनुज्ञापत्रे (लायसन्स) अथवा लिखित अधिकार पत्रे या करिता आकारावयाच्या शुल्काचे दर ठरविण्याचा अधिकार.
४२२ (१) दंडाधिकाऱ्यांच्या जागा निर्माण करण्याबाबत संमती देण्याचा अधिकार.
४५४ नियम करण्याचा अधिकार.
४५५ (३) नियमाच्या अधिक प्रगटीकरणाची रित ठरविण्याचा अधिकार.
४५८ उपनियम करण्याचा अधिकार.

५) शहर सुधारणा समितीचे कार्यक्षेत्र.(सुधारणा समिती)

१) शहराच्या सर्व साधारण सुधारणा संबंधी तसेच निर्देशक योजना (मास्टर प्लॅन) नगररचना योजना,औद्योगिक वसाहती,गृहनिर्माण योजना या संबंधीने सर्व प्रश्न.

शहर सुधारणा समितीचे अधिकार व कामे

कलम अधिकार किंवा कामे यांचे स्वरुप अधिकार प्रदानाच्या मर्यादेसंबंधी

७० या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या समितीच्या किंवा उपसमितीच्या वृत्तांतातील उतारा मागविण्याचा आणि आशा समिती संबंधी विवरण पत्रक हिशोब पत्रक किंवा प्रतिवृत्त मागविण्याचा अधिकार.
७६ (१) मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार.
२७०(१)महापालिका आयुक्त यांनी काढलेल्या
बी (१) अधिसुचनेला (नोटीफिकेशन) पसंती देण्याचा अधिकार.
खोका टपरीधारकांचे अर्जाप्रमाणे नगररचना अधिकारी यांचे अभिप्राय घेवून मंजूरी देण

६) माध्यमिक पुर्व प्राथमिक व तांत्रिक शाळा समितीचे कार्यक्षेत्र माध्यमिक,पुर्व प्राथमिक व तांत्रिक शाळेसंबंधीचे सर्व प्रश्न.

७) गलिच्छ वस्ती सुधारणा,घर बांधणी व समाज कल्याण समितीचे कार्यक्षेत्र.
गलिच्छ वस्ती सुधारणा,घर बांधणी व समाज कल्याण समितीचे सर्व प्रश्न.

**संवाद :**

श्री.हमीद उद्दीन ताबा : शिक्षकांच्या ज्या मुलाखती झाल्या त्या खऱ्या अर्थाने योग्य झाल्या का?याचा खुलासा व्हावा.काही बोगस लोकांनी परिक्षा दिली अशी माहिती मिळाली आहे.

मा.आयुक्त : या संबंधामध्ये पूर्ण काळजी घेतली जाईल ज्या उमेदवारांची निवड करण्यात येईल त्यांना नेमणू पत्र देण्यापूर्वी सही तपासली जाईल.आवश्यकता भासल्यास उमेदवाराबाबत शहानिशा करुनच चौकशी केली जाईल.त्यानंतरच उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल.काही लोकांना जि.प.मध्ये नौकरी असतांनाही मुलाखत पत्र दिले गेले होते ही चुक सेवायोजन कार्यालयाची आहे.महानगरपालिकेने सेवायोजन कार्यालयाकडून यादी मागविली.त्यानुसार सर्वांना मुलाखत पत्र दिले.सर्व साधारण सभेचा ठराव असेल तर जे सध्या नौकरीत आहेत त्यांना नियुक्ती देवू नये असा ठराव सर्व साधारण सभने केला तर त्याचा आदर केला जाईल.

श्री.हमीद उद्दीन ताबा : शिक्षक भरतीसाठी वृत्तपत्रात जाहिरात का दिली नाही जसे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूकीसाठी जाहीरात दिली होती तशी शिक्षकांसाठी पण जाहीरात यावयास हवी होती.

मा.आयुक्त : शासनाचा सेवायोजन बाबत जो कायदा आहे.त्यानुसार वर्ग-३ करिता जाहीरात देता येत नाही.परंतू ज्या विशिष्ट जागा आहेत त्यासाठी आपण सर्व मार्गांनी उमेदवार बोलावतो.त्यासाठी सेवायोजन सोशल वेल्फेअर यांचेकडून उमेदवारांची नावे मागविली जाते.व जाहीरात पण देतो.यापूर्वी जी वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती झाली त्यावेळी ८ जागांसाठी फक्त १५ उमेदवार आले यावेळीही वैद्यकीय अधिकारी पदासाठी फार कमी अर्ज आले आहे.जास्तीत जास्त उमेदवारांचे अर्ज यावे चांगल्या उमेदवाराची निवड व्हावी म्हणून जाहीरात देतो.शिक्षकांबाबत ही स्थिती नाही.सेवायोजन कार्यालयाकडून आवश्यक तेव्हढे उमेदवार मिळू शकतात व सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवार घेण्यात यावेअसे बंधन आहे.जाहीरात दिली तर लाखो अर्ज येतील त्याची पडताळणी शक्य नाही.

श्री.मोहसीन अहेमद : महापालिकेने शिक्षक भरतीसाठी ४२० उमेदवारांना मुलाखत पत्र दिले.त्यावेळी २१६ लेखी परिक्षेस आले,यापैकी २०६ तोंडी परिक्षेला आाले.एका पदाकरीता कमीत कमी १० उमेदवार असावे असा नियम आहे.यातील अनेक उमेदवारांनी फसवेगिरी केलेली आहे.यापैकी बरेच लोक दुसऱ्या खात्यात नौकरीस आहेत या उमेदवारांपैकी बऱ्याच उमेदवारांनी यापूर्वीही महापालिकेत मुलाखत दिलेली आहे.याबाबत लेखी पत्र दिले आहे.या यादीत १९९४ च्या उमेदवारांची नावे आहेत.याची चौकशी व्हावी.

मा.महापौर : मा.आयुक्त खुलासा करीत आहेत.स.सदस्यांनी खाली बसावे.

सौ.लता दलाल : मुलाखत दिलेल्या उमेदवारांपैकी बरेच उमेदवार इतर ठिकाणी नौकरीत आहेत अशा उमेदवाराकडून बॉंड पेपर करार लिहून घ्यावा ते इतरत्र कोठेही नौकरीत नाही व ही माहिती खोटी निघाल्यास त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.अशा प्रकारामूळे फक्त बेकार उमेदवारांनाच नौकरीची संधी मिळेल.

श्री.काशीनाथ कोकाटे : एखादया उमेदवारास त्या सस्थेत किंवा खात्यात काम करण्याची इच्छा नसेल तर असे लोक मुलाखत देवू शकतात.स.सदस्या सौ.दलाल

यांचे सुचनेवर असे सुचवितो की जे उमेदवार इतर खात्यात नौकरीस आहेत ज्यांना नौकरीवर घेतले जाणार नाही अशी जाहीरात द्यावयास पाहीजे होती कोणासही कोठेही मुलाखत देण्याचा अधिकार आहे.

श्री.अब्दुल जावेद रज्जाक : एका उमेदवाराचे जागेवर दुसऱ्याच उमेदवारांनी मुलाखत दिली अशा वेळी फोटो आवश्यक आहे की नाही याचा आयुक्तांनी विचार करावा.

मा.आयुक्त : मी स्वतः मुलाखतीच्यावेळी हजर होतो.ज्या उमेदवारांनी लेखी पेपर दिले त्यांच्या स्टँडर्ड मध्ये फारसा फरक नाही.त्यामुळे इतर उमेदवार पेपर देत असेल तर फरक पडतो.सर्वांच्या सहया घेतल्या आहेत त्यामूळे बोगस उमेदवाराचा शोध घेणे कठीण नाही.सही व पेपरवरील अक्षर तपासून पाहीले जाईल.पोस्टाच्या दिरंगाईमुळे मुलाखत पत्र मिळाले नसले तरी आशा उमेदवारांना परिक्षेस बसण्याची परवानगी दिली आहे.

**संवाद :**

नगरसचिव : विषय पत्रिकेसोबत विषय समित्यांचे कार्यक्षेत्र बाबत अधिकाराची माहिती दिलेली आहे.

मा.महापौर : विषय समित्यांना अधिकार दिले तो विषय आहे त्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने गठीत केलेल्या सात विषय समित्यांचे अधिकार व कार्यक्षेत्र (प्रस्तावित नमुद केल्या प्रमाणे) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्येवाही व्हावी.

**विषय १२०/१० :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहेकी,दशमेशनगर,जयनगर येथे नाल्यास संरंक्षित भिंत बांधण्याविषयी कामाचे अंदालपत्रक परिसर अभियांत्रिकी यांचे दर सूची ९४-९५ नुसार ३५,००,०००/- चे तयार करण्यात आले आहे.अंदाजपत्रकामध्ये संरंक्षित भितींची लांबी ५४० मीटर घेण्यात आली आहे.

सदरील रक्कम रुपये ३५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.१९/१२/९५ ला मंजुरी दिलेली आहे.मे.शहा कन्सल्टस यांनी दिलेल्या डीझाईनप्रमाणे अंदाजपत्रक रुपये ३५,००,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम विशेष शासकीय अनुदान ९५-९६ मधून प्रस्तावित आहे.तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दशमेशनगर,जयनगर येथे नाल्यास संरंक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी यांचे दरसुची ९४-९५ नुसार मे.शहा कन्सल्टस यांनी दिलेल्या डीझाईन प्रमाणे तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ३५,००,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम विशेष शासकीय अनुदान ९५-९६ मधुन खर्च करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १२१/११ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,संजय नगर,भवानीनगर,दादाकॉलनी येथे दाट लोकवस्ती असून संपूर्ण वस्ती नाल्या शेजारी आहे.यावर्षी झालेल्या मुसळधार पावसात या नाल्यास मोठया प्रमाणात लोकांच्या घरात पाणी शिरुन बऱ्याच घराची पडझड झालेली आहे.करीता या ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे आवश्यक आहे.

परिसर अभियांत्रिकी दरपत्रक ९४-९५ नुसार व मंजूर दर पत्रकानुसार मे.शहा कन्सल्टंस यांनी दिलेल्या डीझाईन प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३८,५९,३६९/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.१२/१२/९५ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.सदरील काम विशेष शासकीय अनुदान ९५-९६ मधून प्रस्तावित आहे.तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद:**

श्री.गौतम खरात : हा जो प्रस्ताव ठेवला तो १० कोटीतून आहे का? यास प्रस्तावात दर्शविलेल्य भागा व्यतिरिक्त काही भागाचे काम होणार का? मिलींदनगरमध्ये घरातून पाणी गेले.

मा.आयुक्त : स.सदस्य श्री.गौतम खरात यांच्या सुचनेची दखल घेतली जाईल.

श्री.गंगाधर गाडे : मसनतपूर भागात गटारापासून जे पाणी वाहत नाल्याचे पाणी वाहते ज्यात फॅक्टरीचे पाणी असते,त्यामूळे नागरिकांना त्रास होतो.शासनाकडून १० कोटी येत असतील तर या पैशातून गरीबांच्या वसाहतीत काम झाले पाहीजे स्लम भागाचा विचार करण्यात यावा.

श्री.अब्दुल रशिदखाँन (मामू) :सिल्क मिल कॉलनी येथील नाला छोटा आहे.त्यास मंजूरी देण्यात येईल असे सांगण्यात आले पण त्याचा समावेश नाही.त्याच प्रमाणे हर्षनगर,बारुदगरनाला,बायजीपूरा,एस.टी कॉलनी येथील कामं घेण्यात यावे,त्यासाठी जास्तीचे ५० लाख वाढविण्यात यावे.

मा.आयुक्त : किरकोळ बजेट मधून काही व दहा कोटीतून काही असे २-३ कोटीची कामे केली जातील.स.सदस्य श्री.गाडे साहेब यांच्या मुदयाप्रमाणे स्लमवर अन्याय होणार नाही.

श्री.वसंत देशमुख : गेल्या दोन वर्षापासूनचा हा प्रश्न आहे.त्याची सतत मागणी केली आहे,यात वर्षाच्या कामाचा प्रश्न आहे.त्याचा विचार करुन त्यास मंजूरी दयावी.

सौ.रुख्मणीबाई लोखंडे : पडेगांव येथे नदीत सर्व घरे या वर्षी वाहुन गेले.त्याठिकाणीही भिंतीची आवश्यकता आहे.

मा.आयुक्त : शहराच्या सर्व नाल्याची पाहणी केली.त्यासाठी अंदाजे ५५ कोटी खर्च येईल त्याचा प्रोग्राम आहे ही कामे एकदम करता येणार नाही.

मा.महापौर : ऐनवेळचे जे दोन प्रश्न होते ते मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर,भवानीनगर,दादाकॉलनी येथे दाट लोकवस्ती संपूर्ण नाल्या शेजारी असुन या वर्षी झालेल्या मुसळधार पावसात नाल्याचे मोठया प्रमाणात पाणी लोकांच्या घरात शिरुन बऱ्याच घराची पडझड झालेली असून या ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे आवश्यक आहे.व त्यासाठी परिसर अभियांत्रिकीचे ९४-९५ चे मंजूर दर

पत्रकानुसार मे.यरहर कन्सल्टंट यांनी दिलेल्या डिझाईन प्रमाणे तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ३८,५९,३६९/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर काम विशेष शासकीय अनुदान ९५-९६ मधुन खर्च करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १२२/१२ :**

प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे सध्या एक २० बेडेड हॉस्पीटल सिडको एन-८ येथे १४ डिस्पेन्सरीज विविध भागात चालवल्या जातात.या दवाखान्याच्या संख्येत उपकेन्द्राचाही समावेश आहे.करीता पुढील प्रमाणे एक २० खाटांचे रुग्णालय व एक उपकेन्द्र सुरु करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) २० खाटांचे रुग्णालय कैसर कॉलनी येथे महानगरपालिकेच्या मालकीच्या खालीलपैकी कोणत्याही एका जागेमध्ये सुरु करणे बाबतचा प्रस्ताव.

१) नागसेन कॉलनी - शीट क्र.४९ सी.टी.एस.न.९२६९ (एरीया ४१३.२ चौ.मी.)
२) न्यु कॉलनी - शीट क्र.३२९ सी.टी.एस. नं.१२०८९/१ (एरीया ४०० चौ.मी.)
३) बशीर कॉलनी - शीट क्र.४८ सी.टी.एस.क्र.९६७२/११(एरीया ५८९.५ चौ.मी.)

२) कटकटगेट येथे आरोग्य उपकेन्द्र चालु करणेबाबत.करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी येथे प्रस्तावात दर्शविलेल्या अ.क्र.१ ते ३ जागेपैकी कोणत्याही एका योग्य जागेत २० बेडेड हॉस्पीटल सुरु करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय पत्रिका*

नगर सचिव - मा.महापौरांचे परवानगीने पुरवणी विषय पत्रिकेस सुरुवात होत आहे.

**विषय १२३/१३ :**

शहरातील सर्व ड्रेनेजचे पाणी व सांडपाणी वाया जात आहे व महानगरपालिकेस त्यापासून उत्पन्नही मिळत नाही.तरी या पाण्यापासून गॅस निर्मिती प्रकल्प किंवा विद्युत निर्मितीचा प्रकल्प राबवावा.जेणेकरुन महानगरपालिकेस उत्पन्नही मिळेल व नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न सुटेल.
सुचक : श्री.गिरजाराम हाळनोर.
अनुमोदक : श्री.महादेव सुर्यवंशी.
**संवाद :**
श्री.गिरजाराम हाळनोर : हा विषय शहराच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून आणि भविष्याच्या प्लॅनिंग मधून ठेवलेला आहे.करीता विषय क्र.१ व २ करीता अधिकारी व सदस्यांची एक उप-समिती नेमून त्याचा विचार करावा व पूर्ण अहवाल तयार करावा.

मा.महापौर : विषय क्रमांक १ व २ मंजूर करण्यात येतो.यासाठी सत्ताधारी पक्षाचे ३ विरोधी पक्षाचे ३ व संबंधित अधिकारी यांची कमिटी स्थापन करुन त्यांनी पुढच्या सभेत अहवाल सादर करावा.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील सर्व वाया जाणारे ड्रेनेजचे पाणी व सांडपाणी या पाण्यापासून गॅस निर्मिती प्रकल्प अथवा विद्युत निर्मिती प्रकल्प राबविण्यात यावा,जेणेकरुन मनपास उत्पन्नही मिळेल व नागरिकांचे आरोग्याचा प्रश्न सुटेलही बाब विचारात घेता सदर प्रकल्पाची सविस्तर माहीती संकलनासाठी सत्ताधारी पक्षाचे तीन विरोधी पक्षाचे ३ नगरसेवक व संबंधित अधिकाऱ्यांची एक कमिटी स्थापन करण्यात येते त्यांनी पुढील सभेत अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय १२४/८** :

आपल्या शहरात बराच कचरा दररोज निघत असतो तो सर्व मांडकी येथील ट्रेचिंग ग्राऊंडवर टाकण्यात येतो,त्यामूळे नारेगांव व परिसरातील नागरिकांना अत्यंत त्रास होतो.त्यांचे आरोग्यही धोक्यात आले आहे.त्यामूळे महानगरपालिकेने कचऱ्यापासून विज निर्मिती प्रकल्प व खत निर्मिती प्रकल्प अमलात आणावेत जेणेकरुन महानगरपालिकेस उत्पन्नही मिळेल व नागरिकांनाही त्रास होणार नाही.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी.

अनुमोदक : श्री.गिरजाराम हाळनोर.

**संवाद :**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात निघणारा कचरा मांडकी येथील ट्रेचिंग ग्राऊंडवर टाकण्यात येतो त्यामूळे नारेगांव परिसरातील नागरिकांना अत्यंत त्रास होतो,त्यांचे आरोग्यही धोक्यात आलेले आहे.त्यासाठी महापालिकेतर्फे जमा होणाऱ्या कचऱ्या पासून विज निर्तिती प्रकल्प तथा खत निर्मिती प्रकल्प अमलात आणण्यासाठी सदर प्रकल्पाची सविस्तर माहिती व अहवाल तयार करण्यासाठी सत्ताधारी पक्षाचे तीन व विरोधी पक्षाचे तीन नगरसेवक व संबंधित अधिकारी यांची एक समिती गठीत करण्यात येते.त्यांनी आगामी सभेत या बाबत संक्षिप्त अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय १२५/१५ :**

महानगरपालिका अस्थापनेवर सध्या काम करीत असलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना सध्या २७/- रु.प्रति दिन वेतन दिले जाते तसेच काही कर्मचारी ठराविक वेतन दिले जाते,त्यामुळे बऱ्याचदा कर्मचाऱ्यांची / कामगारांची ठराविक वेतनाबाबत मागणी केलेली आहे.तरी दै.वेतनावरील कर्मचाऱ्यांना प्रतिदिन रु.२७/-ऐवजी ३५/- दैनिक वेतन व वर्ग ३ च्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना रु. ४०/- दैनिक वेतन देण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.गौतम खरात.

अनुमोदक : श्री.प्रदीप जैस्वाल.

**संवाद**

मा.आयुक्त : या प्रस्तावास तत्वतः विरोध नाही एप्रिल ९५ पर्यंत २१ रुपये देतो.मे ९५ पासून २१/५ रुपयाचे २७ रुपये केले त्यांना ३५ रुपये मिळाले पाहीजे यात वाद

नाही पण वाढ दोन हप्त्यात दिली तर आर्थिक बोजा थोडा कमी होईल.१ जानेवारीपासून रु.३२/- व त्यानंतर कुठल्याशा चांगल्या तारखेपासून ३५ रुपये दयावयाचे.

श्री.प्रदीप जैस्वाल : मा.आयुक्त यांनी खुलासा केला येत्या १ जानेवारी पासुन रु. ३५ /- दैनिक वेतन दयावे.

मा.महापौर : विषय क्र.मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अस्थापनेवर सध्या काम करीत असलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना सध्या प्रतिदिन रुपये २७/- वेतन दिले जाते.तसेच काही कर्मचाऱ्यांना ठराविक वेतन दिले जाते.कर्मचारी / कामगारांची ठराविक वेतनाबाबत मागणी विचारात घेता दै.वेतनावरील कर्मचाऱ्यांना रु.३५ या प्रमाणे दै.वेतन १ जानेवारी ९६ पासून अदाई करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १२६/१६ :**

आमखास मैदान येथे महानगरपालिकेतर्फे उद्यान विकसित होणार आहे.सदरील नियोजित उद्यानास "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान" असे नाव देण्यात यावे.

सुचक : श्री.गौतम खरात.

अनुमोदक : श्री.प्रदीप जैस्वाल.

**संवाद :**

मा.आयुक्त : सर्व नागरिक तेथे येऊन प्रात: विधी करतात सार्वजनिक शौचालय तेथे आहे.थोर व्यक्तीचे नाव दिल्यानंतर त्याचे पावित्र्य ठेवल्या गेले पाहीजे,याची दक्षता घ्यावी.

मा.महापौर : मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथे विकसित होणाऱ्या नियोजित उद्यानास "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान" असे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १२७/१७ :**

प्रभाग क्र.७८ एस.टी.कॉलनी भागातील जयभवानी नगर,राजीव गांधीनगर,संतोषीमाता नगर,लोकशाही कॉलनी हया भागातील नागरिक एकूण खर्चाच्या ५०% रक्कम भरण्यास तयार आहेत.तरी त्या भागामध्ये पाणी,ड्रेनेज व रस्त्याचे काम करण्यात यावे.करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.मंदा धनंजय काळुसे.

अनुमोदक : श्री.गिरजाराम हाळनोर.

**संवाद :**

मा.महापौर : स.सदस्य श्री.काशीनाथ कोकाटे हे बोलतील.

श्री.काशीनाथ कोकाटे : सभागृहाने नुकताच २५ % रक्कम भरुन सवलती देण्याचा प्रस्ताव मंजूर केला यात सर्व सवलती देणार का?

मा.महापौर विषय क्र. १२७/१७ बाबत सर्वांच्या भावना लक्षात घेऊन ५०% ऐवजी २५% करण्यात येत आहे.

.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.७८ एस.टी.कॉलनी भागातील जय भवानीनगर,राजीव गांधीनगर,संतोषीमाता नगर व लोकशाही कॉलनी हया भागातील नागरिकांकडून एकूण खर्चाच्या ५०% ,ऐवजी २५% रक्कम वसुल झाल्यानंतर त्या भागामध्ये पाणी,ड्रेनेज व रस्त्याचे काम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १२८ / १८:**

महानगरपालिकेमार्फत महापालिका हद्दीत बऱ्याच ठिकाणी काही गृह निर्माण संस्था अथवा बिल्डर्स यांना स्वंविकास (सेल्फ डेव्हलपमेंट) या तत्वावर विकास-निधी (बेटरमेंट चार्जेस) न घेता बांधकाम परवानगी देण्यात येते.गृह निर्माण संस्था किंवा बिल्डर्स त्या वसाहतींना सर्व नागरी मुलभुत सुविधा हव्या तशा उपलब्ध करुन देत नाहीत आणि दिल्याच तर त्यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो अशा संस्थानी मुलभुत सुविधा तयार करून दिल्या नंतर त्याची प्रथम प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन उत्कृष्ट प्रतिच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या अशी खात्री झाल्यानंतरच सदर गृहनिर्माण संस्थाना अथवा खाजगी बिल्डर्सना बांधकाम परवाना देण्यात यावा.

सुचक : श्री.नरसिंग ढगे.

अनुमोदक : श्रीमती पुष्पाताई गंगवाल.

**संवाद :**

श्री.नरसिंग ढगे : सेल्फ डेव्हलपमेंट या अटीवर महानगरपालिका परवानगी देते.याचा फायदा घेवून बिल्डर्स सर्व सुविधा देत नाहीत त्यासाठी हा प्रस्ताव मांडला आहे.गादीया विहारला अशी परवानगी दिली.येथील ड्रेनेज लाइन नेहमी चोक अप होते.गादीया विहारने ड्रेनेज लाइन विनापरवाना दिड वर्षापूर्वी जोडली आहे.तेव्हा बिल्डर्सना परवानगी देतांना आधी पूर्ण सुविधा देण्याबाबत सूचना द्यावी.

श्री.प्रदीप जैस्वाल : स.सदस्य श्री.नरसिंग ढगे यांचा प्रस्ताव योग्य आहे.बिल्डर्सना परवानगी देतांना सेल्फ डेव्हलपमेंट प्रमाणे पूर्ण विकास करुन किंवा बेटरमेंट घेतल्यानंतरच परवानगी दयावी.

श्री.संजय जोशी : रामतारा सोसायटीचा सेल्फ डेव्हलपमेंटमध्ये ले-आऊट मंजूर झाला पण तेथे जाण्यास रस्ता नाही.डांबरी रस्ता नाही ही पूर्ण चूक प्रशासनाची आहे.खिंवसरा विहारचा ले आऊटही तयार आहे नाल्यावर प्लॉट पाडून ते मंजूर केले ही चूक प्रशासन व नगररचना यांची आहे.त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.अब्दुल रशिद खान (मामू) : विकास खर्च न घेता परवानगी दिली असे किती प्रकरणे आहे विकस खर्च वसुल केल्याशिवाय परवानगी मिळत नाही असा नियम आहे.

मा.महापौर : स.सदस्य श्री.हाळनोर बोलत आहेत.

श्री.गिरजाराम हाळनोर : बिल्डर्स नागरिकांकडून विकास खर्चाचे पैसे घेतात,इमारत बांधतात,विकास करत नाहीत आणि पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेत नाही.नागरिक रहायला आले की,महापालिकेला वरील कामे करावी लागतात.

सहा.संचालक (नगररचना) : सध्याच्या पध्दतीनुसार सेल्फ डेव्हलपमेंट मध्ये ५०% रक्कम डीपॉझीट घेतो आणि काम पूर्ण झाल्यानंतर कार्यकारी अभियंता (पा.पू.जलनि:सारण) अति-शहर अभियंता यांचेकडून प्रमाणपत्र घेतो.त्यानंतर लेआऊटची अंतीम मंजरी देतो.

श्री.अब्दुल रशिद खान (मामू) :बिल्डरने अंडरटेकींग देवून विकास खर्च भरला नाही तर अशांना आपण परवानगी देतो का? कायदयात तशी तरतूद आहे किंवा नाही.

मा.आयुक्त : स.सदस्य श्री.रशिद मामू यांचे म्हणणे बरोबर आहे.तशी तरतुद आहे.पण पूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन अनामत रक्कम म्हणून ५०% रक्कम घेतो.पण बिल्डर्स प्लॅट विकून टाकतात अशावेळी परवानगी देतांना बाकी रक्कम भरण्याची मागणी करतो व डेव्हलपमेंट चार्जेस भरुन घेतो.विकास खर्च व शहर विकास हे दोन वेगळे चार्जेस आहेत.रामतारा सोसायटीचा करार डीफेक्टीव्ह आहे.त्याचा फायदा बिल्डरने घेतला ही बाब लक्षात घेवून त्यात सुधारणा केली आहे.

श्री.गंगाधर गाडे : कायदेशिर बाब तपासून रामतारा बाबत करार बदलून घेता येतो का?हे तपासून पहावे.

मा.आयुक्त : रामताराचा करार १९८८ मध्ये झाला.आता तो बदलता येणार नाही.

मा.महापौर : विषय क्रमांक १२८/१८ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरातील गृह निर्माण संस्था अथवा बिल्डर्स यांना स्वयंविकास तत्वावर परवानगी देतांना अशा संस्थांनी मुलभूत सुविधांचा दर्जा उत्कृष्ट प्रतिचा आहे अशी खात्री झाल्यानंतरच सदर गृह निर्माण संस्था अथवा खाजगी बल्डिर्सना बांधकाम परवानगी देण्यात यावी,असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

सौ लता दलाल : एक लक्षवेधी सुचना आहे जकात धोरणानुसार सर्व ड्रगीस्ट असोशिएशनने बंद पाळला आहे.असोशिएशनचे लोक आले आहेत.कृपयात्यांचे निवेदन स्विकारावे व मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

(सर्व सभासद आपआपसात बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

मा.आयुक्त : मिटींगनंतर निवेदनधारक मा.महापौरांना भेटतील त्याबाबत खुलासा असा की,सलाइनचे बाटल्याचा ट्रक आल्यानंतर त्याच्या व्हायचरवर प्रत्येकी रु. ८.५० असा दर आहे.मार्केट मध्ये रुपये ३०.०० मध्ये सर्वसामान्य ग्राहकांना मिळते.यावरुन व्हावचर बोगस असतील किंवा हा सुध्दा नफाखोरीचा होवू शकतो.जर एखादा दुकानदार रु.८.५० ची बॉटल रु.३०/- विकत असेल तर कायदयाने गुन्हा होवू शकतो.१५% ते २०% नफा योग्य पण १००%,२००%,३००% नफा ही बाब नफा खोरीत येवू शकते.यावरुन मार्केट

मध्ये जी किंमत आहे त्यातून २०% नफा सोडून ती किंमत धरली यात चुक काय?

श्री.प्रदीप जैस्वाल : दुकानदारांना नफा किती मिळतो याचा महनगनरपालिकेशी संबंध येत नाही.दुकानदारांनी सर्व कागदपत्र दिलेत.दुकानदारांना फक्टरी कोणत्या रेटने माल देते हे बघा त्याची चौकशी करावी व दोषी आढळल्यास कार्यवाही करावी असे मत आहे.

मा.महापौर : डॉ.कराड बोलतील.

डॉ.भागवत कराड : माझ्या माहितीनुसार रु.९/१० मिळते.प्रिटींग किंमत जास्त असते ती कशी हे मी सांगू शकत नाही.

मा.आयुक्त : तीन वाजता मिटींग बोलावली आहे.मा.महापौरांना निवेदन देतील.कोणावरही अन्याय होवू देणार नाही.

श्री.अब्दुल रशिद खान (मामू) : सभागृहात स.सदस्य श्री कराड यांनी खुलासा केल्याप्रमाणे मार्केटमध्ये रुपये ९/१० ला सलाइनची बाटली मिळते तर महापालिकेने रु.१०/- वर जकात आकारावी व व्यापाऱ्यांनी ती मार्केटमध्ये रु.२५ किंवा रं.३० ला विकावी.

(यावेळी काही स.सदस्य आपआपसात जोरजोरात बोलतात.काहीही ऐकू येत नाही.)

श्री.मोहसीन अहेमद : आज शहरात महापालिकेचे ८२ नगरसेवक आहे.तर असोशिएशनने स.सभासदांना विश्वासात घ्यावयाला हवे होते.तर या पध्दतीचा अवलंब न करता ड्रग असोशिएशनने सरळ दुकाने बंद करुन निवेदन देण्याचा मार्ग स्विकारला ही बाब योग्य नाही.म्हणून मा.महापौरांनी त्यांचे निवेदन स्विकारणे योग्य नाही.

(यावेळी पुन्हा काही स.सदस्य आपआपसात घोषणासह जोरजोरात बोलतात.काहीही ऐकू येत नाही.)

श्री.काशीनाथ कोकाटे : सभागृहात स.सदस्य श्री.जैस्वाल यांनी खुलासा केल्याप्रमाणे सभा बंद करुन ड्रग असोशिएशल यांचे निवेदन यास माझा विरोध आहे.शहरातील दुकानदार अनेक कर चुकवतात.मा.आयुक्त यांनी जो खुलासा केला त्यांचा ही विचार केला गेला पाहीजे.

श्री.प्रदीप जैस्वाल : स.सदस्य श्री.कोकाटे यांनी आताच खुलासा केल्याप्रमाणे मी सभा बंद करुन ड्रग असोशिएशनचे निवेदन स्विकारावे असे कुठेच म्हटलेले नाही.याबाबत माझे म्हणणे असे आहे की,ही लक्षवेधी सुचना यासाठी आहे की,ड्रग असोशिएशनने अचानकपणे दुकाने बंद केलेली आहेत.शहरातील अनेक नागरिक रुग्णांसाठी औषध घेण्याकरीता दुकानाजवळ थांबले असतील याचा विचार करुन ही लक्षवेधी सुचना केली आहे.

श्री.गंगाधर गाडे : ड्रग असोशिएशन व त्यांचे विक्रेते यांचीही ही बाब म्हणजे अतताईपणाची आहे.याबाबत मा.आयुक्त व मा.सभासद यांनीही खुलासा केलेला आहे.तर मला असे वाटते की,ड्रग असोशिएशनने मा.महापौर,मा.आयुक्त यांना त्यांच्या मागण्यांचे निवेदन देवून ही बाब सांगू शकले असते आज शहरात एखादा नागरिक मृत्यूशी झुंज देत असेल अशावेळी ड्रग असोशिएशनने दुकाने बंद करुन त्यांच्या मृत्युशी खेळू नये.तेव्हा माझी एकच विनंती आहे की,ड्रग असोशिएशनने आपली दुकाने त्वरीत उघडावीत माझ्या या मताशी स.सदस्य श्री.प्रदीप जैस्वाल सहमत असतील असे मी मानतो.

श्री.प्रदीप जैस्वाल : जकात आकारणी प्रकरणी ड्रग असोशिएशन यांनी दि.३०/११/९५ व ६/१२/९५ रोजी जी पत्रे दिली त्याच वेळी श्री.मा.आयुक्त यांना याबाबत माहिती दिली.याबाबत त्यापत्रात बातमीही आली आहे.या बाबत मा.आयुक्तांनाही निर्णय दयावा असे मी दुरध्वनीवरुन बोललो.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : सलाइन बाटलीच्या विक्री प्रकरणावरुन सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे दुकानदार जर रु.८/- बाटली ग्राहकांना रु.३०/- मध्ये विकत असतील तर महापालिकेचे सभापती शाखा प्रमुख या नात्याने श्री.जैस्वाल यांनी याचा विचार करावी की,एखादया वस्तूच्या विक्रीवर नफा तरी किती घ्यावा नफा घेण्यास सुध्दा काही मर्यादा असाव्यात.

श्री.भगवान घडामोडे : दुकानदारावर दुकाने बंद करण्याची पाळी आली यास प्रशासनाच्या काही चुका असू शकतात.औषध ही जीवनावश्यक वस्तू आहे.यास रशिद मामू यांनी रु. १०/- किंमतीवर जकात घ्यावी व किंमत रु. १५ /- करावी.आज सभागृहात या प्रश्नावर विचार करतांना कोणत्याही पार्टीचा हा प्रश्न आहे.याचा विचार न करता या वस्तूंची विक्री करतांना रु. ८,१०,२५,३० या वेगवेगळया करांचा विचार नंतर करुन त्यावर जकात किती आकारावी या एकाच बाबींचा विचार करण्यात यावा.वेळ पडल्यास रशिद मामू यांनी दुकानदारांनी कोणत्या किंमतीत औषध विकावे यासाठी आंदोलन उभारावे आम्ही पाठीशी उभे राहू.

मा.महापौर : सर्व स.सभासदांना विनंती करण्यात येते की,ड्रग असोशिएशनचा मोर्चा बाहेर आला आहे.विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा करावी व सर्वांनी सहकार्य करावे.

श्री.जावेद रज्जाक : आज वैद्यकीय डॉक्टरांचा संप चालू आहे.त्यात औषधी दुकाने बंद.अशावेळी नागरिकांच्या आरोग्याचा विचार करता किंमती किती आहेत हा प्रश्न बाजूला ठेवून सर्व नगर सेवकांनी ड्रग असोशिएशनला दुकाने सुरु करण्याबाबत आवाहन करावे.

( यावेळी काही सभासद आपआपसात जोरजोरात बोलतात.काहीही ऐकू येत नाही.)

मा.महापौर : स.सभासदांना विनंती की सभागृहात विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा करत आहोत तो विषय नंतर घेता येईल.पुरवणी विषय पत्रिकेवरील विषय घेण्यात यावेत.

**विषय क्र.१२९ /१९ :**

औरंगाबाद शहरात प्लास्टीक सर्जरीचा मुक्त कॅम्प चालु आहे.या कॅम्प मध्ये अमेरिकेचे प्रसिध्द प्लास्टीक सर्जन डॉ.शरदकुमार दिक्षित हे गरीब रुग्णावर मोफत सर्जरी करीत आहे.हा कॅम्प १३ डिसेंबर ते २० डिसेंबर लायन्स क्लब सिडको येथे सुरु आहे.या कॅम्पमध्ये अंदाजे ३०० सर्जरी करण्याचे ठरविले आहे.एका सर्जरीसाठी अंदाजे १५०००/- रुपये खर्च येतो.एकूण खर्च ५,००,०००/- अपेक्षित आहे.तरी सर्व स.नगरसेवक निधीतून रु.१०००/-प्रमाणे मदत या कॅम्पसाठी देण्यात यावी.जेणेकरुन गरीब रुग्णांवरही शस्त्रक्रीया करण्यास मदत होईल.

सुचक : श्री.मनमोहनसिंग ओबेराय.
श्री.मोहसिन अहेमद.

अनुमोदक : डॉ.बी.के.कराड.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू).

**संवाद :**

मा.महापौर : ज्या स.सभासदांना या कॅम्पसाठी नगरसेवक निधीतून मदत करावयाची असेल अशा सभासदांनी त्यांच्या लेटरपॅडवर मदत देणेबाबत पत्र द्यावे.त्याप्रमाणे मदत देण्यात येईल.विषय क्र.१२९/१९ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात दि.१३ डिसेंबर ते २० डिसेंबर या काळात लायन्स क्लब सिडको येथे सुरु असलेल्या प्लास्टीक सर्जरीचे मुक्त कॅम्पमध्ये अमेरिकेचे प्रसिध्द प्लास्टीक सर्जन डॉ.शरदकुमार दिक्षित हे अंदाजे ३०० गरीब रुग्णांवर शस्त्रक्रीया करणार असुन एका सर्जरीसाठी १५०००/- रुपये खर्च अपेक्षित असून ज्या स.सभासदांना या कॅम्पसाठी नगरसेवक निधीतून मदत करावयाची असेल अशा स.सभासदांनी त्याचे लेटर पॅडवर मदत देणे बाबत पत्र द्यावे असे या दुरुस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३०/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर "नगरसचिव" हे पद वर्ग-२ संवर्गात निर्माण केलेले असून वर्ग-२ संवर्गातील अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. "नगरसचिव" हे पद लोकाभिमुख प्रशासनामध्ये लोकनियुक्त पदाधिकारी व प्रशासन यांच्यामध्ये दुवा म्हणून समन्वय साधण्याचे काम करीत असतो. "नगरसचिव" यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रस्तावित कर्तव्ये लक्षात घेता सर्व साधारण सभा,स्थायी समिती सभा,विषय समिती सभा इ.मध्ये जे धोरणात्मक व कार्यात्मक ठराव पारीत करण्यात आलेले आहे,त्यावर प्रशासनातर्फे कार्यवाही झाली किंवा नाही सदरील ठरावाची अंमलबजावणी केलेली आहे किंवा नाही या बाबत पाठपूरावा करावा लागतो सभेच्या अनुषंगाने स.सदस्यांनी विचारलेली माहिती संकलित करुन सभागृहात ठेवावी लागते या करीता वेळोवेळी महापालिकेच्या विविध विभाग प्रमुखांशी त्यांना पत्र व्यवहार व संवाद साधावा करावा लागतो.महानगरपालिकेतील विभाग प्रमुख हे वर्ग-१ संवर्गातील असल्यामूळे मिटींग विभाग प्रमुख "नगरसचिव" हे पदही वर्ग-१ संवर्गात वेतनश्रेणी रुपये २२०० ते ४००० यामध्ये रुपांतरीत करण्यात यावे करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक :श्री.प्रदीप जैस्वाल.
श्री.गिरजाराम हाळनोर.
श्री.महादेव सुर्यवंशी.
सौ.रजनी जोशी.

अनुमोदक : श्री.नरेंद्र पाटील.
श्री.मोहसिन अहेमद.
श्री.अब्दुल रशिदखान (मामू).
श्री.गौतम खरात.

**संवाद :**

श्री.अब्दुल रशिद खान (मामू) : प्रस्तुत प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.सध्या असलेले नगरसचिव यांचा सेवाकाळ लक्षात घेता व त्यांचा सेवाकाळ कमी अवधीचा राहीलेला आहे.यानंतर हे पद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (३) अनव्ये भरण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या वर्ग-२ चे नगर सचिवांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रस्तावित कर्तव्यानुसार सर्व कामे करावी लागत असल्यामूळे मिटींग विभाग प्रमुख हे पद वर्ग-२ संवर्गात वेतनश्रेणी रुपये २२००/- ते ४०००/- या वेतन श्रेणीत रुपांतरीत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३१/२१ :**

महीला विकास वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये महिला नगरसेवकांची संख्या २७ आहे.या महिला नगर सेविकांना महानगरपालिकेच्या कामकाजाची पध्दती जाणून घेणे या विषयी अन्य महानगरपालिकेतील कार्यपध्दतींची माहिती घेणे व त्यांचा अभ्यास करणे आवश्यक वाटते.

या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेतील महिला नगरसेविकांना वरील प्रकारची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी काही महानगरपालिकांना भेटी देण्याकरीता अभ्यास दौरा आयोजित करण्यात यावा व जेणेकरुन त्यांना बाहेरील कार्यपध्दती व येथील कार्यपध्दती समजू शकेल.

सुचक : सौ.ज्योस्ना हिवराळे.

अनुमोदक : सौ.लता दलाल,श्रीमती आबेदा बेगम,श्रीमती जाहेदा बेगम,सौ.अलका पाटील.

**संवाद :**

श्री.रशिदखान (मामू) : या अभ्यास दौऱ्यासाठी चांगली गाडी घेण्यात यावी.दोन चपराशाही बरोबर ठेवावेत.

मा.महापौर : सदरील विषय मंजूर करण्यात येतो.आणखी दोन तिन प्रश्न राहीले आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महिला विकास वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये असलेल्या २७ नगरसेविकांना महानगरपालिकेच्या कामकाजाची पध्दती जाणून घेण्यासाठी अन्य महापालिकेतील कार्य पध्दतीची माहिती घेणे व त्याचा अभ्यास करणे आवश्यक वाटत असल्यामूळे महानगरपालिकेतील महिला नगरसेविकांना वरील प्रकारची माहिती प्राप्त करुन घेणेसाठी काही महापालिकांना भेटी देण्यासाठी अभ्यास दौरा आयोजित करणेस सर्वानुमते मंजरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३२/२२ :**

औरंगाबाद शहराचा विस्तार पहाता शहरातील औरंगपूरा,चिकलठाणा,शहागंज मध्यवर्ती बसस्थानक व रेल्वेस्टेशन,क्रांतीचौक,ज्युबली पार्क व इतर ठिकाणी गर्दीच्या ठिकाणी महिलांसाठी सवतंत्र स्वच्छतागृह बांधणे.

सुचक : सौ.रजनी जोशी.

अनुमोदक : सौ.लता दलाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचा विस्तार पाहता शहरातील औरंगपूरा,चिकलठाणा,शहागंज,मध्यवर्ती बस स्थानक व रेल्वे स्टेशन,क्रांती चौक,ज्युबली पार्क व इतर गर्दीच्या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधणेसाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३३/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,नगरसेवक श्री.गंगाधर गाडे हे "बलिदान स्मरणिका" काढणार असल्याने सदर स्मरणिकेसाठी बराच खर्च लागणार आहे.बलिदान स्मरणिकेद्वारे सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक प्रबोधन करण्याचा त्यांचा मास आहे.सदर स्मरणिकेसाठी त्यांना आर्थिक मदतीची अत्यंत गरज आहे.आर्थिक मदत म्हणून नगरसेवकांच्या विकास फंडातून (स्वेच्छा निधी शिल्लक नसल्यास) विशेष बाब म्हणून नगर सेवकांच्या स्वेच्छेनुसार प्रत्येकी पाच हजार रुपये मंजूर करण्यात यावे.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक :१) श्री.प्रकाश निकाळजे.

२) श्री नरेंद्र पाटील.

३) श्री.गौतम खरात.

४) श्री.अभिमन्यु भालेराव.

५) श्री.विकास जैन.

अनुमोदक :१) श्री.मोहसिन अहेमद.

३) श्री.हमीद ताबा.

**संवाद :**

ज्या सभासदांची इच्छा असेल त्या नगरसेवकांनी लेटर पॅडवर पत्र द्यावे.त्याप्रमाणे मदत देता येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.सदस्य श्री.गंगाधर गाउे यांच्या तर्फे प्रसिध्द होणाऱ्या "बलिदान स्मरणिकेस" येणारा खर्च लक्षात घेता आर्थिक मदत म्हणून बलिदान स्मरणिकेस ज्या नगरसेवकांची इच्छा असेल अशा नगरसेवकांनी त्यांच्या स्वत:च्या लेटर पॅडवर संमती देवून विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर " जन गण मन " या राष्ट्र गीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मा.नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# ***औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद***

## दिनांक १८-१-१९९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दिनांक. १८ जानेवारी १९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता नगर भुवन (टाऊन हॉल) येथे मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षते खाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेस सुरुवात झाली.

या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | उप महापौर |
| २) | सौ. रुख्मणबाई खंडेराव लोखंडे | स.सदस्य |
| ३) | श्री. अफसर खॉ यासिन खॉ | --//- |
| ४) | श्री. प्रभाकर सिताराम विधाते | --//-- |
| ५) | सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ६) | श्री. स.सलिम हनिफ कुरैशी | --//-- |
| ७) | श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ८) | सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ९) | सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | --//-- |
| १०) | सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| ११) | सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १२) | श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १३) | श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | --//-- |
| १४) | श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १५) | श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १६) | श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १७) | श्री. सोनवणे सुदाम रामराव | --//-- |
| १८) | श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १९) | सौ. पद्मा बाबुराव शिंदे | --//-- |
| २०) | श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २१) | श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २२) | श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचळ | --//-- |
| २३) | सौ. फरहद बानो भ्र.मो.नवाब | --//-- |
| २४) | श्री. फजल उल्लाह खान अजमत उल्लाह खान | --//-- |
| २५) | श्री. अजिज खॉ. गणी खॉ | --//-- |
| २६) | श्री. श्रीमती आबेदा बेगम मो. मुजफा | --//-- |
| २७) | श्री. मो.मुश्ताक अहमद | --//-- |
| २८) | सौ. नुरजहा बेगम अ. रहेमान खॉ | --//-- |
| २९) | श्री. वंसत विनायक देशमुख | --//-- |
| ३०) | श्री. हाजी मोहसिंन अहेमद हाजी बशीर अ. | --//-- |
| ३१) | श्री. मुजीब आलमशाह मिर आलमशाह | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३२) | सौ. मोहसिना बिल्कीस विखरोद्दीन | --//-- |
| ३३) | श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३४) | सौ. जाहेदा बेगम मा. जमिर | --//-- |
| ३५) | श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ३६) | सौ. यशोधा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३७) | श्री. हमीदउद्दीन फसियोद्दीन ताबा | --//-- |
| ३८) | श्री. म. अ. रुउफ म.अ. माबुद | --//-- |
| ३९) | श्री. स.अ. एकबालोद्दीन स. अ. कुतुबोद्दीन | --//-- |
| ४०) | श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल | --//-- |
| ४१) | श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४२) | श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ४३) | श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ४४) | सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ४५) | सौ. लता श्रीनिवास दलाल | --//-- |
| ४६) | श्री. जयवंत (बंडु) ओक | --//-- |
| ४७) | सौ. अलका रमेश पाटील | --//-- |
| ४८) | सौ. शंकुतला रामदास धांडे | --//-- |
| ४९) | श्री. अब्दुल रशिद खान (मामु) | --//-- |
| ५०) | श्री. डॉ. भागवत कराड | --//-- |
| ५१) | सौ. सविता संजय अव्हाड | --//-- |
| ५२) | सौ. निर्मलाबाई विठ्ठल काबळे | --//-- |
| ५३) | श्री. धिल्लन तरवेंद्र महेंद्रसिंग | --//-- |
| ५४) | श्री. विखारोद्यीन पि. खुदबोद्यीन | --//-- |
| ५५) | श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ५६) | श्री. गंगाधर सुखदेव गाडे | --//-- |
| ५७) | श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ५८) | श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय | --//-- |
| ५९) | श्री. निकाळजे प्रकाश रामभाऊ | --//-- |
| ६०) | श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ६१) | श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत | --//-- |
| ६२) | श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --//-- |
| ६३) | सौ. राधाबाई सखाराम तळेकर | --//-- |
| ६४) | श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ६५) | श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ६६) | डॉ. विजयकुमार मेहेर | --//-- |
| ६७) | सौ. मंदा धनंजय काळुसे | --//-- |
| ६८) | श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६९) | श्री. भगवान देवीदास घडामोडे | --//-- |
| ७०) | श्री. कचरु चद्रभान नवपुते | --//-- |

सभेची सुरुवात "वदेमातरम्" या गीताने झाली.

संवाद

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : तेलगु देशमची माजी मुख्यमंत्री व प्रसिध्द अभिनेते एस.टी. रामराव यांचे दुःखद निधनानिमित्त दिवगंत नेत्यास सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी व आजची सभा एक दिवसाकरिता तहकुब करण्यात यावी.

श्री. जयंवत बंडु ओक : विरोधी पक्षनेता यांनी मांडलेल्या श्रध्दांजलीच्या प्रस्तावास आमची सहमती आहे.

तेलगु देशमध्ये माजी मुख्यमंत्री व प्रसिध्द अभिनेते श्री. एन.टी.रामाराव यांचे दुःखद निधनानिमित्त ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री. प्रदिप जैस्वाल : विरोधी पक्षनेता यांनी आजची सर्वसाधारण सभा एक दिवसासाठी तहकुब करण्याची सुचना केली असली तरी उद्या शुक्रवार आहे आणि त्यानंतर पुढे सभा घ्यावयाची ठरली तर सभेस वेळ होइल तेंव्हा ००.१५ मि. करिता सभा तहकुब करावी.

मा. महापौर : श्री. एन.टी.रामाराव यांचे दुःखद निधनानिमित्त सभागृहाने श्रध्दांजली अर्पण केली आहे. त्यांचे कुटुंबियाचे दुःखात हे सभागृह सहभागी आहे. आजची सभा ००.१५ मि. करिता तहकुब करण्यात येते.

तहकुब करण्यात आलेल्या सभेस पुन्हा ११.४५ वा. सुरुवात झाली.

श्री. नरेंद्र पाटील : लोकप्रतिनिधींच्या काळात मनपातर्फे कबड्डी व खो-खो अशा प्रकारच्या दोन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले त्याबद्दल आपले अभिनंदन करण्यात येते. परंतु या स्पर्धासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली होती का? जसे प्रशासकीय ठराव सभागृहापुढे येतात. तसा प्रस्ताव या बाबत सभागृहापुढे आलेला नाही, या स्पर्धावर प्रत्येकी दोन-तीन लाखाचा खर्च झाला अशी माहिती आहे. या शिवाय अनेक क्रिडा कार्यक्रमही झाले, यासाठीही १० लाखाच्या तरतुदीतुन खर्च करता आला असता या उलट साहित्य क्रिकेटसाठी नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन रक्कम देण्यात आली आहे. तेंव्हा नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन खेळासाठी देण्यात आलेला निधी खेळासाठी तरतुद करण्यात आलेल्या निधीतुन खर्च करावा व तसा ठराव पुढील सर्वसाधारण सभेत मांडावा. शिबिरासाठी जास्तीत जास्त खर्च झाला तरी चालेले. व तसा ठराव सभागृहापुढे ठेवावा अशी आपल्याला विनंती करतो.

श्री. प्रदिप जैस्वाल : महापौर चषकासाठी १० लाखाची तरतुद ठेवण्यात आली आहे ही तरतुद अन्य कामासाठी वर्ग करता येत नाही. ही तरतुद महापौर चषक म्हणुन ठेवण्यात आलेली आहे १० लाखाच्या आतले सर्व प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवले जातात व पास केले जातात. बजेटमध्ये तरतुद करण्यांची जी सुचना स.सभासदांनी केली आहे. त्यानुसार बजेटमध्ये महापौर चषकसाठी १० ऐवजी १५ लाखाची तरतुद करावी लागेल.

श्री. नरेंद्र पाटील : महापौर चषक स्पर्धापुर्वी शिबिर घेणे आवश्यक असते. नुसती महापौर चषक स्पर्धा घेवुन त्यावर ५-५ लाख खर्च झाले तर योग्य नाही. तर अशा चषक स्पर्धापुर्वी शिबिर घेवुन त्यातुन खेळाडु निर्माण करावयाचे आहेत आपण लक्षात घेतले पाहिजे यानंतर चषक स्पर्धा घेण्यात आल्या तर त्याचा उपयोग होतो.

श्री. अब्दुल रशिद खान (मामु) : खो-खो कबड्डी याच बरोबर हॉकी/फुटबॉल व इतर खेळाच्या स्पर्धाही घेणे आवश्यक आहे. .खो-खो कबड्डी हा परंपरागत खेळ आहेत. हॉकी/फुटबॉल या खेळाचे चांगले खेळाडु शहरात आहेत तेंव्हा खेळाच्या स्पर्धा ठेवण्यात याव्यात अशी विनंती आहे.

श्री. अफसरखान : मनपा फंडात नागरिकांकडुन पैसा जमा होतो, याची अधिकाऱ्यांना काही किंमत नाही, लोक प्रतिनिधींनी अधिकाऱ्यांकडे प्रभागातील काम करण्याची मागणी केली तर अधिकारी बजेट शिल्लक नाही असे सांगुन मोकळे होतात. या उलट मनपात जे विना परवाना पद आहे. त्याच्या गाडी, कॅबीन, व वाहन चालक फर्निचर व इतर कामासाठी ५-५ लाख रुपये खर्च होतात हा पैसा कोठुन आणला जातो. जनतेच्या कामासाठी जर महापालिकेकडे पैसा नाही तर अशा विनापरवाना पदासाठी खर्च कसा केला जातो. नगरसेवकांने स्वेच्छा निधीतुन काम करण्याची मागणी केली तर २-२,३-३ वेळा फाइल पाठवुनही मा. आयुक्त अशा संचिकेवर सही करत नाहीत. तर ३ लाखाच्या गाडीचे फाइलवर लगेच सही करुन देतात हे कसे.

श्री. प्रदिप जैस्वाल : सन १९८८ पासुन मनपामध्ये महापौर, उपमहापौर सभापती सभागृहनेता अशी पाच पदाधिकाऱ्यांची पदे आहेत. ही पदे सभागृहाने मान्यता दिलेली आहेत. या पदाधिकारी पैकी सभापती किंवा विरोधीपक्षनेता यांची गाडी खराब दिसली तर सभागृहाचे काम आहे की, अशा पदाकरिता गाडी देण्यात यावी विरोधी पक्षनेता यांची गाडी खराब झाली होती म्हणुन नविन गाडी घेण्यास स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. विरोधी पक्षनेता प्रकरण न्यायालयात असले तरी न्यायालय जो निर्णय देईल त्यावर नंतर विचार करता येईल.

श्री. अफसर खॉ : हा जो खर्च होत आहे तो बेकायदेशीर आहे. न्यायालय निर्णय देईल ही नंतरची बाब आहे. परंतु बेकायदेशीर पदावर आपण जो खर्च (वाहनचालक/चपराशी/कॅबीन ३) करत आहेत तो का खर्च करत आहे. जर महापालिकेकडे जनतेच्या कामासाठी निधी उपलब्ध नाही तर या बेकायदेशीर पदासाठी हा खर्च कसा केला जातो. या पदासाठी मान्यता नाही असे पद कोणेही नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : सभागृहनेता/विरोधीपक्ष नेतापद ही बाब धोरणात्मक निर्णयाची आहे. त्यानुसार ही पदे आहेत. महाराष्ट्राच्या प्रत्येक मनपामध्ये सभागृहनेता/ विरोधीपक्षनेता ही पदे आहेत आणि त्याच प्रमाणे मा. मनपातही या पदाकरिता सुविधा देण्यात आलेल्या आहेत.

श्री. अफसर खॉ : जर मनपाकडे निधीनाही तर बेकायदेशीर पदावर मनपा खर्च का करते.

मा. महापौर : सर्व स.स.जागेवर बसतील हा विषय विषयपत्रिकेवर नसल्याने त्यावर स.सदस्यांनी चर्चा करु नये. विषय पात्रिकेवरील विषयास सुरुवात करण्यात यावी. स.सभासद श्री. अकबर खॉ यांनी मुध्दा मांडला त्या बाबत मा. आयुक्त मा. सभापती यांचेशी चर्चा केल्यानंतर या बाबत विचार केला जाईल. विषय क्रमांक १.

श्री. हमीदउद्दीन ताबा : सचिव हे एक जबाबदार अधिकारी आहेत. तरी पण सर्व साधारण सभेत कॅडर चैंज करण्याच्या प्रस्तावावर विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेवुन नंतर कार्यवाही करावी. असा निर्णय झालेला असतांना स्वत:ची मताने

कॅडर चैंज करण्याचा प्रस्ताव विधी सल्लागाराचे मत न घेता शासनास पाठविला आहे हे कसे.

श्री. प्रदिप जैस्वाल : प्रथम विषय पात्रिकेवरील विषयावर चर्चा करण्यात यावी त्यानंतर स.स.श्री हमीदउद्दीन ताबा यांनी विचारलेल्या प्रश्नावर चर्चा करु विषय क्र. १.

मा. महापौर : सदर विषय नंतर घेता येइल. प्रथम विषय पत्रिकेवरील विषयावर चर्चा करण्यात यावी. विषय क्रमांक १ ला सुरुवात करण्यात येते.

**विषय क्र. १३४/१ :**

दिनांक २०-१२-९५ रोजी तहकुब झालेल्या व दि. २७-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : पान नं. ४१ ठराव क्र. १३० यास आपण मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५ या प्रमाणे सचिव पद राहील असे सुचविले होते. पण तशी नोंद आली नाही. कलमाची नोंद नसेल तर ठराव चुकीचा होइल. मुंबई व इतर मनपा प्रमाणे सचिव पदासाठी एल.एल.बी पदवीधारक व दहा वर्षाचा अनुभव असणे जरुरी आहे. सध्या सचिवांना हा चान्स देण्यात यावा. त्यानंतर जे सचिव येतील, त्यांचे साठी हया कलमाप्रमाणे भरती करण्यात यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : सभागृहाने मंजुर केलेला ठराव बरोबर आहे. स. सभासदाचे वैयक्तिक मत आहे. सचिव कोण असावा हा सभागृहाचा अधिकार आहे.

श्री. गौतम खरात : सचिव पदाचे प्रस्तावाबाबत कायदेशीर बाबींचा विचार करुन निर्णय घेण्यात यावा. आणि या प्रस्तावावर विचार करण्यासाठी सभासदांना वेळ देण्यात यावी. अशी सभागृहास विनंती आहे.

श्री. हमीदउद्दीन ताबा : या प्रस्तावावर जो पर्यंत निर्णय घेत नाही, तो पर्यंत शासनास प्रस्ताव पाठविण्यात येऊ नये.

मा. महापौर : स. सभासदांनी सचिवाचे प्रस्तावा बाबत जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यात कलमाच्या उल्लेख केला जाईल आणि नंतर शासनास पाठविला जाईल.

श्री. मोहसिन अहेमद : मनपातील विकास आराखडा जाहिर करण्यात आला आहे त्यानुसार बरेच ठराव प्लनिंग कमेटीकडे पाठवावेत असा निर्णय झाला आराखडा जाहिर करुन त्यावर नागरिकांचे आक्षेप घेतले जातात तर सभागृहात विकासाचे प्रस्ताव प्लॅर्निगकडे पाठवले जातात. आणि प्रशासन विकासा बाबतचे ठराव सभागृहाकडे ठेवले व ते मंजुर होतात हे कायदेशीर रित्या चुक आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम कलम १२७ प्रमाणे अशा प्रस्तावावर निर्णय घेण्याचा अधिकार सर्व साधारण सभेस आहे, त्यात काही कायदेशीर बंधन आहेत त्याप्रमाणे प्रस्ताव सभागृहापुढे ठेवावे लागतात. तेव्हा माझी अशी विनंती आहे की तो प्रस्ताव चर्चेला आल्यानंतर त्यावर विचार करावा.

मोहसिन अहमद : माझ्या वार्डातील चंपा मस्जिद ते जालना रोडचा ठराव प्लॅनिंग कमेटीकडे पाठवावा असा निर्णय झाला. या रस्त्यात माझे वार्डातील २०७

नागरिकांचे घरे जातात. त्यानंतरही आमच्या विषय पत्रिकेवर नवे प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवले आहेत. विकासाबाबतचे प्रस्ताव हे धोरणात्मक निर्णयाचे आहेत. त्यावर विचार व्हावा.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : स.सभासदांचे मानधनात वाढ करणे, पॉनिंग कमिटी व या कमिटीचे सभासद निश्चित करणे आणि शहरास B-२ चा दर्जा देणे या तिनही निर्णयाबाबत मी या शहराचे पालक मंत्री श्री. चन्द्रकांत खैरे यांनी जे प्रयत्न केले त्याबाबत पालकमंत्री यांचे अभिनंदन.

सौ. रजनी जोशी : पालकमंत्र्याप्रमाणे स. सभासदांचे मानधन वाढविणे, प्लॅनिंग कमेटीचे गठण आणि सदस्य मंजुरी या बाबत मा. महापौर यांनीही वेळोवेळी पाठपुरावा केला आहे करिता मा. महापौर यांचेही अभिनंदन करण्यात येते.

श्री. वसंत देशमुख : विषय क्र. ११२ च्या ठरावान्वये सदर विषय लॅनिंग कमेटीकडे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लॅर्निंग व सदर कमिटयाचे गठण झाले. तरी पण या कमिटया कार्यान्वित शाखा नाहीत. त्यामुळे शासकीय प्रस्ताव प्रलंबित राहतात जिन्सी शाळेचा रोड अशा प्रस्तवाबाबद निर्णय होणे आवश्यक आहे. अशी विनंती आहे.

श्री. नरेंद्र पाटील : विषय समित्याची स्थापना झाली परंतु या विषय समित्याचे सभापती अद्याप निवडण्यात आले नाहीत तेव्हा विषय समितीची स्थापना करुन त्याचे सभापतीची निवड न करणे म्हणजे स्थापना करुन त्यांचे सभापतीची निवड न करणे म्हणजे सभासदांची समजुत घालणे आहे काय?

श्री. हमीदउद्दीन ताबा : स. सभासदांनी सभागृहात केलेल्या सुचने बाबत मा. महापौर यांनी प्रथम खुलासा करावा.

मा. महापौर : सभागृहात विषय क्र. १ वर चर्चा चालु आहे. त्यानंतर सदर विषय चर्चेला आल्यानंतर त्यावर निर्णय घेता येईल.

सौ. अलका पाटील : उप समित्याबाबत स.स.श्री. देशमुख यांनी जो सुधा उपस्थित केला त्यानुसार उप समिती कायम करुन सभासदांची समजुत घातली जात आहे काय? उप समित्यांच्या सभासदांना काही तरी अधिकार द्या आणि सभासदांना समिती बाबत कामाला लवा.

श्री. गिरजाराम हाळनोर : स. सभासदांच्या भावना लक्षात घेता उप समित्यांचे सभापती पदाबाबतीत येता १५ दिवसात निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : सर्व सन्माननिय सभासदांच्या भावना लक्षात घेतलेल्या आहे. कारण या विषयावर चर्चा झाली विषय समित्यांचे सभापती उप सभापतींना बसण्यासाठी जागेची अडचण होती येत्या १०/१५ दिवसात ही अडचण दुर करणार आहोत.

श्री. वसंत देशमुख : मा. महापौरांची सुचना आम्हाला आहे. परंतु प्लॅनिंग कमिटी व इतर उप समितीचे गठण झाले आहे. आणि त्या कार्यान्वीत होत नसतील तर त्यांचा विचार पुर्वीच करावयास हवा होता तेंव्हा विकासाचे विकास अशा कमिटीत न ठेवता शासकीय अथवा सभासदांनी मांडलेल्या प्रस्तावर निर्णय घेण्यात यावेत हे विषय शहर विकासाचे आहेत.

मा. महापौर : येत्या १०-१२ दिवसात यावर निर्णय घेण्यात येइल.

श्रीमती नुरजहाँ बेगम : संजयनगर मध्ये जी नविन ड्रेनेज लाईन टाकण्यात आली त्यावर आजापर्यंत ड्रेनेज कनेक्शन करण्यात आले नाही कन्हर्वशन च्या कामासाठी ३० लाखाचे बजेट असतांना कन्हर्वशनचे काम की करु शकत नाही याचा

खुलासा व्हावा अनेक अर्ज केले आहेत वार्डात घाण होत आहे. हा भाग सल्मचा आहे.

मा. महापौर : सभागृहात मागील सभेच्या इतिवृत्तावर चर्चा होत आहे आपल्या सुचने बाबत संबंधीत अधिकाऱ्यांकडुन नंतर खुलासा घेतला जाईल.

श्री. नरेंद्र पाटिल : या सभागृहात अनेक वेळेत असे विषय येतात. त्यावर सदर विषय समितीकडे पाठवावा असा निर्णय घेतला जातो. आता पर्यंत अनेक समित्यांचे गठण झाले. पण अशा समित्यांच्या सभासदांच्या नावाची माहिती सभासदांना दिलेली नाही. आज कोण सभासद कोणत्या समितीमध्ये आहे याची माहिती सभासदांनाच नाही. तेव्हा समित्यांच्या सभासदांच्या नावाची माहिती सर्व सभासदांना देण्यात यावी त्यानंतर यावर विचार व्हावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : इतिवृत्त कायम करण्याबाबत चर्चा चालु आहे सभागृहाने तीन महिन्यापुर्वी आंबेडकर नगर भागात बाहेरगांवातुन येणाऱ्या देशी दारु दुकानास ना हरकत प्रमाणपत्र देतांना असा प्रस्तवा शासनाकडे पाठविला जाईल. असा निर्णय घेतला आहे. त्यास मनपा नाहरकत प्रमाणपत्र देणार नाही असाही निर्णय झाला होता परंतु एन-१ शिवनेरी भागात भरवस्तीत भर रस्त्यावर आणि शाळा जवळ असतांना देशी दारुचे दुकानाला नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांकडुन खुलासा मागविण्यात यावा. नाही तर सभागृहातील निर्णयाला काहीही किंमत राहणार नाही असे मला वाटते.

श्री. प्रदिप जैस्वाल : स. सभासद श्री. कोकाटे यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, दारुचे दुकान भरवस्तीत भर रस्त्यावर किंवा शाळेजवळ आहे, त्या मुद्दा बाबत दारुबंदी अधिकाऱ्यांचा जो अधिकार आहे शासनाचा असा नियम आहे की, देशी दारुचे दुकान शाळा/वसाहत/पुतळे इ. पासुन ३०० मिटर दुर असावीत याचा विचार दारुबंदी अधिकारी व पोलीस यांनी करावयाचा असतो.

श्री. काशीनाथ कोकाटे : मा. सभापतींनी सभागृहात रुलींग दिलेली आहे. रुलींग देण्याचा आधिकार मा. महापौरांचा आहे, आणि विषयाला वेगळे वळण दिले गेले. अधिकार कोणाला आहे याचा प्रश्न नाही. भरवस्तीत देशी दारु दुकानाला परवानगी देवु नये असा निर्णय सभागृहाने घेतला आहे. मग नाहरकत प्रमाणपत्र मनपाने दिले कसे?

श्री. प्रदिप जैस्वाल : मी रुलींग दिलेली नाही माझ्याकडे दारुची दुकाने होती म्हणुन नियम माहित आहे ती माहिती दिली.

श्री. काशीनाथ कोकाटे : देशी दारुचे दुकान कोठे असावे या नियमाची माहिती आम्हालाही आहे. परवानगी देतांना अधिकाऱ्यांनी त्या भागाची पाहाणी केली होती का? तेथील लोकांची माहिती घेण्यात आली का? मनपातर्फे जे ना हरकत प्रमाणपत्र देवुन त्यामुळे सभागृहाचा अपमान केला गेला आहे. मनमानी पणाने सभागृह चालवायचे असेल तर आम्हाला जन आंदोलन उभे करुन विरोध करावा लागेल.

श्री. गौतम खरात : बाहेरगांवी देशी दारुचे दुकाने या शहराच्या स्लम भागात येतात. स्लम भागात गरीब नागरिक राहतात. त्यांच्या उत्पन्नातुन घरखर्चही नीट चालत नाही. असे नागरिक दारुचे नादी लागुन त्यांचे संसार उध्दवस्त होतात मुलांचे शिक्षणाकडे लक्ष देत नाही म्हणुन स्लम भागात देशी दारुची दुकाने नसावीत या दृष्टीने सभागृहात विचार झाला होता. म्हणुन स.स श्री.

कोकाटे यांनी सुचविलेल्याप्रमाणे दारु दुकानासाठी नाहरकत प्रमाणपत्र दिले असेल तर ते प्रमाणपत्र परत घेण्यात यावे. तसे पत्र दारु बंदी विभागास द्यावे. ५०% महिलांनी मागणी केली तर देशी दारुचे दुकानास परवानगी देण्यात येवु नये असे शासनाची नियम आहेत त्याप्रमाणे त्वरीत कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : स.स.श्री. कोकाटे यांचे भागातील महिलांनी माझेकडे यासंबंधी भेट घेतलेली आहे. व या दुकानाचा परवाना रद्द करण्याची त्यांनी मागणी केली. सभागृहात चर्चा झाल्यानंतरही संबंधीत अधिकाऱ्यांनी नाहरकत प्रमाणपत्र कसे दिले या बाबत त्यांनी खुलासा करावा.

नगर रचनाकार : दारु दुकानाबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र सर्व साधारण असते शाळॄ वसाहत याचा अविहीत उल्लेख नाही. तरी पण ती रद्द होवु शकते.

श्री. गौतम लांडगे : नाहरकत प्रमाणपत्र देण्यापुर्वी शाळा/मंदिर ही ठिकाणे किती अंतरावर असावित याचा नियमात उल्लेख आहे. याची शहानिशा केल्या नंतरच नाहरकत प्रमाणपत्र दिले जाते. या बाबत असे रुलींग नसल्याचा खुलासा संबंधीत अधिकारी करतात पण तो नियम आहे.

श्री. काशीनाथ कोकाटे : ज्या जागेवर दारु दुकानास परवानगी दिलेली. जागा मनपा हद्दीत नाही तर सिडको भागात आहे. त्या जागेवर ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा अधिकार मनापाला नाही हे माहित असतांनाही अधिकाऱ्यांनी जाणुन बुजुन ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

श्री. गंगाधर गाडे : ज्या विषयावर चर्चा होणार आहे त्या विषयांचे अधिकारी सभागृहात हजर असणे जरुरी आहे. ही बाब यापुर्वी निदर्शनास आणुन दिलेली आहे. पण तसे होतांना दिसत नाही. नाहरकत प्रमाणपत्र बाबत ज्या अधिकाऱ्यांनी खुलासा केला त्यांचे ज्ञान कमी आहे असे दिसते ५०% महिलांनी मागणी केल्यास अशा ठिकाणी दारु दुकानास नाहरकत प्रमाणपत्र देऊ नये असा शासनाचा नियम आहे. तेव्हा शिवनेरी भागातील नागरिकांची मागणी लक्षात घेवुन दारु दुकानासाठी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करुन तसे पत्र शासनाकडे पाठवावे व हा विषय संपवावा.

श्री. सुदाम सोनवणे : शिवनेरी हा भाग माझ्या वार्डातील आहे. तो भाग सिडको भागात आहे. मनपाची हद्द नसतांना अधिकाऱ्यांनी नाहरकत प्रमाणपत्र कसे दिले या वर खुलासा व्हावा.

श्री. काशीनाथ कोकाटे : ना हरकत प्रमाणपत्राबाबत खुलासा करतांना अधिकाऱ्यांनी पाहाणी केली असा खुलासा केला तर या ठिकाणापासुन शाळा/मंदिर किती अंतरावर आहे याचा खुलासा त्यांनी करावा.

श्री. विजय कुमार मेहेर : शिवनेरी भागात दारु दुकानास विरोध करण्यासाठी त्या भागातील माहिलांनी महापौरांची भेट घेतली असा सभागृहात खुलासा केलेला आहे. त्यानंतरही पदाधिकाऱ्यांनी विचार विनिमय न करता नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. हा पदाधिकाऱ्यांचा उपमर्द आहे, अस मी मानतो. तेंव्हा या पुढे दारु दुकानास नाहरकत प्रमाणपत्र देतांना त्या भागाचे नगर सेवकांचे मत घेण्यात यावे असे रुलींग देवुन हा विषय संपवावा.

श्री. भगवान घडामोडे : एकाच विषयावर जास्त चर्चा न करता व सभागृहाचा जास्त वेळ न घालवता ज्या विषयाबाबत ज्या अधिकाऱ्यांवर सभागृहाची दिशाभुल केली

आहे. त्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी व पुढील कामकाज सुरु करावे.

मा. महापौर : सहाय्यक संचालक नगर रचना हे कार्यालयीन कामानिमित बाहेरगांवी गेले आहेत. स.स.श्री. कोकाटे यांनी दारु दुकानाबाबत जो प्रश्न मांडला त्याची येत्या १५ दिवसात चौकशी करुन दारु दुकानास दिलेले ना हरकत परवाना रद्द कसा करता येइल या बाबत विचार करुन तसा खुलासा स.स.ना करण्यात येइल.

श्री. वसंत देशमुख पान क्र. ३९ श्री. सदाशिव घडामोडे तर सदाशिव घडामोडे आपल्याकडे सदस्य आहेत काय?

मा. महापौर : ही चुक दुरुस्त करुन घेण्यात यावी.

मा. महापौर : स.स.श्री. महादेव सुर्यवंशी यांचे सुचनेप्रमाणे स्वच्छता कमेटीचे सदस्य जाहीर करण्यात येतात.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. महादेव सुर्यवंशी | |
| २) | श्री. गिरजाराम हाळनोर | सभापती |
| ३) | श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ४) | श्री. मोहसिन अहेमद | --//-- |
| ५) | श्री. व्ही.व्ही. देशमुख | --//-- |
| ६) | श्री. गौतम खरात | --//-- |
| ७) | श्री. डॉ. दिनकर देशपांडे | अधिकारी |
| ८) | श्री. पी.आर.बनसोडे | --//-- |
| ९) | श्री. जे.एम.भडके | सचिव |

या कमिटीने आपले काम सरु करावे.

श्री. महादेव सुर्यवंशी : कचरा कमिटी म्हटल्यानंतर थोड विसंगत वाटत. वास्तविक पाहाता शहरातील सर्व कचरा हटल्याशिवाय आपले आरोग्य आबादीत राहणार नाही. याशिवाय कचऱ्यापासुन विद्युत निर्मिती/गॅस निर्मिती लवकरात लवकर कशी करता येईल याचा माझ्या अभ्यास करण्यासाठी कमिटीची स्थापना केली आहे या बद्ल मा. महापौरांना धन्यवाद.

सौ. मोहसिना बिल्कीस : कचरा कमिटी ऐवजी स्वच्छता कमिटी असे संबोधावे व विषय क्र. ११५ वर निर्णय घेण्यात यावा. हा विषय १९७२ पासुन प्रलंबित आहे कमिटीत देण्यात येवु नये.

श्री. गौतम लांडगे : गरवारे कंपनीतील स्फोटात मृत्यु पावलेल्यांना श्रध्दांजली वाहन्याचा प्रस्ताव मी मांडलेला आहे श्री. पाटील यांचे नावास माझा विरोध नाही तरी श्रीमती नियास यानंतर स.स. श्री.--- करुन मोकळी जागा आहे. त्या ठिकाणी श्री. अभिमन्यु भालेराव यांचे नावाची नोंद घेण्यात यावी. अशी दुरुस्ती करावी.

**ठराव :**

दि. २७-१२-९५ च्या सभेतील ठराव क्र. १२३ अन्वये गठीत करण्यात आलेल्या कचरा कमिटी ऐवजी स्वच्छता कमिटी अशी दुरुस्ती करुन या कमिटीत खालील प्रमाणे स. सभासदांचा समावेश राहील अशी वाढ करण्यास सर्वानुमते मंजरी देण्यात येते.

१) श्री. महादेव सुर्यवंशी

२) श्री. गिरजाराम हाळनोर
३) श्री. भगवान घडामोडे
४) श्री. मोहसिन अहेमद
५) श्री. व्ही.व्ही. देशमुख
६) श्री. गौतम खरात
७) श्री. डॉ. दिनकर देशपांडे अधिकारी
८) श्री. पी.आर.बनसोडे उप अभियंता
९) श्री. जे.एम.भडके (सचिव) उद्यान अधिक्षक

वरील प्रमाणे दुरुस्ती व वाढ या सह दि. २७-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.१३५/२ :**

स्थायी समिती सभा दिनांक २१-१२-९५ मधिल प्रस्ताव क्र. २५२/२२ नुसार मो. रमानगर येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधणे व अस्तित्वात असलेली गटार दुरुस्ती करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ७,९५,१००/- चे अंदाज पत्रकास तसेच सदर खर्च झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षका अंतर्गत असलेल्या रुपये ५० लाखाचे तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्व साधारण सभेस शिफारस करण्यात येते.

सवाद :

श्री. प्रदिप जैस्वाल : या पुर्वीच्या सर्वसाधारण सभेत रु १० लाखाचे वरचे ठराव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी पाठवावेत असे ठरलेले असतांनाही हा विषय सर्वसाधारण सभेपुढे कसा ठेवला.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील सभेत स्थायी समितीस रु १० लाखाचे अधिकारी दिले आहेत.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी यापुढे लक्ष द्यावे व रु १० लाखाचे वरचेच प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठवावेत याची अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थायी समिती सभा दिनांक २१-१२-९५ मधिल प्रस्ताव क्र. २५२/२२ नुसार मो. रमानगर येथे ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बांधण्याच्या कामासाठी अंदाज पत्रकीय रक्कम रु ७,९५,१००/- रुपयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३६/३ :**

स्थायी समिती सभा दिनांक २१-१२-९५ मधिल प्रस्ताव क्र. ३६५/३६ नुसार वित्तीय वर्ष सन १९९६-९७ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रतील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ९ कलम ९९ अन्वये खालील प्रमाणे मालमत्ता कराचे दरात सर्वानुमते मंजुरी देण्यात आली असुन खालील कराचे दर हे करयोग्य मुल्यावर आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे.

## अ) महानगरपालिकेचे दर

| अ. क्र. | कराचे नांव | सन १९९५-९६ चे दर करयोग्य मुल्य दर | | सन ९६-९७ करिता प्रस्तावित दर करयोग्य मुल्य दर. | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | कोणत्याही करयोग्य मुल्य दर<br>१ ते १०००<br>१००० ते १०,०००<br>१०,००० ते २०,०००<br>२०,००० ते ५०,०००<br>५०,००० ते १,००,०००<br>१,००,००० ते पुढे | २३%<br>२४%<br>२५%<br>२६%<br>२७%<br>२८% | १ ते १०००<br>१००० ते १०,०००<br>१०,००० ते २०,०००<br>२०,००० ते ५०,०००<br>५०,००० ते १,००,०००<br>१,००,००० ते पुढे | २३%<br>२४%<br>२५%<br>२६%<br>२७%<br>२८% |
| २. | सर्व साधारण पाणी पट्टी | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ३. | साफ सफाईकर<br>अ) निवासी वापर<br>ब) निवासेत्तर वापर | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ४. | वृक्षकर | --//-- | ३% | --//-- | ३% |
| ५. | अग्निशमनकर | --//-- | ६% | --//-- | ६% |
| ६. | मनपा शिक्षणकर | --//-- | १% | --//-- | १% |
| ७. | पथकर | --//-- | १% | --//-- | १% |
| ८. | जलनिःसारण कर | --//-- | १% | --//-- | १% |
| ९. | जलभार कर | --//-- | १% | --//-- | १% |
| १०. | मोकळया व सहान जागेचा कर | करयोग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने. | | करयोग्य मुल्यावर सामान्य कराचे दाराने. | |

ब) शासनाचे कर

| अ. क्र. | करयोग्य मुल्य | राज्यशिक्षणकर निवासी | निवासेत्तर | रोजगार हमीकर निवासेत्तर |
|---|---|---|---|---|
| १. | १ ते ७४ | --//- | --//-- | --//-- |
| २. | ७५ ते १४९ | २% | ४% | १% |
| ३. | १५० ते २९९ | ३% | ६% | १.५% |
| ४. | ३०० ते २९९९ | ४% | ८% | २% |
| ५. | ३००० ते ५९९९ | ५% | १०% | २.५% |
| ६. | ६००० ते त्या पेक्षा जास्त | ६% | १२% | ३% |

वरील प्रमाणे अ) व ब) हे कर १९९५-९६ मध्ये अस्तित्वात होते तेच कर सन ९६-९७ साठी प्रस्तावित करण्यात आलेले असुन तसेच मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासनाने नियमाप्रमाणे करयोग्य मुल्यावर १०% दराने सन १९९६-९७ या वर्षासाठी आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येइल सर्व साधारण सभेस शीफारस करण्यात येते

संवाद

श्री. गिरजाराम हाळनोर : कोणत्याही प्रकारची करवाढ न करता स्थायी समितीने पूर्वीच्याच कराचे शिफारस केली आहे. त्या बद्दल मा. सभापती यांचे अभिनंदन करण्यात येते. हा ठराव सभागृहाने स्थायी समितीच्या शिफारसी प्रमाणे मंजुर करावा अशी विनंती आहे.

मा. महापौर : विषय क्र. ३ मंजुर करण्यात येतो.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : निवासी क्षेत्रावर १९९६-९७ साठी शासनाचे करात १०% वाढ करण्यात आलेली आहे असा कर वाढविण्याचा महानगरपालिका कायद्यात तरतुद नाही. तो कर वाढविण्यात येऊ नये. या सभागृहात मात्र स्थायी समितीने कोणताही कर न वाढवता शिफारस केल्याबद्दल अभिनंदन करण्यात आलेले आहे. मालमत्ता कर आकारतांना एन.आर. व्ही मध्ये वाढ करु नये अशी आमची विनंती आहे.

मा. महापौर : प्रस्तुत प्रस्तावा बाबत उप-आयुक्त खुलासा करीत आहेत.

उप आयुक्त : हा मोठया निवासी क्षेत्रावरील कर हा शासनाचा कर आहे महानगरपालिकेने तो वसुल करुन शासनाला पाठवावयाचा असतो. महानगरपालिकेने १-४-९४ ला जे कर लावलेले आहेत त्यात कुठल्याही प्रकारची वाढ केलेली नाही ते कर पुर्वीचेच आहेत.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे हा कर शासनाचा असला तरी आम्ही शहर वासियांवर कोणताही कर वाढवु इच्छित नाही मालमत्ता कर जी वसुली आहे तीच योग्य प्रमाणात होत नाही तेंव्हा या करास स्थागिती देण्यात यावी.

उप-आयुक्त २ : हा जो कर आहे तो मोठया निवासी क्षेत्रावरील कर आहे हा कर शासनाचे आदेशाप्रमाणे मागील वर्षापासुन वसुल करुन शासनास देत आहोत शहरात १५० ते २०० मालमत्ता या निवासी क्षेत्रात येतात.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील काळात महानगरपालिकेवर प्रशासक होते. प्रशासकांनी लावलेले कर लोकनियुक्त प्रतिनिधींवर बंधनकारक नाही सर्वांना समानकर असवा ही आमची मागणी आहे.

श्री. नरेंद्र पाटील : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे मोठे निवासी क्षेत्र म्हणजे काही ठरविक नंबर आहेत का? असे नंबर असलेल्या घरांची यादी गृहापुढे ठेवणे आवश्यक होते. करवाढ नसली तरी प्रत्यक्षात मालमत्ता धारकांस नोटीस गेल्यानंतर मागील वर्षाचा कर आणि चालु वर्षाचा कर यात तफावत आढळते. तशी तफावत कुठल्याही नोटीसीस मध्ये आढळुनये अशी माझी विनंती आहे.

उप आयुक्त २ : मोठे निवासी क्षेत्र म्हणजे क्षेत्राचा राहण्यासाठी उपयोग होतो व ज्याचे क्षेत्र १५० स्के. मी. पेक्षा जास्त आहे. अशा घरांना हा कर आकारणी करुन शासनाकडे पाठवला जातो.

श्री. काशीनाथ कोकाटे : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे १५० स्क्वे.मी.क्षेत्र हे सर्वाच्याच घराचे असते म्हणजे हा कर सर्वांना लागु होतो.

श्री. गंगाधर गाडे : या ठिकाणी पडदयामागुन नागरिकांवर १०% कर लावण्याचा अप्रत्यक्षपणे प्रयत्न होत आहे. व त्या करास हा शासनाचा कर आहे असे सांगीतले जाते आहे. हा शासनाचा असला तरी तो शहरातील नागरिकांवर लावण्याचा प्रयत्न होत आहे. आज आपल्या राज्यात युतीचे सरकार आहे. त्या ठिकाणी काम करणारे प्रतिनिधी ही युतीच्याच सरकारचे आहेत. म्हणजेच याच प्रतिनिधींना नागरिकांवर अप्रत्यक्षपणे हा कर लावत आहे. तो नागरिकांवर भुर्दंड आहे. तेंव्हा हा कर या शहरातील नागरिकांवर लावण्यात येवु नये. तो कर रद्द करावा आणि शासनाकडे परत करावा.

श्री. नरेंद्र पाटील : शहरातील मोठे निवास क्षेत्र धारक अधिक जास्त कर देत असतात आणि अशा नागरिकांवर पुन्हा १०% जादा कर लावणे म्हणजे अन्यायकारक ठरेल काही इमारती भाडयाने दिलेल्या आहेत. काही शासकीय इमारती आहेत त्यांना हा कर कसा लावणार तेव्हा पुर्वीचा जो कर आहे तोच कायम ठेवावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : युतीच्या सरकारने हा कर वाढवलेला नाही. युतीचे सरकार हे गोरगरीबाचे सरकार आहे. सभागृहाचे मागणीनुसार हा १०% कर कमी करु शकत असाल तर तो शासनाकडे पाठवावा.

श्री. गंगाधर गाडे : हाळनोर यांनी खुलासा केल्याप्रमाणे पुर्वीच्या सरकारणे जरी हा कर लावला असेल तरी युतीच्या सरकारचे काळात तो लावला जात आहे आणि जर हे सरकार गोरगरिबांचे असेल तर प्रशासकांना या शहरातील नागरिकांविषयी काही वाटत नसलं तरी युतीच्या सरकारला का वाटु नये? या वरुन स. सभासदाचा खुलासा फसवा आहे.

श्री. सैय्यद अली मिरा सलामी : स.स.श्री. गाडे यांचे मताशी मी सहमत आहे. १०% कर लावल्यामुळे जनतेवर गदा येणार आहे. तेव्हा लावण्यात आलेला १०% कर रद्द करावा. असा निर्णय घेण्यात यावा व तो शासनाकडे पाठवावा.

श्री. प्रकाश निकाळजे : स्लम भागात गोरगरिब नागरिक राहतात. त्यांची १०x१०ची घरे आहेत या गोरगरिब नागरिकांचा विचार करावा कर आकारणी करतांना अ,ब,क,ड, ही पध्दत अवलंबलेली आहे शहरात अंदाजे १०/१२ स्लम आहेत यात दारिद्रय रेषेचा खाली जीवन जगनारे नागरिक आहेत. हा प्रस्ताव दाखल करतांना फक्त क्षेत्रफळाचा विचार केलेला आहे. तेव्हा मागील कर कायम ठेवावा.

श्री. अब्दुल जावेद रज्जाक : मोठया निवासी क्षेत्रावर लावण्यात येणाऱ्या १०% जादा करा बाबतचे पत्र शासनाकडुन आल्याचा उल्लेख प्रस्तावात नाही तसेच लावण्यात येणाऱ्या १०% कर कोणावर लावणार याचाही उल्लेख नाही. यावरुन सभागृहाची दिशाभुल केली जात आहे, तेव्हा हा कर रद्द करावा. आणि त्यावर विचार करण्यात यावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : सभागृहातील सभासंदानी प्रस्ताव निट वाचलेला दिसत नाही. स्थायी समितीने कोणताही कर वाढवलेला नाही. प्रशासक काळात जे कर लावण्यात आले होते तेच कर कायम ठेवले आहेत. स्थायी समितीने करवाढ केलेली नाही.

श्री. काशीनाथ कोकाटे : स.स.श्री. जैस्वाल यांनी खुलासा केला की, प्रशासक काळात जे कर होते तोच आम्ही कायम ठेवले आहेत. जर शहराचे नांव बादलण्याचा ठराव येतो तर १०% कर रद्द करण्याचा प्रस्ताव का घेतला जात नाही?

श्री. नरेंद्र पाटील : १५० स्क्वे.मी. क्षेत्रावर लावण्यात येणारा १०% कराचा फटका चिखलठाणा औद्योगिक वसाहतीत मोठया प्रमाणावर बसणार आहे. येथील कंपन्याचे क्षेत्र मोठे आहे. तेव्हा मागच्या वर्षी जो कर होता तोच कायम ठेवण्यात यावा आणि हा १०% या कर शासनास परत करावा.

श्री. नरसिंग ढगे : सभागृहात १०% करा बाबत चर्चा चालु आहे १०% कर हा १५० स्क्वे. मी.च्या वर क्षेत्र असलेल्या घरांवर लावलेला आहे. कोणत्याही गोरगरिबांकडे १५० स्क्वे. मी. च्यावर जमीन नाही किंवा घर नाही. हा कर मोठया नागरिकांवर आहे आणि तो लागु करावा.

उप आयुक्त २ : १०% कर हा निवासी क्षेत्रांवर आहे कुठल्याही औद्यागिक क्षेत्रावर हा कर नाही निवासी क्षेत्र जर १५० स्क्वे.मी. पेक्षा जास्त वापरात असेल तर १०% कर आहे. औद्योगिक क्षेत्रावर हा कर नाही. हा मागील वर्षीच वाढलेला आहे. तो तसाच चालु ठेवलेला आहे. त्यात कुठल्याही प्रकारची वाढ केली नाही.

१०% वाढ होऊ देणार नाही. निषेध विरोधी पक्ष सदस्यांनी १०% कराबाबत सभासदाची दिशाभुल केली जात आहे अशी सुचना करुन विरोधी पक्षाच्या सर्व सभासदांनी १.१० वाजता घोषणा देत सभात्याग केला.

सभात्याग केलेल्या विरोधी पक्षाच्या सभासदांनी १.१५ वाजता पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

अति.शहर अभियंता : १०% कर हा सन १९९१ पासुन वसुल करण्यात येतो १५० स्क्वे.मी. निवासी क्षेत्र फुट. होतात. त्याचे कर लावण्यांत येतो.

करमुल्य निर्धारण अधि.(राजपुत) : १५० चौ.मी. किंवा १६०० स्क्वे. इतके निवासी क्षेत्र जर घरमालकाचे स्वत:चे वापरात असेल तर आशा घरांना हा १०% कर लावण्यात येतो. या शहरात अशा फक्त १२५ ते १५० मिळकती आहेत त्यांना हा कर लागु आहे.

श्री. गंगाधर गाडे : निवासी क्षेत्रावर १०% जादा कर हा प्रस्ताव पारित झाला नाही. तर वसुलीवर अडचणी येतील. तर अशी सुचना आहे की, महानगरपालिकेने जो कर लावला आहे तो कर मान्य करुन शासनाने जो १०% कर लावला आहे तो रद्द करण्याबाबत शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात यावा. अशी दुरुस्ती करुन ठराव ठेवावा.

श्री. डॉ. भागवत कराड : मालमत्ता करा बाबतच्या प्रस्तावावरुन असे निषपन्न झाले आहे की, १५०० स्क्वे. फुटापेक्षा जास्त बांधकाम असेल तर सर्व जनतेला हा कर लावणार आहे माझ्या माहितीनुसार १६०० स्क्वे फुटापेक्षा जास्त बाधकाम असलेली बरीच घरे असतील त्याचा फटका बऱ्याच नागरिकांना बसणार आहे या विषयी खुलासा करतांना हा कर १९९१ पासुन लागु असल्याचे सांगीतले आहे तर हा कर लागु करण्यास काय हरकत आहे.

मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो शासनाने जो १०% कर लावलेला आहे तो कर या महानगरपालिकेला मान्य नाही असे शिफारस पत्र शासनाकडे पाठविण्यात येइल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थायी समिती सभा दि. २१-१२-९५ मधिल प्रस्ताव क्र. ३६५/३६ नुसार वित्तिय वर्ष सन १९९६-९७ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका

क्षेत्रतील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ कलम ९९ अन्वये प्रस्तावात दर्शविलेल्या कराचे दर हे करयोग्य मुल्यांवर आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३७/४ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महापालिका गणवेश विनियम क्र. २५ दि. १८-६-९३ नुसार सर्व महानगरपालिका चतुर्थ श्रेणी स्त्री कामगारांना तीळ संक्रांती पुर्वी साडया, बलाऊजपिस, शर्ट सलावर व ओढणी कापडाचे वाटप करण्यात येते सदरील विनियम अनुसार दर्शविलेल्या साहित्याचा रंग "स्काय ब्ल्यु कलर" असा आहे. अनुसार सदरील रंगात बदल करण्यात यावा त्यासाठी प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेपुढे ठेवण्यास मान्यता दिलेली आहे. करिता साडया बलाऊज पिस, शर्ट सलवार व ओढणी इ. च्या रंगाबाबत गणवेश विनियमातील उल्लेख वगळण्यात येणेस्तव तथा स्तंभात कलर ठरविक न राखता वेळोवेळी आणि पसंतीनुसार साडयाची पोत प्रत आणि रंगाची निवड करुन खरेदी करण्यासाठी दुरुस्ती होवुन प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

श्री. डॉ. भागवत कराड : गणवेश बरोबर औरंगाबाद महानगरपालिका असा बिल्लाही असावा.

मा. महापौर : ठराव मंजुर करण्यात येतो. चालेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका चतुर्थ श्रेणी स्त्री कामगारांसाठी दरवर्षी संक्रांती सनाच्या दरम्यान साडया, ब्लाऊजपिसस, शर्ट सलावर व ओढणी या गणवेशाच्या रंग महानगरपालिका विनियमात "स्काय ब्ल्यु कलर" असा दर्शविलेला आहे. गणवेश विनियमातील उल्लेख केलेल्या रंगास वगळययात येवुन पसंती नुसार साडयांची पोत, प्रत व रंगाची निवड करुन खरेदी करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३८/५ :**

औरंगाबाद शहराचे मंजुर विकास योजना मधील हॉटेल अमरप्रित ते बीड बायपास रोड रस्ता विकासाचे काम सुरु करण्यात आलेले आहे. या रस्त्यावर शहानुरमिया दर्गा नजिक रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंग करणे आवश्यक आहे. त्यासाठी रेल्वे विभागाशी पत्र व्यवहार करुन विचारणा करता या रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंग करिता किमान खर्च ६.०० लाख येणार असुन तेव्हढी रक्कम रेल्वे विभागाकडे जमा करावयाची आहे सदर रेल्वे लेव्हल क्रॉसिंगचे काम रेल्वे विभागाकडुन त्यांनी कळविल्याप्रमाणे रु. ६.०० लाख एव्हढी रक्कम जमा केल्यानंतर करण्यात येइल हया सोबतच रेल्वे विभागाने कळविल्यानुसार महानगरपालिकेस आवश्यक ती करारनामा करुन घ्यावा लागेल. त्या बाबतची सविस्तर माहिती देण्याबाबत रेल्वे विभागास इकडील पत्र दि. ५-१२-९५ ने कळविलेले आहे. रेल्वे विभागाकडुन रेल्वे या बाबत खुलासा होताच आवश्यक करारनामा करुन देण्यासह लेव्हल कॉसिंग करिता येणारा खर्च रक्कम रुपये ६.०० लाख (सहा लाख) त्यांचे कडे करावे लागतील.

करिता रेल्वे लेव्हल क्रॉसिंग करिता च्या खर्चाची रक्कम रुपये सहा लाख रेल्वे विभागाकडे जमा करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. गजानन बारवाल : प्रस्तुत कामाची प्रगति सांगण्यात यावी.

अति.श.अ. : अमरप्रित रस्त्याचे काम संपत आलेले आहे हा प्रस्ताव पुढील रस्त्याचा आहे. रेल्वे क्रॉसिंगजवळ रस्त्याचे काम थांबलेले आहे. तशी परवानगी मिळाल्याबरोबर काम होइल. मध्यंतरी काम बंद होते. आता जोरात काम चालु आहे व ते लवकरात लवकर पुर्ण करु.

श्री. गौतम खरात : काम मंद गतीने चालु आहे यात शंका नाही त्यासाठी झालेला खर्च लक्षात घेता हे काम किती दिवसात पुर्ण होईल याचा खुलासा करावा.

अति.श.अ. : काम जोरात चालु आहे. व ते मार्च पर्यंत पुर्ण करु विषय क्र. ५ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंजुर विकास योजना मधील हॉटेल अमरप्रित ते बीड बायपास रोड रस्ता विकासाचे काम सुरु करण्यात आलेले आहे. या रस्त्यावर शहानुरमिया दर्गा नजिक रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंग काम करणे आवश्यक आहे. त्या करिता रेल्वे विभागाकडे ६.०० लाख रुपये प्रस्तुत कामासाठी जमा करण्याची मंजुरी देवुन सदरील विभागाकडुन आवश्यक करारनामा करुन घेण्याची मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३९/६ :**

औरंगाबाद शहराचे मंजुर विकास योजना १९७५ नुसार जिन्सी चौक ते इंदिरानगर १५.०० मीटर (५० फुट) रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे.

प्रकल्प शहर विकास योजने मध्ये रस्त्याचा प्रस्ताव कायम ठेवण्यात आलेला आहे.

चंपा मस्जिद ते जालना रोड हा ३०.०० मीटर रुंद रस्ता विकसित करण्या बाबतचा प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर मान्यतेस्तव पाठविण्यात आलेला आहे. हया रस्त्यावर जिन्सी चौक येथुन खास गेट मार्गे इंदिरानगर सेंट्रल नाका भागात जाणारा हा रस्ता असुन जालना रोडला समांतर असा याचा वापर होवु शकतो.

सध्या मोठा ते सेंट्रल नाका अशी वाहनाची वाहतुक जड वाहने हया सदस्याचा वापर करतात. तसेच सिडको, इंदिरानगर, बायजीपुरा संजयनगर हा भाग हया सदस्यांनेच शहराशी जोडला जातो. त्यामुळे सकाळी सायंकाळी रहदारीचे वेळी येथे वाहतुकीची कोंडी होते हया करिता सदर विकसित करणे आवश्यक आहे.

तरी सदरील रस्त्याने बाबतीत क्षेत्र संपन्न केल्यास वाहतुकीस अडथळा होणार नाही व वाहतुक सुरळीत होवुन जनतस सुविधा होइल करिता जिन्सी चौक ते इंदिरानगर हा १५.०० मिटर (५० फुट) रुंद विकास योजना रस्ता भुसंपादन करणेस्तव व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह हा भुसंपादन मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. मोहसिन अहेमद : प्रस्तावित जागा संपादन करण्यास हरकत नाही जागा बदली जागा संपादन करावी असा निर्णय घेण्यात यावा.

श्री. वसंत देशमुख : प्रस्तुत प्रस्ताव शासकीय पध्दतीनुसार ठेवला आहे. त्यास मंजुरी देण्यास हरकत नाही. येथे कोणतीही धार्मिक स्थळ नाही. जिन्सी चौक ते इंदिरानगर येथे आता जे कब्रस्थान देता आले तर नागरिक जागा देण्यास तयार आहे. तसे पत्र दाखल केले आहे. ठरावास मंजुरी देण्यास हरकत नाही. फक्त २४ घरे बाधीत आहेत नगरसेवक सहकार्य करण्यास तयार आहेत.

मा. महापौर : विषय क्र. ६ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर मंजुर विकास योजना अतंर्गत जिन्सी चौक ते इंदिरानगर (१५.०० मीटर रुंद) विकास योजना रस्त्यासाठी तसेच चंपा मस्जिद ते जालना रोड हा ३० मीटर रुंद विकसित करण्यासाठी व खाजगेट मार्गे इंदिरानगर सेंट्रल नाका भागात जाणारा हा रस्ता जालना रोडला समांतर करण्यासाठी वरील विविध रस्त्यात बाधीत क्षेत्र संपादन करण्यासाठी खर्चासह भुसंपादन करण्याची सर्वानुमते मंजुरी करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४०/७ :**

औरंगाबाद शहराचे मंजुर विकास योजना १९९५ नुसार आरंक्षण क्रमांक २५० "खुली जागा" इ.आरक्षण क्रमांक २५१ "प्राथमिक शाळा" व १५.०० मिटर रुंद रस्ता सर्व्हे क्रमांक ३२ मौजे भावसिंगपुरा येथे आहे.

तसेच प्रारुप शहर विकास योजने प्रमाणे सदर सर्व्हे क्र. ३२ भावसिंगपुरा हा आरक्षण १४६,१४७ व १४८ हे अनुक्रमे "गार्डन" "खेळाचे मैदान" व प्राथमिक शाळा १५.०० मिटर रुंद रस्त्याने भागशः बाधीत होत आहेत.

सदर मंजुर विकास योजनेस दहा वर्षे पुर्ण झाली असल्याने अर्जदार श्री. सदाशिव सखाराम लोखंडे त्यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये हया जागेची खरेदी सुचना दिलेली आहे.

या सुचनेप्रमाणे कायद्यानुसार सहा महिन्याचे आत जमीन संपादनाची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने भुसंपादन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

तसेच या आरक्षणासाठी मंजुर विकास योजनेनुसार १५.०० मिटर रुंद (५० फुट) रुंद रस्ता सर्व्हे क्रमांक २६,३२ व ३४ मधुन जात असल्याने वरील आरक्षणा बरोबर १५.०० मिटर रुंद रस्त्याने बाधीत होणारी जमीन सुध्दा भुसंपादन करणे आवश्यक आहे.

तरी या भुसंपादनाचे कार्यवाहीस्तव व त्यास येणाऱ्या भुसंपादन खर्चास मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंजुर विकास योजना अतंर्गत आरक्षण क्र. २५० खुली जागा व आरक्षण क्र. २५१ "प्राथमिक शाळा" व १५.०० मिटर रुंद रस्ता सर्व्हे क्रमांक ३२ मौजे भावसिंगपुरा येथील आरक्षण क्रमांक १४६,१४७ व १४८ अनुक्रमे गार्डन खेळाचे मैदान प्राथमिक शाळा १५ मिटर रस्ता भागशः संपादीत करण्यासाठी मंजुर विकास योजने नुसार अर्जदार श्री. सदाशिव सखाराम लोखंडे यांनी प्रस्तावात दर्शविलेल्या नियमानुसार संपादीत करण्याची संमती दर्शविलेली आहे. तसेच आरक्षणासाठी १५ मिटर रुंद रस्ता सर्व्हे क्र.

२६,३२ व ३४ मधुन जात असल्याने या आरक्षणा बरोबर १५ मिटर बाधीत होणारी जमीन संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *"पुरवणी विषय पत्रिका"*

**विषय क्र.१४१/८ :**

विविध उद्योगातील (कारखाने) तसेच सरकारी व निमसरकारी कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधुन त्यांचय अंगभुत कलागुणांना वाव देणे त्यांच्या अंगभुत कलागुणांना वाव देणे त्यांच्या निस्पृह कार्याचा आढावा घेणे हे उद्दीष्ट समोर ठेवुन शासनातर्फे गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येतो.

औरंगाबाद शहरातील विविध कारखाने शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा यशोचित सत्कार शासनातर्फे आला आहे अशा गुणवंत कामागारांचा यशोचित सत्कार संभाजी महानगरपालिकेतर्फे करण्यात यावा.

सुचक : सौ. लता श्रीनिवास दलाल
अनुमोदक : श्री. व्ही.व्ही. देशमुख
सौ. रजनी जोशी

संवाद

श्री. गिरजाराज हाळनोर : गुणवंत कामगारा बरोबरच १०-१२ गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : यासाठी एक कमिटी नेमण्यात यावी.

सौ. लता दलाल : दरवर्षी या कार्यक्रमासाठी ठराविक तरतुद करण्यात यावी तसा निर्णय या ठरावात होण्यात यावा.

मा. महापौर : विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध उद्योगातील (कारखाने) तसेच सरकारी व निमसरकारी कार्यालयातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधुन त्यांच्या अंगभुत कलागुणांना वाव देणे त्यांच्या निस्पृह कार्याचा आढावा घेणे हे उद्दीष्ट समोर ठेवुन जसे शासनामार्फत गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येतो.त्याच धर्तीवर आपल्या शहरातील विविध करखान्यातील तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयातील कामगार कर्मऱ्यांना मनपातर्फे यशोचित सत्कार करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२/९ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रारुप आराखडयात निर्देशित जिन्सी, संजयनगर इंदिरानगर -१ इंदिरानगर -२ सुरणानगर, कैलासनगर, भवानीनगर या सात वार्डातील नागरिकांना व्यायामाशाळेची इमारत उपलब्ध नाही व तशी खुली जागा सुध्दा या परिसरात उपलब्ध नाही. म्हणुन बसैय्येनगर मंजुर ले आऊट मधील अधिगृहीत केलेली महानगरपालिकेची व सर्व वार्डातील रहिवाशांना मध्यवर्ती अशा सहान जागेवर व्यायामशाळा बांधकाम महानगरपालिकेने करुन या भागातील आम जनतेला सोय उपलब्ध करुन द्यावी. अशी या प्रस्तावाव्दारे सभागृहाला विनंती आहे.

संवाद

वसंत देशमुख : संजयनगर इंदिरानगर हा गरीब वस्तीचा भाग आहे या भागातील तलाव विद्यार्थ्यांना फायदा व्हावा म्हणुन व्यायाम शाळेचा प्रस्ताव मांडला आहे. त्यास मंजुरी देण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : प्रत्येक वार्डात व्यायाम शाळा बांधणे मनपास शक्य होणार नाही. म्हणुन या व्यायाम शाळेसाठी आमदार फंडातुन निधी घेण्यात यावा तसा ठरावात उल्लेख करुन ठराव मंजुर करण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : स. सभासदांनी सुचना केली असली तरी जागेचा प्रश्न मोठा आहे. मनपाने व्यायाम शाळेसाठी जागा उपलब्ध करुन दिली तर द्यावी. अशा ठिकाणी नगर सेवकांच्या स्वेच्छा निधीतुन व्यायाम शाळा उभारण्यात येतील.

श्री. वसंत देशमुख : व्यायाम शाळेचा प्रस्ताव फक्त जिन्सी वार्डाशी संबंधीत नसुन सात वार्डातील नागरिकांशी संबंधीत आहे. त्यासाठी बसैय्येनगर येथील जागा देणे योग्य आहे किंवा नाही हा पहिला प्रश्न आहे. त्यानंतर निधीचा प्रश्न येइल सात वार्डाचे नगरसेवक स्वेच्छानिधीतुन योग्य करणार आहोत. रक्कम कमी पडल्यास लोकवर्गणीतुन जमा करण्यात येइल.

मा. महापौर : विषय क्र. १४२/९ मंजुर करण्यात येतो सभागृहातील चर्चेनुसार व्यायाम शाळा उभारण्यास आमदार निधितुन मदत मिळवुन घेण्याबाबत नगरसेवकांनी स.स.श्री.वसंत देशमुख यांना मदत करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा प्रारुप आराखडयात निर्देशित जिन्सी, संजयनगर इंदिरानगर -१ इंदिरानगर -२ सुरणानगर, कैलासनगर, भवानीनगर या सात वार्डातील नागरिकांसाठी मा. सभागृहात चर्चा झाल्यानुसार व्यायामाशाळेची इमारत साहित्य इत्यादी तयार करण्यासाठी बसैय्येनगर मंजुर ले आऊट मधील अधिकृत केलेली सहान जागेवर व्यायामशाळा बांधकाम करण्यास आमदार फंडातुन मदत घेऊन जनतेला वरील सोय उपलब्ध करुन देण्याची सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३/१० :**

जिन्सी वार्डात व पाच वार्डातील जवळच्या वस्त्यांतील विद्यार्थी संस्था मोठी असुन, या शाळेतील विद्यार्थी संस्था पहाता सध्याची इमारत खोल्यांची संख्या अपुरी पडते. तसेच या इमारती जवळुन भविष्यात डी.पी.रोड जात असल्याने शाळेच्या प्रांगणातील जागेवर बांधकाम न करता दुमजली इमारत करुन पाच खोल्यांचे बांधकाम करण्यात यावे. व या शाळेची अपुर्ण खोल्यांची अडचण सोडविण्यासाठी सदर प्रस्ताव मंजुर व्हावा, अशी

सभागृहाला विनंती आहे. या साठी गेले एप्रिल ९५ पासुन सतत पाठपुरावा करुन शहर अभियंता यांचेकडे या संबंधीतील कार्यवाही प्रलंबित आहे. वाढीव बजेट मधुन सदर काम करण्यात यावे. यासाठी सार्वजनिक हित विचारात घेऊन या प्रस्तावास मान्यता द्यावी अशी विनंती.

सुचक : श्री. देशमुख वसंत विनायकराव
अनुमोदक : श्री. कचरु चंद्रभान नवपुते

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिन्सी वार्डातील मनपाची शाळा जवळच्या पाच वार्डातील विद्यार्थ्यांना कमी पडत असल्यामुळे व भविष्यात विद्यार्थ्यांची संख्या अधिक वाढण्याची शक्यता असल्यामुळे प्रस्तुत शाळेच्या प्रांगणातील जागेवर बांधकाम न करता प्रस्तुत इमारतीवर दोन मजली काम करुन पांच खोल्या काढण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४४/११ :**

निजामगंज कॉलनी व दादाकॉलनी या भागातील सध्या सोयीच्या दृष्टीतुन टाकलेली ड्रेनेज लाइन ही गेले ७ वर्षापुर्वी ६" टाकण्यात आलेली आहे. काही ठिकाणी १०" लाइन टाकण्यात आलेली आहे.

सध्याची वाढती लोकसंख्या विचारात घेता सदर ड्रेनेज लाइन वारंवार चोकअप होतात. त्यामुळे नागरिकांची जी गैरसोय होते व चोकअप काढतांना बरेच ठिकाणी लाइनवर खड्डे मारल्यामुळे बरेच घरांमध्ये पाणी जाणे, दुर्गंधी पसरणे इ. तक्रारी आहेत.

वाढीव बजेट मधुन सदर विभागातील आवश्यक त्या ड्रेनेज लाइन बदलण्यात येऊन १०"आर सी सी पाईप टाकुन या भागातील लोकांची गैरसोय, अडचणी सोडविण्यासाठी मा.सभागृहाने मंजुरी द्यावी. अशी विनंती आहे.

सुचक : श्री. देशमुख व्ही.व्ही.
अनुमोदक : श्री. कचरु चन्द्रभान नवपुते
श्रीमती आबेदा बेगम

**ठराव :**

विषय क्रमांक १४४/११ सर्वानुमते स्थायी समितीकडे वर्ग करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५/१२ :**

महानगरपालिका प्राधिकरणातर्फे नव्याने बांधण्यात येत असलेल्या इमारती मधील सभागृहात "कै प्रबोधनकार केशव ठाकरे सभागृह" असे नांव देण्यात यावे.

कारण प्रबोधनकार करांनी समाजासाठी केलेले योगदान विचारात घेता त्यांनी सामजिक समता निर्माण करण्यासाठी चंदनासारख्या देह झिजवला, त्यांनी लेखनीव्दारे पत्रकारीतेच्या माध्यमातुन लोकशिक्षण, समाज प्रबोधन व परकीय शक्तीचे अन्यायाविरुध्द एकाकी लढा दिला, संपुर्ण देशातील जनतेत स्वदेशाभिमान व प्रखर राष्ट्रनिष्ठा जागृत केली.

त्यांच्या या महान कार्याची भावी पिढीला सतत आठवण राहावी व त्यापासुन प्रेरणा मिळावी, यासाठी वरील प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री. प्रदिपकुमार जैस्वाल, श्री. कचरु चद्रभान नवपुते,
श्री. धिरज शांतीलाल खखोरडीया,
सौ. लता दलाल.

अनुमोदक : श्री. महादेव सुर्यवंशी श्री. विकास जैन
सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह

संवाद

श्री. प्रदिप जैस्वाल : ठाणे/मुंबई/ चिंचवड येथील महानगरपालिकेतील सभागृहांना अशी नावे दिलेली आहेत त्याच प्रमाणे मनपाच्या नव्या इमारतीत तयार झालेल्या सभागृहास कै. प्रबोधनकार ठाकरे असे नांव देण्यास सभागृहाने मंजुरी द्यावी. अशी माझी विनंती आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : प्रबोधनकार ठाकरे उत्तम पत्रकार डॉ. होते तसेच प्रधोधिनकार ठाकरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बरोबर काम केले असुन कुशल समाज सुधारक होते. अशा या व्यक्तीची त्याकाळी जिवंतपणे प्रेत यात्राही काढण्यात आली होती. त्यांना ती डोळयांनी पहावी लागली होती असे थार व्यक्तीमत्व असलेल्या प्रबोधनकार ठाकरे यांचे नाव सभागृहाला देण्यास मंजुरी देण्यात यावी, अशी विनंती आहे.

श्री. नरेंद्र पाटील : आजही वादाचा विषय चर्चेला आहे. नामांतर करणे पुतळा बसविणे या विषयी गठण केलेल्या समितीकडे असे विषय पाठविण्याची प्रक्रिया सुरु करावयाची असा निर्णय झालेला असतांना हा ठराव सभागृहापुढे ठेवण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे हा ठराव त्या उप समितीकडे पाठवला पाहिजे. प्रबोधनकार ठाकरे यांचे विषयी कुठल्याही गोष्टीचा राग नाही किंवा काहीही घेणे नाही. येथील ज्यादा भागात प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाने मोठा उड्डान पुल बांधण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. यावरुन प्रबोधनकार ठाकरे ही फार मोठी व्यक्ती होती असे वाटते. तेव्हा अशा मोठया व्यक्तीचे नाव छोटया सभागृहाला देणे म्हणजे त्यांची अपमान करण्यासारखे आहे असे मला वाटते. प्रबोधनकार ठाकरे हे शिवसेनेची नव्हते हे सभागृहाच्या महितीसाठी सांगत आहे.

श्री. मिरा सलामी : मनपाच्या नव्या सभागृहास प्रबोधनकार यांचे नाव देण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे. प्रबोधनकार ठाकरे हे महान नेते होते. या बाबत कोणत्याही विरोध नसावा असे मला वाटते तरी पण या शहराचे पहिले नगराध्यक्ष श्री. व्दारकादास पटेल यांचे नांव या सभागृहास देण्यात यावे अशी माझी विनंती आहे. माझ्या मित्रांनी सभागृहास नाव देण्याबाबतचा प्रस्ताव ठेवतांना २३ नावांची प्रस्तावात नोंद करुन त्यातुन नाव निवडण्याचा प्रस्ताव ठेवायला हवा होता. व्दारकादास पटेल यांचे कार्य आणि शिवसेनेपुर्वीचे अस्तित्वात विचारात घेता त्यास कोणचाही विरोध राहाणार नाही असे मला वाटते.

सौ. रजनी जोशी : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे प्रबोधनकार ठाकरे मोठे सामाजिक कायकर्ते होते, या बद्दल त्या सभासदांना धन्यवाद त्याच बरोबर अशा मोठया

सामाजिक कार्यकर्त्यांचे नाव छोटया सभागृहास देण्यात येऊ नये सुचना करण्यात आली तर लोकप्रतिनिधी हे समाजकारणातूनच राजकारण केले जाते त्यामुळे प्रबोधनकार ठाकरे याचे नांव सभागृहास देणे वावगे ठरणार नाही ते नाव देणे योग्य होइल.

श्री. प्रदिप जैस्वाल : स.स.श्री. मिरा सलामी यांची सुचना योग्य आहे पण त्यांनी तसा प्रस्ताव प्रथम माडला असता तर त्याचा जरुर विचार करण्यात आला असता तरी पण स्थायी समिती सभागृहास प्रथम नगराध्यक्ष व्दारकादास पटेल यांचे नांव देण्यात यावे. अशी माझी सुचना आहे.

श्री. अब्दुल रशिद खान (मामु) : प्रबोधनकार ठाकरे यांचे नांव सभागृहास देण्यास आमच्या विरोध आहे. प्रबोधनकार ठाकरे हे मोठे व्यक्ती होते. त्याच्या विचाराचा आदर केला पाहिजे त्याप्रमाणे वागले पाहिजे आणि औरंगाबाद शहरात मलीकअंबर बादशाहाने पाण्याची नहर आणली आजही नहरी पाणी विनामुल्य घेत आहोत तेव्हा नव्या सभागृहास किंवा गेटला तरी मलीकअंबर यांचे नाव देण्यात यावे.

सौ. लता दलाल : प्रबोधनकार ठाकरे हे शिवसेनेचे नव्हते असे विचार प्रबोधनकार ठाकरे यांचे सभागृहास नांव देण्याबाबतचे प्रस्तावावर विचार करतांना मांडले आहेत या बद्दल सर्वांना धन्यवाद यावरुन हा ठराव पक्षीय दृष्टीकोन समोर ठेवुन मांडलेला नाही ही गोष्ट आपण लक्षात घेता प्रबोधनकार ठाकरे यांचे नाव या सभागृहाला देणे उचित ठरणार आहे हे यावरुन सिध्द होते. ज्या प्रबोधनकारांनी समाज सुधारणेच्या कार्यात हुंडा विरोधी लहान मुलींचे विवाह ब्राम्हणांच्या जुन्या रुढी या गोष्टींना त्यांनी विरोध केला आहे. या गोष्टी आजही आम्हाला मान्य आहेत आणि म्हणुन ज्या सभागृहात बसुन लोकप्रतिनिधींनी शहर/गाव/राज्ये/देश या पातळीवर काम करणार आहोत त्या सभागृहास प्रबोधनकार ठाकरे यांचे विचार समोर ठेवुन आम्ही कार्य करणार म्हणुन या सभागृहास त्यांचे नाव देणे उचित ठरणार आहे. ठराव एकमताने मंजुर करावा.

श्री. गौतम खरात : प्रबोधनकार ठाकरे हे महाराष्ट्रातच नाही तर संपुर्ण देशात प्रसिध्द होते यात शंका नाही. याची पावती समाजा समोर आहेत. परंतु ज्यांनी हा ठराव ठेवला आहे त्यांना ठराव ठेवण्याचा अधिकार नाही. प्रबोधनकार ठाकरे हे समाजवादी लोकशाही मार्गाने वागले. त्यांचे या देशावर प्रेम होते. अशा थोर व्यक्तींचे नाव सभागृहाला देण्याबाबत ठराव ठेवला त्या लोकशाहीवर विश्वास असलेल्या जे आजही ब्राम्हण वादाला मानतात अशा माझ्या या सभागृहातील माझ्या बांधवानी त्यांचे नाव देण्याचा ठराव ठेवावा हे मला तरी संयुक्तीक वाटत नाही प्रबोधनकार ठाकरे यांना आमचा विरोध नाही. पण त्यांचा अपमान होईल असे सभागृहात वर्तन होणार नाही याचे भान ठराव ठेवणाऱ्यांनी ठेवावे. असे मला वाटते.

डॉ. भागवत कराड : स.स.श्री. खरात यांनी जे विचार मांडले त्यांच्याशी मी सहमत आहे. पण स.स.श्री. नरेंद्र पाटील यांनी जे विचार मांडले त्यास माझ्या विरोध आहे या शहरातील हे अत्यंत महत्वाचे सभागृह आहे. यात मनपाचा कारभार चालतो तेव्हा सभागृहाला देण्यात येणारे नाव अत्यंत विचारपुर्वक देण्यात यावे अशी विनंती आहे. स.स.गौतम खरात यांनी जे विचार मांडले त्यातुन

प्रबोधनकार ठाकरे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बरोबरीचे होते असे मान्य केले याबाबत त्यांना धन्यवाद.

श्री. भगवान घडामोडे : सभागृहास नाव देण्याबाबतचा ठराव कोणी मांडला या बाबीला महत्व नसुन समाज बांधणीचे कार्य करणाऱ्या प्रबोधनकार ठाकरे यांचे आदर्श समोर ठेऊन खरोखरच शहराचा विकास करावयाचा असेल तर प्रबोधनकार ठाकरे आणि शिवसेना यांचा ३६ या आकडा आहे. बाबासाहेब आंबेडकरांचे विचाराचा वारसा घेऊन प्रबोधनकार ठाकरे यांनी समाज परिवर्तन कार्य केले पण ज्या बाबासाहेब आंबेडकराच्या विचाराचा वारसा घेवुन समाज कार्याचा आदर्श केला अशा महापुरुषांची (आंबेडकर/फुले/शाहु) जर नाव देण्यास काहीच हरकत नाही. प्रत्येक ठरावात राजकारण आणुन वेळ घालवु नये. प्रबोधनकार ठाकरे यांचे नाव देण्याचा ठराव एक मताने मंजुर करावा अशी विनंती करतो.

श्री. कुंवरसिंग बैनाडे : नविन सभागृहात ज्या काही क्रांतीकारी महिला होवुन गेल्यात (उदा. जिजामाता/झाशीची राणी/अहिल्याबाई/त्यांचे पुतळे अवश्य ठेवले पाहिजे अशी माझी नम्र विंनती आहे.

श्री. गंगाधर गाडे : सभागृहा समोरील प्रस्तावा बाबत काही सदस्यांनी आपले विचार मांडले. देश/राज्य हे महापुरुषांचे आदर्शावरुन घडवल जात औरंगाबाद हे या राज्यातले मोठे शहर आहे सभागृहाला नाव देण्याचा ठराव हा महत्वाचा आहे तेव्हा हा ठराव मांडणारा प्रश्न विचारावयाचा आहे की, सभागृहास नाव देण्याचा जो ठराव मांडला तो बाळासाहेब ठाकरे यांचे वडील म्हणुन किंवा प्रबोधनकार ठाकरे म्हणुन नाव देण्याचा ठराव मांडला याचा खुलासा त्यांनी करावा.

या व्दारे लोकसभा/महापौर/विधान सभा या सारख्या निवडणुका समोर ठेवुन तर हा ठराव मांडला नाही ना? अस मला वाटते या प्रस्तावा बरोबर स्थायी समिती सभागृहास प्रथम नगराध्यक्ष श्री. व्दारकादास पटेल आणि ऐतिहासिक शहरावर प्रेमकरणारे मलिक अंबर यांचे देण्याचा प्रस्ताव पुढे आला या तिघांची नावे सभागृहाने स्विकारावीत अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. सुदाम सोनवणे : प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाचा जो प्रस्ताव आला त्याच सर्व सदस्यांनी अभिनंदन केले ते वरवर केला व ज्या नावाचा विरोध दाखवायचा तो विरोध दाखवलाच आहे. जर सर्वांना हा ठराव आणि प्रबोधनकार यांचे विचार मान्य आहेत तर सर्वांनी सहमती दर्शविली आहे तर यावर चर्चा केली तेव्हा मनपा सभागृहास प्रबोधनकार ठाकरे यांचे नाव देण्यात यावे अशी विनंती आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : स.स.श्री. गाडे यांनी चांगले विचार मांडले आम्ही जातीयवाद मानत नाही. हा ठराव मांडतांना लोकसभा/महापौर निवडणुक याचाही उद्देश समोर ठेवलेला नाही तर नविन इमारतीत नविन सभागृह बांधण्यात आलेले आहे म्हणुन हा ठराव ठेवण्यात आला स.स.श्री. रशिद मामु यांनी मलिक अंबर यांच्या नावाचा उल्लेख केला. मलिक अंबर ही फार मोठी व्यक्ती होती आजही त्यांच्या नहर या शहरात आहेत. तेव्हा माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, तिनही नावांचे ठराव एकाचवेळी मंजुर करावेत.

श्री. विजयकुमार मेहेर : या विषयावर खुप उहापोह झालेला आहे. तेव्हा ठराव एकमताने मंजुर करावा.

मा. महापौर : विषय क्र. ५ सर्व सभासदांनी एकमताने मंजुर केला त्याबद्दल सर्व सभसदांचे कोतुक करण्यात येते. त्याच बरोबर जे दोन ठराव दिलेले आहेत व्दारकादास पटेल/मलिकअंबर हे ठरावही मंजुर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व मा. सभागृहातील संवाद नुसार सर्व साधारण सभेच्या मा. सभागृहास "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" तसेच मा. स्थायी समिती सभागृहास "कै. व्दारकादास पटेल सभागृह" तसेच मुख्य प्रवेश व्दारास "मलिक अंबर व्दार" नामकरण करण्यास चर्चा संपन्न झाली आहे.

**विषय क्र. १४६/१३ :**

वार्ड क्र. ३५ भागातील बहुतेक नागरिक सर्व जाती धर्माची असुन अत्यंत गोर गरिब आहेत जवळपास कोणताच शासकीय दवाखाना नाही. शासकीय दवाखान्याचा उपयोग घ्यावयाचा वाटल्यास रिक्शा भाडे मोठया प्रमाणवर खर्च होतात जे परवडणारे नसतात. त्यामुळे या भागात दवाखाना (ओ.पी.डी.) सुरु केल्यास या भागातील नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या सुटण्यास मोठया प्रमाणात मदत होइल. व निश्चितच या भागातील जनता आपणास दुआँ देतील.

सुचक : श्री. अब्दुल जावेद रज्जाक
अनुमोदक : श्री. नरेंद्र पाटील

संवाद

मा. महापौर : विषय स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

विषय क्र. १४६/१३ सर्वानुमते स्थगित ठेवण्यात येतो.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/१४ :**

मनपा उर्दु शाळा नं. २ किराडपुरा येथील गेल्या १६ वर्षापासुन भाडयाच्या इमारतीत सुरु आहे. सध्याची इमारत फार जुनी असुन विद्यार्थ्यांची संख्या हरवर्षी वाढत आहे. त्यांना बसण्यास जागा कमी पडते. करिता जवळ कटकटगेट (तलावाडी) मध्ये महानगरपालिकेची खुली जागा (सि.स.नं.११६०३/१) शिट.नं. ३३४३५ त्यावर नविन इमारत महानगरपालिकेकडुन बांधण्यात यावे करिता मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. फजलउल्लाखान
अनुमोदक : श्री. अब्दुल जावेद रज्जाक

संवाद

मा. महापौर : विषय १४७/१४ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा येथील उर्दु शाळा नं.२ गेल्या १६ वर्षापासुन भाडयाच्या इमारतीत असल्यामुळे व प्रस्तुत इमारत फारच जुनी झाल्यामुळे तसेच विद्यार्थ्यांची संख्या वर्षानुवर्षे वाढत असल्यामुळे कटकटगेट (तलावाडी) जवळील मनपाची खुली जागा जिचा सि.स.न. ११६०३/१ शिट.नं. ३३४३५ या खुला जागेवर मनपा मार्फत शाळा इमारत बांधकाम करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. १४८/१५ :**

मुंबई, पुणे व इतर महानगरपालिके प्रमाणे एक कोटी पर्यन्तचे रजिस्ट्रेशन औरंगाबाद महानगरपालिकेत करण्यात यावे.

सुचक : श्री. हमीदउद्दीन ताबा.

अनुमोदक : श्री. सय्यद अली मिरा सलामी, श्री. गौतम लांडगे

संवाद

श्री. गजानन बारवाल : योग्य सुचना आहे पुणे मुंबई प्रमाणे कत्राटदाराची वर्गवारी करण्यात यावी.

मा. महापौर : विषय क्र. ८ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई पुणे व इतर मनपा प्रमाणे मनपा कार्यालयात कार्यरत असलेल्या कंत्राटदारास रु. १ (एक कोटी) कोटी पर्यंन्तचे रजिस्ट्रेशन करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *"ऐनवेळचे विषय"*

**विषय क्र. १४९/१६ :**

सहाय्यक आयुक्त -१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग परिपत्रक क्र. एसईआर १२७६/६२/एम.यु.एन.१ सचिवालय मुंबई -३२ दिनांक २७-२-१९७६ तसेच सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एस व्ही आर/१०७२ डी दि. १५ जुलै १९७२ अन्वये पती पत्नी एकत्रीकरणाचे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने सह शिक्षकांची सेवा महानगरपालिकेमधे वर्ग करण्यास मान्यता देणेस्तव तसेच शासनाच्या या धोरणाचा लाभ महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पती अभवा पत्नी यांनाच देता येइल प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री. लेखाधिकारी : पती-पत्नी एकत्रीकरण या बाबत शासनाचे धोरण आहे जर एखादया कर्मचाऱ्याची पत्नी महानगरपालिकेमध्ये सेवा करीत असेल आणि पती इतर विभागात काम करीत असेल तर पती-पत्नी एकत्रीकरण कायद्याने त्यांची

सेवा महानगरपालिकेमध्ये वर्ग करुन घ्यावी या अनुषंगाने हा ठराव मांडलेला आहे.

श्री. हमीदउद्दीन ताबा : जालनानगर परिषदेची एक कर्मचाऱ्याचा पती बऱ्याच दिवसापासुन असा प्रयत्न करित आहे त्याच्यामुळे तर हा ठराव आलेला नाही ना?

लेखाधिकारी : महानगरपालिका कर्मचाऱ्याची पत्नी इतर जिल्हयात काम करीत असेल तर पती पत्नी रहावे या दृष्टीने हा ठराव मांडलेला आहे. महानगरपालिकेत जागा रिक्त असेल तरच अशा पध्दतीने विचार केला जातो. सर्वसाधारण जागेवरच अशा पध्दतीने सेवा वर्ग करुन घेण्याचा विचार केला जातो. जागा रिक्त असतील तरच हा विचार होतो.

श्री. डॉ. भागवत कराड : हा प्रस्ताव अयोग्य आहे. जर पती पत्नी पैकी एक महानगरपालिकेमध्ये व दुसरे दुसऱ्या खात्यात असतील तर त्याची सेवा महानगरपालिकेत घेण्याची गरज नाही. त्या पेक्षा नविन उमेदवाराला प्राधान्य दिल्यास ते कुटुंब सुखी होइल म्हणुन ठराव मंजुर करु नये.

श्री. हमीदउद्दीन ताबा : ठराव जो लिहिला आहे त्यात शिक्षक असे लिहिले आहे तो दुसऱ्यास लागु नाही का?

लेखाधिकारी : सर्व कर्मचाऱ्यांसाठी लागु आहे.

सौ. लता दलाल : या ठरावावर पुर्णतः अभ्यास करुन व्यवस्थितपणे पुढील सभेत मांडावा अशी विनंती आहे.

मा. महापौर : स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन सदर प्रस्ताव पुढच्या सभेत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सर्व सभासदांच्या भावना लक्षात घेऊन पुढच्या सभेत सुधारित प्रस्ताव ठेवावा.

**विषय क्र. १५०/१७ :**

औरंगपुरा नाथ सुपर मार्केट जवळील नाल्यावर दुकान केंद्र (मिनी मार्केट) बांधण्याच्या कामासाठी सौ. लता दलाल स.नगर सेविका यांच्या मागणी नुसार रक्कम रुपये. १,००,००,०००/- (रक्कम रु एक कोटी) चे अंदाज पत्रक तयार करण्यात आले असुन सदर दुकान बांधकामासाठी लागणारी रक्कम ही दुकानाच्या जाहिराती व्दारे भाडे पट्टयाच्या निविदा मागवुन अनामत रकमेच्या स्वरुपात जमा केलेल्या रक्कमेतुन करण्यात येइल व येणाऱ्या भाडयाच्या रक्कमेमधुन महानगरपालिकेच्या आर्थिक बाजुवर भर पडेल व नागरिकांनाही सोयी उपलब्ध होतील सबब सदर कामाचे रक्कम रुपये १.०० कोटीचे अंदाज पत्रक मंजुरीस्तव तसेच सदर इमारतीस लागणारे डीझाईन, नकाशे इत्यादी उपलब्ध वास्तु तज्ञ श्री. देव यांचेकडुन प्रचलित दरावर करुन घेण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सदरचा खर्च येणाऱ्या दुकानाच्या अनामत रकमेतुन करण्यात येइल (भाडे तत्वावर दुकाने देण्याचा व अनामत रक्कम जमा करणे बाबतच्या नियम व अटींचे मसुदा नियम क्र. १ ते २१ जोडला आहे. मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. गौतम खरात : ज्या कामाची किंमत २ लाखाचे वर असेल तर अशा कामासाठी निविदा न मागवता असे काम देता येते का याचा खुलासा व्हावा. वास्तुशास्त्रज्ञाच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या का?

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या ऐनवेळच्या प्रस्तावा बाबतचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यासाठी या ऐन वेळच्या प्रस्तावांना स्थगिती देण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : स.स.श्री. खरात यांनी सुचविल्या प्रमाणे या दोन्ही कामांच्या वास्तुशास्त्रज्ञाचे कामासाठी निविदा मागविण्यात याव्यात आणि मार्केट बांधण्याच्या मुळ अंदाजपत्रकास आजच्या सभेत मंजुरी देण्यात यावी. म्हणजे पुढील कामे करणे सोयीचे होइल.

मा. महापौर : सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आलेल्या ऐनवेळच्या दोन्ही प्रस्तावांना (अंदाजपत्रकांना) मंजुरी देण्यात येते या कामाच्या निविदा मागविण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा नाथ सुपर मार्केट जवळील नाल्यावर दुकान केंद्र (मिनी मार्केट) बांधण्याच्या कामासाठी अंदाज पत्रकीय रक्कम रुपये १.०० कोटी दुकान बांधकामासाठी लागणारी ही रक्कम जाहिराती व्दारे भाडे पट्टयाच्या निविदा मागविण्यासाठी व इमारतीस लागणारी डीझाइन नकाशे इत्यादी उपलब्ध वास्तुतज्ञ श्री. देव यांचे कडुन प्रचलित करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.रेल्वे स्टेशन येथील साधना लॉज जवळील मनपा जागेवर मनपा दुकान केंद्राची इमारत बांधण्यासाठी श्री. विकास जैन स.नगर सेवक यांचे मागणीनुसार रुक्कम रु. ३०.०० लाखाचे अंदाज पत्रक तयार करण्यात आले असुन सदर दुकाना बांधकामासाठी लागणारी रक्कम ही भाडे पट्टयावर देण्या करिता जाहिराती व्दारे निविदा मागवुन अनामत रक्कमेच्या स्वरुपात जमा केलेल्या रकमेतुन करण्यात येइल. व येणाऱ्या दुकानाच्या भाडेच्या रकमेतुन मनपाच्या आर्थिक बाजुवर भर पडेल व नागरिकांनाही सोयी उपलब्ध होतील. सबब सदर कामाचे रक्कम रु. ३०,००,०००/- (रुपये तीस लाखाचे) अंदाजपत्रक मंजुरीस्तव तसेच सदर दुकानाचे इमारतीस लागणारे डीझाइन नकाशे इ. वास्तुतज्ञ श्री. आय.क्यु.असो.यांचेकडुन प्रचलित दरात करुन घेण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सदरचा खर्च येणाऱ्या दुकानाच्या अनामत रकमेतुन करण्यात येइल (भाडेतत्वार दुकाने देण्याच्या व अनामत रक्कम जमा करणे या बाबतच्या नियम व अटींचा मसुदा नियम क्र. १ ते २१ जोडला आहे.)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.रेल्वे स्टेशन येथील साधना लॉज जवळील महानगरपालिकेच्या जागेवर महानगरपालिका दुकान केंद्राची इमारत बांधणेसाठी अंदाज पत्रकीय रक्कम रुपये ३०.०० लाख ही रक्कम उपलब्ध करुन देण्यासाठी जाहिराती व्दारे निविदा मागवुन अनामत रकमेच्या स्वरुपात जमा करणेसाठी तसेच दुकानाचे इमारतीत

लागणारे डीझाइन नकाशे इत्यादी वास्तुतज्ञ श्री. आय.क्यु.असो. यांचे कडुन प्रचलित दरावर करुन घेण्यासाठी सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२/१९ :**

औरंगाबाद महानगरपालिके मार्फत नव्यानेच बांधण्यात आलेल्या नविन प्रशासकीय इमारतीचे मुख्य प्रवेश व्दारालगत "छत्रपती शिवाजी महाराज" यांचे सुंदर व अकर्षक पुर्णाकृती तैलचित्र बसविण्यात यावे.

प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. जयवंत ओक, श्री. प्रदिप जैस्वाल

अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर, सौ. रजनी जोशी,
श्री. वसंत देशमुख

संवाद

डॉ. भागवत कराड : मागील सर्वसाधारण सभेत टपरी कमिटीच्या नियमाबाबत पुढील सभेत सर्व सभासदांना माहिती देण्यात येइल असे ठरविण्यात आले होते त्या बाबत चर्चा करण्यात यावी ही विनंती.

मा. महापौर : ऐनवेळेवरचे प्रश्नावर विचार करावा.

नगर सचिव : सर्व साधारण सभा दि. १८-११-९५ चे विषय क्र. ८५/६ ८७/८,२१/१२ आजच्या सभेत मंजुर करुन कायम करणे (स.स.श्री. होळनोर/जैस्वाल यांचा लेखी प्रस्ताव)

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : राजकीय भावना ठेवुन हा प्रस्ताव मांडलेला आहे. नियमाप्रमाणे असे विषय सभागृहापुढे चर्चेला घेता येत नाहीत.

श्री. गिरजाराम हाळनोर : मागील सभेत मा. आयुक्त यांनी टपरी कमिटीचे नियम तयार करुन देऊ असे सांगितले होते. सर्व टपरी कमिटी तयार झालेली आहे व तीचा अहवालही आलेला आहे. तेव्हा ठराव क्रमांक ८५/६ व इतर आजच्या सभेत मंजुर करण्यात यावेत.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : असा ऐनवेळचा कोणताही प्रस्ताव नियमाप्रमाणे घेता येत नाही तशा कायद्यात तरतुद नाही.

श्री. जयवंत ओक : महापौरांना ऐनवेळचे विषय घेण्याचा अधिकार आहे ऐनवेळचे विषय घेत नाही असे जे मत आपण दिले आहे ते कोणत्या नियमाप्रमाणे ते दाखवावे.

मा. महापौर : संबंधीत अधिकारी या बाबत खुलासा करतील.

विधी सल्लागार : नियमाप्रमाणे ऐनवेळचा प्रस्ताव सभागृहाच्या संमतीने घेता येतो ५०% पेक्षा जास्त सभासदांची मागणी असेल तर ठराव घेता येतो.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : एका सभासदांचा विरोध असला तरी असा ऐनवेळचा ठराव घेता येत नाही.

विधी सल्लागार : निवडणुक नियमावली नियम क्र. २ नुसार ऐनवेळचा विषय चर्चेला घेता येतो. (नियम क्र.२ वाचुन दाखविण्यात आला.)

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : नियम क्र. २ नुसार कोणताही परवानगी घेतलेली नाही हा विषय ऐनवेळी ठेवलेला आहे. ठरावाची प्रतही सभासदांना दिलेली नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : ऐनवेळचा ठराव सभागृहापुढे चर्चेला ठेवावयाचा किंवा नाही हा महापौरांचा अधिकार आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : आजच्या सभेत स्थायी समिती सभागृहात व्दारकादास पटेल यांचे नांव देण्याचा ऐनवेळचा विषय सभागृहाने मंजुर केला आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : या ठरावात जी काही दुरुस्ती करावयाची आहे ती पुढच्या सभेत करा आमचा त्याला विरोध नाही.

मा. महापौर : नविन इमारतीतील सभागृहाला नांव देण्याबाबत जो ठराव मंजुर झाला त्याच बरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांचे तैलचित्र नविन प्रशासकीय इमारतीत बसविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिके मार्फत नव्यानेच बांधण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीचे मुख्य प्रवेश व्दारालगत "छत्रपती शिवाजी महाराज" यांचे सुंदर व अकर्षक पुर्णाकृती तैलचित्र बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मा. नगर सचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी १९९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

मंगळवार दिनांक. २०फेब्रुवारी १९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता नगर भुवन (टाऊन हॉल) येथे मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षते खाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेस सुरुवात झाली.

या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे | उप महापौर |
| २) | सौ. रुख्मीणबाई खंडेराव लोखंडे | सभासद |
| ३) | श्री. प्रभाकर सिताराम विधाते | --//-- |
| ४) | सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ५) | श्री. महंमद सलीम म. हनिफ खान | --//-- |
| ६) | श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ७) | ॲण्ड. गणेश किसनराव वानखेडे | --//-- |
| ८) | सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | --//-- |
| ९) | सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १०) | सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| ११) | श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १२) | श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | --//-- |
| १३) | श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १४) | श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १५) | श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | --//-- |
| १६) | श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १७) | श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | --//-- |
| १८) | श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १९) | श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २०) | श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २१) | श्रीमती चंदाबाई पांचाळ | --//-- |
| २२) | श्री. फजलउल्ला अजमतउल्लाखॉं | --//-- |
| २३) | श्रीमती आबेदा बेगम मा. मुस्तफा | --//-- |
| २४) | सौ. नुरजहॉ बेगम अ. रहेमानखॉन | --//-- |
| २५) | श्री. वसंत विनायक देशमुख | --//-- |
| २६) | सौ. मोहसिमा बिल्कीस विखारोद्यीन | --//-- |
| २७) | श्री. अ.जावेद रज्जाक | --//-- |
| २८) | श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| २९) | श्री. किशोर बाबुराव तुळशीबागवाले | --//-- |
| ३०) | श्रीमती पुष्पाबाई गंगवाल | --//-- |
| ३१) | श्री. म.अ.रऊफ स.अ.माबुद | --//-- |

३२)	श्री. स.अ.एकबालोद्दीन स.अ.	--//--
३३)	श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल	--//--
३४)	श्री. रमेश लहोट	--//--
३५)	श्री. संजय किसनराव केणेकर	--//--
३६)	श्री. फैय्याज अहमद कुरैशी	--//--
३७)	सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम	--//--
३८)	सौ. लता श्रीनिवास दलाल	--//--
३९)	श्री. जयवंत (बंडु) ओक	--//--
४०)	सौ. अलका रमेश पाटील	--//--
४१)	सौ. शकुंतला धांडे	--//--
४२)	श्री. अब्दुल रशिद खॉन	--//--
४३)	श्री. सुभाष कच्छवाह	--//--
४४)	कु. माया ललवाणी	--//--
४५)	डॉ. भागवत कराड	--//--
४६)	सौ. निर्मला कांबळे	--//--
४७)	श्री. अ.रशिद अ. सत्तार	--//--
४८)	श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन	--//--
४९)	श्री. श्री. विखारोद्यीन पि.खुदबोद्यीन	--//--
५०)	श्री. जैन विकास रतनलाल	--//--
५१)	श्री. गजानन बारवाल	--//--
५२)	श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय	--//--
५३)	श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव	--//--
५४)	श्री. संजय रामदास जोशी	--//--
५५)	श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर	--//--
५६)	श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत	--//--
५७)	श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे	--//--
५८)	सौ. राधाबाई सखाराम तळेकर	--//--
५९)	डॉ. विजयकुमार मेहेर	--//--
६०)	श्री. नरसिंग मुरलीधर ढगे	--//--
६१)	श्री. भगवान देविदास घडामाडे	--//--
६२)	श्री. कचरु चंद्रभान नवपुते	--//--

सभेची सुरुवात "वंदेमारम्" या गिताने झाली.

संवाद

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मा. सभागृहात स.सदस्यांनी सुचित केलेल्या मृत व्यक्तींना सभागृहात ००.०२ मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पन करण्यात आली.

श्री. नरेंद्र पाटील : गेल्या १० महिन्यापासुन मनपात लोकनियुक्त शासन चालु आहे वार्ड कमिटीच्या निवडणुका घेऊन त्या स्थापन करने अत्यावश्यक होते. परंतु खेदाची बाब म्हणजे या बाबत काहीही कार्यवाही आलेली नाही. या बाबत खुलासा करण्यात यावा.

श्री. मोहसिन अहेमद : मनपात गेल्या १० महिन्यापासुन जो कारभार चालु आहे तो कुठल्या नियमाने पार पाडल्या जातो पंचायत राज पध्दतीने चालते की मुंबई प्रांतिक ॲक्ट प्रमाणे याचा खुलासा व्हावा.

डॉ. विजयकुमार मेहेर : मनपाच्या निवडणुका होवुन १० महिन्याचा कालावधी लोटुन गेला परंतु अद्याप पर्यंत आपण ज्या कमिटया झालेल्या आहेत त्याचे चेअरमन आपण निवडलेले नाहीत. या संदर्भाने ३-४ दिवसापुर्वी माझे आयुक्तांशी या विषयी बोलणे झालेले आहे. तसेच विभागीय कमिटया व्हावयास पाहिजे होत्या. त्याही आतापर्यंत झालेल्या नाही. या कमिटयांच्या सदस्यांना जे अधिकार असतात त्या अधिकारापासुन वंचित झालेले आहेत. ८२ नगरसेवकांच्या अधिकारावर आपण गदा आणलेली आहे, यास कोण जबाबदार आहे याचा खुलासा प्रशासनाने केलाच पाहिजे अन्यथा प्रशासनाला आम्ही निषेध करु.

श्री. नरेंद्र पाटील : हे काम स्थायी समितीच्या सभापतींनी होऊ दिले नाही.

श्री. कचरु नवपुते : सब कमिटीच्या स्थापन केलेल्या नाहीत. विभागीय कमिटया स्थापन केलेल्या नाहीत. मार्केट कमिटी व इतर कमिटीवर नेमणुका करणे आवश्यक होते. परंतु या सभागृहाने तशा प्रकारच्या कुठलाही निर्णय घेतलेला नाही. या बाबत संबंधीत अधिकारी व मा. महापौर यांनी खुलासा करावा.

श्री. वसंत देशमुख : या संबंधाने स्थानिक वर्तमानपत्रात बातम्या येतात तसेच या कमेटी स्थापने बाबत प्रशासन कुठलीच कार्यवाही करीत नाही. ही खेदाची बाब आहे.

मा. आयुक्त : विषय समित्यापैकी एका समितीची बैठक झालेली आहे. त्याचे अध्यक्ष सचिव निवडल्या गेलेत इतर समित्याच्या बैठकी तसेच वार्ड कमिटीच्याच्या बैठकासुध्दा नगर सचिवांनी बोलवावयास पाहिजे. या बैठका आयुक्त बोलवत नाहीत. को.ऑप मेंबर कमिटी शिवाय इतर कुठलीही बाब शासनाकडे प्रलंबित नाही. को.ऑप. मेंबर शिवाय वार्ड कमिटी गठीत होवु शकते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : महानगरपालिकची निवडणुक पंचायत राज प्रमाणे झालेली आहे. त्यामुळे या कमिटया तयार करायच्या नव्हत्या प्रशासनास एकतर वार्ड कमिटीप्रमाणे कारभार चालवावा लागेल किंवा को.ऑप.मेंबर प्रमाणे कार्यभार चालवावा लागेल आणि या दोन्ही बाबी एकदम कारभार पाहु शकत नाही.

मा. आयुक्त : वार्ड कमिटयांना आर्थिक बाबी विषयी अधिकार आहे विषय समित्यांना आर्थिक बाबी विषयी अधिकार नाही. विषय समिती ही प्रत्येक विषया करिता असुन स्वच्दतेची कमिटी ही पुर्ण शहरासाठी आहे व वार्ड समिती ही सर्व विषया करिता आहे. परंतु वार्डापुरती मर्यादित आहे. या दोन्ही कमिटयांचे कार्यक्षत्र वेगवेगळे आहे.

श्री. विजयकुमार मेहेर : विभागीय समित्या ज्या दहा महिन्यात व्हावयास पाहिजे होत्या त्या का झाल्या नाहीत याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : कमिटयांचे चेअरमन निवडीचे काम आयुक्तांचे नसुन ते नगरसचिवांचे आहे आणि नगरसचिव हे आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

डॉ. विजयकुमार मेहेर : हे अधिकार नगरसचिवांच्या अधिकार क्षेत्रात येत असेल तर नगर सचिव यांनी या बाबीचा खुलासा करावा.

नगर सचिव : या ठिकाणी असा खुलासा करतो की, सभागृहाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम या कार्यक्षेत्रात काय करायचे की, पंचायतराज पध्दतीने काम करायचे असा ठराव प्रथम घेणे आवश्यक होते.

श्री. नरेंद्र पाटील : मग गेल्या दहा महिन्यापासुन हा निर्णय का घेण्यात आला नाही.

डॉ. विजयकुमार मेहेर : या समित्या गठीत करण्याचे काम जर नगर सचिवाचे होते तर ते त्यांनी का केले नाही. तसेच सचिवांनी सभागृहात उत्तर देतांना त्याचा अगोदर अभ्यास करुनच उत्तर देणे आवश्यक आहे.

श्री. अब्दुल रशिद खॉन (मामु) : मनपाचे नियमावलीत पंचायत राजचे नियम समाविष्ट आहेत.

मा. महापौर : कृपया सभागृहात सर्व स.सदस्यांनी ठेवावी एका वेळी एकच सदस्य बोलेल.

सौ. लता दलाल : जशी पंचायतराज विधेयक लागु झाले असेल तर मनपाचा कारभार या व्दारे किंवा कसे आणि तसेच यामुळे बापीएमसी ॲक्ट मनपास लागु नाही काम याचा खुलासाही व्हावा.

श्री. नरेंद्र पाटील : मनपाचा कारभार कसा चालवावा या बाबतच्या तरतुदी पंचायत राजमध्ये दिलेल्या आहेत.

मा. महापौर : नगरसचिवांनी या बाबत खुलासा करावा.

नगरसचिव : मनपाचा कारभार हा बीपीएमसी ॲक्टनुसारच चालु आहे पंचायतराज विधेयकांच्या ज्या काही कलमाचा कायद्यात समावेश करण्यात आलेला आहे ते माझे पर्यंत आलेले नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : या ठिकाणी नगरसचिव यांनी केलेला खुलासा मुळीच योग्य नाही.

डॉ. विजयकुमार मेहेर : सचिवांनी या विधेयकाच्या प्रति त्यांच्या स्वाक्षरीने दिलेल्या आहेत. त्यामुळे नगर सचिवांनी केलेला खुलासा योग्य नाही.

श्री. नरेंद्र पाटील नगरसचिवांना नियमच माहित नसतील तर ही बाब खेदाची आहे. सचिवांनी अभ्यास करुनच कुठल्याही बाबींचा खुलासा करावा.

नगर सचिव : वार्ड कमिटयांचे गठण ८-१५ दिवसात करण्यात येइल.
(यावेळी सभागृहात एकदम अनेक स.सदस्य बोलत होते.)

मा. महापौर : सर्व स.सदस्य खाली बसल्याशिवाय व शांतता राखल्या शिवाय पुढील खुलासा होणार नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : वार्ड कमिटी गठीत करण्याचा अधिकार जरी सचिवांना असला तरी मा. महापौर यांच्या निर्देशानुसारच काम केले जाते त्यामुळे सचिवांना दोषी धरता येणार नाही.

श्री. हमिदउद्दीन ताबा : सचिवांनी केलेला खुलासा हा नोट केलेला नाही.

श्री. विजयकुमार मेहेर : या विषयीची माहिती प्रशासनाने मा. महापौर यांना द्यावयास पाहिजे होती.

नगर सचिव : समित्या गठीत करण्याबाबत मा. महापौर ज्या प्रमाणे आदेश देतील त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येइल.

डॉ. विजयकुमार (मेहेर) : काल स्थायी समितीची अर्थ संकल्पावर बैठक झाली. ही बैठक जवळ जवळ ३ तास चालत होती या अर्थ संकल्पाचे वाचन व भाषण मा. आयुक्तांनी केले आहे यावेळी पत्रकार हजर होते या सभेच्या वेळी जास्तीत जास्त प्रश्न मी विचारले व त्यात दुरुस्तीही सुचविल्या परंतु स्थानिक वर्तमानपत्र दै. अजिंठाणे ३ स.नगरसेवकांचे नावे टाकुन नगर सेवक

उलक्या घेत होते असे प्रसिध्द केले आहे त्याच्या निषेधार्थ मी येथे या वर्तमान पत्राची होळी करतो.

मा. महापौर : विषय क्र. १ चर्चेस सुरुवात होत आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : पान क्र. २० वर शहरातुन जे विद्यार्थी विशेष्ज्ञ गुण घेऊन १० वी व १२ वी परिक्षेत पास होतात त्यांचाही सत्कार करण्यात यावा असा उल्लेख पुरवणी विषय पत्रिकेतील विषय क्र. १४१/१ मध्ये आलेला नाही. तरी त्यात तशी दुरुस्ती करण्यात यावी. तसेच गेल्या ठराव घेण्यात आला आहे की, मनपा प्राधिकरणातर्फे नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमधील मुख्य सभागृहात "कै प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह असे नांव देण्यात यावे या मध्ये थोडी दुरुस्ती करण्याबाबत विनंती आहे. नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष श्री. व्दारकादास पटेल यांचे नांव मुख्य मुख्य प्रवेश व्दारास देण्यात यावे. तसेच या शहराचा आराखडा तयार करणारे व ज्यांनी औरंगाबाद शहरास पाणी पुरवठा करण्याबाबत आराखडा तयार केला असे श्री. मलीक अंबर नांव स्थायी समिती सभागृहास देण्यात यावे.

श्री. नरेंद्र पाटील : एकदा ठराव मंजुर झाला त्यात बदल करण्याचा अधिकार नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. अब्दुल रशिद खॉ (मामु) : यात दुरुस्ती करता येऊ शकते पण ठराव बदलता येणार नाही. श्री. हाळनोर यांनी दिलेल्या प्रस्तावास आम्ही सहमत नाही. असा बदल का करावयाचा याचा खुलासा व्हावा, तसेच श्री. मलीक अंबर हे इंजिनियर होते त्यांनी औरंगाबाद शहरासाठी बरेच काही चांगले कार्य केलेले आहे. आजही त्यांनी तयार केलेल्या प्लॅनिंगनुसार औ'बाद शहरासाठी पाणी पुरविले जाते. श्री. व्दारकादास पटेल हे शहराचे पहिले नगराध्यक्ष होते त्यांचेही नाव स्थायी समिती सभागृहास दिलेले आहे. येणे प्रमाणे नांवे दिल्यानंतर यात आता बदल करण्याची गरज का भासावी हे कळत नाही.

श्री. नरेंद्र पाटील : ठराव मंजुर झालेला आहे परत त्यात बदल करता येणार नाही.

श्री. बंडु ओक : मागील बैठकीत एकच प्रस्ताव प्रबोधनकार ठाकरे या नावाचा होता परंतु विरोधी पक्षाच्या विनंतीने त्यांचाही प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला आहे. परंतु इतिवृत्तात दुरुस्ती कल्याचा अधिकार मा. महापौर यांना आहे व ते तशी दुरुस्ती करु शकतात.

श्री. गजानन बारवाल : सभागृह नेता यांनी दिलेल्या सुचनेस मी सहमत आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : नामांतराच्या बाबतीत मलिक अंबर नावाचा प्रस्ताव सत्ताधारी पार्टीकडुन आलेला होता आता यात बदल करणे योग्य होणार नाही. या सभागृहात नामांतरसंदर्भाने बऱ्याच वेळा गोंधळ झालेला आहे. यामुळे सभागृहात जनतेची कामे व शहराचा विकास या विषयाकडे दुर्लक्ष होत चालले आहे. यामुळे सभागृहाचा खुप वेळही वाया जातो तेव्हा मागील बैठकीत जो ठराव प्रारित झालेला आहे त्या प्रमाणेच कार्यवाही व्हावी. त्यात कुठलाही बदल करुनये अशी विनंती आहे.

श्री. भगवान घडामोडे : श्री. कोकाटे हे सभागृहाची दिशा भुल करीत आहत ते राजकीय हेतु ठेवुन भाषण करित आहेत. जातीयवादाचा येथे प्रश्नच उद्‌भवत नाही. मागील वेळेस फक्त प्रबोधनकारक ठाकरे यांच्याच नावाचा प्रस्ताव होता. विरोधी पक्षाकडुन ऐनवेळी आलेला ठराव मंजुर करुन त्यास मान्यता दिली. श्री. मलीक अंबर यांचे नावास कुणाचाही विरोध नाही. ठरावात दुरुस्ती

करण्याचा अधिकार मा. महापौर यांना आहे व त्यांनी ती दुरुस्ती करावी अशी विनंती आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : स.स.श्री. घडामोडे यांनी केलेला खुलासा हा चुकीचा आहे. ठरावास दुरुस्ती करुन त्यास जातीय स्वरुप देत आहे हे सिध्द होते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स.स. सभागृहाची दिशाभुल करित आहेत. मा. महापौर यांनी एकदा रुलिंग दिलेली आहे. त्यात दुरुस्ती आता करता येणार नाही. तिनही नावाचा ठराव पारित करण्यात आलेला आहे. ठरावात बदल करणे असेल तर ३ महिन्यानंतर ठरावात बदल करण्याचा प्रस्ताव ठेवावयाचा होता. या मागे राजकीय हेतु आहे. व त्यामुळेच हा प्रस्ताव पुढे आलेला आहे. (यावेळी नामांतराच्या प्रश्नावरुन व पालकमंत्री श्री. चंद्रकांत खैरे यांच्या नावाचा आदराने उल्लेख न केल्यामुळे सभागृहात सर्व स.स. एकमेकात बोलत होते व बराच गोंधळ निर्माण झाला.)

श्री. नरेंद्र पाटील : सभागृहात सत्ताधारी पक्षाच्या स.स.जी व्यक्तीकडे केली आहे ते चुकीचे आहे. मागील बैठकीत अगदी खेळीमेळीच्या वातावरणात तिन्ही प्रस्ताव मंजुर झालेले होते. पालकमंत्री यांच्या सुचनेवरुन आता या ठरावात बदल करण्याचा जो विचार आहे त्याच्या मी निषेध करतो. (यावेळी त्यांनी या बाबत मागील बैठकीत झालेल्या ठरावाचे वाचन केले.) या ठरावात "चर्चा संपन्न झालेली आहे" असा उल्लेख आहे "ठराव मंजुर झालेला आहे" असा कुठेही उल्लेख नाही.

श्री. हमीदउद्दीन ताबा : सभागृहात नामांतराच्या संदर्भाने चुकीचे काम चालु आहे. खरे पाहता इतिवृत्तात "चर्चा संपन्न झाली" असा उल्लेख असतांना तो मंजुर झाल्याचे सांगतात ते सर्वस्वी चुकीचे आहे.

श्री. गजानन बारवाल : मा. महापौर यांना ठराव दुरुस्तीचा अधिकार आहे व ते करुन चर्चा येथेच संपवावी.

श्री. अभिमन्यु भालेराव : सर्व सदस्य हे येथे गोंधळ घालण्यासाठी आलेले नाही तर जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आलेली आहेत. मागील वेळी सभागृहाने ठराव मंजुर केलेला आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, हा ठराव रद्द वा त्यास बदल करण्यात येवु नये.

(यावेळी मा. महापौर यांच्या आसना शेजारी येवुन बरेच स.सदस्य घोषणा देतात यावेळी मा. महापौर यांना सभागृहात शांतता ठेवुन सहकार्य करण्योच आवाहन केले.)

श्री. गिरजाराम हाळनोर : ठरावात दुरुस्ती करण्याचा मा. महापौर यांना अधिकार आहे व त्यांनी त्यात बदल करुन ठराव मंजुर करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील सभेचे इतिवृत्त पाहिल्यास त्यात मा. महापौर यांनी व्दारकादास पटेल/मलिक अंबर हे ठरावही मंजुर करण्यात येतात असा स्पष्ट उल्लेख आहे.

मा. महापौर : सभागृहात स. सदस्यांनी शांतता राखावी. एकावेळी फक्त एकच सदस्य बोलतील.

श्री. महादेव सुर्यवंशी : विषय क्रमांक १४५/५ हा प्रस्ताव फक्त प्रबोधनकारक ठाकरे यांच्याच नावाचा होता. या प्रस्तावावर चर्चा सुरु असतांना स.सदस्य श्री. रशिद मामु आणि अन्य स.सदस्यांनी इतर नावाचा उल्लेख करुन प्रस्ताव मंजुरीसाठी मांडला त्यावेळी मा. महापौर यांनी सभागृहाच्या भावना लक्षात घेवुन मंजुर

केला परंतु या ठरावात दुरुस्ती करण्याचा अधिकार मा. महापौर यांना आहे तसेच प्रबोधनकारक ठाकरे यांच्या नावाशिवाय इतर जी २ नांवे पुढे आलेली आहेत त्या प्रस्तावास सुचक व अनुमोदक लागतात व ते येथे दिलेले नाहीत. त्यामुळे हा ऐनवेळी उपस्थित केलेला प्रस्ताव आहे. मा. महापौर यांना विषय क्र. १४५/५ एकमताने मंजुर केला याचा अर्थ असा आहे ज्या ठिकाणी मुळ प्रबोधनकार ठाकरे या नावाचा होता तो एकमताने मंजुर करण्यात आलेला असा त्याचा अर्थ होतो. ऐनवेळी आलेल्या प्रस्तावाचा मा. महापौर यांनी विचार केलेला आहे.

श्री. हमीदउद्दीन ताबा : या चर्चेमुळे सभागृहाचा वेळ वाया जात आहे व ठराव मंजुर झालेला आहे. परत त्यात बदल करण्यात येऊ नये.

श्री. अब्दुल रशिद खान (मामु) : प्रबोधनकार ठाकरे यांच्या नांवास आम्ही मंजुरी दिली. कारण ते एक अभ्यासक वृत्ताचे होते. त्यांच्या नावाशी आम्ही सुध्दा सहमत होती. त्यानंतर ऐनवेळच्या प्रस्तावात औरंगाबाद शहराचे पहिले नगराध्यक्ष श्री. व्दारकादास पटेल आणि श्री. मलिक अंबर यांच्या नावाचे प्रस्ताव समोर आले त्यावेळी सर्व स.सदस्यांनी यास मंजुरी दिली आता यात आपणास जर बदल करावयाचा असेल तर तो प्रस्ताव समोर ३ महिन्यानंतर ठेवावा. कारण नियमात तशी तरतुद आहे. आणि श्री. मलीक अंबर यांचे नांव मुख्य प्रवेशव्दाराला दिलेले आहे. यात काय बिघडले?

(श्री. रशिद मामु यांनी यावेळी पालकमंत्री श्री. चंद्रकांत खैरे यांच्या नावाचा ऐकेरी उल्लेख केल्याने सभागृहात गोंधळ निर्माण झाला)

मा. महापौर : या विषयावर चर्चा झालेली आहे. सर्व स. सदस्य खाली बसतील या विषयावर रुलिंग देण्यात येत आहे. विषय क्रमांक १ इतिवृत्त कायम करणे बाबत गोंधळ निर्माण झालेला आहे मागील बैठकीत प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाचा प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला आहे. श्री. मलिक अंबर व श्री. व्दारकादास पटेल याच्या नावाचे २ विषय ऐनवेळी ठेवण्यात आलेली होते. यावर फक्त चर्चा संपन्न झालेली आहे. मी इथे असेही सांगु इच्छिते की या बाबत कुठलाही खुलासा केलेला नाही. तसेच कुठले नांव घ्यावयाचे हे सांगितलेले नाही. सर्व स. सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन स्थायी समिती सभागृहाला श्री. मलिक अंबर यांचे नाव देण्यात येते आहे आणि प्रवेशव्दारास श्री. व्दारकादास पटेल यांचे नाव देण्यात येत आहे. सभागृहाचे कामकाज एक तास स्थगित करण्यात येते आहे.

(दुपारी १२.३० वाजता सभा एकातासासाठी तहकुब करण्यात आली) त्यानंतर पुनश्य एकतासानंतर सभेस सुरुवात झाली व लगेचच राष्ट्रगित म्हणुन आजची सभा पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आली)

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मा. नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

## दिनांक २३ फेब्रुवारी १९९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दिनांक. २३फेब्रुवारी १९९६ रोजी दुपारी ३.०० वाजता नगर भुवन (टाऊन हॉल) येथे मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षते खाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेस सुरुवात झ ााली.

या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

स. सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. ज्यात्स्ना दौलतराव हिवराळे | उपमहापौर |
| २) | सौ. रुख्मीणीबाई खंडेराव लोखंडे | सभासद |
| ३) | श्री. प्रभाकर सिताराम विधाते | --//-- |
| ४) | श्री. म.सलीम हनिफ कुरैशी | --//-- |
| ५) | श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ६) | ॲड. गणेश किशनराव जोशी | --//-- |
| ७) | सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ८) | सौ. विलबाई नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| ९) | सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १०) | श्री. लांडगे गौतम लिंबाजी | --//-- |
| ११) | श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १२) | श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १३) | श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १४) | श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १५) | श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | --//-- |
| १६) | सौ. पदमा बाबुराव शिंदे | --//-- |
| १७) | श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| १८) | श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| १९) | श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २०) | श्रीमती फरहदबानो मो. नवाज | --//-- |
| २१) | श्री. फजलउल्लाखॉन अजमतउल्लाखॉ | --//-- |
| २२) | श्री. अजिज खॉ गणीखॉन | --//-- |
| २३) | श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा | --//-- |
| २४) | सौ. नुरजहॉ बेगम अ. रहेमान खॉ | --//-- |
| २५) | श्रीमती मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| २६) | श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| २७) | श्रीमती जाहेदा बेगम मो. जमीर | --//-- |
| २८) | श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| २९) | श्रीमती यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३०) | श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले | --//-- |

३१) श्रीमती पुष्पाताई गंगवाल --//--
३२) श्री. मो. अ. रऊफ मो.अ. माबुद --//--
३३) श्री. स.अ.एकबालोद्दीन स.अ.कुतुबोद्दीन --//--
३४) श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल --//--
३५) श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण --//--
३६) श्री. सय्यद अली मिरा सलामी --//--
३७) श्री. लहोट रमेश दिपचंद --//--
३८) श्री. फैय्याज अहमद कुरैशी --//--
३९) सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम --//--
४०) सौ. लता दलाल श्रीनिवास दलाल --//--
४१) श्री. जयवंत (बंडु) ओक --//--
४२) सौ. अलका रमेश पाटील --//--
४३) श्री. शंकुतला रामदास धांडे --//--
४४) श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु) --//--
४५) श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह --//--
४६) सौ. वंदना संजय आव्हाड --//--
४७) सौ. निर्मलाबाई विठ्ठल कांबळे --//--
४८) श्री. अब्दुल रशिद म. सत्तार --//--
४९) श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग --//--
५०) श्री. विखारोद्दीन पि. खुदबोद्दीन --//--
५१) श्री. जैन विकास रतनलाल --//--
५२) श्री. बारवाल गजानन रामकिसन --//--
५३) श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय --//--
५४) श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव --//--
५५) श्री. जोशी संजय रामदास --//--
५६) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर --//--
५७) श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे --//--
५८) सौ. राधाबाई तळेकर --//--
५९) डॉ. विजयकुमार मेहेर --//--
६०) श्री. विठ्ठल किसन जाधव --//--
६१) सौ. मंदा धनंजय काळुशे --//--
६२) श्री. भगवान देविदास घडामोडे --//--
६३) श्री. कचरु चंद्रभान नवपुते --//--

सभेची सुरुवात वंदे मातरम् या गिताने झाली.

संवाद

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : नामांतराबाबतचा ठराव मंजुर झालेला आहे. आता त्यात बदल करता येणार नाही. या ठरावात जर काही बदल करावयाचा असेल, तसा प्रस्ताव ३ महिन्यानंतर ठेवावा. यावर आता चर्चा करता येणार नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : मागील बैठकीत प्रबोधनकार ठाकरे यांचे नांव मुख्य सभागृहास देण्याबाबतच्या प्रस्ताव होता. परंतु सर्व सभासदांच्या भावना लक्षात घेवुन

श्री. व्दारकादास पटेल व श्री. मलिक अंबर यांचे नाव देण्याचा प्रस्ताव पुढे आला त्या अगोदर मुळ प्रस्तावात या दोन्ही नावाचा समावेश नव्हता मागील सभेतील नाव देण्यांचा ठरावात दुरुस्ती करण्याचा मा. महापौर यांना अधिकार आहे.

श्री. अब्दुल रशिदखॉन : हा ठराव ३ महिन्यानंतर सभागृहापुढे ठेवावा व तो पर्यंत हे प्रकरण प्रलंबित ठेवावे. हा ठराव एकमताने पास झाला असतांना परत त्यात बदल करणे योग्य नाही. श्री. मलिक अंबर हे एक इंजिनियर होते. मलिक हे नांव हिंदु समाजातही आहे. व मुस्लीम समाजातही आहे. श्री. मलिकअंबरने औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठासाठी प्लॅनिंग तयार केली त्यामुळेच आज पर्यंत या शहरास त्यांनी त्यावेळी तयार केलेल्या प्लॅनिंगनुसार पाणी मिळत आहे. तसेच मलिक अंबर यांचे नांव मुख्य प्रवेशव्दारास देण्याचा ठराव मंजुर झालेला असतांना ते आता बदलुन स्थायी समिती सभागृहास देण्याचा जो बदल करित आहे त्याची काय गरज आहे? कृपया याचा खुलासा व्हावा.

श्री. नरेंद्र पाटील : या ठरावा बाबत परत बोलण्याची फारशी गरज नाही. परंतु दुरुस्ती म्हणजे ठरावातील नसते. तर मी जे बांधले ते जर इतिवृत्तात बरोबर लिहिले गेले नाही तर माझ्या बोलण्यात व इतिवृत्तात जी तफावत असेल तर ती दुरुस्ती करता येते. पुर्ण ठरावात दुरुस्ती करता येत नाही. जर प्रत्येक ठरावात दुरुस्ती करत गेलो तर एकच ठराव वर्षानुवर्षे सभागृहात सुरु राहील. स्थानिक दैनिक सामना या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेले आहे की, आपण या तिन्ही नावांना मंजुरी दिली होती. आपणास यात दुरुस्ती करावयाची असेल तर तसा ठराव ३ महिन्यानंतर सभागृहात आणावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : मुळ प्रस्तावामध्ये कुठेच बदल करण्यात आलेला नाही. मुळ प्रस्तावात मलिक अंबर व व्दारकादास पटेल यांच्या नावाचा समावेश नव्हता. फक्त प्रबोधिनकार ठाकरे यांच्या नावाचा प्रस्ताव होता. मलिक अंबर यांच्या नावाला आमचा मुळीच विरोध नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ठराव मंजुर झालेला आहे तो फक्त आता सभागृहात कन्फर्म करणेस्तव आलेला आहे. यास बदल करावयाचा असेल तर सदर ठराव परत ३ महिन्यानंतर ठेवावा. तसेच यात बदल करणे असेल तर त्यात का बदल करावयाचा याच कृपया खुलासा व्हावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : स. सदस्यांना सांगु इच्छितो की ठराव पारित झाल्यानंतर तो ठराव मंजुर केला जातो.

श्री. बंडु ओक : मा. महापौर यांनी इतिवृत्तात सुधारणा केली त्या बद्दल धन्यावाद. तसेच या विषयाबाबत चर्चा करणेस्तव आपण इतरन सदस्यांना संधी दिली आहे. आता विषय क्र. २ वर चर्चा व्हावी अशी विनंती आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. हमीद ताबा व श्री. जावेद रज्जाक : सभागृहात बोलण्याची संधी दिली हे स.स.श्री. ओक यांनी बोलले त्यांचे शब्द मागे घ्यावे.

श्री. बंडु ओक : मा. महापौरांनी नावाच्या ठरावात दुरुस्ती केलेली आहे. त्यांचा निषेध विरोधी पक्षांनी केलेला आहे तेव्हा आता विषय क्र. २ वर चर्चा करावयास हरकत नसावी.

श्री. काशीनाथ कोकाटे : सभागृहनेता श्री. ओक यांनी सांगितले की विषय क्र. १ इतिवृत्त कायम करणे, तो मंजुर केला आहे व त्यावर आता चर्चा व्हावयास नको. मी येथे असे निदर्शनास आणुन देतो की, इतिवृत्तातील फक्त नावाच्या

ठरावावरच चर्चा झालेली आहे. इतिवृत्तातील अन्य कुठल्याही मुद्यावर चर्चा झालेली नाही. इतिवृत्तातील प्रत्येक चर्चा झालेनंतरच इतिवृत्त कायम करावे.

श्री. मिरा सलामी : सभागृह नेता श्री. ओक यांनी संधी दिली असे म्हटले ते सर्वस्वी चुकीचे विधान आहे. आम्हास सभागृहात बोलण्याचा अधिकार आहे. व तो अधिकार जनतेने दिला आहे. त्यामुळे श्री. ओक यांनी आपले शब्द मागे घ्यावे. नावाच्या बाबत जी सभागृहात चर्चा चालु आहे या बाबत असे सांगु इच्छितो की, प्रबोधनकार ठाकरे यांचे मुख्य सभागृहास देण्याचा प्रस्ताव आता तेव्हा त्यास विरोधी पक्षांची विरोध केला नाही. त्यावेळी मी स्वत: श्री. व्दारकादास पटेल यांचे नांव स्थायी समिती सभागृहास द्यावे. असा प्रस्ताव दिला त्यास सभापती श्री. जैस्वाल यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर स.स.श्री. रशिद मामु यांनी मुख्य प्रवेशव्दारास श्री. मलिक अंबर यांचे नांव देण्याचा प्रस्ताव मांडला तो ही सर्वानुमते मंजुर करण्यात आलेला आहे. येणे प्रमाणे नावं देण्याचा प्रस्ताव सभागृहातील सर्व सदस्यांच्या मताने मंजुर झाला आता या नावाला बदल करण्याचा निर्णय घेण्यात येवु नये. यात आता बदल करता येणार नाही. या बाबत विधी सल्लागार यांचे मत घ्यावे.

श्री. अ.जावेद रज्जाक : सभागृह नेता श्री. ओक यांनी संधी दिली असे म्हटले ते शब्द त्यांनी मागे घ्यावे. सभागृहास शिस्त असणे आवश्यक आहे. नावात बदल करणे बाबत विधी सल्लागार यांचे मत घ्यावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : कुठल्याही स. सभासदांचा अपमान करण्याचा प्रश्न नाही. सभागृहात सर्व स. सभासदांना बोलण्याचा अधिकार आहे. नावाच्या बदल संदर्भाने आम्ही कुठल्याही प्रकारचा जातीयवाद निर्माण केलेला नाही. सभागृहात सर्वांच्या मताने कामकाज व्हावे अशी सभागृहाची भावना आहे. प्रस्तावावर बोलु द्यावयाचे किंवा नाही हा महापौरांचा अधिकार आहे. तरी नावाचे बदलास मान्यता द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : एक विषयावर एका सभासदाने किती यावर मर्यादा असावी.

श्री. विखारोद्यीन : ठरावात का बदल करण्यात येत आहे याचा अगोदर खुलासा व्हावा.

श्री. गौतम खरात : मा. महापौर यांनी दि. २०-२-९६ च्या सभेत जी रुलींग दिली त्यावेळी कायद्याच्या कोणत्या कलमाचा आधार घेतला ३ महिन्याच्या आत निर्णय बदलता येत नाही. हे खरे काय? सभागृहात सताधारी पक्ष खोटे बदलतात. तसेच नावाचे तिनही ठराव ३ महिन्यासाठी स्थगित ठेवावेत.

श्री. हमिदउद्यीन ताबा, श्रीमती आबेदा बेगम : हा ठराव एकमताने पास झालेला आहे तेव्हा यात बदल का करावयाचा याचा अगोदर खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री. गणेश वानखडे : विषय क्र. २ वर चर्चा सुरु करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : गेल्या १० महिन्याच्या काळात सर्व साधारण सभाच्या ज्या बैठका झाल्या तेव्हा पासुन नामांतराचे बरेच ठराव आलेत व या बाबत बराच गोंधळ झालेला आहे. जनतेस नामांतर नको आहे. त्यांना वार्डातील विकासाची कामे पाहिजेत तेव्हा हे नामांतराचे सत्र येथे थांबवावे अशी विनंती आहे.

मा. महापौर : या प्रकरणी स. सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. श्री. मलिक अंबर यांचे नाव स्थायी समिती सभागृहास दिले जाते कारण या सभागृहात शहराच्या विकासाशी निगडीत बरेच मोठे निर्णय घेतले जातात त्यामुळे त्यांचे नाव देण्यात येत आहे.

श्री. हमीदउद्दीन ताबा, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. अब्दुल रशिद खॉन (मामु) : मा. महापौर यांनी मागील बैठकीत पारित केलेला ठरावावरील निर्णय बदलण्याने त्याचे निषेधार्थ आम्ही सभात्याग करीत आहोत (या वेळी आघाडीच्या सदस्यांनी सभात्याग केला.)

श्री. काशीनाथ कोकाटे : मागील बैठकीत २ स.स.चे सभासदत्व १५ दिवसासाठी रद्द करण्यात आले होते कृपया मागे घेण्यात यावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : सभागृहात शिस्त असावी. भविष्यात अशा प्रकारच्या घटना हाऊ नयेत अशी अपेक्षा आहे तसेच पोलिसात जी तक्रार करण्यात आली ती कृपया मागे घ्यावी. मा. महापौर यांनी रुलींग द्यावी अशी विनंती आहे.

मा. महापौर दि. २० फेब्रुवारी ९६ या सर्व साधारण सभेच्या वेळी २ स.नगरसेवकांचे सदस्यत्व १५ दिवसासाठी रद्द केले होते सभागृहाच्या विनंतीनुसार ते मागे घेण्यात येत आहे. तसेच ज्या वेळी सभागृहात जो गोंधळ झाला होता त्यावेळी (९) स.नगरसेवका विरुध्द पोलिसात तक्रार करण्यात आली होती सदर पोलिस तक्रार सभागृहाच्या विनंतीनुसार मागे घेण्यात येत आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : तसेच मुख्य इमारतीतील जे एक सभागृह (स.नगरसेवक हॉल) आहे त्या सभागृहास श्री. करमसिंग ओबेरॉय याचे नाव देण्यात यावे.

श्री. बंडु ओक : स.स.श्री. जैस्वाल व श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या मताशी मी सहमत आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : सभागृहात पुनश्च गोंधळ होणार नाही याची हमी विरोधी सदस्यांनी द्यावी.

श्री. बंडु ओक : स.स.श्री. हाळनोर यांचे मताशी मी सहमत आहे. तसेच स.सदस्यांनी मा. महापौर उपमहापौर आणि अधिकारी वर्गावर धावुन जाऊ नये. शिस्तबध्द पध्दतीने कामकाज पार पाडावे. तसेच मा. महापौर यांचे शब्दाचा सभागृहात मान राखला जावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : मागील बैठकीतील इतिवृत्तातील पान क्र. ९ वर मा. महापौर यांनी सांगीतले होते की, शिवनेरी कॉलनी भागात देण्यात आलेल्या दारु दुकान परवाना बाबत १५ दिवसात चौकशी करण्यात येइल. परंतु एक महिना उलटुन गेला या बाबत काहीच कार्यवाही केलेली नाही. मा. महापौर यांच्या आदेशाचा आदर अधिकारी करत नसतील तर हा संपुर्ण सभागृहाचा अपमान आहे. आता आपण या बाबत काय कार्यवाही करणार आहात याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्याचे खुलासा करावा.

नगर रचनाकार : शिवनेरी कॉलनीतील देशी दारुचे दुकानास ना हरकत प्रमाणपत्र आलेले आहे. ते एखादया कॉलनीसाठी दिलेले नसुन औरंगाबाद शहरासाठी दिलेले आहे. ना हरकत प्रमाणपत्रात कुठल्याही विशिष्ट ठिकाणाचा उल्लेख केलेला नाही.

श्री. काशीनाथ कोकाटे : मागील सभेत जे गोलमोल उत्तर दिलेले आहे तेच उत्तर आता सभागृहात देवुन सभागृहाची दिशाभुल केली एन-९ ए-११५ सिडको या ठिकाणी देशी दारु चालविण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. असा स्पष्ट उल्लेख ना हरकत प्रमाणपत्रात आहे. या अधिकाऱ्याकडे सदर पत्राची प्रत असेल तर ती त्यांनी सभागृहात दाखवावी.

श्री. गौतम लांडगे : मागील सभेत मा. महापौर यांनी १५ दिवसात चौकशी करुन दारु दुकानास दिलेला ना हरकत प्रमाणपत्र रद्द कसा करता येइल अशी रुलींग दिली होती. तर या ठिकाणी परवाना रद्द कसा करता येइल हा विषय होता तर तो का रद्द करण्यात आला नाही याचा खुलासा व्हावा.

डॉ. विजयकुमार मेहेर : मा. महापौर यांना या संदर्भाने महिलांचे शिष्ट मंडळ भेटले होते अधिकाऱ्याने ज्या वेळी परवानगी दिली होती. त्यावेळी त्यांनी मा. महापौर यांच्याशी विचार विनिमय करावयास पाहिजे होता. किंवा वरिष्ठ अधिकाऱ्याशी विचार विनियम करावयाचा होता. परंतु त्यांनी त्यांचे अख्यत्यारीत ना हरकत प्रमाणपत्र दिले याचा सविस्तर खुलासा व्हावा.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : महाराष्ट्र शासनाच्या मालकीची ही दुकान आहे या दुकानांना ना हरकत प्रमाणपत्र क्षेत्र देण्याचा महानगरपालिकेचा मुळीच संबंध नाही. तसेच या साठी एक्साईज खाते हे पुर्ण काम बघते.

श्री. विजयकुमार : स.सदस्य श्री. जैस्वाल हे अधिकाऱ्यांचे समर्थन करीत आहेत मा. महापौर यांना महिलांचे शिष्ट मंडळ भेटले तेव्हा या बाबत अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे की ना हरकत प्रमाणपत्र देण्यापुर्वी मा. महापौर यांचेशी चर्चा करावी.

मा. महापौर : नगर रचनाकार यांनी खुलासा करावा.

नगर रचनाकार : ना हरकत प्रमाणपत्र सहाय्यक संचालक नगररचना यांनी दिलेली आहेत ते पुढील बैठकीत खुलासा करतील तसेच महिलांचे शिष्टमंडळ भेटले किंवा नाही याचाी माहिती मला नव्हती.

श्री. काशिनाथ कोकाटे : इतिवृत्तात स्पष्ट उल्लेख आहे की, महिलांचे शिष्टमंडळ भेटलेले आहे. संबंधीत अधिकारी बेजबाबदार पणे उत्तर देत आहे.

श्री. विजयकुमार मेहेर : अधिकाऱ्यांने बेजबाबदारपणे उत्तर दिले आहे हा सभागृहाचा उपमर्द आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मा. महापौर यांचे अधिकाऱ्यांवर नियंत्रण राहिलेले नाही.

श्री.च काशिनाथ कोकाटे : दारु दुकान परवान्याचे अधिकार इतर कार्यालयास आहेत तर महानगरपालिकेने का ना हरकत प्रमाणपत्र दिले.

श्री. नरेंद्र पाटील : सिडकोच्या जागेवर महानगरपालिकेने ना हरकत प्रमाणपत्र दिले. ना हरकत प्रमाणपत्राची प्रत सभागृहात दाखल करावी.

श्री. विठ्ठल जाधव : महानगरपालिकेने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र हे संपुर्ण शहरासाठी आहे. केवळ सिडको क्षेत्रापुरते मर्यादित नाही स.सदस्य श्री. कोकाटे यांचे म्हणण्यानुसार ना हरकत प्रमाणपत्रावर शिवनेरी कॉलनी व तेथील पत्याचा उल्लेख आहे तर त्यांनी ती प्रत सभागृहात दाखवावी. श्री. कोकाटे हे सभागृहाची दिशाभुल करीत आहेत.

मा. महापौर : तसेच श्री. हाळनोर यांनी मुख्य इमारतीतील एका सभागृहास श्री. करमसिंग ओबेरॉय यांचे नाव देण्याचा जो प्रस्ताव दिला आहे तो मंजुर करण्यात येत आहे.

या संबधीत चौकशी करण्यात येइल तसेच संबंधीत अधिकाऱ्याने महापौरांचे कॅबिनमध्ये येवुन आजच चर्चा करावी. विषय क्र. २ वर चर्चा करावी.

**विषय क्र. १५३/१ :**

दिनांक १८ जानेवारी १९९६ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

विषय क्रमांक १ इतिवृत्त कायम करणे दि. १८-१-९६ सर्व साधारण सभेतील विषय क्र. १४५/५ मध्ये पुढील प्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे. नविन प्रशासकीय इमारतीतील स्थायी समिती सभागृहास श्री. मलिक अंबर यांचे नांव देण्यात येते तसेच मनपा कार्यालयाच्या मुख्य प्रवेश व्दारास "व्दारकादास पटेल प्रवेश व्दार" असे नांव देण्यांत येते. तसेच स.स.श्री. गिरजाराम हाळनोर यांनी नविन प्रशासकीय इमारतीतील नगर सेवक कक्षास "करमसिंग ओबेरॉय" हॉल असे नांव देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन दि. १८-१-९६ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेच्या इतिवृत्तास विषय क्र. १ मधिल दुरुस्तीसह मंजुरी करण्यात येते.

**विषय क्र. १५४/२ :**

स्थायी समिती दि. ६-१-९६ मधील ठराव क्र. ३७३/२१ नुसार शहरातील सर्व झोन मधील कचरा वाहतुक करण्यासाठी एकुण २९ ट्रक/टिप्पर आहेत दोन जुने झालेले ट्रॅक्टर स्पेअरला आहेत. झोन मधील एखादा ट्रक नादुरुस्त असल्यास या ट्रॅक्टरची व्यवस्था केली जाते परंतु या ट्रॅक्टरमुळे ट्रकाप्रमाणे संपुर्ण कचरा वाहुन नेला जाऊ शकत नाही.

तसेच शहरातील जनतेसाठी ज्या भागात पाण्याच्या नळाची व्यवस्था नाही तेथे पाणी पुरवठा करण्यासाठी सध्या चार मोठे दहा हजार लिटर क्षमतेचे व एक लहान तिन हजार लिटर क्षमतेचे पाण्याचे टँकर आहेत. या वर्षी पाऊस कमी झाल्यामुळे पाणी टंचाईची शक्यता जास्त आहे. त्यासाठी पाच नविन टॅर्क्स खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे हे टँकर मध्यम आकाराचे आठ हजार लिटर क्षमतेचे टिप्परमध्ये बसवुन पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. ज्या वेळेस पाणी टंचाई नसेल त्या वेळेस हे टिप्पर कचरा वाहतुकीसाठी वापरले जाणार आहे.

महानगरपालिकेकडे कचरा वाहतुकीसाठी सर्व टाटा कंपनीचे टिप्पर आहेत. हे टिप्पर मजबुत व चांगल्या प्रतिचे आहेत. दुरुस्ती व स्पेअर पार्ट उपलब्धतेच्या दृष्टीने सोईचे आहे. नविन १६१२ टिप्पर खरेदीसाठी टेलकोचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटर्स लि. औरंगाबाद यांचेकडुन (गर्व्ह रेट) प्रमाणे दरपत्रक मागवविण्यात आलेले आहे. १) टाटा एके .१६१२/३६ बॉक्स टिप्पर ०५ ६,६५,७५० रक्कम रुपये ३३,२८,७८५

वरील प्रमाणे एकुण पाच टिप्पर्स खरेदी करण्यासाठी ३३,२८,७८५ खर्च येतो हे दर जकात सोडुन आहेत. तसेच वाहनांचा पुरवठा करतांना जी कमी किंवा जास्त किंमत असेल त्या प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल. संपुर्ण रक्कम ॲडव्हान्स अदा करावी लागेल सध्या नविन वाहने खरेदी साठी तरतुत नाही.

तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

श्री. नरेंद्र पाटील : कंचरा वाहतुक करण्यासाठी एकुण २९ टिप्पर आहेत असे सांगण्यात आले स्थायी समिती सभापती यांना अशी सुचना आहे की, जी ट्रकची उंची आहे ती दोन फुट आहे तेव्हा त्यात कचरा कमी बसतो ट्रक मध्ये कचरा

जास्त बसावा यासाठी ट्रकची बॉडी जी आहे तीची उंची थोडी असावी त्यामुळे त्यात जास्त कचरा बसु शकेल.

श्री. विकास जैन : स.सदस्य श्री. पाटील यांनी उंची वाढविण्याबाबत सांगितले परंतु आजची अशी स्थिती आहे की, मजुर लोकांना ट्रकमध्ये कचरा टाकते वेळी सध्याच्या उंचीमुळे त्रास होतो.

श्री. गौतम खरात : शहराची स्वच्छता चांगल्या प्रकारे व्हावी असे माझे मत आहे परंतु येथे असे सांगु इच्छितो की ट्रकची उंची आणि मंजुरांच्या हाताची उंची पाहता कर्मचारी ट्रकमध्ये कचरा टाकु शकत नाही.

श्री. नरेंद्र पाटील : ट्रकची उंची वाढविण्याचा जो माझा प्रस्ताव आहे. यावर ट्रायल बेसिसवर प्रयत्न करणे योग्य होइल असे वाटते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स.सदस्य श्री. पाटील यांनी दिलेले मत योग्य आहे.

श्री. गजानन बारवाल : सभागृहात जो प्रस्ताव माडण्यात आला तो तसाच मंजुर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील कचरा वाहतुकीसाठी व पाणी पुरवठयासाठी महानगरपालिकेत अस्तीत्वात असलेली वाहने कमी पडत असल्यामुळे टाटा कंपनीचे पाच नविन १६१२ टिप्पर औरंगाबाद येथील टेलको कंपनी अधिकृत विक्रेते मेसर्स सतिश मोटर्स लि. औरंगाबाद यांचेकडुन शासकीय दराने म्हणजे प्रति टिप्पर रु. ६,६५,७५० जकात कर सोडुन खरेदी करण्यास मान्यता देण्यात येते या प्रमाणे टाटा एस के.१६१२/३६ बॉक्स टिप्पर प्रति नग रु. ६,६५,७५० या दराने ५ नग टिप्पर करिता रक्कम रु. ३३,२८,७८५ रुपयांच्या खर्चास व सदरील टिप्पर हे टेलकोचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटर्स औ'बाद यांच्याकडुन खरेदी करण्यास व सदरची रक्कम अगाऊ अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५/३ :**

स्थायी समिती दि. ६-१-९६ मधील ठराव क्रमांक ३७७/३६ नुसार महानगरपालिका हद्दीतील मिळकत धारकांनी/घरमालकांनी मालमत्ता कर व त्या संलग्न असलेले इतर कराचा भरणा केल्यानंतरही पुन्हा सदर कराची थकबाकी म्हणुन मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्याने दि. २८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीने मिळकत धारकांना घर मालकांना मालमता कर व त्यास असलेले सलग्न "कराचा भरणा पुस्तक" देण्याचा निर्देश दिलेला आहे.

महानगरपालिकेचया हद्दीत सध्या कर आकारणी केलेले सुमारे ८५७३० मिळकती असुन त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मिळकत धारकांना घरमालकांना भरलेल्या आणि थकबाकी असलेल्या सदर कराची जाणिव राहावी. व कराचा भरणा वेळोवेळी व्हावा म्हणुन सदर पुस्तक देणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सुमारे एक लाख पुस्तकांची तुर्त आवश्यकता असल्याने त्यास सुमारे रुपये पाच लाख (अपेक्षित) खर्च लागणार आहे. सदर खर्च मिळकत धारकांकडुन/घरमालकाकडुन ना नफा ना तोटा या धरतीवर किंमत निश्चित करुन वसुल करण्यात येइल या करिता सोबत जोडलेल्या नमुन्यात सदर पुस्तक तयार करुन मिळकत धारकांना/घरमालकांना दि. ०१-०४-९७ पासुन देण्याचा प्रस्ताव मंजुर करुन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यासाठी सादर करीत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीतील मिळकत धारकांनी/घर-मालकांना स्थायी समितीने निर्देशित केल्याप्रमाणे मालमत्ता कर व त्यास असलेले सलग्न "कराचा भरणा पुस्तक" देणेसाठी महानगरपालिका हद्दीत सध्या कर आकारणी केलेले सुमारे ८५७३० मिळकती असुन त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने मिळकत धारकांना /घर मालकांना भरलेल्या आणि थकबाकी असलेल्या सदर कराची जाणिव राहावी. व कराचा भरणा वेळोवेळी व्हावा म्हणुन सदर पुस्तक देणे आवश्यक असल्यामुळे सद कामासाठी सुमारे एक लाख पुस्तकांची तुर्त आवश्यकता असल्याने त्यासाठीचे सुमारे रुपये पाच लाख (अपेक्षित) खर्चास मान्यता देण्यात येते. तसेच सदर खर्च मिळकत धारकांकडुन/घरमालकाकडुन ना नफा ना तोटा या धरतीवर किंमत निश्चित करुन वसुल करणेस व सोबतचे नमुन्यात पुस्तक तयारक करु मिळकत धारकांना/घरमालकांना दि. ०१-०४-९७ पासुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६/४ :**

सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव अनेक वर्षापासुन विचाराधिन आहे. या संबंधात लवकरात लवकर निर्णय घेणे आवश्यक आहे. सिडको क्षेत्रामध्ये मालमत्ता कर लावण्यात आलेला आहे. व त्याची नियमित मागणी अंदाजे रुपये १.५ कोटी असुन थकबाकीची रक्कम अंदाजे पाच कोटी रुपये आहे. सद्य स्थितीत मनपा त्या क्षत्रात पाण्याव्यतिरिक्त इतर कोणतीही सुविधा उपलब्ध करुन देत नसल्यामुळे तेथील घर मालक मालमत्ता कर भरण्यास विरोध करीत आहेत. सिडको क्षेत्राचे हस्तांतरण करुन घेण्या बद्दल सिडको प्राधिकरणकडुन सुध्दा वारंवार विनंती केली जात आहे. सिडको क्षेत्रामध्ये म्हाडाच्या कॉलनी सुध्दा तयार झालेल्या आहेत त्याही ठिकाणी सुविधांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या सर्व बाबींचा विचार होणे सर्वांच्या दृष्टीने हितावह आहे असे वाटते परंतु असे हस्तांतरण करुन घेण्यापुर्वी सिडको प्राधिकरणाने ज्या सुविधा पुरविण्याचे आश्वासन दिले होते. त्या सर्व सुविधा पुरविण्यात आल्या किंवा नाही या बाबतच्या कामाचा आढावा घेऊन सिडको कडुन आवश्यक रक्कम घेणे सुध्दा फार महत्वाचे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता असा प्रस्ताव आहे की, सध्या अपुर्ण असलेल्या सुविधा निर्माण करण्याकरिता / पुरविण्या करिता येणारा खर्च सिडको प्राधिकरण देण्यास तयार असेल तर सिडकोचे हस्तांतरण औरंगाबाद महानगरपालिकेकडे करुन घेण्यात यावे. सिडको क्षेत्रामध्ये ज्या सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत किंवा अपुर्ण आहेत अशा सर्व बाबीचा सविस्तर आढावा घेण्या करिता मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक उपसमिती गठीत करण्यात यावी, या उपसमिती मध्ये सभापती, स्थायी समिती, सभागृहनेता, विरोधी पक्षनेता तसेच सिडको क्षेत्रातील सर्व स. नगरसेवक/ सेविका यांचा समावेश असावा. त्या शिवाय सिडकोचे मुख्य प्रशासक तसेच महानगरपालिकेचे शहर अभियंता अति शहर अभियंता व कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांचाही समावेश असावा समितीने आपला अहवाल १५ दिवसांत तयार करुन समितीने ठरविलेल्या कार्यप्रणाली नुसार प्रत्यक्ष हस्तांतरणाची प्रक्रिया १ मे ९६ च्या आत पुर्ण करण्यात यावी.

संवाद

श्री. गजानन बारवाल : सिडकोचे हस्तांतरण करण्याच प्रस्ताव सभागृहापुढे आलेला आहे. हस्तांतरण करणार आहेत म्हणजे नेमके काय करणार आहेत. या हस्तांतरणासाठी सभागृहाची विशेष बैठक घेण्यात यावी, कमेटीमध्ये या हस्तांतरणाची कार्यवाही होईल असे वाटत नाही. त्यामुळे याचा खुलासा व्हावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सिडको हस्तांतर कमेटीमध्ये सर्व पदाधिकाऱ्यांचा समावेश करावा.

श्री. विजयकुमार मेहेर : सिडकोंचे हस्तांतरण ज्या दिवशी महापालिकेकडे होइल तेव्हापासुन टॅक्स भरण्यात येइल. त्या अगोदरचा टॅक्स भरणार नाही. तसेच सिडको हस्तांतर कमेटीमध्ये सिडकोतील सर्व स. नगरसेवक यांचा समावेश असावा तसेच या प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी एक समन्वय समिती असणे आवश्यक आहे.

श्री. गजानन बारवाल : या समितीमध्ये माझ्या नावाचा समावेश करण्यात यावा.

श्री. महादेव सुर्यवंशी : सदर विषयात स्पष्ट उल्लेख आहे की, "समितीने आपला अहवाल १५ दिवसात तयार करुन समितीने ठरविलेल्या कार्यप्रणालीनुसार प्रत्यक्ष हस्तांतरणाची प्रक्रिया १ मे ९६ च्या आत पुर्ण करावी. तेव्हा समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील चर्चा होणार आहे. त्यामुळे चर्चा न करता हा विषय मंजुर करण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : हा विषय आयुक्तांमार्फत मान्यतेसाठी आलेला आहे सिडको हस्तांतरणासाठी सिडकोच्या नगर सेवकांच्या विरोध नाही. सिडकोतील मालमत्ता कर हा प्रश्न महत्वाचा आहे. या बाबत एक नागरी कृती समिति आहे. या समितीशी मालमत्ता करा बाबत विचार विनिमय करावा. अशी विनंती आहे.

सौ. रजनी जोशी : या बाबत बाहेरील लोकांना घेण्याची आवश्यकता नाही.

मा. महापौर : सिडको हस्तांतरणाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

श्री. नरेंद्र पाटील : सिडको हस्तांतरणासारख्या महत्वाच्या विषयावर २ मिनिटे चर्चा करण्यासाठी सभागृहास वेळ नाही याचा मी निषेध करतो.

श्री. भगवान घडामोडे : स.स.श्री. पाटील यांची कुठे तरी चुक होत आहे या हस्तांतरणासाठी समिती नेमण्यात आली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर सविस्तर चर्चा करता येइल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको क्षेत्राचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण अनेक वर्षापासुन विचाराधिन आहे. सिडको क्षेत्रामध्ये मालमत्ता कर लावलेला आहे. मालमत्ता कर थकबाकी पाच कोटीची असुन सिडको प्राधिकरण सिडको हस्तांतरण करणे बाबत महानगनपालिकेस वारंवार विनंती करीत आहे. सिडको क्षेत्रात म्हाडाच्या कॉलनी इतर वसाहतींना अवश्यक त्या नागरी सुविधा पुरविण्या बाबजत मा. महापौर यांचे अध्यक्षते खाली हया समिती गठीत करण्यासाठी स. सदस्य म्हणुन स्थायी समिती सभापती, सभागृहनेता, विरोधी पक्षनेता, सिडको क्षेत्रातील नगरसेवक/सेविका तसेच सिडकोचे मुख्य प्रशासक, मनपाचे शहर अभियंता, अति शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचा समावेश करण्यास मंजुरी देण्यात येते. सदर उप समितीने आपला अहवाल समिती गटीत झाल्यापासुन १५

दिवसाच्या आत सादर करावा व प्रत्यक्ष सिडको हस्तांतरणाची प्रक्रिया दि. १ मे १९९६ चे आत पुर्ण करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७/५ :**

टपरी जागा वाटपाची नियमावली

दिनांक १-६-९५ पर्यंत ज्या ठिकाणी टपरी अस्तीत्वात असेल व ती जागा टपरी समितीने देण्याबाबत शिफारस केली असेल त्या ठिकाणीच टपरी नियमित करण्यात यावी. परंतु दि. १-६-९५ नंतर टपरी लावण्यात आली असेल तर ती काढुन टाकण्यात यावी.

टपरी समित्यांच्या अहवालानुसार जागा उपलब्ध असेल टपरी समितीची शिफारस असेल व जागा रिकामी असेल त्या जागेवर टपऱ्या नाहीत आणि असल्या तरी दि. १-६-९५ नंतरच्या आहेत अशा जागे करिता अर्ज मागविण्यात यावेत आलेल्या अर्जाची छाननी करुन खालील निकर्षांच्या आधारे टपऱ्यासाठी जागा मंजुर करण्यात यावी.

१) ज्या अपंग व्यक्तीकडे स्वतःच्या किंवा कुटुंबातील व्यक्तीच्या नावे टपरी साठी जागा नाही, अशा अपंग व्यक्तीसाठी ५% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

२) १२ वी किंवा त्यापेक्षा अधिका शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित बेकांराकरिता टपऱ्यासाठी २५% जागा राखीव ठेवण्यात याव्यात (मागासवर्गिय व्यक्तीस)

३) १२ वी किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षण घेतलेल्या मागासवर्गिय व्यक्तीकरीता ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

४) स्वातंत्र्य सैनिक माजी सैनिक किंवा त्यांच्यावर प्रत्यक्ष अवलंबुन असणाऱ्या व्यक्तीसाठी ५% जागा राखीव ठेवण्यात याव्या.

५) प्रकल्प ग्रस्तांसाठी कुटुंबातील एका व्यक्तीच्या नावे ५% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

६) महिला करिता ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

टीप : अर्जदाराच्या कुटुंबातील कोणत्याही (कुटुंब म्हणजे पती पत्नी अविवाहीत मुली आणि अवलंबुन असलेले आई वडील/बहीन/भाऊ) व्यक्तीच्या नावे इतर धंदा व्यवसाय असल्यास अशा व्यक्तीस टपरीसाठी जागा देण्यात येऊ नये.

अर्जाची छाननी करण्या करिता खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

अर्जाची छाननी करण्याकरिता खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १) महापौर यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी | सदस्य |
| २) विरोधी पक्षनेता यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी | --//-- |
| ३) संबंधित वार्डाचे नगर सेवक | निमंत्रक सदस्य |
| ४) उप आयुक्त-२ | सदस्य |
| ५) सहा. संचालक नगर रचना | --//-- |
| ६) मालमत्ता अधिकारी | --//-- |

I. छाननी समितीने शिफारस केलेले अर्ज स्थायी समितीकडे मान्यतेकरिता सादर करण्यात यावे व स्थायी समितीने मंजुर केल्यानुसार तात्पुरत्या कालावधी करिता टपरीसाठी जागा देण्यात यावी.

II. छाननी समितीने टपरीचा आकार आणि डीझाईन निश्चित करावी. व त्यानुसार टपरी बसविण्याच्या आदेश द्यावा.

III. सहा. संचालक नगर रचना यांनी टपरीकरिता देण्यात आलेल्या जागेचे भाडे निश्चित करुन समितीकडे मंजुरीसाठी पाठवावे.

IV. सध्या ज्या टपऱ्या बंद आहेत त्यांना परवानगी दिली असल्यास परवाना रद्द करण्यात यावा.

V. ज्या व्यक्तीला टपरीसाठी जागा मंजुर केलेली असेल त्या व्यक्तीचा प्रत्यक्ष ताबा नसेल आणि दुसरी व्यक्ती सदरहु जागा वापरत असल्यास परवाना रद्द करुन ती जागा इतर व्यक्तीला देण्यात यावी.

VI. ज्या टपरी धारकांकडे भाडे थकबाकी असेल त्यांनी ३ महिने भरण्यासाठी मुदत देण्यात यावी. मुदतीनंतरही भाडे भरणा न केल्यास परवाना रद्द करण्यात यावा.

VII. टपरीसाठी जागा देतांना वाहतुक पोलिस यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

VIII. ज्या कार्यल्यासमोर टपरीसाठी जागा देण्यात येणार असेल त्याच्याशी विचार विनिमय करण्यात यावा.

IX. टपरीसाठी जागा देतांना वाहतुकीस अडथळा होणार नाही ही बाब नजरेसमोर ठेवुनच टपरीसाठी जागा देण्यात यावी.

X. शक्यतोवर गॅरेज, वर्कशॉप करिता जागा देण्यात येऊ नये. कारण गॅरेज वर्कशॉप समोर अनेक वाहने उभी राहतात व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

XI. सार्वजनिक आरोग्यास अपाय करण्याऱ्या धदयात/व्यवसायात तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणाऱ्या धदयास/व्यवसायास टपरीकरिता जागा देण्यात येऊ नये.

**विषय क्र. १५८/६ :**

स्थायी समिती दि. १९-१-९६ ठराव क्र. ४०८/३० नुसार शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रियदर्शिनी इंदिरानगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे या कामासाठी रु. १०,१३,१००/- चे अंदाज पत्रक सां.बा. विभाग औरंगाबाद यांची दरसुचीनुसार ९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आले असुन मा. आयुक्त यांनी दि. ११-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरिता महानगरपालिकेचे सन. ९५-९६ अर्थसकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षकांतर्गत रु. १० लाखाची तरतुद केलेली आहे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रियदर्शिनी इंदिरानगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणेसाठी रु. १०,१३,१००/- च्या अंदाज पत्रकास व सदरचा खर्च ९५-९६ च्या अर्थसकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत डांबरीरस्ते या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरामधे विविध ठिकाणी मनपा जागेवर मनपाच्या मालकीचे दुकान केद्र अनामत ठेवी स्विकारुन भाडे तत्वावर देण्यासाठी खालील प्रमाणे नियम व अटी तयार करण्यात आलेल्या आहेत. कारण सदर अशा प्रकरणामध्ये आर्थिक बाबींवर तान न पडता सदर दुकान केंद्राच्या इमारती बांधकाम करता येऊ शकतात व नागरिकांनाही दुकान केंद्रामुळे सहकार्य होइल व त्या पासुन येणारे भाडे रक्कमेपाटी मनपाची आर्थिक बाजु सुधारु शकते.

नियम व अटी खाली प्रमाणे

१) प्रत्येक मजल्यासाठी, दुकानासाठी स्वतंत्र निविदा भरावी लागेल.

२) निविदेमध्ये व्यवसाय धारकाने कोणता व्यवसाय करणार याचा स्पष्ट उल्लेख करावा व निविदा मंजुर झाल्यास निविदेत उल्लेख केलेला व्यवसाय करणेच त्यास बंधनकारक राहिल.

३) भाडे पट्टयाचा कालावधी ताबा दिल्यापासुन प्रथमत: ३० वर्षाचा राहील हा कालावधी संपल्यानंतर पुन्हा ३० वर्षांनी भाडेपट्ट वाढवुन देण्याचा विचार करता येइल. तथापी त्याच्या अटी व शर्ती नव्याने त्यावेळचे परिस्थितीनुसार ठरविण्यात येतील. तसेच भाडे पट्टयाचा कालवधी वाढवुन देण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

४) दर पाच वर्षांनी प्रचलित भाडयात २५% इतकी वाढ करण्यात येइल व ती वाढ भाडे करुवर बंधनकारक राहील.

५) महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली अनामत र. रु. ४०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्रावर खाली करुन देतांना परत करण्यात येइल त्या रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

६) जी निविदा मंजुर होइल त्या निविदाधारकांस अनामत रक्कम रु. ४०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्रावर निविदा मंजुर झाल्यापासुन ३० दिवसाचे आत भरावी लागेल ही रक्कम ३० दिवसाचे आत न भरल्यास मंजुर निविदा नामंजुर करण्यात येइल व निविदा सोबत भरलेली बयाना रक्कम जप्त करण्यात येइल र. रु. ५०००/- (अक्षरी रु. पाच हजार फक्त)

७) संबंधीत जागेचा ताबा निविदा मान्य झाल्यापासुन शक्यतो १८ महिन्याचे आत देण्यात येइल तथापी काही अपरिहार्य कारणास्तव बांधकामास उशिर झाल्यास त्यानंतरच्या कालावधीसाठी रु. ४०००/- या रकमेवर बॅकेचे बचत खात्यावरील त्यावेळचे दरानुसार व्याज अनुज्ञेय राहील.

८) निविदा मंजुर झाल्यास दुकान वापर त्या इमारतीतील इतर संस्थांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही अशा प्रकारे करण्याचे बंधन राहिल उदा. दारुचे दुकान, बिअर बार, परमिटरुम, मटन दुकान, चक्की, छापखाना, स्फोटक वस्तुचे दुकान अशी व्यवसाय व इतरांना उपसर्ग पोहोचविण्याऱ्या व्यवसाया साठी इच्छुकांनी निविदा भरु नये ते वापर अनुज्ञेय केले जाणार नाही.

९) निविदेत दर्शविलेले व्यवसाय महानगरपालिकेस मान्य नसल्यास निविदा नाकारण्यात येइल.

१०) एकाच मजल्यासाठी सम मुल्याच्या एकाहुन जास्त निविदा प्राप्त झाल्यास त्या विविध मजल्यासाठी सोडत काढुन वाटप करण्यात येइल.

११) विद्युतीकरणासाठी आवश्यक ते वायरींगचे काम संबंधीतांना महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र घेवुन स्वखर्चाने करुन घ्यावे लागेल. व विद्युत शुल्क धारकास स्वत: भरावा लागेल. विद्युत मिटर बसवुन घ्यावे लागेल तसेच परिसर लाइट व्यवस्थेचे येणारे बिल सर्वांसाठी कॉमन बील असेल तर ते प्रत्येकास विभागुन घ्यावे लागेल.

१२) धारकास मालमत्त कर (सर्व सामान्य कर) व इतर सर्व कर नियमाप्रमाणे भाडया व्यतिरिक्त भरावे लागतील. तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचा अधिकार भाडेकरुस (रु. पाच फक्त) प्रति चौ.मी. प्रमाणे सेवा शुल्क भाडया व्यतिरिक्त द्यावे लागेल.

१३) दुकान परस्पर हस्तांतर करुन देण्याचा पोट भाडेकरु ठेवण्याचा अधिकार भाडेकरुस राहणार नाही. मात्र मुळ भाडेकरुचे वाटपाचे नांव महानगरपालिकेची पुर्ण परवानगीने हस्तांतर करता येइल.

१४) दुकान तारण ठेवण्याचा किंवा त्यावर आर्थिक बोजा निर्माण करण्याचा भाडेकरुस अधिकार राहणार नाही असे निदर्शनास आल्यास अनामत रक्कम जप्त करुन खाली करुन घेण्यात येइल.

१५) भाडे करुस दुकानात फेरबदल करण्याचा अधिकार राहणार नाही दुकानाचे स्वरुपात बदल व उपयुक्ततेस बाधा येईल असे बांधकाम करता येणार नाही. महानगरपालिकेची लेखी परवानगीने किरकोळ दुरुस्ती व रंगरगोटी भाडेकरुस करुन घ्यावी लागेल.

१६) प्रत्येक निविदे सोबत रु. ५०००/- प्रमाणे बयाना रक्कम (३ यरनेष्टमनी) म्हणुन कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेचा डीमांड ड्राफ्ट किंवा रोखीने महानगरपालिका कार्यालयात भरुन त्याची मुळ पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र निविदा स्विकारण्याच्या दिवशी बयाना रक्कमे (३ अरनेष्ट मनी) ची रक्कम रोखीने महानगरपालिका कार्यालयात स्विकाराण्यात येणार नाही. डिमांडड्राफ्ट ३० आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या नावाने असावा व तो औरंगाबादेतील बँकेच्या कोणत्याही शाखेचा देय असावा. निविदेसोबत बयाना रक्कमे (३ अरनेष्ट मनी) या ड्राफ्टचा रोख रक्कम भरणा केली असल्याची मुळ पावती नसल्यास त्याची निविदा विचारात घेण्यात येणार नाही. वरील बयाना रक्कम ३ अरनेष्ट मनी) ही निविदा मंजुर होतील त्याच्याही बयाना रक्कम त्यांना भरावयाच्या अनामत रकमेचे वेळी वळती करुन घेण्यात येइल.

१७) निविदा मंजुर झालेल्या निविदा धारकांना दुकानाचा ताबा मिळाल्यापासुन प्रत्येक वर्षी एक वर्षाचे अगाऊ भाडे महानगरपालिका कार्यालयात प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस उशिरात उशिरा एप्रिल अखेर जमाकरणे बंधनकारक राहील अन्यथा त्यावर १०% व्याज आकारले जाईल.

१८) निविदेमध्ये मासिक भाडयाचा उल्लेख प्रति चौ.मी. प्रमाणे करणे आवश्यक आहे. उल्लेख नसल्यास तो प्रति चौ. मी. आहे गृहीत धरण्यात येइल व त्यानुसार कार्यवाही होइल.

१९) महसुल अधिनियमान्वये योग्य त्या किंमतीच्या मुद्रांककावर करारनामा करावा लागेल.

२०) कोणतीही किंवा सर्व निविदा कारण न दाखविता नाकारण्याचे अधिकार महानगरपालिका प्रशासक/आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

२१) प्रत्यक्ष स्थळातर झालेले वाढीव किंवा कमी बांधकाम क्षेत्रफळाप्रमाणे अर्जदास ताबा देतांना जागेवरील उपलब्ध क्षेत्रफळानुसार व ठरलेल्या दरनुसार प्रति चौ.मी. प्रमाणे भाडे आकारणी करण्यात येइल.

प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांच्या विनंतीवरुन सभा येथेच संपविण्यात येत आहे.

**ठराव :**

विषय क्र. १५९/७ हा पुढील सभेत ठेवावा.

जन गण मन या राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मा. नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ११-३-१९९६ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तात**

सोमवार दि. ११.३.१९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षते खाली कै. केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्व साधारण सभेस सुरुवात झाली.

या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.सौ. ज्सोत्स्ना दौलतराव हिवराळे | उप महापौर |
| २) | मा. सौ. रुख्मीनीबाई खंडेराव लोखंडे | सदस्य |
| ३) | मा.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ४) | मा.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ५) | मा.श्री. म.सलीम हनिफ कुरैशी | --//-- |
| ६) | मा.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ७) | मा.सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ८) | मा.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| ९) | मा.सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | --//-- |
| १०) | मा.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| ११) | मा.श्री. गौतम भागजी खरात | --//-- |
| १२) | मा.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १३) | मा.श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --//-- |
| १४) | मा.श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १५) | मा.श्री. काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --//-- |
| १६) | मा.श्री. सुदाम रामदास सोनवणे | --//-- |
| १७) | मा.श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | --//-- |
| १८) | मा.श्री. कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --//-- |
| १९) | मा.सौ. पदमा बाबुराव शिंदे | --//-- |
| २०) | मा.श्री. सुभाष भिकाजी टाकळकर | --//-- |
| २१) | मा.श्री. प्रफुल्ल लालचंद मालाणी | --//-- |
| २२) | मा.श्रीमती चंपाबाई पांचाळ | --//-- |
| २३) | मा.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २४) | मा.श्री. फजलउल्लहखान अजमतऊल्लाह खान | --//-- |
| २५) | मा.श्री. अजिल खाँ गणी खाँ | --//-- |
| २६) | मा.श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्ताफा | --//-- |
| २७) | मा.श्री. मुस्ताक अहेमद | --//-- |
| २८) | मा.सौ. नुरजहाँ बेगम अ. रेहमानखॉन | --//-- |
| २९) | मा.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३०) | मा.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर अहेमद | --//-- |
| ३१) | मा.सौ. मोहसिना बिल्कीस विखारोद्यीन | --//-- |
| ३२) | मा.श्री. अ.जावेद रज्जाक | --//-- |
| ३३) | मा.सौ. जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३४) | मा.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३५) | मा.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३६) | मा.श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले | --//-- |
| ३७) | मा.श्रीमती पुष्पाबाई गंगवाल | --//-- |
| ३८) | मा.श्री. हमिदउद्दीन फसियोद्दीन ताबा | --//-- |
| ३९) | मा.श्री. मो. अ. रऊफ मो.अ.माबुद | --//-- |
| ४०) | मा.श्री. स.अ. एकबालोद्दीन स.मो. कुतुबोद्दीन | --//-- |
| ४१) | मा.श्री. धिरज शांतीलाल खाखोरडीया | --//-- |
| ४२) | मा.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४३) | मा.श्री. सौ. अली मिरा सलामी | --//-- |
| ४४) | मा.श्री. संजय किसनराव केणेकर | --//-- |
| ४५) | मा.सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --//-- |
| ४६) | मा.सौ. दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| ४७) | मा.श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| ४८) | मा.सौ. अलका रमेश पाटील | --//-- |
| ४९) | मा.सौ. शकुंतला हरीदास धांडे | --//-- |
| ५०) | मा.श्री. अ.राशिद खॉ (मामु) | --//-- |
| ५१) | मा.श्री. डॉ. भागवत कराड | --//-- |
| ५२) | मा.सौ. सविता संजय आव्हाड | --//-- |
| ५३) | मा.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ५४) | मा.श्री. अ.रशिद अ. सत्तार | --//-- |
| ५५) | मा.श्री. तरवेंद्रसिंह म. धिल्लन | --//-- |
| ५६) | मा.श्री. विखारोद्यीन खुदबोद्यीन | --//-- |
| ५७) | मा.श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ५८) | मा.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ५९) | मा.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | --//-- |
| ६०) | मा.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | --//-- |
| ६१) | मा.सौ. राधाबाई सखाराम तळेकर | --//-- |
| ६२) | मा.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ६३) | मा.श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ६४) | मा.सौ. मंदा धनंजय काळुशे | --//-- |
| ६५) | मा.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ६६) | मा.श्री. कचरु चंद्रभान नवपुते | --//-- |

विषय क्र. १६०/१ :
सन १९९६-९७ अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकावर विचार विनिमय करणे बाबत

संवाद

श्री. प्रदिप कुमार जैस्वाल : अर्थसंकल्पावरील मनोगत व्यक्त केले त्याच प्रमाणे शहरातील नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या दृष्टीने शासकीय वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालय या धर्तीवर महानगरपालिकेतर्फे रुग्णालय असावे या दृष्टीने अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी.

श्री. नरेंद्र पाटील : मा. सभापती यांनी जे निवेदन सभागृहात वाचुन दाखविले त्या निवेदनात रुग्णालया बाबत उल्लेख नाही तसा अंतरभाव निवेदनात असणे आवश्यक आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : अर्थ संकल्पातील निवेदनात रुग्णालया विषयीचा आंतरभाव करण्याचे राहुन गेले आहे. तथापी तसा अंतरभाव निवेदनात करुन घेण्यात यावा.

श्री. मोहसिन अहमद : सन १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात सिकंदर अली वज्द आणि मौलाना अब्दुल कलाम आझाद मेमोरीयल करिता तरतुद करण्यात आलेली नाही. या बाबत खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : सिकंदर अली वज्द मेमोरियल करिता मागील दोन अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली होती या तरतुदी नुसार उक्त कामावर रु १० लाखापर्यंतचे काम व्हावयास हवे होते तथापी आता पर्यंत फक्त रु. ७ लाखापर्यंतचे काम झालेले आहे. तरतुद केलेली रक्कम खर्च झालेली नाही तेव्हा या कासाठी आवश्यकता भासल्यास तर करता येइल तसेच मौलाना अब्दुल कलाम आझाद मेमोरीयलसाठी आवश्यक ती जागा अद्याप उपलब्ध झालेली नाही या बाबत जागा निश्चित झाली तर सुधारीत अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येइल.

श्री. मोहसिन अहेमद : सिकंदर अली वज्द मेमोरीअल साठी अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे. तरतुद केलेली रक्कम खर्च करणे अथवा न करणे हा प्रश्न या ट्रस्टचा आहे. मागील ९३-९४ अर्थ संकल्पातही या कामासाठी तरतुद करण्यात आली होती, त्याच प्रमाणे या अर्थसंकल्पातही टोकण रकमेची तरतुद करण्यात यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सिकंदर अली वज्द मेमोरीयल करिता अर्थसंकल्पात टोकण रकमेची तरतुद करणे आवश्यक आहे. या विषयी तशी चर्चाही झालेली आहे. बन्सिलालनगर येथील इमारतीत मौलाना अब्दुल कलाम आझाद मेमोरीयल सुरु करण्याची तरतुद झालेली आहे. प्रशासनाने महापालिकेमध्ये समाविष्ट झालेला १८ खेडयांच्या विकासासाठी जी तरतुद केली होती त्यात स्थायी समितीने कपात केली आहे. हे योग्य नाही, ग्रामीण भागाचा विकास झाला पाहिजे या शिवाय महापालिका पदाधिकाऱ्यांनी निमंत्रीत केलेल्या परिषदेस हजर राहण्यासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतुद करणे आवश्यक आहे, त्यासाठी किमान रु. ५ लाखाची तरतुद करण्यात यावी. नारेगांव येथील विद्युत प्रकल्पासाठी या भागात कचरा वाठणे आवश्यक आहे या सर्व बाबींवर पुन्हा विचार करण्यासाठी आज सभा पुढे ढकलण्यात यावी, व सर्व सभासदांची समन्वय बैठक कोऑर्डीनेशन मिटिंग घेण्यात यावी. अर्थसंकल्पात नगरसेवकांच्या स्वेच्छा निधिसाठी १.५० लाखाची तरतुद केलेली आहे ही रक्कम कमी आहे तेव्हा १.५० ऐवजी २ लाख नगरसेवक स्वेच्छा निधिची तरतुद करण्यात यावी अशा प्रकारच्या अनेक बाबींवर विचार विनिमय करण्यासाठी वेळ मिळावा म्हणुन आजची सभा पुढे ढकलण्यात यावी. अर्थसंकल्पात जकात करा पोटी ८ कोटी रुपयाची तरतुद कशी

करण्यात आली याचा खुलासा व्हावा वर्षभरात आठ कोटी रुपयांची वसुली होइल का? तरतुद केलेली रक्कम वसुल व झाल्यास जनतेत हसु होइल.

मा. आयुक्त : जकात कराचा अपेक्षित ३० कोटी रकमेत ३०% वाढ होइल असे निर्धारीत धरुन तरतुद केलेली आहे त्या नुसार जकात करात कोणतीही वाढ केलेली नाही. महाराष्ट्र डीस्टीलरी कंपनी विरुध्दचा जकात करा बाबत दावा महापालिकेने उच्च न्यायालयात जिंकला आहे. म्हणजे एक कोटी उत्पन्न दरवर्षी वाढणार या प्रकरणात महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केलेले आहे. अद्याप पर्यंत या प्रकरणी न्यायालयाकडुन काहीही कार्यवाही झाल्याचे महापालिकेला कळविण्यात आलेले नाही वरील बाबींचा विचार करता ४९/८ (महाराष्ट्र डीस्टीलरी कडील) -४९ अशी तरतुद होते तथापी अर्थ संकल्पात ४७ ची तरतुद केलेली आहे कोणत्याही प्रकारचे अर्थसंकल्प तयार करतांना टॅक्स विचारात घेऊन रिसीष्ट दाखवली जाते.

श्री. मनमोहसिग ओबेरॉय : मा. आयुक्तांचा खुलासा विचारात घेता तशी जकात कराच्या वाढी बाबत शासनाची मंजुरीची आवश्यकता आहे. शासनाची मंजुरी बाबत मा. महापौर यांनी सभागृहास ठोस असे अश्वासन द्यावे यात नागरिकांच्या निवेदनाचाही विचार करणे आवश्यक आहे.

श्री. कचरु नवपुते : जालना रोडचे रुंदीकरण व्हावे अशा प्रकारचा ठराव या पुर्वीच्या लोकप्रतिनिधीच्या काळात मंजुर झालेला आहे. परंतु या अर्थ संकल्पात जालना रोड रुंदीकरणाबाबत कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही या शिवाय या अर्थसंकल्पात रासायनिक खतांसाठी किंमतीवर जकात आकारणीचा प्रस्ताव आहे त्या ऐवजी वजनावर जकात कर आकारणी केली तर योग्य होइल तसाच प्रकार कपासी बाबत आहे याचा विचार करावा.

मा. आयुक्त : जालना रोड सार्वनिक बांधकाम खात्याचे ताब्यात हा रस्ता महापालिकेकडे हस्तांतर झालेला नाही या रस्त्याची मुळ रुंदी जो पर्यंत हा रस्ता हस्तांतर करुन घेणे योग्य होणार नाही. यासाठी किमान ४ कोटी खर्च येइल.

श्री. नरेंद्र पाटील : मा. आयुक्तांनी गेल्या दोन वार्डात नविन योजना राबविल्या त्याबद्दल त्यांचे अभिनंदन शहराच्या नागरिकांना ज्या सुविधा दिल्या जातात त्यासाठी किमान ३० ते ३५% डी कीसिएट देतो याचा विचार करता काही काळ सौदर्याकरणाचे काम बंद ठेवणे योग्य होइल. यामुळे आज शहरातील नागरिकांना भरपुर व योग्य प्रमाणात पाणी पुरवठा करण्याची गरज आहे. आज शहरात जायकवाडी जलाशयातुन पाणी पुरवठा होत आहे. गेल्या दोन दिवसात सिडको भागात पाणी नाही, तेव्हा या एकाच पुरवठयावर महापालिकेने अवलंबुन न राहता पाणी पुरवठयाच्या दृष्टीने नविन उपाय योजना राबवावी. यासाठी अर्थसंकल्पात तरतुद दिसुन येत नाही, यासाठी सध्याच्या साम व हर्सुल तलावाची योग्य दुरुस्ती केली तर महापालिकेकडे स्वतःचा पाण्याचा साठा वाढण्यास मदत होइल गेल्या सहामहिन्यापुर्वी शहराच्या पुरवठयाच्या दृष्टीने सर्व्हे करुन पाणलोट प्रकल्प उभारण्यात येइल अशी घोषणा सभागृहात करण्यात आली होती तरीपण या अर्थसंकल्पात तशी कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसुन नाही, महापालिकेने गेल्या दहा वर्षाच्या काळात स्वयंरोजगारावर बरीच रक्कम खर्च केलेली आहे यातुन महापालिकेला काय साध्य झाले या योजनांचा दुरुपयोग झाला चालु अर्थ संकल्पातही या योजनेसाठी बरीच तरतुद आहे.

तेव्हा आता पर्यंत स्वयंरोजगार योजना बाबत प्रशासनाने काय काय कार्यवाही व प्रकल्प हाती घेतले याचा अहवाल सभासदांना द्यावा, शहरातील वाढती रहदारी लक्षात घेता अरुंद रस्ते रुंद करणे अत्यंत आवश्यक आहे या अरुंद रस्त्यावर अपघात झाला तर त्या त्या भागातील नगरसेवकांना अशा वेळी नागरिकांच्या समोर जावे लागते. अशावेळी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याचा आहे का महापालिकेचा याचा विचार नागरिक करत नाही याशिवाय माझे सहकारी मित्र यांनी सुचविल्याप्रमाणे मौलाना अब्दुल कलाम आझाद यांचे नांव बन्सिलाल नगर येथे महापालिकेतर्फे उभारण्यात येणाऱ्या वाचनालयास देणे योग्य होइल.

श्री. अब्दुल रशिदखान (मामु) : स.सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांचे सुचनेस अनुमोदन दिले.

मा. आयुक्त : सौदर्यीकरणाबाबत या अर्थसंकल्पात कोणतीही तरतुद नाही यासाठी शासनाकडुन जो १० कोटीचा निधी येणार आहे त्या बाबत दिलेल्या सुचीप्रमाणे तरतुद केली आहे. दुसरा मुद्दा असा की, महानगरपालिकेची स्वयंरोजगार योजना नाही तर शासनाच्या नेहरु रोजगार योजना आहेत यासाठी सबसीडी मिळते व बॅकेमार्फत कर्ज दिले जाते या शिवाय पानलोट क्षेत्राबाबत सर्वेकरण्याचा जो मुद्दा आहे. त्या बाबत संबंधीत विभागास विनंती करण्यात आली आहे. सर्व्हे करणे, त्यानुसार अंदाजपत्रक तयार करणे, शासनाची मंजुरी घेणे या बाबींसाठी लागणारा वेळ विचारात घेता यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतुद या वर्षी करणे योग्य होणार नाही.

श्री. नरेंद्र पाटील : स्वयंरोजगार बाबत मा. आयुक्तांनी जो खुलासा केला त्या बाबत मला असे सुचवायचे आहे की, महापालिका स्टाफ वर जो खर्च करतो, जे कर्ज घेतो किंवा देता त्यातुन काय निष्पन्न होते या विषयी मला माहिती हवी आहे. सौदर्यीकरणासाठी जो खर्च, तो खर्च त्या कामासाठी न करता पाण्या सारख्या ज्वलंत प्रश्नावर खर्च केला तरी काही हरकत नाही.

मा. आयुक्त : सौदर्यीकरणावर गतवर्षी फक्त पाच लाख रुपये खर्च झाले आहेत आणि या रकमेतुन पाण्याचा प्रश्न सुटेल असे नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : सौदर्यीकरणाबाबत आमचे काहीही म्हणणे नाही. पण एक दिवस जर पाणीपुरवठा झाला नाही तर त्याचा परिणाम २ ते २.५ लाख नागरिकांना सोसावा लागतो, या बाबींचा विचार करत पाणलोट क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने विचार झाला आहे त्यास वेळ लागेल असा आता सभागृहात खुलासा झाला तेव्हा नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटावा या साठी या भागात २/४ मोठया विहीरी खोदल्यातर त्याचा उपयोग होइल. सिडको भागातील नागरिकांची पाण्याची गरज पुर्ण करा सौदर्यीकरण व इतर विकास कामांना आमचा विरोध नाही. पण त्याच पैशात सिडको हडको भागात ग्रामीण भागात ज्या प्रमाणे शासन विहीरी खोदते त्या प्रमाणे ४/५ विहीरी खोदण्यासाठी तरतुद अर्थसंकल्पात करण्यात यावी. अन्न,पाणी, निवारा या महत्वाच्या बाबी आहेत याचा विचार करता पाण्यासाठी बजेटमध्ये तरतुद करण्यात येइल असे मला वाटते. आज सिडको भागातील संपवेल मध्ये एक बकेटही पाणी नाही. टँकर उभे आहेत तेव्हा विहीरी खोदल्यास हा पाण्याचा प्रश्न सुटेल असे मला वाटते.

श्री. प्रदिप जैस्वाल : स. सदस्यांनी पाण्याविषयी जो प्रश्न उपस्थित केला त्या विषयी खुलासा करण्यात येतो की, स्थायी समितीने महापालिका पाणलोट क्षेत्रात

वाढ करण्याच्या दृष्टीने फुलंब्री आदी भागात सर्व्हे केलेला आहे या पाहणीत गॅस्टीने शहरात पाणीपुरवठा होइल अशी कोणती जागा नसल्याचे संबंधीत अहवालात नमुद केले आहे.

श्री. काशीनाथ कोकाटे : सभापती यांनी सुचविल्याप्रमाणे पाण्यासाठी प्रशासन लोकप्रतिनिधी यांचे खुप प्रयत्न होत आहेत या बाबत आमचे दुमत नाही पण सिडको/हडको भागातील काही विहीरीस चांगले पाणी लागले आहे. या विहीरी रुंद करणे व त्यांची खोली वाढविणे याचा विचार करावा म्हणजे पाण्याचा प्रश्न काही अंशी सुटेल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : पान १८ वर हॉटेलचे वर्गिकरणाबाबत तरतुद करण्यात आली आहे हे काम एक महिन्यात पुर्ण झाले पाहिजे. तसेच स्मशान भुमीबरोबरच ग्रेयार्डचा विकास करण्यात यावा. स्लम भागाच्या विकासासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली असली तरी या भागातील रस्ते तयार करतांना अनेक गरिब नागरिकांच्या घराच्या भिंती व इतर भाग तोडावा लागेल असा तोडलेला भाग बांधुन देण्यासाठी अर्थ संकल्पात तरतुद करण्यात यावी. त्या शिवाय स्लम भागाचा विकास साध्य होणार नाही. स्लम भागाच्या विकासासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतुद करण्यात आली आहे या बाबत मा. महापौर स्थायी समिती सभापती आणि मा. आयुक्त यांचे अभिनंदन करण्यात येते.

मा. आयुक्त : अनाधिकृत वसाहती बाबत जी तरतुद केली आहे, त्या विषयी सिडको विभागाचे अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली आहे त्यांचेकडुन ना हरकत प्रमाणपत्र मिळेल. स्लम भागाच्या विकासाबाबत स्थायी समितीत तशी चर्चा झाली आहे. स्लम भागातील १/२ रुस्त्याचा विकास करावयाचा झाल्यास अंदाजे सात लाख खर्च येइल अशी माहिती मिळाली आहे त्याच प्रमाणे सर्व शहरातील स्लम भागाच्या रस्त्यांचे विकासासाठी किती खर्च येइल याचा आराखडा सभागृहापुढे ठेवावा लागेल त्यानंतरच यावर विचार करावा लागेल या बाबत सविस्तर प्रस्ताव पुढील सभेत मांडला जाइल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मा.आयुक्त यांची सुचना योग्य आहे तरी पण स्लम भागाचा विकास झाला पाहिजे आणि त्यासाठी इतर योजना प्रमाणे या कामासाठी काही ना काही तरतुद या अर्थ संकल्पात करणे आवश्यक आहे खेळ व इतर बाबीही आल्या पाहिजेत त्याच बरोबर थोडीफार आकडेवारी बदलुन या कामासाठीही तरतुद करण्यात यावी अशी विनंती आहे.

सौ. लता दलाल : अंदाज पत्रकाचवे पुस्तक छापतांना सभागृहनेता यांचे फोटो बरोबर मा. बाळासाहेब ठाकरे यांचाही फोटो यात आला आहे. या बाबत संबंधीत विभागाने दक्षता घ्यावयास हवी होती. कुठल्याही फोटोचा अपमान होऊ नये अशी सुचना आहे.

मा. आयुक्त : ज्या पुस्तकात फोटो वगैरे आलेला असेल ते पुस्तक बदलुन देण्यात येइल.

सौ. लता दलाल : पान नं. २२ पाणी पुरवठा या सदरात इतर किरकोळ खर्चासाठी ६० लाख रुपयाची तरतुद दाखविली आहे. तो किरकोळ खर्च कोणता याचा खुलासा व्हावा. तसेच सुलभ सौचाल्यासाठी जी ३५ लाख रुपयाची तरतुद आहे त्यात वैधानिक विकास मंडळाकडुन मिळणाऱ्या २५ लाखाचा समावेश आह किंवा नाही याचा खुलासा व्हावा. पान २३ वर नाल्यातील गाळ काढण्यासाठी पाच लाखाची तरतुद दाखविली आहे सन १९८१/८२ पासुन

महापालिकेने विविध भागात तिवर लाइन टाकण्याचे जे काम केले त्याचा गाळ नाल्यात तसाच पडुन आहे नाले सपाट झाले आहेत पावसाळयात नाल्यास पाणी आल्यास ते कडेवर असलेल्या घरात घुसण्याची शक्यता आहे. तेव्हा कामासाठी पाच लाखाची तरतुद पुरेल काय? याचा विचार करणे आवश्यक आहे त्यात वाढ करण्यात यावी. अर्थसंकल्पात स्मशान जोगी यांना घरे बांधुन देण्याची योजना आहे. या बाबतच्या माहितीनुसार स्मशान जोगी यांना कायम स्वरुपी नौकरी नाही तेव्हा त्यांना कायम करुन नंतरच घरे देण्यात यावी. पान क्र. २८ वर त्यांना रुंदीकरणाबाबत जी नांव दिलेली आहेत त्याच प्रमाणे बलवंत मोफत वाचनालय ते गुलमंडी हा रस्ताही अत्यंत रहदारीचा असुन सन ७५ मध्ये या रस्त्याचे संपादनास मंजुरी मिळाली आहे. वरील रस्त्या बरोबर या रस्त्याचे विकास बाबत अर्थसंकल्पात तरतुद करावी. पान २९ वर रेल्वे फुट क्रिडासाठी महापालिका फंडातुन ७० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. त्या ऐवजी या कामासाठी केंद्र शासनाकडुन अनुदान मागविण्यात यावे व ही रक्कम (महापालिकेची) इतर विकास कामासाठी वापरण्यात यावी पान ३९ वर वरील नोंदी नुसार इयत्ता चौथी पर्यंतच्या २८० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ऐवजी चौथी बरोबरच इयत्ता ७ वी पर्यंत ३०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची तरतुद करावी पान क्र. ३२ वरील खुलासा प्रमाणे फक्त स्लम भागात नव्हे तर सर्वच शहरात अभ्यासिका सुरु कराव्यात शहराच्या इतर भागातील गरिब विद्यार्थी राहातात. वरील सर्व सुचनांचा सभागृहाने विचार करुन त्या अमलात आणाव्यात अशी विनंती आहे.

मा. आयुक्त स. सदस्या सौ.लता दलाल यांच्या मुद्दा बाबत खुलासा सुलभ शौच्यालयासाठी तरतुद करण्यात आलेल्या ३६ लाखपैकी २५ लाख रुपये हे वैधानिक विकास महामंडळाकडुन मिळणारे अनुदान राहील. पाणी पुरवठयाच्या किरकोळ खर्चातील ६० लाख रुपयाच्या तरतुदीतुन पाईप बदलावे दुरुस्त करणे अशी कामे हाती घेतली जातील. नाल्यातील गाळ काढण्याच्या पाच लाख रुपयाच्या तरतुदीत आवश्यकता पडल्यास वाढ करता येइल तसेच रस्ता रुंदीकरण या सदरात पाचच जी नावे दिली असली तरी इतर कोणतेही विकास रस्त्याचे काम करता येइल ही पाच नावे उदा. म्हणुन दिली आहेत. रेल्वे फ्रुटलीनसाठी केंद्राकडुन मदत मिळणार नाही या बाबत अनेक वेळा पत्र व्यवहार केलेला आहे अभ्यासिका फक्त स्लम भागातच असा अर्थ नसुन ज्या भागात गरिब विद्यार्थी राहतात त्या भागात अभ्यासिका असा त्याचा अर्थ आहे चौथी नंतर हुशार विद्यार्थ्यांनी महापालिका शाळेतच शिक्षण घ्यावे म्हणुन चौथी नंतर इयत्ता ५,६,७ या वर्षासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. सातवी नंतरचे वर्ग महापालिका शाळेत नाहीत त्यामुळे त्याचा फायदा होणार नाही. ८ वी, ९वी १० वीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे पण त्यास मान्यता मिळालेली नाही. पाठपुरावा करावा लागेल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मा. आयुक्तांनी खुलासा केल्याप्रमाणे ८ वी ९ वी १० वीच्या वर्गांना शासनाची मंजुरी मिळविण्या बाबत मा. महापौरांनीही सभागृहात आश्वासन द्यावे व मंजुरी मिळवावी अशी विनंती आहे. आम्ही त्यांना पुर्ण सहकार्य देवु वेळ पडल्यास उपोषणही करण्याची आमची तयारी आहे.

श्री. विखारोद्दीन : पान २९ चा रेल्वे फ्रुटलिनसाठी अंदाजपत्रकात तरतुद आहे त्याच प्रमाणे ओव्हर ब्रीज आणि मौलाना अब्दुल कलाम आझाद मेमोरीयलसाठी किती एकुण रकमेची तरतुद केली याचा खुलासा व्हावा. तसेच ग्रे गार्ड आणि किती रकमेची तरतुद केली आहे.

मा. आयुक्त : रेल्वे ओव्हर ब्रीज बाबत माहे सप्टेंबर ९५ मध्ये जी कॅबीनेट मिटींग झाली त्यात यावर चर्चा झाली त्यावेळी हे काम खाजगी कंपनीला देण्यात यावे असे ठरले हे काम पी डब्ल्यु डी विभागाकडे दिलेले आहे. संबंधीत विभाग या बाबत कार्यवाही करीत आहे.

श्री. मोहसिन अहेमद : मौलाना अब्दुल कलाम आझाद मेमोरीयल साठी ९२-९३ ते ९४-९५ च्या अर्थ संकल्पात पाच लाखाची तरतुद करण्यात आली होती त्याची प्रत सभागृहास देत आहे. याशिवाय रोषनगेट भागात स्टेडियम तयार करण्याचा ठराव मंजुर झालेला आहे पण अर्थ संकल्पात या बाबत तरतुद करण्यात आलेली नाही यासाठीही तरतुद करण्यात यावी तसेच मालमत्ताचा सर्व्हे करण्यासाठी सीटी सर्व्हे खात्याकडे जमा करावयाची रक्कम महापालिका व सिटी सर्व्हे ऑफिस यांचे जॉईट अकांऊट मध्ये ठेवण्यात यावी यामुळे महापालिकेस व्याज मिळेल लॅड रेकॉर्ड विभागाला द्यावयाचे तिन लाखा बाबतही असे जॉइन्ट अकाऊन्ट ठेवण्यात यावे हा पैसा एकाच वेळी खर्च होणर नाही म्हणुन ही सुचना आहे.

मा. आयुक्त : शहरातील ५० हजार मालमत्तांचा सर्व्हे झालेला नाही यासाठी लागणारा कर्मचारी वर्गावर १ कोटी खर्च येणार आहे त्यासाठी कर्मचाऱ्यावर होणारा खर्च जमा केल्या शिवाय कर्मचाऱ्यांची पदे भरण्यास शासन मंजुरी देत नाही ही रक्कम राज्य शासनाकडे जमा होते त्यामुळे जॉइन्ट अकाऊटचा प्रश्न येत नाही. ही रक्कम तीन हप्त्यात भरावयाची आहे त्या प्रमाणे रेकॉर्ड विभागातर्फे आवार्ड जाहिर होते त्याच वेळी जमिन मालकास द्यावयाची रक्कम त्या विभागाकडे दिली जाते.

श्री. स.अली : स. सदस्य नवपुते यांनी सुचविल्याप्रमाणे महानगरपालिका जालना रोड ताब्यात का घेत नाही हा रोड व्ही आय पी रोड आहे हा रोड महापालिकेच्या ताब्यात नसल्यामुळे माझे वार्डातील विकास कामांना पाणी पुरवठा लाइनच्या कामात अडथळा निर्माण होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग या रस्त्यावरुन क्रॉसपाईप लाइन टाकण्यास परवानगी देत नाही. तेव्हा रोड च्या कामावर खर्च करणे ही त्यांची वैयक्तिक बाब आहे तेव्हा दर वर्षी प्रमाणे याही वर्षी या कामासाठी पाच लाखाची तरतुद करण्यात यावी. तसेच गुलमंडी ते सिटी चौक पर्यंतच्या रस्त्याचे कामाबाबत सुप्रिम कोर्टाचा निकाल आल आहे. तसेच आवार्ड ही मंजुर झालेला आहे. मग हे काम हाती का घेतले जात नाही. दिवसेंदिवस या रस्त्यावरील रहदारी वाढत आहे. याबाबत कोणतीही तरतुद अर्थसंकल्पात नाही. लोकांच्या हिताच्या दृष्टीने या रस्त्याचे कामासाठी तरतुद करण्यात यावी.

मा. आयुक्त : जालना रोड बाबत यापुर्वीच खुलासा झालेला आहे. भुमिसंपादन या सदरात जी तरतुद केलेली आहे त्यातुन ज्या भागाचे आवार्ड मंजुर झालेले आहे. त्या भागाची काम यातुन करता येतील.

श्री. म. मुस्ताफ अहमद : भुसंपादनासाठी ३ कोटीची तरतुद केली आहे त्यातुन २.५ कोटी चे आवार्ड मंजुर झाल्याचे म्हटले आहे. फक्त ५० लाख रुपये उरतील ही

रक्कम पुरे होइल का? आताच खुलासा केल्याप्रमाणे रोषनगेट येथील भुमिसंपादन व इतर काम ही रक्कम अपुरी पडेल म्हणुन रोशनगेट स्टेडीयमसाठी स्वतंत्र तरतुदी करावी व भुसंपादनासाठी आणखी ५० लाखाची तरतुद करावी.

श्री. मोहसिन अहेमद : स. सदस्य श्री. मुस्ताफ अहमद यांचे सुचनेशी मी सहमत आहे.

मा. आयुक्त : स. सदस्यांनी जादा तरतुद करण्याबात ज्या सुचना केल्या आहेत त्या बाबत सभागृह निर्णय घेइल.

श्री. नरेंद्र पाटील : पान १३ वरील जकात करा बाबतचे जे ॲटम आहेत त्यात पुर्वीच्या कर पध्दती ऐवजी टक्केवारी जकात कर वसुली बाबत मा. सभापती यांचे अथिनंदन पान ९६ वरील मालमत्ता कर भरणा बाबत जो सुट दिली आहे ती अडचणीची वाटते त्याऐवजी सहा महिन्याच्या आत व सहा महिन्यानंतर सुट देण्याचे दोनच भाग करावेत ६ महिन्यानंतर कर भरला तर ५ किंवा १० करावा ६ महिन्यापुर्वी हप्ता भरणाऱ्यांना जास्तीत जास्त सवलत द्यावी पुर्वी ट्रंझीट फी रु १० ऐवजी २० करण्याचा प्रस्ताव या पुर्वीच सुचवला होता पण स्थायी समितीने तो कर रु १५% केला आहे ट्रांझीट फी वाढविल्यामुळे त्याचा बोजा नागरिकांवर न पडता ट्रक धारकांवर पडणार आहे त्यामुळे ट्रांझीट फी रु २०% करण्यात यावी. या मुळे महापालिका उत्पन्नास भर पडेल तसेच सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे महाराष्ट्र डीस्टीलरी विरुध्दची केस आपण जिंकली आहे.

तर ही आठ कोटी महापालिकेस मिळणार आहेत का? याचा खुलासा व्हावा. सिडकोचे हस्तांतर अद्याप झालेले नाही किंवा तसा उल्लेख यात नाही. पान १८ प्रमाणे हॉटेलची वर्गवारी करतांना ग्रेड नुसार ३%,२%,१%, असा प्रस्ताव सुचवावासा वाटतो फरक कमी करावा पान २० वरील नोंदी प्रमाणे मराठवाडा विकास मंडळाकडुन २५ लाख वसुल झाले किंवा नाही या बाबत खुलासा व्हावा पान २८ नुसार तारांगण/ विज्ञान केंद्र रोपवे या सारख्या योजनांची आज गरज नाही या बाबत जी दोन वर्षाची मुदत दिली आहे ती मुदत सहा वर्षाची करावी सहा वर्षाची करावी म्हणजे महापालिकेवर आर्थिक भार पडणार नाही. पान २९ नुसार मयुझीयम साठी जी तरतुद केली आहे त्यात मुझियम म्हणजे नेमक काय आणि त्यात कोणत्या वस्तु ठेवणार याचा खुलासा व्हावा पान १३ नुसार डीव्हायडर साठी तरतुद केली आहे पण शहराचा प्रत्येक रस्त्यावर वेगवेगळया प्रकारचे डीव्हायडर दिसतात ते एकाच प्रकारचे असावेत.

मा. आयुक्त : महाराष्ट्र डीस्टीलरी विरुध्द महापालिकेने उच्च न्यायालयातील केस जिकली आहे उच्च न्यायालयाने प्रकरणी दोन महिन्याची मुदत दिली आहे त्याची मुदत २३ मार्च रोजी संपत आहे महापालिकेने सुप्रिम कोर्टात कॅव्हेट दाखल केले आहे वैधानिक विकास मंडळाचे चेअरमन यांनी २५ कोटीच्या अनुदानाबाबत आश्वासन दिलेले आहे, त्यामुळे ही रक्कम मिळण्यास काही अडचण नाही. बाकी मुद्दे सभागृहाच्या विचाराधिन आहेत.

श्री. गजानन बारवाल : अर्थ संकल्पात कचरा वाहतुकीसाठी सायकल रिक्शा खरेदीसाठी तरतुद करण्यात आली आहे त्या ऐवजी ऑटो रिक्शा च वापर करणे सोईचे होइल असे वाटते त्यासाठी १० सायकल रिक्शा ऐवजी ६ ॲटोरिक्शा खरेदी करण्यात याव्यात. ॲटोरिक्शा वापरने सर्व दृष्टीने सोइचे होइल या शिवाय

शालेय इमारतीच्या बांधकामासाठी जी तरतुद करण्यात आली आहे त्या मध्ये क्रांती चौक वार्डात शाळेची इमारत बांधण्याचा कोठेच उल्लेख आलेला नाही या वार्डात शाळेसाठी भरपुर जागा उपलब्ध आहे रेल्वे स्टेशन ते क्रांतीचौक या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे पंचवटी येथील चौकात महाराण प्रताप यांचा पुतळा उभारणेबाबत यापुर्वीच सुचना केलेली आहे. पण अर्थ संकल्पात पुतळा उभारणेसाठी तरतुद करण्यात आलेली नाही त्यासाठी आवश्यक ती तरतुद करुन महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्यात यावा शहरातील विविध विकास कामा बरोबरच वाचनालय/समाजमंदिर मंगलकार्यालय या बाबींचीही जनतेला नितांत गरज आहे. ही बाब लक्षात घेता समाजमंदिर वाचनालय यासाठी ठेवण्यात आलेल्या तरतुदीत वाढ करण्यात यावी. या शिवाय शहरात एकही खुले मंगल कार्यालय नाही. खुले मंगल कार्यालयाची शहरासाठी फार मोठया प्रमाणात आवश्यकता आहे. त्यासाठी लागणारी जागा क्रांती चौक वार्डात मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे तसेच अभ्यासिका/व्यायाम शाळा यासाठी जादा तरतुद करणे आवश्यक आहे. या अभ्यासिका मध्ये सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध होतील अशी व्यवस्था करण्यात यावी. डीपीडीसी फंडातुन व्यायामशाळा तयार करण्यात येत असव्या तरी महापालिकेतर्फे प्रत्येक व्यायामशाळेसाठी रु ५ लाख तरतुद करावी व त्यातुन शाळेसाठी लागणारे साहित्य खरेदी करावे या शिवाय सिमेंट, लोखंड खरेदी साठी करण्यात आलेली तरतुद अपुरी वाटते. मागील वर्षाचे काळात अनेक गुत्तेदारांना सिमेंट, लोखंड बाजारातुन खरेदी करावे लागले अशी वेळ पुन्हा येऊ नये म्हणुन साठा खरेदीसाठी जादा तरतुद करण्यात यावी.

मा. आयुक्त : अर्थ संकल्पात शाळा बांधकामासाठी विस्तृत (बॉ प्रोव्हीजन) तरतुद केलेली आहे त्यातुन आवश्यक त्या शाळा बांधता येतील समाज मंदिराचा बऱ्याच ठिकाणी दुरुपयोग होतो त्यावर काळजीपुर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. शहरात आज ३५ समाज मंदिर आहे त्यापैकी काही उल्लेख आलेला असला तरी त्यावर इंजिन राहाणार आहे, म्हणजे ही रिक्शा ऑटो रिक्शा सारखीच राहणार आहे अभ्यासिका सुरु करणे या बाबत खुलासा असा की, यामध्ये स्पर्धात्मक परिक्षा साठी जी पुस्तके लागतील ती सुध्दा ठेवण्यात येतील असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. व्यायाम शाळा या आमदार निधीतुन बांधल्या जात आहेत. त्यातील साहित्यासाठी तरतुद करावी अशी सुचना आहे यावर सर्व साधारण सभेत निर्णय घ्यावा लागेल पुतळे उभारण्यासाठी १० लाखाची तरतुद आहे त्यातुन जे पुतळे मंजुर होतील ते बसवले जातील.

श्री. वसंत देशमुख : औरंगाबाद महापालिका अर्थसंकल्प फक्त या महापालिके पर्यंत मर्यादित नसुन या बाबत अनेक प्रकारची चर्चा होइल या अर्थ संकल्पात अनेक ठिकाणी मुद्रण दोष आढळुन येतात या पुढे त्या बाबत दक्षता घ्यावी अशी सुचना आहे.

या अर्थ संकल्पात विद्युत पोल/डी.पी. यावर भाडे आकारणीचा प्रस्ताव आहे हे जरी मान्य असले तरी या संदर्भाने विद्युत मंडळाशी त्या बाबत काही चर्चा झाली का? माझे माहितीनुसार विद्युत देयकांवर ग्रामपंचायत/नगरपालिका महापालिका यांनी पोलवर आकारणी केल्यास ती आकारणी ग्राहकाकडुन वसुल केली जाइल अशी नोंद विद्युत बिलांवर असते. सध्या देशात विशेषत:

आपल्या राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती आहे याचा विचार करता महापौर चषक व इतर स्पर्धा या साठी करण्यात आलेली तरतुद इतर योग्य कामासाठी खर्च करावी अशी सुचना आहे.

मा. आयुक्त : विद्युत मंडळाचे पोल/डीपी आणि शहरात येणाऱ्या विद्युत प्रवाह या वरील जकात या बाबी नविन आहेत. सर्वच राज्यातील नगरपालिका/महापालिकांनी अशा प्रकारची मागणी केली आहे यावर राज्यशासन विचार करणार आहे. त्यामुळे विद्युत मंडळाकडे विचारणा करण्याचा प्रश्नच येत नाही. या पासुन मिळणाऱ्या उत्पन्नाचा अर्थसंकल्पात समावेश केलेला नाही.

सौ. शकुंतला धांडे : पान न. ४० वर अपंग परित्यक्ता यांच्यासाठी जी १ (एक) लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. ती वाढवुन २ लाख करावी आज या सभागृहात २० महिला नगरसेविका निवडुन आलेल्या आहे विशेष म्हणजे महिला विकास वर्ष चालु आहे आणि अशा वेळी अपंग परित्यक्ता महिलांचे पुनर्वसनासाठी अर्थसंकल्पात काहीच तरतुद नसणे योग्य नाही यासाठी महापालिकेने २ लाखाची तरतुद करावी.

मा. आयुक्त : युबीएसपी हा कार्यकम पुर्णतः महिलांनी राबविण्याचा कार्यक्रम आहे या कार्याक्रमात विशेष लक्ष देण्यात येणार आहे यातुन महिलांसाठी भरपुर कार्य होणार आहे/यातुन खडु/झाडु /फिनेल या युबीएसपी योजनेतुन महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहेत यात विशेषतः खडु/झाडु/ फीनेल अशा प्रकारच्या वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे आणि या वस्तु महिलांकडुनच खरेदी करावयाच्या आहेत यातुन फार मोठया प्रमाणावर उलढाल होणार आहे.

सौ. लता दलाल : आज सभागृहात २७ महिला नगरसेविका आहेत किमान २७ महिला नगरसेविकांच्या वार्डातुन कमीत कमी १५ महिलांना प्रशिक्षण द्यावयाचे झाल्यास अर्थसंकल्पातील तरतुद कमी पडेल असे वाटते.

मा. आयुक्त : युबीएसपी या योजनसाठी स्वतंत्र तरतुद करणे आवश्यकता नाही. युबीएसपी म्हणजे महिलांना ठराविक उद्योगासाठी तयार करणे यातुन महापालिका ज्या वस्तु खरेदी करते उदा. खडु/ड्रेस/या वस्तु याच महिलांकडुन खरेदी करावयाच्या आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात तरतुद कमी असली तरी महापालिकेला या लागणाऱ्या वस्तु खरेदीमुळे प्रत्यक्षात ५० लाखाच्या वर खर्च होणार आहे यातुन प्रशिक्षण अभ्यास दौरे असे कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे.

श्री. सुदाम सोनवणे : या अर्थसंकल्पात सिडको-हडकोतील मालमत्ता कर पाणीपट्टी याचा जमा बाजुत समावेश आहे. परंतु सिडको/हडकोच्या या कराबाबत वाद चालु आहे तेव्हा सिडको/हडको हस्तांतराचा प्रश्न सोडवुन या नागरिकांना ज्या ज्या सुविधा देणे आवश्यक आहे. त्या त्या सुविधा पुरवाव्यात अशी सुचना आहे.

मा. आयुक्त : सिडकोतील मालमत्ता कराची स्वतंत्र मागणी नाही या शहराची मालमत्ता कर मागणी २८ कोटी राहणार आहे वसुली फक्त १० कोटी दाखवली आहे यात सिडको मालमत्ता कराचा समावेश नाही तर अनाधिकृत वसाहती आहेत त्यांना ज्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत त्यात २५% शेअर्सच्या रुपात ४ कोटी रुपये वसुल होणार आहेत सिडको ची मागणी

वजा करुन फक्त ५०% वसुली अपेक्षित आहे. त्यामुळे हस्तांतर आणि अर्थसंकल्पात याचा काहीही संबंध नाही.

श्री. अ.जावेद रज्जाक : पान ३८ वर नविन बगीचे विकसित करण्याचा उल्लेख आहे हे बगिचे कोणत्या जागेवर आहेत याचा खुलासा व्हावा. सभागृहातील बरेच नगरसेवक नव्याने निवडुन आलेले आहेत त्यांना विश्वासात घेण्यात आले नाही या अर्थ संकल्पात ९४-९५ वर्षात किती कामे करण्यात आली किती बाकी आहेत त्याचा या अर्थसंकल्पात समावेश आहे काय? याची या नविन नगर सेवकांना माहिती मिळणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : शासनाकडुन जे १० कोटी अनुदान मिळणार आहे त्यासाठी जी यादी तयार करण्यात आली आहे त्यास स्थायी समितीने मंजुरी दिली आहे, त्या संपुर्ण कामाचाी यादी सर्व स.सदस्यांना देण्यात येइल.

श्री. राजकुमार बचाटे : या अर्थसंकल्पात पाणी प्रश्नाला अग्रक्रम दिल्या बद्दल सर्वांचे अभिनंदन शहरात येणारा पाणी पुरवठा याचा विचार करता शहरातील विहीरीचा गाळ काढणे त्यातुन शहराच्या पाण्याची गरज भागविणे या बाबत अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली नाही, तशी तरतुद करण्यात यावी अशी सुचना आहे. या बाबत अनेकवेळा अधिकाऱ्यांशी चर्चाही केलेली आहे.

मा. आयुक्त : जुन्या विहीरीचा गाळ काढणे त्या स्वच्छ करणे या कामला सुरुवात केलेली आहे काही कामे पुर्णही झालेली आहेत एक दीड महिन्याच्या कालावधीत अशा सर्व विहीरींचे दुरुस्ती करुन त्याचे पाणी शहराला देता येइल. नविन खोदण्याच्या प्रस्तावावरही प्रशासन विचार करीत आहे.

श्री. प्रफुल्ल मालाणी : या अर्थसंकल्पावर विचार करता जवळ जवळ ५५% उत्पन्न हे जकात करापासुन मिळते. या अर्थ संकल्पात जकात करापोटी ४७ कोटी उत्पन्न मिळेल असे दाखविण्यात आले आहे. या बाबत मा. आयुक्तांनी सभागृहात सविस्तर खुलासाही केलेला आहे. यापुर्वी सभागृहात येण्यापुर्वी एक व्यापारी या नात्याने जकात कर रद्द करावा म्हणुन संबंधीतांना अनेक निषेदने दिलेली आहेत पण आज नगर सेवक म्हणुन जकात करा शिवाय महापालिकेचा कारभार चालु शकत नाही ही खात्री पटली आहे. आमच्या मागण्या परत घेतल्या आहेत तरीपण जकात करा बाबत अर्थसंकल्पात जी नविन वाढ दाखविण्यात अली आहे ती ४ कोटीची वाढ रद्द करुन या बाबत जाहिरात बाबतचे जे माध्यम वाढले आहे त्यातुन जाहिरात करात वाढ करुन ही तुट भरुन काढावी जाहिरात करात कोणतीही वाढ यात दर्शविली नाही, यात वाढ केल्यास किमान ५०/६० लाखाचे उत्पन्न वाढेल तसेच मुंबई शहराच्या धर्तीवर बालकणीवर या महापालिकेने कर आकारणी केली तर ज्यातुनही महापालिकेस चांगले उत्पन्न मिळु शकेल आणि पर्यायाने जकात करता जी वाढ सुचविण्यात आली आहे ती वाढ करण्याची शक्यता भासणार नाही असे वाटते तेव्हा या दोन सुचनाचा विचार करता जकात करात दर्शविलेली वाढ रद्द करुन जकात कर पुर्वी प्रमाणेच ठेवावा.

मा. आयुक्त : इतर महापालिकांच्या मानाने या महापालिकेचे जकात उत्पन्न फक्त ५५% इतकेच आहे. इतर महापालिकांमध्ये जकात कराचे उत्पन्न ६०% ते ७०% पर्यंत आहे. जकात कर रद्द करावा किंवा नाही. हा शासनाच्या धोरणाचा प्रश्न आहे. जाहिरात मि. रुपये १.२७ या दराने आकारणी केली जाते हा कर दुप्पट केला तरी यातुन ५ लाखपेक्षा जास्त उत्पन्न मिळेल असे वाटत

नाही. दुसरा मुद्दा म्हणजे बालकणीला कर आकारणी करणे आपल्या राज्यात मुंबई महापालिका, नागपुर महापालिका, कायदे आहेत बालकणीला कर आकारणी करण्याची तरतुद मुंबई महापालिका कायद्यात आहे आपल्या महापालिका कायद्यात तशी तरतुद नाही ही तरतुद आपल्या कायद्यात आहे का याचा विचार करावा लागेल.

श्री. प्रफुल्ल मालाणी : कॅन्टोन्मेंट बोर्डाने जाहिरात कराचे बोर्ड लिलाव पध्दतीने दिलेले आहेत त्यातुन १/१ बोर्ड जवळ जवळ ८/९ हजारा पर्यंत गेले आहेत. महापालिकेने प्रति चौ. मी. ऐवजी लिलाव पध्दतीने जाहिरात फलक देण्याचा विचार केला तर उत्पन्नात भर पडेल.

मा. आयुक्त : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पोलवर लावण्यात येणाऱ्या होर्डींग बाबत महापालिकेने नोटीस दिली होती त्यास स्थगिती मिळाली आहे, त्यामुळे पुढील कार्यवाही थांबलेली आहे.

श्री. जयवंत ओक : या शहरात ६० अधिकृत अनाधिकृत व त्यापेक्षा अधिक असलेल्या अनाधिकृत वसाहती आहेत या वसाहतींना सुविधा पुरविण्याबाबत अर्थ संकल्पात तरतुद नाही. या वसाहती गेल्या २०/२५ वर्षापुर्वी पासुन बसलेल्या आहेत त्यापैकी काही वसाहतीत ड्रेनेज, लाइट, पाणी या सारख्या सुविधा दिलेल्या आहेत. आणि काही वसाहतीत काहीच सुविधा दिलेल्या नाहीत त्या बाबत विचार करण्यात यावा. अर्थसंकल्पात फायर टेंडर खरेदीसाठी १२ लाख रुपयांची तरतुद आहे परंतु शहराच्या काही भागातील रस्ते अत्यंत अरुंद आहेत. जाधवमंडी येथील फायरच्या वेळीही हीच परिस्थिती निर्माण झ ाली होती याचा विचार करता खरेदी करण्यात येणारे फायर टेंडर लहान किंवा मोठे खरेदी करणार याचा खुलासा व्हावा शहरातील अरुंद रस्त्यांचा विचार करता लहान फायर टेंडर खरेदी करण्यात यावे तसेच महापौर चषक या सदरात ज्या पाच खेळाचा उल्लेख आहेत त्यात क्रिकेटच्या स्पर्धाचा समावेश करावा व राज्यातील महापालिकांना क्रिकेट स्पर्धेसाठी निमंत्रित करावे यासाठी जादा एक लाखाची तरतुद करावी.

मा. आयुक्त : अनाधिकृत वसाहतीबाबत १० कोटीच्या अनुदानातुन तरतुद करण्यात आली आहे. यातुन अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा पुरविण्यात येतील दुसरा मुद्दा क्रिकेट खेळाचा असला तरी या खेळास प्रोत्साहन देण्याऱ्या अनेक संध्या आहेत गरवारे स्टेडियमचे उद्‌घाटन मे महिन्यात होइल त्यावेळी एक दिवसीय क्रिकेट स्पर्धा आयोजित करुन उद्‌घाटन करता येइल.

श्री. माहसिन अहमद : अर्थ संकल्पात बरीच चर्चा झाली असली तरी बऱ्याच सदस्यांना आपले विचार अद्याप मांडावयाचे आहे याचा विचार करता आजची उद्याही पुढे चालु ठेवावी अशी सभागृहास विनंती आहे व आजची सभा तहकुब करावी.

श्री. जयवंत ओक स.सदस्य श्री. मोहसिन अहेमद यांचे सुचनेस अनुमोदन स. सदस्यांना अर्थ संकल्पावरील मुद्दा बाबत अभ्यास करण्यासाठी ही सभा तहकुब करुन उद्या घेण्यात यावी.

श्री. गजानन बारवाल : रात्र झाली तरी चालेल ही सभा पुढे चालु ठेवावी अशी माझी विनंती आहे.

श्री. वसंतराव देशमुख : स. सदस्य श्री. बारवाल यांचे सुचनेस अनुमोदन आहे.

सौ. अलका पाटील : पान ३० वरील नोंदीनुसार गणवेश वाटपासाठी तरतुद केली आहे त्याच प्रमाणे गणित आणि मराठी पुस्तकांचे वाटप केले तर योग्य होइल हे दोन विषय महत्वाचे असुन गरिब विद्यार्थी ही पुस्तके होऊ शकत नाही.

मा. आयुक्त : महापालिकेकडे दोन योजना आहेत त्यापैकी सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना अंतर्गत सर्व मुलींना वही/पाटी/पुस्तक यांचे मोफत वाटप करण्यात येत दुसऱ्या योजने नुसार गणवेश वाटपाची असुन मुलींना त्याचे वाटप होइल.

श्री. काशिनाथ कोकाटे : अर्थसंकल्पावरील बहुतांश विषयाबाबत मा. आयुक्त यांनी खुलासा केला आहे पण ५ विहीरी बाबतचा जो मुद्दा मी मांडला त्या बाबत अद्याप खुलासा झालेला नाही. तेंव्हा सिडको हडको भागातील ५ विहीरी बाबत तरतुद करावी अशी विनंती करतो.

मा. आयुक्त : स. सदस्य यांनी सुचना अमलात आणणे योग्य आहे पण त्या विषयीच्या तरतुदी बाबत सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. नरेंद्र पाटील : स. सदस्य श्री. कोकाटे यांनी फक्त ५ विहीरींची मागणी केली आहे पण प्रत्यक्षात प्रत्येक सेक्टर करिता एक या प्रमाणे १३ विहीरींची तरतुद करावी.

श्री. वसंत देशमुख : अर्थसंकल्पावरील चर्चेत स. सदस्यांच्या प्रश्नांना फक्त मा. आयुक्त उत्तरे देत आहेत. आता पर्यंत मा. महापौर यांनी कुठेही खुलासा केलेला नाही किंवा अश्वासन दिलेले नाही वस्तुत तो अधिकार मा. महापौरांचा आहे. विहीरीचा प्रश्न फक्त सिडको हडको भागापुरता मर्यादित नसुन संपुर्ण शहरातील प्रश्न आहे महापालिकेने १९८७ मध्ये अनेक विहीरी ताब्यात घेतल्या आहेत पाण्याचे परिस्थितीचा विचार करता या विहीरी दुरुस्त करुन ज्या विहीरींचे पाणी पिण्या योग्य असेल ते पाणी त्या त्या भागातील नागरिकांना पुरवावे असे प्रस्ताव अनेक वेळा दिलेले आहेत.

मा. आयुक्त : राज्य शासनाकडुन या बाबत एक योजना आलेली आहे त्या नुसार ज्या ज्या ठिकाणी नविन/जुन्या विहीरीचे काम करावयाचे आहे त्या बाबतची योजना तयार करण्यात येत आहे.

सौ. अलका पाटील : पान १८ नुसार शॉपिंग सेंटर बांधण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे यात काही रक्कम डीपॉझीट म्हणुन घेण्यात येणार आहे यात या शॉपिंग सेंटरला प्रधान्य वार्डातील सुशिक्षित बेकार व ३०% महिलांना व्हायला पाहिजे.

मा. आयुक्त : सध्या टेंडर काढुन दुकाने देण्यात यावे अशी पध्दत आहे यात राखीव दुकान ठेवण्याची पध्दत नाही हा धोरणात्मक निर्णय आहे तो सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा लागेल.

श्री. स.अली मिरा सलामी, श्री. म.मुश्ताफ अहमद : ८२ कोटीचे बजेट आहे बरीच चर्चा झ ाालेली आहे त्या वरील अभ्यासा करिता काही वेळ मिळणे आवश्यक आहे करिता आजची सभा उद्याही पुढे चालु ठेवावी अशी विनंती आहे मुंबई व इतर महापालिकांमध्ये अर्थ संकल्पाची सभा २/३ दिवस चालु असते.

श्री. वसंतराव देशमुख : या सभागृहात मुंबई व इतर महापलिकांचा दाखला दिला जात असला तरी बजेटवर एकाच वेळी चर्चा होणे योग्य ठरेल. यात चर्चा करण्यात खुप वेळ झाला आणि मा. महापौरांना वाटले तरच अशी सभा पुढे दुसऱ्या दिवशी चालु ठेवता येते.

मा. आयुक्त : अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी वेळ आहे ज्या स. सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत आणि ते तयार असतील तर अशा स. सदस्यांना वेळ देता येइल.

मा. महापौर : सर्व स. नगर सेवक, मा.सभापती मा. विरोधी पक्ष यांच्या मागणी विचारात घेता ही सभा उद्या सकाळी ११.०० वाजता पुढे घेण्यात येइल आजची सभा राष्ट्र गितानंतर तहकुब करण्यात येते.

या नंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
मा. नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

## दिनांक १२-३-१९९६ रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

दिनांक. ११-०३-१९९६ रोजी तहकुब करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १२-०३-९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षते कै. केशव सिताराम (प्रबोधनकार ठाकरे) ठाकरे सभागृहात सुरु झाली.

या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.सौ. ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे | उप महापौर |
| २) | मा.सौ. लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | सदस्य |
| ३) | मा.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ४) | मा.श्री. म.सलीम म. हनिफ कुरैशी | --//-- |
| ५) | मा.सौ. जोशी रजनी रमेश | --//-- |
| ६) | मा.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| ७) | मा.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| ८) | मा.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | --//-- |
| ९) | मा.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | --//-- |
| १०) | मा.श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| ११) | मा.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | --//-- |
| १२) | मा.श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १३) | मा.सौ. शिंदे पदमा बाबुराव | --//-- |
| १४) | मा.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| १५) | मा.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | --//-- |
| १६) | मा.श्री. फजलउल्लखॉन अजमतउल्लाखान | --//-- |
| १७) | मा.श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा | --//-- |
| १८) | मा.श्री. महंमद मुश्ताक अहमद | --//-- |
| १९) | मा.सौ. नुरजहाँ बेगम अ. रहेमानखाँ | --//-- |
| २०) | मा.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २१) | मा.श्री. हाजी मोहसिन अहमद हाजी बशीर अहेमद | --//-- |
| २२) | मा.श्री. मुजीब आलमशाह मिर आलमशाह | --//-- |
| २३) | मा.सौ. मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| २४) | मा.श्री. अ.जावेद रज्जाक | --//-- |
| २५) | मा.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| २६) | मा.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| २७) | मा.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | --//-- |
| २८) | मा.श्री. हमिदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --//-- |
| २९) | मा.श्री. स. अहेमद एकबालोद्दीन स.मो. कुतुबोद्दीन | --//-- |
| ३०) | मा.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३१) | मा.श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ३२) | मा.सौ. दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| ३३) | मा.श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| ३४) | मा.सौ. अलका रमेश पाटील | --//-- |
| ३५) | मा.सौ. धांडे शकुंतला हरिदास | --//-- |
| ३६) | मा.श्री. अ. रशिदखान (मामु) | --//-- |
| ३७) | मा.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनाराण | --//-- |
| ३८) | मा.कु. लाडवाणी माया लिंबाजी | --//-- |
| ३९) | मा.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ४०) | मा.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ४१) | मा.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ४२) | मा.श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ४३) | मा.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | --//-- |
| ४४) | मा.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ४५) | मा.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ४६) | मा.श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ४७) | मा.सौ. काळुशे मंदा धनंजय | --//-- |
| ४८) | मा.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ४९) | मा.श्री. नवपुते कचरु चंद्रभान | --//-- |

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने झाली.

संवाद

सौ. रुख्मणबाई लोखंडे : वार्ड नं. १ भावसिंगपुरा येथील कारखान्या बाबत आता पर्यंत जी चर्चा झाली त्या दृष्टीने ९६-९७ च्या अर्थसंकल्पात काय तरतुद केली याचा खुलासा व्हावा. हा करखाना हलविण्यासाठी काय कार्यवाही होणार.

मा. आयुक्त : हाडाचा कारखाना महापालिकेकडे नाही. महापालिकेकडे फक्त कत्तलखाना आहे आणि त्याचे अपग्रेडेशन बाबत अर्थ संकल्पात तरतुद ही केलेली आहे. हाडाच्या कारखान्याबाबत मनाई हुकुम आहे त्यावर चर्चा करता येणार नाही.

श्रीमती जाहेदा बेगम : ४ ते ५ तारखेला संत एकनाथ रंग मंदिर येथे महिलांना जे प्रशिक्षण देण्यात आले आहे त्या बाबतची तरतुद अर्थसंकल्पात आहे काय? याचा खुलासा व्हावा.

सौ. लता दलाल : पडेगांव येथील हाडाच्या कारखान्या बाबत न्यायालयाचा मनाई हुकुम असल्याने तो बंद आहे तो कारखाना तेथुन हटविण्यास किंवा या प्रकरणी न्यायालयाचे कामाकाजा बाबत काही खर्च करावा लागल्यास तो खर्च महापालिकेने करावा आणि भविष्यात हा कारखाना तेथे सुरुच होऊ नये यासाठी प्रयत्न करावे आणि म्हणुन या ठिकाणी आर्थिक तरतुद करावी म्हणजे पुढे अडचण येणार नाही अशी विनंती आहे.

मा. आयुक्त : हाडाचा कारखाना हा खाजगी आहे तर पण या प्रकरणात महापालिकेला पार्टी करुन घ्यावे असा अर्ज दिलेला आहे व न्याया असल्याने महापालिका कोणतीही सेवा देत नाही,

सौ. रुख्मणबाई लोखंडे : हाडाच्या कारखान्याचा प्रश्न जास्त काळ लांबत न ठेवता महापालिकेने जास्तीत जास्त प्रयत्न करुन कार्यवाही करावी अशी सभागृहाला विनंती आहे.

मा. आयुक्त : युबीएसपी ही पुर्ण योजना महिलांसाठीच आहे त्यासाठी अर्थ संकल्पात १० लाखाची तरतुद केलेली आहे यात राज्यशासनाचे ६ लाख अधिक महापालिकेचे ४ लाख असे १० लाखाची तरतुद आहे ही तरतुद फक्त महिलांसाठीच आहे, त्यात प्रशिक्षण/अभ्यास दौरा असे कार्यक्रम आहेत तेव्हा वेगळी किंवा अधिक तरतुद करण्याची गरज नाही.

सौ. अलका पाटील, सौ. जाहेदा बेगम, सौ. बिल्कीस बेगम : महापालिकेच्या सभागृहात अनेक थोर पुरुषांचे तैलचित्र लावण्यात आले आहेत पण या मध्ये क्रांतीकारक महिलांचे एकही तैलचित्र लावण्यात आले नाही. थोर महिला होवुन गेल्या नाहीत का? हा महिलांचा अपमान आहे चॉद सुलताना, रझिया सुलतान या सारख्या थोर महिलांचा विसर का पडत आहे.

मा. आयुक्त : या पुर्वीच्या सभागृहात जे तैलचित्र होते तेच तैल चित्र या सभागृहात लावण्यात आलेले आहेत. त्यावेळी कोणीही असा आग्रह धरलेला नाही.

श्री. नरेंद्र पाटील : या पुर्वीचे सभागृह हे लहान होते. आता सभागृह मोठे आहे तेव्हा या मोठया सभागृहात क्रांतीकारी महिलांचे तैलचित्र लावले जाइल अशी अपेक्षा होती.

सौ. मंदा काळुशे : पान १० वर सिडको भागातील अनाधिकृत वसाहतीसाठी पाणी ४ कोटीची तरतुद अधिकृत वसाहतींची नावे आहेत त्यांची नावे कोणती मागील सर्व साधारण सभेत वार्ड क्र. ७८ मधील राजीव गांधीनगर व इतर वसाहती करिता लोकवर्गणी करुन पाणी पुरवठा करण्याचा ठराव झालेला आहे. त्याच्यासाठी यात तरतुद करण्यात यावी.

मा. आयुक्त : ठराव झालेला असेल तर कार्यवाही सुरु करता येइल.

सौ. नुरजहॉ बेगम, श्रीमती चंपाबाई पांचाळ : ठराव नं. ६५-१४ अन्वये वार्ड क्र. ३० मध्ये वाचनालय बांधण्याचा प्रस्ताव मंजुर झाले आहे. परंतु अर्थ संकल्पात खडकेश्वर व इतर वाचनालयाची नावे आहेत तेव्हा जो ठराव मंजुर झाला आहे त्या बाबत काय याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : अर्थसंकल्पात नाव नसले तरी वाचनालयाचे काम केले जाइल ही ब्लॉक तरतुद आहे या तरतुदीतुन जितकी कामे करणे शक्य आहे ती कामे केली जातील.

श्री. मुलिबखॉन : वार्ड क्र. ३३ मधील वाचनालयाकरिता पुस्तके खरेदी बाबत माझ्या स्वेच्छा निधितील रक्कम खर्च करण्यास मंजुरी मिळाली आहे पण अद्याप पुस्तके खरेदी करण्यात आलेली नाही या बाबत खुलासा व्हावा.

श्रीमती. चंपाबाई पांचाळ : इंदिरानगर बायजीपुरा येथील ड्रेनेज लाइन टाकणेसाठी बसैय्ये यांची खाजगी जागा संपादन करुन खरेदी करण्यात यावी व ड्रेनेज लाइन टाकुन देण्यात यावी, यासाठी अनेकवेळा पत्र देण्यात आलेले आहे सध्या या भागात उघडयावर ड्रेनेजचे पाणी वाहात आहे. या भागातील नागरिकांचे जिवन त्यामुळे धोक्यात आहे.

श्री. जयवंत ओक : स. नगरसेविका यांचा असा प्रश्न आहे की, ड्रेनेज लाइन साठी बसैये यांची खाजगी जागा संपादनासाठी तरतुद केलेली आहे का? महापालिका ती जागा संपादन करणार का?

मा. आयुक्त : भुसंपादनासाठी ३ कोटीची एकत्रित तरतुद आहे यातुन सदर जागा संपादन करता येइल या प्रकरणात संबंधीताने कोर्टाचा मनाई हुकुम मिळवला आहे तरी खाजगीरित्या वाटाघाटी करुन जागा संपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.

सौ. अलका पाटील : वार्ड क्र. ५३ मधील नाल्या बाबत निवेदन दिलेले आहे या नाल्यात नाला ट्रेडिंग बांधण्याबाबत मा. आयुक्त यांचे सोबत पाहणीही करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पाचे तरतुदीतुन नाल्याचे बांधकाम करण्यात येइल का? या नाल्या लगत बरीच लोकवस्ती झालेली आहे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे.

मा. आयुक्त : नाल्या लगतची जागा खाजगी आहे त्यावर नागरिकांनी घेरे बांधली आहेत. नाला ट्रेडिंगचे काम करावयाचे झाल्यास जागा मालक त्या बाबत हरकत घेइल.

श्री. मुजीबखॉन : चंपा मस्जिद ते कलेक्टर ऑफिस या रस्त्यावरील पुल बांधण्याचे काम दोन महिन्यात सुरु करण्यात येइल असे आश्वासन देण्यात आलेले आहे, परंतु अद्याप या पुलाचे काम सुरु झालेले नाही. गेल्या दोन वर्षापासुन हे काम तसेच आहे.

सौ. शकुंतला धांडे : पान ३२ वरील सुचनेनुसार ज्या दहा अभ्यासिका सुरु करण्यात येणार आहेत त्यात आणखी पाच अभ्यासिकांची वाढ केल्यास योग्य होइल तसेच या अभ्यासिका समाज मंदिरात सुरु केल्यास ज्या झोपडपट्टीत समाजमंदिर नाही त्या ठिकाणी काय करणार याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : दोन/तिन झोपडपट्टया मिळुन एक अभ्यासिका अशा प्रकारे प्रायोगिक तत्वावर अभ्यासिका सुरु करण्याचा प्रस्ताव आहे. अशा अभ्यासिका इतर कोणत्याही शहरात नाहीत प्रत्येक वार्डा करिता अभ्यासिका सुरु करणे शक्य नाही. प्रायोगिक तत्वावर सुरु केलेल्या अभ्यासिकांना चांगला प्रतिसाद मिळाला तर पुढे त्यात वाढ करता येइल.

श्री. नरेंद्र पाटील : पान ६ वर १८ खेडयांच्या विकासासाठी ३.२० कोटी तरतुद करण्यात आली आहे. तेव्हा १८ खेडयासाठी कमीत कमी दुप्पट म्हणजे ६.४० कोटी तरतुद करावी असे वाटते पान २० वर १० कोटी शासकीय अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहे हे अनुदान पुढील वर्षात मिळेलच याची शाश्वती नाही. तेव्हा हे अनुदान हे अनुदान प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही कामाला सुरुवात करण्यात येऊ नये. पान २३ वर गाजर गवत व नाले स्वच्छ करणेसाठी पाच लाखाची तरतुद केलेली आहे यात गाजर गवत निर्मुलन म्हणजे निश्चित काय काम करणार याचा खुलासा व्हावा. पान न. २४ वर कचरा वाहतुकीसाठी नविन ट्रक घेण्याचा प्रस्ताव आहे. हया ट्रक घेतांना अशा ट्रक खरेदी करण्यात याव्यात की जेणे करुन एका ट्रकामध्ये तिन ट्रकचा कचरा दाबुन भरता येइल याचा विचार करावा अशा नविन ट्रकची निर्मिती झालेली आहे. अशी माझी माहिती आहे. यासाठी एक ट्रक घेतला तरी चालेल पान २६ वर स्मशान भुमीसाठी ४० लाखाची तरतुद आहे यात फक्त शहरातील स्मशान भुमीचा समावेश असेल तर सिडको भागातील स्मशाभुमी करता आणखी ४० लाखाची तरतुद करण्यात यावी एन- ६ येथील स्मशानभुमीत कोणत्याही सुखसोइ उपलब्ध नाहीत पान ३३ वर गरवारे स्टेडियमसाठी जी तरतुद करण्यात आली आहे. त्यापैकी गरवारे यांचा शेअर किती व

महापालिकेचा शेअर किती आहे तसेच हे स्टेडियम केव्हा पुर्ण होणार आहे पान ३४ यात दुधनगरी स्थापन करण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे. यात शहरातील मोठयांची संख्या किती आहे? याचा विचार केला तरी ही तरतुद अपुरी वाटते. यापुर्वी महापालिकेने कत्तलखाना शहराबाहेर नेलेला आहे. पण प्रत्यक्षात त्याचा उपयोग होत नाही असे दिसुन येते. अशा प्रकारे दुधनगरी शहरा बाहेर गेली तर गोठे शहरात आणि दुधनगरी शहराबाहेर असे चित्र दिसेल तेव्हा यासाठी करण्यात आलेली तरतुद अन्य कामासाठी वापरुन दुग्धनगरी प्रकल्प रद्द करावा, तसेच औषधी खरेदीसाठी जी कमिटी नियुक्त करण्यात आली त्यात लोकप्रतिनिधींचा समावेश असावा.

मा. आयुक्त : स. सदस्य श्री. पाटील यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहे बहुतांश मुदयाबाबत यापुर्वीच खुलासा करण्यात आलेला आहे. अर्थसंकल्पात तयार करतांना आजची स्थिती काय आहे याचा विचार करुन अर्थसंकल्पात तयार केला जातो.

श्री. कचरु नवपुते : स.सदस्य श्री. पाटील यांनी दुग्धनगरी बाबत मुद्दा उपस्थित केला आहे. ज्या ठिकाणी दुग्धनगरी उभारण्यात येणार आहे ती शासकीय जमीन आहे यात बरेच नाले आहेत याचा विचार करता दुग्धनगरी प्रकल्प या ठिकाणी उभारणे महानगरपालिकेला परवडण्यासारखे नाही यामुळे या भागाच्या सभोवतालच्या नागरिकांचे आरोग्य बिघडेल तसेच शेतकऱ्यांनाही त्रास होइल म्हणुन या प्रकरणास माझा विरोध आहे त्यासाठी जादा तरतुद करुन आधुनिक दुग्धनगरी उभारण्यात यावी, तसेच १८ खेडयासाठी जी तरतुद केली आहे त्यात महापालिका अस्तीत्वात येण्यापुर्वी या खेडयांना सर्व सुविधा देण्यात याव्यात तो पर्यंत कर नाही असा बॉड देण्यात आलेला आहे याचा विचार करता १८ खेडयांसाठी वाढीव तरतुद करावी.

श्री. नरेंद्र पाटील : स. सदस्या सौ. लोखंडे ताई यांच्या वार्डात जो त्रास आहे तीच बाब स.स.नवपुते यांना सभागृहासमोर मांडावयाची आहे. या भागातील नागरिकांचे आरोग्य आज खराब झाले आहे. तिच परिस्थिती चिखलठाणची होऊ नये.

मा. आयुक्त : १० कोटीच्या अनुदानाची रक्कम आलेली आहे ही रक्कम पुढच्या वर्षाची नाही ते अद्याप खर्च झालेली नाही ३१ मार्च पर्यंत खर्च पडणे शक्य नाही ते पुढील वर्षी खर्च करण्यात येणार आहेत. शहराच्या विकास आराखडयात ही जमीन दुग्ध नगरीसाठी ठेवण्यात आली आहे. या ठिकाणी दुग्ध नगरी नको असेल तर तसा ठराव घ्यावा लागेल जी योजना तयार करण्यात आलेली आहे ती अधुनिकी करणासह आहे.

सौ. अलका पाटील : पान २० वर जी तरतुद केलेली आहे त्यात ज्या वस्तु ठेवणार आहोत त्यांच्या खरेदीसाठी काही तरतुद केलेली आहे काय?

मा. आयुक्त : संग्रहालयात ठेवण्यात येणाऱ्या वस्तु खरेदी केल्या जात नाहीत त्या बक्षिस म्हणुन दिल्या जातात. गाजर गवताला फुल येण्यापुर्वी ठेके पध्दतीने ते उपटुन टाकणे.

सौ. जाहेदा बेगम : वार्ड क्र. २८ मधील उर्दु शाळे बाबतच्या बजेट बाबत खुलासा व्हावा त्यासाठी स्वतंत्र तरतुद करावी. जेणे करुन शाळेचे काम लवकर व्हावे.

मा. आयुक्त : शालेय इमारतीसाठी १.६० कोटीची तरतुद आहे त्यातुन हे काम करण्यात येइल.

सौ. मोहसिना बिल्कीस : वाचनालयासाठीच्या पुस्तकांची तरतुद करण्यात आली आहे. यातुन नविन पुस्तके खरेदीचा प्रस्ताव आहे पण जुने पुस्तक खरेदी बाबत तरतुद नाही, त्यासाठी स्वतंत्र तरतुद करावी, तसेच शिक्षकांसाठी क्लॉर्टर करिता तरतुद करावी अशी सुचना करण्यात आली आहे त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद केलेली दिसत नाही.

श्री. अ.जावेद रज्जाक : पान २५ वर वेगवेगळया इमारतीबाबत जी ०८.५० कोटीची तरतुद केली आहे यात मराठी व उर्दु शाळा करिता तरतुद आहे का फक्त मराठी शाळा करिता आहे याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : ज्या ठिकाणी शालेय इमारतींची आवश्यकता असेल त्या ठिकाणी ती शाळा मराठी असो वा उर्दु असो त्या ठिकाणी इमारत बांधली जाईल.

सौ. लता दलाल : अर्थसंकल्पात प्राथमिक शाळाचा जो उल्लेख आहे त्यात उस्मानपुरा शाळेचा उल्लेख नाही या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. विद्यार्थ्यांना जागा कमी पडते, याचा विचार करता या शाळेच्या इमारतीसाठी व वेळ पडल्यास जमिन खरेदी साठी अर्थ संकल्पात तरतुद करावी.

मा. आयुक्त : उस्मानपुरा शाळेच्या इमारतीचा वापर जिल्हा परिषद करते व महापालिकाही करते ती जागा राज्य शासनाची आहे.

सौ. जाहेदा बेगम : शहर विकास आराखडयानुसार रस्त्यांचे रुंदीकरण करतांना घरे तुटनार आहे. उदा. सिटी चौकातील रस्ता काम अपुर्ण आहे, तेव्हा या साठी जादा तरतुद करावी.

मा. आयुक्त : अर्थ संकल्पावर बरीच चर्चा झालेली आहे. तेव्हा ज्या ज्या मुद्यावर चर्चा झाली त्या बाबत निर्णय मा. महापौर यांनी जाहीर करावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : मागील एका सभेत कचऱ्यापासुन विजनिर्मिती यासाठी एक कमिटी गठण केलेली आहे ही कमिटी या बाबत अभ्यास करुन हा प्रकल्प तयार करण्यास महापालिकेला खर्च करावा लागणार नाही अशा प्रकारे महापालिकेची आर्थिक बचत करुन शहरातील कचरा कसा साठवता येइल या साठी प्रयत्न करणार आहे. तथापी अर्थसंकल्पात या योजनेसाठी तरतुद केलेली आहे. याप्रमाणे महसुली उत्पन्नात पान २ वर बेटरमेंट चार्जेसची तरतुद पुर्वी जी होती तीच पुढील वर्षासाठी दाखविली आहे. शहराची वाढ झपाटयाने होत आहे. नविन नविन वसाहती तयार होत आहेत त्यादृष्टीने बेटरमेंट चार्जेसमध्ये वाढ होणार नाही का? दुकान भाडया पासुन ८० लाखाचे उत्पन्न दाखविण्यात आले होते त्यातुन २८ लाख वसुल झाले आणि अर्थसंकल्पात पुन्हा ४० लाखाची तरतुद केली आहे. टपरी भाडयात १० लाख गृहीत धरण्यात आले आहे. यापैकी ५.४६ लाख वसुल झाले आहे पुन्हा १० लाखाची तरतुद दाखविण्यात आली आहे. या वरुन मागिल वर्षी महापालिकेने टपरी भाडे वसुल केलेले नाही. नुकत्याच मंजुर झालेल्या टपरी अहवालानुसार महानगरपालिका नविन टपऱ्या देणार आहे. याचा विचार करता टपरी भाडयाचे उत्पन्नात वाढ होणे आवश्यक होते पान ३ वर मटन बाजार फी २५ लाखाची तरतुद आहे मटन बाजार फी २६ लाख वसुल झ ाली आहे पुन्हा २५ लाख दाखविण्यात आले आहे. शहरात मटनाची दुकाने वाढत आहेत. तेव्हा मटन बाजार फी उत्पन्नातही वाढ होणे आवश्यक आहे. कर्मचारी घर भाडे/कर्ज वसुलीत प्रत्यक्षात १.८० ची वसुली अपेक्षित होती

ती २.०० लाख वसुली झाली आहे. पुढील वर्षी पुन्हा २.०० लाख तरतुद दाखविली यात वाढ होणार नाही का?

"क" अर्थसंकल्पातील पान १० वर जल निःसारण वसुली १.०० गृहीत धरले १.७६ लाख सुधारित तरतुद १.५० दाखविण्यात आले आहेत पान १३ महसुली खर्च वर्गीकरणात टंकलेखन दुरुस्ती व झेरॉक्स मशिन खरेदी साठी ८० हजाराची तरतुद आहे. नागेश्वरवाडी वाचनालयात संगणकाची व्यवस्था आणखी चांगल्याप्रकारे काम होइल त्यासाठी तरतुद करण्यात यावी.

मा. आयुक्त : स. सदस्य श्री. हळनोर यांनी ज्या ज्या मुद्या बाबत खुलासा केला आहे त्यात रसिट बाजु कमी दाखविली असली तरी उत्पन्न वाढले तर त्यादृष्टीने प्रयत्न केले जातील. नारेगांव ट्रेंचिंग गाऊडवर खत निर्मिती/विज निर्मिती या बाबत जो उल्लेख केलेला आहे. त्यासाठी महापालिकेची गुंतवणुक (कॅपिटल) ही आवश्यक आहे. सध्या हडकोच्या कर्जाचा दर १६.५% आहे यापेक्षा विदेशी डॉलरच्या कर्जाचा दर फक्त ६% आहे. या दृष्टीने अशा योजनेचा प्रकल्प तयार करुन तो विदेशात पाठवुन त्यांच्या कडुन कमी दराने कर्ज उपलब्ध झाल्यानंतर वसुली आपोआप कमी होत जाते. सुधारीत अंदाजपत्रकात जी प्रत्यक्ष वसुली झाली तेच आकडे दाखविले आहेत त्यात ज्यादा येणाचा प्रश्न नाही.

श्री. कचरु नवपुते : अर्थ संकल्पातील जकात कर वाढीत रासयनिक खतांवर किमतीवर अधारित जकात कर आकारणीचा प्रस्ताव आहे या कर वाढीमुळे कराचा प्रत्यक्ष भार शेतकऱ्यांवर पडेल. आज रासायनिक खतांच्या एका गोणीची किंमत अंदाजे २५०% ते ३००-३५०% आहे तेव्हा रासयनिक खतांवर पुर्वीप्रमाणेच जकात कराची आकारणी करावी एका ट्रकमध्ये २०० गोणी खत येते त्याची किंम ५०,०००/- होते टनाप्रमाणे जकात वसुली केली तर रु. २/- या प्रमाणे रु. २०/- जकात होते हीच जकात किंमतीवर आधारित वसुल केली तर रु. ७००/- द्यावे लागतील.

श्री. स. अली महापालिकेच्या अर्थसंकल्पावर सर्व सदस्यांनी चांगल्या प्रकारे चर्चा केली आहे. यात सर्व सदस्यांनी कामासाठी वाढीव तरतुदीची मागणी केली आहे. पण अर्थसंकल्पात उत्पन्न वाढविण्याबाबत कोणीही आपले विचार माडलेले नाहीत, त्यासाठी सर्व सदस्यांनी सुचना कराव्यात सिडको हडको हस्तांतर लवकरात लवकर करुन मालमत्ता करात वाढ करावी आणि या भागात सुविधाही उपलब्ध करुन द्याव्यात.

श्री. अ. जावेद रज्जाक : पान ३० वर महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना जी रु ४००/- शिष्यवृत्ती देण्यात येते ती फार कमी आहे त्यात वाढ करण्यात यावी तसेच शिष्यवृत्ती देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी माध्यमाचे किंवा उर्दु माध्यमाचे विद्यार्थी किती याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : विद्यार्थी संखेच्या टक्केवारीत ही शिष्यवृत्ती दिली जाते.

सौ. शकुंतला धांडे : पान ३४ वर जुन्या क्रिडा संघटना यांना आर्थिक सहाय्य देणे बाबत तरतुद केलेली आहे या क्रिडा संघटनांना नगर सेवक स्वेच्छा निधितुन मागील वर्षी आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे तेव्हा या क्रिडा संघटनांवर लोकप्रतिनिधी पाठविले जावेत.

मा. आयुक्त : जिल्हा क्रिडा संघटनांचा स्वतंत्र उपविधी असतो यावर महानगरपालिकेला लोकप्रतिनिधी पाठवता येणार नाही.

मा. महापौर : औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन १९९५-९६ चे सुधारित व सन १९९६-९७ चे मुळ अंदाजपत्रकावर सर्व सन्माननिय सभासदांनी सुचविलेल्या सुचनांचा विचार करुन खाली प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | | |
|---|---|---|
| १. | सिडको व शहर भागातील नागरिकांना पाणी सुविधा व्हावी यासाठी सिडको भागातील विहीराचा गाळा काढणे. | रु ५.०० लाख |
| २. | मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र. | रु. ५.०० लाख |
| ३. | सिकंदर अली वज्द मेमोरीयल | रु. ५.०० लाख |
| ४. | पदाधिकाऱ्यांचे दौरे | रु. ३.०० लाख |

या शिवाय अनाधिकृत वस्त्यांमध्ये रस्ता रुंदीकरणा करिता ज्या नागरिकांच्या इमारती बाधित होतील अशांना भिंती बांधुन देणे ही बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे अगामी सर्व साधारण सभेत या बाबत स्वतंत्र ठराव मंजुर करुन त्या प्रमाणे सुधारित अंदाज पत्रकात तरतुद उपलब्ध करुन देता येइल.

वरील प्रमाणे करण्यात आलेल्या तरतुदी या शिल्लक रकमेतुन करण्यात येतील त्यामुळे सन १९९६-९७ च्या अर्थ संकल्पातील महानगरपालिकेची अखेरीची शिल्लक ७.९७ लाख राहील याप्रमाणे मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती सभेतर्फे सभागृह समोर दाखल करण्यात आलेल्या सन १९९५-९६ च्या सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते तसेच स्थायी समिती सभेतर्फे सभागृहासमोर दाखल करण्यात आलेल्या सन १९९६-९७ चे मुळ अंदाजपत्रकास दुरुस्तीसह खालील प्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## अ) सन १९९५-९६ सुधारित अंदाजपत्रक

| अ. क्र. | जमा बाजु | | खर्च बाजु | |
|---|---|---|---|---|
| १) | प्रारंभी शिल्लक | २२३ | | |
| अ) | महानगरपालिका कर | ३,७७१३४ | अ) सर्वसामान्य प्रशासन | २८६६७ |
| ब) | विशिष्ट कायद्यान्वये येणारी वसुली | २०,५०१ | ब) सार्वजनिक आरोग्य व सुखसोयी. | २३२५६ |
| क) | कराच्या व्यतिरिक्त मनपा च्या मिळकती व अधिकारा पासुन मिळणारे उत्पन्न. | ९०,०९२ | क) सार्वजनिक सुरक्षा विभाग. | १०,३,६९२ |
| ड) | देनग्या व अनुदाणे. | १५७११२ | ड) लोकशिक्षण<br>इ) संकीर्ण<br>ग) अग्रिम | ४४९४३<br>२१६८८<br>७९५० |
| | | | | २,३०,१९६ |
| इ)<br>ह) | संकीर्ण<br>अग्रिम वसुली | २१३८२<br>५८६५ | भांडवलीकामावरील खर्च<br>१) इ<br>ोपडपट्टी सुधारण | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ५,९२,२९९ | २) रस्ते बांधणे<br>३) इमारती बांधणे<br>४) इतर भांडवली कामे | १९०००<br>२२०००<br>४९६५५<br>६२८६९ |
| | | | | १,४५,५२४ |
| | "क" अंदाजपत्रक | | "क" अंदाज पत्रकावरील खर्च | |
| १. | वाणी पुरवठा | ४९९७३ | १) पाणिपुरवठा महसुली खर्च | ८१५९० |
| २. | जलनिःसारण | ३९३९ | २) जलनिःसारण महसुली खर्च | १२४२० |
| | | ५,३११२ | | ९४०१० |
| | | | १) भांडवली खर्च पाणी पुरवठा व जलनिःसारण<br>विशेष शासकीय अनुदानातुन करावयाची कामे | ३१७०० |
| | एकुण जमा | ६४५४११ | १) मुळ अंदाजपत्रकातील | २३,२०० |
| | दुबेरजी जमा | ३६५८५ | २) पा.पु. व जलनिः सारण | १८,८५७ |
| | | | | ४२०५७ |
| | | | एकुण खर्च<br>वर्षअखेर शिल्लक | ५४३४८७<br>१०१९२४ |
| | | | एकुण जमा<br>दुबेरजी खर्च. | ६,४५,४११<br>३६,५८५ |
| | एकुण जमा | ६८१९९६ | एकुण खर्च | ६८१९९६ |

## मुळ अंदाजपत्रक सन १९९६-९७

| अ. क्र. | जमा बाजु | | खर्च बाजु | |
|---|---|---|---|---|
| १) | प्रारंभी शिल्लक | १०१९२४ | | |
| | "अ" महानगरपालिका करा पासुन उत्पन्न | ५७०५५० | "अ" सर्वसाधारण प्रशासन | ३३७४५ |
| | "ब" विशिष्ट कायद्यान्वये येणारी वसुली | २३६५५ | "ब" सार्वजनिक आरोग्य व सुखसोयी | ३१०४५ |
| | "क" कराच्या व्यतिरिक्त मनपाच्या मिळकती व अधिकरापासुन मिळणारे उत्पन्न. | ११७८० | "क" सार्वजनिक सुरक्षा | १२६८२२ |
| | "ड" देणग्या व अनुदाने. | ५३३८० | "ड" लोकशिक्षण | ५५०७६६० |
| | "इ" संकीर्ण | २०४७० | "इ" संकीर्ण | २७६६० |
| | "ग" अग्रिम वसुली | ३०९५ | "ग" अग्रिम | ८३०० |
| | | ७८४८५४ | | २८२६४२ |
| | | | मांडवली कामाकरिता खर्च | |
| | | | १) झोपडपट्टी सुधारणा<br>२) रस्ते बांधणी<br>३) इतर इमारत बांधणी<br>४) इतर भांडवली | ४०३००<br>४६०००<br>६८३००<br>१५५८०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कामे | |
| | | | | ३,१०,४०० |
| | "क" अंदाजपत्रक. | | "क" अंदाजपत्रक | |
| १. | पाणी पुरवठा | ५५८०० | १) पा.पु. महसुलीखर्च | १,२२,८१० |
| २. | जलनि:सारण | ३५०० | २) जलनि:सारण --//-- | १९७०५ |
| | | ५,९३०० | | १,४२,५१५ |
| | | | भांडवली खर्च पा.पुत्र. व जलनि:सारण खर्च वर्ष अखेर शिल्लक | १,०६,०००<br>८,४,१५५७<br>२५९७ |
| | जमा | ८४४१५४ | एकुण खर्च | ८४४१५४ |
| | दुबेरजी जमा | ८४००० | दुबेरजी खर्च | ४८००० |
| | एकुण जमा | ८,९२,१५४ | एकुण खर्च | ८,९२,१५४ |

क) मुळ अंदाजपत्रकात दर्शविल्येल्या दुरुस्त्या औरंगाबाद महानगरपालिकेचा सन १९९६ च्या मुळ अंदाजपत्रकावर सर्व सन्माननिय सभासदांनी सुचविलेल्या सुचनांचा विचार करुन खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) रु

| अ. क्र. | | |
|---|---|---|
| १. | सिडको व शहर भागाती नागरिकांना पाण्याची सुविधा व्हावी यासाठी सिडको व शहर भागाती विहीरींचा गाळ काढणे. | रु. ५.०० लाख |
| २. | मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र | रु. ५.०० लाख |
| ३. | सिकंदरअली वज्द मेमोरीयल | रु. ५.०० लाख |
| ४. | पदाधिकाऱ्यांचे दौरे | रु. ३.०० लाख |

या शिवाय अनाधिकृत वस्त्यांमध्ये रस्ता रुंदीकरणाकरिता ज्या नागरिकांच्या इमारतीची भाग बाधीत होइल अशा नागरिकांना भिंती बांधुन देणे बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने अगामी सर्व साधारण सभेत या बाबत स्वतंत्र ठराव मंजुर करुन त्याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रकात तरतुद उपलब्ध करुन देता येइल.

वरील प्रमाणे अ.क्र. १ ते ४ प्रमाणे करण्यात आलेल्या तरतुदी या शिल्लक रक्कमेतुन करण्यात याव्यात त्यामुळे सन १९९६-९७ च्या मुळ अर्थ संकल्पातील महानगरपालिकेची अखेरची शिल्लक रु ७.९७ लाख राहील.

उपरोक्त दुरुस्तीसह सन १९९६-९७ च्या मुळ अंदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या नंतर "जन गण मन" या राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
मा. नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

## दिनांक १६ मार्च १९९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दिनांक. १६ मार्च१९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांचे अध्यक्षते खाली कै. केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेस सुरुवात झाली.

या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. ज्सोत्स्ना दौलतराव हिवराळे | उपमहापौर |
| २) | सौ. रुख्मनबाई खंडेराव लोखंडे | सदस्य |
| ३) | श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ४) | सौ. साजेदा बेगम हनिफ कुरैशी | --//-- |
| ५) | श्री. सलीम म. हनिफ कुरैशी | --//-- |
| ६) | श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ७) | श्री. ॲड. गणेश किशनराव वानखडे | --//-- |
| ८) | सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ९) | सौ. उषाबाई दिलीप गायकवाड | --//-- |
| १०) | सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| ११) | सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १२) | श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १३) | श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १४) | श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --//-- |
| १५) | श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १६) | श्री. काशिनाथ हरिभाऊ कोकाटे | --//-- |
| १७) | श्री. सुदाम रामराव सोनवणे | --//-- |
| १८) | श्री. कंवरसिंग किसनसिंग बैनाडे | --//-- |
| १९) | सौ. पदमा बाबुराव शिंदे | --//-- |
| २०) | श्री. सुभाष भिकाजी टाकळकर | --//-- |
| २१) | श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २२) | सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २३) | सौ. फरहतबानो भ्र.मो.नवाज | --//-- |
| २४) | श्री. फजलउल्लाह खान आजमतउल्लाखान | --//-- |
| २५) | श्री. अजिज खॉं गजी खॉ | --//-- |
| २६) | श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | --//-- |
| २७) | श्री. महंमद मुस्ताक अहमद | --//-- |
| २८) | श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- |
| २९) | श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३०) | श्री. मुजीब आलमशाह मिर आलमशाह | --//-- |
| ३१) | सौ. मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| ३२) | श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३३) | श्रीमती जाहेदा बेगम मो.जमिर | --//-- |
| ३४) | सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३५) | श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --//-- |
| ३६) | श्री. स.अ. एकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | --//-- |
| ३७) | श्री. धिरज शांतीलाल खखोरडीया | --//-- |
| ३८) | श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ३९) | श्री. लहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ४०) | श्री. फैय्याज अहमद म. हाजी कुरैशी | --//-- |
| ४१) | सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे | --//-- |
| ४२) | सौ. लता श्रीनिवास दलाल | --//-- |
| ४३) | श्री. जयवंत केशवराव ओक | --//-- |
| ४४) | सौ. अलका रमेश पाटील | --//-- |
| ४५) | सौ. शकुंतला हरिदास धांडे | --//-- |
| ४६) | श्री. अब्दुल रशिद खॉन (मामु) | --//-- |
| ४७) | कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ४८) | श्री. डॉ. भागवत किसनराव कराड | --//-- |
| ४९) | सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ५०) | श्री. अब्दुल रशिद अ. सत्तार | --//-- |
| ५१) | श्री. तरवेंद्रसिंह म. धिल्लन | --//-- |
| ५२) | श्री. विखारोद्दीन पि. खुदबोद्दीन | --//-- |
| ५३) | श्री. गंगाधर सुखदेव गाडे | --//-- |
| ५४) | श्री. गजानन रामकिसन बारवाल | --//-- |
| ५५) | श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | --//-- |
| ५६) | श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ५७) | श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत | --//-- |
| ५८) | श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | --//-- |
| ५९) | सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६०) | श्री. नरसिंग किसन ढगे | --//-- |
| ६१) | श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ६२) | सौ. मंदा धनंजय काळुशे | --//-- |
| ६३) | श्री. बन्सी तुळशीराम गांगवे | --//-- |

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" गिताने झाली.

संवाद

श्री. गिरजाराम हाळनोर : पडेगांव येथील हाडाच्या कारखान्या बाबत न्यायालयाने जो महत्वपुर्ण निर्णय दिला या प्रकरणी महानगरपालिका आयुक्त सन्माननिय न्यायालय तसेच मा. पोलिस आयुक्त यांचे अभिनंदन ठराव मांडत आहे.

श्री. गजानन बारवाल : त्यास माझे अनुमोदन आहे.

सौ. रुख्मणबाई लोखंडे : पडेगांव हाडाच्या कारखान्याबाबत सभागृहात वेळोवेळी सहकार्य माझे सर्व सहकारी स. सभासद तसेच मा. आयुक्त स. न्यायालय तसेच मा. पोलिस आयुक्त यांचे अभिनंदन.

श्री हमिदउद्दीन ताबा : मागील सभेत स्थायी समिती सभागृह, मुख्य सभागृह आणि महानगरपालिका प्रवेशव्दारास नांव देण्याचा प्रस्ताव मंजुर झाला आहे त्यापैकी स्थायी समिती सभागृह आणि मुख्य प्रवेशव्दार यांना संबंधीताचे नावे देण्या बाबतचा ठराव प्रलंबीत का ठेवण्यात आला याचा खुलासा व्हावा.

श्री. जयवंत ओक : मुख्य प्रवेशव्दारास कै. व्दारकादास पटेल व स्थायी समिती सभागृहास मलीकअंबर यांचे नाव देण्याबाबतच्या उद्घाटन सोहळयास कोणते प्रमुख अतिथी निमंत्रित करण्यात यावेत या बाबतचा २/४ दिवसात निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पा बाबतची सभा आयोजित करण्यात आली होती म्हणुन मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. दिपकरावजी रावते यांचे हस्ते मुख्य सभागृहाला नियोजित नांव देण्याचा कार्यक्रम करण्यात आला आहे. मुख्य प्रवेश व्दाराला ही नांव देण्याचा कार्यक्रम लवकरच आयोजित करण्यात येइल.

श्री. गजानन बारवाल, श्री. जयवंत ओक : स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा यांचे सुचनेनुसार निमंत्रित उद्घाटक निश्चित करुन प्रवेशव्दारास नाव देण्याबाबतचा कार्यक्रम आज ठेवला तरी चालेले.

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रवेशव्दाराला नाव देण्याबाबतचा प्रश्न उपस्थित होण्याचे काही एक कारण नव्हते मुख्य सभागृहाला नियोजित नाव देण्याचा जो कार्यक्रम आयोजित करण्यात आला त्याच कार्यक्रमात प्रवेशव्दारास नाव देण्याबाबतचा ही कार्यक्रम आयोजित करण्यात आला असता यासाठी उद्घाटक कोण हा प्रश्न सभागृहाला नाव देण्याबाबतची निमंत्रण पत्रिका कार्यक्रम कार्यक्रमापुर्वी एक तास अगोदर मिळालेली आहे. अशी वेळ पुन्हा येवु नये. जनतेची जी कामे आहेत त्यास आमचे रस्त सहकार्य सभागृहाला मिळेल. लोकप्रतिनिधींच्या काळात एकतर्फी निर्णय घेणे योग्य नाही. सर्वांना बरोबर घेवुन चालले पाहिजे. तेव्हा आता तरी उद्घाटणाचा कार्यक्रम लवकर ठेवण्यात यावा हीच सुचना.

श्री. मोहसिन अहमद : स. स.श्री. कोकाटे यांनी मांडलेल्या विचाराला अनुमोदन आहे उद्घाटणाचे कार्यक्रमाबाबत विचार करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : पिरबाजार येथील नाल्याची जागा सरकारी असते, परंतु पीर बाजार येथील नाल्याच्या जागेस कंपाऊड वॉल बांधण्यात आली आहे. या नाल्याच्या जागेवर पीरबाजार येथील आठवडी बाजार सुरु करण्यात यावा, असा सभागृहात निर्णय झालेला आहे या दृष्टीने पिरबाजार येथील कार्यक्रमानिमित्त त्या ठिकाणी गेलो असता काही नागरिकांनी स.सदस्यांना दिले व कार्यक्रमास विरोध केला. या बाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली, ही जागा म्हाडाने घेतली होती.

श्री. गिरजाराम हाळनोर : पिरबाजार येथील नाल्याच्या जागेवर स.स.श्री. निकाळजे यांचे हस्ते उद्घाटणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आणि या कार्यक्रमापुर्वी सदर जागेवर तार कुंपन करण्यात आले या बाबतची माहिती शहर अभियंता, प्रशासकीय अधिकारी यांना देण्यात आल्यानंतरही

संबंधीतांनी या बाबत लक्ष घातलेले नाही. तेव्हा तारकुंपनाचे जे काम झाले त्यावर प्रशासन काय कार्यवाही करणार? तार कुंपन काढुन टाकण्यात आल्याची खोटी माहिती सभासदांना दिली. तेव्हा या भागाचे बांधकाम निरीक्षकावर कार्यवाही करण्यात यावी.

मा. आयुक्त : स. सदस्य यांनी सुचविलेल्या जागेच्या मालकी हक्का बाबतचे कागदपत्र तपासण्याच्या सुचना सहा. संचालक नगर रचना आणि विधीसल्लागार यांना देण्यात आल्या आहेत जर सदर जागा महापालिकेची आहे असे सिध्द झाले तर संबंधीत इमारत निरिक्षका विरुध्द कार्यवाही करण्यात येइल सदरील जागेच्या मालकी हक्का बाबत वाद आहे. बाबत वाद आहे. या जागेचे कागदपत्र श्री. गुणवाणी या नावाने आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी महानगरपालिका काही झोपडपट्टया उठवल्या आहेत ही जागा जर महापालिकेची नव्हती तर महापालिकेने झोपडपट्टया का उठवल्या ही जागा आता दुसऱ्याच्या मालकीची कशी झाली. पीरबाजार नाल्याच्या जागेवर आठवडी बाजार सुरु करण्या बाबतचा ठराव मंजुर झालेला आहे.

मा. आयुक्त : पिरबाजार नात्याची जागा महापालिकेची आहे. म्हणुन आठवडी बाजाराबाबतचा ठराव मंजुर केला आहे. पण उद्घाटणानिमित्त त्या ठिकाणी गेलो असता संबंधीताने मालकी हक्का बाबतचे कागदपत्र दाखवले त्या दृष्टीने आधिक चौकशी करणे जरुरी आहे.

श्री. गजानन बारवाल : यापुर्वी महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेचे पी.आर.कार्ड काढण्यात आले होते त्यावेळी या जागेचेही पी. आर कार्ड काढण्यात आले होते किंवा नाही याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : या जागेचे पी.आर.कार्ड महापालिकेकडे नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : एखादया नागरिकाला त्याच्या मालकी हक्काच्या जागेवर तार कुंपन करण्यास अथवा बांधकाम करावयाचे असल्यास महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगीची आवश्यकता असते. बांधकाम परवानगी नसेल तर असे बांधकाम पाडण्यात येते मन हे काम कां तोडण्यात आले नाही.

मा. आयुक्त : आठवडी बाजार पिरबाजार येथील नाल्यावर स्थलांतरीत करावयाचा आहे या दृष्टीने उद्घाटन कार्यक्रमा निमित्त तेथे गेलो असता मालकीचे कागदपत्र दाखविण्यात आले. तारकुंपन तोडता येइल.

श्री. हमिदउद्दीन ताबा : उद्घाटन करावयाची जागा जर महापालिकेच्या मालकीची नव्हती तर उद्घाटणाचा कार्यक्रम का ठेवला आणि त्या ठिकाणी उद्घाटनास बोलवुन स.सदस्य यांची बेइज्जती केली आहे याचे कारण काय आणि त्यास जबाबदार कोण?

मा. आयुक्त : उद्घाटनाची जागा महापालिकेची नाही असे म्हणणे नाही सदर जागा महानगरपालिकेचीच आहे. परंतु त्या जागेचे पी.आर.कार्ड आजपर्यंत कोणीही सादर केलेले नाही. नकाशावर सदर जागा मोकळी जागा म्हणुन दाखविलेली आहे. कार्यक्रमाचे वेळी नागरिकांनी पी.आर.कार्ड दाखवले.

श्री. प्रकाश निकाळजे : १९९१ मध्ये पी.आर. कार्डवरील नावात बदल करण्याच्या प्रकरणी सिटी सर्व्हे कार्यालयातील ५२ अधिकारी निलंबित झालेले आहेत तेव्हा महानगरपालिकेने या जागेच्या पी.आर.कार्ड बाबत चौकशी करावी आणि

जनहीताच्या दृष्टीने त्या ठिकाणी आठवडी बाजाराचे त्वरीत बांधकाम करावे अशी विनंती आहे.

श्री. विखारोद्दीन : शहराच्या काही भागात अशाच प्रमाणे मोठया प्रमाणात आहे या बाबत गेल्या सहामहिन्यापासुन तक्रार करण्यात येत आहे. पण काहीच अंमलबजावणी नाही. औषधी अथवा धुराचा योग्य वापर होतो किंवा नाही हे कळत नाही आठ वाजेनंतर घरात बसता येत नाही तेव्हा या डांसाच्या निर्मुलनाबाबत काय कार्यवाही करण्यात येणार याचा खुलासा संबंधीत अधिकाऱ्यांनी करावा. यासाठी कर्मचारीवर्ग कमी पडत आहे. रोजदारी मजुराची नेमणुक का केली जात नाही.

मा. आयुक्त : डासांचे प्रमाण का वाढते याचे मुख्य कारण म्हणजे जागोजागी साचत असलेले पाण्याचे खड्डे साचलेल्या पाण्यावर डासांची उत्पत्ती मोठया प्रमाणावर होते. टाकण्यात आलेल्या ड्रेनेजलाईनचा उतार बरोबर नाही. यातील गाळ काढला जातो पण साचलेले पाणी तसेच राहते म्हणुन डासांचा प्रश्न आहे. जोपर्यंत शहराचे पाणी पुर्णपणे जाणार नाही तापर्यंत कितीही औषधीचा उपयोग केला तरी डासांचा प्रश्न सुटणे शक्य नाही.

श्री. अब्दुल रशिद खान (मामु) : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे नाल्यांना उतार असला तरी नाल्यावर मोठेमोठया इमारती तयार झालेल्या आहेत यामुळे नाल्याचा भागात घाण साचुन राहते. याबाबत नोटीसही देण्यात आलेल्या आहेत. पण कार्यवाही होत नाही. चौकशी केली असता पोलिसांकडे प्रकरण दाखल करुन असे सांगतात. सफाई होत नाही घाण पाणी साचुन राहते. डासांची जास्त उत्पत्ती नाल्यावर होत आहे. हा प्रश्न केव्हा धसात लागेल याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : सिल्कमिल कॉलनी येथील नाल्यात ब्रेकरचेकाम फक्त आठ दिवसात पुर्ण होइल. शहरात जवळ जवळ ३००/४०० कि.मी. लांबीची गटार आहे. या ७५% गटारीला योग्य उतार नाही किंवा त्यांना शेवट नाही. त्यामुळे या लाइनमध्ये पाणी साचुन राहते. ज्या ठिकाणी नाले साफ करणे शक्य असते असे नाले १५ दिवसात साफ केले जातील बनेवाडी येथील ऑक्शीडेशन पॉट हा फक्त १/४ शहराच्या मर्यादपुरताच आहे. बाकी सर्व पाणी सिध्दार्थ गार्डन येथील नाल्यात जाते. शहराच्या दृष्टीने ऑक्सीडेशन पॉट बाबत यापुर्वी काही विचार झालेला नाही. यासाठी झाल्टा येथे एक नविन प्लॅट तयार करण्याचे योजना पुर्णत्वाच्या टप्प्यावर आहे त्यासाठी २.०० कोटीची तरतुद केली आहे.

सौ. लता दलाल : शहरात टाकण्यात आलेली सिवर लाइन बरोबर टाकण्यात आलेली नाही. हडकोपासुन सिध्दार्थ गार्डन पर्यंत तीन वर्षापुर्वी सिवर लाइनचे काम करण्यात आले. पण या कामामध्ये अनेक ठिकाणी अनेक उंच सखल भाग आहे. या कारणामुळे या सिवर लाइनला जोडण्यात येणाऱ्या इतर लाइनवर घ्याव्या लागल्या. त्यामुळे लाइनमध्ये पाणी साचुन राहते. या साचलेल्या पाण्यावर डासांची उत्पत्ती होते. या साठी महानगरपालिकेला नाले खोदावे लागणार आहेत. यासाठी महानगरपालिका काही करणार आहे का?

मा. आयुक्त : मकबऱ्याच्या बाजुला जो नाला आहे या ठिकाणी मोठे दगड आहेत. हे फोडणे शक्य नाही. म्हणुन सिवर लाइनही वरच टाकावी लागेल शहरीभागास नियमाप्रमाणे सुरुंग घेता येत नाही. ड्रेनेज लाइनचे काम अपुर्ण

आहे. ते पुर्ण झाल्यावर खाजगी कनेक्शन जोडणे योग्य होइल दगडफोडता येत नाही म्हणुन अन्य तांत्रिक उपाय करता येतील का? हे पहावे लागेल.

श्री. स. अली मिरा सलामी : शहरात मोठया प्रमाणावर वाढलेल्या डासांच्या बाबत सभागृहात चर्चा झाली. हे डास कमी कसे होतील याच विचार करणे आवश्यक आहे दलालवाडी भागातील नाला जागोजागी तुंबलेला आहे पिपत्स को.ऑप. औषधी भवन या इमारतीच्या खाली पुर्ण माती भरलेली आहे, त्यामुळे नाल्याची खोली कमी झालेली आहे. व पाणी साचुन राहते या नाल्याच्या कडेला नागरिकांनी घरे बांधलेली आहेत. या नाल्याची सफाई योग्य प्रमाणात होत नाही. साचलेल्या पाण्यावर डासांची उत्पत्ती होते. ड्रेनेज लाइनच्या उताराबाबत प्रशासन जबाबदार आहे. तेव्हा यात तांत्रिक अडचण काय आहे आणि त्यावर काय उपाययोजना करण्यात येणार याचा खुलासा व्हावा पिरबाजार येथील नाल्याच्या जागेबाबत सभागृहात चर्चा झाली. तेव्हा महानगरपालिकेच्या ज्या जागा आहेत त्याबाबत काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : महानगरपालिकेच्या जागांना तार कुंपन करण्याच्या कामासाठी सन ९५-९६ या वर्षात ४० लाख आणि सन ९६-९७ या वर्षात ८० लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. या रक्कमेतुन तार कुंपनाचे काम केले जात आहे. डासांची उत्पत्ती घाण पाण्यावर होते. त्यासाठी महानगरपालिकेतर्फे औषधीची फवारणी करण्यात येते. फॅगिंग मशिंनची धुर फेकही या कामासाठी केली जात नाही. फॉगिंग मशिन व्दारे धुर फेकीचे काम हे सकाळ/सध्याकाळचे वेळेस केले जाते. यासाठी फक्त ३० मिनिटे मिळतात. शहरातील डासांचे प्रमाण कमी करावयाचे झाल्यास नाले साफ करावे लागतील.

श्री. महमंद विखारोद्दीन : डास निर्मुलनासाठी वापरण्यात येणाऱ्या हलक्या औषधी ऐवजी भारी औषधी उपयोग करण्यात यावा.

मा. आयुक्त : डास निर्मुलनासाठी शासकीय औषधीचा वापर होतो तथापी स. सदस्यांच्या सुचनेप्रमाणे प्रयोगशाळेत तपासणी करता येइल त्यानंतर आवश्यकता भासल्यास शासनास कळविण्यात येइल.

श्री. मुश्ताक अहमद : मागील वर्षी अतिवृष्टीमुळे जी पडझड झाली होती. त्यावेळी तातडीची बैठक झाली या बैठकीस नाल्याच्या प्रवाहास प्रतिबंध करण्याऱ्या सर्व इमारती तोडण्याचे अधिकार मा. आयुक्तांनी दिली होती. त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे डास वाढतात यावर्षी पावसाळयात पुन्हा प्रश्न उद्‌भवु शकतो.

मा. आयुक्त शहराच्या अनेक ठिकाणी नाल्यावर नागरिकांनी घरे बांधलेली आहेत नाला ट्रेनिंगच्या कामसाठी ही घरे तोडावी लागतात त्यावेळी स. सदस्यांनी हे घर तोडु नका अशी शिफारस करु नये. अशा प्रकारची कमीत कमी ५ हजार घरे आहेत.

श्री. अब्दुल रशिदखाँ : बारुदगर नाला, महानगरपालिका शॉपिंग सेंटर अशा इमारतींच्या नाल्यात बांधकाम साहित्य पडलेले आहे. त्या ठिकाणी जाण्यास कामगार घाबरतात ते साफ करण्यात यावेत असे स.स.श्री. मुश्ताक अहमद यांना सुचवाचे आहे. अनेक नाल्यावर लाखो रुपये खर्च करुन इमारती बांधल्या आहे

**विषय क्र. १६१/१ :**

दिनांक २० फेब्रुवारी ९६ रोजी तहकुब झालेली व दिनांक २३ फेब्रवारी ९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

सौ. लता दलाल : टिळकरोड येथील श्रीमान श्रीमती नाल्याची परिस्थिती बघितल्यानंतर या नाल्याचे पाणी पुढील भागात नाल्याच्या कडेवर असलेल्या घरात शिरणार आहे. या बाबींचा विचार करता संभाव्य धोका टाळण्यासाठी नाला सफाईचे व इतर काम आताच हाती घेतले पाहिजे मा. आयुक्तांना रु. ३.०० लाखापर्यंतचे अंदाज पत्रक मंजुर करण्याचे अधिकार आहेत. या अधिकारात या कामाचे अंदाजपत्रक मंजुर करुन काम लवकरात लवकर सुरु करावे म्हणजे डासांचे प्रमाण कमी होइल.

मा. आयुक्त : माहे एप्रिल मध्ये या कामात सुरुवात करण्यात येइल मा आयुक्तांना फक्त १ लाखापर्यंत अंदाजपत्रक मंजुर करण्याचे अधिकार आहे. ३.०० लाखाचे नाहीत.

श्री. वसंत देशमुख : या शहरातील नाल्याची एकुण लांबी किती आहे? त्यापैकी किती नाल्यावर अतिक्रमण करुन घरे बांधण्यात आली आहेत या बाबतची माहिती देण्यात यावी वार्ड क्र. मध्ये ३६ लाखाचे जे काम करण्यात येणार आहे. त्याठिकाणी अतिक्रमण करुन लोकांनी जागा ताब्यात घेतली आहे. तेंव्हा अशा अतिक्रमणाबाबत जरुर मोहिम हाती घेण्यात यावी.

मा. आयुक्त : शहरातील नाल्याची एकुण लांबी ४५ की.मी. आहे तसेच एकुण गटारीची लांबी ३ लाख रनिंग मिटर आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : विषय क्र. १ वरील चर्चेस सुरुवात करण्यात यावी.

मा. महापौर : विषय क्र. १ चर्चेला घेण्यात येत आहे.

श्री. अब्दुल रशिद खॉ (मामु) : शासनाकडुन बांधकामाबाबत एक शासन निर्णय सर्व संबंधितांना देण्यात आलेला आहे या शासन निर्णयाची प्रत सर्व सभासदांना देण्यात यावी.

मा. आयुक्त : शासन निर्णयानुसार पुढील अनाधिकृत बांधकामासाठी शासनाचे आदेश आहेत. या शासन निर्णयासची प्रत सर्व स.सभासदांना दिली जाईल यात शहराच्या संपुर्ण भागाची विभागणी गटात करावयाची व त्या गटाशी अधिकारी नेमावयाचा नियुक्त गटाच्या अधिकाऱ्यावर त्याचे भागात कुठलेही अनाधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी राहील. असे बांधकाम झाल्यास त्या विभागाचे निरिक्षक व पोलिस अधिकाऱ्यांना निलंबीत करावयाचे आदेश आहेत.

श्री. अविनाश कुमावत : शहराचा ज्या भागात अनाधिकृत वसाहती बसलेल्या आहेत त्यापैकी २०% जागेवर बांधकामे झाली आहे. १०% च जागेवर बांधकाम बाकी आहे. अशा जागा काय याचा खुलासा व्हावा. त्यावर बांधकाम करुन देणे म्हणजे त्या भागावर अन्याय झाला उदा. शिवशंकर कॉलनी.

मा. आयुक्त : स.सभासद श्री. कुमावत यांनी सुचविल्या प्रमाणे यापुढे अनाधिकृत बांधकाम करु दिले जाणार नाही.

श्री. जयवंत ओक : स.सभासद श्री. कुमवात यांचे विचाराप्रमाणे शासनास पत्र पाठविण्यात यावे त्या बाबत शासनाचे काहीतरी आदेश येतीलच अन्यथा शासनाकडे या संबंधात भांडु शासनाचे सहकार्य जरुर मिळेल.

सौ. मंदा काळुसे, सौ. पदमा शिंदे : दि. २०-०२-९६ च्या च्या सर्वसाधारण सभेत असतांनाही उपस्थित सभासदांच्या यादीत काही सभासदांची नावे दर्शविण्यात आलेली नाही या बाबत नाही या बाबत खुलासा व्हावा.

श्री. कंवरसिंग बैनडे : दि. ७ तारखेला सुचक/अनुमोदक यांच्या सध्या एक सुचना देण्यात आली होती होती ती अजिंडयावर का आली नाही याचा खुलासा व्हावा.

नगर सचिव : सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासदांनी स्वाक्षरी करण्यासाठी सभागृहाच्या प्रवेशव्दाराजवळ सहीचे रजिष्टर ठेवण्यांत येते यावरील उपस्थित सभासदांच्या स्वाक्षऱ्या बघुन त्याची नोंद घेतली जाते.

सौ. मंदा काळुशे व सौ. पदमा शिंदे : सभागृहाच्या प्रवेशव्दाराजवळ ठेवण्यात आलेल्या रजिष्टर सही आहे पण उपस्थित सभासदांच्या यादीत नाव नाही.

मा. महापौर : स.स.सौ. काळुशे यांनी जी सुचना केली आहे. त्या बाबत नगरसविचांनी या पुढे असे होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी सुचना करण्यात येते.

नगर सचिव : योग्य ती दक्षता घेण्यात येइल.

श्री. महादेव सुर्यवंशी : सभागृहात बांधकाम परवाव्याबाबत चर्चा झाली आहे. महानगरपालिकेमध्ये जी १८ खेडी समाविष्ट झाली आहेत त्या खेडयात ग्रामपंचायत असतांना बांधकाम परवानगी मिळत होती पण महानगरपालिकेत १८ खेडी समाविष्ट झाल्यानंतर येथील नागरिकांना बांधकाम परवानगीसाठी पी आर कार्डची मागणी केली जाते पर्यायाने बांधकाम परवानगी मिळत नाही. त्यामुळे १८ खेडयाचा बिकट प्रश्न निर्माण झालेला आहे. नागरिकांना त्रास होत आहे.

मा. आयुक्त : १८ खेडयात पी आर कार्ड किंवा मालकी हक्काचे कोणतेही कागदपत्र येथील नागरिकांकडे नाहीत, त्यासाठी ५० लाखाची तरतुद करुन या नागरिकांना पी आर कार्ड व सनद देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री. स. अली मिरा सलामी : इतिवृत्ताची नोंद घेतांना स.सभासद ज्या मुद्दयावर सभागृहात खुलासा करतात त्या ऐवजी दुसऱ्या मुद्दयाची वृत्तात नोंद घेतली जाते यामुळे वृत्तांत तफावत निर्माण होते संभाजीनगर नावाचा उल्लेख करण्याबाबत न्यायालयाचे आदेश असतांनाही इतिवृत्तात संभाजीनगर या नावाचा उल्लेख केला जातो. या बाबत न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सचिवांनी काळजी घेणे आवश्यक आहे. यानंतरही जर इतिवृत्तात संभाजीनगर नावाचा उल्लेख आढळल्यास न्यायालयाच्या आदेशाचा अवमान या अंतर्गत न्यायालयात धाव घेतली जाइल.

श्री. म.मुश्ताक अहमद : सर्वोच्च न्यायालयाने संभाजीनगर या नावावर मनाई हुकुम दिलेला आहे. काही सभासद त्यांच्या लेटरपॅडवर अजुनही संभाजीनगर या शब्दाचा शब्दप्रयोग करतात. तेव्हा पुढे असा शब्द प्रयोग होऊ नये या बाबत सर्व संबंधीत नगरसेवकांना महापौरांतर्फे ताकीद देण्यात यावी अन्यथा या बाबत याचीका दाखल करण्यात येइल.

ॲड गणेश वानखेडे, श्री. हाळनोर श्री. बारवाल : आम्ही आमच्या लेटरहेड वर औरंगाबाद किंवा संभाजीनगर हा शब्द प्रयोग करावा हा आमचा प्रश्न आहे या बाबत मा. सभागृहातही ठराव मंजुर झालेला आहे. आम्हाला कोणाचेही बंधन

नाही. महानगरपालिकेच्या कोणत्याही लेटरपॅडवर संभाजीनगर छापलेले नाही नगरसेवकांचे लेटर पॅड हे त्यांचे स्वत:चे लेटर पॅड आहेत.

मा. महापौर : विषय क्र. १ वर बरीच चर्चा झालेली आहे विषय क्र. १ मंजुर करण्यात येतो.

श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु) : गारखेडा भागात महानगरपालिकेच्या जमीनीवर विनापरवाना प्लॉट पाडुन विकली जात आहेत.

श्री. वसंत देशमुख : महापौर पदाचे निवड नंतर विषय समित्यांच्या सभासदांची निवड झाली या निवडीनंतर नियमाप्रमाणे त्या त्या समित्याचे सभापती पदाची निवड होणे आवश्यक होते तरी पण बराच कालावधी उलटल्या नंतरही विषय समित्यांच्या सभापती पदाची निवड अद्याप झालेली नाही म्हणुन मी ज्या-ज्या विषय समितीचा सभासद आहे त्या विषय समितीच्या सभासद पदाचा राजीनामा देत आहे.

श्री. मुजीब आलमशाह खान : विषय समितीच्या सभापती पदाची निवडणुक केव्हा होणार सभापती पदाची निवड न झाल्यामुळे वार्डातील कामांना विलंब होत आहे.

श्री. गौतम लांडगे : आपल्या विषय पत्रिकेवरील विषय क्र. १ अद्याप मंजुर झालेला नाही या विषयावर चर्चा होणार आहे.

श्री. अब्दुल रशिदखॉ (मामु) : दि. १८-२-९६ च्या सभेत अजेंडयावरील वृत्तात दुरुस्ती करण्याबाबत मा. महापौर यांनी रुलींग दिलेली आहे पण त्या बाबतची नोंद इतिवृत्तात आलेली नाही. दि. १८-२-९६ च्या इतिवृत्तातील पान ५ वर नगर सचिव या पदाकरता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(१) अन्वये नगर सचिव पद भरतांना दहा वर्षाचा अनुभव एल एल वी पदवीधारक आणि महानगरपालिका सेवाभरती नियमाप्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यातुन भरती व्हावी दुरुस्ती करण्यात यावी.

मा. आयुक्त : स. सभासदांचे सुचनेप्रमाणे सेवाभरती नियमाप्रमाणे नगर सचिव या पदाची भरती करण्यात येइल. सध्याचे नगरसचिव यांना कामाचा अनुभव असल्यामुळे त्यांच्याकडे नगरसचिव पदाचे काम दिलेले आहे. नियमाप्रमाणे सभांचे कामकाज ते चालवित आलेले आहेत.

श्री प्रकाश निकाळजे : सध्या नगरसचिव या पदावर काम करीत असलेले सचिव यांनी या पुर्वी नगरसचिव म्हणुन पाच वर्षापासुन काम केलेले आहे. त्यांना या पदाचा अनुभवही आहे याच वळेस हा प्रश्न उपस्थित का? करण्यात आला?

श्री. मोहसिन अहमद : ठराव क्रमांक १५७ दि. २३-२-९६ अन्वये सिडको-हडको भागाचा महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबत सहमत असले तरी या भागातील रस्ते. लाइट, ड्रेनेज इ. सुविधा बाबत काय कार्यवाही करण्यात येणार हस्तांतराची कार्यवाहीच्या वेळी या बाबीकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

श्री. गजानन बारवाल : सिडको हस्तांतरणाचे प्रश्नाचे वेळी या प्रकरणी समिती स्थापण करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. या समितीमध्ये माझे नावाचा समावेश करण्यात यावा असे सुचविण्यात आले आहे.

श्री. काशीनाथ कोकाटे : सिडको हस्तांतराबाबत समितीची स्थापना झालेली आहे या समितीच्या अहवालानंतर सिडका हस्तांतराचा विचार केला जाईल त्यामुळे हस्तांरासाठी १ मे चा प्रश्नच उद्भवत नाही शहराच्या बहुतांश नागरीक/नगरसेवक यांच्या मालमत्ता सिडको भागात आहे याचा विचार

करता सिडको हस्तांतर कमेटीवर सर्वच नगरसेवकांना सभासदांच द्यावे लागेल. त्यामुळे समितीचा निर्णय लांबेल.

श्री. गजानन बारवाल : सिडको भागातुन निवडुन आलेले नगरसेवकांच्या संखे इतकेच इतर नगरसेवकांचा समितीत समाविष्ट करण्यात यावेत.

श्री. गौतम लांडगे : सभागृहातील चर्चेनुसार सिडको भागातील देशी दारुचे दुकान प्रकरणी अधिकाऱ्याशी काय चर्चा झली याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : महानगरपालिकेतर्फे देशी दारुचे दुकानासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते परवानगी दिली जात नाही ग्रामीण भागातुन शहरात येणाऱ्या देशी दारुच्या दुकानांना विशिष्ट भागात ना हरकत प्रमाणपत्र दिली जात नाहीत. गेल्या अनेक वर्षापासुन अशा प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. शहरी भागात दारुच्या दुकानांना परवानगी द्यावी किंवा नाही ही बाब धोरणात्मक निर्णयाची आहे त्यासाठी स्वतंत्र ठराव घ्यावा लागेल.

श्री. प्रकाश निकाळजे, श्री. गौतम लांडगे : देशी दारुमुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत ही बाब विचारात घेऊन ग्रामीण भागातुन येणाऱ्या देशी दारुच्या दुकानांना शहरात परवानगी देवु नये असा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : ग्रामीण भागातुन शहरात येणाऱ्या देशी दारुचे दुकानांना परवानगी देण्यात येवु नये असा ठराव गत महिन्यापुर्वीच झाले आहे. याचे कारण काय? तथापी सभागृहाने मंजुर केलेल्या ठरावाची अंमलबजावणी व्हावी इच्छा आहे.

श्री. वसंत देशमुख : ग्रामीण भागातील जनता जागृत झाली आहे यात विशेषतः महिला जागृत झाल्या आहेत त्यामुळे ग्रामीण भागातील देशी दारुच्या दुकानांना खंबीरपणे विरोध होत आहे. असाच खंबीर विरोध शहरीभागातुनही झाला पाहिजे.

**ठराव :**

दिनांक २०-२-९६ व २३-२-९६ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६२/२ :**

दिनांक १-६-९५ पर्यंत ज्या ठिकाणी टपरी अस्तित्वात असेल व ती जागा टपरी समितीने देण्याबाबत शिफारस केली असेल त्या ठिकाणी टपरी नियमित करण्यात यावी. परंतु दिनांक १-६-९५ नंतर जर टपरी लावण्यात आली असेल तर ती काढुन टाकण्यात यावी. नाही आणि असल्या तरी दिनांक १-६-९५ नंतरच्या आहेत अशा जागेकरता अर्ज मागविण्यात यावेत आलेल्या अर्जाची छाननी करुन खाली निकर्षांच्या आधारे टपऱ्यांसाठी जागा मंजुर करण्यात यावी.

१) ज्या अंपग व्यक्तीकडे स्वताःच्या किंवा कुटुंबातील व्यक्तीच्या नावे टपरीसाठी जागा नाही अशा अपंग व्यक्तीसाठी ५% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

२) १२ वी किंवा त्यापेक्षा आधिक शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित बेकारा करिता टपऱ्यासाठी २५% राखीव जागा ठेवण्यात याव्यात (मागासवर्गिय व्यक्ती व्यतिरिक्त)

३) १२ वी किंवा त्यापेक्षा अधिका शिक्षण घेतलेल्या मागासवर्गीय व्यक्तीकरता ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

४) स्वातंत्र्य सौनिक/माजी किंवा त्यांच्यावर अवलंबुन असणाऱ्या व्यक्तीसाठी ५% जागा ठेवण्यात याव्यात

टीप : अर्जदाराच्या कुटुंबातील कोणत्याही (कुटुंब म्हणजे पती,पत्नी आविवाहीत मुले आणि अवलंबुन असलेले आई/वडील/बहीण/भाऊ) व्यक्तीच्या नावे इतर धंदा/व्यवसाय असल्यास अशा व्यक्तीस टपरीसाठी जागा देण्यात येवु नये.

अर्जाची छाननी करण्याकरिता खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

| अ. क्र. | | |
|---|---|---|
| १. | महापौर यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी | सदस्य |
| २. | विरोधीपक्षनेता यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | संबंधित वार्डाचे नगरसेवक | सदस्य |
| ४. | उप-आयुक्त-२ | निमंत्रक सदस्य |
| ५. | सहा. संचालक नगररचना | सदस्य |
| ६. | मालमत्ता अधिकारी | सदस्य |

i) छाननी समितीने शिफारस केलेले अर्ज स्थायी समितीकडे मान्यतेकरिता सादर करण्यात यावे व स्थायी समितीने मंजुर केल्यानुसार तात्पुरत्या कालावधी करिता टपरीसाठी जागा देण्यात यावी.

ii) छाननी समितीने टपरीचा आकार आणि डीझाइन निश्चित करावी. व त्यानुसार टपरी बसविण्याचा आदेश दयावा.

iii) सहाय्यक संचालक नगर रचना यांनी टपरीकरता देण्यात आलेल्या जागेचे भाडे निश्चित करुन स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठवावी.

iv) सध्या ज्या टपऱ्या बंद आहेत त्यांना परवानगी दिली असल्यास परवाना रद्द करण्यात यावा.

v) ज्या व्यक्तीला टपरीसाठी मंजुर झालेली असेल त्या व्यक्तीचा प्रत्यक्ष ताबा नसेल आणि दुसरी व्यक्ती सदरहु जागा वापरत असल्यास परवाना रद्द करुन ती जागा इतर व्यक्तीला देण्यात यावी.

vi) ज्या टपरीधारकांकडे भाडे थकबाकी असेल त्यांनी ३ महिने भाडे भरण्यासाठी मुदत देण्यात यावी. मुदतीनंतरही भाडे भरणा न केल्यास परवाना रद्द करण्यात यावा.

vii) टपरीसाठी जागा देतांना वाहतुक पोलिस यांचे हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

viii) ज्या कार्यलयासमोर टपरीसाठी जागा देण्यात येणार असेल त्यांच्याशी विचार विनिमय करण्यात यावा.

ix) टपरीसाठी जागा देतांना वाहतुकीस अडथळा होणार नाही. ही बाब नजरेसमोर ठेवुनच टपरीसाठी जागा देण्यात यावी.

x) शक्यतोवर गॅरेज, वर्कशॉप करिता जागा देण्यात येवु नये. कारण गॅरेज,वर्कशॉप समोर अनेक वाहने उभी राहतात व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

xi) सर्वाजनिक आरोग्यास अपाय करण्याऱ्या धंडयास/व्यवसायास तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणाऱ्या धंदयास/व्यवसाययास टपरीकरता जागा देण्यात येवु नये.

संवाद

श्री. सै.अली मिरा सलामी व श्री. हमीदउद्दीन ताबा : टपऱ्या देण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेल्या अटी या योग्य वाटत नाही, कारण शहराच्या अनेक भागात ५/६ वी पर्यंत शिक्षण घेतलेले अनेक तरुण/स्कुटर दुरुस्ती पक्चर जोडणे असे छोटे छोटे व्यवसाय करीत आहेत याचा विचार करतांना टपरी वाटपासाठी जी शिक्षणाची अट ठेवलेली आहे ती योग्य नाही. टपरी समितीने सविस्तर अहवाल दिलेला आहे तेव्हा प्रस्तावित सर्व अटी रद्द करण्यात याव्यात.

श्री. म.मुस्ताक अहमद : स्थायी समितीच्या ठरावनुसार टपरी उपसमितीची नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यानुसार या समितीने आपला अहवालही दाखल केला आज जो प्रस्ताव सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे तो तयार करतांना टपरी समितीने दिलेल्या अहवालाचा त्यात विचार करण्यात आलेला दिसत नाही आज छोटे छोटे व्यवसाय करण्याऱ्यांमध्ये अनेक तरुण १२ वी पेक्षा कमी शिक्षण घेतलेले आहेत. त्यांची संख्या जवळ जवळ १ लाखावर आहे. तेव्हा प्रस्तावात ठेवण्यात आलेली १२ वी शिक्षणाच्या अटी ऐवजी सुशिक्षित बेरोजगार अशी अट ठेवण्यात यावी. अशी प्रस्तावीत अटी पैकी क्र. २,३ या अटी रद्द करण्यात याव्यात. तसेच क्र. ५ ची अट चुकीची असुन उपसमितीच्या अहवालनुसार सध्या जी व्यक्ती टपरी चालवित आहे त्याच व्यक्तीला परवाना देवुन नियमित करण्यात यावी. या बाबीचा विचार करता अटक ५,७,१० या अटी जाचक असल्यामुळे रद्द करण्यात याव्यात या अटीचा समावेश राहिल्यास प्रशासन कोणत्याही सुशिक्षित बेकारास टपरीसाठी जागा देवु शकणार नाही. तेव्हा टपरी समितीच्या अहवालानुसार शहराचे सौदर्यात भर पडेल सुशिक्षीत बेरोजगारांना व्यवसाय उपलब्ध अशा पध्दतीने टपरीसाठी जागा देण्यात यावी.

श्री. गजानन बारवाल टपरीसाठी जागा दिल्यानंतर संबंधीताने दिलेल्या जागेच्या आतच आपला व्यवसाय केला पाहिजे याची नोंद घ्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : प्रशासनातर्फे ज्या नागरिकाला टपरीसाठी जागा देण्यात येइल त्याच व्यक्तीने सदर जागेवर व्यवसाय करणे जरुरी आहे. परवाना दिलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त अन्य नागरिक त्या ठिकाणी व्यवसाय करतांना आढळल्यास अथवा पोटभाडयाने दिल्याचे आढळुन आल्यास असा परवाना रद्द करावा.

श्री. म.मुस्ताक अहमद : टपरीसाठी जागा देतांना जी आरक्षणे ठेवण्यात आलेली आहेत त्यात पत्रकार बंधुसाठी काही प्रमाणत आरक्षण ठेवण्यात यावे.

सौ. लता दलाल : प्रस्तावित प्रस्तावानुसार १-६-९५ पुर्वी असलेली टपरी नियमित करण्यात यावी आणि १-६-९५ नंतर लावण्यात आलेली टपरी काढुन टाकावी असे टपरी समितीच्या अहवालात म्हटल्याचे नमुद केले असले तरी वर नमुद केलेली कोणतीही माहिती आज प्रशासनाकडे उपलब्ध नाही. फक्त वार्ड क्र.

५१ पुरताच विचार करावयाचा झाल्यास प्रत्यक्ष परिस्थिती प्रशासनाकडील उपलब्ध माहिती आणि टपरी समितीच्या अहवालावरील माहिती यात फार मोठी तफावत आहे. या सर्व बाबींचा विचार करता टपरीसाठी जागा देतांना संबंधीत वार्डातील नागरिकांना ८०% इतर व्यक्तींना १५% आणि ५% टपऱ्या अंध/अपंग व्यक्तींना देण्यात याव्यात याशिवाय इतर कोणतीही अट यासाठी लागु करण्यात येऊ नये.

श्री. गजानन बारवाल : स.स.सौ. दलाल यांनी जी सुचना केली आहे त्यास मी सहमत आहे तसेच मध्यवर्ती बस स्थानकासमोरील ज्या टपऱ्या आहेत या टपऱ्यांना फक्त रात्रीच्या वेळी व्यवसाय करण्याची परवानगी दिलेली असतांनाही आज या टपऱ्यावर दिवसाही व्यवसाय केला जात आहे. तेव्हा या बाबत निमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

श्री. जयवंत ओक : टपरीसाठी जागा देतांना एका घरातील एकाच व्यक्तीला टपरीसाठी जागा देण्यात यावी. अशा पध्दतीने टपरी वाटण्याचे काम झाल्यास सर्व लोकांना प्राधान्य दिले जाइल. तसेच ज्या व्यक्तीस टपरीसाठी परवाना दिला आहे ती व्यक्ती स्वत: टपरी चालवत नसल्यास परवाना रद्द करण्यात यावा.

श्री. अब्दुल रशिद खाँ (मामु) : एक घर म्हणजे काय याची व्याख्या ठरवणे आवश्यक आहे तसेच पस्तावात वाहतुक विभागाचे ना हरकत प्रमाणपत्राची अट ठेवण्यात आली आहे. तेव्हा टपरीसाठी जागा देतांना किती ठिकाणी असे प्रमाणपत्र मिळु शकेल. प्रशासनाकडे तांत्रिक असा नगर रचना विभाग आहे. याचा विचार करतांना नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांवर या बाबत जबाबदारी टाकण्यात यावी तसेच टपरीसाठी १२ वी शिक्षणाची अट चुकीची आहे. कमी शिक्षण घेतलेले लोकही अनेक छोटे छोटे उद्योग करतात तसेच गॅरेजसाठी जागा देवु नये अशी सुचना केली आहे त्यात किमान दुचाकी गॅरेजला टपरीसाठी जागा देण्यात यावी अशी दुरुस्ती करावी.

सौ. अलका पाटील : वार्ड क्र. मधिल मेडीकलच्या रोडवर एका व्यक्तीकउे ५/५ जागा असुन त्यांनी त्या भाडयाने दिलेल्या आहेत अशा व्यक्तीकडुन सदर जागा काढुन घ्याव्यात व सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्याने द्यावेत.

मा. आयुक्त : सर किंवा कुटुंब या बाबतची व्याख्या प्रस्तावात स्पष्ट नमुद केली आहे या शिवाय स. सदस्य यांनी एक एका मुद्दयावर चर्चा करुन दुरुस्ती सुचविल्यास त्याचा विचार करता येइल.

श्री. स.मुश्ताक अहमद : सभागृहात सुचना केल्याप्रमाणे प्रस्तावित प्रस्तावातील अट क्र. २,३,५,७,१० या अटी रद्द करण्यात याव्यात.

श्री. गौतम लांडगे : अट क्र. ३ पुर्ण पणे रद्द न करता १२ वी पास व्यक्तीस प्राधान्य देण्यात यावे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

सौ. लता दलाल : प्रस्तावित प्रस्तावानुसार आरक्षणाची जी अट ठेवण्यात आलेली आहे ती लागु करतांना एखादया ठिकाणी पुर्वी असलेल्या टपऱ्या गृहीत धरुन आरक्षणाची अट लागु आहे का? आरक्षणाची अट फक्त नविन टपऱ्या वाटप करतांना लागु करण्यात येणार आहेत याचा खुलासा व्हावा. याशिवाय टपरीसाठी जागा वाटप करतांना संबंधीत वार्डाचे नगर सेवकांना विश्वासात घेवुन ८०% प्राधान्य वार्डातील नागरिकांना राहील अशी वाढ करण्यात यावी.

मा. आयुक्त : स. सदस्यांच्या सुचनेनुसार ८०% जागा वार्डातील नागरिकांना प्राधान्याने देण्यात याव्यात परंतु टपरीसाठी सर्वच वार्डात जागा उपलब्ध नाही या अटीमुळे ज्या वार्डात जागा आहेत त्याच वार्डातील लोकांना फायदा मिळेल.

श्री. मोहसिन अहमद : स.सदस्य व सभागृहनेता यांनी सुचविल्याप्रमाणे संबंधीत वार्डाचे नगरसेवकांस विश्वासात घेवुनच टपरीच्या जागेचे वाटप करावे यासाठी नगर सेवकांने दिलेल्या अर्जावर प्रथम विचार करावा आणि त्यानंतरच इतर अर्जाचा विचार व्हावा.

मा. आयुक्त : नगर सेवकांना विश्वासात घेवुन टपरीसाठी जागा द्यावी याचा अर्थ काय?

श्री. मोहसिन अहमद : नगरसेवकांना विश्वासात घेवुन म्हणजेच जे नगरसेवक सुशिक्षित बेकार अपंग अशा नागरिकांना टपरीसाठी जागा देण्याबाबत त्याच्या अर्जावर शिफारस करतील. त्याना टपरीसाठी जागा देण्यात यावी असा त्याचा अर्थ आहे.

मा. आयुक्त : स. सदस्य यांनी सुचित केल्याप्रमाणे नगरसेवकांनी शिफारस केलेल्या अर्जाचा विचार करावा असे म्हणणे सोइचे होइल. त्यासाठी नगरसेवकास विश्वासात घेवुन हा शब्द प्रयोग योग्य नाही.

श्री. गजानन बारवाल : नेहरु रोजगार योजनेसाठी ज्या प्रमाणे छापील फॉर्म देण्यात आले होते त्या प्रमाणे टपरीसाठी जागा देतांना छापील अर्जाचा फॉर्म ठेवण्यात यावा.

श्री. सै. अली मिरा सलामी : टपरी वाटपासाठी जे प्रस्तावित नियम तयार केले आहेत ते पाहता एखादया अधिकाऱ्याच्या नेमणुकीच्या वेळी जसे नियम असतात तसे नियम दिसतात. एवढे नियम करण्याची आवश्यकता नव्हती यात फक्त दर काय? साइज काय याचा विचार करण्यात यावा यासाठी जी समिति नेमण्यात आली आहे ती योग्य नाही सदर समिती बाबींचा विचार करील. यासाठी फार मोठे नियम करण्याची गरज नाही. तेव्हा सर्व नियम अटी रद्द करण्यात याव्यात सर्वच वार्डात टपरीसाठी जागा उपलब्ध आहे असे नाही याचा विचार करता ८०% वार्डातील लोकांना प्राधान्य देण्यात यावी ही अट घालण्यात येवु नये.

मा. आयुक्त : टपरीसाठी मर्यादित जागा आहे. अशा वेळी एक जागा असतांना दहा अर्ज आले तर त्याची निवड कशी करण्यात येइल. समिती स्थापन करण्यात आली असली तरी समितीला सुध्दा नियम असल्याशिवाय काम करता येणार नाही नगरसेवकास विश्वासात घ्यावे म्हणजे काय?

श्री.अ.रशिदखॉन (मामु) : जी समिती तयार केली आहे त्या समितीकडे अर्ज पाठवावा समिती सर्व करुन घेऊन चिठ्ठी पध्दती वापरता येइल.

श्री. प्रकाश निकाळजे : समितीकडे टपरी बाबतची सर्व व्यवस्था दिल्यांस नगरसेवक याचा वेगळा अर्थ काढतील तेव्हा नियम ठरवुन प्रशासनाकडे टपरी वाटपाचे काम देण्यात यावे अर्जदार ज्या वार्डाचा रहीवाशी आहजे या बाबत नगरसेवका कडुन खातरजमा करुन घ्यावी.

श्री. अ.रशिदखॉन (मामु), श्री. गजानन बारवाल : नगरसेवकास विश्वासात घ्या म्हणजे आलेल्या अर्जावर संबंधीत वार्डाचे नगरसेवकाची शिफारस असावी असा त्याचा अर्थ आहे.

सौ. लता दलाल : टपरी दिल्यानंतर त्या ठिकाणी काही प्रसंग उद्‌भवला तर नगरसेवक त्या ठिकाणी धावुन जातात अशा वेळी देण्यात आलेलीर टपरी कोणास

दिली आहे ती व्यक्ती कोण याची माहिती असावी. म्हणुन जे फॉर्म्स भरुन घेण्यात येणार आहेत त्या बरोबर वार्डाचा प्रतिनिधी या नात्याने नगरसेवकाचे पत्र असणे जरुरीचे आहे. असा त्याचा अर्थ आहे.

श्री.अ.रशिद खान (मामु), श्री. गजानन बारवाल, श्री. मोहसिन अहेमद, श्री. हाळनोर : टपरीसाठी आलेल्या अर्जावर ज्या प्रमाणे प्रशासन कार्यवाही करणार आहे त्याच प्रमाणे वार्डात टपरीसाठी कोणकोणत्या व्यक्तींनी अर्ज दिले आहेत याची माहिती व्हावी यासाठी अर्जासोबत नगरसेवकाचे शिफारस पत्र घ्यावे असा विश्वासात घ्या याचा अर्थ आहे यावर जास्त चर्चा करुन जसा जसा अर्थ काढला जाइल तसा तो वेगवेगळा निघेल.

श्री. भागवत कराड : टपरी वाटपाच्या विषयावर बरीच चर्चा झाली टपरी वाटपाच्या वेळी सर्व प्रकारचे व्यवसायाच्या टपऱ्या यात असाव्यात अशी सुचना आहे (उदा झेरूक्स/भाजीपाला/टाईप. इ) या शिवाय ८०% किंवा त्यापेक्षा जास्त रुंद असलेल्या रस्त्यावरील टपऱ्यांना पुढे परवानगी देणार किंवा त्या टपऱ्या काढण्यात येणार याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : टपऱ्या वाटप करतांना फक्त गरजु व बेरोजगार व्यक्तींना टपऱ्या देण्यात येतील प्रस्तावातील अट क्र. २,३,७,१० या अटी वगळण्यात येत आहेत.

श्री. प्रकाश निकाळजे,श्री. गौतम लांडगे : प्रस्तावित प्रस्तावातील अट क्र. ३ मधिल १२ वी ची अट वगळुनी करुन मागासवर्गियांकरिता ३०% जागा राखीव ही अट कायम ठेवण्यात यावी.

मा. महापौर : जे गरजु व्यक्ती आहेत ते टपरी टाकु शकतात १२ वी शिक्षणाची जी अट घातलेली आहे ती रद्द कशालाही अटी नाहीत टपरीसाठी जागा द्यावयाची किंवा नाही हा नगरसेवकांचा अधिकार आहे. त्यासाठी कोणत्याही आरक्षणाची अट ठेवण्यात आलेली नाही. महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत ज्या महिलेस टपरीकरता जागा दिलेली आहे अशा महिलेने दुसऱ्या व्यक्तीस टपरी चालविण्यास दिल्यास संबंधीत महिलेचा परवाना रद्द करण्यात येइल.

श्री. महंमद मुश्ताक अहेमद : सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्य देण्यात यावे.

श्री. गौतम लांडगे : टपरीसाठी केलेल्या नियमाची फक्त दुरुस्ती करण्यात येत आहे. १२ वी शिक्षणाची अट रद्द करुन मागास वर्गियासाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

श्री. अ.रशिदखॉन (मामु) : महिलांसाठी ३०% राखीव त्याचप्रमाणे मागासवर्गियांसाठी ३०% (अट क्र. ३ प्रमाणे) राखीव ठेवण्यात याव्यात अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागसवर्गिय जनजातींचा समावेश असेल.

श्री. गौतम लांडगे, श्री. प्रकाश निकाळजे : मागासवर्गियांसाठी आरक्षण ठेवण्यात यावेत त्याशिवाय दुसरा विषय चर्चेला घेऊ नये.

मा. महापौर : टपरी वाटपासाठी जो प्रस्ताव ठेवण्यात आला आहे त्यावर रुलींग देण्यात आली आहे. विषय क्र. २ पुर्ण झाला

सौ. अलका पाटील : टपरी वाटपासाठी सर्व प्रकारची आरक्षण रद्द करण्यात यावीत व सर्वांसाठी ओपन ठेवण्यात यावे.

श्री. प्रकाश निकाळजे : विषय क्र. २ वर खुलासा करण्यात यावा व अट क्र. ३ प्रमाणे मागासवर्गियांसाठी आरक्षण ठेवण्यात यावे.

श्री. काशीनाथ कोकाटे : टपरी नियमावलीच्या प्रस्तावात १२ वी शिक्षणाची अटी बरोबर मागासवर्गियांसाठी ३०% जागा आरक्षण ठेवण्याचे ठरले आहे. यात फक्त शिक्षणाच्या अटीचा प्रश्न आहे यात सर्व सभासदांनी १२ वी शिक्षणाची अट ठेऊ नये अशी मागणी केलेली आहे. मागासवर्गियांच्या आरक्षणाबाबत शासनाचे धोरण आहे. यास विरोध करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात येतात मग मागासवर्गियांच्या आरक्षणास विरोध का? सभागृहाचे आरक्षणाबाबतचे निश्चित धोरण काय?

सौ. लता दलाल : टपरी वाटपाबाबत आरक्षण ठरविण्यापुर्वी पुर्वीच्या टपऱ्या किती आहेत आरक्षण ठेवतांना या बाबत काय विचार केला जाणार याचा खुलासा झाल्यानंतर आरक्षण निश्चित करण्यात यावे. अन्यथा सरसकट टपऱ्या देण्यात याव्यात.

श्री. महादेव सुर्यवंशी : टपरी वाटपाबाबत प्रशासनाने वेगवेगळया प्रकारच्या अटी घातलेल्या आहेत. टपरी कमिटीने केलेल्या पाहणीत असे आढळुन आले आहे की, ज्या टपऱ्या आहेत किंवा ज्या टपऱ्या देण्यात आल्या आहेत त्यापैकी बऱ्याच टपरीधारकांनी कार्यालयात रक्कम भरलेली नाही. तेव्हा रक्कम जमा न केलेल्या टपरी धारकांचा परवाना प्रशासन रद्द करणार का? आणि जो पर्यंत पुर्वीच्या टपऱ्याचे परवाने रद्द होत नाही तो पर्यंत आरक्षणाची अट लागु करता येणार नाही. मागासवर्गियांबरोबरच प्रत्येक प्रकारचे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. आरक्षणा बाबतचा धोरणात्मक निर्णय घेतांना मागसवर्गिय/स्वातंत्रसैनिक/अपंग अशा सर्व प्रकारच्या आरक्षणाचा विचार करणे आवश्यक आहे या सर्व आरक्षणाचा विचार करावयाचा झाल्यास सर्व प्रथम यापुर्वी टरीचे जे परवाने दिले आहेत ते रद्द करणे आवश्यक आहे. आवश्यक आहे आणि हे होणार नसेल तर टपरीसाठी कुठल्याही प्रकारचे आरक्षण ठेवण्यात येवु नये. तेव्हा टपरी देतांना फक्त गरजु व्यक्तींचा विचार करण्यात यावा.

श्री. मोहसिन अहेमद : सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे मा. महापौरांनी विषय क्र. २ वरील चर्चा पुर्ण होऊन रुलींग दिलेले आहे व विषय क्र. ३ चर्चेला घेण्यात आल्याचे सुचित केले आहे त्यानंतरही सभागृहात विषय क्र. २ वर चर्चा होत आहे. तेव्हा सभागृहात कोणत्या विषयावर चर्चा चालु आहे याचा खुलासा मा. महापौरांनी करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : विषय क्र. २ वर चर्चा चालु आहे स.स. श्री. सुर्यवंशी यांनी आरक्षण गरजेचे आहे असा खुलासा केला आहे मागासवर्गिय नागरिक हजारो वर्षापासुन दारिद्रय रेषेच्या खालचे जिवन जगत आहेत. आशा नागरिकांवरील अन्याय दुर करण्यासाठी आरक्षण गरजेचे आहे तेव्हा मागासवर्गिय आणि मंडल आयोगाप्रमाणे प्रत्येकांसाठी आरक्षण ठेवण्यात यावे.

श्री. वसंत देशमुख : जातीय भावना ठेवुन कोणीही असे प्रश्न वारंवार उभे करु नये समाजाचे नेतृत्व जरुर करावे पण जातीय भावना समोर ठेवुन सभागृहाला जे खदखदत ठेवतात त्याचा आम्ही निषेध करतो.

श्री. जयवंत ओक : यापुर्वी एकाच घरातील ५/५ व्यक्तींना टपरीचे परवाने देण्यात आले आहेत ते सर्व परवाने रद्द करण्यात यावेत आणि सर्वांसाठी ओपन टपरी वाटप करावे. सर्वांना समान कायदा करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : यापुर्वी जे टपऱ्यांचे वाटप झाले त्यात मागासवर्गियावर अन्याय झालेला आहे म्हणुन टपरी वाटपात मागासवर्गियांसाठी आरक्षण ठेवण्यात यावे. हा अन्याय दुर करण्यासाठी आरक्षण ठेवणे गरजेचे आहे.

श्री. मोहसिन अहेमद : वस्तुतः आरक्षणामुळे सर्व सामान्य नागरिकांवर खुप अन्याय झालेला आहे. याचा विचार करता आरक्षणाच्या नागरिकांनी यावेळी स्वत:हुन सर्व सामान्य दिलासा मिळेल अशी भुमिका घेणे आवश्यक आहे. म्हणुन टपरीवाटपासाठी कोणतेही आरक्षण नसावे.

श्री. सै. अली मिर सलामी : टपरीवाटपासाठी प्रशासनातर्फे जे नियम दिले आहेत. त्याचा विचार करुन आरक्षण ठेवावे सर्वांसाठी ओपन ठेवावे अशा सुचना आहेत तरीपण केंद्रशासनाचे नियम कया आहेत याचा केला तर आरक्षण आवश्यक आहे. महिलांसाठी जे ३०% आरक्षण आहे त्यातही एस.सीएसटी महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात यावे. याशिवाय स्वातंत्र सैनिक/अपंग अशा प्रकारचे सर्व आरक्षण यात असणे आवश्यक आहे या सर्व बाबींचा विचार करण्यासाठी हा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा किंवा अट क्र. २ मधील १२ वीची शिक्षणाची अट रद्द करुन महिला व मागासवर्गियांसाठी नियमाप्रमाणे आरक्षण ठेवुन प्रस्ताव मंजुर अशी सभागृहास विनंती आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : टपरीसाठी ११ महिन्या करिता परवानगी दिली जाते ११ महिन्यानंतर तो परवाना नियमाप्रमाणे रद्द होतो. तरीपण शहरात आज ज्या टपऱ्या आहेत त्या ५/५,६/६ वर्षापासुन आहेत आणि टपरी धारकांनी टपरीचे भाडेही महानगरपालिकेकडे जमा केलेले नाही. अशा टपऱ्याचे परवाने रद्द करावेत व अशा टपऱ्यांना पुन्हा परवानगी देऊ नये. अशी शिफारस टपरी उप समितीने केलेली आहे.

श्री. अ.रशिद खान (मामु) : स. सदस्य यांनी जी सुचना केली ती योग्य वाटत नाही. टपरीचे भाडे स्विकारण्यात येवु नये असे आदेश असल्यामुळे जे टपरी धारक टपरीचे भाडे घेवुन येत होते त्यांचे कडुन भाडे वसुल केले गेल नाही. आणि अशा प्रकारे परवाने रद्द केल्यास महानगरपालिकेचे नुकसान होइल आरक्षण बाबत मा. महापौर यांचेही मत घेण्यात यावे.

मा. उप महापौर : विषय क्र. २ बाबत बरीच चर्चा झाली यासाठी बरेच नियम व अटी सभागृहापुढे ठेवण्यात आल्या आहे. त्यानुसार महिलांसाठी ३०% आरक्षण ठेवले तर सर्व आरक्षण नियम व अटी ठेवावे लागतील अन्यथा सर्वासाठीच ओपन ठेवण्यात यावे.

श्री. गंगाधर गाडे : एका महत्वाच्या म्हणजेच टपऱ्या विषयीच्या विषया बाबत चर्चा होत आहे. टपरी समितीने या बाबतचा अहवाल दिलेला आहे तरी पण शहरातील बेरोजगारांना थोडया फार प्रमाणात मदत करु शकु असा हा विषय असतांना काही तांत्रिक मुल्यावर तो विषय प्रलंबित ठेवला जात आहे, हे योग्य नाही. महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्याचे शासनाचे मार्गदर्शक तत्व ठरवुन दिलेले आहे. त्यानुसार मंगल आयोग/मागासवर्गिय आणि महिलांसाठी आवश्यचक ती आरक्षण ठेवुन या बाबतचे सर्व अधिकार प्रशासनास देण्यात यावे. टपरी वाटप करावे आवश्यकता वाटल्यास एका एका नागरिकांची अर्जा बाबत नगरसेवकाची शिफारस घेण्यात यावी. तथापी नगरसेवकांने शिफारस केली म्हणुन प्रशासनाने ते काम केलेच पाहिजे असा त्याचा अर्थ

होता कामा नये. टपरी वाटपा बाबत त्या त्या वार्डातील नागरिकांना प्रधान्य देण्यात यावे.

श्री. मोहसिन अहेमद : ओपन नागरिकांवर आतापर्यंत खुप अन्याय झाला आहे मी त्यांचा प्रतिनिधी म्हणुन येथे काम करत आहे. सर्वासाठी टपरी वाटप ओपन ठेवावे हे माझे वैयक्तीक मत आहे. म्हणुन पुन्हा विनंती की टपरी वाटप सर्वांसाठी ओपन ठेवावे.

श्री. अ.रशिदखॉन (मामु) : मागासवर्गिय जमात ही सर्व जाती धर्मात आहे. शहराच्या काही भागात टपऱ्यासाठी जागा उपलब्ध होणार नाही (उदा. गुलमंडी,मछली-खडक) अशा ठिकाणच्या लोकांनाही टपरीसाठी जागा मिळावी म्हणुन आरक्षण ठेवणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : राज्य शासन किंवा केंद्र शासनाच्या काही योजना असतात त्या अंतर्गत अशा प्रकारचे आरक्षण ठेवलेले असते आरक्षण ठेवावयाचे किंवा नाही, हा निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : राज्य शासन किंवा केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे टपरी वाटपासाठी आरक्षण ठेवण्यात यावे.

श्री. मुश्ताक अहेमद : टपरी वाटत या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे या विषयी आणखी चर्चा करणे योग्य होणार नाही. करिता या बाबतचा निर्णय मा. महापौरांवर सोपविण्यात यावा. मा. महापौरांनी ज्या ज्या ४/५ मुदयाबाबत वगळण्याची सुचना स. सदस्यांनी केलेली आहे त्यावर विचार करुन ते मुद्दे वगळावे व हा विषय मंजुर करावा.

मा. उप-महापौर : प्रशासनाने जे नियम व अटी घालुन दिलेल्या आहेत त्या प्रमाणे मंजुरी देण्यात यावी. नसता शिक्षणाची अट रद्द करुन गरजु बेरोजगारांना आवश्यकतेनुसार टपऱ्या देण्यात याव्यात. सर्वांसाठी खुल्या या प्रमाणे टपऱ्याचे वाटप करण्यात यावे काही वार्डात टपरीसाठी जागा उपलब्ध नसली तरी ज्या वार्डात टपरीसाठी जागा आहे अशा ठिकाणचे नगरसेवकां शी चर्चा करुन हा प्रश्न मिटवता येइल.

श्री. गंगाधर गाडे : या ठिकाणी दोन विषयाची गल्लत केली जात आहे. पुर्वी ज्या-ज्या टपऱ्या आहेत (उदा. औरंगपुरा/शहागंज इ.) त्या ठिकाणी मागासवर्गियांच्या टपऱ्या दिसत नाहीत या बाबत अर्ज करुनही अशा नागरिकांना टपऱ्या मिळाल्या नाहीत तेव्हा अशा ठिकाणी या नागरिकांना टपऱ्या देता येतील या कडे बघण्यात यावे नविन ज्या टपऱ्या द्यावयाच्या आहेत हा विषय वेगळा आहे त्यासाठी काय नियम असावेत याचा विचार करावा.

सौ. लता दलाल : औरंगपुरा/ शहागंज भागात मागासवर्गियांच्या टपऱ्या नाही असा उल्लेख वारंवार केला जात आहे. आज पाहाणी केली तर औरंगपुरा भागात मागासवर्गियांच्या किती टपऱ्या आहेत हे दाखवुन देता येइल अनेक ठिकाणी ओपनच्या नागरिकांसाठी टपऱ्या दिलेल्या नाहीत खऱ्या अर्थाने न्याय द्यावयाचा असेल तर पुर्वीच्या सर्व टपऱ्यांचे परवाने रद्द करुन नव्याने टपरी वाटपा बाबत विचार करावा.

(या वेळी सर्व सभासद आप आपसात जोरजोरात बोलतात घोषणा दिल्या जातात)

मा. महापौर : विषय क्र. २ वर बरीच चर्चा झालेली आहे या प्रस्तावातील महिलांसाठीचे ३०% आरक्षणाची अट रद्द करण्यात येतील विषय क्र. ३ चर्चेला घेण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टपरीसाठी जागा वाटपा बाबत जी नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्या नियमावलीसाठी अट क्र. २ व ३ मध्ये दर्शविण्यात आलेली बारावी किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षणाची आट फक्त शिथील करण्यात येवुन अनुक्रमांक १ ते ६ पर्यंतच्या नियमाप्रमाणे टपरीसाठी जागा वाटप करणे व छाननी समिती आणि छाननी समितीच्या अनुक्रमांक १ ते ११ पर्यंतच्या अटी प्रमाणे टपरीसाठी जागा वाटप करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री. प्रकाश निकाळजे : विषय क्र. २ बाबत चुकीचा निर्णय घेण्यात आलेल्या मा. महापौरांचा धिक्कार असो. या बाबीचा निषेध करण्यात येतो.
(या वेळी काही सदस्या जोरजोरात घोषणा देतात.)

**विषय क्र. १६३/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरामध्ये विविध ठिकाणी मनपा जागेवर मनपाच्या मालकीचे दुकान केंद्र अनामत ठेवी स्विकारुन भाडे तत्वावर देण्यांसाठी खालील प्रमाणे नियम व अटी तयार करण्यात आलेल्या आहेत. कारण सदर अशा प्रकरणामध्ये मनपाच्या आर्थिक बाबींवर ताण न पडता दुकान केंद्राच्या इमारती बांधकाम करता येऊ शकतात व नागरिकांनाही दुकान केंद्रामुळे सहकार्य होते व त्यापासुन येणारे भाडयाच्या रकमेपोटी मनपाची आर्थिक बाजु सुधारु शकते.

नियम व अटी खालील प्रमाणे.

१) प्रत्येक मजल्यासाठी, दुकानासाठी स्वतंत्र निविदा भरावी लागेल.

२) निविदांमध्ये व्यवसाय धारकांने कोणता व्यवसाय करणार याचा स्पष्ट उल्लेख करावा व निविदा मंजुर झाल्यास निविदेत उल्लेख केलेला व्यवसाय करणेच त्याला बंधनकारक राहील.

३) भाडेपट्टयाचा कालावधी ताबा दिल्यापासुन प्रथमत: ३० वर्षाचा राहील कालावधी संपल्यानंतर पुन्हा ३० वर्षांनी भाडेपट्टा वाढवुन देण्याचा विचार करता येइल. तथापी त्याच्या अटी व शर्थी नव्याने त्यावेळचे परिस्थिती नुसार ठरविण्यात येतील. तसेच भाडेपट्टयाचा कालावधी वाढवुन देण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

४) दर पाच वर्षांनी प्रचलित भाडयात २५% इतकी वाढ करण्यात येइल व ती वाढ भाडेकरुंवर बंधनकारक राहील.

५) महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली अनामत रक्कम रु. ४०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्रावर खालीकरुन देतांना परत करण्यात येइल त्या रकमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

६) जी. निविदा मंजुर होइल त्या निविदा धारकांस अनामत रक्कम ४०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्रावर निविदा मंजुर झाल्यापासुन ३० दिवसाचे आता भरावी लागेल ही रक्कम ३० दिवसाचे आत न भरल्यास मंजुर निविदा नामंजुर करण्यात येइल व निविदा सोबत भरलेली बयाना रक्कम जप्त करण्यात येइल रक्कम रु. ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त)

७) संबंधीत जागेचा ताबा निविदा मान्य झाल्यापासुन शक्यतो १८ महिन्याचे आत देण्यात येइल तथापी काही अपरीहार्य कारणास्तव बांधकामासा उशिर झाल्यास त्यानंतरच्या कालवधीसाठी रु. ४०००/- या रकमेवर बॅकेचे बचत खात्यावरील त्यावेळचे दरानुसार व्याज अनुज्ञेय राहील.

८) निविदा मंजुर झाल्यास दुकानाचा वापर त्या इमारतीतील इतर संस्थांना कोणत्याही प्रकारच्या त्रास होणार नाही अशा प्रकारे करण्याचे बंधन राहील उदा. दारुचे दुकान, बिअर बार परमिटरुम, मटन दुकान, चक्की, छापखाना, स्फोटक वस्तुचे दुकान अशी व्यवसाय व इतरांना उपसर्ग पोहाचविणाऱ्या व्यवसायासाठी इच्छुकांनी निविदा भरु नये. ते वापर अनुज्ञेय केले जाणार नाहीत.

९) निविदेत दर्शविलेले व्यवसाय महानगरपालिकेस मान्य नसल्यास निविदा नाकारण्यात येइल.

१०) एकाच मजल्यासाठी सममुल्याच्या एकाहुन जास्त निविदा प्राप्त झाल्यास त्या विविध मजल्यासाठी सोडत काढुन वाटप करण्यात येइल.

११) विद्युतीकरणासाठी आवश्यक ते वायरींगचे काम संबंधीतांना महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेवुन स्वखर्चाने करुन घ्यावे लागेल व विद्युत शुल्क धारकास स्वता:भरावा लागेल. विद्युत मिटर बसुवन घ्यावे लागेल तसेच परिसर लाइट व्यवस्थेचे येणारे बील सर्वांसाठी कॉमन बील असेल तर ते प्रत्येकास विभागुन घ्यावे लागेल.

१२) धारकांस मालमत्ता कर (सर्वसामान्य कर) व इतर सर्व कर नियमाप्रमाणे भाडया व्यतिरिक्त भरावे लागतील तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याच्या खर्चापोटी दरमहा रु. ५/- (रु पाच फक्त) प्रति. चौ.मी. प्रमाणे सेवा शुल्क भाडया व्यतिरिक्त द्यावे लागेल.

१३) दुकान परस्पर हस्तांतर करुन देण्याची पोट भाडेकरु ठेवण्याचा अधिकार भाडेकरुस राहणार नाही मात्र मुळ भाडेकरुचे वारसाचे नाव महानगरपालिकेची पुर्ण परवानगीने हस्तांतर करता येइल.

१४) भाडेकरुस दुकानात फेरबदल करण्याचा अधिकार राहणार नाही असे निदर्शनास आल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करुन दुकान खाली करुन घेण्यात येइल.

१५) भाडेकरुस दुकानात फेरबदल करण्याचा अधिकार राहणार नाही दुकानाचे स्वरुपात बदल व उपयुक्तेस बाधा येइल असे बांधकाम करता येणार नाही. महानगरपालिकेच्या लेखी परवानगीने किरकोळ दुरुस्ती व रंगरंगोटी भाडेकरुस करुन घ्यावी लागेल.

१६) प्रत्येक निविदे सोबत रु. ५०००/- प्रमाणे बयाना रक्कम (इयरनेस्ट मनी) म्हणुन कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा डीमांड ड्राफ्ट किंवा रोखीने महानगरपालिका कार्यालयात भरुन त्याची मुळ पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र निविदा स्किारण्याच्या दिवशी बयाना रक्कम (इयरनेष्ट मनी) ची रक्कम रोखीने महानगरपालिका कार्यालयासत स्विकारण्यात येणार नाही. डीमांड ड्राफ्ट उपआयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या नावाने असावा व तो औरंगाबादेतील बॅकेच्या कोणत्याही शाखेत देय असावा निविदे सोबत बयाना रकमेचा (इयरनेष्ट मनी) ड्राफ्टचा रोख रक्कम भरणा केली असल्याची मुळ पावती नसल्यास त्याची निविदा विचारात

घेण्यात येणार नाही. वरील बयाना रक्कम (इयरनेष्ट मनी) ही निविदा मंजुर होतील त्यांच्याही बयाना रक्कम त्यांना भरावयाच्या अनामत रकमेच्या वेळी वळती करुन घेण्यात येईल.

१७) निविदा मंजुर झालेल्या निविदाधारकांना दुकानाचा ताबा मिळाल्यापासुन प्रत्येक वर्षी एक वर्षाचे अगाऊ भाडे महानगरपालिका कार्यालयात प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस उशिरात उशिर एप्रिल अखरे जमा करणे बंधनकारक राहील अन्यथा त्यावर १०% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

१८) निविदे मध्ये मासिक भाडयाचा उल्लेख प्रति चौ.मी. प्रमाणे करणे आवश्यक आहे उल्लेख नसल्यास तो प्रति चौ.मी. आहे असे गृहीत धरण्यात येइल व त्यानुसार कार्यवाही होइल.

१९) महसुल अधिनियमान्वये योग्य त्या किंमतीच्या मुदकांवर करारनामा करावा लागेल.

२०) कोणतीही किंवा सर्व निविदा कारण न दाखविता नाकारण्याचे अधिकार महानगरपालिका प्रशासक/आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

२१) प्रत्यक्ष रस्त्यावर झालेले वाढीव किंवा कमी बांधकाम क्षेत्रफळाप्रमाणे अर्जदारास ताबा देतांना जागेवरील उपलब्ध क्षेत्रफळानुसार व ठरलेल्या दरा नुसार प्रति चौ.मी. प्रमाणे भाडे आकारणी करण्यात येइल.

प्रस्तावत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. गिरजाराम हाळनोर : विषय क्र. ३ मधील नियम ४ मध्ये दर ५ वर्षांनी २५% ऐवजी ३०% प्रमाणे भाडयात वाढ करण्यात येइल अशी दुरुस्ती करावी.

श्री. गजानन बारवाल : दुकानासाठी जी अनामत रक्कम घेण्यात येइल त्या रक्कमेला बॅकेच्या नियमाप्रमाणे व्याज देण्यात यावे.

मा. महापौर : विषय क्र. ३ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरामध्ये विविध ठिकाणी मनपाच्या जागेवर मनपाच्या मालकीचे दुकान केंद्र अनामत ठेवी स्विकारुन भाडे तत्वावर देण्यांसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या नियम व अटी क्र. १ ते २१ पैकी अट क्र ४ दुरुस्त करुन दर पाच वर्षांनी प्रचलीत भाडयात ३०% वाढ करण्यास व बाकीच्या अटी रु. १ ते २१ जशेच्या तशा ठेवुन त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/४ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की, शासकीय अनुदानातुन प्रकल्प अंतर्गत एकुण १० व मनपा फंडातुन ३ अशा एकुण १३ बालवाडया विविध झोपडपट्टीत कार्यरत आहेत. १५०/- ठराविक मानधनावर कार्यरत आहेत. व ४ बालवाडी सेविकांची पदे रिक्त आहेत.

सर्व साधारण सभा दि. १६-९-९६ ठराव क्र. ४ नुसार दि. ०१ ऑगस्ट ९५ पासुन सर्व बालवाडी शिक्षिकांना रु. ३००/- वरुन द.म.५००/- पर्यंत मानधात वाढ करण्यात

आलेली आहे. त्याच धर्तीवर सेविकांनाही द.म.रु. १५०/- वरुन मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

श्री. प्रकाश निकाळजे : मागासवर्गिय आणि महिलांच्या आरक्षणास विरोध करण्याऱ्या मा. महापौरांचा धिक्कार असो याचा निषेध म्हणुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

वरील घोषणेनंतर विरोधी पक्षाच्या सर्व सभासदांनी अंदाजे १.५५ वाजता सभात्याग केला.

श्री. गजानन बारवाल : विषय क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ३००/- रु ऐवजी ५००/- रुपये मानधन देण्यात यावे.

श्री. गिरजाराम हाळनोर : विषय क्र. ४ नुसार सेविकांचे मानधन रु. ३००/- करण्यात यावे.

(सभात्याग केलेले स.सभासद सभागृहात प्रवेश करतात)

मा. महापौर : विषय क्र. ४ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा हद्दीतील एकुण १३ बालवाडया विविध झोपडपट्टीत कार्यरत आहेत. या सर्व बालवाडीवर (९) नऊ सेविका व (१) एक अभ्यासिका सेविका द.म. १५०/- रुपयावर कार्यरत आहेत. (४) बालवाडी सेविकांची पदे रिक्त आहेत सर्व साधारण सभा दि. १६-९-९६ च्या चर्चेच्या अनुष्यंगाने बालवाडी शिक्षिकांना रु.३००/- वरुन द.म.५००/- रु. मानधात वाढ केलेली आहे त्याच धर्तीवर बालवाडी सेविकांना रु १५०/- वरुन रु ३००/- द.म. मानधानात वाढ करण्याची व तसेच (४) चार सेविकांची रिक्त पदे भरण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/५ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना १९७५ नुसार ८० फुट रुंद रस्ता वेदांत हॉटेल ते शहानुरमिया दर्गामार्ग उस्मानपुरा व रस्ता प्रारुप विकास योजनेमध्ये सुध्दा ८० फुट प्रस्तावित आहे. सदरील रस्ता जालना रोडच्या दक्षिण भागा करिता एक महत्वाचा रस्ता असुन वेदांत हॉटेल ते शहानुरमिया दर्गा सुत गिरणीमार्गे गजानन महाराज मंदिर तसेच शहानुरवाडी व गारखेडा परिसरासाठी सदर रस्त्याचा वापर सुरु झाल्यास जालना रोडवरील व क्रांतीचौकातील रहदारी वरील ताण कमी होईल.

वेदांत हॉटेल ते शहानुरमियाँ दर्गा रोड मंजुर विकास योजने प्रमाणे जवळपास ८०%ते ९०% रस्ता तयार झालेला आहे. फक्त फुलेनगर व शहानुरवाडी या दोन झोपडपट्टी बधीत भाग संपादन करणे बाकी आहे. तरी फुलेनगर झोपडपट्टी व शहानुरवाडी झोपडपट्टी येथील सदरील रस्त्याने बाधित झालेल्या लोकांचे पुर्नवर्सन करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. गजानन बारवाल : पस्तावित रस्त्यात ज्या झोपडया बाधीत होणार आहेत त्या झोपडयासाठी पर्यायी जागा अथवा योग्य तो मोबदला देवुन हा रस्ता तयार करण्यात यावा.

मा. महापौर : विषय क्र. ५ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विकास योजना १९७५ नुसार ८० फुट रुंद रस्त्यासाठी वेदांत हॉटेल ते शहानुरमिया दर्गामार्ग मंजुर विकास योजनेप्रमाणे जवळपास ८०%ते ९०% रस्ता तयार झालेला आहे. फक्त फुलेनगर व शहानुरवाडी या दोन झोपडपट्ट्या मधील बधीत भाग संपादन करण्याची तसेच फुलेनगर व शहानुरवाडी झोपडपट्टी प्रस्तावित रस्त्यामध्ये बाधित झालेल्या लोकांचे पुर्नवर्सन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६/६ :**

सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग परिपत्रक एसईआर १२७६/६२ एमयुएन-१ सचिवाल्य मुंबई - ३२ दि. २७-२-१९७६ तसेच सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एस् व्ही आर १९७२/डी. दि. १५ जुलै १९७२ अन्वये पती पत्नी एकत्री करण्याबाबतचे शासनाचे धोरण आहे त्या अनुषंगाने महानगरपालिकेमध्ये सेवा वर्ग करण्यास मान्यता देणेस्तव तसेच शासनाच्या या धोरणाचा लाभ मनपामध्ये कार्यरत असलेल्या कर्मऱ्यांच्या पती अथवा पत्नी यांनाच देता येइल दुरुस्ती प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. हाळनोर : विषय क्र. ६ बाबत खुलासा करण्यात यावा. पती पत्नी एकत्रीकरण म्हणजे नेमके काय करण्यात येणार आहे?

सहा. आयुक्त-१ : यापुर्वी सदर विषय सभागृहापुढे ठेवण्यात आला होता त्यावेळी फक्त शिक्षक हा शब्द प्रयोग होता. सदर विषय दुरुस्त करुन ठेवतांना शासनाचे आदेशाप्रमाणे पती पत्नी असा शब्द प्रयोग वापरुन सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे महापालिका कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची पती किंवा पत्नी इतर विभागात काम करित असतील तर अशा कर्मचाऱ्यास या नियमाप्रमाणे संबंधीत कर्मचाऱ्याच्या पतीस किंवा पत्नीस महानगरपालिका कार्यालयात सामावुन घेणे असा त्याचा अर्थ आहे.

श्री. गजानन बारवाल : आताच सभागृहाने विषय क्र. ५ मंजुर केलेला आहे. परंतु हा विषय मंजुर करण्यापुर्वी या रस्त्यात किती घरे बाधीत होतात त्यांचे संपादनात किती खर्च येइल.

मा. महापौर : पर्यायी रस्ता काढता येइल का? याचा विचार करणे आवश्यक आहे तो पर्यंत सदर विषय स्थगित ठेवण्यात याचा विषय क्र. ५ मंजुर करण्यात आला असला तरी स.सदस्यांच्या मागणीनुसार सदर तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

श्री. हाळनोर गिरजाराम : विषय क्र. ६ बाबत अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा योग्य वाटत नाही. हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

श्री. गजानन बारवाल : विषय क्र.६ बाबत पुन्हा खुलासा करण्यात यावा.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी स.सभासदांच्या मागणीनुसार सविस्तर खुलासा करावा.

सहा. आयुक्त : शासनाचे पत्रकात शहरात असा उल्लेख केला आहे त्यानुसार महानगर-पालिका कार्यालयात या नियमाप्रमाणे कर्मचाऱ्यांना सामावुन घ्यावयाचे किंवा नाही या बाबत सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. गजानन बारवाल : हा विषय गोंधळाचा बनलेला आहे पती/पत्नी एकत्रीकरण करुन होण्याचा नियम शहरासाठी आहे मग अशा कर्मचाऱ्यास महानगरपालिकेत घ्यावयाचे का हे कळत नाही, त्यासाठी नविन पद निर्माण करावयाचे का? किंवा एखादी जागा रिकामी असेल तर अशा जागेवर या कर्मचाऱ्यास प्राधान्य देणार का? तेव्हा हा विषय तुर्त स्थगित ठेवावा.

श्री. अब्दुल रशिद खॉ (मामु) : पती/पत्नी एकत्रीकरण नियमानुसार एका शहरात ठेवणे हा नियम बरोबर आहे. पण सर्व कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत समावुन घेणे शक्य होणार नाही. या विषयाचा अभ्यास करण्यासाठी सदर विषय तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

मा. महापौर : विषय क्र. ६ तुर्त स्थागित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदर विषय तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १६७/७ :**

औरंगाबाद शहराच्या १९७५ मध्ये मंजुर विकास योजना प्रमाणे १०० फुट रुंद व प्रारुप विकास योजनेनुसार सिध्दार्थ गार्डन (वरद गणेश) चौक ते मिलकॉर्नर हा रस्ता ११५ फुट रुंद प्रस्तावित केलेला आहे. तथापी १९७५ च्या मंजुर विकास योजनेनुसार प्रिट्रॅव्हल चौक ते सिध्दार्थ गार्डन चौक तसेच मिलकॉर्नर ते सिटी क्लब पर्यंत संपुर्ण रस्ता १०० फुट रुंदाने विकसित करुन रहदारीस मोकळा केलेला आहे. आता फक्त सिध्दार्थ गार्डन चौक ते मिलकॉर्नर चौक हा विकास योजनेनुसार १०० फुट रुंद विकसित केलेला नाही.

हया भागात शहराचे मध्यावर्ती बस स्थानक आहे त्यामुळे येथे वाहतुकीची बरीच कोंडी होत असते. पायी चालणाऱ्यांची तसेच शेजारी असलेली हॉटेल्स च्या वापरामुळे होणारी वर्दळ खुप आहे ही हॉटेल्स रस्त्यामध्ये बाधीत होतात हा रस्ता व्ही आय पी रस्ता असल्याने सहाय्यक संचालक. नगररचना, वाहतुक व परिवहन यांनी तयार केलेल्या बस स्टॅन्ड वाहतुक सुधार योजनेतील पहिल्या टप्प्यानुसार हा रस्ता विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. रस्त्यांचे महत्व रहदारीची कोंडी पाहता हया रस्त्याच्या भुसंपादनाचा प्रस्ताव मान्य होणे आवश्यक आहे.

करिता भुसंपादन प्रस्ताव त्यास लागणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

संवाद

श्री. गजानन बारवाल : प्रस्तावित प्रस्तावनुसार नेमकी किती जागा ताब्यात घेणार त्यासाठी किती खर्च येइल याची माहिती देण्यात यावी.

श्री. अब्दुल खॉ (मामु) : प्रस्तावित प्रस्तावात सदर रस्ता १०० फुट गृहीत धरुन बांधकामा परवानगी दिली जाते तेव्हा या रस्त्यांची निश्चित रुंदी किती? प्रस्तावात रहदारीस केंद्रास अडथळा येतो असे म्हणत असतांना याचा रस्त्यावर झुनका भाकरी केंद्रास परवानगी दिली आहे. यामुळे प्रस्तावाचे निश्चित धोरण लक्षात येत नाही.

सहा. संचालक नगर रचना : वाहतुक नियंत्रणाची जी योजना तयार केली होती त्याचा एक भाग म्हणुन या टप्पा क्र. १ चे काम करण्यात येत आहे. सदर रस्ता जुन्या विकास आरखडयाप्रमाणे १०० फुट व नविन आराखडयाप्रमाणे ११५ फुट रुंद आहे परंतु त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. तरीपण बांधकाम परवानगी प्रारुप आराखडयाप्रमाणेच द्यावी लागेल.

श्री. गजानन बारवाल : प्रस्तावित प्रस्तावात दर्शविलेला रस्ता महत्वाचा आहे रस्त्यावर रहदारी मोठया प्रमाणावर असते म्हणुन सदर प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री. अ.रशिद खॉ (मामु) : प्रस्तावित रस्त्यावर महानगरपालिकेने मेडीकल क्वार्टर जवळ जे पाण्याचे कारंजे लावले आहे ते ५ फुट पुढे आहे. हा काय प्रकार आहे?

श्री. काशिनाथ कोकाटे : सभागृहात खुलासा केल्या प्रमाणे ११५ फुट रुंदीचा आरखडा मंजुर झाल्यानंतर सदर प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात यावा. तसेच या रस्त्यात बाधीत होणाऱ्या जागा बाबत पर्यायी व्यवस्था काय याचाही विचार व्हावा.

श्री. मुजीब आलमशाह खाँ : विकास आराखडयाबाबत प्लॅनिंग कमिटीची स्थापना झाली आहे. या कनिटीचा निर्णय होऊपर्यंत कोणताही ठराव सभागृहापुढे ठेवण्यात येवु नये.

मा. महापौर : विषय क्र. ७ तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थागित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १६८/८ :**

औरंगाबाद महानगरपालिका सर्व साधारण सभेचा ठराव क्र. १३/६ दि. १६/८९ अन्वये आरक्षण क्रमांक २७७ पार्कपैकी ५६२.२६ चौ.मी.जागा सिकंदर वज्द मेमोरिल ट्रस्ट तर्फे त्यांचे स्मरणार्थ उभारण्यात येणारे वास्तुसाठी वगळुन निवास भागात समिल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये वगळणे बाबत निर्णय झालेला असुल तसा प्रस्ताव महानगरपालिकेतर्फे जा.क्र./मनपा/नरवि/विमो/किके/४०७१/८९ दि. २-११-८९ अन्वये शासनास सादर केलेला आहे.

आता सध्या ट्रस्टतर्फे विनंती केल्यानंतर महानगरपालिकेने प्रस्ताव क्र. १७१ दि. १३-३-९५ चे अन्वये ट्रस्टने उपलब्ध करुन घेतलेल्या ४४३.५३ चौ.मी. वाढीव जागेसह म्हणजेच ५६२.२६+४४३.५३-१००५.७९ चौ.मी. जागा सदर आरक्षणामधुन वगळण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ वे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेच्या दृष्टीने या संबंधाची अधिसुचना दि. १८-१०-९५ रोजी दै. लोकमत व महाराष्ट्र शासन राजपत्र औरंगाबाद विभाग भाग १ दि. ३०-११-९५ चे पृष्ठांक २१११ वर प्रसिध्द झाली आहे. हया बाबत कोणतेही आक्षेप व सुचना आलेली नाही. अशा प्रकारे महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही पुर्ण केली असुन प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्यास्तव सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेने प्रस्ताव क्रमांक १७१ दि. १३-३-९५ चे अन्वये ट्रस्टने उपलब्ध करुन घेतलेल्या ४४३.५३ चौ.मी. वाढीव जागेसह म्हणजेच ५६२.२६+४४३.५३-१००५.७९ चौ.मी. जागा २७७ पार्क हया आरक्षणामधुन १९६६ वे कलम ३७ अन्वये करावयाची कार्यवाही पुर्ण झालेली असल्याने सदर जागा सिंकदर अली वज्द

मेमोरीयल ट्रस्ट तर्फे वज्द यांचे स्मरणार्थ उभारण्यात येणारे वास्तु करिता वगळुन निवास भागात समाविष्ट करणेसाठी प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६९/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथील रस्ताचे पुर्नडांबरीकरण करणे व डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां. खात्याच्या ९४-९५ च्या दरसुची नुसार रु. ११,३६,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम पुर्णडांबरीकरण करणे रु. १००.०० लाख या शिर्षकातुन करण्यास येइल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि. १२-२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे दि. २९-२-९६ रोजी स्थायी समितीत सदरच्या अंदाजपत्रकास विषय क्र. ३२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. ११,३६,३००/- चे अंदाजपत्रक यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम भागातील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरणासाठी सा.बां. खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रु. ११,३६,३००/- व सदरचा खर्च शासनाकडुन मिळण्याऱ्या रु. १००.०० लक्षअनुदानातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०/१० :**

सिडको हडको व लगतच्या परिसरात पाणी पुरवठा व्यवस्था आधिक चांगल्या पध्दतीने होण्याच्या दृष्टीने नविन जलवाहिनी अंदाजित खर्च रुपये २०.०० कोटीची योजना कार्यालयाच्या विचाराधीन आहे. सिडको हडको भागातील पाण्याची वाढती गरज व नविन नियोजित जलवाहिनी योजना विचारात घेता एन-५ व एन-७ येथील जलकुंभाची जागा अपुरी पडणार आहे एन-५ जलकुंभ परिसराच्या दक्षिण बाजुस व एन-७ जलकुंभ परिसराच्या पश्चिम बाजुस सिडको कार्यालयाच्या मालकीची जागा अनुक्रमे १३७५० चौ.मी. व ३४६६.५० चौ.मी. मोकळी आहे. सदरील जागा जलकुंभ बांधणे, पंप हाऊस, व रुम बांधणे व पाणी पुरवठयाच्या दृष्टीने आवश्यक असलेली इतर बांधकामे करण्यासाठी आवश्यक आहे सदरील जागा ही पाणीपुरवठा सारख्या आत्यावश्यक सेवेसाठी व सार्वजनिक उपयोगी कामासाठी हवी आहे. करिता वरील एन-५ व एन-७ येथील दोन्ही जागा सिडको कार्यालयाकडुन हस्तांतर करुन कार्यवाही करण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको हडको व लगतच्या परिसरात पाणी पुरवठा व्यवस्थित व चांगल्या पध्दतीने करण्यासाठी सिडको हडकोची २० कोटीची योजना विचाराधीन आहे. एन-७ जलकुंभाच्या परिसराच्या पश्चिम बाजुस सिडको कार्यलयाची मालकीची जागा अंदाजित क्षेत्रफळ अनुक्रमे १३७५० चौ.मी. व ३४६६.५० चौ.मी. असलेली मोकळी जागा जलकुंभ बांधणेसाठी तसेच पंप हाऊस बांधणेसाठी तद्त्वतच ही जागा

सार्वजनिक उपयोगी कामासाठी हवी असल्यामुळे हया दोनही जागा सिडको कार्यालयाकडुन हस्तांतर करुन घेण्याची सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/११ :**

शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर अधिनियम १९६६ चे २८ अन्वये प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) या प्रसिध्द झालेल्या विकास योजनेसंबंधी आलेल्या सुचना व हरकती यांचा विचार करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक टीपीएल् ३०९५ सी आर- ६७/९५/युडी-९ दि. ८-१-९६ रोजीच्या आदेशान्वये नियोजन समितीची नेमणुक केली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(३) अन्वये नियोजन समितीने विकास योजने संबंधी आलेल्या सुचना व हरकतीचा विचार करुन संबंधीत नागरिकांना सुनावणीसाठी बोलवुन अशा सुचना व हरकतीवरील अहवाल/निर्णय नियोजन समिती स्थापन झाल्यापासुन दोन महिन्याच्या आत नियोजन प्राधिकरणाकडे सादर करावयाचा असतो. शासनाकडुन नियोजन समितीची नेमणुक दि. ८-१-९६ राजी झाली असली तरी सदरहु आदेशान्वये प्रत महानगरपालिका औरंगाबाद यांचे कडे दि. १७-१-९६ रोजी प्राप्त झाली तद्नंतर लगेचच नियोजन समितीने स्थळ पाहणी व नागरिकांना सुनावणी देणे हे काम सुरु केले. सदरहु काम पुर्ण झाले असुन नियोजन समितीने त्या बाबतचा अहवाल/निर्णय देण्याचे काम लवकर सुरु होत आहे/ तथापी सदरहु काम नियोजन समिती स्थापन झाल्यापासुन दोन महिन्याच्या आत नसल्यामुळे दि. ८-३-९६ च्या पुढे तीन महिने नियोजन समितीत मुदत वाढ मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधिल कलम २८ (३) अन्वये प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) या प्रसिध्द झालेल्या विकास योजनेसंबंधी नागरीकांच्या सुचना व हरकतींची सुनावणी होण्यासाठी गठीत केलेल्या नियोजन समितीस दि. ८-१-९६ च्या पुढे तिन महिने नियोजन समितीच्या मुदत वाढीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२/१२ :**

औरंगाबाद महानगरपालिकेने भुतपुर्व औरंगाबाद नगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील (१९७५) "ना विकास" क्षेत्र वगळुन व शासनाने सिडको अधिसुचित (नविन औरंगाबाद) क्षेत्रांतुन वगळलेल्या क्षेत्रांसाठी प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) तयार करुन ती महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द केली असुन या बाबतची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र औ'बाद विभाग भाग - १ पुरवणी दि. ३० मार्च १९९५ पुष्ठ ५७९ व ५८० मध्ये प्रसिध्द झालेली आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये शासन राजपत्रात आधिसुचना प्रसिध्द झाल्यानंतर एक वर्षाच्या आत म्हणजेच दि. ३०-२-९६ पुर्वी सदरहु विकास योजना (सुधारित) उक्त अधिनियमांच्या कलम ३० अन्वये शासनास सादर व्हावयास हवी. कलम २६(१) नुसार विकास याजना (सुधारित) प्रसिध्द झाल्यानंतर त्याबाबत ६० दिवासाच्या आत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांमध्ये हया लोकांना सुनावणीची संधी देवुन निर्णय घेण्यासाठी व त्या बाबत आपला अहवाल सर्व साधारण सभेत सादर करण्यासाठी कलम २८ अन्वये नियोजन समिती

नियुक्त करण्याचे बाबत शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई निर्णय क्र. टीपीएस ३०९५/३०९५/९५४ सी आर-६७/९५/युडी-९ दि. ८-९-९६ अन्वये चार सदस्यांची नियुक्ती केलेली असुन महानगरपालिकेने स्थायी समितीतील तीन सभासदांची नेमणुक केली व या समितीने आपले कामकाज दि. २२-९-९६ पासुन सुरु केले व फेब्रुवारी अखेर सर्व अर्जावरील सुनावणीचे काम पुर्ण केले असुन नियोजन समितीचा अहवाल लवकरच तयार होवुन सर्व साधारण सभेपुढे सादर होइल. त्यानंतर सर्व साधारण सभा त्यावर निर्णय घेवुन आवश्यकतेनुसार प्रस्तावित सुधारणा बाबत विकास योजना पुन्हा प्रसिध्द करुन व त्या बाबतची पुढील कार्यवाही पुर्ण करुन व त्यानंतर अंतिम निर्णय घेवुन व त्याप्रमाणे विकास योजना (सुधारित) चे नकाशे व अहवाल तयार करुन उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये ते शासनास सादर करण्यासाठी लागणारा एकंदर कालवधी लक्षात घेता दि. ३०-३-१९९६ रोजी संपत असलेली मुदत पुढे एक वर्षासाठी म्हणजे ३० मार्च १९९७ पर्यंत वाढवुन घेणे आवश्यक आहे. करिता मुदत वाढीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेने भुतपुर्व औरंगाबाद नगरपालिकेच्या १९९५ साली मंजुर विकास योजनेतील विकास क्षेत्र वगळुन, शासनाने सिडको (अधिसुचित नविन औरंगाबाद) क्षेत्रांतुन वगळुलेल्या क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) तयार करुन प्रसिध्द केली आहे उक्त प्रारुप विकास योजनेवर प्राप्त हरकती व सुचनांची सुनावाणी होवुन निर्णय घेण्यासाठी व त्या बाबतचा आपला अहवाल सर्वसाधारण सभेस सादर करणेसाठी शासनातर्फे नियुक्त नियोजन समितीने सुनावणीचे पुर्ण केले आहे व निर्णयाचे काम बाकी आहे. सदर योजनेचे नकाशे व अहवाल सादर करावयास लागणारा कालावधी पाहता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास अहवाल सादर करणेची ३०-३-९६ रोजी संपत असलेली मुदत ३०-३-९७ पावेतो वाढवुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७३/१३ :**

स्थायी समिती ठराव क्र. ५२८/७६ दि. २९-२-९६ अन्वये मो. सिल्क मिल कॉलनी येथे बहुउद्देशिय सांस्कृतिक हॉल बांधणेच्या कामसाठी रुपये १६,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सध्या अर्थ तरतुद उपलब्ध नसल्यामुळे वाढीव तरतुद उपलब्ध होइल या अटीवर मा. आयुक्तांनी दि. २६-१२-९५ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदर हॉल शादी खाना, मंगल कार्यालय, व सांस्कृतिक सभागृह करिता उपलब्ध होइल. व भाडयापोटी येणाऱ्या रकमेतुन मनपाच्या आर्थिक बाजुवर भर पडेल. सदर कामाचे रु. १६,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन ९६-९७ मध्ये भांडवली इमारती या लेखा शिर्षामधुन करण्यात येइल, सर्व साधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. सिल्क मिल कॉलनी येथे बहुउद्देशिय हॉल बांधण्याच्या कामसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. १६,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च ९६-९७ मधिल भांडवली इमारती या लेखा शिर्षातुन व प्रसतावात दर्शविल्याप्रमाणे अटीनुसार करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/१४ :**

स.नगर सेवक श्री. रशिदखॉन (मामु) यांनी पत्र देवुन मागणी केल्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची विकास योजना महाराष्ट्र शासन नगर विकास सार्वजनिक आरोग्य गृह निर्माण विभागाची अधिसुचना क्रमांक टीपीएस/३०२७/४९५८/डब्ल्यु-२ ६ जानेवारी १९९५ अन्वये मंजुर झालेली आहे.

सदर योजनेमधील ऐतिहासिक वास्तुचे संरक्षण करण्याचे तसेच त्यांचे सौदर्यात भर पडण्याचे दृष्टीकोनातुन वास्तुपासुन ठराविक अंतरापर्यंत इतर इमारतीचे बांधकाम थांबविणे गरजेचे आहे. तसेच पानचक्की पाहण्यासाठी मोठया संखेने रोज देशी विदेशी पर्यटक येतात. त्यांना वाहने ठेवण्यासाठी वाहन तळाची आवश्यकता आहे. तसेच हया ठिकाणी बगीचा झ ााल्यास पानचक्कीच्या सौदर्यातही भर पडेल व वाहनतळापासुन महानगरपालिकेस उत्पन्न ही मिळवु शकेल त्यानुसार स.नगर सेवक यांनी सुचविल्यानुसार पानचक्की बाजुचे (पुर्व बाजु) घाटी निवास स्थानाकडील बाजुची जमीन जो मंजुर विकास योजनेमध्ये सार्वजनिक व निम सार्वजनिक भागामध्ये आहे तो बगीचा व वाहन तळ हया करिता आरक्षित करणे जरुरी आहे.

सदर जागेचा स.न. २१८ कोतवालपुरा असुन तीची चर्तु:सिमा प्रारुप विकास योजना (सुधारित) नुसार खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस १२ मटिर रुंद रस्ता

पश्चिमेस -पानचक्की लगतची खाम नदी.

उत्तरेस -१८ मिटर रुंद विकास योजना रस्ता

दक्षिणेस - कोहीनुर कॉलनी स.न. २१८

एकुण क्षेत्र -६१००.०० चौ.मी. अंदाजे.

औरंगाबाद शहराची प्रारुप विकास योजना (सु) दि. १८-३-९५ रोजी प्रसिध्द झालेली असुन ती शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यापुर्वी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम २८ खालील नियोजन समितीचे वरील फेरबदल करण्याचा प्रस्ताव विचारात घेणे योग्य होइल.

तरी प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराची प्रारुप विकास योजना (सु) दि. १८-३-९५ रोजी प्रसिध्द झालेली असुन ती शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यापुर्वी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाचे कलम २८ खालील नियोजन समितीने स.न.२१८ कोतवालपुरा येथील घाटी निवास स्थान परिसरातील पश्चिमेकडील अंदाजे ६१००.०० चौ.मी. जमीन शासकीय निमशासकीय क्षेत्रातुन वगळावी व बगीचा आणि वाहन तळ या करिता आरक्षित करावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५/१५ :**

सहाय्यक आयुक्त -१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संले.को १९९५/प्र.क्र/२६९/९५ कोषागार -१ मंत्रालय मुंबई-३२ दि. १५-१-९६ अन्वये श्री. म.न.सोनार यांची मुख्य लेखा परिक्षक या पदावर महाराष्ट्र नागरी सेवका (पदग्रहण

अवधी स्वीयेत्तर सेवा--इ) नियम १९८१ मधील सुचना क्रमांक २ नुसार प्रथमतः दोन वर्षासाठी रुजु झाल्याचे तारखेपासुन नियुक्त करण्यात आली आहे.

करिता श्री. म.न.सोनार यांना दि. २२-१-९६ पासुन महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर --इ) नियम १९८१ मधील परिशिष्ट तीन मधील अटी व शर्तीनुसार मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रथम दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीत मान्यता देण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

मुख्य लेखा परिक्षक : महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार शासनाने प्रतिनियुक्ती वर या पदासाठी नेमणुक केलेली आहे. यात २ वर्षाची मुदत दिलेली आहे त्यात सभागृहाने मान्यता द्यावी.

श्री. मोहसिन अहेमद : तुर्त एक वर्षाची मुदत देण्यात यावी.

सौ. अलका पाटील : शासनाच्या नियमानुसार दोन वर्षा ठिक आहे.

उप आयुक्त : मुख्य लेखा परिक्षकाची नियुक्ती शासनाचे आदेशाप्रामणे दोन वर्षाकरिता केलेली आहे या ऐवजी १ वर्षाची मुदत दिल्यास तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा लागेल.

श्री. मश्ताक अहमद : शासनाने दोन वर्षाची मुदत दिली असली तरी त्यास मान्यता देण्याचा आधिकार सभागृहाचा आहे तेव्हा एक वर्षाचे मुदतीस मंजुरी द्यावी.

श्री. अ.जावेद रज्जाक : मुख्य परिक्षकांना रुजु होवुन दोन महिन्याचा कालवधी लोटला आहे तेव्हा २ वर्षाकरिता नियुक्ती करण्यात यावी.

मा. महापौर : विषय क्र. १५ मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिका औरंगाबाद यांनी मागणी केल्यानुसार शासनाने निर्णय क्र. स.ले.को १९९५/प्रक्र/२६९/९५ कोषागार, मंत्रालय मुंबई -३२ दि. १५-१-९६ अन्वये श्री. म.न.सोनार यांची दि. २२-१-९६ पासुन महानगरपालिकेत नियम १९८१ मधील परिशिष्ट ३ मधील अटी व शर्तीनुसार मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रथम दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/१६ :**

सहाय्यक आयुक्त १ यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई -३२ यांचे निर्णय क्रमांक एस.ए.ओ-३१९३/१९४२/९३-प्रशा-२ दि. ५२ऑगस्ट १९९५ अन्वये श्री. एस.आर. पंडीत यांचा शिक्षण आधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका औ'बाद या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालवधी दि. २५ पासुन दि. १४ एप्रिल १९९६ पर्यंत वाढविण्यात आला होता आता श्री.एस.आर पंडीत शिक्षणाधिकारी यांना प्रतिनियुक्तीवरील पुढील मुदत वाढ दि. २५ एप्रिल १९९६ ते दि. २४ एप्रिल १९९७ एक वर्षासाठी वाढवुन देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद

श्री. गजानन बारवाल,श्री. हाळनोर : या पुर्वीच्या कार्य काळात चागले काम केले आहे करिता एक वर्षाची मुदत देण्यात यावी. शाळत बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत.

श्री. मुजीब आलमशा खाँ : शिक्षणाधिकारी यापुर्वीच्या काळापेक्षा चागले काम करणार असतील तर एक वर्ष मुदतवाढ द्यावी.

ॲड गणेश वानखेडे : शिक्षणाधिकारी यांचा यापुर्वीचा कार्यकाल चागला आहे. शाळेच्या कामात बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत एक वर्ष मुदत वाढ देण्यात यावी.

श्री. मुश्ताक अहेमद : स.सदस्यांच्या सुचनेस सहमत आहे.

श्री. अ.रशिद खॉ. (मामु) : महापालिका शाळेत झालेली सुधारणा ही मा. आयुक्त यांच्या मुळे झालेली आहे. शिक्षणाधिकारी यांचा कार्यकालही चांगला आहे एक वर्ष मुदत वाढ देण्यात यावी.

मा. महापौर : विषय क्र. १६ मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई -३२ यांचे निर्णय क्र.एस.ए.ओ-३१९३/१९४२/९३-प्रशा-२ दि. ५२ ऑगस्ट १९९५ अन्वये श्री. एस.आर. पंडीत शिक्षणाधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका औ'बाद या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालवधी दि. २५ एप्रिल १९९५ पासुन दि. १४ एप्रिल १९९६ पर्यंत मुदत शासनाचे प्रस्तावित होती श्री. एस.आर.पंडीत शिक्षणाधिकारी यांना या प्रतिनियुक्तीचा कार्यकाळ समाधानकारक व चांगला असल्यामुळे पुढील मुदतवाढ दि. २५ एप्रिल १९९६ ते दि. २४ एप्रिल १९९७ असा एक वर्षासाठी वाढवुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७७/१७ :**

औरंगाबाद शहरात "छत्रपती संभाजी महाराज" यांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे अशी असंख्य नागरिकांची वाढती मागणी आहे शहरातील बाबा पेट्रोलपंप परिसरात बरीच खुली जागा उपलब्ध आहे शहरातील काही मान्यवर पंजीकृत विश्वासंस्था सदर स्मारक उभारण्यास भरीव आर्थिक मदत करण्यास तयार आहेत. महानगरपालिके मार्फत या परिसरातील आवश्यक तेवढी जागा संपादित करण्यात यावी महानगरपालिके मार्फत जागा संपादित करुन दिल्यास या पंजीकृत संस्थांना सदर जागी स्मारक करणे सुकर होइल. जेणकरुन भावी पिठीस छत्रपती संभाजी महाराजांचे नाव व ऐतिहासिक कार्य सदैव स्मरणात राहील, या परिसराचे सौदर्यात भर पडेल या महापुरुषाचे स्मारकासाठी प्रशस्त जागा उपलब्ध करुन दिल्याचे श्रेय महानगरपालिकेस मिळेल.

प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. जयवंत ओक श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर, सौ. रजनी जोशी,
श्री. वसंत देशमुख

संवाद

श्री. मोहसिन अहमद : अशा प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी सभागृहाने उपसमितीचे गठण केले आहे. त्यानुसार सदर विषय उपसमितीकडे वर्ग करावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : सभागृहाने पुतळा उभारणे किंवा रस्त्यास नाव देणे अशा प्रस्तावाबाबत उपसमितीचे गठण केलेले आहे. प्रस्तुत प्रस्तावात स्मारक उभारण्याची मागणी आहे त्यामुळे हा प्रस्ताव उपसमितीकडे वर्ग करण्यात येवु नये.

श्री. अ.रशिद खॉ (मामु) : प्रस्तुत प्रस्तावाच्या जागेवर गृहनिर्माण मंडळाचा ताबा होता या पैकी अर्धा भाग सदर मंडळास देण्यात आला आहे. मुळ जागा श्री. बरकतुल्ला खाँ यांचे नावे आहे, तेव्हा एक जागा दोन वेगळया कामासाठी दिली जाऊ शकत नाही, असा सर्वाच्च न्यायालयाचा निर्णय आहे. हा ठराव रद्द करण्यात यावा अशा प्रकारचे प्रस्ताव ठेवुन जातीय भावना दुखावण्याचा प्रयत्न होत आहे. सदर जागा म्हाडाने संपादन केली आहे. त्या ठिकाणी दुकान केंद्र उभारण्यात येणार आहे काही सं.सदस्यांनी संबंधीतात पैशाची मागणी केली ती रक्कम दिली गेली नाही म्हणुन हा ठराव ठेवला आहे पदमपुरा कॉर्नरवर महापालिकेची जागा आहे त्या ठिकाणी पुतळा का उभारण्यात येत नाही?

श्री. गजानन बारवाल : स.सदस्यांनी आपले शब्द मागे घ्यावेत पदमपुऱ्याच्या जागेवर महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्याचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे त्यावेळी स.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. मिरा सलामी श्री. प्रकाश निकाळजे : प्रस्तुत प्रस्तावानुसार संभाजी महाराज यांचे भव्य स्मारक उभारणेचा प्रस्ताव सभागृहापुढे आहे परंतु हे स्मारक खाजगी जागेवर उभारण्याचे प्रस्तावात नमुद केले आहे त्या ऐवजी प्रस्तुत स्मारक महानगरपालिकेच्या जागेवर उभारावे त्यास सभागृहाची मान्यता राहील.

श्री. गंगाधर गाडे : खाजगी जागा संपादन करुन स्मारक उभारण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे कोणाचा त्यास विरोध नाही त्यासाठी संबधीत जागा मालकाची संमती आहे का? संबंधीत जागा मालकाची इच्छा असेल तर सदर जागा संपादन करुन स्मारक उभारण्यात यावे.

मा. महापौर : सं सभासद यांच्या सुचनेप्रमाणे जमीन मालकाशी चर्चा करुन स्मारकासाठी जागा संपादीत करण्यात येइल.

श्री. गिरजाराम हाळनोर : जागा संपादनाचा प्रस्ताव सभागृहापुढे आहे त्यावर विचार व्हावा.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तुत प्रस्तावातील जागा संपादना बाबत संबंधीत जागा मालकाशी चर्चा करुन स्मारकासाठी जागा संपादीत करण्यात यावी.

**विषय क्र. १७८/१८ :**

मो. चिखलठाणा येथील विभागिय कार्यालयालगत ६ दुकानाचे बांधकाम करुन भाडे तत्वावर देण्याबाबत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन रक्कम रुपये १,००,०००/- अनामत रक्कम निश्चित करुन जाहीर प्रगटनाव्दारे निविदा मागणविल्या असता अनामत रक्कम जास्त असल्यामुळे एकही निविदा प्राप्त झालेली नाही. चिखलठाणा हा विभाग ग्रामीण भागात मोडत असल्यामुळे सदर दुकानासाठी ठरविलेली अनामत रक्कम वाजवी पेक्षा जास्त असल्यामुळे ती कमी करुन रक्कम रु. २०,०००/- करण्यात यावी व सदर दुकानाचे बांधकाम पुर्ण करुन दुकान भाडे तत्वावर देणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सुचक : श्री. कचरु नवपुते
अनुमोदक : श्री. अविनाश कुमावत, सौ. लता दलाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. चिखलठाणा येथील विभागिय कार्यालयालगत सहा दुकानाचे बांधकाम करण्यासाठी भाडे तत्वावर देण्याबाबत अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन अनामत रक्कम रु. १,००,०००/- महापालिकेने निश्चित केले होते परंतु हा ग्रामीण भाग असल्यामुळे अनामत रकमेसाठी एकही निविदा प्राप्त झाली नाही वाजवी रक्कम रु. २०,०००/- अनामत रक्कम म्हणुन ठेवुन घेण्याची सर्वानुमते मंजुरी दिली जाते. तसेच बांधकाम पुर्ण करुन दुकाने भाडे तत्वावर प्रदान करण्याची मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/१९ :**

मो. गणेश कॉलनी आलमगिर कॉलनी भागात अंदाजे १०,००० रहीवासी रहात असुन या वसाहतीमध्ये मध्यमवर्गीय, गरीब रहवाश्यांची संख्या जास्त आहे या भागाचे जवळपास कोठेही वाचनालय उपलब्ध नाही त्यामुळे या वसाहतीत राहणारे वयोवृध्द पुरुष, स्त्रीया, शालेय विद्यार्थी मुले मुली व दिवसभर काबाड कष्ट करणाऱ्या नागरिकांना या भागात वाचनालय सुरु करणे बाबत मागणी केली आहे. मा. विभागीय आयुक्त कार्यालयाचे मागील बाजुस महानगरपालिकेच्या मालकीची बरीच जागा उपलब्ध असुन सदर खुल्या जागेत अद्यावत व सुसज्ज असे वाचनालय सुरु केल्यास या भागातील समस्त रहीवाशांना अध्यायनाची गरज भागु शकेल. सदर जागी नविन प्रशस्त इमारत बांधण्यात यावी. व सदर जागी उर्दु व मराठी भाविक रहीवाशांसाठी वाचनालय सुरु करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. अ.जावेद रज्जाक
अनुमोदक : श्री. के.के. बैनाडे

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तावातील दर्शविलेली जागेची नगर रचना विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करुन सदरील प्रस्ताव अहवाल सादर झाल्यानंतर सदरील प्रस्ताव पुढच्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १८०/२०:**

मो. गणेश कॉलनी आलमगिर कॉलनी भागात मा. अप्पर विभागीय आयुक्त यांचे निवास स्थानाच्या समोरील उपव्या बाजुस महानगरपालिकेची बरीच प्रशस्त जागा पडलेली असुन सदर जागी या भागातील लहान मुलांना खेळण्यासाठी लघुउद्यान तयार करणे बाबत या भागातील रहीवासी मागणी करीत आहे. या वसाहतींमध्ये अत्यंत मोरगरिब रहीवासी छोटया छोटया घरात रहात असुन त्यांचे मुलांना उद्यानात बालकांना खेळण्यासाठी लागणारे साहित्य बसविण्यात यावे. जेणे करुन या जागी अतिक्रमण होणार नाही लहान मुलांची खेळण्याची सोय होइल.

सुचक : श्री. अ.जावेद रज्जाक

अनुमोदक : श्री. कंवरसिंग बैनाडे

**ठराव :**

मा. सभागृहात चर्चा नाही. निर्णय नाही.

**विषय क्र. १८१/२१:**

मो. आरेफ कॉलनी वार्ड क्र. ५ मधील कॉलनी मध्ये तेथील नागरीकांसाठी व्यायाम शाळेची इमारत बांधणे बाबत.

सुचक : श्री. मो. सलीम कुरैशी, श्री. अ.जावेद रज्जाक
अनुमोदक : श्री. हमीदउद्दीन ताबा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. आरेफ कॉलनी वार्ड क्र. ५ मधील कॉलनी मध्ये तेथील नागरीकांसाठी सार्वजनिक व्यायाम शाळेची इमारत बांधण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८२/२२:**

वार्ड क्र. ५ मधील असेफिया कॉलनी वार्ड क्र ५ मध्ये शाळेच्या बाजुला मोकळया जागेमध्ये विद्यार्थ्यांसाठी व लहान मुलांसाठी छोटे बालोद्यान बांधण्यात यावे.

सुचक : श्री. मो. सलीम कुरैशी श्री. अ. जावेद रज्जाक
अनुमोदक : श्री. हमीदउद्दीन ताबा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. असेफिया कॉलनी वार्ड क्र ५ मध्ये शाळेच्या बाजुला मोकळया जागेमध्ये विद्यार्थ्यांसाठी व लहान मुलांसाठी छोटे बालोद्यान निर्माण करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८३/२३:**

औरगाबाद शहरात बऱ्याच ठिकाणी लहान लहान गल्या आहेत त्या ठिकाणचा कचरा उचलण्यासाठी महानगरपालिकेचे मोठे वाहन जाऊ शकत नाही. करिता ठिकणीचा कचरा उचलण्या करीता रीक्शा खरेदी करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती आबेदा बेगम
अनुमोदक : श्री. फजल उल्लहखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील लहान लहान गल्यातील कचरा उचलण्यासाठी लोड सायकल रिक्षा खरेदी करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८४/२४ :**

सिडको (नोटीफाईड) एरिया मध्ये महानगरपालिकेच्या नगर सेवक स्वेच्छा निधीतुन काम करण्यात यावे. या भागामध्ये सिडको सुध्दा काम करीत नाही महानगरपालिका सुध्दा

काम करीत नाही. त्या करिता या भागामध्ये नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन काम करण्यास धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.

सुचक : श्री. विठ्ठल जाधव, सौ. मंदाताई काळुशे
अनुमोदक : श्री. सुदाम सोनवणे

संवाद

श्री. स.अली मिरा सलामी, श्री. प्रकाश निकाळजे,श्री. गंगाधर गाडे : सिडकोचा भाग महापालिकेच्या ताब्यात नाही, त्यास विरोध आहे, पाण्याशिवाय इतर कोणतेही सुविधा महापालिकेतर्फे दिली जात नाही. प्रथम हस्तांतरणाचा प्रस्ताव मंजुर करावा सिडकोची जागा नसेल तर हरकत नाही.

मा. महापौर : विषय क्र. ८ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको नोटीफाईड एरिया मध्ये सार्वजनिक कामे स्ट्रीट लाइट पोस्ट, मुत्र्या,ड्रेजेज पाइप लाइन, पा.पु. पाइप लाइन, सार्वजनिक रस्ते इ. कामे करण्यासाठी त्या भागामधुन निवडुन आलेल्या नगर सेवकांच्या स्वेच्छानिधी मधुन सदर कामे पुर्ण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८५/२५ :**

नारेगांव वसाहतीसाठी प्रवेश करण्यासाठी फक्त वरुड रोड हा एकमेव रस्ता आहे. नारेगांवच्या तिनही बाजुंनी एम.आयडीसी एरिया आहे एमआयडीसी एरियाने नारेगांवात प्रवेश करण्यासाठी अनिल केमिकल्स ते नारेगांव हा मोठा रुंद रस्ता (१० मिटर) ठेवलेला आहे. या रस्त्यात बऱ्याच दिवसापासुन दोन व्यक्तींची घरे येतात याची पर्यायी व्यवस्था करुन रस्ता तयार करणे आणि अनिल केमिकल रोड पासुन स्लेट लेजर कंपनी आणि हिदुंस्थान फोर्जिग कंपनी यांच्या दोन्ही कंपन्यांच्या सेंटर मधुन अस्तित्वात असलेल्या गल्लीचे रुंदीकरण किमान १५ ते २० फुट करणे आवश्यक आहे जेणे करुन नारेगांव कचरा उचल्यास आणि नागरिकांची अडचण दुरकरण्यास मदत होइल दोन्ही रस्त्यांसाठी जागा संपादन करुन रस्ता उपलब्ध करुन देण्यात यावा.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. महादेव सुर्यवंशी
अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. नारेगांव वसाहमध्ये प्रवेश करण्यासाठी फक्त वरुड रोड हा एकमेव रस्ता आहे. नारेगांवच्या तिन्ही बाजुंनी एम.आयडीसी एरिया आहे प्रस्तानुसार या विभागाची अडचण दुर करण्यासाठी अनिल केमिकल्स रोड पासुन ग्रेटलेकर कंपनी आणि हिंदुस्थान फोर्जिंग कंपनी या दोन्ही कंपन्यांच्या सेंटर मधुन अस्तित्वात असलेल्या गल्ली २० फुट रुंदीकरण करण्यास व त्या गल्लीत बाधित असलेल्या घरास पर्यायी व्यवस्था करुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८६/२६ :**

औरंगाबाद महापालिका अस्तित्वात आल्यापासुन या शहराची मोठया प्रमाणावर झ ापाटयाने वाढ होत आहे. वाढत्या लोकसंखेमुळे सुविधा पुरविण्याचे महानगरपालिकेचे काम वाढत आहे. हे काम तीन कार्यकारी अभियंता करीत आहेत. परन्तु त्यांना औरंगाबाद शहरामध्ये असलेल्या महाराष्ट्र शासन उदा. टेलीफोन पी. डब्ल्यु डी, परिसर अभियांत्रिकी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ एमआयडीसी, सिडको पोलीस आयुक्त आणि महसुल इ. कार्यालयाशी समन्वय व संपर्क साधणे लागतो. या सर्व कार्यालयाचे अधिकारी वरिष्ठ श्रेणीचे आहेत त्यामुळे त्यांचेशी संपर्क साधणे महानगरपालिकेला अडचणीचे होते त्यासाठी महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता या श्रेणी मधील शहर अभियंता हे पद वरिष्ठ श्रेणी म्हणजेच अधिक्षक अभियंता या श्रेणीमध्ये रुपांतर करणे जरुरीचे आहे.

सुचक : श्री. गिरजाराम हाळनोर
अनुमोदक : श्री. महादेव सुर्यवंशी

संवाद

श्री. अ.रशिद खॉ (मामु) : महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारच्या कामासाठी एक समिति नेमलेली आहे त्यापुर्वी सभागृहानेही अशीच समिती नियुक्त केली आहे. या समितीत या बाबत विचार झाल्यानंतर निर्णय घेण्यात यावा. नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. सलामी स अली : गुणवते ऐवजी आर.के प्रमाणे ही पदे निर्माण करावयास पाहिजे.

डॉ. भागवत कराड : शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता पद निर्माण करण्यास मंजुरी देण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : स्टपिंग पॅटर्न समितीचे गठण होऊन तिन महिने झाले समितीचे काम झ ााले नाही. १९८४ ला असे पद महानगरपालिकेत होते. आज या पदाची आवश्यकता आहे. याचा विचार करता प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. गजानन बारवाल : अधिक्षक अभियंता या पदाबरोबर शहराचा वाढता विस्तार लक्षात घेवुन विद्युत विभागासाठी आणखी एक उप अभियंता पद निर्माण करावे.

मा. महापौर : विषय क्र. १० मंजुर करण्यात येतो. शासनाकडे पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महापालिकेतील कार्यकारी अभियंता या पदास अनेक प्रसशासकीय कामे असल्यामुळे शासनाच्या अनेक कार्यालयाची समन्वय व संपर्क साधावा लागतो. त्या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता या श्रेणीतील शहर अभियंता हे पद अधिक्षक अभियंता या श्रेणीमध्ये रुपांतर करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येवुन सदरील ठराव मंजुरीसाठी शासनाकडे वर्ग करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८७/२७ :**

औरंगाबाद महापालिका अस्तित्वात आल्यापासुन या शहराची मोठया प्रमाणावर झ ापाटयाने वाढत असलेल्या या शहरात बांधण्यात येत असलेल्या घरांना बांधकाम परवानगी देणे. बांधकाम प्रमाणे पत्र देणे, विकास निधीची आकारणी करणे आणि शहर विकास

आराखडयाची रचना करणे या शहर विकास आराखडयानुसार आरक्षित जागेवर विकास करणे या कामसाठी महापालिका प्रशासनांतर्गत असलेले सहाय्यक संचालक नगररचना या पदावर काम करणारे एक वरीष्ठ अधिकारी अपुरे पडतात.

करिता महापालिकेतील नगररचना विभागाचे दोन भाग करुन सध्या कार्यरत असलेल्या सहाय्यक संचालक नगर रचना या पदाकडे शहर विकास आराखडा तयार करणे, मंजुर झालेल्या शहर विकास आराखडयातील आरक्षित जागांचा नियमाप्रमाणे पुढील विकास आरखडा तयार करणे आदी कामे सोपवावीत आणि मंजुर भुमी अभिन्यासानुसार नागररिकांना बांधकाम परवानगी देणे, दिलेल्या बांधकाम परवानगी नुसार बांधण्यात आलेल्या घरांना बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे विकास निधीची वसुली आदी कामासाठी नगर रचना विभागामध्ये कार्यकारी अभियंता, नगररचना हे वर्ग -२ या संवर्गात वेतन श्रेणी (रुपये ३००० ते ४५००) या श्रेणीमध्ये नगर रचना या विभागासाठी एक पद निर्माण करुन महानगरपालिका अधिकाऱ्यांमधुन योग्य गुणवत्तेनुसार पदोन्नतीने भरण्यात यावे.

सुचक : श्री. गिरजाराम हाळनोर

अनुमोदक : श्री. कचरु नवपुते

संवाद

श्री. मुश्ताक अहेमद श्री. अ.रशिद खॉं (मामु) : प्रस्तुत प्रस्तावातील गुणवत्ता हा शब्द वगळुन आर आर प्रमाणे भरती करण्यात यावी.

मा. आयुक्त : सेवा भरती नियमात जी अर्हता नमुद केली असेल त्या प्रमाणे भरती करण्यात येइल.

श्री. गिरजाराम हाळनोर : प्रस्तुत प्रस्तावानुसार जागा भरतांना अर्हतेचा (क्लॉलीफीकेशनचा) विचार केला जावा.

मा. महापौर : प्रस्तुत प्रस्ताव मंजुर करण्यात येतो सेवा भरती नियमा प्रमाणे शासनाकडे शिफारस करण्यात येइल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेतील नगररचना विभागातील सहाय्यक संचालक या एकाच पदावर संपुर्ण शहराचा विकास आराखडा बांधकाम परवाना आरक्षित जागेवरचा विकास करणे, इ. तांत्रिक कामे बघावी लागतात. महानगरपालिका प्रशासनास अेका वरीष्ठ अधिकाऱ्याकडुन अपुरे काम होत असतात या विभागाच्या कामाच्या अनुषंगाने नगररचना वर्ग -१ या संवर्गात वेतनश्रेणी रु. ३०००/- ते ४५००/- या श्रेणीमध्ये नगर रचना विभागासाठी अेक पद करुन सदरील ठराव शासनाकडे वर्ग करण्यास सर्वानुमते मंजरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८/२८ :**

आमदार निधितुन वॉर्ड क्र. ३२ शिट नं. ४९ सिटी सर्व्हे नं. ९२७१ महानगरपालिकेच्या जागेवर या भागातील तरुणांसाठी हेल्थ क्लब बांधण्यास महानगरपालिका आम सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. मोहसिन अहमद

अनुमोदक : श्री.स.अ. एकबालोद्दीन

संवाद
मा. महापौर : विषय क्र. २८ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आमदार निधीतुन वार्ड क्र. ३२ शिट नं. ४९ सिटी सर्व्हे ९२७१ या महानगरपालिकेच्या जागेवर सार्वजनिक हेल्थ क्लब इमारत बाधंण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८९/२९ :**

चिकलठाणा वार्ड क्र. ८२ मधील आंबेडकर चौका पासुन ते अहिल्याबाई होळकर चौका पर्यंत मरक्युरी लाइट लावणे बाबत व अहिल्यादेवी होळकर चौक रुंदीकरण करणे बाबत अहिल्याबाई होळकर चौक वाहतुकीचे दृष्टीने अत्यंत अरुंद असा अतिक्रमणामुळे झ ाला आहे. तरी त्या चौकाचे रुंदीकरण व सुशोभीकरण करावे.

सुचक : श्री. विजयकुमार मेहेर
अनुमोदक : श्री. विकास जैन

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १९०/३० :**

आपल्या व महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिके मध्ये जे प्रथम व्दितीय व तृतीय श्रेणीचे कर्मचारी व अधिकारी असतील त्यांची दर तिन वर्षांनी वेगवेगळया महानगरपालिकेत बदल्या करण्यात याव्यात.

यामुळे कोणाही कर्मचाऱ्यास एकाच ठिकाणी राहुन वर्षानवर्ष काम करता येणार नाही. एकाच ठिकाणी राहील्यामुळे जे दोष निर्माण होतात ते टाळता येतील तरी शासनाने अशा प्रकारचा जी.आर. काढावा.

सुचक : श्री. विजयकुमार मेहेर
अनुमोदक : श्री. विकास जैन

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात

**विषय क्र. १९१/३१ :**

महानगरपालिकेतील शिक्षणाधिकारी श्री. एस.आर. पंडीत यांना परत त्यांच्या मुळ खात्याकडे पाठविण्यात यावे (प्रत्यावर्तीत करावे) त्याची मुदत संपल्यानंतर लगेच कारवाई करण्यात यावी.

सुचक : संजय जोशी, श्री. त्र्यंबक तुपे
अनुमोदक : श्री. संजय केनेकर, श्री. नरसिंग ढगे

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १९२/३२ :**

वार्ड क्र. ३७ भवानीनगर, रेहीदासपुरा (ढोरपुरा) व त्याला लागुन रेंगटीपुरा हया दोन्ही वस्तीत झोपडपट्टी म्हणुन घोषित करण्यात याव्यात कारण तेथील लोकांना सोयी व सुख सुविधा उपलब्ध होइल.

सुचक : श्री. त्र्यंबक तुपे

अनुमोदक : श्री. संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. भवानीनगर, वॉर्ड क्र. ३७ ढोरपुरा (रोहीदासपुरा) व त्यालाच लागुन रेंगटीपुरा या वस्तीस झोपडपट्टी म्हणुन घोषित करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/३३ :**

विठ्ठलनगर मुकुंदवाडी या वार्डात व त्या परिसरामध्ये जवळपास कुठेही प्राथमिक आरोग्य केंद्र नाही. तरी जनतेची गैरसोय होत आहे. करिता महानगरपालिकेतर्फे विठ्ठल नगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र पाहिजे करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. भगवान घडामोडे

अनुमोदक : श्री. संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विठ्ठलनगर मुकुंदवाडी या वार्डाच्या जवळपास कुठेही प्राथमिक आरोग्य केंद्र नसल्यामुळे जनतेच्या सोयी करिता मो. विठ्ठलनगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापित करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४/३४ :**

तेलंगवाडा, निजामगंज कॉलनी, दादा कॉलनी हे अत्यंत मागासलेले भाग म्हणुन ओळखले जातात. या भागातील आर्थिक दुर्बल घटक, बेरोजगारांचे प्रमाण मोठया प्रमाणावर असुन बरेच वर्ष या भागात विकासाचे काम पाहिजे त्या प्रमाणात झालेले नाहीत. यासाठी विकासाच्या गुणात्मकतेसाठी सदरील वस्त्या ज्या झोपडपट्टी वजा आहेत. त्यांच्या अंतर्भाव स्लम म्हणुन घोषित करण्यात याव्यात.

सुचक : श्री. व्ही.व्ही. देशमुख

अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तेलंगवाडा, निजामगंज कॉलनी, दादा कॉलनी हे अत्यंत मागासलेले भाग ओळखले जातात. या भागांचा नागरी विकास करण्यासाठी झोपडपट्टी म्हणुन घोषित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५/३५ :**

सभेचे सर्व कामकाज मराठी व उर्दुतुन चालेल परंतु जर एखादया प्रसंगी मराठीतुन किंवा उर्दतुन बोलण्यास असमर्थ असेल तर सभापतींनी अनुमती दिल्यास इंग्रजीतुन किंवा हिंदीतुन बोलण्याचे स्वातंत्र्य असेल.

सुचक : श्री. फजलउल्लाह खान अजमत उल्लाखान
अनुमोदक : श्रीमती मोहसिन बिल्कीस, श्रीमती जाहेद बेगम,
श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. बी.के. कराड, श्री. गौतम लांडगे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका सभेचे सर्व कामकाज मराठी व उर्दुतुन चालेल परंतु जर एखादयास मराठीतुन किंवा उर्दतुन बोलण्यास असमर्थ असल्यास सभापतींनी अनुमती प्रदान केल्यास त्यास इंग्रजीतुन किंवा हिंदीतुन बोलण्याचे स्वातंत्र्य असेल.

महानगरपालिका कामकाज नियमावलीचे नियम क्र. ५ अन्वये आतापर्यंत सभेचे कामकाज चालत आलेले आहे या नियमाची दुरुस्ती करण्याची व प्रस्तुत ठराव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९६/३६ :**

१८ खेडी तसेच स्लम झोपडपट्टी भागात रस्ता रुंदीकरण (अतंर्गत) बऱ्याच ठिकाणी घरे तसेच घरांचा भिंती तोडणे गरजेचे आहे. सदर भागातील लोकांची आर्थिक परिस्थिती दयनिय असल्याने आवश्यक त्या ठिकाणी बाधित घरांना भिंती हया घरमालकास महापालिकेच्या वतीने बांधुन देण्यात यावे व स्लम भागाचे सुशोभीकरण करण्यात सहकार्य करावे.

सुचक : श्री. महादेव सुर्यवंशी
अनुमोदक : श्री. गौतम खरात, श्री. विठ्ठलराव जाधव,
श्री. गौतम लांडगे, श्री. प्रकाश निकाळजे, श्री. अभिमन्यु भालेराव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीतील १८ खेडी तसेच स्लम झोपडपट्टी भागात रस्ता रुंदीकरण कामासाठी बाधीत होणारी घरे किंवा घराच भिंती ज्या लोकांच्या तोडल्या जातात अशा बाधीत घरांच्या भिंती घरमालकांना महानगरपालिकेच्या वतीने बांधुन देण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७/३७ :**

जयभवानीनगर, राजीवगांधीनगर, संतोषी मातानगर, लोकशाही कॉलनी अंबिकानगर, लक्ष्मी कॉलनी, जयभारत कॉलनी, सुरेवाडी, जमनज्योती,एकनाथनगर, राधास्वामीनगर या भागात सर्व गरिब कष्टकरी नागरिक राहतात. हा भाग अनाधिकृत असल्यामुळे त्यांना कुठल्याही प्रकारची सुखसुविधा पुरवता येत नाही. तरी वरील सर्व भाग झ ोपडपट्टी घोषित करण्यात यावा. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. मंदा काळुशे, सौ. विमल मुंडलिक
अनुमोदक : सौ. शिला गुंजाळे, श्री. भगवान घडामोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयभवानीनगर, राजीवगांधीनगर, संतोषीमातानगर, लोकशाही कॉलनी अंबिकानगर, लक्ष्मी कॉलनी, जयभारत कॉलनी, सुरेवाडी, जमनज्योती,एकनाथनगर, राधास्वामीनगर या सर्व वस्त्यास सुख सुविधा पुरविण्यासाठी झोपडपट्टी घोषित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *"ऐनवेळचे विषय"*

**विषय क्र. १९८/३८ :**

वार्ड क्र. ७ लेबर कॉलनी या भागात काबाडकष्ट करणारी गरिब जनता राहात आहे, या भागातील गरिब नागरिकांसाठी सर्व सोयीयुक्त असे जवळपास वाचनालय नाही ही गैरसोय दुर होण्यासाठी दिल्लीगेट जवळील परिसरातील पेट्रोल पंपा समोरील म.न.पाच्या मालकीची जागा आहे. त्या जागेवर छत्रपती संभाजीमहाराज वाचनालय या नावाने सर्व सोयीयुक्त असे वाचनालयाची इमारत बांधण्यात यावी.

सुचक : श्री. गणेश वानखेडे
अनुमोदक : श्री. रमेश लाहोट, श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन
दिनांक : १२-३-९६

दिल्लीगेट पेट्रोल पंप बाजु म.न.पा.ची मालकीची जमिनीवर मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेंटर कायम करण्यात यावा.

सुचक : श्री. हमीद ताबा, रशिद मामु
अनुमोदक : श्री. फजल उल्लाहखान
दिनांक : १२-३-१९९६

संवाद

श्री. मुजिबखॉन : सर्व साधारण सभेसाठी एक प्रस्ताव देण्यात आला होता त्याचा समावेश विषय पत्रिकेवर नाही तो का घेण्यात आला नाही याचा खुलासा व्हावा.
सदर जागा महापालिकेच्या मालकीची आहे तो विषय आजच्या सभेत आता घेण्यात यावा. प्रस्ताव यापुर्वीच दिलेला आहे.

मा. महापौर : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक नगररचना : दिल्लीगेट जवळील जागा खुली जागा म्हणुन आहे सदर जागा १९४५ साली संपादन केली आहे त्यातील काही जागा एस.टी. करिता देण्यात आली आहे. ताबाही दिलेला आहे.

श्री. हमीदोद्यीन ताबा : जदर जागेचा ताबा एसटीला दिलेला नाही अधिकारी सभागृहाची दिशाभुल करीत आहेत.

श्री. अ.जावेद रज्जाक : संबंधीत अधिकाऱ्यांना जागा ताबा देण्याचे अधिकार आहेत जागेचा ताबा दिल्याचे पत्र दाखवा.

ॲड गणेश वानखेडे : वार्ड क्र. मध्ये एकही वाचनालय नाही, वाचनालयासाठी जागा मिळावी असे पत्र आहे. तेव्हा ही जागा संभाजी वाचनालयासाठी देण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : दिल्लीगेट पेट्रोल पंपा समोरील महापालिकेची मोकळी जागेसाठी श्री. हमीद ताबा यांची मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेंटर साठी मागणी आहे. तसेच सदरील प्रभागाचे नगरसेवक श्री. गणेश वानखेडे यांनी सुध्दा सदर जागा छात्रपती संभाजी महाराज सार्वजनिक वाचनालयासाठी मागणी केलेली आहे. म्हणुन वरील उपयुक्तेसाठी सदरील जमीनीचे अर्धे अर्धे क्षेत्रफळ प्रदान करण्यात हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स. नगर सेवक, श्री. गणेश वानखेडे व श्री. हमीद ताबा याच्या प्रस्तावातील मागणीनुसार दिल्लीगेट पेट्रोल पंपा समोरील महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळया जागेचे दोन भाग मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेंटर साठी तसेच दुसऱ्या भागात छत्रपती संभाजी महाराज सर्वाजनिक वाचनालयाची इमारत उभारणेस ही जागा प्रदान करणेच सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९/३९ :**

सिडको भागास पाण्याचा फार त्रास होत आहे तरी त्या ठिकाणी बोअरींग व विहीरीचे काम त्वरीत चालु करावे.

सुचक : श्री. काशिनाथ कोकाटे

अनुमोदक : श्री. मोहसिन अहेमद, श्री. सुदाम सोनवणे, सौ. रजनी जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको भागातील नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा त्रास कमी करण्यासाठी त्या भागात ठिकाणीकाणी बोअरवेल, व जुन्या विहीरीचे गाळ काढण्याचे कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २००/४० :**

शिट क्र. २३ सिटीएस न. ३८७८ बुठीलाइन भागात ४०x४० ची मनपाची मालकीची जागा खुली आहे तेथे कलचरल हॉल मंजुर करण्यात यावा.

सुचक : काशीनाथ कोकाटे

अनुमोदक : श्री. मोहसिन अहमद, श्री. स.अ.एकबालोद्यीन,
श्री. अ.रशिद, श्री. अजीज खॉ. श्री. वसंतराव देशखमुख,
श्री. मुश्ताक अहमद, श्री. फजलखान,
श्री. हमीदोद्यीन श्री. हमीदोद्यीन ताबा,
श्रीमती आबेदा बेगम, श्री. अ.रऊफ,
श्री. अ. जावेद रज्जाक, सौ. साजेदा बेगम,
सौ. जाहेदा बेगम सौ. मोहसिना बिल्कीस

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. बुठीलैन येथील शिट न. २३ व सिटएस.नं. ३८७८ ही जागा ४०x४० चे जागेवर सांस्कृतिक हॉल बांधणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येत.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०१/४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, जिल्हा क्षय रुग्णालय (टीबी. हॉस्पीटल) ते हिमायत बागेकडे जाणारा ६० फुट (साऊ) रस्ता विकसित करणे व दोन्ही बाजुंना संरक्षक भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २८,४०००/- (रु. अठ्ठाविस लाख चाळीस हजार फक्त) चे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वर्ष १९९५-९६ च्या जिल्हा दर सुचीनुसार तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त, महानगरपालिका यांनी दिली आहे. तरी अंदाजपत्रक रु. २८,४०,०००/- चे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टीबी. हॉस्पीटल ते हिमायत बागेकडे जाणाऱ्या ६० विकास रस्त्यासाठी व दोन्ही बाजुंना संरक्षित भिंत उभारणेच्या कामासाठी सा.बा. विभागाचे वर्ष १९९५-९६ च्या जिल्हा दर सुचविनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २८,४०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

संवाद

मा. महापौर : ही सभा ००.१५ मिनिटासाठी तहकुब करण्यात येते वेळ अंदाजे ४.०० वाजता. (००.१५ मिनिटांसाठी तहकुब करण्यात आलेली सभा पुन्हा ४.१५ वाजता सुरु झाली)

श्री. प्रदिप जैस्वाल : आजच्या सभेत जे जे विषय मंजुर झालेले आहेत त्या सर्व विषयांना स्विकृती देण्यात यावी.

श्री. गजानन बारवाल, श्री. अ.रशिदखॉन (मामु), श्री. मुश्ताक अहेमद : स. सदस्यांच्या सुचनेस सहमत आहोत.

**विषय क्र. २०२/४२ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स.नगर सेवक श्री. वसंत देशमुख यांनी विनंती केल्यानुसार त्यांचे प्रभागात एक बाल संस्कार केंद्र कार्यान्वित करण्यात यावे. या बाल संस्कार केंद्रात सहा वर्षाखालील २० ते ३० बालकांना प्रवेश देण्यात येइल केंद्रात मैदानी खेळांनी प्रशिक्षण, कवायती, समरगीते, बालकांनामध्ये राष्ट्रीय प्रेम, एकात्मता वृध्दीगंत व्हावी या उद्देशाने वेळोवेळी कथाकथन, निबंध व वकृत्व स्पर्धा, चित्रकला, संघिक खेळ इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. त्यासाठी नगरसेवक प्रभागातील दानशुर व्यक्ती, स्वयंसेवी संस्थांची मदत घेतील. मनपा त्यासाठी तरतुद उपलब्ध करुन देणार नाही सदर केंद्र सुटीचे दिवस सोडुन कार्यरत राहील. मनपा तर्फे एका वर्षात एकदाच रु. २०००/- चे क्रिडा साहित्य पुरविण्यात येइल. क्रिडासाहित्याचा सांभाळ व वापरासाठी स.नगरसेवक जबाबदार राहतील तसेच ते एका स्वयंसेवक/स्वयंसेविकेची नियुक्ती करतील. सदर व्यक्तीस रु. ३००/- द.म. मानधनावर स्वयंसेवी समाज कार्यात, बाल कल्याणात आवड असणाऱ्या कोणत्याही केंद्रातुन मैदान प्रकल्प विभागाचे नियंत्रण राहील. हे केंद्र वृक्षाच्या छायेत खुल्या मैदानात दररोज सायंकाळी ५ ते ७ दरम्यान कार्यरत राहील.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३२ या संस्कार केंद्र ६ वर्षाखालील बालकांना मैदानी खेळ कवायती, समरगीते, बालकांनामध्ये राष्ट्रीय प्रेम, कथाकथन, चित्रकला, इ. प्रशिक्षण देण्यासाठी संबंधीत वार्डातील नगर सेवक. प्रभागातील दानशुर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था कडुन मदत मिळविण्यासाठी तसेच महापालिकेतर्फे वर्षातुन एकदाच रु. २०००/- रुपये तसेच क्रिडा साहित्य सांभाळण्यासाठी अेक स्वयंसेवक त्यास द्यावयाचे मानधन द.म. ३००/- रुपये या कामसाठी सेवानिवृत्त आधिकारी,शिक्षक, प्राध्यापक किंवा स्वयंसेवी समाज कार्यात आवड असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस स. नगर सेवकांने प्रवृत्त करावे. या केद्रांतुन कोणत्याही प्रकारचे धार्मिक प्रशिक्षण देण्यात येणार नाही. यासाठी बाल संस्कार केंद्रावर महापालिकेच्या प्रकल्प विभागाचे नियंत्रण राहील. संस्कार केंद्र वृक्षाच्या खुल्या छायेत खुल्या मैदानात दररोज सायंकाळी ५ ते ७ वाजताचे दरम्यान कार्यरत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३/४३ :**

वार्ड क्र. १३ नारेगांव प्रभागाच्या अंतर्गत असलेली "मिसारवाडी" हा भाग झोपडपट्टी म्हणुन घोषित करण्यात यावा.

सुचक : श्री. महादेव सुर्यवंशी

अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर

दिनांक :

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १३ नारेगांव प्रभागाच्या अंतर्गत असलेली "मिसारवाडी" हा भाग झोपडपट्टी म्हणुन घोषित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४/४४ :**

अल-हलाल कॉलनी मध्ये पाइप लाईन बसविण्या बद्दल वरील विषयी विनंतीपुर्वक अर्ज सादर करतो, की आम्ही ५०% पैसे भरु शकत नाही, कारण आमची जनता फार गरिब आहे. तरी आम्हास मोफत पाइप लाइन द्यावी आणि त्यासाठी आम्हास बजेट द्यावे ही नम्र विनंती.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.अल-हलाल कॉलनी येथे पाणी पुरवठा करण्यासाठी या वार्डातुन लोकवर्गणी खर्चाच्या २५% वसुल करुन पाइप लाईन टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०५/४५ :**

शहाबाजार येथे मनपा चे कुठेही आरोग्य केंद्र नाही तरी त्या ठिकाणी जनतेच्या सोयीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र पाहिजे त्यासाठी प्रस्ताव सादर.

सुचक : सौ. मोहसिना बिल्कीस सौ. अलका पाटील
अनुमोदक : श्री. मुजीब आलमशाह खाँ.
दिनांक : १६-३-९६

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. शहाबाजार येथे महानगरपालिकेमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र उघडणेस सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६/४६ :**

मोंढयापासुन शिवशंकर कॉलनी पुमुख रस्त्यावर टयुब ऐवजी सोडियम व्हार्स बसविण्यात यावे.

सुचक : श्री. राजकुमार बचाटे
अनुमोदक : सौ. विमबाई मुंडलीक
दिनांक : १६-३-९६

**विषय क्र. २०७/४७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. लोटा कारंजा येथे अस्तित्वात असलेल्या मनपा. या शादीखान, त्याचे छतावर पत्रे आहेत ते काढुन त्यावर आर सी सी स्लॅब टाकुन वर पहिला मजला बांधणेसाठी रक्कम रुपये २१.०० लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. व मा. आयुक्त साहेबांकडे प्रशासकीय मंजुरीस्तव पाठविण्यात आले होते, परंतु मा. आयुक्तांनी सदर बाबतीत चर्चा करण्या करिता शहर अभियंता यांना बोलवले. चर्चा नुसार शहर अभियंता यांनी सदर हॉलची आजची स्थिती चांगली आहे. सदर हॉल तोडुन बांधण्यासाठी मनपाचे रक्कम रुपये. ४.०० लाखाचे नुकसान होइल व सदर हॉल व सदर शादीखान्यातील शाळा इतरत्र हलविण्यास शादीखाना पुर्वतः वापरास मोकळा होइल व मनपाचे आर्थिक नुकसान टाळता येइल व शादीखान्याचे उत्तरे कडील बिफ मार्केट जे मोडकीस आलेले आहे ते पाडुन जमीन दोस्त करुन त्या ठिकाणी शाळा बाबत मा. आयुक्तांशी दिनांक ११-३-९६ रोजी मंजुरी दिली आहे. त्या प्रमाणे सदर कामाचे तिन टप्प्यात विभागणी केली आहे.

अ) अस्तीत्वात असलेला शादीखाना व शाळेच्या भागाचे एकत्रीकरण करुन हॉल न तोडता एकत्रिकरण त्यामध्ये हॉलचे आधुनिकीकरण करुन त्यामध्ये चिन रुमचे व अद्यावत सोयीउपलब्ध करण्यासाठी रक्कम रुपये. ५.०० लाखाची तरतुद लागेल तसेच ब) शादी खान्याचे बाजुला असलेल्या व मोडकीस आलेला बिफ मार्केटला पुर्णतः जमीन दोस्त करुन त्या ठिकाणी प्रा.शाळा व बालवाडीची अद्ययावत इमारत बांधणेसाठी आठ लक्ष रुपयांची तरतुद लागेल. तसेच क) लोटा करंजा जवळील नाल्या लगत मनपाने बिफ मार्केट साठी आरक्षीत केलेल्या जागेवर अद्ययावत बिफ मार्केट बांधणेसाठी रक्कम रुपये ५.०० लक्ष तरतुद लागेल. सबब या अ,ब,क, भागशः प्रकल्पास एकुण रुपये २०.०० लक्ष अपेक्षित आहे सबब सदर अ,ब,क प्रकल्पासाठी रक्कम रुपये २०.०० लाखचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

मंजुरी प्राप्त झाल्यास वेगवेगळया कामासाठी वेगवेगळया निविदा मागवुन व इमारतीचे उपलब्ध चांगल्या वास्तु तज्ञाकडुन नकाशे मागवुन काम हाती घेण्यात येइल.

सदरचा खर्च ९६-९७ या वर्षात (१) बिफ मार्केट (२) विकास इमारती शाळा दवाखाने बांधणे या लेखा शिर्षा मधुन करण्यात येइल.

संवाद

मा. महापौर : आजच्या सभेत जेजे विषय मंजुर झालेले आहे. त्या सर्व ठरावांना आजच्या सभेत स्विकृती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. लोटा कारंजा येथे महानगरपालिकेच्या शादीखान्यास मोडतोड न करता शादीखान्याचे उत्तरे कडील बिफ मार्केट जमिनदोस्त करुन त्या ठिकाणी शाळा बांधणेसाठी व इतर कामे तीन टप्प्यात करण्यासाठी अ,ब,क भागशः प्रकल्पास अंदाजपत्रकीय रक्कम रु. २०,०००/- (विस लाख रुपये) सन ९६-९७ या वर्षात बांधकाम करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या नंतर "जन गण मन" या राष्ट्र गिताने सभा संपल्याने मा. महापौर यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-<br>मा. नगरसचिव,<br>महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-<br>मा. महापौर,<br>महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## दिनांक ३०-३- १९९६ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा वृत्तात

शनिवार दिनांक. ३०-३-१९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांच्या अध्यक्षते खाली प्रबोधनकार कै. केशव सिताराम ठाकरे सभागृहात औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेस सुरुवात झाली.

या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.सौ. हिवराळे ज्सोत्स्ना दौलतराव | उप महापौर |
| २) | मा.सौ. रुख्मणबाई खंडेराव लोखंडे | सदस्य |
| ३) | मा.श्री. अफसखॉन यासीन खॉ | --//-- |
| ४) | मा.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ५) | मा.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ६) | मा.श्री. म.सलीम म.हनिफ कुरैशी | --//-- |
| ७) | मा.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ८) | मा.श्री. ॲड. गणेश किशनराव वानखेडे | --//-- |
| ९) | मा.सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| १०) | मा.सौ. उषा दिलीप गायकवाड | --//-- |
| ११) | मा.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| १२) | मा.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | --//-- |
| १३) | मा.श्री. लांडगे गौतम लिबांजी | --//-- |
| १४) | मा.श्री. सुर्यवंशी महादेव पुडलिक | --//-- |
| १५) | मा.श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १६) | मा.श्री. पाटील नरेंद्र यादवराव | --//-- |
| १७) | मा.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १८) | मा.श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १९) | मा.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| २०) | मा.श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| २१) | मा.सौ.शिंदे पदमा बाबुराव | --//-- |
| २२) | मा.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २३) | मा.श्री. मालाणी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २४) | मा.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | --//-- |
| २५) | मा.सौ. विसपुते धनश्री अशोक | --//-- |
| २६) | मा.सौ. फरहतबानो भ्र.मो.नवास | --//-- |
| २७) | मा.श्री. फजलउल्लाखान अलमउल्लाखॉन | --//-- |
| २८) | मा.श्री. अजित खॉ गणी खॉ | --//-- |
| २९) | मा.श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्ताफा | --//-- |
| ३०) | मा.सौ. नुरजहा बेगम अ. रहेमान | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३१) | मा.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| ३२) | मा.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर अहेमद | --//-- |
| ३३) | मा.श्री. मुजीब आलमशाह मिर आलमशाह | --//-- |
| ३४) | मा.श्रीमती मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | --//-- |
| ३५) | मा.श्री. अ.जावेद रज्जाक | --//-- |
| ३६) | मा.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३७) | मा.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३८) | मा.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३९) | मा.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ४०) | मा.श्रीमती गंगावाल पुष्पाबाई सुरेशचंद्र | --//-- |
| ४१) | मा.श्री. हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन | --//-- |
| ४२) | मा.श्री. म.अ.रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| ४३) | मा.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो. कुतुबोद्दीन | --//-- |
| ४४) | मा.श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल | --//-- |
| ४५) | मा.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४६) | मा.श्री. सय्यद अली मिरा सलामी | --//-- |
| ४७) | मा.श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ४८) | मा.श्री. संजय किसनराव केनेकर | --//-- |
| ४९) | मा.श्री. फैय्याज अहमद हाजी कुरैशी | --//-- |
| ५०) | मा.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ५१) | मा.सौ. लता श्रीनिवास दलाल | --//-- |
| ५२) | मा.श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |
| ५३) | मा.सौ. पाटील अलका रमेश | --//-- |
| ५४) | मा.सौ. धांडे शकुंतला हरीदास | --//-- |
| ५५) | मा.श्री. अ. रशिदखान (मामु) | --//-- |
| ५६) | मा.श्री. सुभाष लक्ष्मीनाराण कच्छवाह | --//-- |
| ५७) | मा.कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ५८) | मा.श्री. डॉ. कराड भागवत किसनराव | --//-- |
| ५९) | मा.सौ. आव्हाड सविता संजय | --//-- |
| ६०) | मा.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ६१) | मा.श्री. अ.रशिद अ. सत्तार | --//-- |
| ६२) | मा.श्री. विखारोद्दीन खुदबोद्दीन | --//-- |
| ६३) | मा.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ६४) | मा.श्री. गाडे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ६५) | मा.श्री. बारवाल गजानन रामकिसन | --//-- |
| ६६) | मा.श्री. ओबेरॉय मनमोहसिंग करमसिंग | --//-- |
| ६७) | मा.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ६८) | मा.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ६९) | मा.श्री. जोशी संजय रामदास | --//-- |
| ७०) | मा.श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ७१) | मा.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | --//-- |
| ७२) | मा.श्री. राजकुमार उर्फ सांडु बचाटे | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ७३) | मा.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ७४) | मा.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ७५) | मा.श्री. विठ्ठल किसन जाधव | --//-- |
| ७६) | मा.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ७७) | मा.सौ. काळुशे मंदा धनंजय | --//-- |
| ७८) | मा.श्री. गांगावे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ७९) | मा.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ८०) | मा.श्री. नवपुते कचरु चन्द्रभान | --//-- |

संवाद :

श्री. प्रदिप जैस्वाल : शहरातील जेष्ठ पत्रकार श्री. बाबा दळवी यांचे दुःखद निधन झाले आहे. सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री. प्रभाकर विधाते : स. सदस्य यांचे सुनेस माझे अनुमोदन आहे.

शहरातील जेष्ठ पत्रकार श्री. बाबा दळवी यांच्या दुःखद निधना निमित्त ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. २०८/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) अन्वये स्थायी समितीच्या आठ सदस्यांची निवडणुक करणे.

प्रथम नगर सचिव यांनी स्थायी समिती करिता निवड करण्यात येणाऱ्या आठ सदस्यांची निवड करण्या बाबतचे मतदान विषयी सविस्तर माहिती सभागृहास वाचुन दाखविली.

सुमारे २.४५ वाजता मतदानास सुरुवात झाली. मा. महापौर यांनी मतदानासाठी १.३० चा कालवधी देण्यात येत असल्याची घोषणा केली.

मत मोजणी पुढील स. सभासद निवडुन आल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. भगवान घडामोडे | ८० |
| २) | श्री. सुभाष टाकळकर | ८० |
| ३) | श्री. त्र्यंबक तुपे | ८० |
| ४) | श्री. अभिमन्यु भालेराव | ७२ |
| ५) | श्री. कचरु नवपुते | ७१ |
| ६) | श्री. विकास जैन | ६७ |
| ७) | श्री. गिरजाराम हाळनोर | ६४ |
| ८) | श्री. अ.रशिद खॉ (मामु) | ५० |

संवाद

श्री. प्रकाश निकाळजे : सध्या लोकसभा निवडणुकी निमित्त आचार संहिता लागु करण्यात आलेली आहे. अशा पारिस्थिती मतदान घेता येइल का?
या विषयी शासनाकडुन काही खुलासा आला आहे का?

मा. आयुक्त : राज्य शासनाकडुन प्राप्त झालेल्या खुलासा प्रमाणे महापौर उप महापौर स्थायी समिती सदस्य व सभापती या पदाच्या निवडणुका घेता येते.

मा. महापौर : नामनिर्देशन पत्र भरलेल्या उमेदवारांपैकी इच्छुक उमेदवारांना आपली उमेदवारी परत घेण्यासाठी ००.३० मिनिटांच्या वेळ देण्यात येतो.

श्री. मोहसिन अहेमद : काही सभासदांना मराठी भाषा समजत नाही तेव्हा मराठी व्यतिरिक्त दुसऱ्या भाषेतही मतपत्रिका तयार करण्यात यावी या पुर्वीच्या सभेत मराठी व्यतिरिक्त उर्दु भाषेत उमेदवारांची नावे देण्यात आली होती.

श्री. प्रदिप जैस्वाल : नियमावली अशा प्रकारची तरतुद नाही.

श्रीमती. मोहसिमा बिल्कीस : स. सभासदांची सुचना योग्य आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : चलनातील नोटांवर फक्त मराठी व इंग्रजी या दोन भाषेत वापर केला जातो ही नाणी सर्व वापरतात मग मतपत्रिकेवरच अन्य भाषेचा वापर करावा असा आग्रह का? ज्या स. सभासदांना आवश्यकता वाटेल अशा सभासदांना अधिकाऱ्यांची मदत घेता येइल.

श्री. मोहसिन अहेमद : सभागृहात उर्दु भाषिक २३ नगरसेवक आहेत त्यांना मराठी वाचता येत नाही त्यामुळे मत बाद होऊ शकते. म्हणुन उर्दु भाषेतुनही मतपत्रिका तयार करण्यात यावी यासाठी लेखी पत्र देत आहे.

नगर सचिव : मा. महापौर यांनी परवानगी दिली तर या मुळे तशी सोय करता येइल इच्छुक उमेदवारांना उमेदवारी परत घेण्याची वेळ संपलेली असुन एकुण बारा स. सभासद निवडणुकीसाठी उभे आहेत. (नावे वाचुन दाखविण्यात आली)

मा. महापौर : स. सदस्य श्री. मोहसिन अहमद यांनी उर्दु भाषेतील मतपत्रीकेची मागणी पत्रका व्दारे केली आहे. तरी पण ज्या स.सदस्यांना आवश्यकता असेल अशा सभासदांकरिता अधिकाऱ्याची मदत घेता येइल.

श्री. गंगाधर गाडे : सभागृहात खुलासा केलेली पध्दत कोठेच नाही स.सभासदांना उर्दु वाचता येते अशा सभासदांना अधिकाऱ्यांची मदत देणे चुकीचे आहे महापालिकेकडे उर्दु शाळा आहेत मग उर्दु भाषेत मतपत्रिका तयार करण्यास विरोध का?

ठराव :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २०(५) अन्वये स.सभासद श्री. भगवान घडामोडे श्री. सुभाष टाकळकर, श्री. त्र्यंबक तुपे, श्री. अभिमन्यु भालेराव, श्री. कचरु नवपुते, श्री. विकास जैन श्री. गिरजाराम हाळनोर, आणि अ. रशिदखॉ (मामु) या आठ सदस्यांची स्थायी समिती करिता मताधिक्याने झालेल्या निवडीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मा. नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |